
# ग. त्र्यं. माडखोलकर

## व्यक्तित्व आणि कर्तृत्व




संपादक :

डॉ. वि.स.जोग

प्रा.राम शेवाळकर

सौ. उमा माडखोलकर

प्रा.वैकुंठ इंगळे


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

मुद्रण :
**शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स**
**शासन मुद्रण लेखन सामग्री संचालनालय, मुंबई**
**द्वारा संचालित, नागपुर - ४४० ०१८**

अनुक्रमणिका

# ग. त्र्यं. माडखोलकर
# व्यक्तित्व आणि कर्तृत्व


-: निमंत्रक संपादक :-

**डॉ. वि. स. जोग**

**प्राचार्य राम शेवाळकर** **सौ. उमा माडखोलकर**

**प्रा. वैकुंठ इंगळे**



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई.



अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती :
८ ऑक्टोबर २०००

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला ,१७२ ,मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर ,मुंबई - ४०० ०१४.

**© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ**

**मुद्रक :**
शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स,
शा)सन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय अंतर्गत(
सुभाष मार्ग, नागपूर - ४४० ०१८.

किंमत : ९० रुपये

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


।भाऊराव। ........................................ १०

|भाऊरावांच्या सहवासात माझी दोन तपे|........................................ २३

|नागपूर आणि ग. त्र्यं. माडखोलकर|........................................ ३३

| संपादक असतो कसा ?| ........................................ ४६

|पत्रव्यवसायातील माझे जेष्ठ मार्गदर्शक| ........................................ ५६

| जनसंपर्कनिष्ठ पत्रकार | ........................................ ६३

| चोखंदळ संपादक कै. भाऊसाहेब | ........................................ ७४

| शिवतत्वाची पत्रकारिता |........................................ ७९

| तरुण भारतातील धार्मिक अग्रलेख |........................................ ८५

|माडखोलकर आणि मराठवाडा | ........................................ १०३

| दलितांचे हितचिंतक |........................................ १०७

| माडखोलकरांची आत्मकथने |........................................ १११

| संयुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेचे शिल्पकार | ........................................ १२५

| महाराष्ट्र एकीकरणाचा ध्यास |........................................ १३५

| माडखोलकरांचे संस्थात्मक जीवन |........................................ १४०

| ग. त्र्यं. माडखोलकर : प्रतीतिधर्मी कादंबरीकार |........................................ १४४

| माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील मार्क्सवाद | ........................................ १५५


| माडखोलकरांच्या कादंबऱ्या |........................................ १६६

| माडखोलकरांच्या त्रिदल कादंबरीची स्त्रीवादी समीक्षा |........................................ १७२

| माडखोलकरी कादंबरी : ललिता ते रेणुका |........................................ १७८

| मी पाहिलेली अमेरिका माडखोलकरांचे एक प्रवासवर्णन | ........................................ १८६

| श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी केलेला साहित्य विचार |........................................ १९९



**चिंतनमान भाऊराव**

अनुक्रमणिका

# अध्यक्षांचे मनोगत

विख्यात पत्रपंडित, संपादक, कादंबरीकार, समीक्षक आणि तत्वचिंतक ग. त्र्यं उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्यावरील गौरवग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रकाशित करावा अशा विनंती दि. ७ नोव्हेंबर १९९९ या दिवशी, विदर्भ साहित्य संघाने आयोजित केलेल्या एका सोहळ्यात मी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना केली. ती त्यांनी मान्य करतानाच या ग्रंथाचे संपादन प्राचार्य रामभाऊ शेवाळकर यांनी करावे अशी विनंती केली. दि. १४ फेब्रुवारीस मी साहित्य व संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली तेव्हा या ग्रंथाचे निम्म्याहून अधिक काम पूर्ण झाले होते.

सर्वश्री शेवाळकर, डॉ. वि. स. जोग आणि त्यांच्या सहकारी संपादक व लेखकांनी ज्या तडफेने आणि वेगाने हा ग्रंथ प्रसिद्ध करून मराठी वाचकांच्या हाती दिला त्याचा गौरव कृतज्ञतापूर्वक करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शासन आणि साहित्य व संस्कृती मंडळाची यंत्रणा यांनी या कामाचा पाठपुरावा ज्या पद्धतीने केला तिचेही कौतुक करणे आवश्यक आहे. ज्या क्षेत्रात पाऊल ठेवायचे त्या क्षेत्रावर आपल्या वाटचालीच्या अमिट खुणा उमटवायचा असा पराक्रम फार थोड्या व्यक्तींना जमतो. भाऊसाहेब माडखोलकरांच्या आयुष्याचा प्रवाह अशा प्रतीचा आहे. त्यांना चाहते होते, तसेच त्यांना टीकाकारही होते. अजातशत्रू वगैरे होण्याचा आणि त्यासाठी कातडी बचाऊपणा करण्याचा भित्रा अट्टाहास भाऊसाहेबांनी कधी बाळगला नाही, परिणामी त्यांना गृहित धरणे कुणास कधी जमले नाही. अशा व्यक्तिमत्वाचे कर्तृत्व एका ग्रंथातून समग्रपणे उभे करणे हे अवघड काम आहे. जवळच्या वा दूरच्या, संबंधातल्या वा तटस्थ अशा कोणा एका लेखकासही हे न पेलणारे काम आहे.

प्राचार्य शेवाळकर, डॉ. वि. स. जोग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेकांची मदत घेऊन हे अवघड कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मी त्या प्रयत्नाचे स्वागत करतो आणि माडखोलकरांविषयी अध्ययन करू इच्छिणाऱ्या अभ्यासकांकडून आणि त्यांच्याविषयीचे कुतुहल अजून मनात असणाऱ्या चोखंदळ वाचकांकडूनही त्याचे असेच स्वागत होईल अशी अपेक्षा बाळगतो.

दि. २ ऑक्टोबर २०००

प्रा. सुरेश द्वादशीवार
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# संपादकीय निवेदन

सुप्रसिद्ध साहित्यिक गजानन त्र्यंबक उपाख्य भाऊराव माडखोलकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एक स्मृतिग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने प्रसिद्ध व्हावा असा प्रस्ताव मंडळाच्या पुणे येथील बैठकीत प्राचार्य राम शेवाळकर यांनी मांडला. हे दायित्व माझ्यावर सोपवावे अशीही त्यांनी सूचना केली. प्राचार्य शेवाळकरांचे म्हणणे मान्य झाले. मी या ग्रंथाचा निमंत्रक संपादक झालो.

माझ्यासाठी हे आनंददायक दायित्व होते. कारण भाऊराव माडखोलकर हे माझे लेखनगुरु आहेत. शालेय जीवनापासून माडखोलकरांच्या सर्व साहित्याचा मी बुभुक्षित वाचक होतो. ना. सी फडक्यांच्या कादंबऱ्याच्या आवडीच्या काळातही माडखोलकरांच्या कादंबऱ्या वेगळी प्रेरणा देत. मुख्य म्हणजे माडखोलकरांच्या कादंबऱ्यात माझ्या जिव्हाळ्याचे नागपुर उमटावयाचे. माडखोलकरांची अनेक पात्रे नागपुरकरांच्या ओळखीची होती. माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील मार्क्सवाद आणि राष्ट्रवाद यांचा समन्वय साधणारा वैचारिक आशय मनातील एतद् विषयक विचारांना दुजोरा देई.

पत्रकार म्हणून माडखोलकरांचा नागपुरकर वाचकांशी रोज संबंध येई. कारण आम्ही दै. तरुणभारत चे वाचक होतो. शैलीदार, प्रौढ, औपरोधिक, बिडंबनपर, तेजस्वी अशा त्या अग्रलेखांनी महाराष्ट्राला घडवले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात उतरविले. माडखोलकरांनी केलेली गुणग्राहक वाड्मयीन समीक्षा त्या पिढीतीलवाचकांना प्रिय होती.

अशा भाऊराव माडखोलकरांच्या 'शताब्दीग्रंथाची' ची सिद्धता करणे हे भाग्याचे, आवडीचे काम होते. ते एक आव्हान देखील होते. कारण स्वतः भाऊरावांनी विपुल लेखन केले. त्यांनी स्वतः विषयी भरपूर लिहिले. त्यांच्यावर इतरांनी खूप लिहिले. जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या ग्रंथांची पुनर्मुद्रणे झाली. त्यांच्यावरील विशेषांकांना विशेष भर आला, अशा परिस्थितीत त्यांच्यावरील आगळावेगळा ग्रंथ सिद्ध करणे, तोही साहित्य संस्कृती मंडळाच्या लौकिकाला शोभेल असा भारदस्त असणे या दोन गोष्टी नजरेसमोर ठेवल्या. सुदैवाने संपादक मंडळातील माझे सहकारी ज्येष्ठ आणि भाऊरावांच्या परिवारातील होते. प्राचार्य राम शेवाळकरांनी या कामात मला उत्तेजन दिले, त्यांनी माझा पाठपुरावा केला. तो सुद्धा प्रकृतीच्या गंभीर चढउतारातील संक्रमण काळात ते गुंतले असताना. केवळ प्राचार्य शेवाळकरांच्या शब्दाखातर या संग्रहातील जुन्या पिढीतील लेखकांचे काही मौलिक लेख मला मिळाले. आज नानासाहेबांची प्रकृती सावरली असून त्यांच्या बहुतांश सूचनांसह हा ग्रंथ प्रकाशित होत आहे.

संपादक मंडळातील दुसऱ्या कर्तबगार सदस्या सौ. उमा चंद्रशेखर माडखोलकर यांच्याविषयीची कृतज्ञता कोणत्या शब्दात व्यक्त करावी? खरे तर भाऊराव माडखोलकरांच्या सहवासात चोवीस वर्षे घालविलेल्या या त्यांच्या प्रिय सूनबाईंनी भाऊरावांच्या आठवणींचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला असता तर मराठी साहित्याची संदर्भश्रेणी उंचावली असती. परंतु प्रत्येक गोष्ट 'स्व' ला वगळून करायची हा उमाबाईंचा कटाक्ष. त्यामुळे असा ग्रंथ लिहिला गेला नाही. मात्र स्वतः उमाताईंनी लिहिलेला एका दीर्घलेख ग्रंथात समाविष्ट

अनुक्रमणिका

केल्यामुळे या ग्रंथाची मौलिकता वाढली. उमाताईंनी, या ग्रंथात समाविष्ट केलेली अनेक छायाचित्रेही, पुरवली. माडखोलकर परिवाराने ग्रंथाच्या प्रत्येक टप्प्यावर साह्य केले.

याशिवाय संपादक मंडळातील सहकारी प्रा. वैकुंठे इंगळे यांनी या ग्रंथाच्या निर्मितीत रूचि घेतली.

हा ग्रंथ संदर्भग्रंथही व्हावा नि सर्वसामान्य वाचकांना आवडेल असा विविधांगीही व्हावा अशी लेखांची निवड केली आहे. व्यक्ती, राजकीय विचारवंत, पत्रकार, कादंबरीकार, समीक्षक/ साहित्यशास्त्रज्ञ आणि अन्य स्वरूपाचे लेखन करणारा अष्टावधानी साहित्यिक असे माडखोलकरांचे दर्शन घडविण्याचा या ग्रंथात प्रयत्न आहे. त्यातही विद्यमान महाराष्ट्रातील सर्व पिढीच्या आणि प्रवृत्तीच्या लेखकांचे भाऊसवांवरील भाष्य या ग्रंथात संकलित आहे.

ग्रंथ निर्मितीचा निर्णय आणि प्रत्यक्षात ग्रंथनिर्मितीचा दिवस यात किमान वर्षे गेली. अनेक घटना घडल्या. जुने मंडळ जाऊन नवीन मंडळ आले. सुदैवाने नवीन मंडळाचे नेतृत्व प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्यासारख्या धडाडीच्या व्यक्तीकडे आले. द्वादशीवार स्वतः नागपुरातले. तशात दै. तरुणभारतचा त्यांचा घनिष्ठ संबंध. 'तरुणभारत' मधूनच त्यांच्या वैचारिक लेखनाला प्रारंभ झाला. त्यांना माडखोलकरांचे वाङ्मयातील आणि महाराष्ट्रातील स्थान यांची जाण होती. त्यांनी उदार अंतःकरणाने हे काम आम्हीच करावे असा निर्णय दिला. त्यातही शक्य ते लवकर करावे असाही प्रयत्न केला. प्रा. द्वादशीवारांच्या धडाकेबाज गतिमानतेशी जुळवून घेताना आम्ही कमी पडलों. परंतु अखेर त्यांच्याच प्रोत्साहनामुळे हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे हेही खरेच. त्यांची मार्मिक प्रस्तावना या ग्रंथाला लाभली आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सचिव श्री. चंद्रकांत वडे म्हणजे महाराष्ट्र प्रशासनाला मिळालेली एक देणगी आहे. मंडळाचे प्रत्येक प्रकाशन उत्तम करण्यामध्ये श्री. वडे यांचा सिंहाचा वाटा असतो. याही ग्रंथाच्या निर्मितीत श्री. वडे यांनी तत्परतेने लक्ष घातले.

याशिवाय या ग्रंथातील सर्व साहित्यिक, तरुणभारत नागपूर परिवार, मुद्रक शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स (शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय मुंबई यांचे व्यवस्थापनांतर्गत) व त्यांचा कर्मचारी वर्ग, मुखपुष्ठ चित्रकार श्री. जयंत हरकरे या सगळ्यांना धन्यवाद मराठी वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

दि. २९ सप्टेंबर २०००
घटस्थापना

डॉ. वि. स. जोग
मुख्य संपादक
प्लॉट क्र. ६६, मांडवी भवन,
हिंदुस्थान कॉलनी, वर्धा मार्ग,
नागपूर - ४४० ०१५.

अनुक्रमणिका

## ।भाऊराव।

---------------------------------------------------------------------- मा.कृ.पारधी

भाऊरावांशी ऋणानुबंध जडणे हे माझ्या आयुष्यातील एक गूढ आहे, तसेच एक घबाड योगायोग आहे.

साल १९४१. नागपुरला मॉरिस कॉलेजात (सध्या 'वसंतराव नाईक विज्ञान संस्था' हे नामांतर) बी. ए. च्या तिसऱ्या वर्षाचा मी विद्यार्थी. कॉलेजच्या वसतिगृहातच राहात होतो. परीक्षा संपली होती. गावी जाण्याच्या विवंचनेत होतो.

तेवढ्यात एक बारकुळा सावळा तरुण मला भेटायला आला. नाव 'वसंत शहाणे' सांगितले. नागपुरातच हिस्लॉप कॉलेजात शिकत होता. त्यांच्या मित्रमंडळीमध्ये मी काव्य-गायन करावे म्हणून त्याने मला गळ घातली.

तेव्हा मी कवि म्हणून प्रसिध्दीला येत होतो. परंतु काव्यगायनाचे कार्यक्रम करण्याइतकी तयारी नव्हती, हौसही नव्हती. तरी शहाणेने फार आग्रह केला म्हणून कबूल झालो.

ठरलेल्या दिवशी मी सीताबर्डीवरुन महालावर शहाणेचा पत्ता काढत, पायी चालत गेलो. शहाणे भेटल्यावर त्याने मला 'चला' म्हणून शुक्रवार तळ्याकडे, महादेवाच्या देवळामागील गल्लीत नेले आणि एका दुमजली बंगलीच्या छोट्याशा फाटकापाशी उभे करून म्हणाला, 'तुम्हाला माडखोलकरांनी बोलावलंय'.

मला फार राग आला. मला काव्यगायनाला बोलावून माडखोलकरांकडे नेण्याचा हा बनाव कां? आणि मी माडखोलकरांकडे कां जायचे?

माडखोलकर फार मोठे लेखक आहेत हे मला माहित होते. त्यांच्या काही कादंबऱ्या मी वाचल्या होत्या. माझे एक-दोन सहाध्यायी मित्र त्यांच्या निकट सहवासात होते. तरी मला त्यांच्याकडे कधी जावेसे वाटले नव्हते. त्यांचे मोठेपण माझ्या फाकेमस्तीला मानवणारे नव्हते. त्यांच्यात आणि माझ्यात सामाजिक प्रतिष्ठेची एक मोठी दरी होती; ती मला ओलांडाविशी वाटत नव्हती. मी मागासलेल्या वर्गातला. त्यातून दरिद्री. त्यातून उनाड व गावठी. कंगालांनाही त्यांच्या कंगालपणाचाच अहंकार असतो.

पण त्या क्षणी हुज्जत घालणे किंवा मागे फिरणे संभावितपणाचे झाले नसते. संभावितांपुढे संभावितपणाचे संकेत पाळण्यात आम्ही अ-संभावित माणसे दक्ष असतो. (कधी कधी ते नीट जमत नाही तेव्हा आमची फजीती होते) तेव्हा 'होऊन जाऊ दे मुकाबला. पुन्हा या घराची पायरी चढायची नाही' असा कुर्रेबाज समंजसपणाचा विचार करून मी शहाणेबरोबर माडखोलकरांच्या पुढ्यात गेलो.

हैदराबादला सत्याग्रह केल्याबद्दल निजामशाही सरकारने विद्यार्थ्यांना उस्मानिया विद्यापीठातून हाकलून दिले होते. त्यांचा लोंढा नागपुरात आला होता आणि नागपुर विद्यापीठाने त्यांना उदार प्रवेश दिला

होता. त्यांच्यातील साहित्यप्रेमी विद्यार्थ्यांनी माडखोलकरांशी जवळीक साधणे स्वाभाविक होते. वसंत शहाणे त्यांच्यापैकी एक. शहाणे गेल्यावर त्यांनी माझी बरीच चौकशी केली. लेखन -वाचन, साहित्यिक आवडी - निवडी, शिक्षण, कौटुंबिक स्थिती, वगैरे. ते सहजपणी बोलत असले तरी त्यांचे ते धारदार भेदक डोळे माझा अंतरंग-ठाव घेताहेत हे मला जाणवत होते.

संध्याकाळ होत होती. त्यांची फिरण्याची वेळ. मला घेऊन ते फिरायला निघाले. त्यांच्या बंगलीसमोरच्या डावीकडच्या रस्त्याने, गणेश पेठेच्या कडेने, मॉडेल मिल्सच्या पुढे मोकळ्या मैदानात आम्ही जाऊन बसलो. येथे ते नेहमी येत असावेत. हे मैदान म्हणजे चंदनवाडी. पुढे दोन एक वर्षांनी त्यांनी याच नावाची कादंबरी लिहिली आणि तिच्यात या चंदनवाडीचा पीरसर जिवंत केला.

अंधारू लागले होते. आम्ही दोघेच त्या माळावर बसलो होतो. तेच बोलत होते. मी फक्त विचारलेल्या प्रश्नांची त्रोटक उत्तरे, संकोचून देत होतो. ज्या आस्थेने ते माझ्याशी बोलत होते ती जाणवून मी त्यांच्यापुढे हळूहळू गोगलगाय होत गेलो. त्यातून त्यांनी विचारलेल्या एका प्रश्नाने तर माझा फाकेमस्ती अहंकार पार उतरला.

‘मी तुमच्यासाठी काय करू शकतों?’ त्यांचा प्रश्न.

‘या उन्हाळ्याच्या सुटीत मला काही कामधंदा मिळवून देता आला तर बघा’

‘माझा सेक्रेटरी म्हणून काम कराल?’

या प्रश्नात मला एक मोठे आश्वासन होते. माझा बाप नुकताच वारला होता. आम्ही गरीब लोक. तो जिवंत असतानाही आणि आता त्याच्या मागे विशेषत्वाने आई व दोन भावंडे यांच्या पोषणाची जबाबदारी माझ्यावर होती. पण माझ्याजवळ कमाईचे काही नियमित साधन नव्हते. कॉलेज सांभाळून मला काही कामधंदा मिळू शकला तर हवा होता. कोणाचा सेक्रेटरी होणे म्हणजे कमाईला लागणे.

पण मी चटकन होकार दिला नाही. मी म्हणालो, ‘पुढच्या आठवड्यात माझ्या बापाची तेरवी आहे. त्यासाठी मला गावी गेलं पाहिजे. तिकडून आल्यावर सांगतो’

‘आल्यावर मला भेटा,’ असे ते म्हणाले.

दुसऱ्या दिवशी मी गावी गेलो. माझे गाव सावनेर, जिथे थोर कवि व नाटककार राम गणेश गडकरी वारले.

तेरवी झाल्यावर सात- आठ दिवस मी गावीच मरगळलो. भविष्यात अंधार होता. काय करावे हे सुचत नव्हते. निकड मात्र होती. माडखोलकरांचा ‘सेक्रेटरी (!)’ होण्याचे मला मुळीच आकर्षण नव्हते. परंतु काही

अनुक्रमणिका

कमाई करण्याचा तेवढाच एक उपाय दिसत होता. म्हणून मी नागपुरला परतलो. त्यांना भेटून सांगितले की मी त्यांच्याकडे काम करण्यास तयार आहे.

'तुझी राहण्या जेवण्याची सोय काय?' त्यांनी विचारले. 'काही नाह' मी उत्तर दिले.

कॉलेजला उन्हाळ्याची सुटी लागल्यामुळे वसतिगृह बंद झाले होते. बाहेरच सोय करणे प्राप्त होते.

'तुम्ही काय द्याल त्यानुसार खोली -बिली घेता येईल'. मी खडा टाकून पाहिला. ते किती पगार देतील याचा मला अंदाज घ्यायचा होता.

'तुला कुठे तात्पुरती सोय करता येईल का?'

म्हणजे माझा खडा वाया गेला. त्यांच्याकडून काही द्रव्य मिळण्याची आशा नाही. मी मनातून खट्टु झालो.

त्यांच्या घरापासून जवळच, शुक्रवार तळ्याकडून महालावर जाणाऱ्या रस्त्यावर, भय्या वझलवार -दाणी वगैरे तरुण कार्यकर्त्यांनी एक खाणावळ चालवली होती. भाऊराव मला तेथे घेऊन गेले. त्यांनी भय्याला सांगितले, 'हे माझे तरुण मित्र येथे रोज जेवायला येतील. पैसे मी देईन.'

म्हणजे, माझा पगार फक्त खाणावळीचे बारा रुपये! राहण्याची सोय माझी मी केली. अभिमन्यू कोसारे हा माझा एक घनिष्ठ सहाध्यायी मित्र. नव्या शुक्रवारीतील महारवाडयात त्याचे स्वतः चे दुमजली घर होते. मी नेहमी त्याच्याकडे जाऊन राहात जेवत असे. या महारवाडयाचे एक वाचनालय होते. ते एक लहानसे घरच होते. कपाटात पुस्तके थोडीशीच. फारसे कोणी वाचायला येत नसे. अभिमन्यूने ते घर मला राहायला दिले. अर्थात भाडे-बिडे काही नाही.

हा महारवाडा भाऊरावांच्या घरापासून फार लांब नव्हता. दिवसा मी त्यांच्याकडे कामाला जायचा. संध्याकाळी ते या महारवाड्यात येत आणि मला घेऊन, तेथूनच पुढे, चंदनवाडीपर्यंत फिरायला जात.

या निमित्ताने भाऊरावांचा एका महारवाड्याशी साक्षात परिचय झाला. अभिमन्यू, त्याचा वडील भाऊ हिरामण, कवि संत, वगैरे तेथील तरुण महार कार्यकर्त्यांशी स्नेहसंबंध जुळले. ते कायम टिकले. अभिमन्यूला तर नंतर त्यांच्या 'चंदनवाडी' कादंबरीत नायकाचे स्थान मिळाले.

अशा रीतीने मी भाऊरावांकडे नोकरीला लागलो. पण झाले वेगळेच. नोकरीच्या द्रव्याऐवजी मला मोठे संस्कार-धन मिळत गेले. माझे आयुष्य आजतागायत निरुद्देश व भरकटलेले. त्यात जी थोडी-फार शिस्त आली, सुविद्य वळण लागले, त्याचा उगम भाऊरावांच्या सहवासात आहे. जन्मदात्या पित्याकडून वीस वर्षांत

काही चांगले शिकायला मिळाले नव्हते, ते या धर्मपित्याच्या सहवासात शिकत राहिलो, कळत-नकळत घडत राहिलो.

नोकरीचा पहिला दिवस. मी त्यांच्या घरी माडीवर गेलो. ते ऑफिसात जायच्या तयारीत होते. ते त्या वेळी श्री. ओगल्यांच्या 'महाराष्ट्र' वृत्तपत्रात सहसंपादक होते. जाता जाता त्यांनी व्हिक्टर ह्यूगोची 'द मिझरेबल्स' ही जाडजूड कादंबरी माझ्या हातात दिली आणि म्हणाले, 'मी जेवायला येईपर्यंत पन्नास पानं वाचून ठेव.'

नोकराला काही काम देण्याऐवजी कादंबरी वाचायला देणारा मालक अजबच!

मी वाचत बसलो. पण उन्हाळ्याच्या उकाड्यामुळे वाचता वाचता डोळ्यांवर सुस्ती आली. दुपारी त्यांनीच मला झोपेतून जागे केले. मी ओशाळलो. ते रोखून पाहात हसले.

तीन-चार दिवस असेच गेले. मी फक्त ती कादंबरी वाचत होतो.

नंतर एक दिवस त्यांच्या बेढब हस्ताक्षरातली वीस पंचवीस पाने मला दिली व त्यांची सुवाच्य अक्षरात प्रत काढून ठेवण्यास फर्मावले. ते त्या वेळी 'नवे संसार' ही कादंबरी लिहीत होते. काही प्रकरणे आधी लिहून झाली होती. हे पुढचे प्रकरण होते. पुढे अशीच हस्तलिखित प्रकरणे माझ्याकडे येत गेली आणि मी त्यांच्या सुवाच्य प्रती लिहीत गेलो.

तेव्हा माझ्या लक्षात आले की त्यांच्या लिखिताच्या सुवाच्य प्रती तयार करणे हेच माझे मुख्य काम होते.

त्यांचे हस्ताक्षर गिचमिड म्हणता येणार नाही. तसे ते मोकळे लिहीत. पण अक्षर बारीक आणि त्याला काही निश्चित आकृतिबंध नाही. काहीसे फकाटलेले आकार. कधी कधी ते भराभरा लिहीत, तेव्हा अक्षरांचे आकार आणखी विसकटून जात. मला त्या हस्ताक्षराची मोडणी कळायला सराव करावा लागला. कधी त्यांचे त्यांनाही ते वाचता येत नसे. मग ते मला विचारायचे.

त्यांचे साहित्यिक लेखन ते स्वतः करीत. कोणा लेखनिकाला तोंडी सांगत नसत. त्यांनी स्वतः लिहिलेल्या लेखांची मूळ प्रत ते जपून ठेवत असत. सुवाच्य प्रत मुद्रणप्रत म्हणून छापायला जात असे. वृत्तपत्रीय लेखन घाईचे असले तरी त्याच्या बाबतीतही त्यांचा हाच परिपाठ होता असे मला वाटते.

पत्र-लेखनाच्या बाबतीत मात्र हा नियम ते मोडत असत. आपले हस्ताक्षर पत्र वाचणाऱ्याला कळणार नाही याची जाणीव त्यामागे असावी. मला ते पत्राचा मजकूर सांगत, मी तसे लिहीत जायचे. त्यातही त्यांची एक शिस्त होती. कागद कसा धरावा येथपासून त्यांच्या सूचना असत. उजव्या हाताला आपला पत्ता, तारीख, डावीकडे मायना, मजकुरात मुद्द्याबरहुकुम परिच्छेद, शब्दांची ऱ्हस्व -दीर्घ व्याकरण-शुद्धता, अशा तपशीलावर त्यांचा कटाक्ष असे.

अनुक्रमणिका

पत्रांच्या बाबतीत ते दक्ष होते. आलेल्या पत्राला लगेच उत्तर गेलेच पाहिजे. उत्तरात पाल्हाळ नको. लिहिलेला शब्द सैल असू नये. वाचणाऱ्याला बोचेल किंवा त्याचा गैरसमज होईल अशी भाषा वापरू नये. शब्द मोजके व समर्पक असावेत.

त्यांचा पत्रव्यवहार फार होता. तो सांभाळणे हे माझे दुसरे काम होते.

त्या वाचनालयात मी आठ-दहा दिवस राहिलो असेन. भाऊराव म्हणाले, 'आता तू आमच्याकडे राहायला ये.'

हे मला मोठे संकट वाटले. आतापर्यंत भाऊरावशीही मी भिडस्तपणेच, नोकराची पायरी सांभाळून वागत होतो. घरातील इतर माणसांशी वरवरचे बोलण्यापलिकडे संबंध येत नव्हता. आता त्यांच्यातला होऊन राहायचे. पण मी परका. माझ्या सवयी भणंग; मन स्वैर. या घरातील वातावरणावर सनातनी पगडा. त्यांतील माणसांचे वागणे टापटीपीचे; शिस्तीत बांधलेले. मी याच्यात कसा मिसळणार? बगळ्यांमधे कावळा.

पण फाकेमस्तीत एक बेपर्वाई असते. आलेल्या प्रसंगाला तोंड द्यायचे. मनाजोगे घडले नाही तर मानेच्या झटक्याने उडवून लावायचे. नुकसान काही नाही. आपले काही नव्हतेच तर गमावणार काय? सगळेच आयुष्य एक गाजराची पुंगी. आणि मी भाऊरावांच्या घरी राहायला गेलो.

अनुभव वेगळा आला. कोणीहि मला परकेपणाने वागवले नाही. या घरातील माणसे एकमेकांशी जशी वागत होती तशीच ती माझ्याशी वागली. मी त्यांचा एक कुटुंबीय झालो. भाऊराव वारल्यानंतरही ते नाते आजतागायत टिकून आहे. माडखोलकर कुटुंबातील सर्व जण आजही मला एक कुटुंबीयच मानतात.

या घरात मला जी आपुलकी मिळाली ती थेट माझ्या हृदयाला भिडली. बाबा (चंद्रशेखर) व मीना या मुलांचा मला लळा लागला होता. त्यांना मी अंगाखांद्यावर खेळवत होतो. उन्हाळयाची सुटी संपून कॉलेजे सुरू झाली तेव्हा मला माझ्या वसतिगृहावर राहायला जायचे होते. पण हे घर सोडून जाताना मला रडू आवरत नव्हते. संध्याकाळी भाऊराव आफिसातून आले तेव्हा मी माडीवर रडत बसलो होतो. ते वर आल्याचे मला कळले नाही. मला रडताना पाहून मला न हटकता ते खाली गेले.

थोड्या वेळाने त्यांनी मला फिरायला जाण्यासाठी हाक मारली. मी तसाच मलूल चेहेऱ्याने त्यांच्याबरोबर गेलो. नेहमीप्रमाणे चंदनवाडीत जाऊन बसल्यावर ते म्हणाले, 'तू मघा रडत होतास?'

मी खाली मान घालून गप्प. हुंदका येत होता. त्यांनी समजावले, 'तू आम्हाला सोडून जात आहेस असं समजू नकोस. हे घर तुझंच आहे असं समज. केव्हाही येत जा.'

अशा रीतीने भाऊरावांकडील माझी नोकरी संपली आणि घरोबा चालू झाला.

अनुक्रमणिका

या घरात मला आपुलकी मिळाली; पण ती मिळण्याची तऱ्हा वेगळी होती. एक अलिप्तता त्या सामायिक राहणीत होती. या घरात जेवढी माणसे होती तेवढे जणु या राहणीचे कप्पे होते. परस्परांविषयी प्रेम बाळगूनही प्रत्येक जण जणु आपापल्या कप्प्यात जगत होता. माझा असाच एक वेगळा कप्पा तयार झाला. कोणी कोणाशी फारसे बोलताना दिसत नसे. तरी कुटुंबातील सर्व व्यवहार निमूटपणे सुरळीत चालत होते.

या राहणीचे दोन थर होते; एक जुन्या वळणाचा, दुसरा आधुनिक. भाऊरावांचे सासरे व सासू, दादा व ताई नवाथे, हे बरेचदा त्यांच्या खेड्यावरुन या घरी येऊन राहात असत. ते दोघे कर्मठ ब्राम्हण. ते समक्ष नसले तरी त्यांचे वर्चस्व घरातील राहणीवर भासत असे. त्यांची सावली, म्हणजे शांताबाईच्या आत्याबाई, या घरात कायम राहात असत. स्वयंपाक-पाणी त्याच करायच्या. त्यांचे अस्तित्व जाणवत नसे; पण घरात भरलेले असे. दादा नवाथे उग्र पण शांत. ताई करारी व करड्या. आत्या मवाळ व अबोल.

भाऊराव व शांताबाई हे आधुनिक वळणाचे. निधर्मी. ते कुटुंब-प्रमुख असले तरी घरातील राहणीत त्यांचे स्थान गौण. भाऊरावांनी कधी घरगुती बाबतीत लक्ष घातल्याचे मला आढळले नाही. शांताबाईंशी ते कधी खाजगीत बोलत असतील तर नकळे. दोघेही आपापल्या उद्योगात गर्क. शांताबाईंचा वावर तळ-मजल्यावर तर भाऊरावांचा माडीवर. कोणी भेटायला आले की त्याला विचारायचे, ‘आपल्याला कोण पाहिजे?’

‘शांताबाई’ म्हटले की बैठक तळमजल्यावर. ‘भाऊसाहेब’ म्हटले की त्याची रवानगी माडीवर.

हा आचरणाचा साचा शांताबाईच्या संगनमतानेच भाऊरावांनी ठरवला असावा. त्यामागे त्यांच्या काही नैष्ठिक धारणा होत्या. त्या आचरण्यासाठी त्यांनी स्वतःला संयमाचे बांध घातले होते.

व्यक्तिस्वातंत्र्यावर त्यांचा दृढ विश्वास होता. म्हणून तर घरात कोणावरही कोणाचे काही बंधन नव्हते. जो तो आपल्या परीने वागायला स्वतंत्र होता. हाच वारसा पुढच्या पिढीला मिळाला. बाबा-मीनाला मते फुटल्यावर घरात खडाजंगीचे वाद चालत असत. अनेकदा भाऊराव निमूटपणे ऐकून घेत असत. बाबा व मीना दोघांनीही आपापले जोडीदार स्वतः निवडले. भाऊरावांनी खुषीने लग्ने लावून दिली. तिसऱ्या पिढीतही तोच गुण उतरला आहे. भाऊरावांचे तिन्ही नातू आणि बाबा आज एकाच घरात राहताहेत; परंतु एकाचे दुसऱ्याशी देणे-घेणे नाही इतक्या स्वतंत्रपणे.

संयम हा शांताबाईंच्याही वागण्याचा स्थायी भाव होता. त्या प्रेमळ होत्या; पण प्रेम दाखवणे, मोकळे-ढाकळे वागणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. आनंद झाला तरी त्या कधी खळखळून हसल्या नाहीत. अबोल वाटाव्यात इतके बोलणे मोजके. मुलांचेही त्यांनी कधी लाड केले नाही. मुलांना शिस्त लागावी म्हणून त्यांच्याशी त्या जरा कोरडेपणानेच वागल्या म्हणून तर वयाने वाढल्यावर बाबाचा असा समज झाला होता की आईने त्याच्यावर कधी प्रेमच केले नाही. महात्मा गांधींच्या हत्येनंतरच्या जाळपोळीत त्यांचा सगळा संसार उद्ध्वस्त झाला तरी त्यांनी आपल्या दुःखाचे प्रदर्शन केले नाही. त्यानंतरच्या दुर्धर आजारालाही त्यांनी धीराने तोंड दिले.

अनुक्रमणिका

शांताबाई महालवरच्या हिंदु मुलींच्या शाळेत शिक्षिका होत्या. त्या कर्वे महिला विद्यापीठाच्या पदवीधर ('गृहीतागमा') होत्या. भाऊराव स्वतः मॅट्रिक झाले नव्हते. पण लग्नानंतर त्यांनी शांताबाईंना शिकण्यास प्रोत्साहन दिले होते. त्यांचे वाचन चौफेर व अद्ययावत होते. दृष्टि मार्मिक होती. पी. वाय. देशपांड्यांची 'विशाल जीवन' ही कादंबरी वाचल्यावर त्या मला म्हणाल्या, 'पी. वाय. ना मला विचारायचं आहे की' अनंताच्या पलिकडे' म्हणजे काय?' त्या कादंबरीत हा शब्दप्रयोग होता. त्या देखण्या नव्हत्या; परंतु त्यांचे टपोरे डोळे विलक्षण बोलके होते. भाऊराव म्हणायचे की एका लग्न -समारंभात ह्या टपोऱ्या डोळ्यांनाच ते भाळले होते आणि त्याच क्षणी त्यांनी शांताबाईंना आपली वधू नियोजित केले होते.

घरातील राहणीत कुठेही डामाडौल नव्हता. सर्वांचे वेष साधे. मुलांचे सुद्धा. शांताबाईंच्या अंगावर मी कधी फॅशनेबल साडी बघितली नाही. भाऊरावांचा रोजचा पेहेराव स्वच्छ धोतर आणि सदरा. विशेष प्रसंगी त्यावर कोट.

या जोडप्याच्या परिवारात जे गणगोत होते ते सगळे शांताबाईंच्या नात्यातले. भाऊरावांच्या नात्यातले कोणी नव्हते. त्याच्या कोणा नातलगाचा उल्लेखही त्यांच्या बोलण्यात येत नसे. फक्त एकदाच मला घेऊन प्रवास करत असताना ते रोह्याला गेले होते. रोहे हे समुद्र-किनाऱ्यावरचे लहानसे गाव. तिथे आम्ही ज्यांच्याकडे दोन दिवस राहिलो ते त्यांची मावशी व तिचे यजमान असल्याचे त्यांनी मला सांगितल्याचे आठवते. अलिकडे मी कोकणात प्रवास करत असताना एक-दोनदा रस्त्याने 'माडखोल' अशी एका लहानशा खेड्याच्या नावाची पाटी वाचली. पण भाऊराव कधी त्यांच्या त्या मूळ गावाबद्दल बोलले नव्हते.

गप्पा मारणे भाऊरावांना आवडत असे. बहुदा रात्रीच्या जेवणानंतर ते गप्पांची मैफल जमवत असत. दिवसभराच्या व्यापानंतर त्यांचा तो विरंगुळा होता. त्यांच्या दैनंदिन भावजीवनात या गप्पांना महत्त्वाचे स्थान होते. श्रोत्यांमधे घरातले कोणी नसायचे. क्वचित शांताबाई. बाकी माझ्या सारखे इष्ट मित्र.

या गप्पांना काही विषय नसे. वेळेवर त्यांना सुचेल ते. बहुदा या गप्पा कोणा व्यक्तींबद्दल असत. ज्यांचा सहवास भाऊरावांना घडला त्या आजवरच्या लहान-मोठया व्यक्ति. या बोलण्यातून त्यांच्या साहित्यिक पूर्व-चरित्राचा थोडासा बोध होत असे. साहित्य-सम्राट नरसिंह चिंतामणि केळकर यांच्या तालमीत त्यांची पत्रकारिता सुरू झाली हे या गप्पांतून मला कळले.

या गप्पांमध्ये ते कोणाची किती टिंगल टवाळी करतील याला सुमार नसे. कोणाच्या काही गुप्त गोष्टी ते खुलवून सांगत. सांगताना ते स्वतःच उमळून पण चोरटया नजरेने हसत असत. अनेकदा हसता हसता जिवणीवर हाताच्या पंजाचा आडोसा धरत. अशा पाचकळ गप्पा करत खूप हसणे ही त्यांची एक मानसिक गरज असावी.

त्यांचे साहित्यिक गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि वि. स. खांडेकर वगैरे गुरुबंधू हा या गप्पांचा एक नेहमीचा विषय होता. कोल्हटकरांच्या 'वधूपरीक्षा' नाटकातील एक ग्रामीण भाषेतील प्रवेश ते घडाघडा म्हणत. त्यात 'माझा वढ्या' हा शब्दप्रयोग ते अधिक मिस्किलपणाने उच्चारत. हिराबाई पेडणेकर ही मुंबईत एक सुंदर

अनुक्रमणिका

तरुण नायकीण होती, ती फार गुणी होती, तिने एक नाटक लिहिले होते आणि कोल्हटकरांचे तिच्याकडे खाजगी येणे-जाणे होते, अशी दुर्मिळ माहिती या गप्पांमधून हाती लागत असे.

होतकरूतरुणांना जवळ करणे आणि आस्थेने त्यांना सक्रिय प्रोत्साहन देत राहणे हे भाऊरावांचे एक व्यसनच म्हणता येईल. त्याबद्दल कोणी त्यांची कुचाळीही करीत. पण त्यांच्या सहवासात कोणी तरुण माणूस नाही असे त्यांच्या आयुष्यात कधी घडले नसावे. हे तरुण केवळ नागपुरातलेच नव्हते. महाराष्ट्रात भाऊराव जिथे जिथे जात तिथे तिथे त्यांच्या साहित्यिक मोठेपणामुळे तरुण मंडळी त्यांच्या भोवती गोळा होत असत. नागपुरात राजा व बकुळ बढे, विनायक अंबादास गिजरे हे माझ्या आधी त्यांच्या जवळ होते. मुंबईत मोहन व मनोहर नाडकर्णी, राजा कारळे; औरंगाबादचे स. मा. गर्गे हे माझ्या माहितीतील आणखी काही तेव्हाचे तरुण. नागपुरात सुनील सुभेदार, भास्कर नंदनवार हे तर अखेरपर्यंत भाऊरावांजवळ होते. आपल्या सहवासात आलेल्या तरुणांचे अनौपचारिक पालकत्व भाऊराव स्वतःकडे घेत असत आणि प्रसंगी आडवाटेला जाऊन त्यांना मदत करत असत. भास्कर मासोदकरचा (पुढे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश) पतिलोम प्रेमविवाह त्यांनी धोका पत्करून करून दिला होता. मागास जातीतील तरुणांबद्दल यांना अधिक आस्था होती.

नोकरीच्या निमित्ताने त्यांच्या सहवासात गेल्यापासून त्यांनी मला त्यांच्या पंखातील ऊब द्यायला सुरुवात केली. काम देण्याऐवजी कादंबरी वाचायला सांगितले ही त्याची पहिली चुणुक होती. माडीवरची कपाटे पुस्तकांनी भरलेली होती. मला आवडतील ती पुस्तके वाचत राहण्यास त्यांनी मला बजावले

'नवे संसार' कादंबरी ते लिहीत असताना उत्तरार्धातील एका प्रसंगात घालायला त्यांना एक कविता हवी होती. माझी 'तुले पाहून' ही ग्रामीण कविता त्यांनी मागितली. (अस्सल नागपुरी बोलीतली ही पहिलीच कविता असावी). मी त्यांना तुकडोजी महाराजांचे एक सुंदर गीत सुचवले. पण त्यांनी माझीच ती कविता वापरली. अनेकदा त्यांच्या संध्याकाळच्या विश्रांतीच्या वेळी ते मला माझ्या कविता गायला लावत असत. पुढे 'तरुण भारत' च्या एका दिवाळी अंकात माझी

'मानवी जीवना' ही दीर्घ कविता त्यांनी आग्रहाने छापली नंतर राजकवि यशवंतांनी तिला विशेष दाद दिली.

१९४२ च्या उन्हाळ्याच्या सुटीत मी पुन्हा त्यांच्या घरी राहायला गेलो. त्यांचा व माझा मित्र बाबू (ज. श्री.) देशपांडेही त्या वेळी त्यांच्याकडे राहायला होता. आम्ही दोघे खाटा टाकून अंगणात झोपत असू. मी पहाटे उठून चिटणीस पार्कापर्यंत धावण्याचा व्यायाम घेत असे. बाबूही माझ्याबरोबर येईन म्हणाला. म्हणून मी त्याला पहाटे उठवायला गेलो. तो उठेना म्हणून त्याच्या अंगावरील पांघरुणासकट त्याला मी ओढले. या खेचाखेचीत त्याच्या खाटेच्या पाया मोडला. सकाळ झाल्यावर भाऊरावांच्या ते लक्षात आले. बाहेर जाताना त्यांनी मला बजावले, 'मी परत येईपर्यंत ही खाट दुरुस्त झाली पाहिजे.' माझ्या सुदैवाने शेजारच्या महादेव मंदिरात एक सुतार होता. फक्त चार आण्यात त्याने ती खाट दुरुस्त करुन दिली.

त्याच उन्हाळ्यात मी नागपुर सोडून मुंबईला राहायला गेलो. त्यामागेही भाऊरावांची प्रेरणा होती.

मी बी. ए. ची परीक्षा दिली होती. पण पहिल्या वर्गात पास होण्याची आशा नव्हती; आणि सरकारी शिष्यवृत्ती बी. ए. पर्यंतच होती. म्हणजे पुढे शिकण्यासाठी काही आर्थिक बळ नव्हते. गेल्या वर्षात मुंबईच्या एका वडीलधाऱ्या गृहस्थांचा माझ्यावर लोभ जडला होता; आणि ते मला सारखे मुंबईला बोलावत होते. मुंबईला काही नोकरी-चाकरी शोधण्यासाठी तरी एक-दोन महिने जाऊन राहण्याचे मनात येत होते. पण त्या वेळी दुसऱ्या महायुद्धाची झळ तीव्र होत होती आणि मुंबईवर बॉम्ब वर्षाव होणार असल्याच्या बातम्या येत होत्या. म्हणून मन कचरत होते.

माझा पेच मी भाऊरावांना सांगितला.

'बॉम्ब पडणार म्हणून घाबरतोस? अरे, मुंबईत लाखो लोक राहतात.' ते म्हणाले. 'जरूर जा. काही नवं पाहायला मिळेल.'

त्यांनी हिंमत दिली. आणि मी मुंबईला गेलो.

त्यांनी नुसती हिंमत दिली नाही. त्यांच्या अनेक साहित्यिक स्नेह्यांना पत्रे लिहिली 'माझे तरुण मित्र..' येत असल्याचे सांगून त्याला सर्वतोपरी मदत करावी अशी त्यांना विनंती. या पत्रांच्या बळावर वि. ह. कुळकर्णी, शांताबाई कशाळकर, ह. वि. देसाई, उमाकात भेंडे, चं. वि. बावडेकर, वा. रा. ढवळे, मामा वरेरकर, प्रभाकर पाध्ये, यांच्या मित्र-परिवारात मी सामील झालो. मुंबईत माझे बस्तान बसेपर्यंत आणि माझे स्वतःचे मित्र-मंडळ तयार होईपर्यंत या वडीलधाऱ्या स्नेह्यांनी मला मुंबई परकी वाटू दिली नाही.

नागपुर माझे कायमचे सुटले; तरी भाऊरावांशी कौटुंबिक नाते दृढ होत गेले. मी सुटी घेऊन नागपुरला जात असे तेव्हा, दुसरीकडे उतरलो तरी, बराच वेळ त्यांच्याकडे जात असे. मी मुंबईत नऊ -दहा वर्षे होतो. भाऊराव मुंबईत आले की ते असतील तिथे त्यांच्या मागे असे.

याच काळांत त्यांनी मला अनेक ठिकाणी त्यांच्याबरोबर प्रवासाला नेले. १९४६ साली बेळगावला मराठी साहित्य संमेलन हे त्यापैकी एक. तिथे ते संम्मेलनाचे अध्यक्ष होते. औरंगाबाद, हैदराबाद, वगैरे ठिकाणीही ते अध्यक्ष, वक्ते वगैरे नात्याने गेले होते. तिथे त्यांची स्थानिक साहित्यिकांशी संस्था-संघटनाविषयक व साहित्य-विषयक खलबते होत असत. त्या वेळी भाऊराव मला त्यांच्या शेजारी बसवत. मला त्या चर्चांमध्ये रस वाटत नसल्यामुळे मी बसल्या जागी वृत्तपत्र किंवा पुस्तक वाचायला घेई. भाऊरावांना ते आवडत नसे. इतरांशी बोलता बोलता हळूच ते वृत्तपत्र किंवा पुस्तक माझ्या हातातून काढून बाजूला ठेवत. मी ती चर्चा ऐकली पाहिजे असे त्यांना वाटे.

१९४५ साली मी मुंबईत स्थिर सरकारी नोकरी सोडून अस्थिर पत्रकार व्यवसायात शिरलो. त्यालाही भाऊराव निमित्त झाले. मी रजेवर नागपुरला गेलो होतो. प्रभाकर पाध्यांचे त्यांना पत्र आले होते की पाध्ये आता ('धनुर्धारी' साप्ताहिक सोडून) दैनिक 'नवशक्ती चे संपादक झाले होते आणि नागपुरकडे कोणी इच्छुक पत्रकार असल्यास सुचवावे. भाऊरावांनी ते पत्र मला दाखवले. म्हणाले, 'जातोस का?' लगेच या पत्राचा संदर्भ देऊन

मी पाध्यांना कळवले की मुंबईला परतताच मी त्यांना भेटतो. त्याप्रमाणे भेटलो. उदयोन्मुख लेखक-कवि म्हणून मला ते ओळखत होतेच. त्यांच्या 'धनुर्धारी' तही मी लेख लिहिले होते. त्यांनी तडक माझी उपसंपादक म्हणून नेमणूक केली.

१९५१ साली मी मुंबई सोडून दिल्लीला आकाशवाणीच्या वृत्त विभागात नोकरी धरली. तेव्हा भाऊरावांनी 'तरुण भारत' मधे माझे कौतुक करणारा छोटा अग्रलेख लिहिला होता.

मी नागपुरात असलो म्हणजे ते मला आवर्जून 'तरुण भारत' च्या कार्यालयात घेऊन जात. तेथील त्यांच्या प्रत्येक लहान-मोठया सहकाऱ्याशी त्यांनी माझी ओळख करून दिली होती. प्रमुख सहकाऱ्यांकडे जाऊन बोलत बसायला मला सांगत. त्यांपैकी एकनाथराव पटवर्धन हे त्यांचे फार जुने समवयस्क सहकारी. भाऊराव आपल्या सर्व सार्वजनिक कार्यामधे पूर्वीपासून त्यांचा सल्ला व सहकार्य घेत आले होते.

भाऊराव रोज योगासने करत असत. आसने करता करता मला समोर बसवून बोलतही असत. त्यांचे पाहून मी आसने करू लागलो. पुढे मी योगशास्त्राचा थोडा अभ्यास केला. मीहि आता गेली ५०-५५ वर्षे नियमितपणे योगासने वगैरे करत आलो आहे.

भाऊराव पूर्ण निर्व्यसनी व शाकाहारी. सुपारीचे खांडही त्यांना लागत नसे. कधी सुग्रास भोजन झाल्यावर विडा खातील तेवढाच. दारूचा तर त्याना तिटकारा होता. नागपुरातील काही लेखक मंडळी दारू पीत, म्हणून भाऊराव त्यांची टिंगल करत. परंतु उतार वयात भाऊरावांना अमेरिकेचे सन्मानपूर्वक सरकारी बोलावणे आले होते; तेथून परतले ते मदिरेची दीक्षा घेऊनच. मग माफक व्हिस्की पिणे हा नित्यनेम झाला होता. म्हातारपणात प्रकृतीला चांगले, असे म्हणत. बाबा सोबतीला असे. मी नागपुरात असलो म्हणजे मलाही या संध्याकाळच्या 'तीर्थ-प्रसादात' सामील करत असत. पण हे पिणे घरगुतीच राहिले. त्याचा गाजावाजा किंवा 'पार्ट्या' झाल्या नाही.

वक्तशीरपणावर त्यांचा कटाक्ष असे. दिलेली वेळ ते स्वतः नेमकी पाळत. कोणाशी काही काम किंवा भेट ठरवायची असली म्हणजे '... वाजताच्या ठोक्याला' हा शब्दप्रयोग ते ठसक्यात उच्चारत.

भाऊराव सौंदर्यभक्त होते. त्यांच्या कादंबऱ्यातील चढी शृंगारिक वर्णने हा त्यांच्या सौंदर्यासक्तीचा कल्पना-विलास होता. सुंदर स्त्रीचे त्यांना विशेष आकर्षण होते. पण हे आकर्षण निर्मोह होते; त्यात अभिलाष नव्हता. नागपुरात मी माझ्या एका मानलेल्या बहिणीकडे राहात असे. ती सुंदर होती, खानदानी श्रीमंत होती, कर्तबगार होती, कलाप्रेमी होती, श्रद्धाळू होती. माझ्यामुळे तिच्याशी भाऊरावांचा स्नेह जुळला; तो बरीच वर्षे टिकला. तिचे असाधारण चरित्र डोळ्यांपुढे ठेवून, भाऊरावांनी एक कादंबरी लिहिली. एवढेच त्या स्नेहाचे फलित. अशीच एक साहित्यलोलुप तरुणी, शांताबाई जिवंत असल्यापासून, भाऊरावांकडे आकर्षित झाली होती. मुलांची तर ती 'मावशी' च झाली होती. शांताबाई वारल्यानंतर तिच्याशी लग्न करावे म्हणून तिने भाऊरावांचा पिच्छा पुरवला. पण भाऊराव बधले नाहीत. तरुण वयातच ते विधुर झाले असतानाही, स्त्रियांच्या बाबतीत ते बेलाग राहिले.

अनुक्रमणिका

भाऊराव धार्मिक नव्हते; पण भाविक होते. त्यांना कधी पूजापाठ करताना मी पाहिले नाही. गळ्यात जानवेही नसे. कोणा गुरूच्या नादी कधी लागले नाही. नागपुरात लांबे महाराजांसारख्या बुवाच्या किंवा जनार्दन स्वामी सारख्या योगाचार्याच्या सहवासात ते राहिले ते त्यांच्या बुद्धिकठोर चिकित्सकपणामुळे. शंकर हे त्यांचे आवडते दैवत होते; ते बहुधा या देवाच्या अद्‌भुत भव्य निःसंगपणामुळे. त्यांच्याबरोबर प्रवास करत असताना एकदा ते मला शिखर शिंगणापुरला घेऊन गेले होते. महादेवाचे हे एक जागृत तीर्थक्षेत्र. येथेच शहाजीराजांना दृष्टान्त झाला होता की 'तुझा मुलगा चक्रवर्ती राजा होईल' असे स्थान-माहात्म्य त्यांनी मला सांगितले. येथील एक प्रसंग मी विसरूशकत नाही. तेथील पुजाऱ्याकडे आम्ही दोन दिवस राहिलो. निघताना पुजाऱ्याने, त्यांच्याकडे येणाऱ्या यात्रेकरूच्या नावांची कीर्द भाऊरावांपुढे धरली. त्या बाडात पिढयान् पिढयांची नावे असतात. भाऊरांवानी स्वतःचे नाव लिहिले. मग पुजाऱ्याने वही माझ्याकडे दिली. अशा बाबी मला कळत नव्हत्या. मी संभ्रमात पडलेला पाहून भाऊरावांनी वही माझ्या हातातून घेतली आणि स्वतःच्या नावाखाली माझे नाव लिहिले- 'माधव गजानन माडखोलकर' दुसऱ्या एका प्रवासात आम्ही पंढरपुरला गेलो होतो. विठोबाच्या देवळात मुळीच गर्दी नव्हती. दर्शन घेऊन बाहेर आलो. तिथे सभा -मंडपात भाऊराव जवळ जवळ तासभर डोळे मिटून निवांत बसले होते.

भाऊरावांचे सार्वजनिक जीवन एक खुले पुस्तक होते. त्यात छक्के-पंजे नव्हते. लोकप्रिय कादंबरीकार, विद्वान साहित्य-समीक्षक, निर्भीड पत्रकार आणि लोकहिताचा निःस्पृह पुरस्कर्ता म्हणून त्यांनी फार मोठी प्रतिष्ठा कमावली होती. इतकी प्रतिष्ठा पावलेले दुसरे व्यक्तिमत्व निदान पूर्व-महाराष्ट्रात तरी नव्हते. अनेक साहित्य-सम्मेलनांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली होती. ते जिथे जात तिथे त्यांना सन्मान मिळत असे. हैदराबादमधील आमच्या मुक्कामात निजामशाहीतील एक मातबर सरदार रायरायॉ भालेराव यांनी त्यांना शाही मेजवानी दिली होती. त्यांच्या ग्रंथालयातील कपाटात भाऊरावांची पुस्तके व्यवस्थित लावून ठेवलेली आम्हाला दाखवली होती.

विदर्भ-मराठवाड्यातील साहित्यिक संघटना व चळवळींमध्ये ते जातीने लक्ष घालत. विदर्भ साहित्य संघाच्या प्रगतीत त्याचा मोठा वाटा होता. विदर्भातील उपेक्षित प्रतिभा पश्चिम महाराष्ट्राच्या नजरेस आणण्याचा त्यांचा खास प्रयत्न असे. ग. त्र्यं. देशपांडे या विद्वानाचे नाव अमरावती पलिकडे कोणाला माहित नसावे. भाऊरावांनी 'तरुण भारत' च्या एका दिवाळी अंकात देशपांड्यांचा एक संशोधनपर लेख छापला. तो बहुधा भवभूतीवरील लेख असावा. त्या लेखाच्या पुष्कळ प्रति काढून त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक विद्वानांना व साहित्य संस्थांना पाठवल्या. पुढे देशपांड्यांना व्याख्यानांची आमंत्रणे येऊ लागली आणि नंतर त्यांच्या प्राचीन साहित्य शास्त्रावरील ग्रंथाला राष्ट्रीय साहित्य अकादमीचा श्रेष्ठ पुरस्कार मिळाला.

नागपुरी बोलीविषयी त्यांना कुतूहल होते. त्यांना ती बोलता येत नसे; परंतु गमतीने, कृत्रिम हेल काढून बोलण्याचा प्रयत्न करीत. या बोलीवरील त्यांच्या लेखासाठी महादेवाचा पोहा, मातामायची गाणी, जात्यावरच्या ओव्या, वगैरे साहित्य मी त्यांना सावनेरहून गोळा करून आणून दिले होते.

ब्रिटिश अमदानीत मध्यप्रांत-वऱ्हाड हे राज्य मराठी व हिंदी मुलुखांचे बनलेले होते आणि त्यावर वर्चस्व हिंदी भाषिकांचे होते. म्हणून नागपुर-वऱ्हाडचा मराठी मुलुख वेगळा काढून विदर्भ हे नवे राज्य स्थापण्याची

चळवळ जीव धरत होती. लोकनायक मा. श्री. अणे हे या चळवळीचे प्रमुख पुढारी आणि माडखोलकर प्रमुख प्रचारक होते. भाऊराव व एकनाथराव पटवर्धन या दोघांनी मिळून, १९४१ - ४२ मधे मी व सावरकर या नावाचे एक तरुण कार्यकर्ते अशा दोघांना भाषिक पाहणी करण्यासाठी छिंदवाड्याला पाठवले होते. छिंदवाडा हा मराठी व हिंदी मुलुखांच्या सीमारेषेवरील एक जिल्हा. या चळवळीपाठोपाठ संयुक्त महाराष्ट्राची विशाल चळवळ सुरू झाली आणि तिचे संघटन भाऊराव नेटाने करत राहिले.

त्यांचा लोकसंग्रह दांडगा होता. साहित्य, समाजकारण व राजकारण या क्षेत्रातील त्यांचे स्नेही व चहाते महाराष्ट्रभर पसरले होते. ते विविध मत-मतांतरांचे होते. अखिल भारतीय साम्यवादी पुढारी श्रीपाद अमृत डांगे आणि मानवेंद्रनाथ रॉयच्या रॅडिकल हयुमॅनिस्ट पक्षाचे वसंतराव व द्वारकानाथ कर्णिक हे तर त्यांचे पूर्वीपासून दोस्त. मध्यप्रांतात सरकार- दरबारी त्यांचे वजन होते. मुख्य मंत्री रविशंकर शुक्ल, गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्र, मुख्य मंत्री राघवेंद्र राव त्यांना मानीत.

सर्व राजकीय पक्षांमध्ये त्यांचे स्नेहसंबंध असले तरी ते स्वतः कोणत्याही पक्षाचे नव्हते. काँग्रेसचे ते कठोर टीकाकार समजले जात. गांधीवादातील दांभिकपणावर ते कोरडे ओढत असत. तरी त्यांनी 'तरुण भारत' पत्र सुरूकेले ते मात्र काँग्रेसचे कट्टर पुढारी असलेल्या बॅरिस्टर अभ्यंकरांच्या नावे काढलेल्या 'नरकेसरी ट्रस्ट' तर्फे. पुढे या वृत्तपत्राची मालकी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे गेली तरी त्याच्या ध्येयधोरणात फरक पडला नाही. इतकेच नव्हे तर संघाच्या कार्यकर्त्यांनाही त्यांच्याविषयी प्रेम व आदर वाटत असे.

भाऊरावांनी स्वतंत्र बाणा कधी सोडला नाही. आपली स्वतंत्र मते सडेतोडपणे मांडण्यासाठी त्यांना स्वतःचे वृत्तपत्र हवे होते. म्हणून त्यांनी ओगल्यांचा 'महाराष्ट्र' सोडून स्वतःचा 'तरुण भारत' काढला, आणि चिकाटीने यशस्वीपणे चालून दाखवला. हे वृत्तपत्र काढण्यापूर्वी त्यांना 'टाईम्स ऑफ इंडिया' च्या डालमिया शेटनी बोलावून मुंबईहून नवे मराठी दैनिक काढण्याचा प्रस्ताव मांडला होता (सध्याच्या 'महाराष्ट्र टाइम्स' ची ही पूर्वपीठिका). संपादक म्हणून भाऊरावांना भरपूर पगार व अन्य सुविधा देऊ केल्या होत्या. पण तिथे आपल्या मत-स्वातंत्र्यावर बंधने येतील म्हणून त्यांनी तो प्रस्ताव फेटाळला होता.

भाऊरावांच्या पत्रकारितेमागे काही निष्ठा होत्या. निःस्वार्थ लोकहित त्या निष्ठेचा पाया होता. हा वसा त्यांनी लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर, शि. म. परांजपे यांच्यासारख्या थोर पूर्वसूरींकडून घेतला होता. एकंदरीत त्यांचे जीवन तत्त्वनिष्ठ होते. ही तत्त्वनिष्ठा पाळण्यासाठी आवश्यक तो कणखरपणा त्यांनी अंगी बाणवला होता. स्वतःच्या सुखदुःखाबद्दल ते बेफिकीर होते. त्यातून त्यांना संकटांना तोंड देण्याचे धैर्य मिळत होते. त्यांच्या 'नवे संसार' कादंबरीवर राजद्रोही म्हणून जप्ती आली तेव्हा ते विचलित झाले नाहीत. महात्मा गांधीच्या हत्येनंतरच्या जाळपोळीत त्यांचे घर आणि छापखाना जाळण्यात आले आणि त्यांना कुटुंबियांसह नेसल्या वस्त्रांनिशी घर सोडावे लागले, तेव्हाही त्यांनी धैर्य सोडले नाही. त्या वेळी मी रजेवर सावनेरला होतो. मी नागपुरला त्यांना भेटायला गेलो तेव्हा ते एका वसतिगृहात आश्रयाला होते. आपल्या निर्वासितपणाबद्दल ते अशा ऐटीत सांगत होते की जणू त्यांना या निर्वासितपणाचा अभिमान वाटत होता.

त्यांच्या आयुष्याचा विचार करताना, ते मला ग्रीक तत्त्वज्ञानातील 'स्टॉइक' वाटतात. तत्वासाठी जगण्याचे व्रत घेतलेले. त्यासाठी आपले आयुष्य एक अभिवेदी बनवलेले. आपल्या मनावर कडक बंधने स्वतःच लादून घेतलेली. संयमन आणि दमन यांच्या दडपणाखाली नाजुक भावजीवनाची कोंडी झालेली.

त्यांच्या शेवटच्या दीर्घ आजारात ही कोंडी फुटली असावी. मनाचे बांध सुटले आणि आत साठलेला गाळ-साळ बाहेर वाहू लगाला. विपरीत ते बोलण्यात येऊ लागले. असा लिचरा होत असतांनाच त्यांना काळझोप लागली.

❋❋❋

अनुक्रमणिका

## |भाऊरावांच्या सहवासात माझी दोन तपे|

------------------------------------------------------------ सौ.उमा माडखोलकर

भाऊराव माडखोलकरांनी आपल्या आयुष्याच्या पहिल्या चोवीस वर्षांची कहाणी लिहिली आहे. तिचं नाव ‘दोन तपे’ १९४८ मधे गांधी वधानंतर झालेल्या विध्वंसाचं, जळिताचं वर्णन केलं ‘एका निर्वासिताची कहाणी’ लिहून. पुनश्च हरि ओम् म्हणून त्यांनी पन्नाशी उलटल्या नंतर पुन्हा घर करून संसार थाटला. त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई यांच्या निधनाचा धक्काही पचवला. पण नंतरच्या आयुष्याबद्दल सलग असं त्यांनी काही लिहिलेलं नाही. माझ्या लग्नाआधी दोन वर्षे सौ. शांताबाईच निधन झालं. त्यांचा सहवास मला लाभला नाही. पण भाऊरावांचा मात्र भरपूर सहवास मिळाला. चोवीस वर्षांच्या या आंबट -गोड आठवणी लिहिताना आनंद होतो आहे मला. ते सर्व प्रसंग, त्या चर्चा अगदी कालच्या वाटताहेत अन् पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो आहे या लेखाच्या निमित्यानं.

माझ्या लग्नाआधी माडखोलकरांकडे मी नेहमी जात असले तरी चंद्रशेखर आणि मीना सोडून इतर कुणाशीही माझी जवळीक नव्हती. मला संकोच वाटायचा. जुजबी बोलणं व्हायचं. माझं लक्षच नसे कुणाकडे. त्यामुळे झालं काय की लग्नानंतर हा लोकांना मी परकी वाटत नव्हते पण हे सर्वजण मला परिचित होते. पण जवळचे वाटत नसत. त्यामुळे माझा प्रचंड गोंधळ उडायचा. त्यांत आमच्या घरी तरुणांपेक्षा वृद्ध लोकच जास्त होते. काय बोलायचं हेच कळायचं नाही. उगीच भीती वाटायची खरं तर ही सगळी मंडळी प्रेमळ होती. त्यांनी ह्यांची पसंती मान्य केली होती. पण तरी... माझ्या माहेरी मी फार लाडात अन् कौतुकात वाढले. आई वडील भाऊ भावजया बहिणी असा मोठा परिवार होता. सर्वात धाकटी म्हणून मी लाडकी, मला कधी कामही करावी लागली नाहीत किंवा प्रापंचिक अडचणीही जाणवल्या नाहीत. फुलपाखरांसारखं आयुष्य होतं माझं. आनंदी, उत्साही सुरक्षित अन् तणावरहीत आयुष्य होत माझं कॉलेज, मैत्रिणी, गाणं, नाटक, वाचन एवढंच छोटसं सुखी जग होत माझं. कशी कुणास ठाऊक पण प्रेमात पडले मी. प्रेमाची परिपूर्ती लग्नातच झाली पाहिजे हा माझा अट्टाहास. आई वडीलांनी मला समजाऊन सांगण्याचा, मला जमिनीवर आणण्याचा बराच प्रयत्न केला. प्रेमांत पडलेली माणसं नुसती आंधळी होत नाहीत तर दुराग्रही बनतात, असं आता मला वाटतं. जेवढं जेवढं ते सांगायचे, समजावण्याचा प्रयत्न करायचे तेवढी मी संवादच नाकारायची. ते विरोध करताहेत अशी माझी समजूत झाली होती. याचा परिणाम असा झाला की लग्नानंतर येणाऱ्या प्रापांचिक, आर्थिक जबाबदाऱ्यांचा किंवा कशाचाच अंशभरही विचार मी केलेला नव्हता. भाऊरावांच्या मोठेपणाचं वलय माहीत असून, काही वेळा अनुभवलं असून त्यांची सून झाल्यावर कस वागावं लागेल. काय बोलावं लागेल वगैरे डोक्यात आलेच नाही. वेगवान खळाळत्या प्रवाहात आपण स्वतःला ढकलून दिलं आहे ही लग्नानंतर झालेली माझी पहिली जाणीव. पहिले काही दिवस अत्यंत घाबरलेल्या, बावचळलेल्या मनस्थितीत मी होते. माहेर आणि सासरच्या जीवन पद्धतीमधे दोन ध्रुवा इतकं अंतर आहे याचं ज्ञान मला आलं, मग रोज माझ्या वास्तव ज्ञानामध्ये भरच पडत गेली. स्वतःच्या पसंतीन लग्न केलेलं असल्यानं आपल्याला तक्रारी करण्याचा किंवा अडचणी सांगण्याचा अधिकार नाही, असां माझां निर्धार असल्यानं मदत मागण्याचीही शक्यता मी ठेवली नव्हती. प्रसंग येईल तशी तोंड देऊ लागले. सकाळपासून तो रात्रीपर्यंत निरनिराळी काम करण्यात वेळ इतका झपाट्याने जायचा अन् अशी काही झोप यायची की विचार करायला सवडच मिळत नसे. कुठलं जगावेगळं घर आपण पत्करल अस वाटत असताना, “ घराच्या सुखदुःखात सहभागी व्हायला पाहिजे, स्वतःत बदल घडवला पाहिजे, काम करून

गोड झालं पाहिजे, प्रेमानं एकजीव झालं पाहिजे", अशी आईची वाक्य आठवायची. हळूहळू मी घरातील होण्याचा प्रयत्न करत होते. सौ. शांताबाई असत्या तर त्यांच्या मायेमुळे हे अधिक सहजपणे घडलं असत अस फार वाटायचं.

भाऊरावांनी सांगितलेली काम मी वेळच्या वेळी बिनचूक करत होते. त्यांची नाराजी होऊ नये याची काळजी घेऊन वावरत होते. मनांवर खूप दडपण असायचं. भीती वाटायची. माझी नणंद मीना मला समजून घेत होती, सखी होऊन मला सांभाळत होती. लहान वय असूनही प्रेमानं अन जबाबदारीनं ती आपल्या वडिलांच करत होती. दिवंगत आईचा वारसा चालवत होती. तिनं मला बोलतं केलं. जशी मी मोकळी होऊन बोलूं लागले, वागूं लागले तशी मला घराची धाटणी कळत गेली. माणसांच्या बाह्य रुपाआड दडलेले स्वभाव समजत गेले, मनाचे पदर अलगद उलगडू लागले. घराचा झालेला विध्वंस आणि शांताबाईंचा मृत्यू नियती म्हणून स्वीकारुन वयाच्या पन्नाशी नंतर पुन्हा घर उभं करण्याची जिद्द ठेवणारे, वयस्क सासूसासरे आणि पोरवयाची मुलं सांभाळत हे एकाकी कुटुंबप्रमुख उज्ज्वल भवितव्याची वाट चाळताहेत हे कळू लागलं. ओढग्रस्त परिस्थितीतही विनातक्रार ताठ जगण्याचा या कुटुंबाचा बाणा अनुभवाला आला. त्यांच्या मोठेपणाचं वलय माझ्यालेखी महत्त्वाचं राहिलं नाही. फारस करारी, प्रेमळ, स्वतःबद्दल प्रचंड विश्वास बाळगणारे अन् कुटुंबियांना विश्वास उत्पन्न करणारे वडील हे एकमेव नातं माझ्या मनावर कोरलं गेलं आणि नाजूक तंतूचं, घट्ट विणीचं एक अतूट नातं केव्हा होऊन गेलं ते आम्हाला कळलंच नाही.

एकमेकांना सावरत, अडी अडचणींवर मात करत, एकमेकांवर प्रेम करत, वाद करत पण मजेत आमचे दिवस जात होते. पैसा नसूनच आम्ही संपन्न होतो. पैशाची उणीव तर पदोपदी जाणवायची पण पैशाशिवायही आयुष्य सुखांत जाऊं शकत हे अनुभवत होतो. अशातच आमच्या कुटुंबाला हादरवून टाकणारी आपत्ती आमच्यावर आली. माझा तिसरा मुलगा श्याम वीस दिवसांचा असताना माझा थोरला मुलगा राजीव हा पोलिओ मॅर्नेजॉयटीसचा शिकार झाला. या रोगाचे सर्व दुष्परिणाम मला चांगलेच माहीत असल्याने मी तर साफ कोसळून गेले. बाळंतपणात माझी प्रकृती खालावलेली असल्यामुळे राजीवची शुश्रुषा करण्यास डॉक्टरनी मनाई केली होती. चंद्रशेखर त्यावेळी मुंबईत होते. त्यांना सुटी मिळू शकली नाही. भाऊरावांनी राजीवच्या उपचारांची उत्तम सोय केली होती. ते स्वतः हडबडून गेले असले तरी उसने अवसान आणून दिवसातून ३, ४ वेळा माझ्या माहेरी भेटायला येऊन मला दिलासा देत होते. मीना, चंद्रशेखर फडणीस, सुनील, राजीवची काळजी घेत होते. माझी गैरहजेरी त्याला जाणवू नये, त्यानं आनंदात रहावं म्हणून या सर्वांनी काय नाही केलं? ऐन पंचविशीतल्या मला मात्र निराशेने ग्रासून टाकलं होतं. माझ्या मुलाला संपूर्ण आयुष्य अपंगावस्थेत काढावं लागेल या आशंकेने भयाने मी कोरपून गेले. भाऊरावांना माझी मन:स्थिती समजत होती. ते माझ्याशी खूप बोलायचे. मला बोलते करायचे पण माझ्यावर फारसा परिणाम होत नव्हता. शेवटी एका दिवशी ते मला म्हणाले, "हे बघ सुधा, तुलाच आता खंबीर व्हावं लागेल. हे आपल्या सगळ्यांवरच संकट असलं तरी सामना मात्र तुला करावा लागेल. राजीवला बरं करण्याची जबाबदारी तुलाचं घ्यावी लागेल. या रोगावर दीर्घकाळ उपचार करावे लागतीलं तू अशी झुरत गेलीस तर तो कायमचा अपंग होऊन जाईल. निराश न होता त्याला तूच पायावर उभं करशील याची मला खात्री आहे. पण त्याकरता नुसता सोशकिपणा उपयोगाचा नाही. खंबीरपणा आणि दुर्दम्य आशावादी वृत्तीही आवश्यक आहे." मला माझ्या जबाबदारीची जाणीव झाली. पण मला स्वतः बद्दलच विश्वास वाटेना. देवाची कृपा अन् मातृत्व शक्ती यावर भरवसा ठेऊन मी बळ आणलं. त्याला पायावर

उभा करण्याचा एक कलमी कार्यक्रम ठरवून टाकून उभी झाले. काही दिवसांनी ते मला हळव्या स्वरात म्हणाले, “अग तू जीवाची बाजी लावून नक्कीच त्याला पायावर उभा करशील ग पण पैसा आणि वेळ खाणाऱ्या या उपचारापायी तूच मोडशील की काय याचीच जास्त काळजी वाटते, दुर्दैवानं तसं झालं तर मीच काय पण आपलं माडखोलकर कुटुंबच मोडून जाईल. तूं आम्हाला पोरकं करणार नाहीस असं वचन मला दे.” तो काळजीनं ग्रासलेला चेहरा, हळवा स्वर, कापरे शब्द या सर्वांचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. या घरात खचून जाऊन मला चालणार नाही, याची मला जाणीव झाली. जन्मभरच या शब्दांच्या आधारानं येणाऱ्या प्रसंगांना मी तोंड देत गेले. माझ्या दुबळ्या शक्तिनिशी सामना करत गेले. काही प्रसंगी खचले. पुन्हा उभी राहिले. स्वतःच स्वतःला धीर दिला पण मोडले नाही.

भाऊराव पाककलेचे श्रेष्ठ उपभोक्ता होते. मासान्न वगळता निरनिराळया पदार्थांचा आस्वाद घ्यायला त्यांना आवडायचं. पदार्थाची दाद अन्नपूर्णेला देताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसायचा. माझ्या सुगरण आईचे मार्गदर्शन अन् भाऊरावांच्या प्रोत्साहनामुळे मला पुष्कळ काही करता यायला लागलं. कोणाकडे काही नवं खाल्लं की त्या सुगरणीला दाद तर ते देतच पण कृतीही विचारुन येत. मग तो पदार्थ करून घाले पर्यंत त्यांचा तगादा असायचा. रोज सकाळी जेवायला काय करणार म्हणून विचारायचे अन् जेवण झाल्यावर मधल्यावेळी काय करणार! हा प्रश्न असे. रोज पंचपक्वान्न केली असती तरी त्यांनी आनंदान खाल्ली असती. एकादशीच्या उपासाला दहा-बारा फराळाचे पदार्थ केले तरी नेमक्या न केलेल्या पदार्थाकरता हळहळत रहायचे “भाऊराव खूप उपास खातात म्हणून त्यांचं पोट फुग्यासारखं झालं आहे,” अस श्री म्हणायचा तर हसायचे. भाऊरावांच्या आणि जयवंत दळवींच्या अन्नब्रम्हावर ज्या समरसतेने गप्पा व्हायच्या त्या ऐकताना फार मजा यायची. लोकांना खाऊ घालण्याचीही त्यांना फार आवड होती. आमंत्रण देण्याची ते संधीच शोधत असायचे. माझा जन्म नागपुरचाच आणि माझ्या माहेरीही सगळा सढळ कारभार असल्यानं मलाही आवडायचं. कष्टाचं चीज होईल असं कौतुक ते करायचे. पण एका गोष्टीत माझी पंचाईत व्हायची. किती लोकांना बोलवायचे याचा त्यांना अंदाज येत नसे. साहजिकच माझ्यावर ताण यायचा. मुलांच्या मुंजी घरच्या घरी करायच्या ठरवल्या. मग छोटासा स्वागत समारंभ ठरवला. असं करता करता आठशे लोक समारंभाला आले. त्यामुळे त्यांनी आकडा दिला की दुप्पट व्यवस्था मी करायची अन् परमेश्वरावर हवाला ठेऊन समारंभ साजरा करायची.

भाऊराव विद्वान होते, बहुश्रुत होते, मोठे व्यासंगीही होते, पण ते रुक्ष नव्हते. निरसलेले नव्हते. संस्कृत आणि इंग्लिश अभिजात साहित्याचे त्यांचे दांडगे वाचन होते. घरातील सर्वांनी उत्तमोत्तम साहित्य खूप वाचावे असा त्यांचा आग्रह असे. परीक्षेच्या अभ्यासापेक्षा दर्जेदार साहित्य वाचन मोलाचं असं म्हणण्यापर्यंत त्यांची मजल जायची. फक्त साहित्यच नव्हे तर संगीत मैफिली, दर्जेदार नाटकं, विद्वतापूर्ण व्याख्यानं या सर्वांची गोडी आम्हाला (नातवंडांना) लागावी याकरता ते प्रयत्नशील होते. आमच्या घरी निरनिराळया क्षेत्रातील नामवंत भाऊरावांना भेटायला येत असत. त्यावेळी मुलांनी हजर राहिले पाहिजे असा त्यांचा दंडक असे. पाहुणे गेले की मग चर्चेला उधाण यायचे. गप्पांना विषय सुचला नाही असे कधी झालेच नाही. घरगुती गप्पा सोडून सर्व विषय चालत असत बायकी गप्पाच मात्र वावडं होतं. घरगुती गप्पांच्या जंजाळातून सुटका व्हावी म्हणुनच बहुतेक या पिता पुत्रांनी सर्व कौटुंबिक अधिकार मला देऊन टाकले अन् क्षुल्लक कटकटीतून ते मोकळे झाले. एक प्रकारे ते ठीकच झाले. आमचं सगळं घरच उत्तम वाचक झालं, रसिक श्रोता झालं,



**श्री. भाऊराव - सौ. उमा व श्री. चंद्रशेखर माडखोलकर**

अनुक्रमणिका

नाट्यदर्दी झालं. अन् क्रीडाप्रेमीही. श्री लहानपणापासून नाटक लिहायचा, काम करायचा, दिग्दर्शनही करायचा अन् बक्षीस मिळवायचा. वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन बक्षीस मिळवून तो आला की ते आकाशातच विहार करत. या अशा सगळ्या व्यापामुळे मुलं अभ्यास करत नाहीत, हुषारी असूनही योग्य गुण मिळवत नाहीत याच त्यांना मुळीच वाईट वाटायचं नाही. भाषणाचे मुद्दे काढून देणं. नाटक लिहिताना काही सुचवणं वगैरेही त्यांना मान्य नव्हतं. अनुकूल वातावरण मिळाल्यावर स्वतःच्या कुवतीनुसार मार्ग शोधावे असं ते त्यांच्या जवळ राहिलेल्या विद्यार्थ्यांना सांगायचे. शिकवणीचा तास घेतल्या प्रमाणे त्यांनी कधी शिकवलं नाही. त्यांच मुक्त विद्यापीठ होतं. अन जो जे वांछिल तो ते लाहो हा खाक्या होता.

भाऊरावांना शारीरिक दुःख जराही सहन होत नसे ते निरोगी तर होतेच पण नियमित योगासने करून त्यांनी शरीर आणि बुद्धी तंदुरुस्त ठेवली होती. पण घरात कुणी आजारी पडलं की त्यांच मनस्वास्थ बिघडायचं. ते स्वतः कुठली मदत करत नसत. उलट नाना प्रकारच्या शंका कुशंका काढून करणाऱ्याला घाबरवून सोडत. माझी मुलं सर्व प्रकारचे खेळ खेळत. त्यांच्या अंगावर जखमा नाहीत असं कधी व्हायचं नाही. त्यांना सदैव धनुर्वात होण्याची भीती वाटायची. एवढी बाब सोडली तर ते निर्भय होते. परिणामांची पर्वा नसे त्यांना. बुद्धीला जे पटेल, मनाला रुचेल, तर्कशुद्ध असेल तेच ते बोलत, लिहीत अन वागत. विदर्भ आंदोलनाच्यावेळी त्यांना चिठ्ठ्यातून, फोनवरुन सतत धमक्या यायच्या, अगदी खुनाच्याही. गांधी-वधाचा अनुभवाने ते घाबरले असते किंवा माघारले असते तर ते क्षम्यच ठरले असतं. पण साठवर्षाच्या या तरुणाच्या मनात भितीचा लवलेशही नसे. हे नागपुरला नसल्याने माझी जबाबदारी वाढली. भाऊराव रोज दुपारी तीन ला भर उन्हात पायी तरुण भारतात जायचे आणि सहा वाजता परत यायचे. सुनील तीन वाजता त्यांच्या सोबत जायचा अन् मी सहा ला आणायला. आम्ही त्यांचे संरक्षक या कल्पनेची ते टर उडवायचे. तुम्हाला प्रसिद्धी हवी म्हणून, हुतात्मा व्हायचं आहे म्हणून हे नाटक करता वगैरे वगैरे. घराच्या संरक्षणाकरता सहा पोलीस सरकारने तैनात केले होते. ते व्हरांडयात किंवा अंगणात असायचे तरी भाऊरावांना त्यांचा त्रास वाटायचा. दिवसभरांत त्यांना चार वेळा चहा, दोनदा नास्ता देणं हे मला जास्तीच काम होऊन गेलं. त्रास मात्र भाऊरावांना. भाऊराव सर्वत्र फिरायचे. मी मात्र नजरकैदेत असा उलटा खाक्या होता. या काळात मी त्यांना कधीही अस्वस्थ झालेलं पाहिलं नाही. महत्त्वाची कागदपत्रे व मुले त्यांनी माझ्या माहेरी पाठवून दिली. घाणेरडया आवाजातल्या गलिच्छ शिव्या अन धमक्या ऐकून कधी माझा धीर सुटायचा तर मला म्हणायचे सुधाबाई तू या घरची कर्ती बाई. चिंता, काळजी, दुःख कुरवाळत बसणं आपल्या घराला परवडायचं नाही."

माडखोलकरांच कुटुंब लहान. त्यांना फारसे नातेवाईकही नव्हते पण शांताबाईंच्या माहेरचे आप्त त्यांचेच होऊन गेले होते. परिवार मात्र खूपच मोठा. ते वागायचे प्रेमानं अगत्यानं आणि रागावायचेही. भाऊरावांना कुणी आवडला की त्यांनी आपल्या छत्रछायेत त्याला घेतलाच म्हणून समजा. काही दिवस त्याची खूप वरवर व्हायची. त्याचा कुवतीचा विचार न करता त्याला ब्रम्हांड देऊ करायचे. काही टिकायचे. त्यांच्यापासून काहीबाही शिकायचे. काही नुसत्या गप्पा मारायचे. काही कार्यक्रमाला जाऊन जवळीकेचे प्रदर्शन करायचे तर काही खाऊन पिऊन धष्टपुष्ट होऊन त्यांनी मिळवून दिलेल्या नोकरीत गुंतून पडायचे. पण एकूणच विद्यार्थ्यांच्या सहवासात ते मजेत असायचे. साहजिकच या लोकांचा मुक्त वावर घरात सर्वदूर असे. त्यामुळे खाजगी हा शब्दच आमच्याकरता राहिला नाही. जे जे देणं शक्य असेल ते देणं हा घराचा स्वभाव. त्यामुळे अपूर्वाईचा पदार्थ मुलांकरता वगळून ठेवणं वगैरे शक्यचं व्हायचं नाही. मी ही हळुहळू सर्वसमभाव शिकले.

अनुक्रमणिका

आपलं कुटुंब समाजाचा एक घटक आहे. आपला काही पैसा, वेळ हा लोकांच्या उपयोगी पडलाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. लोकोपयोगी कामे स्वधर्म समजून अग्रक्रमानं केलीच पाहिजेत असं ते म्हणायचे. अनोळखी मुलांना गणपतीची वर्गणी न देता परतवून लावलेलं त्यांना कधी आवडायचं नाही. कधी कधी तर या छोड्या छोट्या देणग्यामुळे आमचं लहानंसं अंदाजपत्रक मार खायचं. अपंग बाल विकास गृह, वनिता विकास गृहात सभासद म्हणून माझं काम करणं त्यांना आवडायचं. माझं सरस्वती नाईट हायस्कूलमधे मुख्याध्यापिका म्हणून असणं हा तर कौतुकाचा विषय होता. पैशासाठी न अडवता गरीब लोकांची वकीलीची कामं चंद्रशेखर बरेचदा करायचे. याचा त्यांना फार अभिमान वाटायचा. चार चांदाची सरदारकी मिळाल्याच्या खुषीत ते असायचे.

भाऊरावांबरोबर सतत असल्यामुळे त्यांच्या अनेक चर्चांची मी मूक साक्षीदार होते. अशावेळी ते वेगळेच होऊन जात. त्यांचा ठाम तर्कसंगत बुद्धिवाद, द्रष्टेपणाचे निर्णय, समोरच्या हस्तीचं मतपरिवर्तन करण्यासाठी केलेली बौद्धिक कसरत, क्वचित केलेले आर्जव हे सगळं बघणं, ऐकणं हा एक वस्तुपाठच असे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सरने आजारी असताना भाऊराव (मी आलेच) त्यांना भेटायला मोझरीला गेले होते. तेथे गेल्यावर भाऊरावांना कळलं की कॅन्सर बरा व्हावा म्हणून महाराजांवर सर्पदंशाचा उपाय होणार आहे. तीव्र विषाचे काळे, पिवळे, हिरवे साप टोपल्यात बंद करून ठेवले होते. असली अघोरी उपाय योजना करु नये म्हणून भाऊरावांनी नाना प्रकारांनी कळकळीने विनवले. महाराज काहीच बोलेनात, तेव्हा अखेरचा प्रयत्न म्हणून तळमळून म्हणाले, "महाराज तुम्ही काय सर्व सामान्य आहात का? देशभक्तीची ज्योत जनमनात उजळवणारे तुम्ही या अशा अंधारात उडी मारुन स्वतःला संपवणार का? तुमच्या वेदना नियती म्हणून स्वीकारा. तुम्हाला मृत्यूच येणार नं? मग तो सर्पदंशानं येण्यापेक्षा कॅन्सरनं आलेला काय वाईट!" लगेच आम्ही नागपुरला परत आलो. परत येताना ते फार व्यथित झालेले होते. तुकडोजी महाराजांनी तो उपचार नाकारला असे नंतर कळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी धर्मांतर प्रश्नावर पत्राने बरीच चर्चा भाऊरावांनी केलेली होती. डॉ. बाबासाहेब नागपुरला हॉटेल श्याम मधे उतंरले असतानाही दोन चर्चासत्रे झाली. पण तिढे फारसे सुटत नव्हते. शेवटी ते म्हणाले, "हिन्दु धर्मानं दलितांवर अन्याय केला म्हणून तुमचा हिंदू धर्मावर राग आहे नं? मी तुमचा राग समजू शकतो पण तुमचा देश हिंदुस्थानच आहे नं? मग धर्मावरचा राग स्वतःच्या मातृभूमीवर कां काढता? धर्मांतरच करायचं तर ज्या धर्माची मूळ ह्या देशातली नाहीत असा धर्म कां स्वीकारायचा? शक्य असेल तर हिंदुस्थानातला एखादा धर्म स्वीकारा किंवा दुसरा धर्म स्थापन करा." काही दिवसांनी बाबासाहेब आणि लाखो दलितांनी दसऱ्याच्या दिवशी बुद्ध धर्माची दीक्षा घेतली.

भाऊरावांच्या मागे कामाचे व्याप खूपच असत. मोडीच्या वळणाच्या हस्ताक्षरात ते फक्त कादंबऱ्या लिहीत. बाकीचे सर्व लेखन लेखनिक लिहून घेत असत. ढगळ अक्षरात शुद्ध लिहिणारा, मख्ख चेहरा ठेऊन मधे न बोलणारा, बराच वेळ डिक्टेशन घेऊ शकणारा लेखनिक त्यांना पसंत असे. पण तो उपलब्ध नसेल तर कोणीही चालायचं. फक्त लिहिणाऱ्याला मंत्रपुष्पांजली ऐकून घ्यावी लागायची घोडा मिळाला तर उत्तमच पण तो नसेल तर गाढवही चालेल असं ते म्हणायचे. हरकत त्यांची नसे- गाढवांचीच असे, दिसेल त्याला काम सांगण्याचा एकूणच त्यांचा स्वभाव होता. एकाच वेळी अनेकांना ते लीलया छोटी-मोठी कामं सांगू शकत. आपल्या पाच मिनिटांच्या कामाकरता दुसऱ्याची पन्नास मिनिटे वाया घालवायला त्यांना मुळीच संकोच वाटायचा नाही. क्षुल्लक कामही त्यांच्या मते महत्त्वाचं असायचं. दोन दिवसांनी लिहिलं तरी चालेल अशा पत्राचं डिक्टेशन घेण्याचा तगादा माझ्या स्वयंपाकाच्या घाईतही ते लावत. माझ्या आजारपणातही 'छोटंसच पण

अत्यावश्यक काम आहे' असं म्हणत. अर्धा तास डिक्टेशन द्यायचे त्यांचं काम पूर्ण झाल्यावर मगच त्यांना माझ्या आजारपणाची जाणीव व्हायची. अशा वेळी मग फटाके वाजायचे कधी कधी तर पाचहजारी लड वाजायची या गोष्टींचा त्यांनी आपल्यामनावर कधी परिणाम होऊ दिला नाही. कुरळया केसांचा राक्षस एकदा अंकित झाला की तुमची सगळी कामं पटापट करून टाकतो, असं मी गोष्टींच्या पुस्तकात वाचलं होतं तो राक्षस कृपावंत होऊन आपल्याकडे आला तर किती बरं होईल असं वाटायचं मला. त्या दिवसात देवानं तुला काय देऊ असं मला विचारलं असतं तर मी तो काम करणारा राक्षसच मागितला असता. पण देवानं कधी विचारलंच नाही.

आमचं हे मोठं खटलं चालवताना मला माझ्या आवडीनिवडी फारशा जपता आल्या नाहीत. छंद जोपासता आले नाहीत. माझं गाणं संपलं. कारण त्याकरता द्यायला माझ्याजवळ वेळच नव्हता. माझ्या काही मैत्रिणीही दुरावल्या. कारण त्यांच्याशी गप्पा मारायला त्यांच्याकडे जाण्याची किंवा घरी बोलावण्याची फारशी संधी मिळाली नाही त्यावेळी. माझ्या बाळंतपणाशिवाय मी कधी माहेरी जाऊन राहू शकले नाही. आई-वडीलांच्या मृत्यु दिवशीही मी आमच्या घरी परतलेली होते. माझ्या माहेरवासाच्या काळातही भाऊराव रोज माझ्या माहेरी यायचे. त्यामुळे पुष्कळ वेळा आपलं माहेर कुठेतरी लांब असायला पाहिजे होत अस तीव्रतेने वाटायचं. निदान भेट तरी होते तेव्हा आहे हेच ठीक असंही वाटायचं. अशा लहान सहान गोष्टींचा त्रास व्हायचा मनाला. कसा कोण जाणे पण भाऊरावांना माझ्या विचारांचा अंदाज यायचा. मग काही दिवस तडजोडीचे सहकार्याचे जायचे. शांतपणे विचार केला की उणे (-) पेक्षा अधिकच (+) चिन्हच ठसठशीत दिसायचं. मग हा माझा जन्म कुटुंबाकरता असं मी म्हणायची. आपण स्वतःच घेतलेले हे अग्निहोत्र भाऊरावांच्या अंतापर्यंत सांभाळणार हे मीच माझ्या मनाला दिलेलं वचन आठवायचं आणि मनावरचं मळभ दूर होऊन लख्ख सूर्य प्रकाश पसरायचा.

भाऊरावांशी मित्रत्व नसलेल्या लोकांशी माझे स्नेहबंध असले तरी त्यांची हरकत नसे. मात्र ती व्यक्ती सभ्य, सुसंस्कृत असावी असं त्यांच म्हणणं असे अन् मलाही ते पटायचं. घरातील कुणाच्याही व्यक्तिगत संबंधाच्या त्यांनी आदरच ठेवला. पु. भा. भावे- काका हे भाऊरावांच्या वर्तुळातले किंवा पीरवारातले नव्हते. पण मी काका आणि काकूंकडे जाऊन खूप गप्पा मारुन ताजी तवानी होवून यायची. त्यांचे नागपूरचे वास्तव्य काही महिन्याचं असल्यामुळे तर त्या दोघांविषयी मला खूप असोशी होती. भाऊरावांना हे माहीत असल्यामुळे वेळ काढून मला जायला सांगत. पुण्याचे रा. ज. देशमुख त्यांचे कित्येक वर्षांचे प्रकाशक. देशमुख पतीपत्नीचे त्यांना कौतुकही होते. त्यांच्या घरी आम्ही जाऊन रहातही होतो. पण काही कारणानं पुढे संबंध दुरावले भाऊरावांचे. मी आणि हे मुलंही त्यांच्याकडे जातच राहिलो. देशमुख पतीपत्नीनीही व्यवहारातील कटुता आमच्या संबंधात येऊ दिली नाही. भाऊरावांबरोबर मी पुण्याला गेले की त्यांचे फोन यायचे, काम नसलेल्या वेळात गाडी पाठवून ते मला घेवून जायचे परत आणून सोडायचे. असा मनाचा उमदेपणा अनुभवाला येणं दुर्मिळ.

मला माणसं ओळखता येत नसत. कित्येक फटके खावे लागूनही आजही ते शहाणपण मला आलेलं नाही. पस्तीशी ओलांडली तरी एखाद माणूस इतकं गाढवं कसं राहू शकत असा त्यांना प्रश्न पडायचा. सावधपणे हातचं राखून बोलणं, प्रसंगाचा फायदा घेऊन स्वतःचा मोठेपणा वाढवणं या वगैरे गोष्टीत माझ्या कमजोरपणाचा त्यांना राग यायचा. वलयांकित माणसाच्या घरातील सगळीच माणसं थोडी काही मोठी

असतात. ती असतात आपापल्या जागी असं माझं म्हणण असायचं. 'जन्मतः कोकणस्थ असूनही माझं व्यवहारज्ञान इतकं कच्च कसं,' असं ते म्हणायचे "गोरे, घारेपण, कंजूषपण जस माझ्यात नाही तसचं हे अस" मी म्हटलं की ते हसायचे. पण कधी कधी त्यांना माझ्या भवितव्याची काळजी वाटायची. त्यांचा मूड पाहून मीही विचारायची त्यांना की, "मी जर महत्वाकांक्षी असते. आत्मकेंद्रित असते. व्यवहारचतुर असते तर आजचं हे वातावरण राहिल असतं कां"? मग एकदम ते विषय पालटून टाकत. "आम्ही माडखोलकर उत्तम ॲडमिनिस्ट्रेटर आहोत. तू कारकून आहेस" असं नेहमीच म्हणायचे. याचा अर्थ त्यांना माझं कौतुक नव्हत असा नाही. नसलेले गुण मला चिकटवून टाकत. मी माझा बेडकाचा बैल होऊ कधीच दिला नाही ही गोष्ट वेगळी.

भाऊरावांच गोत्र बहुधा नारदमुनी हे असाव. त्यांना लहर आली आणि मोकळा वेळ मिळाला की ते कळ लावत. मीनाला काही सांगतील, मग मीना म्हणाली म्हणून मला, मग माझ्या नावावर ह्यांच्याकडे दुसरचं काही खपवतील. बाबासाहेब तर असं म्हणत होते. असं सुनीलला सांगतील. अनेक गैरसमज व्हायचे. मग नंतर कधी त्यांची नारदीय कळा लक्षात आली तेव्हा आम्ही ठरवलं की आपली आपसांत भांडण व्हायची असली तर ती होऊ दे. आपण कडाकडा भांडू पण भांडणाचं कारण आपण असायला हवं. भाऊरावांनी लावलेली काडी नको. आम्हाला म्हणायचे की, "तुम्ही सगळे एकत्र होता आणि मला म्हाताऱ्याला एकटं पाडता." ६४ च्या सुमारास आम्ही जेमचा मोठा फ्रीज घेतला. त्याकाळी घरोघर फ्रीज नव्हते. फ्रीजचा मोठा आकार पाहून लोक कौतुक करायचे ते ऐकून घेतल्यावर स्वतःहून खालच्या आवाजात सांगत, 'अहो मी आणि बाबा गरम डोक्याचे आहोत न सुधाला त्रास होतो. तिनं हा भला मोठा फ्रीज अशासाठी घेतला की जो रागवेल त्याला फ्रीजमधे बसवून शांत थंड करता येईल.' लोक मोठ्यानं हसून त्यांना दाद द्यायचे अन माझ्याकडे बघायचे. आमंत्रणांना नकार द्यायचा असला तर सांगायचे की, 'मी सुधाबाईला विचारुन सांगतो.' कधी म्हणायचे, 'मला नाही वाटत सुधा परवानगी देईल,' लोकांना वाटायचं एवढ्या थोर माणसाला सुनेचा केवढा जाच. आमंत्रण स्वीकारायचं असलं तर मग त्यांची गैरसोय होत नसे, त्यांना कसलाही त्रास होत नसे. सूज्ञ लोकांना बहुतेक हा प्रकार माहीत झाला असावा. कारण मला कुणी बोल लावला नाही.

भाऊराव समजणं ही सोपी गोष्ट नव्हती. ते रागीट होते, लहरी होते पण साधे सरळ होते, प्रेमळ होते. ते मनस्वी होते पण आपल्या लोकांच्या बंधनातही होते स्वतःच्या मनाप्रमाणे सर्व करून घेत पण त्यांच्याकरता जीव पाखडत. त्यांना गृहीत धरता येत नसे. कामाचा रेटा असल्यावर त्यांच वागणं वेगळं असायचं आणि कामाचा भर उतरल्यावर शिणलेले असले तरी प्रसन्न असायचे. लहान सहान बाबींमधे कधी सल्ला विचारायचे तर कधी, 'मला कळतं तुमच्या सल्याची गरज नाही' म्हणायचे. आम्ही सर्वांवर खूप प्रेम असूनही अलिप्त बनायचे तर कधी कुटुंब कबिल्यात रहात असूनही एकाकी असायचे. ते निर्भय होते आणि भित्रेही. कधी ज्या माणसांवर खूप प्रेम करायचे त्यांच्याशी कठोरपणानं वागत. त्यामुळे त्यांची गाडी सांधा बदलून दुसऱ्या रुळावर केव्हा जाईल हे कळायच नाही. त्यांच्यासोबत सतत मी असल्यामुळे मलाच तीव्र चटके बसायचे. कुणाहीसमोर काहीही बोलायचे. क्षुल्लक कारणावरुन असह्य व्हावं एवढं रागवायचे. हा सगळा वाढत्या वयाचा परिणाम होता हे आम्हालाही कळत होतं पण अनोळखी लोकांसमोर अकारण होणारा अपमानही पचवायला जड जात होता. मी फारच नाराज झाले किंवा उदास झाले की मला म्हणायचे, "मी एक संतापी पण तूं का नाही शांतपणानं सहन करत." कधी म्हणायचे, "तू माझा खुळेपणा खपवून घेतेस त्यामुळे लोक तुझी तारीफ करतात." एकदा म्हणाले, "आता मी तुझा सासरा नाही. तूं मला आजपासून आपला चौथा मुलगा करून टाक म्हणजे सगळेच

प्रश्न सुटतील." माझी मुलं "हा तुझा धाकटा मुलगा सर्वात वरचढ त्रास देतो" अस गंमतीनं म्हणायची. मुद्दा चिघळायचा नाही. वाद संपायचा आणि सगळ्यांचाच समजूतदारपणा वाढायचा एवढं मात्र खरं.

७४ साली उन्हाळ्यात घरच्या गाडीनं आम्ही सर्व बद्रीनारायण, बद्रीकेदार, अलाहाबाद, बनारस असा मोठा प्रवास दीड महिन्यात करून आलो. त्यांना आपल्याला हा प्रवास घडल्याचे मोठेच समाधान होते. संपूर्ण प्रवासात संस्कृत काव्य व नाटकांविषयी आमच्याशी बोलत होते. विदेशात जाऊन आले तरी हिमालय बघता आला नसल्याची रुखरुख आता राहिली नाही असं म्हणत होते. गंगेच्या हिमालयाच्या दर्शनानं ते भाराऊन गेले होते. त्यांना थकवा यायचा. पण प्रवासांत उत्साही होते पण आमच्या गाडीला अपघात घडला तर काय होईल. अशी दुष्ट शंका मनात येऊन ते घाबरुन जायचे. त्यांचा थरकाप व्हायचा. मग ते बोलू शकायचे नाहीत आजूबाजूला बघू शकायचे नाहीत. डोळे मिटून घेत. मुक्कामावर पोचल्यावर ते थोडे शांत व्हायचे. त्यांच्यातला हा बदल अनिष्ट होता पण नागपुरला आल्यावर ते पूर्ववत झाले, "माझ्या मुलानं पोटातलं पाणी न हालवता, सर्व सुख सोयी उपलब्ध करून, श्रीमंती थाटांत प्रवास घडवून माझी इच्छा पूर्ण केली" असं ते सांगत! प्रत्यक्ष भेटीत किंवा पत्रभेटीत नंतरही पुण्या, मुंबईला दोनदा जाऊन आलो. त्यांनी कामं पुष्कळ कमी केली असली तरी पत्रव्यवहार चालू होता. तरुण भारतात आठवड्यातून दोन वेळा अग्रलेख लिहीत होते. आर्थिक समस्या नव्हत्या. नातवंडे मार्गी लागतील याची खात्री वाटावी अशी चिन्हे दिसत होती. त्यांचे विद्यार्थीही शिकून नोकरीला लागले होते. आणिबाणीमुळे तरुणभारताची काळजी त्यांना वाटत होती. पण तोही योग्य व्यक्तिच्या हाती सुरक्षित होता. जन्मभराची दगदग संपली होती. निर्घोर शांत आयुष्य जगण्याचे दिवस आलेले होते. पण एकाएकी त्यांच्या जगण्यातला आनंद निघून गेला आहे. असं आम्हाला जाणवायला लागलं. विचार करुनही आम्हाला या धक्कादायक बदलाचं कारण कळलं नाही. चालता येत असून ते हंतरुणावरुन उठायचे नाहीत. त्यांना अन्न पचेनासे झाले. रोज डॉक्टर त्यांच्या तपासण्यासाठी घरी येत. औषध देत. त्यांची शुश्रुषा मी स्वतः करत होते. पण ते कुणातच रमेनात. त्यांचा जीवनरस आटून गेला. "भाऊराव वाचून दाखवू का तुम्हाला? नाट्यपद ऐकता कां? अंगणांत छान ऊन पडलं आहे. आपण बसायचं कां?" अशा नाना प्रश्नांना नको एवढं एकच उत्तर देत. मात्र सारख खायला मागायचे. त्यांना अन्न पचायचं नाही. अतिसाराची बाधा झालेली होती. त्यामुळे जास्त खायला दिले तर त्यांना त्रास व्हायचा आणि आम्हालाही. आणि नाही दिलं तर मला रागावायचेच. शांताबाई गेल्यावर केवळ मीना, बाबाकरता मी जगलो असं म्हणणारे वडील आपल्या मुलांशी चार वाक्यही बोलायला उत्सुक नसत. नातवंडाचं उठसूठ कौतुक करणारे आजोबा त्यांची विचारपूस करीनात. ती त्याच्या खोलीत जाऊन बसली तर थोड्याच वेळात त्यांना घालवून देत. तरुण भारतातले सहकारी भेटायला आले तर एक दोन वाक्य बोलून डोळे मिटून घेत. त्यांचे विद्यार्थी आले, मित्र आले तरी थोड्या फार फरकाने हाच प्रकार व्हायचा. त्यांना शारीरिक वेदना फारशा नव्हत्या तरी सारखे ओरडायचे. त्यांचे शरीर दुर्बल झालं होतं त्यापेक्षाही त्यांची बुद्धी क्षीण झाली होती. त्यांचं हे रुप पाहून मला रडायला यायचं. त्यांना बरं वाटावं म्हणून काहीही करण्याची आमची तयारी होती. पण करून घेण्याची त्यांची तयारी नव्हती. आमच्या लक्षात आलं की त्यांनी जगायचं नाकारलं आहे. त्यांच फक्त शरीर आपल्यात आहे. त्यांची मन बुद्धी उरलीच नाही. दिवस भर झोपल्यानं रात्री झोप यायची नाही. सारखे हाका मारायचे मला. ह्यांना, सुनीलला, मला विषाची गोळी मागायचे सारखे. मी सारखीच त्यांच्या जवळ असल्यामुळे मला अगदी असह्य व्हायचं. शेवटी मी एकदा म्हटलं. "मी आणून देते विषाची गोळी तुम्हाला. तुमची सुटका करते अन् मग खून केल्याच्याआरोपावरुन फाशी जाते." त्यानंतर ती मागणी संपली. 'खायला दे' आणि 'लवकर सोडव' अशी दोन

अनुक्रमणिका

वाक्यच ते शंभरवेळा म्हणायचे “माझ्याजवळ बस मला खायला घाल, थोपट,” “असं म्हणायला लागले. ते विकलांग झाले होते. निव्वळ हाड उरली होती त्यांची ते इतके केविलवाणे दयनीय झाले होते की आम्हाला ते बघणं कठीण झालं होत. जन्मभर ताठपणे जगलेल्या माणसाचेच हे रुप बघणं दुःखाच झालं होतं. आकाशीच्या कुऱ्हाडी, खुशाल पडो माझ्या माथी, परी ते सोसण्याचे सामर्थ्य द्यावे. एवढेच परमेश्वराला जन्मभर मागणारे भाऊराव आगतिक होऊन लाचार होऊन, ‘मला मुक्त कर’ असं विनवत होते. लवकर ने म्हणून प्रार्थना करत करत होते. त्यांच्या इतकच सगळ्यांना हे असह्य झालं होत. देवानं त्यांना लवकर बोलावून घ्यावं असं आम्हालाही वाटायला लागलं. अखेर शनिवारी २७ नोव्हेंबर ७६ ला त्यांना बोलवण्याची परमेश्वराला इच्छा झाली. त्यांच्या मृत्यूसमयी हे व मी आम्ही दोघेही त्यांच्याजवळ होतो. आमच्याकडे पहात असताना शांतपणे त्यांचा मृत्यू झाला. आम्ही दोघं, आमची मुलं जवळपास पंधरा मिनिट निःशब्द बघत बसलो होतो त्यांच्यापाशी, मग अतीव दुःखानं पण शांतपणे पुढच्या तयारीला लागलो.

सहा पायांच्या आमच्या संसार शकटाचे दोन पाय निखळून पडले होते. राहिलेल्या चार पायांना गाडा पुढे ओढायचाच होता. एखादा वारकरी वैकुंठाला निघून गेला म्हणून दिंडी अशी मधेच नाही थांबत, बाकीच्यांची वाटचाल सुरुच राहते.

***

अनुक्रमणिका

## |नागपूर आणि ग. त्र्यं. माडखोलकर|

---------------------------------------------------------------- प्रभाकर त्र्यं. चाफेकर

गजानन त्र्यंबक अुपारख्य भाऊसाहेब माडखोलकर अेक श्रेष्ठ कादंबरीकार, अतिशय मार्मिक अग्रलेख लिहिण्यानं गाजलेले तरुण भारत या नागपूरच्या दैनिकाचे संपादक, अेक चोखंदळ समीक्षक तसेच अेक अुत्तम वक्ता, रसिक, कला-प्रेमी आदि अनेक गुणांमुळे संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर जगभर परसरलेल्या निदान मागच्या पिढीच्या मराठी वाचकांना ज्ञात आहेत.

नागपूरला स्थानिक होऊन नागपूरच्या साहित्य क्षेत्रात समाजकारणात, स्वतःच्या कर्तबगारीने, याजगाचा निरोप घेईपर्यंतच्या अनेक वर्षांच्या काळात ते सतत गाजत राहिले. मराठी सारस्वताच्या इतिहासातलं अेक सानेरी पान भाऊसाहेबांच्या साहित्य- क्षेत्रातील योगदानाकरता वेगळंठेवावंच लगेल.

नागपूरच्या इतिहासातही भाऊसाहेब माडखोलकरांच्या कामगिरीचा गौरवानं उल्लेख होइल. मला त्यांचा सहवास थोडा लाभला. माझ्या स्वतःच्या आणि त्यांच्या अगदी निकटच्या परिवारातील श्री. चंद्रशेखर आणि सौ. मीनाक्षी फडणीस तसे श्री. केशवराव पोतदार आणि श्री. मुकुंदराव नानिवडेकर यांच्या स्मृती भाऊसाहेबांबद्दलच कृतज्ञतेन सादर केल्या आहे. यासर्व स्मृतीवरुन आपल्याला भाऊसाहेबांचे विविध क्षेत्रांशी कसे संबंध होते. त्यांनी किती तरी बाबतीत अनेकांना नुसतं मार्गदर्शनच केलं नाही तर सहाय्यही कसे केलं, ते अेक उत्तम पुरुष कसे होते याची कल्पना येते. ते विख्यात कादंबरीकार व कथाकार होते त्यांनी काही कविताही लिहिल्या. पुण्याला स्थापन झालेल्या साहित्यिकांच्या "रवि-किरण मंडळा" तले तेही अेक प्रमुख घटक होते. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकरांना भाऊराव आपल्या गुरुस्थानी मानीत आणि तात्या साहेबांचा या आपल्या प्रिय शिष्यावर फार लोभ होता हे सारं मी ऐकून होतो. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होइस्तोवर "भंगलेले देऊळ" आणि "मुक्तात्मा" या भाऊरावांच्या गाजलेल्या कादंबऱ्या मी वाचल्या होत्या. त्यांचे कितीतरी अग्रलेख वाचले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेबाबातचा ठराव बेळगावला भरलेल्या साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदावरुन आठवण करताना प्रथम भाऊरावांनीच मांडला होता व संयुक्त महाराष्ट्राची संकल्पना प्रथम जाहीररीत्या विशद करणारे भाऊरावच होते हे सारे मला ज्ञात होते.

काही योगायोगाने मला भाऊरांवाच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी सुचवलेल्या "तरुण भारत" मधील सहकाऱ्यांच्या हाताखाली रोज दोन-तीन तास का होईना काम करण्याची संधी मिळाली. भाऊरावांनी तोंडी सांगितलेला मजकूर लिहून घेणारे अतिशय तत्पर आणि हुशार असो काही लेखनिकही होते. फार क्वचितच पण छोटा मजकूर त्यांनी तोंडी सांगितल्यावर समोरच बसून लिहून घेण्याची संधी मला लाभली. भाऊरावांचे विविध उत्तम गुणही त्या लहानशा काळातच मला अनुभवता आले.

बहुतेक सगळेच त्यांचे परिचित ग. त्र्यं. माडखोलकरांना भाऊसाहेब म्हणूनच संबोधत असत. मी त्यांना भाऊराव म्हणत आलो, याला एकच कारण १९४४ पासून त्यांचा मुलगा चंद्रशेखर याचा वर्ग मित्र म्हणून माझा त्याच्याशी निकटचा परिचय होतो. आमचे घर चंद्रशेखरच्या घरापासून फार लांब नव्हते. त्यामुळे जवळजवळ रोजच त्यांच्या घरी माझं जाणं येणं माझ्या विद्यार्थी दशेत होतं. बंधूतुल्य चंद्रशेखर आणि

भगिनीप्रमाणेच असलेली त्यांची कन्या मीना वडिलांनां ज्या नावानं हाक मारीत त्याच नावानं हाक मारण्याची मला सवय पडली! तेच नाव मी तेव्हापासून बहुधा वापरत आलो आहे. "तरुण-भारत मध्ये मलाही उमेदवारी करता येईल का?" हे विचारायला गेलो तेव्हा पहिल्या दिवशीच सायंकाळी त्यांनी मला स्पष्टपणे कल्पना दिली की, दोन-तीन तास मला सांगण्यात येईल ते काम करावं लागेल. हे प्रशिक्षण समजावं. मात्र कामाबद्दल पगार किंवा भत्ता किंवा कोणतेही मानधन मिळणार नाही." मग ते म्हणाले. "डोळे मिटून नरसिंह चिंतामण केळकरांचं संपूर्ण साहित्य मिळेल तसंच वाचून काढ." मी जरा आश्चर्यानचं पाहिलं त्यांच्याकडे, तेव्हा ते म्हणाले "याचा अर्थ फक्त नाटकंच त्यांनी लिहिलेली वाचायची नाहीत. त्यांनी लिहिलेली सगळी पुस्तकं; समजली नाहीत काही त्यातली, तरी वाचायची. हे वाचन तुला इथल्या म्हणजे वृत्तपत्राच्या कामाकरता उपयोगीच पडेल." नंतर "तरुण-भारत" मधल्या मला ज्या विभागात काम करावं लागणार होतं त्यातले उपसंपादक, वार्ताहर, अन्य मोठी माणसं यांच्याबद्दल त्यांनी अनेकांना साध्या वाटतील पण फार मोलाच्या गोष्टी मला सांगितल्या ते म्हणाले "मी तुला गोविंदराव गोखल्यांच्या स्वाधीन करणार आहे. ते सांगतील ते काम करायचं. काही दिवसांनी तुला एखाद्या सभेला किंवा बैठकीला बातमी घेण्याकरीता, रिपोर्ट लिहायला ते पाठवतील. स्वतः तोंडी ते सांगतील तो मजकूर न कंटाळता लिहून घ्यायचा. साधेच कपडे (पण स्वच्छ) घालणारे दुसऱ्यांच्या नेहमी उपयोगी पडणारे ए. श्री. पटवर्धन आहेत. रात्रपाळीतही न कंटाळता व्यवस्थितपणे काम करणारे पां. चि. करकरे आहेत. एखाद्या सभेचा, मुलाखतीचा रिपोर्ट तिथल्या तिथे स्वच्छ आणि सुंदर हस्ताक्षरात पुन्हा त्याच्यात कसलाही बदल करावा लागत नाही अशा पद्धतीनं यशवंतराव शास्त्री लिहितात. या सगळयांकडूनच तुला खूप शिकायला मिळेल."

भाऊरावांनी सांगितलेल्या त्या गोष्टींच्या सत्यतेचा प्रत्यय मला फार लवकर आला. लहान बैठकींना कार्यक्रमाला मला वृत्त गोळा करण्याकरताही हळुहळु जायला मिळाल एकदा एका व्याख्यानाचं वृत्त घ्यायला गोविंदरावांनी मला जायला सांगितलं. त्या वक्त्याची भाषण मी आधी ऐकली होती. फार सामान्य दर्जाची ती असत. सगळे (ऐकणारे) बोअर होत! मी गोविंदरावांना म्हटलं, "मला नाही यांचं भाषण आवडत मला नका पाठवू." भाऊरावांनी माझं हे बोलणं ऐकलं. मला त्यांच्या टेबलाजवळ बोलावून मला ते म्हणाले. "वार्ताहराला एखादा कार्यक्रम आवडत नसला, भाषण आवडत नसलं तरी त्याच्या आवडीनिवडीचा प्रश्नच नसतो. त्याला पाठवलं त्या ठिकाणी जाऊन त्यानं रिपोर्ट आणलाच पाहिजे. तुला गेलंच पाहिजे," एक मोलाचा धडा मला शिकता आला. दोन वर्ष मी "तरुण भारत" मध्ये शिकावू उमेदवार म्हणून काम केलं. सायं. पाच ते रात्री दहापर्यंत मी असे. दुसऱ्या वर्षी सीटी कॉलेजमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतला त्याला कारणही भाऊरावच होते. पहिल्या वर्षी (मॅट्रिकनंतरच्या) मी कुठेच प्रवेश घेतला नव्हता. तू बी. ए. तरी व्हायलाच पाहीजेस "असं ते म्हणाले" आता यां दुसऱ्या वर्षी मला कॉलेजमध्ये शिकायचं आहे हे वडिलांना सांगण्याची आणि फी मागायची हिंमत होत नाहीं" हे भाऊरावांना मी सांगितलं. भाऊराव म्हणाले "खर्चाची तू काळजी करु नकोस. मी भैय्याजी पांढरिपांडयांना तुझ्या प्रवेशाकरता पत्र देईन. तुझ्या फीमध्ये सवलतीबद्दलही लिहीन पण तू कॉलेजमध्ये जाच." मी कॉलेजमध्ये जाऊ लागलो. काही महिन्यानंतर माझ्या वडिलांनीच मला आपणहून फी देणं सुरु केलं पण या शिक्षणाकरीता प्रारंभीचं प्रवेश शुल्क व फी देखील भाऊरावांनीच भरली. महाविद्यालयात एरवी मी प्रवेश घेतलाही नसता. ते शक्य झालं भाऊरावांनी दिलेल्या प्रोत्साहानामुळेच.

अनुक्रमणिका

एक प्रसंग आठवतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कर्क रोगाच्या शेवटच्या अवस्थेत मोझरीला होते. त्यांच्याकरता केलेले सर्व उपाय निष्फळ ठरत आहेत दुर्दैवानं आपल्याला अशुभ बातमी ऐकावी लागणार याची कल्पना होती. बर्डीवरील व्हेरायटी टॉकीज समोरचा एक रिक्षावाला दुसऱ्याला सांगत होता.... मी ते बोलणं ऐकलं व वेगानं "तरुण भारत" कार्यालयात पोहचलो आणि भाऊरावांना ऐकलेलं वृत्त सांगितलं. ते म्हणाले "अशा ऐकण्यावर विश्वास ठेवू नये. वृत्तपत्रांना बातम्या लवकर मिळतातच. जोपर्यंत पूर्णपणे खात्रीलायक अशी कुणाच्याही निधनाची बातमी आपणाला कळत नाही, तोंवर आपल्याकडून आपण कुणालाही ती अशुभ बातमी सांगू नये." सुदैवाने त्या दिवशीची ती बातमी खोटीच ठरली पण त्या निमित्तानं भाऊरावाकडून एक चांगला पाठ मिळाला.

मला एकदा ते मजकूर लिहायला सांगत होते. एक पत्र घेऊन मला कुणाकडे तरी जायचं होतं. माझा परिचय त्या पत्रात प्रथम त्यांनी करुन दिला व "आपण कृपया हे पत्र घेऊन येणारे - त्यांच्या बरोबर शक्यतर पाठवावा" अशा आशयाचा शेवटी मजकूर होता - मला माझं नाव पूर्णपणे लिहिण्याची त्या काळात तरी सवय होती. समोर बसलेल्या भाऊरावांच. लेखनाकडे पूर्ण लक्ष होतं. मला ते म्हणाले "त्रिंबक शब्द काय लिहितोस?" त्र्यंबक लिही. मी म्हटलं "माझे वडीलही तसाच हा शब्द लिहितात." ते मला म्हणाले, "तेही मग चूक लिहितात. पुष्कळ जण असाच तो लिहितात. त्र्यंबक शब्द हवा. त्रि आणि अंबक म्हणजे त्र्यंबक तीन डोळ्यांचा म्हणजे शंकर. वडिलांची शब्द लिहिण्यातली चूक तू त्यांना दाखवू नकोस. तू स्वतः मात्र शब्द शुद्ध लिहीत जा."

भाऊरावांना भेटायला "तरुण - भारत" मध्ये खूप मोठी माणसं येत त्यांच्याबरोबरही भाऊरावांच्या काव्य-शास्त्र विनोदाच्या झालेल्या गप्पा ऐकता आल्या. श्री. बकुळ बढे, श्री पार्श्वनाथ अळतंकर आलेले आठवतात. इतवारी विभागात राहणारे बबनराव नवघरे एकदा भेटायला आले होते. ते राम गणेश गडकऱ्यांचे भक्त. हौशी कलावंतांनी सादर केलेल्या "प्रेमसंन्यास" नाटकाच्या प्रयोगात "कमलाकर" ची भूमिका त्यांनी अप्रतीम केली होती. भाऊरावांच्या सांगण्यावरुन "प्रेमसंन्यास" मधील उठा.... कैलासनाथ -उठा अशा शब्दांचं स्वगत खणखणीत आवाजात सभिनय, बबनरावांनी सादर करुन सर्व उपस्थितांची वाहवा मिळवली. भाऊराव म्हणाले बबनचं नाव मी कमलाकरच ठेवलं आहे"

श्री. गोविंदराव टेंबेंना श्रीमंत बाबूराव देशमुखांकडे भेटायला भाऊराव एकदा गेले होते तेव्हा मला ही त्यांच्याबरोबर जाता आलं. भाऊरावांच्या शेवटच्या आजारात त्यांच्या प्रकृतीची मुद्दाम विचारपूस करायला श्री. नरहर कुरुंदकर, श्री. पु. भा. भावे गेले होते तेव्हा त्यांच्याबरोबर मलाही उपस्थित राहता आलं. मला आठवतं न्या. मूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारींच्या मोटारीतच नरहर कुरुंदकर भाऊरावांना भेटायला आले होते. वाटेत बोलतांना ते म्हणाले, "रस्त्यावर समोरुन येतांना भाऊसाहेब माडखोलकर दिसले तरी मी त्यांच्या पायाला हात लावूनकेव्हाही श्रद्धेने वंदन करेन कारणः भाऊसाहेबांनी हैद्राबाद संस्थाच्या राजवटीत आमच्या प्रगतीकरता जे काही केलं आहे, तिथल्या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाच्या परीक्षांन बसण्याच्या दृष्टीनं त्यांनी जे प्रयत्न केले ते आम्ही कायमचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले पाहिजेत" फार विनम्रतेनं नरहर कुरुंदकरांनी भाऊरावांच्या प्रकृतीची चौकशी केली आणि धीर दिला. मला आठवतं किती तरी जणांना भाऊरावांनी मदत केली. तरुण भारतमध्ये चपराशाचं काम करणाऱ्या राजाराम नावाच्या तरुणाला त्यांनी परीक्षांना बसण्याकरता

प्रोत्साहन देऊन चपराशाची नोकरी सोडून रिझर्व बँकमध्ये नोकरी स्वीकारायला लावल्याची गोष्ट श्री. चंद्रशेखर फडणवीसांनी सांगितली होती.

पुरुषोत्तम भास्कर भावे आणि गजानन त्र्यंबक माडखोलकर पूर्णपणे विरोधी मतप्रवाहांचे पण मतांमुळे मनोभेद निर्माण झाले नाहीत. पु. भा. भावेंनी भाऊरावांच्या अंत्यदर्शनालाही उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली कारण भाऊरावांचं कर्तृत्व कुणीही विसरणं अशक्य होतं.

भाऊसाहेबांनी "तरुण-भारत" मधल्या सहकाऱ्यांना मोलाचं मार्गदर्शन केलंच पण काही तरुणांमधला लिहिण्याचा शक्तीचा स्फुल्लिंग बरोबर ओळखून त्याना लिहितं केलं. त्यांना साहित्याबरोबरच साहित्य समीक्षेची दृष्टीही दिली. न्यायमूर्ती भास्करराव मासोदकर, केशवराव पोतदार, प्रा. सुरेश डोळके, प्रा. म. ना. लोह, प्राचार्य राम शिंदे आदी अनेकांना लेखनाचं प्रोत्साहन दिलं श्री. चंद्रशेखर फडणीस यांनी जेव्हा जेव्हा भाऊसाहेबांनी बोलावलं तेव्हां तेव्हां आनंदानं त्यांच्या लेखनिकाचं काम केलं होतं. केवळ आपलं मराठी सुधाराव म्हणून "तरुण भारत" च्या संपादकीय विभागात पडतील ती काम फडणिसांनी केली. भाऊसाहेबांबरोबर बर्डीवरच्या श्याम हॉटेलमध्ये नागपूर मुक्कामात उतरलेल्या डी. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीकरीता आपल्याला जाण्याची संधी मिळाली याचाही चंद्रशेखर फडणवीस आवर्जून अभिमानानं उल्लेख करतात.

निर्मिती किंवा सृजनशक्ती ज्याला म्हणतात त्या गुणामुळे भाऊसाहेब कथा -कादंबऱ्या कविता किंवा समीक्षालेखच नव्हेत तर साहित्याशी संबंधित अनेक सुंदर लेख तसेच विशेषतः त्यांचे गाजलेले अनेक अग्रलेख लिहु शकले असा चंद्रशेखर फडणिसांचा विश्वास आहे. तरुण भारतामध्ये साधारणतः दर आठवडयात भाऊसाहेब तीन अग्रलेख लिहीत. सोमवारचा त्यांचा अग्रलेख अध्यात्मिक वा धार्मिक असे महान व्यक्तींच्या गुणपूजनाकरता त्यांनी लिहिलेले गौरवपर अग्रलेख तसेच मोठया व्यक्तींच्या निधनानंतर भाऊसाहेबांनी लिहिलेले मृत्यूलेख संपूर्ण महाराष्ट्रात गाजले. भाऊसाहेबांच्या स्मृतींना उजाळा देतांना श्री. चंद्रशेखर फडणीस म्हणाले.

स्वतः केलेल्या लेखनाची प्रुफं भाऊसाहेब स्वतः तपासत. कथा-कादंबऱ्या मात्र त्यांनी स्वतः च्या हस्ताक्षरात घरीच लिहिल्या. ते अग्रलेख मात्र तोंडी सांगत व लेखनिक लिहून घेत असे. त्यांनी वृत्तपत्राकरता केलेलं साहित्यविषयक लेखन असंच असे. वृत्तपत्राच्या विविध विभागांकरता अनेकांमधील अचूक गुण ओळखून त्यांनी सुचवलेल्या व नेमलेल्या व्यक्तींच्या कामात ते कधीही ढवळाढवळ करीत नसत. एकदा एखादं काम दिलं की पां. चि. करकरे किंवा गोविंदराव गोखले ते व्यवस्थित करणारच, यशवंतराव शास्त्री ठळक पण सुरेख हस्ताक्षरात सभाबैठकींच वृत्त पुन्हा बघण्याची व दुरुस्त्या करण्याची गरजच भासणार नाही इतकी नीटस प्रत त्वरित प्रेसमध्ये देणारच याची त्यांना खात्री होती. यशवंत बाळाजी शास्त्री म्हणजे य. बा. शास्त्री नावानं ओळखल्या जाणाऱ्या आपल्या तरुण सहकाऱ्यावर त्यांचा फार लोभ होता. रात्रीचे अकरा - बारा वाजेपर्यंत यशवंतराव भाऊसाहेबांना सहाय्य करायला "तरुण -भारत" कार्यालयात थांबत असत. एकनाथराव (ए. श्री.) पटवर्धन हे भाऊसाहेबांचे खास अंतरंगातले मित्र होते. भाऊसाहेब आणि ए. श्री. पटवर्धन जणु एकाच

नाण्याच्या दोन बाजू होत्या. आदरानं भाऊसाहेबांना भेटायला खूप मोठी माणसं येत. एखाद्या अडलेल्या मोठ्या कामाकरता भाऊसाहेबांकडे त्यांची मदत घ्यायला येत.

एक उदाहरण फडणिसांनी सांगितलं –

भाऊसाहेब संयुक्त महाराष्ट्रवादी तर त्या दिवसात (वारे शेर - आगया शेर - म्हणून गाजलेले) जांबुवंतराव धोटे विदर्भ चंडिकेच्या मूर्ती समोर आमरण उपोषण (विदर्भ निर्मितीची शासकीय पातळीवर घोषणा होईस्तोवर) करायला बसलेले होते. जांबुवंतरावांची प्रकृती उपवासामुळे बिघडत चाललेली, त्वरित त्यांनी ते थांबवलं नाही तर विलक्षण शक्तिपातानं दुर्देवी गोष्ट होण्याची भीती जांबुवंतराव कुणाचंही एकेनात. अगदी विरोधी मताच्या जांबुवंतरावांचे प्राण वाचले पाहिजेत म्हणून काही पुढारी भाऊसाहेबांकडे आले व त्यांना तुम्हीच काही या घटकेला मार्ग काढून जांबुवंतरावांचे प्राण वाचवा असं म्हणाले मत -भिन्नतेचा विचार न करता गर्दीनं ओसडणाऱ्या इतवारीतल्या उपोषणाच्यामंडपात भाऊसाहेब गेले. प्रथम काही बोलले नाहीत मग जांबुवंतरावांचे लक्ष गेल्यावर प्रथम त्यांनी त्यांच्या अंगावर वात्सल्यानं हात ठेवला. थोडया वेळानं डोक्यावर प्रेमाने थोपटून भाऊसाहेब म्हणाले, “जांबुवंतराव तुम्ही माझ्या मुलासारखे आहात. मुलगा असा नाही जाऊ द्यायचा हाच विचार पित्याच्या मनात येणार.” बस - भावनावेगाने गदगदल्यान जांबुवंतरावांच्या तोंडून हुंदका बाहेर पडला. जांबुवंतरावांना प्रेमाच्या आग्रहापुढे आपला विचार सोडावा लागला. जांबुवंतरावांचे प्राण वाचले ते भाऊसाहेबाच्या वात्सल्याच्या वागणुकीमुळे असं आम्हाला वाटतं.”

मैत्रीच्या भांडवलावर भाऊसाहेबांना त्यांचे काही निकटचे मित्र, “आपल्या कार्यक्रमाचं वृत्त तरुण - भारत मध्ये आलं पाहिजे त्याकरता उत्तम वृत्तपत्रप्रतिनिधी पाठवा.” अशी गळ घालीत. एकदा नागपुरातल्या एका हिंदुत्ववादी वयोवृद्ध पण कर्तबगार पुढाऱ्यानं आपलं आज चिटणीस पार्कमध्ये भाषण होणार आहे. चांगला रिपोर्टर पाठवा.” असा आग्रह केला त्यांना भाऊसाहेब म्हणाले. “तुमच्या मताचा सावरकरवादी तरुण आहे आमच्याजवळ. त्यालाच पाठवेन.” ति कामगिरी भाऊसाहेबांनी नेमकी फडणिसांवरच टाकली. पण त्या भाषणाचं वृत्त कसं द्यायचं हा प्रश्न त्यांना पडला. कारण त्या भाषणात मुख्यतः पंडित नेहरुंची निंदा नालस्तीच होती असाच प्रसंग फडणिसांवर पुन्हा एकदा ओढवला श्री. ल. ग. उपाख्य कर्तारसिंग मते यांनी एकदा भाऊसाहेबांना “माझी मुलाखत घ्यायला कुणाला तरी पाठवा आणि लेख तरुण - भारत मध्ये प्रसिद्ध करा” हा आग्रह भाऊसाहेबांना केला. फडणिसांनी तीन दिवस त्यांची मुलाखत घेतली पण ती वृत्तपत्रात आलीच नाही! कर्तारसिंग कमालीचे संतापले व हातातील काठीसह येऊन फडणिसांना जाब विचारु लागले. वस्तुतः हे दोन्हीही लेख फडणिसांनी भाऊसाहेबांना दिले होते. त्यांनी ते वाचलेही होते पण अकारण निंदानालस्तीच्या मजकुराचे ते लेख छापून समाजाचा रोष ओढवण्याऐवजी “फडणिसांनी मला लेख दिलेच नाहीत.” असं भाऊसाहेबांनी म्हटलं. भाऊसाहे मांडखोलकरांच्या कन्या सौ. मीनाक्षी फडणीसांनाही आपल्या वडिलांच्या काही आठवणी सांगितल्या.

भाऊसाहेबांना संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत रामदास आदी धारकरी आणि वारकरी संप्रदायांतील संतांच्या साहित्याचा आणि त्यांच्या महान कर्तृत्वाचा जसा सार्थ अभिमान आणि श्रद्धाभावही होता तसाच स्वतः च्या काळातील संतांबद्दल, अवलिया म्हणून विख्यात असलेल्यांचीही ओढ होती. राष्ट्रसंत

तुकडोजी महाराजांचा त्यांचा निकटचा परिचय होता. कॅन्सरनं आजारी असलेल्या महाराजांच्या शेवटच्या दिवसात त्यांचा आजार विकोपाला गेला असताना मोझरीला, आपले सहकारी दिगंबरराव घुमरे आणि आपली कन्या सौ. मीना यांना बरोबर घेऊन भाऊसाहेब महाराजांची भेट घ्यायला गेले. महाराजांच्या मृत्यूनंतर गुरुदेव सेवा मंडळाला मठीचे आणि बुवाबाजीचे स्वरुप येऊ नये व पैशाचा अपहार होवू नये या हेतूने माडखोलकरांनी एक योजना तयार केली आणि ती त्यांनी तुकडोजी महाराजांना सांगून त्यांची या योजनेला संमती घेतली व या योजनेच्या कागदावर महाराजांची स्वाक्षरी घेतली.

ती योजना म्हणजेच संत तुकडोजी महाराज कॅन्सररिलीफ सोसायटी. आज याच सासायटीतर्फे नागपुरात कॅन्सरग्रस्त रुग्णांकरता अद्यावत कॅन्सर हॉस्पिटल उभे झाले आहे आणि काम करते आहे.

त्या काळात वर्धा मार्गावर नंतर स्थापन झालेल्या विकास आश्रमाचे चालक लांबे महाराज यांच्या भक्तिगायनाने आणि उपदेशाने प्रभावित झालेला अनेक उच्चस्थानांवरील मोठी माणसेही होती. सौ. मीनाला धन्तोलीवरच्या भाऊसाहेबांच्या "प्रसाद" बंगल्यात, रा. मु. सगदेव न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती, पु. य. देशपांडेही भाऊसाहेबांकडे लांबे महाराज जेव्हा येत तेव्हा आवर्जून अनेकदा आल्याची आणि या साऱ्यांच्या अध्यात्मिक विषयांवर चर्चा झाल्याची आठवण आहे. लांबे महाराजांचे दैनंदिन व्यवहारातले काही नेम होते ते भाऊसाहेब व्यवस्थितपणे लक्षात ठेवून व्यवस्था करत.

बडया साहित्यिकांची भाऊसाहेबांकडे वर्दळ असणं यात काही आश्चर्य नव्हतं. पण त्या काळात गाजलेल्या नाटकातील कलावंत आणि बोलपटातील कलावंतही आवर्जून भाऊसाहेबांच्या निवासस्थानी येऊन त्यांची भेट घेत. गायनाच्या क्षेत्रात गाजलेले कलावंतही येत. १९४८ ते १९५५ या काळात रांगणेकरांची कंपनी "कुलवधू," "आशीर्वाद," "माझे घर," "रंभा," " एक होता म्हातारा" नाटकाच्या प्रयोगाकरता येऊन जात असे. त्याआधी चिंतामणराव कोल्हटकरांची बलवंत संगीत नाटक मंडळी, लोंढ्यांची कंपनी, गंधर्व नाटकमंडळी, दामुअण्णा मालवणकरांची नाटक कंपनी, इं. अनेक नाटक मंडळी येऊन या मोठया नाटक मंडळयातील सगळे बडे कलावंत भाऊसाहेबांना भेटायला येऊन त्यांच्या सर्व कुटुंबियांना आणि निकटच्या मित्रांना आपल्या नाटयप्रयोगांना बोलावून समोरच्या रांगातल्या जागा त्यांच्यासाठी राखून ठेवत. जयराम शिलेदार आणि जयमालाबाई, पंडितराव नगरकर, पार्श्वनाथ अळतेकर, बाळ कोल्हटकर आदि कलावंतही येऊन जातं. चिंतामणराव कोल्हटकरांनी तर त्यावेळी लहान वयाच्या असलेल्या चंद्रशेखरकडून "पुण्यप्रभाव" नाटकातली एक भूमिका बसवून घेतली होती! त्या दिवसात पु. ल. देशपांडे रांगणेकरांच्या नाटयप्रयोगात काम करीत. आपल्या घरी पु. लं. नी केलेलं पेटीवादन. रांगणेकरांची रोजची भेट, राजा बढे तसेच त्यांचे बंधू बकुळ बढे, बबनराव बढे यांचं भाऊसाहेबांना भेटायला येणं, बकुळ बढेंच्या विवाहप्रसंगी आपल्या आईवडिलांनी त्यांना दिलेलं प्रोत्साहन व मदत, बकुळ बढयांच्या झालेल्या अकाली निधनाआधीच्या त्यांच्या गंभीर आजारामुळे व्यथित झालेले भाऊसाहेब मीना ताईंना आठवतात. भाऊसाहेब बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधाकर होते. जात-पात इ. अनिष्ट गोष्टींचा त्यांच्या जीवनात स्थानच नव्हतं. अनेक गरजू मुलांची शाळा-कॉलेजातली फी त्यांनी भरली. अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या. ऐवढंच नव्हे तर आपल्या घरात कुटुंबातल्या घटकाप्रमाणेच त्यांना वागणूक दिली. दर वर्षी अपंग मुलांच्या संस्थांना. दिवाळीच्या दिवसात भेट देऊन ते फराळाचं साहित्य नेऊन देण्याकरता, सौ. शांताबाईंनाही बरोबर नेत. नागनदीवरच्या मॉडेलमिल्स जवळच्याच पुलानजिक

उंटखाना वस्तीत रोमन कॅथलिक चर्चने चालवलेली (गरीब अपंगांकरता) एक संस्था कार्य करत असते. या संस्थेकरता जी मोलाची मदत भाऊसाहेबांनी केली त्याबद्दल अतिशय आदरानं सिस्टर झेवियर आणि सिस्टर कॅलिस्टा अनेकदा भाऊसाहेबांना आणि सौ. शांताबाईंना भेटायला येत. गांधीजींच्या वधानंतर खवळलेल्या समाजाचा रोष उफाळला होता. भाऊसाहेबांच्या घरावरही त्यांची वक्र दृष्टी फिरली होती. जाळपोळ दगडांचा मारा होण्याची शक्यता होती. तसा विध्वंसकांचा बेतही होता पण आपल्या वडिलांनी संरक्षणाकरता कधीही पोलिसांची मदत मागितली नाही या त्यांच्या धैर्याचा आपल्याला अभिमान वाटतो असे मीनाताई म्हणाल्या. त्यांच्यामुळेच वि. स. खांडेक, रा. ज. देशमुख, बाबुराव पेंटर, माधवराव बागल, हिराबाई बडोदेकर, गोविंदराव टेंबे, आदी महान कलावंत भाऊसाहेबांमुळेच जवळून बघायला मिळाले, रविशंकरजी शुक्ला, पं. द्वारकाप्रसाद मिश्रा, भगवंतराव मंडलोई, डॉ. बार्लिंगे, डॉ. खरे आदी त्या काळच्या मंत्रीमंडळातल्या बडया मंत्र्यांची भाऊसाहेबांशी किती जवळीक होती, आचार्य दादा धर्माधिकारी, डॉ. हेडगेवार, गुरुजी गोळवलकर, रामभाऊ रुईकर इ. भिन्न विचारधारांची माणसं त्यांना किती मानत होती याची कल्पना आली. तसेच न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, श्री. वसंतराव साठे, श्री. नाशिकराव तिरपुडे आदि राजकीय पुढारी भाऊसाहेबांबद्दल किती आदरभावानं वागत याचीही कल्पना आली, श्रीपाद अमृत डांगेसारखे महान साम्यवादी पुढारी आपल्या वडिलांचे किती जवळचे मित्र होते हेही कळलं इत्यादी माहिती सौ. मीनाताईंनी सांगितली.

भाऊरावांच्या सान्निध्यात बराच काळ राहिलेले एक पत्रकार होते केशवराव पोतदार. १९ ४५ साली जानेवारी महिन्यातल्या एका सोमवारी धोतर नेसलेला, शर्ट कोट आणि डोक्यावर टोपी घातलेला मराठवाडयातला एक तरुण मेलनं नागपूरला आला आणि हातात एक पिशवी घेऊन सरळ "तरुण-भारत" दैनिकाच्या, इमारतीपाशीच येऊन पोहचला! फार मोठे संपादक म्हणून भाऊरावांना यां तरुणानं आधी पत्र पाठवून "तरुण -भारत" मध्ये पत्रकारिता शिकण्याची उमेदवारी देण्याची विनंती केली होती. "तरुण-भारत" चे संघटक होते, श्री अे. श्री. पटवर्धन. त्यांना भाऊरावांनी याबाबतचा निर्णय घेण्याकरता त्या तरुणाचं पत्र दिलं. "बिनावेतन काम करण्याची तयारी असेल तर या आणि भाऊसाहेब माडखोलकरांना भेटा" असं उत्तर श्री. ए. श्री. पटवर्धनांनी या तरुणाला पाठवलं आणि तडक या तरुणानं नागपूर गाठलं! त्या दिवसात महाल विभागातल्या शुक्रवार तळयाच्या पाळीजवळच "तरुण-भारत" च मुद्रणालय आणि कार्यालय होतं.

पत्ता काढत आल्यावर तळमजल्यावरच्या फाटकापाशी दिसलेल्या व इमारतीत शिरत असलेल्या गोविंदराव गोखलेंना या तरुणानं, "भाऊसाहेब कुठे भेटतील" हे विचारलं. त्यांनी म्हटलं. "तिसऱ्या मजल्यावर "तरुण-भारत" च्या कार्यालयात. मी तिथेच काम करतो. चला माझ्याबरोबर."


भाऊसाहेबांची भेट झाली. भाऊसाहेबांनी आधीच स्पष्टपणे कल्पना दिली कामाची आणि म्हटलं "काही तास रात्री काम करु शकाल पण या उमेदवारासाठी महाविद्यालयातही शिकणे आवश्यक आहे." या तरुणानं नम्रपणे होकार दिला. भाऊसाहेब त्याला "शांता -निवास" या आपल्या निवासस्थानी घेऊन गेले. सौ. शांताबाईनीही अगत्यानं स्वागत केलं. चहा दिला. "स्नान करुन जेवायला या. माडखोलकरांना सोमवारचा उपवास असतो ते मात्र आता जेवणार नाहीत. तुम्ही निःसंकोचपणे तुमची सोय होइस्तोवर इथे रहायला हरकत नाही." असं त्या म्हणाल्या. हा तरुण म्हणजे केशवराव पोतदार, केशवराव त्याकाळच्या आठवणी सांगताना म्हणाले. "उस्मानाबाद जिल्हयातल्या भूम गावचा माझा मित्र वि. द. तेरकर नागपुरात राहत असे. त्यानं माझी

स्वतःकडे राहण्याची व्यवस्था केली होतीच. दोन दिवस भाऊसाहेबांनी मला स्वतःच्या घरीच ठेवून घेतलं. नंतर मी त्या मित्राकडे गेलो. त्या वर्षीच दोन महिने हा मित्र गावाकडे उन्हाळयात सुटयांमध्ये गेला. त्या दोन महिन्यातही भाऊसाहेबांनी आपल्या घरीच रहायला बोलावलं. मी "तरुण भारत" मध्ये उमेदवार म्हणून आवश्यक तेव्हा भाऊसाहेबांचा लेखनिक म्हणून काम करत असे. लवकरच "टाईम कीपर" ची जागा रिकामी झाली. त्याजागेवर मला भाऊसाहेबांनी नेमून अर्थार्जनाचाही प्रश्न सोडवला! प्राचार्य भैय्याजी पांढरीपांडेंना सांगून मला महाविद्यालयातही प्रवेश मिळवून दिला. मी "तरुण-भारत" च्या संपादकीय विभागात बी. ए. झाल्यावर काम करु लागलो. १९५८ मध्ये आचार्य प्र. के. अत्रे यांनी नागपूरला सुरु केलेल्या "मराठा" आवृत्तीच्या कार्यकारी संपादक पदावर माझी नियुक्ती केली. त्याकरता भाऊसाहेबांनी आनंदानं मला परवानगी दिली होती एवढंच नव्हे तर "तरुण भारत" सोडतांना माझ्यावर त्यांनी स्वतः अग्रलेख लिहिला. "महाराष्ट्र" वृत्तपत्र सोडून भाऊसाहेब "तरुण-भारत" चे संपादक म्हणून आले तेव्हा गोपाळराव (दादासाहेब) ओगले यांनीही भाऊसाहेबांना प्रेमानं निरोप दिला होता. त्यावेळी ओगले यांनी वापरलेला श्लोक "यथा काष्ठंच काष्ठंच" माडखोलकरांनी माझ्यावरील अग्रलेखात वापरला. या अग्रलेखातून माझा माडखोलकरांनी केलेला गौरव ही माझ्या लेखी अभिमानाची गोष्ट होती. पत्रकारितेतले. आपले ते मार्ग दर्शकच नव्हते तर भाऊसाहेब आपले पालकही होते ही गोष्ट अभिमानाने आणि कृतज्ञतेनं केशवराव पोतदार सांगतात.

भाऊसाहेबांनी साहित्यसम्राट नरसिंह चितांमण केळकर यांच्या जन्मशताब्दीच्या वेळी त्यांचा शैलीकार साहित्यिक व पत्रकार म्हणून गौरव केला होता. तेच शब्द संयुक्त महाराष्ट्राचे प्रणेते असलेले भाऊसाहेब यांनाही लागू पडतात. असं केशवराव पोतदाराचं मत आहे.

वीस वर्षे "महाराष्ट्र" चे उपसंपादक म्हणून काम केल्यावर भाऊसाहेब २ जाने १९४४ ला "तरुण भारत" चे मुख्य संपादक झाले. महाराष्ट्रचे उपसंपादक म्हणून काम करताना त्यांना अनिर्बंध मतस्वातंत्र्य होते. वर्तमानपत्र चालवण्याची लोकशाही पद्धत आपण दादासाहेब ओगलें पासून घेतली आणि "रिपोर्ट लिहिण्यापासून अग्रलेख लिहिण्यापर्यंत गरज पडली तर संपूर्ण अंक एकटयानं लिहिण्याची मुख्य संपादकाची तयारी असली पाहिजे" ही दादासाहेब ओगल्यांची शिकवण आपण कधीही विसरलो नाही. असं भाऊसाहेब म्हणत. बहुश्रुतपणा, विषयाची अग्रलेखाकरता तयार करण्याची पद्धत, मांडणीची शैली, कांटेकोर वागणूक व अखंड उद्योगशीलता हे संस्कार मुख्यतः तात्यासाहेब केळकरां पासून आपण शिकल्याचे कृतज्ञतेने प्रामाणिकपणाने आणि प्रांजळपणे भाऊसाहेब म्हंणत. आपले गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना १९२१ साली लिहिलेल्या पत्रात जगाच्या राजकारणाचे स्वरुपच मुळी दिवसें-दिवस बदलत चालल्यानं वृत्तपत्रात लेखन करताना सामाजिक बाबीला सर्वात जास्त महत्व देण्याचा आपला विचार असल्याचं त्यांनी लिहिलं होतं. ही गोष्टही केशवराव पोतदारांकडून कळली.

अनुक्रमणिका



**श्री. भाऊराव नातवंडासह - राजु, प्रियदर्शन, शाम**

अनुक्रमणिका

"वर्णव्यवस्थेला संपूर्णपणं तिलांजली दिल्याशिवाय हिंदू धर्माला यापुढे तरुणोपाय नाही" असं ते मानत. धर्माचे पारंपारिक अडसर त्यांनी कधीही मानले नाहीत. आंतरजातीय विवाहांचा भाऊसाहेबांनी नेहमीच पुरस्कार केला. त्यांच्या घरी विविध जातीधर्माचे लोक घरच्याप्रमाणे राहत असत हे केशवरावांनी स्वतः पाहिलेलं आहे.

वासुदेव बळवंत फडक्यांचा क्रांतिवाद, न्यायमूर्ती रानडेंचे ध्येयदर्शित्व, टिळकांचे प्रतियोगी राजकारण व युयुत्सता तर आगरकरांचा बुद्धिवाद इतकेच काय कर्वे आणि देवधरांचे स्त्रीयांच्या उन्नतीचे कार्य, महात्मा फुले यांनी बहुजन समाजाच्या उद्धाराची केलेली ऊठावणी, शिंदे, गायकवाड, चंदावरकर यांनीही केलेले अस्पृश्यता निवारणाचे कार्य, रानडे, भांडारकर, राजवाडेंचे इतिहास संशोधनाचे कार्य, श्रीधर व्यंकटेश केतकरांचे ज्ञानकोशांचे कार्य, स्वातंत्र्यवीर सावरकरांचा विशाल हिंदुत्ववाद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेलं लढाऊ दलितसंघटन या साऱ्या गोष्टींबद्दल भाऊसाहेबांना फार आदर होता असं केशवरावांनी सांगितलं. या साऱ्या गोष्टीतून बुद्धियोगाचं दर्शन होते असं भाऊसाहेब म्हणतं! पुढे केशवराव म्हणाले, "स्वतः च्या" मतांचे प्रतिपादन करताना आणि न पटणाऱ्या गोष्टींवर कडाडून टीका करताना भाऊसाहेबांनी सहिष्णू वृत्तीच ठेवली. आजवर गांजलेल्या, दडपलेल्या, मागासलेल्या बहुजन समाजाच्या नुकसान भरपाईचा विचार करायलाच हवा अशी त्यांची धारणा होती. दलितांचे प्रश्न-मग ते दलित कोणत्याही जातीचे असोत ते सोडवण्याचे प्रयत्न त्यांनी केले. सुमारे पाऊणशे वर्षापूर्वी मागासलेल्या दलितांची सर्व क्षेत्रातली नुकसान भरपाई करणं हे आपलं कर्तव्यच आहे. उद्याचे राजकारण त्या समाजाचे आहे हा विचार भाऊसाहेबांनी मांडला होता. भाऊसाहेबांना वर्णविहीन, वर्गविहीन एक जिनसी समाज निर्माण झालेला बघायचा होता. या गोष्टीकरताच त्यांनी आपली लेखणी वापरली. त्यामुळेच दलित समाजातही भाऊ साहेबांचे अनेक मित्र होते."

केशवराव पोतदार मूळचे मराठवाडयातले, त्यामुळे मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारुन त्या काळी असलेल्या निजाम राजवटीत अटक होण्याची शक्यता असतानाही निर्भयपणे आपल्या भाषणातून गुलामगिरीच्या बेडया तोडण्याचे खणखणीतपणे सांगणाऱ्या व मराठवाडयात दौरा करुन अनेक ठिकाणी मराठवाडा साहित्य परिषदेच्या शाखा स्थापन करणाऱ्या मराठवाडयातून नागपूरला आलेल्या गरजू लोकांना शक्य ती सारी मदत करणाऱ्या भाऊसाहेब माडखोलकरांचं ऋण केशवराव पोतदार मानतात.

स्वतः च्या अग्रलेखात ज्या प्रमुख व्यक्तींचा उल्लेख ते करीत त्या सर्वांना ते, कटाक्षानं ते अग्रलेख पाठवत. "तरुण-भारत" कार्यालयाला भाऊसाहेबांनी जणु वृत्तपत्र-विद्यापीठच बनवले. प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे वृत्तपत्रविद्या भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली शिकून इतर मोठया वृत्तपत्रात नाव कमावणाऱ्या पत्रकारांपैकी केशवराव पोतदारही एक होते.

केशवराव पोतदार स्वतः समाजवादी मताचे पण त्यांचे स्नेहसंबंध विविध पक्षातल्या मोठयांशी जुळलेले, एक प्रखर हिंदुत्ववादी श्रेष्ठ साहित्यिक पु. भा. भावे यांचेही केशवराव पोतदार एक निकटचे स्नेही भावे आणि माडखोलकर यांच्यात तीव्र मतभेद होते पण या दोघांबद्दल बोलतांना केशवराव पोतदार म्हणाले, "नागपूरच्या शेवटच्या दीर्घ मुक्कामात भाव्यांनी माडखोलकरांच्या सुनबाईंकडून माडखोलकरांच्या अनेक

कादंबऱ्या मिळवून प्रथमच वाचल्या." एक दिवस मला म्हणाले. "सौ. सुधाताईंमुळे माडखोलकरांची काही पुस्तक वाचता आली. रचना, भाषा, कल्पनाविलास यांनी नटलेल्या कादंबऱ्या वाचून माझ्या लक्षात आलं माडखोलकर मोठे लेखक निश्चितच आहेत."

मला कुणीतरी सांगितलं होतं की संयुक्त महाराष्ट्राबाबतचा ठराव भाऊसाहेब माडखोलकरांनीच बेळगावला साहित्य सम्मेलनात प्रथम मांडला पण त्याआधीच नागपूरला राजाराम वाचनालयाच्या प्रांगणात एका भाषणाचं आयोजन करुन याबाबतचं भाऊ साहेबांनी सूतोवाच केलं होतं. गोपाळराव उर्फ आबासाहेब खेडकर, रामराव देशमुख, आणि पी. के. देशमुख यांच्यासारख्या काँग्रेस पक्षातील नेत्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या योजनेला अनुकूल करुन घेऊन संयुक्त महाराष्ट्राच्या नागपूर करारावर त्यांच्या संमतीदर्शक स्वाक्षऱ्याही मिळवल्या होत्या. नुसते ते मोठे साहित्यिक किंवा पत्रकारच नव्हते तर कोणत्याही राजकीय पक्षात नसले तरी मुत्सद्दी राजकारणीही होते. मध्यप्रांत किंवा वऱ्हाडात याबाबतचा विचार मांडण्याकरता त्यांनी कुठलेही राजकीय स्थान न निवडता राजाराम वाचनालयाच्या मंचाचीच निवड केली आणि इंग्रजी भाषेत वक्तृत्व करणाऱ्या माननीय पट्टाभि सीतारामैय्या यांनाच भाषण देण्याची विनंती केली! नागपूरला राज्यपाल असतानाही डॉ. पट्टाभि सीतारामैय्या आले आणि आपल्या मुद्देसुद भाषणात समोरच्या सुशिक्षित आणि विचारवंत नागरिकांपुढे केलेल्या अस्खलीत वाणीने इंग्रजीतून केलेल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्रात राहिल्याने विदर्भाचा कसा विकास होईल याचं त्यांनी विवेचन केलं. या भाषणाचा सुंदर व सुबोध मराठीत, भाऊसाहेब माडखोलकरांनी तिथल्या तिथेच अनुवाद करुन वाहवा मिळवली ही माहिती मुकुंदराव नगने वडेकरांकडून मिळाली.

सीताबर्डीवरील राजाराम सीताराम दीक्षित यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या व राजाराम वाचनालय या नावाने ख्याती पावलेल्या प्रसिद्ध वाचनालयाचे विद्यमान कार्यवाह श्री. मुकुंदराव भि. नानिवडेकर यांचा या वाचनालयाशी गेल्या चाळीस वर्षांपासूनचा संबंध. आधी वाचक म्हणून मग सदस्य आणि पदाधिकारी म्हणून आणि काही वर्षे अनेक निवडणुकात सरकार्यवाह म्हणून निवडून येऊन तनमनधनानं या वाचनालयाच्या प्रगतीकरता अथक प्रयत्न करण्याचा त्यांचा लौकिक आहे. मुकुंदरावांनी विवाह केला नाही. पण दुपारी प्रामाणिकपणे रिझर्व बँकेच्या नागपूर शाखेत नोकरी करतानाच सकाळी व संध्याकाळी काम केलं राजाराम वाचनालयाचंच! भाऊसाहेब माडखोलकरांचा या वाचनालयाशी फार निकटचा संबंध होता, त्यांच्या बऱ्याच आठवणी मुकुंदराव नानिवडेकरांच्या मनात आजही ताज्या आहेत. वरच्या घटनेबाबतची सत्यता त्यांनीच अनुभवली आहे.

मुकुंदराव नानिवडेकरांच्या मते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत आचार्य प्र. के. अत्रे यांचा सिंहाचा वाटा असला तरी संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा भाऊसाहेब माडखोलकरांनी पाठ पुरावा केला नसता तर महाराष्ट्र राज्याची पूर्वेकडची सीमा जळगाव जिल्ह्याचीच ठरली असती.

"भाऊसाहेब माडखोलकर राजाराम वाचनालयात त्यांना हव्या त्या संदर्भ ग्रंथांकरता पुष्कळदा येत. त्या वेळी असलेले कर्तव्यदक्ष ग्रंथपाल श्री. भिसे, भाऊसाहेबांनी सांगितलेली पुस्तकं पटापट काढून देत. श्री. भिसे यांची आर्थिक स्थिती चणचणीची होती. थोडा वेळतरी भाऊसाहेब, श्री भिसे यांच्याशी बोलून जात. त्यांच्या

अनुक्रमणिका

आर्थिक परिस्थितीची माडखोलकरांना जाण होती. शक्य ती आर्थिक मदत तर त्यांना भाऊसाहेबांनी केलीच पण या कर्तव्यदक्ष, गरीब पण प्रामाणिक ग्रंथपालाचा आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत उल्लेख करुन गौरवही केला.

"भाऊसाहेब माडखोलकरांनी राजाराम वाचनालयाच्या कार्याची माहिती श्री. जयवंत दळवी आदी मुंबईतल्या साहित्यिकांना दिली. श्री. जयवंत दळवी, श्री. कर्णिक आदी साहित्यिकांना या वाचनालयाला भेट देण्याची विनंतीही त्यांनी केली. व त्यांच्या मध्यस्थीने युसिसला सांगून एनसायक्लोपीडियाचे पंचवीस भाग या वाचनालयाला देणगी म्हणून मिळवून दिले. तसेच अनेक उत्कृष्ट इंग्रजी ग्रंथाचा, या वाचनालयाला साखळी पद्धतीने पुरवठा भाऊसाहेबांच्या विनंतीनुसारच झाला."

श्री. मुकुंदराव नानिवडेकर सांगत होते "ललित" मासिकाच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी त्याच्याच एक समारंभासाठी श्री. केशवराव कोठावळे यांनी नागपूरला राजाराम वाचनालयाचीच निवड केली. सभा संमेलनाना उपस्थित न राहण्याची, कुठेही भाषण न करण्याची श्री. जयवंत दळवीबाबत कल्पना अनेकांनी आम्हाला दिली असतानाही श्री. जयवंत दळवी कार्यक्रमाला उपस्थित राहिले. त्यांनी मुलाखतीला संमती देऊन विचारलेल्या प्रश्नांची मंचावरुन उतरे देऊन लोकांना खुश केले आणि कार्यक्रमानंतर आपल्याशी बोलतांना म्हणाले "भाऊसाहेब माडखोलकरांचं आमच्यावर मोठं ऋण आहे. या वाचनालयाला केव्हातरी भेट देण्याचं आम्ही त्यांना वचन दिलं होतं. आज या वाचनालयातच कार्यक्रम देऊन ते ऋण अंशतः फेडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे."

"ग्रंथालयांनी ग्रंथ प्रसिद्धी करावेत व त्यांच्या विक्रीतून पैसा मिळवावा असं भाऊसाहेब माडखोलकरांचं मत होतं. राजाराम वाचनालयाच्या एका वार्षिक सम्मेलनात "साहित्यातील जीवनदर्शन" "साहित्यातील नवे प्रवाह" आणि "साहित्य समीक्षेची नवी दिशा" याविषयांवरची तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची व्याख्यानमाला भाऊसाहेब माडखोलकरांमुळेच आम्हाला मिळाली. त्या व्याख्यानमालेचा अध्यक्षीय समारोप करताना या तीनही व्याख्यानांचा एक प्रबंध तयार करुन तो राजाराम वाचनालयाला द्यावा आणि या वाचनालयातर्फे, पहिलं प्रकाशन म्हणून पुस्तक रुपानं प्रसिद्ध करायला अनुमती द्यावी अशी भाऊसाहेब माडखोलकर यांनी तर्कतीर्थांना विनंती केली आणि फूल ना फुलाची पाकळी म्हणून राजाराम वाचनालय शक्यतो स्नेहधन देईल हे आश्वासन दिलं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी ती विनंती तत्काळ मान्य करुन भाऊसाहेबांच्या शब्दाला केवढी किंमत होती याचा प्रत्यय आम्हाला आणून दिला.

नागपुरातील योगाचार्य जनार्दन स्वामींशी भाऊसाहेबांची योगविद्येवर चर्चा अनेकदा होत असे. स्वामीजींना भाऊसाहेब गुडघे टेकुन नमस्कार करीत. भाऊसाहेब स्वतः प्राणायाम आसन करत असत. एका संध्याकाळी अंधार पडत असतांना शासकिय तंत्र निकेतनच्या वऱ्हांडयात काही माणसे आसनं करत होती तरं स्वामिजी फाटक्या सतरंज्या शिवत होते! भाऊसाहेब स्वामिजींना भेटायला गेले होते. तिथली परिस्थिती त्यांनी पाहिली. आठ दिवसात नवीन सतरंज्या काही साहित्य व विद्युत दीपही लागले. भाऊसाहेबांच्या प्रयत्नामुळे परदेशातली आमंत्रणे असतानाही योगाचार्य त्या विनंतीचा स्वतः च्या देशवासीयांच्या स्वाथ्याकरता त्याग करुन भारतातच राहीले ही आठवणही श्री मुकुंदराव नानिवडेकरां कडूनच कळली.

अशा प्रकारे भाऊसाहेब माडखोलकरांचे व्यक्तिमत्व होते आणि त्यांचे नागपूरशी स्नेहबंध होते.

⁂⁂⁂

## | संपादक असतो कसा ?|

------------------------------------------------------------------------------दि. भा. घुमरे

संपादक हे बिरुद धारण करणारी व्यक्ती नेमकी काय असते. कोणकोणती कामे ती करते, आपल्या सहकाऱ्याकडून तिच्या काय अपेक्षा असतात वगैरे ज्ञान अजिबात नसणारा मी, उमेदवारींच्या काळात भाऊसाहेबांच्या हालचालीचे या सर्व जिज्ञासेपोटी निरीक्षण करीत असे. भाऊसाहेब दुपारी तीन-साडेतीनच्या सुमारास कार्यालयात येत. डाव्या हाती, छातीशी धरलेली दोन-तीन पुडकी असायची. न्यूज रुममधून ते आपल्या चेंबरमध्ये प्रवेश करताना उपस्थितांवर एक धावती नजर टाकायचे. कधीमधी आत जाता जाता शेरे, ताशेरे. समज. सूचना असे प्रसंगपरत्वे चालायचे. तेवढयाने त्या दिवसाचा त्यांचा मूड लक्षात येऊन न्यूजरुमची त्या दोन-तीन तासापुरती "स्ट्रॅटेजी" आपोआप सिद्ध होऊन जाई. होय दोन-तीन तासच! दुपारी साडेतीनच्या सुमारास सायकलरिक्षाने आलेले भाऊसाहेब सायंकाळी ६-६ ॥ पर्यंत थांबायचे. परतताना ते पायी जात आणि त्यावेळी त्यांना घरापर्यंत कुणी तरी सोबतीला लागत असे पण तो कुणीही नसे. हे माझ्या पुढे लवकरच ध्यानात आले. सोबतीचा माणूस रोज वेगळा असे. कधी-कधी तर एखादा कम्पोझिटर किंवा चपराशीही त्यांना घरापर्यंत सोबत करी.

अशीच पाळी एक दिवस माझ्यावर आली. माझे धाबे दणाणले. पण चार-सहा पावले त्यांच्यासोबत चालताच त्यांनी एकदम कामाचे बोलणे सुरु केले आणि माझी भीड चेपली. काम होते स्वातंत्र्यसमरशताब्दी विशेषांकाचे १० मे १९५७ ला तो अंक प्रसिद्ध व्हावयाचा होता. त्याची योजना त्यांनी केली होती आणि या अंकात, तोपर्यंत मराठीत अप्रसिद्ध असा एक मजकूर. त्या अंकाचे आकर्षण म्हणून ते प्रसिद्ध करणार होते. त्याविषयी ते रस्ताभर बोलले आणि घरी पोहोचताच एक जूनी झालेली पुस्तिका त्यांनी माझ्या हाती दिली. चहा आला. चहा पिता पिता ते म्हणाले, "आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यावर चाललेल्या खटल्याचा वृत्तांत आणि त्याची डायरी. अशी ही पुस्तिका आहे. या इंग्रजी पुस्तिकेचे पूर्ण भाषांतर करुन ते मला पुस्तिकेसह इथे घरी आणून द्यायचे. याची कुणाजवळही वाच्यता करायची नाही. मजकुरावर तुमचे नाव राहील. मजकुराची जबाबदारीही तुमचीच, पुस्तिका कुठून मिळाली. ती कुठे आहे. असे कुणी विचारले. अगदी पोलिसांनी सुद्धा तर ती तुमची जबाबदारी. आणखी एक. हे सर्व काम तुम्ही घरी करायचे. वासुदेव बळवंत फडके कोण, हे जर माहीत नसेल तर क्रांतिकारकांच्या इतिहासातून आधी वाचून काढा आणि मगच कामाला लागा. आता उठा तुम्ही आणि सरळ घरी जा." भाऊसाहेबांनी एक मोठे काम सोपविले याचा आनंद तर झालाच. पण त्या पुस्तिकेच्या त्यांनी निर्माण केलेल्या रहस्यामुळे मनात धडकीही भरली. घरी येईपर्यंत मनात एक विचार तयार झाला. पुढे-मागे कुणी विचारलेच तर, रद्दी-भंगार बाजारातून विकत घेतले म्हणून सांगायचे. दुसऱ्या दिवशी भाऊसाहेबांना भीतभीतच माझ्या मनातला हा विचार सांगितला तसं ते ताडकन म्हणाले, "इतक सोपं नाही ते तुम्ही आधी कामाला लागा." मी कामाला लागलो.

याचबरोबर त्यांनी आणखी एक काम सांगितले आणि ते म्हणजे प्रसिद्ध क्रांतिकारक, गदर पार्टीचे नेते आणि कृषितज्ज्ञ डॉ. श्री पांडुरंग सदाशिव खानखोजे यांची मी प्रदीर्घ मुलाखत घ्यायची. डॉ. खानखोजे परदेशातून नुकतेच परतले होते. नागपूर विद्यापीठाने लॉ-कॉलेज मागील एका कौलारु जुन्या घरात त्यांची सोय केली होती. आठवडाभर रोज सकाळी त्यांच्याकडे जाऊन माहिति घेई. त्या आधाराने त्यांची मुलाखत

तयार करुन डॉ खानखोजे यांना दाखविली. मुलाखत म्हणून नव्हेतर तो माझा लेख म्हणून माझ्या नावाने छापावा अशी त्यांची इच्छा असल्याने तसेच केले.

दरम्यान भाऊसाहेब मार्च एप्रिल व मे या काळात अमेरिकेच्या प्रवासाला गेले. त्यामुळे वासुदेव बळवंत फडके यांचा मजकूर पुढे स्वातंत्र्यदिन अंकासाठी द्यायचे ठरले. आणि १५-८-१९५७ च्या पुरवणीत जवळजवळ ३७ कॉलम भरेल एवढा भक्कम मजकूर प्रसिद्ध झाला. पुस्तिका त्यांची त्याना परत केली.

**चिंतन, संकल्पन, निवड**

या निमित्ताने, कुठलाही अंक काढावयाचा तर त्याची योजना कसलाही गाजावाजा न करता ते किती आधीपासून करीत. याचा अनुभव आला. कार्यालयात केवळ अडीच-तीन तासच असत. पण घरी आणि सभा बैठकीत त्याचे दैनंदिन अंक, विशेषांक आणि पुरवण्या यासंबंधी सतत चिंतन आणि संपर्क सुरु असे. संपादक मंडळातील सर्व सहकार्याची बैठक घेणे, चर्चा करणे, विषय निवडणे, लेखक ठरविणे वगैरे सोपस्कार त्याच्या कार्यशैलीत नव्हते. त्यावर त्याचा विश्वासही नसावा. असेच एकंदरीने आढळून येई, विषय आणि आराखडा त्यांच्या चिंतनातून तयार होई. संपादक मंडळातील सहकाऱ्याविषयी त्यांचे काही आकलन असे. त्यानुसार ते कामे नेमून देत. समाजाचा 'फीडबॅक' बसल्या ठिकाणी प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या विश्वासातली माणसे सतत बदलत असत. काहींचे भाव बरेच दिवस टिकून असले की, ते फुशारायचे. पण फुशारण्याचे त्यांचे ते समाधान त्यांना फार काळ लाभत नसे. अशा प्रसंगी फाजील शेफारणाऱ्यास कार्यकारी संपादक श्री. तात्यासाहेब करकरे इशारा द्यायचे, "सांभाळा भाऊसाहेब म्हणजे पारा आहे. मुठीतून केव्हा घरंगळून गेला ते कळायचे सुद्धा नाही." वृत्त संपादक श्री गोविंदराव गोखले तर भाऊसाहेबांना उपयुक्ततावादी च म्हणायचे 'तरुण भारत' चे एक संस्थापक ट्रस्टी आणि सहायक संपादक श्री ए. श्री. पटवर्धन मात्र असे काही बोलताना कधी आढळले नाहीत. त्यांचे आणि भाऊसाहेबांचे खूप काहीतरी सारखे सुरु असायचे पण ते कार्यालयात नव्हे, तर भाऊसाहेबांच्या घरी किंवा अन्यत्र ते दोघे मिळून कुठे कुठे जात त्यावेळी. आणि याचाही इतरांना फारसा पता लागत नसे. एखाद्या प्रसंगाच्या किंवा व्यक्तीच्या संदर्भात लिहिताना भाऊसाहेब जेव्हा त्यांची साक्ष आपल्या लिखाणात नोंदवीत, तेव्हाच काय ते कळे! तो प्रसंगही महत्त्वाचा असे आणि ती व्यक्तीही महत्त्वाची असे. अशा वेळी निष्कर्ष हाती येत असे तो हाच की; हे दोघे मिळून 'तरुण-भारता' चे धोरण आणि दिशा ठरवीत. कार्यकारी संपादक श्री. तात्यासाहेब करकरे यांचा सल्ला घेतला जाई किंवा त्यांना अवगत केले जाई, तेवढेच! पण दिसायला कसे दिसे की श्री. पटवर्धन हे म्हणजे संपादक मंडळातील एक न -अस्तित्व- नॉन एन्टीटी! प्रत्यक्षात मात्र वस्तुस्थिती वेगळीच होती.

स्वातंत्र्य समर शताब्दी अंक १० मे १९५७ ला प्रसिद्ध झाला, तेव्हा भाऊसाहेब अमेरिकेत होते. परतल्यावर स्वातंत्र्यदिनाची (१ ५-८-१९५७) पुरवणी ही 'स्वातंत्र्यदिन आणि स्वातंत्र्य समर शताब्दी,' अशी जोड पुरवणी काढून १० मे ५७ च्या अंकाचा त्यांच्या मनात राहून गेलेला अग्रलेख चांगला सहा-सात कॉलमचा त्यानी प्रसिद्ध केला.

अनुक्रमणिका

**काँग्रेस अधिवेशनांक**

त्या काळात भाऊसाहेबांना पत्रकारापेक्षा लेखक कादंबरीकार आणि साहित्यिक म्हणूनच जास्त ओळखले जाई आणि म्हणूनच की काय. प्रसंग येताच ते आपल्या पत्रकारितेचे असे वैभव प्रकट करीत की 'श्रेष्ठ पत्रकार' म्हणून नावाजलेले डावे ठरत. याचा अनुभव त्यांच्या विविध राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक प्रश्नांवरील अग्रलेखातून तर यावयाचाच परंतु प्रसंगानुरुप जे विशेषांक निघत त्यातून अधिक यावयाचा. १९५९ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन नागपुरात भरले. त्यानिमित्ताने 'तरुण-भारत' चा जो 'काँग्रेस अधिवेशन विशेषांक १९५९' निघाला याची सर्वदूर खूप प्रशंसा झाली. राष्ट्रीय आणि प्रांतिक अशा दोन्ही क्षेत्रातील राजकारण आणि स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्वाच्या टप्प्यांवर घडलेला इतिहास याचे त्या अंकाने जे दर्शन घडविले होते. त्यामुळे तो अंक केवळ वाचनीयच नव्हे, तर संदर्भासाठी संग्राहय अंक ठरला. त्या अंकात त्यांचा अग्रलेख पूर्ण अंकाची साडेतीन पृष्ठे म्हणजे अठ्ठावीस कॉलम इतका समग्र आणि विस्तृत होता. अत्यंत अभ्यासपूर्ण असा हा मजकूर ते स्वतः च्या नावाने देऊ शकले असते. परंतु ते त्यानी केले नाही. अग्रलेख हा आपल्या अंकाचा प्राण आणि प्रतिष्ठा होय, असे ते मानीत.

या अंकासाठी त्यांनी श्री एकनाथपंत पटवर्धन यांचे प्रमुख साहाय्य घेतले. एकनाथपंत काँग्रेसचे ज्येष्ठ पुढारी, स्वातंत्र्यसंग्राम सैनिक आणि पदाधिकारी राहिलेले फार मोठे जाणकार होते. त्यांचे स्वतः चे दप्तर आणि रुमालही होते. त्यातून एकेक रत्नजेव्हा बाहेर निघे, भाऊसाहेबांच्या हाती पडे तेव्हा त्याचे परिष्करण आणि संस्करण होऊन स्वातंत्र्यसंगराचे एकेक इतिहासपृष्ठ त्यांच्या सर्व कलासह झळाळून उठे! या अंकाने स्व. भाऊसाहेबांच्या ठिकाणी असलेल्या संपादकीय दृष्टीच्या आणि कर्तृत्व -कौशल्याच्या विविध अंगाचा परिचय घडविला. ९ जानेवारी १९५९ चा हा काँग्रेस अधिवेशनांक काँग्रेसच्या स्थापनेपासून तो १९५९ पर्यंत घडलेल्या महत्वाच्या घडामोडीचा संपृक्त असा बोधक इतिहास आहे. दैनिक वृत्तपत्राच्या आकारातील संपूर्ण अशा ३६ पृष्ठाच्या या विशेषांकातील मजकुराचे जुळवणी कार्य. कसलाही गाजावाजा आणि कुठलेही प्रदर्शन न करता दैनिकाच्या आणि रविवार आवृत्तीच्या घबडग्यातच पुढे सरकत होते. तेव्हा विशेष असे परिश्रम-पर्व आणि कामाठी सुरु आहे. असे कधी कुणाला वाटलेही नाही. लेखकांना पत्रे पूर्वीच रवाना झाली होती. काहीना तर नुसती फोनवरुनच विनंती करण्यात आली होती आणि पटवर्धनही कसली वाच्यता न करता एकेका मजकुराची दरदिवशी भर घालीत होते.

या अंकातील मजकुरावरुन सहज नजर फिरविली तरी संदर्भ म्हणून आजही तो किती मोलाचा आहे, हे लक्षात येईल.

१९०८ मधील राष्ट्रीय संघर्षावर विख्यात संशोधक पं प्रयागदत्त शुक्ल यांचा हिंदीतून लिहिलेला विस्तृत लेख. १९०७ साली अ. भा. काँग्रेसचे नागपूरला भरणार असलेले अधिवेशन नेमस्तानी, जहालांच्या भयाने सुरतेस नेले ती कथा आणि नंतर नेमस्तांची सुरतेस झालेली बेसुरत याचा अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या 'देशसेवक' पत्रातील वृत्तांत. १८९१ साली नागपूरला भरलेल्या काँग्रेसवर प्रकाशझोत. १८९७ साली अमरावतीस भरलेले तेरावे अधिवेशन. १९२० साली नागपूरला भरलेले अधिवेशन या व अन्य मौलिक संदर्भ साहित्याबरोबरच डॉ. ना. भा. खरे, ब्रिजलाल बियाणी, रा. कृ. पाटील, गावंडे, डॉ. श्री. भा. वर्णेकर, डॉ.

सुरेश डोळके, म. गं. दातार, सौ. अनसूयाबाई काळे प्रभृती जाणकारांचे लेख, असा अंकाचा सारा साज भाऊसाहेबांनी सजविला.

**उद्दिष्टप्रधान विशेषांक**

दीपावली विशेषांक हे स्वतंत्र वेगळे प्रकरण असे. त्यात एखाददुसरे वैशिष्टय वगळता ठराविक साचा असे आणि पाहुण्या लेखकांच्या सहभागाने त्याचे स्वरुपही दरवर्षी वेगळे ठरे. दैनिकांच्या संपादकाने लोकहित समाजहित व राष्ट्रहित लक्षात घेऊन प्रसंगविशेषी काढावयाच्या विशेषाकांची प्रकृती, धर्म आणि पोत हे सारे निराळे आणि प्रासंगिक उद्दिष्टप्रधान असावयाचे. अशा याविशेषांकातच संपादकाची प्रतिभा, त्याची दृष्टी, त्याचे आकलन आणि त्याची अभिरुची यांची कसोटी लागत असते. Everything and anything under the sky. आकाशाखाली जे जे म्हणून दृश्यमान आणि विद्यमान आहे, ते ते सारे दैनिक वृत्तपत्राच्या कक्षेत येते, असे म्हणतात त्यामुळेच दैनिकांच्या विशेषांकात विविध विषयाचा आवाका, आकलन आणि विशदीकरण हे आवश्यक असून तेच त्यांचे मर्मही असते. हे मर्म जाणलेल्या भाऊसाहेबांनी 'महाराष्ट्र राज्य' स्थापनेच्या वेळी दि. २७ एप्रिल १९६० ला 'तरुण भारत' पुणे यांच्या सहकार्याने एक संयुक्त अंक काढला. यापूर्वीचे विशेषांक त्यांच्या एकट्याच्या संकल्पनेनुसार निघालेले होते. तर हा अंक आणि यापूर्वीचे काही दिवाळी अंक 'तरुण-भारत' पुणे यांच्याबरोबर संयुक्तपणे त्यांनी काढले. 'महाराष्ट्र राज्या' पासून असलेल्या जनतेच्या अपेक्षा व्यक्त करणारे अर्थकारण, कृषी सहकार, उद्योग, शिक्षण, समाजकारण अशा विविध विषयांवर अधिकारी व्यक्तीचे लेख आणि त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र परिषद आणि नंतरची संयुक्त महाराष्ट्र समिती यांच्या कार्याची संदर्भमूल्य असलेली नोंद या अंकात केलेली आहे.

लो. टिळक जन्मशताब्दी, टागोर जन्मशताब्दी. म. गांधी जन्मशताब्दी, श्रीपाद कोल्हटकर जन्मशताब्दी अशा महनीयांच्या जन्मशताब्दी वर्षात कधी विशेषांक, तर कधी रविवार आवृत्तीत प्राधान्यक्रम ठेवून मौलिक आणि एकमेव (Exclusive) अशा मजकुराचा उपाहार ते वाचकांपुढे ठेवीत.

समाजात खदखदत असलेल्या विषयांचे आणि समस्यांचे वेध घेऊन वार्ता, मुलाखती, लेख, अग्रलेख आणि वाचकांची पत्रे असे पंचकर्म तर त्यांचे अन्य इतर संपादकांप्रमाणे नित्य सुरुच असे. पण 'जो न देखे रवी वह देखे कवी' या म्हणीचा, ते मधूनच कुठल्या तरी अ-चर्चित विषयाला किंवा जो अजून पुरता शिजलाही नाही, जो कधी काळी समाजात खदखदून वर येईल, असे कुठे संकेतही नसतात, असे विषय ते सर्वांच्या आधी समाजापुढे आणून, प्रत्यय देत. बेळगावच्या साहित्य संमेलनातील आपल्या भाषणातून संयुक्त महाराष्ट्राचा जो विषय सर्वप्रथम त्यांनी समोर आणला तो तर त्यांच्या या प्रतिभेचाउत्तुंग अविष्कार होय. तो अशेष मराठी माणसांचा विषय होता. परंतु नागपुरातील विणकरांच्या समस्या, उद्योगविस्तार, नागपुर सुधार प्रन्यास अशा विषयांना हात घालून पुरवण्या काढणे, त्या विषयाचा मग पाठपुरावा करणे हे त्यांचे संपादकीय कार्यकर्तृत्व अजोड होते. यात पुष्कळशा बाबतीत त्यांचा सहभाग विषय सुचविण्यापुरताच असावयाचा. त्या विषयाचे उद्घाटन आणि त्याचा पाठपुरावा हे निरनिराळया सहकाऱ्यांचे कर्तृत्व असे.

अनुक्रमणिका

२ जानेवारी १९६९ रोजी 'तरुण भारता' ने आपल्या रौप्य महोत्सवानिमित्त जो विशेषांक काढला होता. त्यात वाचकांनी, पुढाऱ्यांनी आणि संस्थाचालकांनी आपल्या पत्रातून आणि लेखातून विविध समस्यांच्या निराकरणात, तसेच निरनिराळया लोकहितकारी संस्था चळवळी यांच्या उभारणीत आणि संचालनात तरुण भारताने जो अभिक्रम दाखविला, त्याची पावती दिली आहे.

**समकालीनांचे अगत्य**

बातम्या, सभावृत्त, व्याख्यानमाला वृत्त वगैरे कामात त्याचे दैनंदिन कार्यात कसलेही निर्देश - नियंत्रण नसावयाचे ते सारे काम कार्यकारी संपादक श्री. करकरे, वृत्तसंपादक श्री. गोविंदराव गोखले बघावयाचे. पण काही प्रसंगी ते स्वतः लक्ष घालावयाचे, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातून त्यांचे समकालीन साहित्यिक आणि पुढारी मंडळी आली की, त्यांची आपल्या वृत्तपत्रात पुरेपूर दखल घेतली जावी, यावर त्यांचा कटाक्ष असे. श्री वि. स. खांडेकर, प्रो. ना. सी. फडके, मामा वरेरकर. म. म. दत्ता वामन पोतदार प्रभृती मंडळीचे कार्यक्रम. त्यांची भाषणे हा सारा मग त्या दिवशी फर्स्ट लीडचा-पहिल्याठळक वृत्ताचा विषय ठरे. भाऊसाहेब खांडेकरांची वि. सा. संघात झालेली भाषणे आठ-दहा कॉलम मजकूर भरेल इतकी विस्तृतपणे रोज प्रसिद्ध होत. ते रिपोर्टिंग श्री. महेश जोशी यांनी केले होते आणि भाऊसाहेबांनी ते त्यांच्या नावाने प्रसिद्ध केले होते. मग अशावेळी त्या दिवशीचे महत्वाचे सारे वृत्त मागे पडे. म. म. पोतदार आले की सकाळपासून रात्रीपर्यंत त्यांचे सारे कार्यक्रम सविस्तर दिले जात. पाहुण्याला पहिल्या दिवशी भलेमोठे पागोटे घातले की आपण मोकळे, असे ते म्हणत.

हे जसे बडया लोकांच्या बाबतीत तसेच ते छोटया लोकांच्या बाबतीत अगदी दुसरे टोक म्हणून घडे. एखादा सर्वसामान्य वाचक धिटाई करुन स्वतः च्या घरच्या लग्नकार्याचे निमंत्रण त्यांना देई. भाऊसाहेब 'शुभ-विवाह' म्हणून ते निमंत्रण प्रसिद्धीस देत. यामुळे शुभविवाहाचा एक स्तंभ कित्येक वर्षे लगनसराईत सुरु राहायचा. तो वाढत वाढत शेवटचे सारे पान आक्रमून टाकू लागला आणि त्यात जेव्हा मग उपसंपादकाच्या डुलक्या-उसंडू-वाढू लागल्या तेव्हा सुरुवातीस पाच रुपये नाममात्र शुल्क आणि पुढे मग जाहिरातीचा दर आकारण्यात येऊ लागल्यावर हे 'शुभविवाह' प्रकरण आटोक्यात आले. ज्येष्ट मंडळी जे सभा बैठकीचे वृत्त द्यायची ते ऐसपैस आधुनिक पत्रकारितेच्या विकसित झालेल्या तंत्राचा कुठेही स्पर्श न झालेले बखरकारी लेखन असावयाचे. नविन पिढीतील मंडळी इतरांचे पाहून स्वतः शिकली. निधनवृत्ताच्या बाबतीतही तसेच. फोनवरुन कुणी सांगितले तरी ते छापायचे. पुढे मग न मेलेले बातमीत मरु लागले. तेव्हा तेथे ही शिस्त आणली गेली.

**काही बोलकी उदाहरणे**

हे झाले सर्वसाधारण बातम्यांच्या संदर्भात. पण अशी अनास्था प्रयत्नपूर्वक मिळविलेल्या खास अशा राजकीय वृत्तांच्या बाबतीत नसावयाची. ते वृत्त स्वतः भाऊसाहेब तपासायचे. त्याचे संपादन करावयाचे, मथळे द्यायचे, इतकेच नव्हे, तर त्याचे प्रूफही ते स्वतः बघायचे. एखादी फारच महत्वाची बातमी निसटली तर मात्र अकांडतांडव करीत. रशियाने स्पुटनिक सोडून अवकाश संशोधनात आघाडी मारली ती बातमी 'तरुण भारता' तून सुटली. केवढा प्रमाद! पेपरची केवढी नामुष्की! भाऊसाहेब भयंकर संतापले. कार्यालयात येऊन त्यांनी

स्वतः त्या युगप्रवर्तन करणाऱ्या घटनेच्या आलेल्या सर्व वार्ता स्वतः तयार केल्या. अग्रलेख लिहिला. तेव्हा त्यांचा राग शांत झाला. जितके रागवायचे होते तितके आधी रागावून झाले होते. नंतर कुणाला मेमो नाही. जाबजबाब नाही की, काही वाच्यता नाही.

बातम्याच्या क्षेत्रात फारसे लक्ष न देणाऱ्या भाऊसाहेबांनी काँग्रेस अधिवेशनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात झालेल्या गोंधळाची मी लिहिलेली बातमी तिच्या राइटपसह बदलून प्रसिद्ध केली. आणि दुसऱ्या दिवशी 'धन्य नेहरुअधन्य समिती' या शीर्षकाचा अग्रलेख लिहून समिती, पोलिस, अधिकारी या सर्वांना धारेवर धरले. यामुळे मग काही दिवस 'तरुण भारत' च्या सरकारी जाहिरातीवर परिणाम झाला. पण त्याची त्यांनी मुळीसुद्धा पर्वा केंली नाही.

ही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत.

'बातम्याच्या संबंधात ते उदार होते. त्या बाबतीत ते एकदा डॉ. श्री. भा. वर्णेकरांजवळ असे म्हणाले होते की, "बातम्यांना प्रसिद्धी देण्याबाबत वृत्तपत्रांचे धोरण राजाश्रयासारखे उदार असावे, असे लो. टिळक म्हणत असत. मी तेच धोरण श्रेयस्कर समजतो."

सामान्यतः संपादक म्हटला की, त्याचे बातम्यांच्या संबंधात काहीएक निर्देश आणि नियंत्रण हे अटळच असते. भाऊसाहेब त्याला अपवाद होते, ते त्यांच्या वर उल्लेखित धोरणामुळे! त्यामुळे मग 'तरुण भारत' कडे काहीही पाठवा, ते छापून येते. अशी मधल्या काळात कुत्साही केली जाई.

अग्रलेखः कसब आणि विविधता

अग्रलेख हा 'तरुण भारत' च्या प्राण आणि प्रतिष्ठेचा अलंकार पण त्यांनी इतरांचे अग्रलेख तपासल्याचे किंवा अग्रलेखासाठी विषय निर्दिष्ट केल्याचे एखाददुसरा अपवाद वगळता कधी घडले नाही. आणि असे असूनही अग्रलेखांचा दर्जा, त्यातून आढळून येणारा त. भा. च्या धोरणाचा अंतः प्रवाह, यात कधी अंतराय पडत नसे.

भाऊसाहेबाचे अग्रलेख हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे. त्यातले संपादक म्हणून त्याचे जे कसब असे, ते अद्वितीय होते. त्याच्या संपादकीय जीवनातील दोन प्रसंग दोन स्थित्यतरे आणि दोन विचारपक्ष हे याचे कारण असावे. आपले लेखनस्वातंत्र्य जपून आणि जोपासून त्यांनी यशस्वीपणे निर्वाह केला, तो त्यांच्या ठायी असलेल्या या परिश्रमार्जित कसबामुळेच होय. पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रीय संस्कारभूमीतून नागपुरात श्री. ओगले यांच्या 'महाराष्ट्रात' येताना त्यांची अडचण झाली असावी. हे उघडच आहे. पण 'महाराष्ट्र' टिळकपक्षीय, प्रतिसहकारवादी म्हणून तो स्वराज्य पक्षास (काँग्रेस) प्रसिद्धी देईना म्हणून मग जो तरुण भारत निघाला त्याच्याच पुनरुज्जीवित दैनिक आवृत्तीचे भाऊसाहेब संपादक झाले. ते पहिले स्थित्यंतर आणि पुढे म. गांधी यांच्या हत्येनंतरच्या जळितात नष्ट झालेल्या 'तरुण भारता' च्या श्री. नरकेसरी प्रकाशन मर्यादित, या लिमिटेड कंपनीत झालेल्या दुसऱ्या पुनरुज्जीवनानंतर आणखी वेगळया अशा विचारगटाशी त्याना जुळवून घ्यावे लागले.

हे दुसरे स्थित्यंतर. पण या दोन्ही स्थित्यंतराच्या प्रारंभिक काळात त्यांची जी काय कोंडी झाली असेल तेवढीच, पुढच्या काळात त्यांच्या ठिकाणी असलेल्या या कसबाने त्यांची कुठे अडचण झाल्याचे, त्यांच्या प्रदीर्घ अशा संपादकीय जीवनात आढळून येत नाही. हे जसे खरे तसेच काँग्रेसपक्षीयांबरोबर असतानाच्या काळात काय किंवा नंतर लिमिटेड कंपनीच्या काळात काय त्यांच्यावर त्या त्या मंडळींनी अंकुश धरल्याचे कधी त्यांच्या बोलण्या-लिहिण्यातून आढळले नाही.

विविध प्रकारच्या लेखनविषयांची निरंतर संपन्नता यामुळे त्यांच्या अग्रलेखातील नित्यनूतनता, ताजेपणा आणि नवबोध कायम असे. एखादा विषय किंवा प्रसंग अडचणीचा असला तरी तो विषय ते टाळीत नसत. तर केवळ मोहरा आणि भर (Emphasis) बदलून तो विषय ते असा सजवीत आणि फुलवित नेत की त्यांनी, त्या विषयाच्या लोकांनी गृहीत धरलेल्या भराऐवजी हा जो वेगळया अंगावरील भर पुढे आणलेला असेल त्या त्यांच्या वेगळेपणालाच वाचक मुक्त दाद देत. याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे, प्रतापगडावर पं. नेहरुच्या हस्ते शिवछत्रपतींच्या पुतळयाच्या अनावरणप्रसंगी संयुक्त महाराष्ट्र समितीचा विरोध आणि उत्पन्न झालेल्या लोकक्षोभाचा प्रसंग. त्यानिमित्त लिहिलेल्या अग्रलेखात त्यांनी प्रगल्भता आणि उपहासयांचे मिश्रण करुन, “या परती महाराष्ट्राला अभिमानास्पद आणि आनंददायक गोष्ट ती कोणती!” अशा सार्थ उद्‌गारांनी भाऊसाहेबानी या सुयोगाची महती लक्षात आणून दिली. हा अग्रलेख त्यांच्या लेखनगुणांचा आणि संपादकीय कसबांचा पुरेपूर, परिचय घडवितो, केवळ एम्फसिस बदलला की क्षोभाची तीव्रता कमी होते. आणि निराकरणासाठी मार्ग मोकळा होतो याचा सुंदर वस्तुपाठ हा अग्रलेख देतो. प्रत्यक्षात तसे घडलेही!

जगात भारतात महाराष्ट्रात, विदर्भात आणि खुद्द नागपुरात घडणाऱ्या घटना, प्रसंग, वक्तव्ये समस्या विविध शासकीय आणि सामाजिक विषय याकडे भाऊसाहेबांचे बारीक लक्ष असे. परंतु या सर्वांहून वेगळे लोकांचे मन एकदम आकर्षून घेईल. असे विषय निवडण्यात त्यांच्या हातखंडा असे. एक उदाहरण. साधारण ६०-७० च्या दशकात नागपुरात एका विदुषीच्या दरवर्षी दोन-तीन ठिकाणी व्याख्यानमाला चालत. प्रारंभी खूप गर्दी होई. हळूहळू ओहोटी लागली. हा विषय भाऊसाहेबांनी अग्रलेखासाठी घेतला आणि मग त्यात ‘व्याख्यान’ शब्दाच्या व्युत्पत्तीपासून तो पाश्चात्य जगातील व्याख्यानांचा दर्जा, त्यांची त्यामागील दृष्टी त्या व्याख्यानाचे ॲकॅडेमिक (ज्ञानदृष्टया) मूल्य आदी इतके नवीन आणि मौलिक मुद्दे त्यांनी मांडले आणि त्यातूनं असे सार काढले की, कीर्ती आणि पैसा, लोकेषणा आणि वित्तेषणा यांच्यामागे लागून दरवर्षी तीच ती रटाळ भाषणे या टोकापासून त्या टोकापर्यंत करीत फिरणारे अनेक धंदेवाईक आणि करिअरिस्ट ‘व्याख्याते’ हबकूनच गेले!

भाऊसाहेब स्वतः स अज्ञेयवादी म्हणवत. अशा अज्ञेयवादी भाऊसाहेबांनी सोमवारचे व्रत म्हणून धर्म आणि अध्यात्म यांना धरुन अग्रलेख लिहिणे सुरु केले. त्यात कल्पना आणि योजना यांचे नावीन्य होते. पण त्यातील विन्धान आणि विन्यास पंडित, परंपरावादी आणि भाविक यांना कधीकधी कासावीस आणि रूष्ट करीत. त्यामुळे वादरण माजले. भाऊसाहेबांनी हे बंद करावे, यासाठी दबाव-दडपणे सुरु झाली. शेवटी ते व्रत सुटले.

साधा विषय असायचा. पण ते त्याला असे वजन द्यावयाचे की, तो मोठा आणि गंभीर विषय होऊन जावयाचा. जेजुरीच्या खंडोबा देवस्थानात डाका पडला. सोने, रुपे, पैसा, पुराणवस्तू असा लाखोंचा ऐवज डाकूंनी नेला. भाऊसाहेबांनी या घटनेवरील अग्रलेखात, परदेशात मंदिरे, धर्मस्थाने यांच्या सरंक्षणाची कशी

व्यवस्था असते, लोक आणि सरकारे कशी जागरुक असतात, अशी ठिकठिकाणची उदाहरणे देऊन आपण सर्वच बाबतीत कसे भोंगळ आणि सज्ञाशून्य आहोत, असा परखड विषय माडला. महाराष्ट्रातील इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषातील वृत्तपत्रांनी या घटनेवर अग्रलेख, वाचकांची पत्रे वगैरे प्रसिद्ध केली. पण अशा एक-दोन घटना घडताच इटली. इंग्लंड आदी युरोपीय देशात सरकारांना कसे हादरे बसले आणि त्यातून कायम सुरक्षा व्यवस्था कशी निर्माण झाली, याची सविस्तर माहिती 'तरुण भारता' शिवाय अन्यत्र कुठे आढळली नाही. असे असावयाचे सामान्य विषयांवरील त्यांचे असामान्य अग्रलेख! त्यांचे मृत्युलेख हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे. त्यात त्यांची एक दृष्टी होती. त्यातं दुःख, शोक, चरित्रगान एवढेच केवळ नसावयाचे, तर त्यात त्या व्यक्तित्वाचे संपन्न असे दर्शन ते घडवीत.

**शेक्सपियरवरील अग्रलेख**

भाऊसाहेब थोर साहित्यिक होते. पण वाङ्मयीन विषयावर ते स्वतः ऊठसूट कधी लिहीत नसत. पण एक प्रसंग त्यांच्या मनाने खूपच घेतला. शेक्सपियरच्या चारशे व्या जयंतीचा, त्या निमित्ताने रविवार आवृत्तीत जाणकारांचे व अभ्यासकांचे लेख, छायाचित्रे, काही सुनीते वगैरे मजकूर प्राप्त करुन भागले असते. इतरांनी तेच केले. पण भाऊसाहेबांनी अग्रलेखाचाच ध्यास घेतला. एकदा सायंकाळी त्यांना घरापर्यंत साथ करायला त्यांच्यासोबत जाताना त्यांनी हा विषय काढला आणि अजून दोन महिने आहेत. या विषयावर तुम्ही लिहायचे, तयारीला लागा, असे म्हणाले. "काय थट्टा करता भाऊसाहेब, माझ्यासारख्या अडाण्याची!" असे मी म्हणताच ते वाटेतच क्षणभर थांबले आणि करडेपणाने म्हणाले, "तुम्हीच लिहिणार. पुस्तकाची मदत मी करीन." माझे तर धाबेच दणाणले. इंग्लिश लिटरेचर हा विषय नव्हातच कधी. पण डॉ. मोझेस आणि डॉ. अ. ना. देशपांडे या गुरुंनी गोडी लावली होती म्हणून थोडे-थोडे वाचन झाले होते. पण शेक्सपियरवर अग्रलेख? चार-आठ दिवसांनी कार्यकारी संपादक श्री. तात्यासाहेब करकरे याच्याजवळ गोष्ट काढली आणि "मला यातून वाचवा," अशी काकुळतीने विनंती केली. तात्या म्हणाले, " त्यांनी म्हटले आहे तर तुम्ही तयारी करा. कदाचित ती पाळी तुमच्यावर येणार नाही, पण त्यांना नकार देऊ नका." टांगणीला लागलेल्या माझ्या जीवाची काही पुरती सुटका होऊ शकली नाही. भाऊसाहेबांनी तो अग्रलेख स्वतः लिहिण्याचे ठरवले.

अनेक दिवसांनतर त्या रात्री मी सुखाने निश्चित झोपलो तरीही मी रात्री थोडा बडबडलो असे सौ. म्हणाली. काय बडबडलो, "तर आऊट आऊट आणि इज इट टेल," अस काही तरी म्हणे बडबडलो, शेक्सपियरच्या 'इडियट' ने सांगितलेली It is a tale tole by an idiot, full of sound and fury, but signifying nothing.. ही जीवनाची कहाणी निरर्थक असेल, पण त्याच्या धसक्याने माझ्यासारख्या इडियटची ही कथा-खरेच इट वॉज अ टेल सिग्निफाईंग मेनी थिंग्ज....

भाऊसाहेबाचा शेक्सपियरवरचा तो अग्रलेख पुरता बारा कॉलमाचा झाला. अग्रलेखाचे संपूर्ण पान आणि समोरचे अर्ध पान. त्या पानावरील पंचाग, राशिभविष्य, आकाशवाणी या दैनिक मजकुराने ध्रुवस्थान पटकाविलेल्या स्तंभाची 'तरुण भारता' च्या आयुष्यात पहिल्यांदाच उचलबांगडी झाली होती. कसा आणि किती गाजला असेल तो लेख आणि केवढी प्रतिष्ठा त्याने मिळवून दिली असेल, याचे काय वर्णन करावयाचे!

अनुक्रमणिका

**ग्रंथसमीक्षा**

अग्रलेखांइतकाच ग्रंथसमीक्षणावरही त्यांचा भर असावयाचा. आज आस्वादक आणि सृजनशील समीक्षा म्हणून जिचा उल्लेख होतो, त्या कोटीची ती समीक्षा असावयाची. नामवंताबरोबरच संपादक मंडळातील उपसंपादक आणि उमेदवारही ग्रंथसमीक्षा आणि ग्रंथपरिचय ही कामे करीत. या संबंधात श्री. वसंत शांताराम देसाई यांचा त. भा. च्या रौप्य महोत्संवी अंकातील त्यांच्या लेखात आलेला अभिप्राय पुरेसा बोलका आहे.

ते लिहितात. 'भाराभर पुस्तकावर भराभर (आणि चिमूटभर) अभिप्राय देण्याची पद्धत 'तरुण भारत' ने कधीच स्वीकारली नाही. कारण अशा अभिप्रायामुळे साहित्याच्या उत्कर्षाला कोणतीच मदत होणे शक्य नसते. एखादे नवे आणि महत्वाचे पुस्तक निवडून त्याच्या गुणदोषांचा समतोलपणाने परामर्श घ्यावा, नुसत्या तपशीलात न शिरता साहित्यगुणांच्या दृष्टीने जे महत्वाचे असेल त्यावर नेमके बोट ठेवावे, अशा प्रकारची साहित्यिकांना आणि समीक्षकांनाही मार्गदर्शक होतील अशी परीक्षणे रविवारच्या 'तरुण भारतात' सतत प्रसिद्ध होत आली आहेत. 'तरुण भारता' चे म्हणता येतील, असे काही कुशल साहित्य समीक्षक 'तरुण भारता' च्या स्तंभातून नावारुपाला आलेले आहेत."

**इंग्रजी ग्रंथावरुन विशेष लेख**

इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या आणि गाजत असलेल्या पुस्तकाचा परिचय कधी ते स्वतः तर - कधी एखाद्या सहकाऱ्यास प्रवृत्त करुन आपल्या मराठी वाचकांसाठी सादर करीत. आज 'तरुण भारतात' डॉ. शरद कोलारकरांचा जो स्तंभ लोकप्रिय झाला आहे, त्याचा उगम हा इतका जुना आहे. चीनची विस्तारवादी वृत्ती आणि त्याची युद्धतयारी या विषयावरील इंग्रजी पुस्तकांच्या अभ्यासातून त्यांचे भाचे डॉ. सुनील सुभेदार यांनी लिहिलेला एक अकरा-बारा कॉलमांचा विस्तृत लेख २७ डिसेंबर १९५९ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. चीनचे आक्रमण पुढे ऑक्टो. १९६२ मधले! 'हिंदी-चीनी भाई भाई,' आणि पंचशील हे व्यर्थ असून, चीन युद्धज्वर वाढवीत असून, तशी तयारीही करीत आहे हेच भाऊसाहेबांना यातून सांगायचे होते. संपादकांनी इंग्रजी ग्रंथवाचन करणे का आवश्यक आहे. हे ते असे लेख प्रसिद्ध करुन संपादक मंडळातील सहकाऱ्यांच्या लक्षात आणून द्यावयाचे. त्यातून काही मंडळी प्रेरणा घेई.

**लेखनाव्यतिरिक्त आणखी बरेच..**

त्यांच्या एकूण संपादकीय आणि अन्य लेखनाचा परामर्श घेणे येथे प्रस्तुत नाही, तर त्यातून त्यांच्या संपादकीय दृष्टीचे, कसबाचे आणि प्रबोधनाचे जे आगळे स्वतंत्र दर्शन घडते तेवढयापुरताच संदर्भ येथे घेतला आहे. परंतु केवळ लेखन-वाचनानेच संपादक तयार होतो हे त्यांन मान्य नव्हते. लोकसंपर्क, लोकसंस्था, काही एक स्वतंत्र कार्य त्या निमित्ताने लोकात मिसळून लोकांचे प्रश्न, गरजा आणि आकांक्षा समजून घेणे, मंत्री, अधिकारी आणि प्रत्येक क्षेत्रातील ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यक्ती यांच्याशी नित्य संपर्क आणि सर्वप्रकारचे वाचन, संगीत, नाटक आदि अभिजात कलांविषयीची आवड हे सारे यशस्वी संपादकासाठी आवश्यक असते, असे ते सांगत. त्यांनी स्वतः हे सर्व केले. खेरीज विविध लोकोपयोगी संस्था उभारण्यास साह्यकारी होणे, पुढाकार घेणे,

पाठपुरावा करणे व त्याद्वारे आपल्या अंकाचा प्रसार विविध क्षेत्रात होईल. अशी सारी मशागत प्रचारकीपणा न आणता करणे हे भाऊसाहेबांचे कर्तृत्व अजोड होते. १९४४ च्या २ जानेवारीस प्रारंभ झालेल्या पुनरुज्जीवित 'तरुण भारता' चे ते जे संपादक झाले तेच मुळी एका महत्वाच्या कार्याचे कंकण बांधून. ते कार्य होते चिमूर-आष्टी फाशी निवारक समितीचे. १९४४ च्या त. भा. पुनरुज्जीवन कार्यातील एक ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते आाणि भाऊसाहेबांचे त. भा. मधील ज्येष्ठ सहकारी श्री - ए. श्री. पटवर्धन त. भा. च्या रौप्य महोत्सवी अंकातील त्यांच्या लेखात सांगतात, 'तरुण भारत' प्रथम जन्मास आला तो चिमूर - आष्टी प्रकरणात झालेल्या अमानुष अन्यायाची तड लावण्याच्या ईष्येने!

अशी होती या संपादकाची राष्ट्रीय बांधिलकी!

⁕⁕⁕

अनुक्रमणिका

## |पत्रव्यवसायातील माझे जेष्ठ मार्गदर्शक|

---------------------------------------------------------------------- चं. प. भिशीकर

ख्यातनाम मराठी साहित्यिक कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याबरोबर सहसंपादक या नात्याने मी नागपूरच्या 'तरुण-भारतात' सुमारे नऊ वर्षे काम केले. पण तरीही त्यांचा उल्लेख माझे 'ज्येष्ठ सहकारी' असा करण्यास मन धजावत नाही. कारण सर्वच सहकाऱ्यांना ते मित्रत्वाच्या नात्याने वागवीत असले तरी या व्यवसायात मी अगदी नवखा होतो. वयाने लहान होतो आणि ज्येष्ठ व जिव्हाळयाचा मार्गदर्शक हीच त्यांच्याकडे पाहाण्याची माझी भावना राहात गेली. या भावनेत अखेपरपर्यंत अतर कधी पडले नाही. १९५७ साली भाऊसाहेबांनी (हे त्यांचे घरगुती नाव. याच नावाने आम्ही त्यांना संबोधित असू) 'तरुण-भारत' च्या पुणे आवृत्तीची जबाबदारी सोपवून मला पुण्याला पाठविले आणि पुढे मी मुख्य संपादक ही झालो. पण मार्गदर्शक या नात्याने भाऊसाहेबांचे स्थान कायमच राहिले.

याचे आणखी एक कारण हे होते की भाऊसाहेब 'तरुण-भारत' सारख्या विदर्भातील अग्रगण्य आणि लोकप्रिय दैनिकाचे संपादक असले, तरी तेवढयापुरताच त्यांचा लौकिक मर्यादेत नव्हता. ते कवी होते, कादंबरीकार होते, साहित्यसमीक्षक होते, अभ्यासपूर्ण प्रबंध त्यांनी लिहिले होते, साहित्याची व्यासपीठे त्यांनी गाजविली होती आणि अनेक वाङ्मयीन वादांना निमित्त ते झाले होते. शिवाय, थोर थोर मंडळींशी त्यांच्या नुसत्या ओळखीच नव्हत्या तर अनौपचारिक स्नेहसंबंधही होते. १९२४ साली नागपूरला ओगल्यांच्या 'महाराष्ट्र' या टिळकपक्षीय साप्ताहिकात ते प्रविष्ट होण्यापूर्वी पुण्या-मुंबईला साहित्यिकांत त्याची ऊठबस होतीच. कै. तात्यासाहेब केळकरांचे प्रेमही त्यांनी संपादन केले होते. नागपूरला गेल्यानंतर हळू हळू सर्व राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते, संस्था आणि चळवळी यांचाशीही त्यांची ओळख झाली. भिन्न भिन्न क्षेत्रातील खूप माणसे त्यांनी जोडली. जिज्ञासू तरुण विद्यार्थ्यांचे त्यांच्याकडे जाणे येणे वाढले. १९४४ साली 'महाराष्ट्र' सोडून दै. तरुण भारत त्यांनी सुरु केला तो या प्रदीर्घ तपश्चर्येच्या पार्श्वभूमीवर त्यांचे नुसते नावच या नव्या दैनिकासंबंधी भरपूर अपेक्षा निर्माण करण्यास पुरेसे हाते.

हा उल्लेख अशासाठी केला की 'तरुण-भारत' च्या संपादक मंडळात प्रश्विष्ट होताना माझ्या मनात भाऊसाहेबांची एक प्रतिमा ठसून गेली होती. शिवाय माझे सगळे शिक्षण नागपूरलाच झाले होते. एम्. ए. ला मराठी हाच विषय असल्यामुळे त्यांच्या ग्रंथाशी ओळंख होतीच. पण त्यांचा प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग मात्र आला नव्हता. 'तरुण-भारत' चे अग्रलेख मी आवडीने वाचत असे, पण त्यापलीकडे माझे पाऊल पडले नव्हते. कारण एका सर्वस्वी वेगळया कार्यक्षेत्रात मी होतो. हे क्षेत्र होते डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेल्या आणि जोपासलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, १९४८ साली गांधीजींची हत्या झाल्यानंतरच्या लोकक्षोभाच्या तीव्र झळा व्यक्तिशः माडखोलकरांना पोचल्या आणि 'तरुण-भारत' चीही त्यांत होरपळ झाली. माडखोलकरांनी लिहिलेल्या 'निर्वासिताच्या' कहाणी मध्ये या विध्वंसाचे सविस्तर वर्णन त्यांच्या खास शैलीत आलेलेच आहे. रा. स्व. संघाला तर हल्ल्याचे लक्ष्य बनविण्यात आले होते. सतारुढ काँग्रेस पक्षाने संघावर बंदी घातली होती आणि गांधी हत्येशी दूरान्वयानेही संबंध नसलेले हजारो कार्यकर्ते तुरुंगात डांबले गेले होते. मी काही महिने भूमिगत राहून 'राष्ट्रशक्ती' नामक साप्ताहिकातून संघावरील अन्यायाला वाचा फोडणारे लेखन केले. वृत्तपत्रीय

लेखनाचा येवढाच काय तो अनुभव माझ्या गाठीशी होता. या लिखाणावर सरकारचा रोष झाला आणि माझी रवानगी नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात झाली.

लोकक्षोभाच्या उद्रेकाने जो विध्वंस झाला त्यामुळे भाऊसाहेबांची हिंमत मात्र खचली नाही. तरीही श्री. नरकेसरी ट्रस्टला 'तरुण-भारत' पुनश्च उभा करण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक बळ एकवटणे अवघड वाटले, भाऊसाहेबांशी सविस्तर चर्चा होऊन श्री 'नरकेसरी प्रकाशन लि.' कडे 'तरुण-भारत' चे संचालन सोपवावे असे ठरले. संपादक भाऊसाहेबच राहाणार होते व त्यांचे जुने सहकारीही पूर्वीप्रमाणेच काम करणार होते, नव्या संचालक मंडळाचे नेतृत्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक अग्रगण्य युवा नेते श्री. बाळासाहेब देवरस यांच्याकडे होते.

मी माडखोलकरांच्या संपादकीय 'टीम' मध्ये सामील व्हावे अशी कल्पना पुढे आली ती याच संधिकाळात. अर्थातच प्रथम रीतसर अर्ज करावा लागला. नंतर माडखोलकरांच्या सहीचे मुलाखतीचे बोलावणे आले. माझी छाती धडधडू लागली. कारण या क्षेत्रात मी अगदीच अननुभवी. त्यावेळी आजच्याप्रमाणे विद्यापीठात पत्रकारितेच्या शिक्षणाची सोयही नव्हती. माडखोलकरांनी सुमारे एक तासपर्यंत माझी मुलाखत घेतली आणि अनेक प्रकारची चौकशी केली. त्याचा मुख्य रोख मी काय काय वाचले आहे याची चाचपणी करण्याकडे होता. त्यांनी राजकारण, अर्थकारण, समाजकारण, धर्मकारण अशा अनेक विषयांशी संबंधित ग्रंथाची नावे भराभर घेतली. त्यापैकी अनेक नावे मी ऐकलीही नव्हती. मग वाचन तर दूरच राहिले! माझी अवस्था पाहून सहानूभुतीने ते म्हणाले, "या व्यवसायात यशस्वी व्हायचे तर चौफेर खूप वाचन करावं लागेल तुम्हाला." मग काही ग्रंथ आधी वाचण्यासाठी त्यांनी सुचविले. त्यांची नावे मी टिपून घेतली.

मुलाखतीचा सगळाच तपशील इथे देण्याचे कारण नाही. पण आपले सहकारी निवडताना ते किती सावध असत हे ध्यानात यावे म्हणून एका प्रश्नाचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. मुलाखत संपविता संपविताच ते म्हणाले, 'शेवटी एक महत्वाचा मुद्दा. मला असं कळलं आहे की तुम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रीय कार्यकर्ते आहात. पण दैनिक वृत्तपत्र चालविताना एक समावेशक आणि वृत्त देण्याच्या बाबतीतील मोकळी भूमिका ठेवावी लागते. कुठल्याही विशिष्ट अभिनिवेशाने सतत लिहून वा वार्ता देऊन चालणार नाही. अशी लवचिक, समावेशक आणि पूर्वग्रहरहित मूल्यमापनाची भूमिका तुम्हाला मानवेल का' माडखोलकरांबरोबर काम करावयाचे आणि 'तरुण -भारत' चा वाचकवर्ग विस्तारावयाचा तर मला कशा प्रकारे काम करावे लागेल, याचा तो सूचक इशाराच होता. पण नंतर सुमारे ३० वर्षांच्या माझ्या व्यावसायिक जीवनात हे सत्र मला फारच मार्गदर्शक ठरले. या सूत्रामुळेच सर्वपक्षीय आणि सर्व थरातील वाचक वर्ग 'तरुण-भारत' ला मिळू शकला. संचालक मंडळाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब देवरस हे कट्टर संघवाले. पण माडखोलकरांना त्यांनी अतिशय आदराने वागविले व माडखोलकरांच्या कामात कधी ढवळाढवळ केली नाही.

एकच उदाहरण पुरेसे होईल. संयुक्त महाराष्ट्र हे भाऊसाहेबांनी जोपासलेले एक स्वप्न होते. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा उद्‌घोष त्यांनी प्रथम १९४६ मध्ये बेळगाव येथील साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन केला होता आणि नंतर 'तरुण-भारता' तूनही भाषावार प्रांतरचनेचा आक्रमक पुरस्कार सातत्याने चालू ठेवला होता. यावादात पुढे प्रांताप्रांतात कटुता आली व आरोप प्रत्यारोप पुष्कळ झाले. भाषेवरुन प्रांताप्रांतात कटुता



**प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. सुरेश डोळके, प्रा. म. श्री. पंडीत यांचेसह भाऊराव**

अनुक्रमणिका

येणे संघाला अनिष्ट वाटत होते. सारे एकाच राष्ट्राचे घटक असल्यामुळे एकाच भाषेच्या लोकांचे राज्य किंवा द्वैभाषिक यासारखे प्रश्न संघाला गौण वाटत होते. पण आपले मत श्री. बाळासाहेब देवरस यांनी माडखोलकरांवर लादले नाही. माडखोलकरांनीही संघाच्या भावना दुखावल्या नाहीत. हे सामंजस्य राखण्यात भाऊसाहेबांचे व्यवहार कौशल्य उत्तम प्रकारे प्रकट झालेले आम्हा त्यांच्या सहकाऱ्यांना अगदी जवळून पहावयास मिळाले. पुढे फाझल अली कमिशनने वेगळया विदर्भाची शिफारस केली, तेव्हाही भाऊसाहेबांनी विदर्भासह संयुक्त महाराष्ट्राचीच मागणी लावून धरली. त्यांच्याच चिकाटीच्या प्रयत्नांनी नागपूर करार घडून आला व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या मार्ग मोकळा झाला. वेगळया विदर्भ राज्याचे कट्टर पुरस्कर्ते श्री. बाळासाहेब तिरपुडे हे देखील भाऊसाहेबांना निकटचा मित्र मानीत असत, हे त्यांच्या यशाचेच गमक मानले पाहिजे.

मला भाऊसाहेबांचे एक वैशिष्ट्य हे जाणवले की केवळ वृत्तपत्रीय लिखाण करण्यात त्यांनी समाधान कधीच मानले नाही. विदर्भाचे साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि संस्थात्मक जीवन समृद्ध व्हावे, नवी माणसे उत्साहाने आपआपल्या आवडीच्या क्षेत्रात कामाला लागली आणि तरुणात अभ्यास वृत्ती जागृत व्हावी, यासाठी ते सतत काहीना काही उपक्रम चालू ठेवत. विदर्भ साहित्य संघ ही नागपुरातील सुप्रतिष्ठित संस्था. पण भाऊसाहेबांची लेखणी व त्यांचे प्रचार कौशल्य, योग्य माणसे देऊन त्यांना कामात ओढण्याचे कौशल्य आणि सरकारदरबारी असलेले वजन खर्ची घालून जागेपासून तो पैशापर्यंतचे प्रश्न सोडविण्याचा सफल प्रयास यामुळेच वि. सा. संघ भरभराटला. साहित्य व ललित कला यांचे सक्षम व्यासपीठ बनू शकला. विदर्भ संशोधन मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. वा. वि. मिराशी यांनी भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर शोकसंदेशात भाऊसाहेबांचे ऋण मान्य करताना म्हटले आहे, 'आमच्या विदर्भ संशोधन मंडळाच्या जन्मच त्यांच्या प्रेरणेमुळे झाला.... त्यांनी स्वतः होऊन खटपट केली नसती तर माझ्यासारख्या प्रसिद्धीविन्मुख कार्यकर्त्याच्या कामाची कल्पना जनतेला आली नसती. विदर्भातील असंख्य युवकांना त्यांनी आपल्या उत्तेजनाचे ऋणी करुन ठेवले आहे. हाडाचा कार्यकर्ता, समाजसेवक, अभ्यासक, आधारासाठी धडपडणारा युवक यांना प्रकाशात आणण्याचे तसेच आधार देण्याचे फार मोठे काम भाऊसाहेबांनी तरुण-भारत द्वारे केले. यात त्यांची गुणग्राहकता आणि इतरांचा विश्वास संपादन करण्याची क्षमता यांचा प्रत्यय नित्य येत असे. ही माणसे व या संस्था तरुण- भारतच्या परिवारात सहजपणे समाविष्ट होऊन जात. संपादक या नात्याने पार पाडावयाच्या जबाबदारीचाच ते हा एक महत्वाचा भाग समजत.

भाऊसाहेबांबरोबर काम करताना मला नेहमी नवल वाटे ते त्यांच्या अतिशय व्यापक आणि विविधतापूर्ण जनसंपर्काचे. ते स्वतः कोणत्याही राजकीय पक्षात नव्हते. लेखक या नात्यानेच त्यांची प्रसिद्धी होती, पण त्यांच्या परिचयाचे आणि प्रभावाचे क्षेत्र साहित्यापुरते कधीच मर्यादित नव्हते. राजकारणाशी व राजकारणी मंडळीशी संपादकाचा संबंध येणे अपरिहार्यच असते. जुन्या मध्यप्रदेशात पं. रविशंकर शुक्ल आणि पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचे प्रस्थ मोठे होते. माडखोलकर काही त्यांचे समर्थक नव्हेत. पण या उभयताचा माडखोकरांवर फार विश्वास. विशिष्ट धोरणांची चर्चा अनेकदा आधी ते माडखोलकरांशी करीत, त्यांचा सल्ला विचारीत. धोरणे योग्य आहेत असे माडखोलकरांना वाटले तर ते आधीच सूचक वार्तापत्रे लिहून त्या धोरणांना अनुकूल मानसिकता तयार करीत. अशा चर्चेला एकदा त्यांच्यासोबत त्यांनी मला नेले होते, त्यामुळे या विधायक सहकार्याची कल्पना मला येऊन गेली. इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा लोकांचे भले होणे भाऊ साहेबांना

अनुक्रमणिका

महत्वाचे वाटत असे, ते कोणाच्या 'खिशात' मात्र कधी गेले नाहीत. त्यांचा संपर्क नव्हता कुणाशी? आणि कोणत्या क्षेत्रात? असाच प्रश्न माझ्यासारख्याला पडत असे.रा. स्व. संघाचे डॉ. हेडगेवार आणि श्रीगुरुजी, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक खेत्रांतील श्री अप्रबुद्ध, बाळशास्त्री हरदास, श्री जनार्दन स्वामी, अनाथ विद्यार्थी गृहाचे काकासाहेब चोळकर, श्रदानंद अनाथालयाचे निष्ठावंत सेवक श्री कृपाशंकर नियोगी, कामगार नेते कॉमरेड रुईकर, रसिकाग्रणी श्रीमंत बाबूरावजी देशमुख, कितीतरी गायक, कलावंत, अभिनेते आदींशी त्यांची जवळीक आणि त्या त्या क्षेत्राचे त्यांना असलेले ज्ञान पाहिले की मी स्तिमित होऊन जाई. या व्यापक संपर्कामुळे 'तरुण-भारत' ला लोकांचा विलक्षण जिव्हाळा लाभला, हे मी अनुभवले आहे.

भाऊसाहेबांची लेखनशैली, त्यांचा लोकसंपती, लोककल्याणाची त्यांची तळमळ आणि त्यांची वृत्तपत्रनीती यामुळे त्यांच्या अग्रलेखांना विलक्षण प्रभाव लाभला होता. 'तरुण-भारत' चे ते अनन्य बलस्थान बनले होते. आपल्या अग्रलेखांचे उस्तुकतेने वाचन करणारा मोठा वाचकवर्ग निर्माण झाला आहे, याची जाणीव भाऊसाहेबांना होती आणि एक प्रकारचा विश्वासही त्यांच्या मनात निर्माण झाला होता. एकदा श्रीमंत बाबूराव देशमुख त्यांना सहज म्हणाले, 'भाऊसाहेब, तुमचे अग्रलेख फार छान असतात. पण पिवळा कागद व खराब छपाई यामुळे धडपणे ते वाचताच येत नाहीत.' यावर भाऊसाहेबांनी उत्तर दिले होते, "माझे अग्रलेख अगदी गोणपाटावर छापले तरी लोक ते आवडीने वाचतील!'

माडखोलकरांचे अग्रलेख, त्यांचे विषय, त्यांची शैली, त्यांची रसवत्ता, त्यात भरलेला अचूक संदर्भयुक्त माहितीचा खजिना, वाचकांच्या विचारांना दिशा देण्याचे त्यांचे सामर्थ्य, प्रसंगानुसार त्यातील आक्रमकता, आवेश, अनुनय, युक्तिवाद, उपरोध व उपहास, भावकल्लोळ इत्यादि अंगांनी स्वतंत्र अभ्यास करावा, अशा तोलामोलाचे आहेत. अग्रलेखांचा विस्तार तर चार, सहा, आठ आणि क्वचित बारा कॉलमापर्यंत असे. इतर वृत्तपत्रांची दोन कालमांतील दोन वा तीन संपादकीये व माडखोलकरांचे विस्तुत अग्रलेख यांतील अंतर 'तरुण भारत' ला उपकारकच ठरत गेल्याच्या अनुभव त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने घेतला आहे. पंतप्रधान पं. नेहरु ह्यांनी द्विभाषिक राज्य लादले तेव्हा भाऊसाहेब मोठे प्रक्षुब्ध झाले होते व हा क्षोभ त्यांच्या त्या वेळच्या अग्रलेखातूनच जणु स्फोट व्हावा तसा प्रकट झाला होता. 'या निर्णयाचे स्वागत करा' या मथळ्याखालील त्यांचा अग्रलेख मला स्मरतो. जळजळीत, उपहासाने ओतप्रोत आणि काँग्रेस श्रेष्टीवर आसूड ओढणारा हा अग्रलेख म्हणजे भाऊसाहेबांच्या शैलीचा अविस्मरणीय मासलाच वाटला मला. 'हे मराठी राज्य की मराठा राज्य?' हा खळबळजनक सवाल एका अग्रलेखातून त्यांनी यशवंतरावांना केला होता, तो प्रतिनिधिक स्वरुपाचाच म्हणावा लागेल. या प्रश्नाचे प्रकट उत्तर सांगलीच्या भाषणात यशवंतरावांनी दिले होते. सुमारे तीन तपातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांचे प्रतिबिंब माडखोलकरांच्या अग्रलेखात उमटलेले आहे. असे म्हटल्यास ती अतिशयोक्ति ठरावयाची नाही. अर्थात् काही प्रसंगी सरकारचा रोष त्यांना सहन करावा लागला. १९४२ च्या लढयावर लिहिलेल्या त्यांच्या नऊ अग्रलेखांवर सरकार फार चिडले होते. पण कारवाई मात्र झाली नाही. पण 'तरुण -भारत' ने चिमूर - आष्टी विशेषांक काढण्याचे ठरविले तेव्हा प्रसिद्धीपूर्वीच सरकारने कारवाई केली व अंक काढू दिला नाही. 'तरुण-भारत' चा राष्ट्रीय बाणा भाऊसाहेबांनी चांगलाच जोपासला होता.

अनुक्रमणिका

अग्रलेखांच्याच संदर्भात आणखी दोन गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे भाऊसाहेबांनी लिहिलेले उत्कृष्ट मृत्युलेख आणि काही ना काही निमित्ताने लिहिलेले व्यक्तिचित्रणात्मक लेख. विदर्भातील एक थोर विचारवंत आणि गांधीवादी अग्रणी कै. दादा धर्माधिकारी यांनी भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चिरंजीवांना पाठविलेल्या शोकसंदेशात लिहिले होते, 'भाऊराव सिद्धहस्त लेखक होते. मृत्युलेख लिहिण्याच्या बाबतीत त्यांचा हातखंडा होता. मी त्यांच्यापेक्षा सहा महिन्यांनी वडील आहे. त्यांनी माझा मृत्युलेख लिहावा आणि या स्वरुपांत मित्र या नात्याने माझी उत्तरक्रिया करावी, अशी माझी मित्रसुलभ महत्वाकांक्षा होती. पण त्यांनी माझी ही इच्छा पुरी केली नाही. त्या आधीच ते निघून गेले. त्यांच्या मैत्रीला हे शोभले नाही! "भाऊसाहेबांनी ज्यांच्यावर मृत्युलेख लिहिले अशा महाभागाची नामावली खरोखरच मोठी होईल. पण प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाचा आणि त्याच्या जीवनातील आशयपूर्ण घटनांचा सूक्ष्म अभ्यास त्यात दिसतो. साऱ्या तारखा आणि संदर्भ यात कुठेही चूक आढळायची नाही. स्वतः च्या अनुभवांचा वापर तर ते चपखलपणे करायचे. त्यांचे मूल्यचिंतनही लेखनात डोकवायचे.

दुसरा आवश्यक उल्लेख आहे त्यांच्या बरेच दिवस चाललेल्या 'सोमवार व्रता' चा. म्हणजे दर सोमवारच्या अंकात ते धार्मिक-आध्यात्मिक विषयावर अग्रलेख नियमाने लिहीत. भाऊसाहेब स्वतः ला अज्ञेयवादी म्हणवीत. रुढार्थाने ते अभद्र आणि कर्मकांडी तर नव्हतेच. उलट 'वाङ्मयाची जीवनमूल्ये' या विषयावर एका साहित्यिक व्यासपीठावरुन बोलताना ते म्हणाले होते, 'मोक्षमूल्ये आणि सत्तामूल्ये यांच्या कचाट्यातून बाहेर पडून निखालस ऐहिक, भौतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचा जोवर आपण अवलंब करीत नाही, तोवर भारताला एकसंघ सार्वभौम व्याक्तित्व आणि राष्ट्रत्व प्राप्त होणे अशक्य आहे.' याच भाषणात, "जुनाट पारमार्थिक आणि पारलौकिक जीवन - मूल्यांची कोंडी' फोडून बाहेर पडण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली होती. म्हणून संतवाङ्मय, धार्मिक परंपरा आणि समजुती, धर्म आणि समाजधारणा इत्यादि विषयांची जी चर्चा त्यांनी सोमवारच्या विशेष अग्रलेखातून केली, ती मोठी वादळी ठरली. अनेकांनी नाराजी व्यक्त केली. अखेर भाऊसाहेबांनी या व्रताची सांगता केली.

मी अगदी जवळून पाहिलेला भाऊसाहेब माडखोलकर यांच्या संपादकीय कर्तृत्वाचा हा अल्पसा आलेख आहे. १९६७ साली भाऊसाहेब संपादकपदावरुन निवृत्त झाले, तरी १९७५ मध्ये आणीबाणीतील उपमर्दकारक 'सेन्सॉरशिप' लागू होतपर्यंत ते प्रतिसप्ताह एक अग्रलेख अवश्य लिहावयाचे. त्यानंतर एक वर्षातच त्यांनी देह ठेवला.

शेवटी आम्हा संपादकांचा भाऊसाहेबांशी जो दैनंदिन संबंध येत असे, त्याविषयी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. पहिली ठळक गोष्ट म्हणजे त्यांचा डामडौल कोणताही नव्हता आणि राहाणीही अगदी साधीच होती. साधा पांढरा अर्ध्या बाहांच्या सदरा व शुभ्र धोतर हाच त्यांचा सामान्यतः वेश असे. सायकल रिक्षातून दुपारी दोन-अडीचच्या सुमाराला ते येत. परस्पर आपल्या खोलीत न जाता वृत्तविभागाच्या दालनातूनजात. सगळ्यांवर एक नजर टाकीत, सगळ्यांना ते मित्रासारखे बरोबरीच्या नात्याने वागवीत, पण थट्टाविनोद करण्याचा त्यांचा स्वभाव होता. काही काही लोकांशी अस्सल नागपुरी बोलीत हेल काढून बोलण्यातही त्यांना गंमत वाटे, वृत्तविभागाच्या कामात फारशी दखल ते देत नसत. सगळे संपादकीय टपाल रोज डोळ्याखालून घालण्याची त्यांची परिपाटी होती. महत्वाची अनेक पत्रे ते कार्यालयातच कोणाला तरी डिक्टेट करीत. त्यांचे

स्वतः चे हस्ताक्षर विशेष चांगले नव्हते. त्यांची अनेक पत्रे आणि इतर मजकूर लिहिण्याची पाळी माझ्यावर वारंवार यायची पण यातूनही पुष्कळ शिकावयास मिळत असल्याने या कामाचा कधी कंटाळा मला आला नाही. शिवाय, लेखन जरा थांबवून काही मजेदार प्रसंग खुमासदारपणे निवेदन करण्याचीही त्यांना कधी कधी लटक येई. हास्याची कारंजी उसळत. भाऊसाहेबांच्या सहवासात वेळ कंटाळवाणा असा कधी जायचाच नाही. त्यांची माणसांची पारख चांगली होती आणि कल्पकता व योजकताही त्यांच्या ठायी भरपूर होती.

त्यांचा कनिष्ठ सहकारी या नात्याने त्यांच्या बरोबर काम करताना नऊ वर्षे आनंदात गेली व मुख्य म्हणजे पुष्कळ काही शिकावयास मिळाले, त्यांचा विश्वास संपादन करता आला. ‘तरुण भारत’ च्या पुणे आवृत्तीची जबाबदारी त्यांनीच माझ्यावर सोपविली व बरीच वर्षे मार्गदर्शनही केले. पत्रकारितेच्या क्षेत्रात किंवा एकूणच लेखनाच्या क्षेत्रात जे काही अल्पस्वरुप यश मला पुढे मिळू शकले त्याचे श्रेय भाऊसाहेबांनाच अर्पण करुन मोकळे होणे मी उचित समजतो.

⁕⁕⁕

## | जनसंपर्कनिष्ठ पत्रकार |

------------------------------------------------------------------------ल. त्र्यं. जोशी

भाऊसाहेब साहित्यिक आणि पत्रकार होते. गतवर्षी गोव्यात गेल्यानंतर मला स्व. भाऊसाहेबांच्या माडखोल या गावाचे दर्शन घेण्याची संधी मिळाली हे मी माझे परमभाग्य समजतो. वास्तविक भाऊसाहेबांचा जन्म माडखोलला झालेला नाही. तेथील लोकांच्या कथनानुसार ते कधीही त्या गावात गेले नाहीत. पण एवढे मात्र खरे की, एवढ्या महान साहित्यिकाच्या व पत्रकाराच्या नावाशी आपल्या गावाची ओळख जोडली गेली आहे याचा त्यांना विलक्षण अभिमान आहे. मी तेथे गेलो असता भाऊसाहेबांसोबत काम केलेला एक पत्रकार म्हणून तर त्यांनी माझे उत्स्फूर्त स्वागत केलेच पण त्याबरोबर भाऊसाहेबांच्या पूर्वजांचे वास्तव्य असलेल्या जागेचे दर्शनही घडविले. विशेष म्हणजे आजही ती जागा माडखोलकरांची जागा म्हणूनच ओळखली जाते. तेथे एक छोटेसे देऊळ देखील आहे व जे कुटुंब त्या जागेत राहते त्याला आपणा माडखोलकरांच्या जागेत राहतो याचा अभिमानही आहे. कृतज्ञतेची भावनाही त्यांच्या अंतःकरणात आहे.

भाऊसाहेब ज्यावर्षी तरुण भारतचे मुख्य संपादक म्हणून निवृत्त झाले (१९६७) त्यावर्षी मी तरुण भारतमध्ये प्रवेश केला. पण निवृत्तीनंतरही ज्येष्ठ संपादक या नात्याने तरुण भारतला भाऊसाहेबांचे मार्गदर्शन मिळत गेल्याने त्याचा लाभ माझ्याही वाट्याला आला हे मी माझे भाग्य समजतो. माझ्या भाग्याचा आणखी एक विषय म्हणजे जेव्हा मी अकोला येथील शिक्षकाची नोकरी सोडून तरुण भारतमध्ये रुजू होण्यासाठी नागपूरला आलो तेव्हा माझे अकोल्याचे मित्र ‘आता काय! गत्र्यंनंतर लत्र्यंच’ असे गंमतीने म्हणत होते. माझे भाग्य असे की, नंतर १९८७ मध्ये माझ्या त्या मित्रांचे विनोदाने उच्चारलेले शब्द खरे ठरले. यात माझ्या कर्तृत्वापेक्षा नियतीचा संकेत अधिक प्रभावी ठरला असे मी मानतो.

आणखी एका प्रसंगाच्या निमित्ताने भाऊसाहेबांच्या सामर्थ्याचा मला आलेला अनुभव सांगण्याचा मोह मी आवरु शकत नाही. माझ्या निवृत्तीनंतर जेव्हा मी माझे ज्येष्ठ सहकारी श्री. वामनराव तेलंग यांच्याकडे तरुण भारतची सूत्रे सोपविली तेव्हा कधीही भावव्याकुळ न होणाऱ्या वामनरावांना भाऊसाहेबांचे स्मरण झाले आणि त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. हा एक प्रसंग वगळला तर मी वामनरावांना कधीही गहिवरलेले पाहिलेले नाही. भाऊसाहेबांच्या व्यक्तित्वाची ही किमया मी अपूर्व मानतो व तिला विनम्र अभिवादन करतो.

भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्वाला आणि कर्तृत्वाला अक्षरशः अनेक पैलू होते. त्यातील प्रत्येक पैलू हा सारखाच विलोभनीय आणि हवाहवासा वाटणारा होता, या प्रत्येक पैलूचे निर्माते स्वतः भाऊसाहेब होते. अत्यंत परिश्रमपूर्वक, सखोल अध्ययन आणि चिंतन करुन, व्यासंग सतत कायम ठेवून, प्रत्येक गोष्टीचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्यांनी या पैलूंना आकार होता. एकेका पैलूवर एकेक पुस्तक तयार व्हावे, एवढा तो व्यापकही होता. भाऊसाहेब काय नव्हते असा नकारार्थी प्रश्न जर कोणी विचारायचा प्रयत्न कोणी केला तर अनेक होकारार्थी उत्तरे देता येतील, असे ते व्यक्तिमत्व होते. भाऊसाहेब साहित्यिक आणि पत्रकार होते. हे वेगळे सांगण्याची गरजच नाही. पण त्यांच्यातील साहित्यिकाला निबंधकार, कादंबरीकार, कवी, समीक्षक, संशोधक, भाषाविद् संस्कृत पंडित असे अनेक आयाम प्राप्त झाले होते. पत्रकार या नात्याने त्यांचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व यांचे मूल्यमापन करायचे झाल्यास एक परिपूर्ण पत्रकार व संपादक कसा असावा याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे

अनुक्रमणिका

भाऊसाहेब माडखोलकर असेच कुणालाही म्हणावे लागेल. त्यांच्या एकंदर जीवनचरित्रावरुन तर असे वाटते की, ते बहुधा दैनिक वृत्तपत्राचे संपादक होण्यासाठीच जन्मले असावेत. मराठीतील पहिले वृत्तपत्र म्हणून ज्या 'दर्पण' चा उल्लेख केला जातो त्याचे संपादक बाळशास्त्री जांभेकरांचे घराणे म्हणजे भाऊसाहेबांचे आजोळ. त्यांचा जन्मही त्यांच्या आजोळीच म्हणजे हल्लीच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील विजयदुर्ग खडीच्या काठी असलेल्या पोंबुर्फा या गाव झाला. भाऊसाहेबांची आई म्हणजे पोंबुर्फ्याच्या नारायणशास्त्री जांभेकर यांची मुलगी. बाळशास्त्री जांभेकर हे तिचे चुलत आजोबा होते. लेखनाचे व पत्रकारितेचे संस्कार भाऊसाहेबांना त्यांच्या मातेपासून प्राप्त झाले होते असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरु नये. कारण त्या माऊलीचे वाचन आणि पाठांतर अतिशय दांडगे होते. विशेष म्हणजे संसाराचा रामरगाडा सांभाळून तिने हा छंद जोपासला होता. 'जांभेकरांचा नातू आहेस, हे विसरु नकोस,' असे ती भाऊसाहेबांना वारंवार बजावीत असे. यावरुन भाऊसाहेबांच्या पत्रकारितेची मुहुर्तमेढ कुणी घातली होती हे कळायला वेळ लागत नाही. भाऊसाहेबांनाही आपल्या मातेचा विलक्षण अभिमान होता. तिच्या देखणेपणाबद्दल भाऊसाहेब म्हणतात, 'गेल्या अनेक वर्षांत मी अनेक सुंदर स्त्रिया पाहिल्या पण माझ्या चिंतनात आणि स्वप्नात जर कोणती सौंदर्यमूर्ती पुनःपुन्हा प्रकट होत असेल तर ती माझ्या मातेचीच होय!' भाऊसाहेबांचे देखणेपणा ही देखील या मातेचीच देणगी असावी.

१९६६ ते १९७६ अशा जेमतेम दहा वर्षांच्या कालावधीत मी भाऊसाहेबांच्या सहवासात होतो पण त्यांच्यात व माझ्यात एचढे अंतर होते की, मी त्यांच्या निकटच्या संपर्कात होतो असे म्हणण्याचे धारिष्ट्यही मी करणार नाही. 'तरुण भारत' चे ते मुख्य आणि जेष्ठ संपादक होते आणि मी एक नवशिका उप संपादक होतो. पण त्यांच्या अल्प सहवासाचे जें क्षण माझ्या जीवनात आले ते आपला प्रभाव सोडून गेल्याशिवाय राहिले नाहीत. त्यांना सर्वप्रथम मी पाहिले ते अकोला नगरपालिकेने केलेल्या त्यांच्या सत्कार समारंभात. त्यावेळी माझा तरुण भारतमध्ये प्रवेश व्हायचा होता. सत्काराच्या निमित्ताने ते अकोल्यात आले असताना श्री. महाजनी यांच्याकडील मुक्कामात अकोल्याचे तरुण भारतचे प्रतिनिधी श्री. शांताराम सरदेशपांडे, मातृभूमीचे श्री. शांताराम जैन व अन्य उपस्थित यांच्याशी त्यांनी ज्या गप्पा केल्या त्या ऐकून माहितीचा खजिना म्हणतात तो हाच असा माझा समज झाला व त्या समजाला नंतर कधीही धक्का लागला नाही. उलट तो दृढच होत गेला. या सत्कार समारंभात नगरपालिकेच्या मानपत्राचा स्वीकार केल्यानंतर भाऊसाहेबांनी केलेल्या भाषणाचा तपशील जरी आज आठवत नसला तरी नगरनियोजन कसे असावे याचा वस्तुपाठच त्यांनी त्या भाषणातून दिला होता. पुढे अकोल्याचे नगराध्यक्ष श्री. विनयकुमार पाराशर यांनी ज्या पद्धतीने त्या शहराचे सौंदर्यीकरण केले त्याची प्रेरणा भाऊसाहेब होते असे म्हटले तर ते यथार्थ ठरावे. अकोल्यातील या पहिल्या दर्शनापासून तर २७ नोव्हेंबर १९७६ या दिवशीच्या त्यांच्या अंत्यदर्शनापर्यंत भाऊसाहेबांशी माझा जो जो अल्पसंबंध आला, तो एक संपादक म्हणूनच. त्यांच्या निकटवर्तीयात सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले नाही आणि त्या परिस्थितीत ते शक्यही नव्हते. कारण भाऊसाहेब जीवनाच्या कर्तृत्वाच्या फार पुढच्या टप्प्यावर जाऊन पोहोचले होते. मी फारच मागे होतो. पण त्यांच्या पाऊलखुणा देखील माझ्यासारख्या नवशिक्यांना प्रसादकणांसारख्या होत्या.

भाऊसाहेबांच्या लेखणीबद्दल सर्वच बोलतात. तरीही तिचे महत्व हनुमानाच्या शेपटीप्रमाणे थोडे उरतेच व कधीही संपत नाही. तिचे मूल्यमापन करणे माझ्यासाठी केवळ अशक्य आहे. माझी ती प्रज्ञाच नाही. पण संपादक या नात्याने भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे जे पैलू पाहता आले, थोडेफार अनुभवता आले त्याची

विलोभनीयता अनन्यसाधारण आहे, असे म्हणावे लागेल. आपल्या सहकाऱ्यांशी संपर्क ठेवणे, त्यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करीत राहणे, त्यांच्या चुका दाखवत दाखवतच त्यांना प्रोत्साहन देणे व पत्रकार म्हणून त्यांना घडविणे हे भाऊसाहेबांच्या या पैलूचे वैशिष्ठ्य होते, पण आपण कोणाला घडवित आहोत असा आवही त्यांनी कधी आणला नाही. सांसदीय लोकशाहीत पंतप्रधानाचे वर्णन 'फस्ट अमंग इक्कल' असे केले जाते. भाऊसाहेब आपल्या सहकाऱ्यांशी याच पद्धतीने वागत असत.

मी पाहिलेल्या भाऊसाहेबांच्या सहकाऱ्यांचे दोन प्रकार आहेत. एक त्यांचे समवयस्क असलेले ए. श्री. पटवर्धन, तात्यासाहेब करकरे, दादासाहेब वाचासुंदर यांच्या सारख्याचा तर दुसरा मामासाहेब घुमरे, य. बा. शास्त्री, ना. बा. ठेंगडी, चंद्रशेखर फडणीस, प्र. शं. देशमुख यांच्यासारखा भाऊसाहेबांनंतरच्या दुसऱ्या फळीचा. आम्हा नवशिक्यांची फळी त्यानंतरची. त्यापैकी पहिल्या फळीशी भाऊसाहेबांचा व्यवहार समकक्षेचा आहे. किंबहुना तो तसा असावा आणि वाटावा याची ते पूरेपूर काळजी घेत. या फळीतील महानुभावांची भाऊसाहेबांशी तुलना करण्याचे कारण नाही. त्यांना ते आवडणारही नाही. पण त्यांच्यात व भाऊसाहेबांत अंतर होते हे कुणीही मान्य करील. स्वतः तेही मान्य करीत पण भाऊसाहेबांनी ते कधीही कुणाला जाणवू दिले नाही. त्यांच्याबद्दल भाऊसाहेब खाजगीत यांच्या स्वभावानुसार मिश्कीलपणे बोलत असतीलही पण सार्वजनिकरीत्या बोलताना, वागताना ते त्यांच्याविषयी निरतिशय आदरच प्रकट करीत. इतका की त्यांच्यात व भाऊसाहेबांत काही अंतर आहे असे कुणालाही वाटू नये. आपण स्वतः महान असताना आपले सहकारी तेवढे महान नाहीत हे ठाऊक असतानाही स्वतः चे महानत्व थोडे झाकून व सहकाऱ्याचे महानत्व प्रकर्षाने पुढे आणून आम्ही सगळे एकाच दर्जाचे आहोत असे चित्र प्रस्तुत करणे हे अतिशय कठीण काम आहे. अशा स्थितीत सामान्यतः माणसाला स्वतःचा मोठेपणा प्रस्तुत करण्याचा मोह अपरिहार्यपणे होतो. भाऊसाहेबांनी तो कटाक्षाने टाळला. यातून डोकावणारे भाऊसाहेबांचे मोठेपणा विलोभनीय नाही काय?

दुसऱ्या फळीतील सहकाऱ्यांबद्दलही वेगळी स्थिती नाही. भाऊसाहेब या सहकाऱ्यांच्या चुका दाखविण्यास कधीही चुकत नसत. कधीकधी अतिशय कठोर होऊन ते या सहकाऱ्यांचे दोष दिग्दर्शन करीत असत. त्यांचे लिखाण, बारकाईने वाचून त्यांना मार्गदर्शन करीत असत. वेळप्रसंगी त्यांना टोचून बोलतही असत. पण त्यामागे दृष्टी होती त्यांना घडविण्याची. त्यांनी या सहकाऱ्यांना एकेक क्षेत्र जणू वाटूनच दिले होते व त्यात प्रगती करण्याच्या संधीची त्यांच्यावर उधळणच केली होती. संपादकीय नेतृत्व करण्यासाठी त्यांनी भाऊसाहेब घुमरे यांची निवड केली होती. संपादकीय लेखनासाठी चंद्रशेखर फडणीस यांना पसंत केले होते. आंतरराष्टीय घडामोडींचा अभ्यास करण्याची अपेक्षा त्यांनी ना. बा. ठेंगडींकडून व्यक्त केली होती, तर सर्व क्षेत्रात विहार करण्याची संधी त्यांनी य. बा. शास्त्रींना उपलब्ध करुन दिली होती. ग्रंथसमीक्षणाचा वसा प्र. शं. देशमुखांच्या झोळीत टाकला होता. या सहकाऱ्यांनी देखील आपल्या परीने भाऊसाहेबांच्या त्या अपेक्षा पूर्ण करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. मामासाहेब घुमरे यांनी पुढे 'तरुण भारत' चे संपादकीय नेतृत्व करुन, चंद्रशेखर फडणीस यांनी शेख अब्दुल्लांवर आठ कॉलमचा मृत्युलेख लिहून, य. बा. शास्त्रींनी राजकारण व कलाक्षेत्र यात विहार करुन आणि प्र. शं. देशमुख यांनी 'रात्र काळी घागर काळी' चे दीड पान रसाळ समीक्षण करुन भाऊसाहेबांची निवड यथार्थ ठरविली होती, हे कदाचित नव्या पिढीला ठाऊक नसेल. पण तत्पूर्वीची पिढी हे विसरु शकत नाही. या प्रत्येकाच्या कर्तृत्वाचे त्या त्या वेळी समाजाने एवढे कौतुक केले की त्यामुळे भाऊसाहेब सुखावले असतील तर ते आश्चर्य नाही.

अनुक्रमणिका

भाऊसाहेब आपल्या सामान्य सहकाऱ्यांचाही मान समाजात राखत असत याचा एक बहारदार किस्सा श्री. प्र. श.देशमुख सांगत असतात व सांगण्याच्या प्रत्येक वेळी त्यांचा उत्साह पहिल्या सांगण्याच्या वेळी जसा होता असाच असतो. तमाशाच्या एका कार्यक्रमात भाऊसाहेब प्रमुख पाहुणे म्हणून गेले होते. माझ्यासोबत माझे सहकारी अण्णासाहेब देशमुख येतील हे त्यांनी संयोजकांना सांगून ठेवले होते. नियोजित वेळी भाऊसाहेब समारंभस्थळी पोचले. पण अण्णासाहेब कसे पोहोचणार? ते रात्रपाळीचे काम करीत होते. अण्णासाहेब नाहीत हे पाहून भाऊसाहेब थांबले ते येईपर्यंत कार्यक्रम सुरु होणार नाही हे त्यांनी संयोजकांना बजावले. त्यामुळे संयोजकांची अण्णासाहेब कुठे आहेत म्हणून धावपळ सुरु झाली. त्यांना वाटले होते की अण्णासाहेब म्हणजे कुणीतरी प्रौढ, भारदस्त व्यक्ती असेल. बिचारे अण्णासाहेब दुसऱ्या दिवशीचा अंक काढण्याच्या फिकीरीत होते. पण कार्यक्रम खोळंबत होता. संयोजक त्यांना नेण्यासाठी आले होते. शेवटी अण्णासाहेब एकदाचे समारंभस्थळी पोहोचले. भाऊसाहेबांनी, 'या अण्णासाहेब'असं म्हणून त्यांना शेजारी बसविले. तेव्हा कुठे कार्यक्रम सुरु झाला. एखाद्या पोरसवदा अण्णासाहेबांसाठी भाऊसाहेबांनी एवढा आग्रह का धरावा असं कदाचित संयोजकांना वाटले असेलही, पण सहकाऱ्याचा मान वाढविण्याच्या भाऊसाहेबांच्या वृत्तीचा अण्णासाहेबांच्या पिढीवर झालेला संस्कार पुसला जाऊ शकत नाही. व्यक्तिगत विचार केला तर हा प्रसंग अण्णासाहेबांच्या जीवनातील अमोल ठेवा ठरतो. तो हृदयाच्या आतल्या कप्प्यात शेवटच्या क्षणापर्यंत सांभाळून ठेवल्याशिवाय राहणार नाहीत.

या दोन पिढयात मी मा. गो. वैद्य यांचा समावेश केला नसल्याचे आपल्याला आश्चर्य वाटले असेल. पण त्या अर्थाने श्री. वैद्य, ए. श्री. पटवर्धन प्रभृतींच्या पिढीत बसत नव्हते आणि दुसऱ्या फळीतही त्यांचा समावेश करता येत नाही. कारण भाऊसाहेबांचे सहकारी होण्याची संधी त्यांना उशिरा प्राप्त झाली. एक प्रकारे मा. गो. वैद्यांचे तरुण भारतचे संपादक पद हे स्वयंभू होते. कारण संपादक होण्यासाठीच त्यांचा 'तरुण भारत' मध्ये प्रवेश झाला होता. त्यांचे मोठेपण यात आहे की आपण संपादक होण्यासाठीच तरुण भारतमध्ये आलो आहोत हे त्यांनी कधीही, कुणालाही जाणवू दिले नाही. रात्रपाळीपासून ते मुद्रितशोधन करण्यापर्यंतची सर्व कामे त्यांनी एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे केली. आणि भाऊसाहेबांचे मोठेपण यात आहे की, मा. गो. वैद्य संपादक होण्यासाठीच 'तरुण भारत' मध्ये आले आहेत, किंबहुना त्यांनीच त्यांना आणले आहे, हे सहकाऱ्यांच्या मनावर बेमालुमपणे बिंबवण्याची संधी भाऊसाहेबांनी कधीही सोडली नाही. पुढे आणिबाणीच्या काळात व नंतर कार्यकारी संपादक आणि संपादक झाल्यानंतर मामासाहेब घुमरे यांनी मागोंना निष्ठापूर्वक दिलेले सहकार्य लक्षात घेतले तर त्यातून मामासाहेबांचा मोठेपणा तर प्रकट होतोच पण त्याबरोबर भाऊसाहेबांची निवड किती यथार्थ होती याचा प्रत्यय येतो.

संपादकाचा जनसंपर्क कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भाऊसाहेबांचा जनसंपर्क अर्थातच पुढाऱ्यांचा जनसंपर्क व संपादकांचा जनसंपर्क यात गुणात्मक फरक आहे. पुढाऱ्यांचा जनसंपर्क सरळ लोकांशीच असतो. पण संपादकांचा जनसंपर्क लोकांच्या प्रतिनिधींशी असतो, असावा लागतो. हे प्रतिनिधी लोकांनी निवडलेले असावेत. आमदार, खासदार मंत्रीच असले पाहिजेत असे नाही. समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांतील विविध गटांचे ते अघोषित प्रतिनिधी असले पाहिजेत. मग ते राजकारणातील असोत, साहित्यातील असोत, समाजकारणातील असोत की सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील असोत या सर्वांशी संपर्क ठेवण्याचा संपादकाला त्याच्या कामाच्या दृष्टीने लाभ असतो. कारण त्याला त्या त्या क्षेत्रातील फर्स्ट हँड माहिती त्यांच्या

माध्यमातून मिळत असते आणि या मंडळींसाठी तर संपादकांशी असलेला संपर्क हा अभिमानाचा विषय असतो. या गोतावळ्यात यशवंतराव चव्हाण, बापूजी अणे यांच्यापासून तर दादासाहेब कन्नमवार, बाळासाहेब तिरपुडे, बॅ. वानखेडे, नरेंद्र तिडके यांच्यापर्यंतचे राजकारणी जसे होते तसेच पु. ब. काळ्यांपासून तर बाबूराव धनवटें पर्यंतचे उद्योगपतीही होते. सुमतीदेवी धनवटें पासून तर पुरुषोत्तम दारव्हेकरापर्यंतची सांस्कृतिक क्षेत्रातील मंडळींही भाऊसाहेबांशी असलेल्या संपर्काचा अभिमान जपण्यात धन्यता मानीत होती. 'ग्रेस' या नावाने प्रसिद्ध असलेले विख्यात साहित्यिक प्रा. माणिक गोडघाटे किंवा डॉ. सुनील सुभेदार काय, राज्यशास्त्राचे संशोधक डॉ. एन. आर. देशपांडे वा डॉ. गो. मा. कुलकर्णी काय, अर्थतज्ज्ञ म्हणून ख्याती पावलेले डॉ. म. अ. चान्सरकर वा डॉ. श्री. आ. देशपांडे काय किंवा बाबूराव देशमुख काय, ही सर्व भाऊसाहेबांचीच माणसे. या माणसांची नुसती यादी करतो म्हटले तरी अजून एक स्वतंत्र लेख तयार होईल व तरीही अनेकांना आपले नाव का सुटले याचा विषाद वाटेल.

भाऊसाहेबांचा जनसंपर्क एवढा दांडगा, एवढा असला तरी त्याचा त्यांनी व्यक्तिगत लाभासाठी कधीही उपयोग करुन घेतला नाही. कारण त्यांनी पत्रकारितेचे व्रत सतीचे वाण समजून स्वीकारले होते. त्याबद्दलची त्यांची दृष्टी सूर्यप्रकाशाएवढी स्वच्छ होती. साप्ताहिक वा अन्य लाभाच्या दृष्टीने त्यांनी पत्रकारिता वा लेखनाकडे कधीच पाहिले नाही. वास्तविक भाऊसाहेबांचे कर्तृत्व लक्षात घेता पदम्भूषण किंवा पद्मविभूषण यासारख्या पदव्या देऊन त्यांचा गौरव व्हायला हवा होता. परंतु तरुण भारतचे संपादकत्व त्या आड आले असावे. भाऊसाहेबांनी मात्र त्यावर कधीही विषाद व्यक्त केला नाही. कारण पत्रकारितेकडे पाहण्याची त्यांची दृष्टी वेगळी होती. त्यासंदर्भात ते म्हणत असत, 'पैशाच्या दृष्टीने वाङ्मय व्यवसायाचा गेल्या आठदहा वर्षांचा माझा अनुभव असा आहे की, लेखक होण्यापेक्षा न्हाव्याचा, धोब्याचा, खानावळवाल्याचा किंवा इतर कोणताही धंदा माणसाने करावा, पण स्वतः च्या महत्वाविषयी भलत्याच कल्पना डोक्यात उत्पन्न करणारा हा प्रतिष्ठीत वांझोटा धंदा मात्र मुळीच करु नये'.

खरे तर हा भाऊसाहेबांचा विनय आहे. कारण त्यांनी संपादक म्हणून त्यांना मिळत असलेल्या वेतनावरच आणि लेखक म्हणून मिळणाऱ्या मानधनावरच आपल्या संसाराचा गाडा चालविला. १९२३ मध्ये ४० रुपये मासिक वेतनापासून त्यांचा पत्रकारितेत प्रवेश झाला. महाराष्ट्रात उपसंपादक असताना त्यांना ६० रुपये व कार्यकारी संपादक असताना ९५ रुपये मिळत. 'तरुण भारत' मध्ये १९४४ साली संपादक झाले तेव्हा त्यांचा पगार १०० रुपये होता व निवृत्तीच्या वेळी तो एक हजारापेक्षा अधिक नसावा. पण भाऊसाहेबांना या संपूर्ण परिस्थितीची जाणीव असूनही त्यांनी पत्रकारिता हेच आपले जीवित कार्य मानले. याबद्दल ते म्हणतात, 'लेखनाचा धंदा भिकार असला तरी त्या धंद्यात पडल्याने पराक्रम गाजविण्याची, स्वतः च्या बुद्धीची चमक दाखवून वाचकांच्या मनावर परिणाम करण्याची, स्वतःला प्रिय असलेल्या कल्पना आपल्या घणाघाती लेखन-शैलीने लोकांच्या बुद्धीवर सतत ठसविण्याची संधी मिळते"

भाऊसाहेबांच्या पत्रकारितेचा विचार करताना सामान्यतः तरुण भारतच्या संदर्भातच तो केला जातो. तसे ते स्वाभाविकही आहे. १९४४ ते १९७६ या बत्तीस वर्षांच्या काळात तरुण भारतचे मुख्य संपादक आणि ज्येष्ठ संपादक या नात्याने त्यांनी धुरा सांभाळल्याने त्यांच्या शिवाय तरुण भारतचा व तरुण भारतशिवाय त्यांचा विचार होऊच शकत नाही. पण भाऊसाहेबांची पत्रकारिता तरुण भारतपुरती सीमितही ठेवता येणार नाही

किंवा मानता येणार नाही. कारण तिचा वेध घेण्यासाठी आपल्याला १९२१ पर्यंत मागे जावे लागेल. हा कदाचित एक योगायोग असेल पण भाऊसाहेबांच्या पत्रकारितेचा शुभारंभ लोकमान्य टिळकांच्या केसरीपासून झाला. अर्थात त्यावेळी लोकमान्य हयात नव्हते. तात्यासाहेब केळकर केसरीचे संपादक होते. आयर्लंड मधील सिनफेन चळवळीचा त्यावेळी बोलबाला होता. भारतातही स्वातंत्र्यलढा सुरुच होता. अशावेळी भाऊसाहेबांसारख्या पत्रकार होण्यासाठी उत्सुक असलेल्या तरुणाला त्या चळवळीवर लिहावेसे वाटले असेल तर ते स्वाभाविकच मानावे लागेल. त्यांनी ३-४ जानेवारी १९२१ रोजी रात्रभर जागून सिनफेन चळवळीवर एक लेख लिहिला व ५ तारखेला केसरी कडे पाठविला. सिनफेन चळवळीवर सातत्याने लिखाण करणारे तात्यासाहेब केळकर आपल्या लेखाला कसा न्याय देतात हे पाहण्याची उत्सुकता असतानाच त्या लेखाची पोच देखील न आल्याने भाऊसाहेब काहीसे निराश झाले होते. पण त्यांच्या लेखाचे व त्यानिमित्ताने त्यांच्या पत्रकारितेचेही भाग्य १८ जानेवारी १९२१ रोजी उजळले. कारण त्या दिवशीच्या केसरीमध्ये त्यांचा तो लेख प्रसिद्ध झाला होता. पुढे २५ जानेवारी व १ फेब्रुवारीच्या अंकात त्या लेखमालेचे उर्वरित दोन भाग प्रसिद्ध झाले. या पहिल्यावहिल्या प्रसिद्धीने भाऊसाहेबांना एवढा हुरुप आला की, त्यानंतर मागे पाहण्याची वेळच त्यांच्यावर आली नाही.

१९२२ मध्ये भाऊसाहेब पुणे येथे सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटीज मध्ये दाखल झाले. तेव्हापासून त्यांच्या पत्रकारितेचा रीतसर प्रारंभ झाला. हाही एक आगळावेगळा योगायोग आहे कीं, मराठी पत्रसृष्टीला ललामभूत ठरलेल्या भाऊसाहेबांना 'सर्व्हंट ऑफ इंडिया' या इंग्रजी साप्ताहिकात सर्वप्रथम पत्रकार म्हणून काम करावे लागले. श्री. ग. वझे हे भाऊसाहेबांचे पहिले संपादक. त्यानंतर मार्च १९२३ ते जुलै १९२४ या काळात ते पुणे येथील प्रतिष्ठीत अशा ज्ञानप्रकाश पत्रात काव्यशास्त्रविनोद व परराष्ट्रीय धोरण या दोन विषयांचे संपादन करीत असत. ज्ञानप्रकाशचे सहसंपादक बापूसाहेब आंबेकर यांनी भाऊसाहेबांकडे या दोन विषयांवरील पुरवण्या काढण्याची जबाबदारी सोपविली होती व त्यांनी ती इतक्या समर्थपणे पार पाडली कीं, ते महाराष्ट्रातील दैनिकांच्या साहित्य पुरवण्यांचे आद्य प्रवर्तक ठरले. या पुरवण्यांच्या यशस्वी संपादनानंतर भाऊसाहेबांची 'ज्ञानप्रकाश' च्या संपादक मंडळावर नियुक्ती होणार होती. पण जणू काय नियतीला हे मान्य नव्हते. इकडे विदर्भातील 'महाराष्ट्र' त्यांची वाट पहात होता. १९२४ साली भाऊसाहेब नागपूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'महाराष्ट्रा' च्या माध्यमातून विदर्भाच्या पत्रकारितेत प्रविष्ट झाले आणि तेव्हापासून त्यांचे केवळ विदर्भातील पत्रकारितेशीच नव्हे तर येथील लोकजीवनाशी जे नाते जुळले ते त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत कायम राहिले. त्यांच्या स्मृतींचा तर विदर्भवासियांना केव्हाही विसर पडणे शक्य नाही.

भाऊसाहेबांच्या विदर्भातील पत्रकारितेचे दोनच खंड पडतात. एक 'महाराष्ट्र' खंड व दुसरा 'तरुण भारत' खंड. तरुण भारतने भाऊसाहेबांच्या पत्रकारितेत यशाचे माप भरभरुन टाकले असेल तर 'महाराष्ट्र' ने त्यांच्या विदर्भातील पत्रकारितेची भक्कम पायाभरणी केली. दादासाहेब ओगले यांच्यासारख्या ध्येयवादी व अतिशय निःस्पृह संपादकाच्या नेतृत्वाखाली त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. प्रथम महाराष्ट्राचे सहसंपादक म्हणून दादासाहेबांनी त्यांच्यावर जबाबदारी सोपविली. यावेळीही ते साहित्य विषयक सदर चालवित. १९३० पासून ते महाराष्ट्राचे कार्यकारी संपादक (ओगल्यांच्या शब्दात एडिटर इनचार्ज) झाले व १५ डिसेंबर १९४३ रोजी राजीनामा देईपर्यंत ते त्या पदावर कार्यरत होते.

अनुक्रमणिका

भाऊसाहेबांच्या महाराष्ट्रातील कारकीर्दीबाबत सुप्रसिद्ध पत्रकार श्री. रा. के. लेले म्हणतात ‘महाराष्ट्रातील वीस वर्षांच्या कारकीर्दीत माडखोलकरांनी साहित्याचे सदर चालवून महाराष्ट्रातील सर्व साहित्यिक विद्वानांचे लक्ष महाराष्ट्र पत्राकडे वेधून घेतले होते. महाराष्ट्र केवळ विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या व विद्वानांच्या कुतुहलाचा विषय झाला. त्यामुळे पुण्या-मुंबईकडेही महाराष्ट्राचा प्रसार होण्यास सहाय्य झाले. वृत्तपत्र म्हणजे सामान्यतः राजकारणाची चर्चा व मतप्रचार अशी त्यावेळची स्थिती होती. पण वृत्तपत्रांच्या या ठराविक चौकटीत बदल करण्याची उपक्रमशीलता ओगले यांनी दाखविली. साहित्यचर्चेला स्वतंत्रपणे जागा देऊन त्या सदराला पद्धतशीर स्वरुप देण्याची योजकता त्यांनी प्रकट केली. अर्थात त्यात माडखोलकरांच्या कर्तृत्वाचा व साहित्यिक कीर्तीचा तसाच लेखणीचा गुण विशेष उपयुक्त ठरला.’ अर्थात भाऊसाहेब व दादासाहेब यांचे सर्व बाबतीत मतैक्य होते अशी स्थिती नव्हती. दादासाहेबांची वृत्ती सर्वांना सांभाळून घेण्याची होती तर परखडपणा हा भाऊसाहेबांच्या मनाचा स्थायीभाव होता. विद्वत्रत्नभाऊजी दप्तरी यांच्या धर्म रहस्य’ या ग्रंथावर भाऊसाहेबांनी केलेली टीका सहानुभूतीपूर्ण नव्हती असे दादासाहेबांचे मत होते. महाराष्ट्रात गाजलेल्या खानमालिनी विवाहावर भाऊसाहेबांनी दुसऱ्या एका पत्रात लेख लिहिणेही दादासाहेबांना आवडले नव्हते. त्या प्रश्नावर भाऊसाहेबांना काढून टाकण्याचा सल्लाही दादासाहेबांना देण्यात आला होता. पण त्यांनी तो मानला नाही.

महाराष्ट्रात असताना भाऊसाहेब त्या वृत्तपत्राच्या वाढीबाबत अतिशय सतर्क होते. त्यासाठी ते दादासाहेब ओगल्यांसारख्यांशीही विवाद करीत असत. महाराष्ट्रात सिनेमाचे पान सुरु करण्याची सूचना भाऊसाहेबांनी दादासाहेबांकडे केली. दादासाहेबांना ती मान्य होणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी ‘तुम्ही सिनेमाचे पान सुरु करणार असाल तर मग महाराष्ट्रात भविष्य कां देऊ नये’ असा प्रतिप्रश्न भाऊसाहेबांना विचारला. त्यावरुन बहुधा महाराष्ट्राच्या मर्यादा भाऊसाहेबांच्या लक्षात आल्या असतील व त्यांनी तो सोडण्याचा निर्णय घेतला असेल असा अंदाज करायला हरकत नसावी. अर्थात भाऊसाहेबांनी महाराष्ट्र त्या कारणासाठी सोडला नाही. महाराष्ट्राचे दैनिकात रुपांतर करावे अशी भाऊसाहेबांची इच्छा होती. त्यासाठी कष्ट करण्याची व आर्थिक तरतूद करण्याचीही भाऊसाहेबांची तयारी होती. पण दादासाहेबांनी ती मान्य केली नाही. दैनिकाचा संपादक होणे हे तर भाऊसाहेबांचे स्वप्नच होते. तरुण भारतच्या रुपाने त्यांना ती मिळत होती. तरुण भारतलाही भाऊसाहेबांसारख्या सिद्धहस्त संपादकाची गरज होतीच. त्यामुळे एक चांगला योग जुळून आला आणि विदर्भाच्या पत्रकारितेत आणि भाऊसाहेबांच्या जीवनात एका नवीन पर्वाचा उदय झाला. ते पर्व किती उज्वल ठरले हे नंतरच्या काळात भाऊसाहेबांनी सिद्ध करुन दाखविले.

तरुण भारतशी भाऊसाहेबांचा संबंध सतत ३२ वर्षे पर्यंत राहिल्याने त्या दोघांना परस्परांपासून वेगळे करणे कळीकाळालाही शक्य नाही. तरुण भारतचे संचालन प्रारंभी नरकेसरी स्मारक मंडळाने वा नंतर श्रीनरकेसरी स्मारक मंडळाने वा नंतर श्रीनरकेसरी प्रकाशन संस्था या पब्लिक लिमिटेड कंपनीने केले असले तरी त्याचे प्रतिपालक मात्र भाऊसाहेबच राहिले आहेत. तरुण भारतला त्यांनी अक्षरशः आपल्या मुलासारखे वाढविले. त्यांच्याकडे तरुण भारतची जबाबदारी अशा वेळी आली जेव्हा वैदर्भीय वाचकांना दैनिक वाचण्याची सवय नव्हती व त्यांना दैनिक वृत्तपत्र वाचायला मिळावे अशी व्यवस्थाही नव्हती. वाचकांपर्यंत लवकरात लवकर अंक पोचविणारी दळणवळणाची साधने नव्हती. छपाईच्या साधनांचाही अभावच होता. वर्तमानपत्रांपर्यंत ताज्या बातम्या पोचविणाऱ्या वृत्तसंस्थाही नव्हत्या. शिवाय लोकजीवनही संथ होते.

अनुक्रमणिका

त्यावेळेपर्यंत भाऊसाहेबांजवळ दैनिक वृत्तपत्र चालविण्याचा अनुभवही नव्हता. त्यांचे एकमेव भांडवल म्हणजे त्यांची लेखणी व जिद्द. त्या बळावर त्यांनी तरुण भारत जगवला, वाढविला आणि त्याला लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन बसविले. वर्तमानपत्र हे नावाप्रमाणेच बातम्यांच्या बळावर चालत असते. पण संपादकाच्या नावावर आणि त्याच्या अग्रलेखाच्या बळावरही ते चालू शकते नव्हे यशस्वी होऊ शकते हे सिद्ध करुन भाऊसाहेबांनी वृत्तपत्रसृष्टीत एक विक्रम प्रस्थापित केला आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरु नये.

भाऊसाहेबांच्या अग्रलेखांबाबत दोन दोन टोकांची मते लक्षात घेतली तर त्यांच्या अग्रलेखांचे सामर्थ्य स्पष्ट झाल्याशिवाय राहात नाही. तरुण भारतचे पहिले व्यवस्थापक श्री. माधवराव दातार त्यांना म्हणाले होते की, 'भाऊसाहेब, आता ती तुमची निबंधातील आणि कादंबरीतील भाषा काही दैनिकात चालायची नाही हं. तुम्ही अगदी सोप्या भाषेत, छोटे अग्रलेख लिहीत जा आणि त्यात विनोदही येऊ देत अधुनमधून. नाही तर आपला तरुण भारत लोकप्रिय होणे कठीण बरं!' भाऊसाहेबांनी त्यावर काय प्रतिक्रिया व्यक्त केली ते काळालाच ठाऊक, पण त्यांनी जे अग्रलेख लिहिले त्यात रसाळ, संस्कृतप्रचुर भाषाही होती आणि साधी भाषाही होती. त्यांची लांबी अर्ध्या कॉलमाची होती आणि सहा कॉलमांचीही होती. पण भाऊसाहेबांचे अग्रलेख वाचकांना वाचावेसे वाटत नाहीत असे कधीही घडले नाही. उलट त्यांच्या अग्रलेखांवर वाचकांच्या उड्या पडत असत. असेही म्हटले जाई की, मृत्युलेख लिहावेत तर ते भाऊसाहेबांनी. सुप्रसिद्ध साहित्यिक ना. सी. फडके तर म्हणत असत की, भाऊसाहेबांनी त्यांच्यावर मृत्युलेख लिहावा म्हणून त्यांना स्वतः ला भाऊसाहेबांपूर्वी मृत्यू यावा. नियतीने त्यांची ती इच्छा पूर्ण केली नाही. त्यांच्यापूर्वीच भाऊसाहेब परलोकवासी झाले हा भाग वेगळा.

दैनिक तरुण भारतची जबाबदारी आपण का स्वीकारली याबाबत खुलासा करताना भाऊसाहेब म्हणतात, 'वृत्त व्यवसायात वीस वर्षे घालविल्यानंतर स्वतः च्या विचाराचा अनिर्बंध प्रसार करण्याची अनायासाने चालून आलेली संधी वाया दवडणे मला अनिष्ट वाटले. म्हणून स्वतःच्या प्रकृतीवर किंवा परिस्थितीवर दैनिकाच्या धबडग्याचा परिणाम काय होईल याची पर्वा न करता तरुण भारतच्या संपादनाची जबाबदारी मी आनंदाने शिरावर घेतली.'

भाऊसाहेबांच्या कारकीर्दीतील तरुण भारतचा इतिहास येथे पुन्हा उदधृत करण्याचे कारण नाही. पण तरुण भारतशी असलेल्या त्यांच्या संबंधातील वैशिष्ट्यांकडे लक्ष वेधणे मात्र क्रमप्राप्त आहे. भाऊसाहेब तसे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसले व सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात ते स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते हे वेगळे सांगण्याची गरजच नाही. भाषावार प्रांतरचनेचे ते समर्थक होते हे संयुक्त महाराष्ट्रासाठी त्यांनी केलेल्या प्रदीर्घ प्रयत्नांवरुन स्पष्ट होते. आर्थिक बाबतीत ते काहीसे डाव्या विचारसरणीचे होते हे त्यांनी कधी लपवून ठेवले नसले तरी ते पोथीनिष्ठ डावेही नव्हते. त्या अर्थाने ते कडवे हिंदुत्वनिष्ठ नव्हते पण राष्ट्रवादी निश्चितच होते. स्वातंत्र्यवीर सावरकर व मानवेंद्रनाथ रॉय यांच्या बुद्धिवादाचे बेमालूम मिश्रण त्यांच्या व्यक्तित्वात होते. सामाजिकदृष्टया ते स्वतः उच्चवर्णीय असले तरी त्या वर्णातील कर्मठतेचा स्पर्शही त्यांनी स्वतः ला होऊ दिला नाही. उलट दलित समाजाचे कैवारी म्हणूनच ते प्रसिद्ध होते. कितीतरी दलित तरुणांवर त्यांनी पुत्रवत प्रेम केले होते. दत्ताचक्रे, भास्कर नंदनवार यांच्यासारख्या अनेक तरुणांना तर त्या काळात त्यांचे मानसपुत्र मानले जाई. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था तर

त्यांनी केलीच शिवाय त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळतील, अनुरुप मुलींशी त्यांचे विवाह होतील याची काळजीही ते घेत असत.

भाऊसाहेब प्रगतीशील विचाराचे असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्वोच्च अधिकारी अध्यक्षपदी असलेल्या संस्थेच्या वृत्तपत्राचे संपादक म्हणून ते कसे काय काम करु शकले असा प्रश्न अनेकांना पडत असे. काही मंडळी तर या संबंधाना विसंगतीही मानत असत. पण या मंडळींना खरे भाऊसाहेब समजलेच नाहीत असे म्हणावे लागेल. वस्तुतः सर्वार्थांनी ते सच्चे लोकशाहीनिष्ठ होते. 'वुई ॲग्री टू डिफर' हे जर खऱ्या लोकशाहीवाद्याचे लक्षण मानते तर भाऊसाहेब तर लोकशाहीवादी ठरतातच पण रा. स्व. संघाचे ते नेतेही (स्व. भैयाजी दाणी, स्व. बाळासाहेब देवरस) लोकशाहीवादी ठरतात. संघाचे संस्थापक स्व.डॉ. हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक स्व. श्रीगुरुजी यांच्याशीही भाऊसाहेबांचे केवळ जिव्हाळयाचेच नव्हे तर आदराचे संबंध होते. दोन्ही बाजूंनी शेवटपर्यंत पथ्य एवढेच पाळले की, परस्परांच्या अपरिहार्यता समजून घेऊन वागायचे. काही लोक म्हणतात कीं, संघाच्या नेत्यांनी भाऊसाहेबांकडून तरुण भारतात संघाविरुद्ध न लिहिण्याचे वचन घेतले असेल. पण असे मानणे म्हणजे त्या थोर पुरुषांना न समजणेच होय. एकप्रकारे तो त्यांचा अवमानही ठरु शकतो. संघाच्या नेत्यांनी भाऊसाहेबांसारख्यां कडून वचन घेणेच शक्य नाही. आणि कुणाच्या बंधनात राहून काम करणे भाऊसाहेबांच्या स्वभावातच नव्हते. त्यांनी तसे कोणतेही वचन दिलेच नसते.

भाऊसाहेबांच्या पत्रकारितेत सुखदुःखाचे अनेक प्रसंग आले पण त्यांना त्यांनी अतिशय स्थितप्रज्ञतेने तोंड दिले. सुखाच्या क्षणी हुरळून न जाता आणि दुःखामुळे डगमगून न जाता त्यांनी आपला बाणा कायम ठेवला. वस्तुतः भाऊसाहेब म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचे आद्यशिल्पकार. त्यांचे वर्णन माझे ज्येष्ठ पत्रकारमित्र श्री. केशवराव पोतदार यांनी यथार्थपणे केले आहे. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्राच्या मंगलकलशाचे धनी भाऊसाहेबांनाच म्हणता येईल. पण संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होताच, 'हे मराठी राज्य की मराठा राज्य?' असा मुद्दा उपस्थित करुन त्यांनी एक मोठा विवाद निर्माण केला. त्याबाबत त्यावेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना जाहीरपणे खुलासा करावा लागला. हाही एक विचित्र योगच म्हणावा लागेल की, कोकणात जन्मलेल्या, मुंबई - पुण्यात वाढलेल्या भाऊसाहेबांची कर्मभूमी विदर्भ होती. पण ते विदर्भवादी बनले नाहीत. उलट विदर्भात राहून काही मंडळींचा रोष पत्करुन त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचाच पुरस्कार केला व तो मिळविलाही. याचा अर्थ असा होत नाही की, विदर्भाबद्दल त्यांना आस्था नव्हती. उलट महाराष्ट्रात विदर्भाच्या हिताचे रक्षण करण्याची ग्वाही मागणारा 'अकोला करार', नागपूर करार' या ऐतिहासिक दस्तावेजांचे ते शिल्पकार होते. अकोला करारावर तर त्यांची स्वतःची देखील स्वाक्षरी होती. पुढे संयुक्त महाराष्ट्रात श्री. वसंतराव नाईक यांच्यासारखे वैदर्भीय मुख्यमंत्री असताना जेव्हा राज्यातील पहिले कृषी विद्यापीठ नगर जिल्ह्यात राहुरी येथे स्थापन करण्याचा निर्णय झाला तेव्हा ते विद्यापीठ विदर्भात स्थापन व्हावे यासाठी भाऊसाहेबांनी तरुण भारतची सारी शक्ती कृषी विद्यापीठाच्या आंदोलनाच्या मागे उभी केली विदर्भ विकासाचा मुद्दा जेव्हा जेव्हा उपस्थित झाला तेव्हा तेव्हा ते विदर्भाच्याच बाजूने उभे राहिले. त्या अर्थाने ते संयुक्त नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील विदर्भ विकासवादी होते असे म्हटले तर ते यथार्थ ठरावे.



**माडखोलकर - खांडेकर व अनंत काणेकर**

अनुक्रमणिका

गांधीहत्येनंतर झालेल्या तरुण भारतच्या वाताहतीला त्यांनी ज्या धैर्याने तोंड दिले ते तर केवळ अपूर्व आहे. त्यांचा वा तरुण भारतचा कोणताही दोष नसताना त्यांना लोकक्षोभाचे लक्ष्य बनावे लागले. संसाराची राखरांगोळी उघडया डोळयांनी पाहावी लागली. तरुण भारत पुन्हा सुरु होणे तर केवळ अशक्य वाटत होते. पण जेमतेम दोन दिवसात जुळवाजुळव करुन त्यांनी तो पुन्हा सुरु केला आणि झाल्या प्रकाराबद्दल कुठेही क्षोभ, कटुता न ठेवता' न मे भक्तः प्रणश्यति' या भावनेने लोकसेवेस सिध्द झाले. उदात्तता, उदात्तता जी म्हटली जाते ती यापेक्षा वेगळे असू शक्ते काय?

भाऊसाहेबांनी आपल्या पत्रकारितेतील अनेक सुखदुःखे लीलया पचविली. पण त्यांच्या अखेरच्या दिवसातकेवळ त्यांच्याच नव्हे तर भारतीय पत्रकारितेवर आलेले गंडांतर त्यांच्यासाठी अतिशय क्लेषदायक ठरले. वास्तविक सरकारी रोष सहन करणे त्यांच्या पत्रकारितेसाठी नवीन नव्हते. पण १९७५ मध्ये आणिबाणीच्या काळात स्वकीय सरकारने जेव्हा पत्रकारितेचा अक्षरशः गळा घोटला तेव्हा त्या प्रकाराने ते अतिशय व्यथित झाले. भाऊसाहेबांसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या पत्रकाराने केलेले लेखन जेव्हा पत्रकारितेतील अबकडही न समजणाऱ्या पोलिसी सेन्सॉर अधिकाऱ्याकडे पाठविण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांच्या अंतःकरणाला झालेल्या वेदना शब्दात व्यक्त करणे केवळ अशक्य आहे. त्यांच्या पत्रकारितेचा एवढा अपमान कधीही झाला नसेल. त्यामुळेच तो पचविणे त्यांच्यासारख्या स्थितप्रज्ञालाही कठीण गेले. भाऊसाहेबांच्या पत्रकारितेतील ही शोकांतिका मन विषण्ण करणारी आहे. तसा प्रसंग पत्रकारितेवर केव्हाही येउ नये अशी प्रार्थना ते स्वर्गातून मनोमन करीत असतील. स्वर्गस्थ देवता ती कशी पूर्ण करतात हे कळणे अशक्य आहे. पण भाऊसाहेबांची ती प्रार्थना त्यांची अपेक्षा समजून पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे मला नम्रपणे वाटते. भाऊसाहेबांच्या पवित्र स्मृतीला त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुनश्च अभिवादन.

## | चोखंदळ संपादक कै. भाऊसाहेब |

----------------------------------------------------------------------- वैकुंठ इंगळे

नागपूरला- नागपूर महाविद्यालयात आणि विधी महाविद्यालयात शिकत असताना माझे दै. “तरुण भारतात” - १९५० ते १९५५ च्या दरम्यान कै. श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या प्रोत्साहनाने अनेक लेख प्रसिद्ध झाले. कारण भाऊसाहेब हे स्वतंत्र विचारांचे, सहृदय व विचारवंत संपादक होते. १९४८ साली स्वतंत्र झालेल्या चीनच्या नवनिर्माण कार्यविषयक अनुवादित एक माझा लेखसुद्धा त्यांनी प्रकाशित करण्याचे धाडस दाखविले. त. भा. मध्ये भाई डांगे यांच्या एका विचारपूर्ण टिपणीवरुन मी एक विस्तृत “भूमिदान यज्ञ” च्या खंडनपर लेख लिहिला. त्यांतील काही मुलगामी विचारांना महत्व देऊन “भूमिदान यज्ञ,” काही विचारार्ह शंका” असे संपादकीय संस्करण करुन त्यांनी निर्भयपणे तो प्रकाशित केला. त्यावरुन त्यांचे मन खुले असल्याचे माझ्या प्रत्ययास आले. माझ्या विवाहोत्तर, सेवाग्रामला आम्ही पति पत्नी कै. मनोहरजी दिवाण यांचे भेटीकरीता आणि मार्गदर्शनाकरिता गेलो होतो. त्यांची एक मुलाखत मी प्रसिद्ध केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीविषयी कै. आदरणीय सुभाषबाबू बोस आणि १९४६ साली मुंबईच्या नाविकांनी केलेला उठाव - यांच्या योगदानाविषयी मी ठसठशीतपणे सादर उल्लेख केला असता आदरणीय श्री. मनोहरजी दिवाण यांनी या मुद्यासंबंधी मुत्सद्दी मौन स्वीकारणे पसंत केले होते. या बाबीचा त. भा. तील मुलाखतीतून मनोहरजी दिवाण यांच्यासंबंधीचा आदर कायम ठेवून - मी जो विवेचनात्मक उल्लेख केला तो भाऊसाहेबांना खूप आवडलेला होता. तत्संबंधी त्यांनी मला पत्र पाठवून माझा मुद्दा उचलून धरला. त्यावरुनहि त्यांचे मन किती खुले होते हे भक्कमपणे स्पष्ट होते. सखोल तपशीलासहितचा अंबर चरख्याच्या अनुपयुक्ततेसंबंधीच्या माझ्या लेखाला त्यांनी प्रसिद्धी दिली होती. चांगले विचार जगाच्या कोठल्याहि कोपऱ्यातून येऊ द्यात - त्यांचे स्वागत असो. या सूत्राला त्यांनी “तरुण भारताच्या” मर्यादेत समर्पकपणे कार्यन्वित केले होते. त्यावेळेला खरोखर तरुण भारत हा बॅ. अभ्यंकरांचा आहे अशी प्रचीति येत होती. ‘न मे कर्मफले स्पृहा’ या तरुण भारताच्या ब्रीदाला साजेसी कै. श्री. भाऊसाहेबांची निःस्पृह व निर्भिड लोकोत्तर भूमिका होती. या व्यतिरिक्त अनेक लेखांना स्थान देऊन - १९५६ ला त्यांनी काटोल- नरखेड तालुक्याकरिता माझी संमति घेऊन मला अखेरीला तरुण भारत करिता अधिकृत वार्ताहर नेमले. असे होते चोखंदळ, विवेकी आणि गुणग्राहक संपादक कै. श्री. भाऊसाहेब माडखोलकर. त्यांच्या जन्मशताब्दिनिमित्त प्रथम मी त्यांच्या स्मृतीला विनम्रपणे अभिवादन करतो.

**जिल्हा ग्रंथालय परिषदेच्या निमित्ताने काटोलला** –

भाऊसाहेबांना नागपूर जिल्हा ग्रंथालय परिषदेच्या निमित्ताने डॉ. रंगनाथन यांच्या जोडीने एक व्याख्याता म्हणून मी काटोलला नेले. त्या परिषदेत त्यांनी केलेले भाषण दुर्मिळ माहितीने परिपूर्ण व अत्यंत मोलाचे होते. सद्‌गुरुच्या बरोबरीने ग्रंथाला त्यांनी एकमेवाद्वितीय स्थान बहाल केले होते. संस्कृताच्या बरोबरच इंग्रजी लेखकांचे त्यांच्या मनाला किती वेड होते, हे त्यांनी या भाषणावरुन निर्विवादपणे सिद्ध केले.

अनुक्रमणिका

**व्यवहार शिष्टाचारपूर्ण - मार्गदर्शक मार्मिक** –

माझ्या घरी देखील ते आनंदाने आले; या आठवणीने माझे मन भरुन येते. बाळंतपणानंतर विश्रांतीचा कालखंड संपल्यानंतर देवीचे दर्शन घेतल्याशिवाय घरकामाला लागू नये, असा बहुमोली सल्ला त्यांनी माझ्या पत्नीला दिला. आम्ही किसान कुटुंबातील असून सुद्धा निरोप घेतेवेळी माझ्या वृद्ध मातोश्रीला त्यांनी सादर नमस्कार केलां. एका 'विशेषनामानंतर वगैरे' असा उल्लेख करु नये असे त्यांनी मला समजावून सांगितले. देवेंद्र वगैरे असे नाही. तर देवेंद्र, वीरेंद्र वगैरे. विशेषनाम जसेच्या तसे पूर्णतः उच्चारावे. त्याचे छोटे रुप करुन कधीहि हाक मारु नये असे त्यांनी स्पष्ट केले. देवू! धीरु! हे बरोबर नव्हे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. असे होते हे भाषा प्रभू माडखोलकर.

त्यावेळेस मी त्यांना रिक्षाने घरी घेऊन गेलो. रिक्षानेच परत रेस्ट हाऊसला पोचवून दिले. यावरचे त्यांचे काय भाष्य होते ते बघा. ते म्हणाले, "वैकुंठ! तू एकदम सरळ, अंतर्बाह्य प्रामाणिक वार्ताहर आहेस. अहंभाव, डावपेच, कौटिल्य यापासून तू दूर आहेस. तुझ्या जागी माझा..... हा वार्ताहर असता तर त्याले उलट सुलट दबावात्मक लिखाण एस. डी. ओ. विरुद्ध करुन त्यांची गाडी माझ्याकरिता आणण्यासाठी त्यांना बाध्य केले असते." आजहि त्यांनी माझ्या संबंधी काढलेल्या उद्‌गारांची आठवण झाली म्हणजे माझे मन प्रेमातिशयाने भरुन येते. "वैकुंठ इंगळे - हा माझा असा वार्ताहर आहे की त्याने पाठविलेले वृत्त कानामात्रा वेलांटीचीहि फरक न करता बेलाशकपणे छापावे." असे ते म्हणत. सगळ्याच वार्ताहरांच्या बाबतीत असे म्हणता येत नाही, असे ते म्हणाले. चांगुलपणाचे कौतुक ते निःशंकपणाने करीत. वागणूकीतील कमी-अधिकपणा त्यांना मुळीहि आवडत नसे. ग्रामीण वार्ताहराचे मासिक वेतन रु. पांच आणि रु. १०, किंवा पंधरा होते. त्या काळातील या आठवणी आहेत. आम्हास लेखन करावयाचे असे त्यांना कौतुक करुन प्रकाशित करावयाचे असे, असा तो काळ होता.

**वार्ताहरांना भक्कम संरक्षणाचा तो काळ होता** –

काटोलला त्याकाळात प्रथम नगरपरिषदेच्या पहिल्या नळ योजनेचे उद्‌घाटन काटोलच्या एका स्त्री कार्यर्क्तीने केले. पण तत्कालीन नगराध्यक्षांनी त्यावेळेच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्त नळयोजनेचे पुनरुद्‌घाटन ठरविले. कारण नळयोजनेतील अनियमित व्यवहारांची, नियम भंगाची व सार्वजनिक फंडाच्या अफरांतफरीची चौकशी एका सर्वपक्षीय नागरिक समितीने मागितली होती. त्यावेळेच्या कलेक्टरांनी दखल घेऊन प्राथमिक स्वरुपाची चौकशी केली. परिणाम स्वरुप काटोल नगरपरिषदेचे लॉगबुक जप्त केले होते. कलेक्टरांच्या चौकशीला प्रभावित व निष्क्रिय करण्याकरिता कदोचित मुख्यमंत्र्यांना नळयोजनेचे हे पुनरुद्‌घाटन कशाकरिता? हे काळजीपूर्वक व संयमाने लिहिलेले आणि भ्रष्टाचाराच्या काही स्पष्ट तपशीलाचा उल्लेख करणारे बातमीपत्र उद्‌घाटनाच्या एक दिवस अगोदर मी तरुण भारतांतून प्रसिद्ध केले. उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण मलाहि होते. मी काँग्रेसचा कार्यकर्ता देखील होतो. पण विचाराने मी डावा व सद्‌सद्‌विवेकबुध्दीला प्रमाण मानून कार्य करणारा सार्वजनिक कार्यकर्ता होतो. स्वागत समारंभात मी माननीय मुख्यमंत्र्यांना हार घालून म्हणालो की, माझी माननीय मुख्यमंत्र्यांना अशी हार्दिक व कळकळीची विनंती आहे की त्यांनी काटोलच्या नागरिकांच्या तक्रारीनुसार नळयोजनेची चौकशी करुन सार्वजनिक फंडाचे रक्षण करण्यास

सहाय्यभूत व्हावे. टॉकीजमध्ये उपस्थित व बाहेरील नागरिकांनी टाळ्या वाजवून माझ्या विनंतीचे स्वागत केले. या गोष्टीकडे खेळाडूपणाने मुख्यमंत्री बघतील व चौकशीचे आश्वासन देतील, अशी अपेक्षा लोकांनी व मी देखील केली. दुदैवाने तसे झाले नाही. उलट माला कॉंग्रेस सोडण्याचे सूचविले गेले.

कार्यक्रमानंतर नगराध्यक्षांच्या घरी जाऊन त्यांच्याकडून माझ्या विरुद्ध लेखी तक्रारही करण्यात आली. तीन वर्षेपर्यंत तक्रारही करण्यात आली. चौकशी अधिकाऱ्याकडून मानसिक छल करण्यात आला. पण मी डगमगलो नाही. मार्क्स, गांधी, लोहिया यांच्या शुद्ध संस्कारांनी माझे मन घडलेले होते. माझ्या चौकशीच्या कट कारस्थाना विरुद्ध काटोलला जाहीर सभेत एका सभेत श्री. बच्छाराजजी व्यास यांनी आवाज उठवला. माझ्या बचावाची भाषणे काटोलच्या रिपब्लिकन पक्षाने केली. शासकीय पत्र कै. श्री. भाऊसाहेब माडखोलकरांना केले गेले. आपला इंगळे या आडनावाचा कोणी वार्ताहर आहे काय? अशी लेखी पृच्छा भाऊसाहेब माडखोलकर यांना केली गेली.

त्यावेळेस माडखोलकरांनी मला संरक्षण दिले. श्रीमान भाऊसाहेब माडखोलकरांनी तरुण भारताच्या सर्व सहसंपादाकाच्या नावाने एक पत्र प्रस्तृत केले. श्री. वैकुंठ इंगळे नावाचे त. भा. चे या नावाचे कोणीहि वार्ताहर नाहीत. असे त्यांना सूचवून ठेवले व तसेच कळविले. मी दिलेल्या माहितीवरुन कै. अत्रे यांनी विधानसभेत आणि कै. श्री.रामजीवनजी चौधरी यांनी विधानपरिषदेत प्रश्न विचारुन सरकारला नमविलेच आचार्य आपल्या वार्ताहरांच्या सद्सद्विवेकबुद्धीवर आधारित निर्भिड व लोकहितार्थ लेखनाला संरक्षण देण्याची व आपल्या वार्ताहरांच्या बचावाची अशी ही माडखोलकरांची अद्वितीय, निर्भय व न्यायप्रिय सिंहझेप होती. एक ना दोन अशा किती आठवणी कै. भाऊसाहेबांच्या सांगावयाच्या? बहुजन समाजातील लेखकांना प्रोत्साहन देण्याचे ब्रीदच भाऊसाहेब माडखोलकरांनी स्वीकारले होते. जे सत्य असेल, ते बोलणार व न्याय्य दिसेल ते करणार. या आगरकरी बाण्याचे कै. श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे मूर्तिमंत प्रतीक होते.

**वार्ताहर लेखकांना बरोबरीच्या नात्याची वागणूक** -

मी मधून मधून संपादकीय कार्यालयातच विविध निमित्तांनी त्यांना भेटावयाचे. ते म्हणायचे ये बैस. काय सांगावयाचे ते पटकन सांगून टाका. बघ माझी दिनचर्या किती व्यग्र असते ती!”

“कधी म्हणायचे वैकुंठ! तू चहा घेशील? मी म्हणावयाचो, “नाही भाऊसाहेब.

“कां बरं?”

“आपण ज्या पद्धतीने विचारले त्या पद्धतीला नकार हेच उत्तर. ही सकारात्मक वैदर्भीय पद्धत आहे भाऊसाहेब” मी म्हणायची. “असं होय? बर मग घे चहा.” अशा खेळाडूपणाने भाऊसाहेब वागावयाचे. सार्वजनिक निरीक्षणाने म्हणा अथवा साम्यवादी परिसाच्या स्पर्शाने म्हणा - त्यांच्या ठिकाणी व्यक्तिगत अहंभाव मुळीहि राहिलेला नव्हता. बहुजन समाजातील लोकांबरोबर अधिकाधिक मिसळणे हा त्यांचा जीवनधर्म होऊन बसलेला असावयाचा.

**त. भा. अडचणी मांडण्याचे लक्षवेधक व्यासपीठ** –

त्यावेळेला वर्तमानपत्रात जागा भरपूर असायची. सध्या सारखे व्यापारीकरण, जाहिरातीकरण झालेले नसे. कधी कधी वार्ताहरांची बातमीपत्रे अग्रलेखाच्या लांबीपेक्षाहि मोठाली असतात. अवर्षण असो, अतिवर्षण असो, शेतकऱ्यांच्या अडचणी मोठाच्या बातमीपत्रातून ठळकपणे मांडल्या जायच्या. गावातल्या विस्ताराच्या अडचणीसंबंधी माझी आणि अनेकांची उत्पादित किसान मालाला अधिक भाव माळणारा खोचदार व माहितीपूर्ण बातमीपत्रे आवर्जून प्रसिद्ध होत असत. त्यांची सरकारी दरबारी प्रभावी दखल घेतली जावयाची. श्री. भाऊसाहेबांनी, लेखकांच्या, वार्ताहरांच्या भाषेची जडणघडण करावयाला फार मोठा हातभारलाजला. त्यांच्या अग्रलेखीय असामान्य शैलीचा तरुण भारतातील सगळ्याच लिखाणावर संस्कार घडलेला दिसून यावयाचा. श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. वामनराव गावंडे, श्रीवामनराव उर्फ दादासाहेब घोरपडे यांच्या पत्रपांडित्याचा तो विशेष स्वरुपाचा कालखंड होता. श्रीवैकुंठ इंगळे - काटोल मंडळ काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष असो की, श्री. पुंडलीकराव मेघे, वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष असो की श्री नामदेवराव दिवटे, सावनेर नगर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष असो की सार्वजनिक प्रश्नांशी बांधीलकी असलेला भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा सभासद असो, कोणालाहि वार्ताहर नेमण्याकरिता त्यांनी वर्ज्य मानले नाही. मराठीमध्ये पीएच.डी. प्राप्त केलेले वरुड चे डॉ. श्याम सोनारे हे देखील त्यांच्याच कालखंडात तरुण भारताचे वार्ताहर राहिलेले आहेत. असा होता भाऊसाहेबांचा सर्वसमावेशक कामासंबंधीचा धबडगा हव्यास.

१९५५ साली माझा विवाह वर्धेला झाला. आमच्या जातीत शापस्वरुप असलेला हुंडा व प्रवासखर्च न घेता. मी विवाह केलेला होता. माझ्या विवाहप्रसंगी मार्गदर्शन करुन आशीर्वाद द्यावयाला त्यावेळचे दुसरे एक पत्रपंडित कै. श्री. वामनरावजी घोरपडे संपादक दै. राष्ट्रदूत व श्रीरामपूर येथील माजी प्राचार्य श्री. वुईल्यम् स्टिवर्ट स्वतः उपस्थित होते. कै. डॉ. भाऊसाहेब कोलते व पत्रपंडित कै. भाऊसाहेब माडखोलकर काही कारणवश येऊ शकले नव्हते. पण श्री. भाऊसाहेब माडखोलकरांनी पत्र पाठवून क्षतिपूर्ति केली होती. सोबतचे त्यांचे तत्वज्ञ, सुधारकी मार्गदर्शन बघा.

नागपूर २४-४-१९५५

श्री. वैकुठराव इंगळे यास,

स. न. आपल्या विवाहासंबंधीचे आपले पत्र वाचून मला अतिशय आनंद झाला. या विवाहात जी ध्येयदृष्टी आचरणात आणण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. तिच्यामुळे या मंगल विधीस अधिक मंगल स्वरुप आलेले असून इतरांना तो आदर्श ठरणार आहे.

आपण आणि आपली वधू या उभयतांना उत्कृष्ट संसार सौख्य प्राप्त होवो. आणि सर्व शुभ प्रेरणांनी आपले प्रणयजीवन सुफलित होवो, असे मी मनःपूर्वक इच्छितो.

आपला
ग. त्र्यं.माडखोलकर

अनुक्रमणिका

कै. भाऊसाहेब माडखोलकर यांना राज्यसभेत नेमले असते तर त्यावेळच्या नेत्यांची प्रतिष्ठा शतपटीने वाढली असते. असो. ते व्हावयाचेच नव्हते हे खरे. भाऊंना आदरांजली पूर्वक प्रणाम.

⁂⁂⁂

## | शिवतत्वाची पत्रकारिता |

---------------------------------------------------------------------डॉ. कुमार शास्त्री

कै. गजानन त्र्यंबक उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने "तरुण भारत" साहित्य पुरवणीचा अतिथी संपादक या नात्याने गतवर्षभर भाऊसाहेबांचे समग्र साहित्य वाचायला मिळाले. २८ डिसेबंर १९९८ रोजी, कै. भाऊसाहेबांना अर्पण केलेला 'तरुण भारत' चा 'अभिवादन विशेषांक' तसेच वर्षभर बावन्न आठवडे भाऊसाहेबांचे 'आसमंत' पुरवणीतून प्रसिद्ध केलेले विविधांगी लेख, अग्रलेख, यातून भाऊसाहेबांचे व्यक्तिदर्शन, साहित्यदर्शन आणि पत्रकारिता यांचे मनोज्ञ पैलू कळत गेले अन् खूप काही शिकायला मिळाले याचे समाधान मनाला आनंद देऊन गेले.

खरोखरीच भाऊसाहेबांचे अष्टपैलू व्यक्मितत्व अतुलनीय आहे. एक सव्यसाची पत्रपंडित, व्युत्पन साहित्यिक, वाङ्मयविमर्षक, टीकाकार आणि कुशल संपादक या एकेका पैलूतून उत्क्रांत होत गेलेला भाऊसाहेबांचा जीवनालेख एक साहसवाद शिकवून जातो. तरुण भारतासाठी तर भाऊसाहेब अग्निदिव्यातील बावन्नकशी सोनं ठरलं. राखेतून 'राष्ट्रीय वृत्तपत्र' उभं करावं तसं, प्रतिकूलतेतून 'तरुण भारत' भाऊसाहेबांनी घडवलं अन् इथेच आमचे कंरद्वय भाऊसाहेबांना कृतानेक साष्टांग नमस्कार करुन जातात.

भाऊसाहेबांच्या विविधांगी व्युत्पन्न लेखन प्रकारात सातत्याने डोकावते ती त्यांची 'पत्रकारिता'! भाऊसाहेब केवळ पत्रकारिता जगले नाहीत, तर 'पत्रकारिता' जागवते झालेत. प्रभाकर पाध्येंनी याच अर्थाने त्यांच्या पत्रकारितेला 'परशुरामाची पत्रकारिता' अशी उपमा देली, तर नरहर कुरुंदकरांनी त्यांच्या पत्रकारितेचे गोत्र 'शिवतत्त्वाशी' जोडले आहे. एक मात्र खरे की, भाऊसाहेबांची पत्रकारिता ही आमच्या तरुण पिढीला, पथदर्शक आहे.

भाऊसाहेबांची पत्रकारिता पथदर्शक यासाठी वाटते. कारण आज नवशतकाच्या उंबरठ्यावर प्रसार माध्यमे अव्याहत प्रगती करताहेत. नवे तंत्र, नवे विषय, नवा दृष्टिकोन यात झपाट्याने बदल होताहेत. 'माहितीचा विस्कोट' हा नवा आशय म्हणजे पत्रकारिता, अशी नवी परिभाषाही रुढ झालेली आहे. पण केवळ माध्यमे, साधने अमर्याद वाढून माहितीचा प्रस्फोट घडविणे एवढेच पत्रकारितेचे उद्दिष्ट मानायचे काय? साधनांच्या अमर्याद झपाट्यात आम्ही पत्रकारितेची 'साध्ये' तर हरवून बसत नाही ना! पत्रकारितेची साधने अमर्याद वाढली अन् साधनांच्याच मृगजळामध्ये पत्रकारितेची 'मूल-तृष्णा' आम्ही शोधतोय्, अशी कस्तुरीमृगाची अवस्था, आज काहीशा भ्रांत पत्रकारितेला प्राप्त झालीय् असे दिसून येते. सत्ताकेंद्री अन् पैसाकेंद्री एवढीच मूल्ये जगणारी पत्रकारिता आज केवळ पत्रकारांना 'गेट कीपर' बनवतेय् अशा या भ्रांत अवस्थेत, भाऊसाहेबांनी जे पत्रकारितेचे धडे गिरविले ते आजच्या पत्रकारितेला केवळ पथदर्शक वा मार्गदर्शकच नव्हे, तर एक चिरंतन तत्त्वज्ञान शिकवून जातात.

पुष्कळदा वाटतं, भाऊसाहेब हे अत्युच्च कोटीतले साहित्यिक वा वाङ्मय विमर्षक, वा कादंबरीकार म्हणून स्वान्तसुखाय जगले नाहीत, हे एकप्रकारे आमच्या समाजासाठी उपकारकच ठरले. हे सर्व पर्याय जगत

असताना, पत्रकारितेचा जो ‘मूलपिंड’ त्यांनी जोपासला, प्रयत्नपूर्वक संवर्धित केला. त्यातून एकात्म, एकसंध समाजनिर्मितीसाठी लेखणी आणि वाणी त्यांनी झिजवली हेच भाऊसाहेबांचे कार्य अनन्यसाधारण ठरले.

भाऊसाहेबांची पत्रकारिता कशी विकसित झाली, हे बघणो याठिकाणी महत्त्वाचे ठरते. कारण, त्यांचा मूळ स्वभाव, पिंड हा तर ‘काव्यात्मकते’ चा होता, प्रतिभा अन् कल्पकता हे स्थायीभाव होते; ललित वाङ्मयातील - ‘लोकोत्तर चमत्कार प्राण’ हा प्रकार त्यांचेसाठी आकर्षण होता. शोकात्मकता अन् शोकात्मपर्यावसायी लेखन ही त्यांची उद्‌भुत शैली होती, म्हणूनच त्यांनी लिहिलेली ‘विलापिका’ अन् मृत्यू उपरांत ‘अग्रलेख’ गाजलेत. अगदी ॲरिस्टॉटल, शेक्सपियर, गटे, कामु, सार्त्र या अस्तित्ववाद्यांपासून ते ‘रैमण्ड’ पर्यंतच्या आधुनिक अस्तित्ववादी साहित्यिकांपर्यंतच्या पाश्चात्य साहित्याचा या नॉन- मॅट्रिक माणसाचा दांडगा अभ्यास होता, तर तिकडे पौर्वात्य साहित्यातील भरत ते जगन्नाथ, आपटे ते कोल्हटकर आणि मर्ढेकरांपर्यंत रमणीयता अन् सुखपर्यावसायी साहित्याचाही त्यांनी व्यापक परामर्श घेतलेला आढळतो. एक विचक्षण वाङ्मय विमर्षक म्हणूनही त्यांची लेखणी गाजली आहे. भाऊसाहेबांच्या लेखणीतला कादंबरीकार वाचकांच्या मनावर चाळीस वर्ष अधिराज्य करतो. तेही फडके आणि खांडेकर यांच्या समकालीन युगात! हे सर्व नमूद करण्याचा उद्देश एवढाच की भाऊसाहेब एक असाधारण साहित्यिक बनून, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त व्यक्तिमत्व होऊ शकले असते, पण ते त्यांनी पद्धतशीरपणे टाळले, असे दिसून येते. अर्थात स्वान्तसुखाय जगणे हा त्यांचा स्वभाव नव्हता हे एकमेव कारण यासाठी देता येणार नाही

भाऊसाहेब पद्धतशीरपणे ‘पत्रकारिते’ कडे का वळलेत अन् त्यात ते सफल कसे झालेत, हे अभ्यासिले तसेच ते जाणून घेतले, तरच भाऊसाहेबांच्या जीवनातील खरे ‘उद्दिष्ट’ कळू शकते. नव्हे ‘खरे’ भाऊसाहेब कळू शकतात, असे लक्षात येते.

विख्यात व्यवस्थापनतज्ज्ञ पीटर ड्रकर म्हणतो की, कोणतेही व्यक्तिमत्व मुळातून समजून घ्यायचे असेल, तर त्या व्यक्तिमत्त्वाचे अंतःप्रवाह शोधून त्यातील बीजसूत्रे जाणली पाहिजेत, तरच त्या व्यक्तिमत्त्वाच्या पाऊलखुणांचा विकास आम्हाला कळतो. याद्दष्टीने अभ्यासिले तर भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वात दोन बीजसूत्रे गवसतात. एक ‘काव्यात्मकता’ अन् दुसरा ‘राष्ट्रीयता’. हीच बीजसूत्रे पुढे ‘साहित्यिक’ अन् ‘पत्रकारिता’ या समांतर दिशेने समांतर रेषेत विकसित झालेली दिसतात. तसेच भाऊसाहेबांनी दोन जीवननिष्ठा पत्रकारितेत जोपासल्या.

१) ज्ञाननिष्ठा २) कर्मनिष्ठा. गीतेत सांगितल्याप्रमाणे ‘लोकेस्मिन द्विविधानिष्ठा’ त्यांनी जागविल्यात.

भाऊसाहेबांच्या पत्रकारितेतील विकासक्रमात स्वातंत्र्यपूर्व काळ अन् स्वातंत्र्योत्तर काळ असे स्पष्ट दोन कालखंड आणि कालानुसार झालेले बदल दिसून येतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळात अगदी कोवळ्या वयात भाऊसाहेब काव्यात्कमतेत शिरलेले असले तरी राष्ट्रीयता, देशभक्ती या भावनेने ते अधिक भारलेले आढळतात. लोकमान्य टिळक अन् न. चिं. केळकर यांच्या लेखणीने ते भारलेले आढळतात. आयर्लंडच्या स्वातंत्र्याची चळवळ त्यांना उद्दीपित करीत होती अन् ‘सिनेफेन’ वरील

अनुक्रमणिका

त्यांचा पहिला लेख केसरीतून झळकला. न. चिं. केळकरांच्या मार्गदर्शनाने ते पत्रकारितेकडे वळले. ज्ञानात भर घालणारी, विचारांना चालना देणारी आणि देशाभिमान उद्दीपित करणारी अशी एकही चळवळ नसेल की त्यात भाऊसाहेबांनी भाग घेतला नसेल. ज्ञानात भर घालणारी, विचारांना चालना देणारी, राष्ट्रीयता जागविणारीही विशेषणेच भाऊसाहेबांना पत्रकारितेकडे वळविती झाली, असे दिसते. विशेष असे की, तत्कालीन स्थितीत पैसा आणि प्रतिष्ठा मिळवून देणारे अनेक पर्याय भाऊसाहेबांच्या समोर असून सुध्दा, त्यांनी ध्येयवादी पत्रकारिता स्वीकारलेली दिसते.

पत्रकारिता हा ध्येयवाद स्वीकारल्यानंतर भाऊसाहेबांचा पुढील प्रवास हा साहसवादाचा दिसून येतो. रत्नागिरीतील हा तरुण मुंबई, पुणे करुन 'ज्ञानप्रकाश' कडून तो नागपूर येथे ओगलेंच्या 'महाराष्ट्र' वृत्तपत्रात येतो. 'महाराष्ट्र' या टिळक प्रधान विचारसरणीची जाज्वल्य देशाभिमानाची, जहाल लेखणी माडखोलकरांना प्रारंभी भावते. खुमासदार शैलीत, उपरोधिक लिहिणे ही त्यांची प्रारंभापासून शैली. सुरुवातीला ते जहाल टीका करीत, पण पुढे त्यांनी त्याला कलाटणी दिली. त्यांचे गुरु कोल्हटकर यांनी त्यांना 'नवयुग' च्या अंकातील लेलेशास्त्र्यांच्या लेखावरील अत्यंत कडक टीकेवरुन मार्गदर्शन केले होते. कोल्हटकरांनी त्यांना उपरोधिक विचारले होते, "गजाननराव, आपण आपली लेखणी वस्तऱ्यासारखी वापरणा, शस्त्रवैद्याच्या सुरीसारखी वापरणार की पराक्रमी पुरुषाच्या तलवारीसारखी वापरणार?" हा प्रश्न आपल्या सर्व आयुष्याचा आहे.

कोल्हटकरांचे हे उद्बोधनपर वाक्य भाऊसाहेबांच्या लेखणीसाठी, पत्रकारितेसाठी वळण बिंदू ठरले असावे. कारण इथून भाऊसाहेबांच्या लिखाणात सावधानता, सृजनता, सहिष्णुता वाढ़तच गेल्याचे दिसून येते.

भाऊसाहेब नागपुरात असताना 'महाराष्ट्र' या ओगलेंच्या वृत्तपत्रातून तरुण भारतात आले. अन् पुढचा सगळा इतिहास नागपुरकरांना ठाऊक आहे. प्रतिकूलतेतून त्यांनी फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून हे राष्ट्रीय वृत्तपत्र उभे केले! अर्थातच त्यामागे रा. स्व.संघाचे तृतीय सरसंघचालक कै. बाळासाहेब देवरस यांचे योगदानही फार मोठे होते. या काळात गांधीवाद, मार्क्सवाद, सुभाषवाद यांचा नेमका परामर्श भाऊसाहेबांनी सातत्याने घेतला. म. गांधींचे तत्त्वज्ञान हे अत्युच्च अन् उत्तम असले तरी त्यातील अव्यवहार्यता स्वातंत्र्यप्राप्तीसाठी योग्य नव्हती. अशी टीका करताना कधीही भाऊसाहेबांनी असहिष्णू टीका केलेली दिसून येत नाही, हे विशेष. 'ऑगस्टवाद' कसा निष्प्रभ झाला हे सांगून 'सुभाषवादा' वर भाऊसाहेबांनी लिहिलेली सात लेखांची प्रदीर्घ लेखमाला 'आयर्लंड' च्या इतिहासाची भाऊसाहेबांच्या मनावर ठसलेली प्रतिबिंबे उभी करतात!

भाऊसाहेबांच्या तत्कालीन लेखात 'कालसन्मुखता' विशेषार्थाने होती, म्हणूनच त्यांच्या लेखात नित्यनूतनता जिवंत दिसायची. कालाप्रमाणे नवीन विषयावर लिहिताना तो विषय वाचकांसाठी रमणीय, खुमासदार कसा करता येईल, या दृष्टीने भाषाशैलीत भाऊसाहेब 'कलासन्मुखता' जोपासायचे, तर संपूर्ण लेखन हे लोकप्रबोधनसाठी 'लोकसंमुखता' जोपासणारे होते. लोकांना जे अभिप्रेत आहे, ती लोकांची बाजू मांडणारे हे लिखाण होते. अशाप्रकारे भाऊसाहेबांनी पत्रकारितेत कालसन्मुखता, आणि लोकसन्मुखतेची नेमकी त्रिवेणी जोपासली, हे विशेष.

पत्रकारितेची ही त्रयी जोपासताना भाऊसाहेबांनी जोपासलेला साहसवाद तेवढाच प्रचोदक आहे. १९४२ च्या लढ्याचेवेळी भाऊसाहेबांनी जे नऊ लेख लिहिले त्यामुळे सरकारचे पित्त खवळले. तरुण भारताला टाळे लावण्याचे आदेश होते, पण भाऊसाहेब डगमगले नाहीत. पुढेगांधी- वधाने त्यांच्या कुटुंबीयांवर अन् तरुण भारतावर झालेला कुठाराघात तर भाऊसाहेबांच्या साहसवादाची परीक्षण होती! हाच साहसवाद चिमूर- आष्टी प्रकरणात भाऊसाहेबांनी दाखविला.

स्वातंत्र्योत्तर काळात हाच साहसवाद भाऊसाहेबांनी धीरोदात्तपणाने दाखविलेला आढळतो. संयुक्त महाराष्ट्राच्या वळवळीत मराठी भाषेचा त्रिभंगलेला महाराष्ट्र एकसंध करण्यासाठी भाऊसाहेबांनी लेखणी आणि वाणी झिजविली, हे सर्वांना ठाऊक आहे. बेळगावच्या अ. भा. मराठी संमेलनातूनही संयुक्त महाराष्ट्राचा उद्घोष त्यांनी केला, पण त्याहून महत्त्वाचे होते ते तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांना परखड पृच्छा करणारा त्यांचा अग्रलेख ‘हे राज्य मराठ्यांचे की मराठीचे!’ महाराष्ट्र हा बहुजनांचा आहे, तळागाळातल्या मराठी मनांचा आहे. केवळ ब्राह्मण आणि क्षत्रियांचा नाही. ही भाऊसाहेबांची चिंतनिका त्यांच्या ‘महाराष्ट्राचे विचार धन’ या पुस्तकातून प्रकट झालेली आहे.

लोकशाही व्यवस्थेत, बहुजनांचे हित हे मूल्य त्यांनी लेखणीतून जोपासले. डॉ. आंबेडकरांची हाक, हा देहमानवतेसाठी राबला इ. अग्रलेख आणि डॉ. आंबेडकरांसोबतचा भाऊसाहेबांचा संवाद, तुकडोजींवरील त्यांचा अग्रलेख वाचल्यानंतर वाटतं की जणू भाऊसाहेबांनीच दलित साहित्याचे उषासूक्त लिहिले!

भारतीय साहित्यशास्त्रात साहित्याचे प्रयोजन दोन प्रकारे सांगितले अहे एक लोकोपदेश अन् दुसरे मनोविनोदन्. भाऊसाहेबांनी आपल्या लेखणीतून  हे दोन्ही प्रयोजन साधले. हेच प्रयोजन प्रायोगिकतेतून, कुशलसंपादकत्व करुन त्यांनी तरुण भारतातून दिले. वाचकांचे मनोगत, राजाबाई टॉवरवरुन, आंतरराष्ट्रीय घडामोडी, सोमवारचा आध्यात्मिक अग्रलेख, कामगार जगत, पुस्तक परीक्षण यासारखे नवे स्तंभ साकारुन, तरुण भारत उद्बोधक अन् त्याहून अधिक रोचक बनविले. वृत्तपत्र हे एखाद्या सुंदर वृक्षवेलींनी विविधांगी नटलेले, फुलांनी बहरलेले उद्यानाप्रमाणे असावे, ते वाचणाऱ्यांचे मन हिंदोळ्यावर हलावे, वैचारिक आनंदाने उन्मुक्त व्हावे, असा हा उपहार हवा - अशी भाऊसाहेबांची मनोधारणा होती. यासाठी वठलेल्या, झडलेल्या डहाळ्या छाटायला हव्यात, ही त्यांची कणखर भूमिका होती.

भाऊसाहेबांनी आपल्या पत्रकारितेतून राष्ट्राचे राष्ट्रीयत्व अन् समाजाचे एकत्व सदैव जोपासले. त्यांचे खालील विचार वेचे बघा. त्यातील दूरदर्शित्व खूप काही सांगून जाते. वाङ्मयाची जीवनमूल्ये सांगताना भाऊसाहेब म्हणतात –

विसावे शतक उजाडेपर्यंत आमचे डोळे काही उघडले नाहीत. किंबहुना, दोन जागतिक महायुध्दे होऊन गेली आणि भौतिकशक्तीच्या जोरावर भूलोकाप्रमाणे अंतराळावरही पाश्चात्यांनी आक्रमण केले, तरी सुद्धा आम्ही सावध झालेलो नाही. सत्य आणि अहिंसा, चरखा आणि खादी, रामराज्य आणि सर्वोदय यांच्या चाकोरीतच आम्ही आजही रखडतो आहोत. आजही जातपात शणि धर्मपंथ यांनी सगळे राजकारण आणि

अनुक्रमणिका

राज्यकारभार नासून टाकलेला आहे. अजूनही भारताला सार्वभौम राज्य आणि राष्ट्र म्हणून स्वतःचे व्यक्तित्व आणि अस्मिता यांचा साक्षात्कार झालेला आहे, असे वाटत नाही. मोक्षमूल्ये आणि सत्तामूल्ये यांच्या कचाट्यातून बाहेर पडून निखालस ऐहिक, भौतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचा जोपर्यंत आपण अवलंब करीत नाही, तोपर्यंत भारताला एकसंध सार्वभौम व्यक्तित्व आणि राष्ट्रत्व प्राप्त होणे अशक्य आहे. जी स्थिती भारताची, तीच महाराष्ट्राचीही!

मित्रहो, ही नवी मूल्ये जनतेपुढे ठेवण्याची जबाबदारी समाजातल्या विचाराग्रणींवर आहे. म्हणूनच, पारमार्थिक आणि पारलौकिक जीवनमूल्यांमूळे, या देशात गेल्या हजार वर्षात झालेल्या अवनतीचा आढावा घेण्यात मी इतका वेळ खर्च केला. साहित्यिक म्हणजे समाजाची प्रज्ञा आणि प्रतिभा! श्रीसमर्थांनी म्हटलेच आहे की, 'कर्तृत्वच जितुके झाले! शारदागुणे ॥' आपल्या सर्वाच्या हृदयात असलेली ती शारदा जोपर्यंत कालसन्मुख आणि लोकसन्मुख होत नाही, वैषम्य आणि नैष्कर्म्य उत्पन्न करणाऱ्या जुनाट पारलौकिक आणि पारमार्थिक जीवनमूल्यांची कोंडी फोडून बाहेर पडत नाही व सार्वभौम राष्ट्रत्व आणि राज्यत्व यांची उत्कट जाणीव लोकात निर्माण करीत नाही, तोपर्यंत या देशाला आपल्या व्यक्तित्वाचा आणि अस्मितेचा साक्षात्कार होणो अशक्य आहे. तो साक्षात्कार होण्यासाठी अवश्य असलेले वाङ्मय तप करण्याची स्फूर्ती हे शारदेचे व्यासपीठ देशातील सर्व विचाराग्रणींना देवो, एवढीच शेवटी प्रार्थना!"

कोणत्याही देशाला व्यक्तित्व, अस्मिता आणि राष्ट्रत्व प्राप्त होण्यासाठी ज्या एकतेची आणि संहतीची चाड त्या देशातील सर्व थरांतल्या लोकात उत्कटतेने असावी लागते, ती चाड काही महाराष्ट्रातील लोकात तेराव्या शतकापर्यंत उदित झालेली नव्हती. या दुःस्थितीला हिंदू समाजरचनाच मुख्यतः कारण आहे, असे प्रांजळपणाने मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही. इतिहासाची साक्ष अशी आहे की, कोणत्याही देशातील लोकसमाज हा मूलतः कधी एकसंध नसतोच. कारण, त्या देशाची वसाहत चालू असताना, निरनिराळ्या वंशांच्या आणि संस्कृतींच्या लोकांची आयातसारखी होत राहते व मूळच्या आदिवासी लोकांना आणि शक्य तर आपल्या पूर्वी आलेल्या आगंतुकांनाही मागे रेटून किंवा जरुर तर त्यांचा निःपात करुन सुद्धा ते स्थायिक होतात. पण, वसाहत करण्याची ही क्रिया एकदा संपल्यावर, हे सगळे प्रतिस्पर्धी आक्रमक लोक, जेव्हा तो देश आपला समजून, त्याला नावारुपाला आणण्याच्या उद्योगाला लागतात, तेव्हा स्वतःच्या अभ्युदयासाठी त्यांना संघटित व्हावे लागते. या संघटनेच्या प्रयत्नातूनच नंतर त्या देशात एकात्म समाज, एकात्म राज्य आणि एकात्म राष्ट्र यांचा हळूहळू उदय होतो. अशा रीतीने त्या देशाला अखेर स्वतःचे विशिष्ट व्यक्तित्व, अस्मिता आणि राष्ट्रत्व प्राप्त होते.

वरील आशयाचे भाऊसाहेबांचे एकसंध समाजाचे सामाजिक भान, दूरदर्शित्व, त्यांची विचारशलाका ठरते नव्हे त्यांच्या पत्रकारितेचे वैचारिक देणे ठरते.

या सर्वाहून महत्त्वाचा पैलू म्हणजे भाऊसाहेबांचे पत्रकारिता जगणे. भाऊसाहेब तत्कालीन मध्यप्रांतांच्या सरकारच्या जवळचे होते. सत्तेचे राजकारण त्यांनी जवळून बघितले होते. त्यांना सत्तेतून प्रलोभने दाखविली गेली नसतील, असे कसे होईल. पण प्रलोभनांना जवळ न करता, पद, प्रतिष्ठा, पैसा यामागे न लागता लोकदेवतेसाठी त्यांनी लेखणी खर्च केली. अगदी साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद, हिंदुत्व सर्व

विचारधारा अन् त्यांच्या नेतेमंडळी समवेत जगून ते स्वयंप्रज्ञेने स्वतंत्र राहिले. साहित्यशास्त्रातील सर्व रसांचा रसानुभव लुटून अखेर शांतरसाकडे ते वळले. कारण शांततेतूनच सृजनत्व निर्माण होते. शिव तत्त्व निर्माण होते. शिव ही वैराग्याची, मृत्युचे तत्त्वज्ञान सांगणारी स्मशान देवता आहे. तसेच ती ज्ञान, कला अन् बहुजनांची लोकदेवता आहे. भाऊसाहेबांची पत्रकारिता ज्ञान, कला अन् बहुजनांसाठीच जगलेली पत्रकारिता नव्हती काय? नरहर कुरुंदकरांनी या पत्रकारितेचा धागा याच अर्थाने शिवतत्त्वाशी जोडला. सोप्या शब्दांत भाऊसाहेब हे शिवतत्त्वाची पत्रकारिता जगलेत, असेच म्हणावे लागेल!

अनुक्रमणिका

# | तरुण भारतातील धार्मिक अग्रलेख |

-------------------------------------------------------------श्रीमती सविता र.व्यवहारे

मराठी वृत्तपत्र सृष्टीत अग्रलेख लेखनाची उज्वल परंपरा आहे. सामान्यतः लोकमान्य टिळक, आगरकर यांच्यापासून सुरु झालेला हा अग्रलेख लेखानाचा प्रवाह अव्याहतपणे, अगदी आजच्या महाराष्ट्रातील प्रमुख संपादकांपर्यंत तेवढयाच प्रखरतेने, आपले तेजस्वीपण कायम राखून आहे.

वृत्तपत्र म्हणजे समाजाचे प्रतिबिंब. त्यातील अग्रलेख हा त्या वृत्तपत्राच्या मताचा ठसा समाजामध्ये घडण्याऱ्या चालू घडामोडींवर लिहिलेला निबंध म्हणजे ‘अग्रलेख’. म्हणूनच या समाजाच्या विचारांचा, समाजाच्या मतप्रवाहाचा विचार निर्भिडपणे त्यातून मांडल्या जातो.

अग्रलेख हा तसा एक वाङ्मय प्रकारच! त्यातील भाषासौष्ठव, प्रतिभाशक्ती व सम्यक्दृष्टी यामुळे तो अक्षरलेणे ठरतो. अशा प्रकारचे सिद्धहस्त लेखकाचे हातून उतरलेले अक्षरलेणे साहित्यप्रकाराच्या या दालनात संस्मरणीय स्थान टिकवून आहे. अग्रलेखाचे वाङ्मयीन मूल्य या दृष्टीने महत्वाचे आहे. अग्रलेख हा तत्कालिक लेखन प्रकार असला तरी त्यातील भाषाशैली व अलंकारिकता किंवा लेखकांच्या शैली गुणांमुळे त्यास वाङ्मयीन मूल्य लाभते. उत्तम अग्रलेख- लेखक आपल्या लेखनातील सामर्थ्यामुळे त्यास टिकाऊपण देतो.

ग. त्र्यं. माडखोलकरांचे अग्रलेख चर्चेचा विषय होते. कारण वृत्तपत्रातील अग्रलेख लेखन हे तसे जोखमीचे काम त्यात प्रतिष्ठा आहे. विचार वैभवाचा दिमाख आहे, पण तर्कशुद्ध बिनतोड युक्तिवादाचे महाकठीण आव्हानही आहे. अग्रलेख हा खरा तर निबंधापेक्षाही आगळा निठसठशीत व जिवंत वाङ्मयप्रकार त्यात काळानुसार जीवनतत्व आहे. वैचारिक निबंध व समीक्षात्मक लेखन हयांच्या सीमारेषेवर उभे राहून दोन्हीचे दोष टाळून त्यांच्या गुणांची उपासना करण्याचे सामर्थ्य अग्रलेखात असते.

पूर्वीच्या काळचे संपादक कधी वृत्तपत्रशास्त्राच्या अभ्यासक्रमात गेल्याचे दिसत नाही. परंतु परिश्रम व्यासंग आणि चिकाटीच्या जोरावर गतीमान यत्नातून कमविलेले बुद्धीवैभव हीच त्यांची खरी ज्ञानसमिधा होय. बुद्धिमत्तेमुळेच त्यांचा समाजमनावरील प्रभाव तितकाच तेजस्वी असतो. अग्रलेख ही विचारप्रवर्तक सामुग्री असते. त्यात समकालीन प्रश्नांचे अचूक शरसंधान साधण्याचे सामर्थ्य असते. संपादकाची स्वतंत्रवृत्ती ही प्रज्ञा, प्रतिभा आणि प्रगमनशीलतेची जोपासना करणारी असते.

अग्रलेख लिहिण्यास सामाजिक चळवळीचे डोळस अध्ययन असावे लागते, अग्रलेखातून वृत्तपत्राची “सामाजिक बंधिलकी” दृग्गोचर होते आणि सामाजिक बांधिलकीच अग्रलेखास विश्वासार्ह जबाबदार व उत्तरदायी बनविते. वाचन, मनन व चिंतनातून नवे तेजस्वी विचार जोपासणे हाच कुशल संपादकापुढील नित्याचा जीवनधर्म असतो. हा जीवनधर्म टिळक - आगरकर- परांजपे- कोल्हटकर- अत्रे - माडखोकर हयांनी सांभाळल्याचे दिसून येते. स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडणे त्या विचारांना खोटेपणाचा, फसवेगिरीचा आळ येवू न देता आपण एक “व्रतस्थ सत्यशोधक” आहे. ही जाणीव ठेवून लिखाण करणे व लेखनातील पावित्र्य जपणे ही उत्तम संपादकाची लक्षणे होत. ही सर्व लक्षणे भाऊसाहेब माडखोलकरांच्या ठिकाणी होती. तरुण भारताची

स्थापना दोन जानेवारी १९४४ साली झाली. दोन जानेवारी ४४ पूर्वी 'महाराष्ट्र दैनिकात माडखोलकरांनी संपादक म्हणून कार्य केले. १९४४ पासून तो त्यांच्या मृत्युपर्यंत तरुण भारतात ते सातत्याने लिहितच राहिले. जागतिक पातळीवरचे सर्व विषय त्यांनी हाताळलेले दिसतात. प्रस्तुत लेखात त्यांच्या केवळ धार्मिक अग्रलेखांचा विचार करावयाचा आहे. ते स्वतःला शैव म्हणवून घेत. शिवचिंतन म्हणजे विश्वातील सगळ्या मांगल्याचे, भव्यतेचे आणि रुद्रतेचे चिंतन लहानपणापासून वाणीची शुद्धता व संस्कृत साहित्याचे संस्कार अविरत घडत गेल्याने त्यांना लहानपणीच 'गजाननपंडित' ही पदवी देखील प्राप्त झाली. ते साहित्यिक असल्यामुळेच त्यांच्या वृत्तपत्रातील लेखाला सौंदर्य प्राप्त झाल्याचे दिसते. त्यांचे अंतर्मन आध्यात्मिक होते. जवळजवळ सर्वच धार्मिक ग्रंथाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. महाभारत तर अनेक वेळा वाचल्याचे शिवकथाकार विजयराव देशमुखांजवळ त्यांनी म्हटले आहे.

अग्रलेख लिहायला माडखोलकरांना एकांतवासाची गरज लागत नसे. कोणत्याही वेळी व कोणत्याही स्थळी ते लिहू शकत असत! तसेच एखाद्याला 'डिक्टेशन' देत असताना मध्येच जर कोणी भेटायला आले तर 'हं! मघा आपण काय लिहित होतो किंवा कोठवर आलो आहोत!" असा प्रश्न न करता थांबलेल्या वाक्याला संयुक्तिक अशा अर्थाचे नवीन वाक्य लिहावयास सांगत असत. एवढी त्यांची बुद्धी कुशाग्र व स्मरणशक्ती दांडगी होती. या जोरावरच त्यांनी वर्तमानपत्रात आपला एक वेगळा ठसा कायम ठेवला.

तरूण भारतातून माडखोलकर सोमवारी धार्मिक अग्रलेख लिहित. जर त्या लिहिण्यात खंड पडला तर लोकांची 'धार्मिक अग्रलेख सुरू करावा' अशी पत्रे येत. अशाच एका पत्राला उत्तर देताना माडखोलकर लिहितात

"धर्मचर्चेसाठी सोमवार ऐवजी इतर दिवस घेता येणार नाहीत. कारण 'सोमवार' हा दिवस महाराष्ट्रात पवित्र मानला जातो. लिहिणारा जरी 'अज्ञेयवादी' असला तरी अत्यंत धर्मशील आहे व त्यामुळे शिवाचा हा वार धार्मिक लेख लिहिण्यास योग्य वाटतो" संवादकीयात हे स्पष्टीकरण सोमवारच का!' असे शीर्षक देवून त्यांनी केले आहे. पुढं त्यांच्या अशा काही अग्रलेखाचा परिचय परामर्ष केला आहे.

**फक्त साधक**
**१८-४-१९५५**

सोमवारचा धार्मिक अग्रलेख वाचून वाचकाना संपादकाची भूमिका कधी संपादक नास्तिक, कधी अज्ञेयवादी,केव्हा संतकृपेसाठी तळमळणारा साधक केव्हाजीवनाचे कोडे उलगडून घेण्यासाठी धडपडणारा जिज्ञासू, तर केव्हा देवाच्या साक्षात्काराची ओढ लागलेला भाविक असावा, असा भास होत असे, केव्हा असे वाटे या संपादकाला अध्यात्माविषयीची गोडी असून त्याचे ज्ञानही त्याने संपादन केलेले आहे. त्याचे स्पष्टीकरण देताना ते लिहितात "प्रस्तुत लेखक हा अज्ञेयवादी आहे. कोणत्याही विशिष्ट धर्मप्रवर्तकावर किंवा धर्मग्रंथावर त्याची एकांतिक श्रद्धा नाही तरी भारतीय धर्म आणि संस्कृती यांच्याविषयी त्याला नितांत आदर व अभिमानआहे. एकमेकांचे अनुभव एकमेकांना मोकळ्या मनाने सांगून एकमेकांच्या सहविचाराने वाट काढणे; हीच सहकार्याची दिशा अध्यात्म आणि तत्त्व जिज्ञासा ह्या बाबतीत ग्राह्य आणि हितकारक होय.

आततायीपणाचा आग्रह न धरता जे ब्रह्मज्ञानी आहेत. जीवनमुक्त आहेत त्यांची सेवा परिप्रश्नांनी करावी आणि शक्य तर याच देही याच डोळा ज्ञानलाभ करून घ्यावा असा मात्र प्रयत्न सतत चालू आहे. या अर्थाने मी फक्त साधक आहे. शंकित आणि जिज्ञासू!'

## बुद्धी आणि श्रद्धा
## १८-४-१९५५

शैव असो, वैष्णव असो, शाक्त असो, गाणपत्य असो, वारकरी असो, की धारकरी असो, त्या सर्वांना शेवटी त्यांच्या त्यांच्या मार्गाने 'एक सत्' चा साक्षात्कार होतो, अशी हिंदू धर्माची श्रद्धा आहे. ह्या धर्मात बुद्धी स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य आणि उपासना स्वातंत्र्य आहे. भगवद्‌गीतेतील परमेश्वर हा ज्ञानविज्ञानमय आहे. श्रद्धामय नाही असे या अग्रलेखात सांगून शेवटी ते लिहितात, "श्रद्धा ही बुद्धीची अनुयायी असली पाहिजे. बुद्धीचे निर्णय अंमलात आणावयाला जे निष्ठेचे बळ लागते ते श्रद्धेने पुरविले पाहिजे, अशीच वेदांताची धारणा आहे. पुरूष हा श्रद्धामय आहे यात शंकाच नाही. पण केव्हा? तर तो बुद्धीयोगी झाल्यानंतर! म्हणूनच म्हणावयाचे की, श्रद्धा बुद्धीयुक्त नसेल, तर ती मानवी मन आणि जीवन यांच्या उन्नतीला सर्वथैव अपायकारक ठरते."

साधे, सोपे शीर्षक तर कधी संस्कृत शब्दाचा वापर करून त्यांनी अनेकदा अग्रलेख अलंकृत केले.

## वैशाखी
## ९-५-१९५५

हा वैशाख महिन्यात पौर्णिमेच्या दिवसावर लिहिलेला अग्रलेख. वैशाखाचे हिंदूधर्मातील महत्त्व सांगून पौर्णिमा हा दिवस व त्या दृष्टीने चंद्राचे मानवी मनो -जीवनावर आणि त्यातही काम प्रेरणावर असलेले वर्चस्व आधुनिक विज्ञानाने स्पष्ट केल्याचे सांगितले आहे. आध्यात्मिक आणि धार्मिक प्रवृत्तींशीही असलेला, संबंध विशद केला आहे. 'वैशाखी' खऱ्या अर्थाने हिमालयाच्या उत्तरभागात नेपाळच्या सीमेपासून 'लासा' ह्या राजधानीपासून ४०० मैल अंतरावर गौतम बुद्धाच्या साक्षात्कारी स्थळापर्यंत मनवल्या जाते. मनवणाऱ्या दिवसाचे व स्थळाचे सविस्तर वर्णन या अग्रलेखात केले आहे. ते करीत असतांना विज्ञान युगाशी सांगड घालण्याची त्यांची, बुद्धी विलक्षणच म्हटली पाहिजे.

## साक्षात्कार
## १६-५-१९५५

साक्षात्काराचे दोन प्रकार सांगून 'सगुण साक्षात्कार' सोपा आहे. परंतु 'आत्मसाक्षात्कार' मात्र बिकट आहे. असे प्रतिपादित करतांना ते लिहितांना आत्मसाक्षात्कार आणि इश्वरप्रणिधान यांचा खरोखरीच काही संबंध आहे का? निरिश्वरवादी आणि आज्ञेयवादी व्यक्तीलाही आत्मसाक्षात्कार का होऊ नये? अशा तऱ्हेचा प्रश्न वाचकांना विचारून त्यांना लिहिते करण्यास वा विचार करण्यास प्रवृत्त करतात.

अनुक्रमणिका



**दाजी पाणशीकर, श्री. आनंद साधले व उमाताईंसह भाऊराव**

अनुक्रमणिका

## श्रीकृष्ण
## ९-८-१९५५

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर लिहिलेल्या अग्रलेखात श्रीकृष्ण कोणकोणत्या बाबतीत श्रेष्ठ होता ते सांगितले आहे. तो स्त्रीयांशी समानतेने वागत असे. यावरून त्याला माडखोलकरांनी 'स्त्रीमित्र' म्हटले आहे. प्रभु रामचंद्राच्या चरित्राला वैयक्तिक प्रतिष्ठा असली, तरी सामाजिक आणि तार्किक अधिष्ठान नाही. परंतु अर्जुनाला तत्वोपदेश करून श्रीकृष्णाने आपल्या वैचित्र्यपूर्व अतिमानुष जीवनाचे रहस्यच जणू जगाला दाखविले. ते रहस्य समजावून घेतल्याने आणि आचरणात आणल्यानेच भारताची उन्नती होईल. टिळक, अरविंद घोष, राधाकृष्णन् ही मंडळी याच गोष्टीचे द्योतक होत. अशी भूमिका या अग्रलेखात आहे कोणताही लेख लिहिताना त्यांची समर्पक विचारी, विषयानुरुप लेखन करणारी दृष्टी स्पष्ट जाणवते.

## 'श्री गणपतीची स्तोत्र'
## २०-९-१९५५

अशा सारखे शीर्षक देऊन लेख लिहिताना त्यांनी यात गणपतीचे इतिहासकाळापासून तो आजच्या काळापर्यंत त्याचे जनसामान्यांवरील अधिराज्य व त्याची आराधना प्रार्थना करण्यासाठी स्तवनांची निर्मिती इत्यादी गोष्टी लिहिल्या या देवतेची उपासना धर्मजागृतीकरीता आणि ज्ञानप्रसाराकरीता करावी असा हितोपदेश सहजगत्या स्पष्ट केला.

## अवकृपारूप कृपा
## १७-२-१९५८

"परमेश्वर हा कृपारुप आहे की अवकृपारूप? या प्रश्नांचे उत्तर खरोखरी काय द्यावे? सृष्टीचा व्यवहार जर पाहिला तर वैषम्य आणि नैर्घृण्य हा मुळी तिचा कायदाच दिसतो. 'सर्व्हायकल ऑफ दि फिटेस्ट' हे पाश्चात्य तत्त्व घ्या किंवा 'जीवो जीवस्य जीवनं' हे भारतीय तत्त्व घ्या स्पर्धा आणि संहार यांच्या पायावरच जणू सृष्टी आणि संसार यांची उभारणी झालेली असल्याचा दारूण अनुभव पावलोपावली येतो. म्हणूनच साधुसंतांनी संसार हा दुःखमय मानलेला असून त्याचा त्याग करण्याचा आणि आनंदघन असा जो परमेश्वर त्याचे प्रणिधान करण्याचा उपदेश केलेला आहे.'

अशा प्रकारचे अवतरण या अग्रलेखात देऊन श्री. माडखोलकर नंतर श्रीरामाचे व पांडवांचे उदाहरण देतात व यावर 'भोग कोणा सुटले' असे तुम्हाला उत्तर मिळाले तरी देवाला शरण गेल्याने दुःखाचा परिहार होतो. यावर कोण विश्वास ठेवील? असे ठामपणे त्यांनी समाजाला विचारले आहे. पुढे ज्ञानेश्वर, तुकाराम आदिचे उदा. घेऊन त्यांच्या आयुष्यात सुद्धा परमेश्वर कृपा घनत्वाची प्रतीति कोठे येते? इ. प्रश्नाची चिकित्सा केली आहे. पुढे ते म्हणतात, काहींनी परमेश्वराची कृपा ही पुष्कळदा अवकृपारूप असते, म्हणजे असे की, महंतावर प्राणान्तिक संकटे आलेली दिसतात खरी पण त्या संकटाने प्राणान्त न होता, उलट त्या दिव्यातून ते

अधिक आत्मप्रत्ययाने तेजःपुंज होऊन बाहेर पडलेले दिसतात. हे त्यांचे बाहेर पडणे म्हणजेच 'अवकृपारूप कृपा' होय हे निर्विवाद सिद्ध होते. असे म्हटले आहे. पुढे ते म्हणतात,

"हा युक्तिवाद प्रथम दर्शनी कितीही संयुक्तिक वाटला तरी तो तर्काच्या आणि अनुभवाच्या कसोटीला कितपत उतरणारा आहे? पांडव लाक्षागृहात नष्ट झाले नाहीत. वनवासात व अज्ञातवासातही नष्ट झाले नाहीत. पण या संकटातून वाचलेल्या पांडवांना अखेर काय मिळाले? श्री तुकारामांनी संसाराचे आणि व्यापाराचे वाटोळे झाल्यावर 'बाईल मेली मुक्त झाली ॥ देवे माया सोडविली ॥ पोरे मेली बरे झाले ॥ देवे मायाविरहित केले ॥ असे जे उद्गार काढले आहेत त्यातून त्यांची परमेश्वर भक्ती दिसत असली तरी त्यांची अशी दैना व्हावी, यात देवाला काय भूषण आहे? आणि हीच जर वाची 'अवकृपारूप कृपा' असेल, तर 'अवकृपा' आणि 'कृपा' या शब्दांना तरी काय अर्थ उरतो? आणि या उत्तराने स्पृष्टीतील वैषम्य आणि नैर्घृण्य यांची तीव्रता तरी कितपत कमी होण्याचा संभव आहे?" माडखोलकरांचे हे विचार वादग्रस्त झाले.

## कृपा आणि अवकृपा
## २४-२-१९५८

"कृपा आणि अवकृपा या शब्दांना परमेश्वराच्याबाबतीत खरोखरी काही अर्थ आहे का? संकटाच्या वेळी त्याची करूणा भाकणे आणि संकट निरसनार्थ त्याला नाना प्रकारचे नवस करणे, हा माणसाचा स्वभाव, पण माणसाच्या या वर्तनाला तरी कितपत आधार आहे?" असा प्रश्न या अग्रलेखात प्रारंभीच करुन या बाबतीत त्यांनी ग्रीक शास्त्रज्ञ सॉक्रोटिसचे उदाहरण दिले. तो एका देवळात गेला असता तेथील गुरुवाणीने त्याला असे सांगितले की, हे मोठे जागृत दैवत असून ते नवसाला पावत असते. या देवाला ज्या नाना प्रकारच्या वस्तु लोकांनी दिलेल्या आहेत. त्या तो नवसाला पावल्यामुळेच होय.' सॉक्रोटिसने विचारले. 'पण ज्याच्या नवसाला तो पावला नाही. त्यांच्या निराशेची कोणती खूण येथे आहे" सॉक्रोटिसची ही पृच्छा अगदी बरोबर होती असे माडखोलकर लिहितात. "आपण जागृत देवतांच्या आणि ती दैवते नवसाला पावल्याच्या गोष्टी नेहमीच ऐकतो पण नवसाला न पावल्याच्या गोष्टी मात्र कधीच कोणी सांगत नाही; व अशा रीतीने अंधश्रद्धेची ही परंपरा अव्याहत अखंडपणे चालू राहते."

माडखोलकर पुढे लिहितीत, "जे देवाला निर्गुणोपासक समजतात त्यांनी देवाची प्रार्थना करणे किंवा करूणा भाकणे या गोष्टी निरर्थक आणि निरुपयोगी आहेत. देव हा जसा मानवी कल्पनेचा एक खेळ, तशीच देवाची कृपा किंवा करूणा हाही त्या खेळातून निष्पन्न झालेला मानवी कल्पनेचा दुसरा खेळ होय; " अज्ञात शक्तीला त्यांनी 'अग्नी' ची उपमा देऊन ती शक्ती सुजाण, विवेकी, डोळस नसल्यामुळे जग हे वैषम्य आणि नैर्घृण यांनी इतके ग्रासलेले आणि घेरलेले दिसते. असे म्हटले "त्या शक्तीला परमेश्वर हे नाव देऊन तिच्यावर नाना प्रकारच्या सद्गुणांचा आरोप करणे आणि, आपल्या सुखप्राप्तीसाठी म्हणा किंवा दुःखनिवारणासाठी म्हणा, तिची आराधना आणि आळवणी करणे हा केवळ माणसाच्या कल्पनेचा खेळ आहे किंवा त्याच्या मनाच्या दुर्बलतेची ती एक कलृप्ति आहे." असे सांगून ते समाजाला डोळसतेचा सल्ला देताना म्हणतात. 'या विसंगत धार्मिक कल्पनात काहीही अर्थ  नाही व त्या कल्पना प्रमाण मानून, जीवन काढण्यापेक्षा माणसाने आत्मप्रत्ययाने आणि धैर्याने, स्वतःच्या बुद्धीच्या प्रकाशाच्या जोरावर आपल्या उन्नतीचा मार्ग काढणेच अधिक समंजस आणि

श्रेयस्कर नाही काय?' स्पष्ट आणि सुसंगत विचार व ती मांडण्याची त्यांची हातोटी व अंधश्रद्धा दूर सारण्यासाठी केलेली समाजजागृती, वरील अग्रलेखातून लक्षात येते.

## आत्मे दोन आहेत काय
## २४-३-१९५८

पाँडेचरी येथील 'संजीवन' त्रैमासिकाचा श्रीमाताजींच्या ऐंशीव्या जन्मदिनानिमित्त विशेषांक निघाला. त्यात काही उद्‌बोधक प्रश्नोत्तरे आहेत त्या संबंधीची चर्चा श्री. माडखोलकरांनी या अग्रलेखाद्वारे केली. श्री. अरविंदानी 'वासनात्मा' आणि 'खराआत्मा' असे प्रकार कल्पिके आहेत त्यावर साधक-बाधक चर्चा केल्यावर शेवटच्या परिच्छेदात माडखोलकर आपले विचार मांडताना जीवनातील सत्य लिहून जातात- 'अध्यात्मासारखे विवाद्य, मायावी आणि मतभेदग्रस्त शास्त्र दुसरे नाही. किंबहुना, मतामतांचा गोंधळ आणि गलबला जर सर्वात जास्त कोणत्या शास्त्रात असेल तर तो अध्यात्माच्या! सुदैवाने माणसाच्या रोजच्या जीवनाशी 'पुराणातील वांगी पुराणात' या न्यायाने या शास्त्राचा प्रायः मुळीच संबंध येत नसल्यामुळे, त्यातील गोंधळ आणि गलबला एकंदर समाजाला त्रासदायक होत नाही; व अध्यात्मशास्त्र हे प्रत्येक धर्मातील चिमूटभर प्रज्ञावंतांच्या केवळ बुद्धीविलासाचे शास्त्र होऊन बसले आहे. उदा. आपल्या वेदांताचीच गोष्ट घ्या. श्रीशंकराचार्य हे अद्वैत तत्वज्ञानाचे सर्वश्रेष्ठ प्रवर्तक, पण त्यांचा सर्व व्यवहार पहावा, तर तो जातीभेद आणि स्पृश्यास्पृश्यता यांच्या विटाळ चांडाळाने ग्रासलेला! जग हे तर त्यांनी सर्वथैव मिथ्य मानलेले आहे. पण श्रीशंकराचार्यांच्या मठाचे आणि उत्पन्नाचे तंटे हे सरकारी कोर्टातून वर्षानूवर्षे चाललेले आहेत व शिष्यस्वामी व गुरू स्वामी यांच्यातील भांडणामुळे जगद्‌गुरूंची गादी ही एखाद्या संस्थानिकांच्या गादी इतकीच भ्रष्टाचाराचे पीठ होऊन बसलेली आहे. सारांश, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा वेदान्त राहिला ग्रंथात आणि मठाची भांडणे मात्र गेली कोर्टात, अशी या पुराणातल्या वांग्यांची आज दैना होऊन बसली आहे.' या प्रक्षोभक अग्रलेखाचा समारोप, 'परमात्मा आणि जीवात्मा यांचे पूर्ण द्वैत गृहीत धरले काय किंवा जीवात्मा आणि वासनात्मा हे भिन्न मानले काय, माणसाच्या रोजच्या व्यवहारात काहीही फरक पडत नाही. उलट, या मायामय जगात आपल्याला जास्तीतजास्त पैसा कमवायचा आहे आणि संसार यशस्वी करून दाखवायचा आहे. या जाणीवेने मनुष्य वेदांत गुंडाळून ठेऊन सगळे व्यवहार करीत असतो. अशा स्थितीत, आत्मा असला काय आणि नसला काय, आत्मा एक असला काय किंवा दोन असले काय, सगळे सारखेच! माणसाच्या रोजच्या व्यवहाराच्या आणि आत्मानात्म विचाराचा काहीही संबंध नाही. ब्रह्म, माया, अद्वैत, द्वैत इत्यादी कल्पना ह्या केवळ प्रज्ञावंतांचा एक बुद्धीविलास आहे. त्यात सामील होऊ न बिचाऱ्या पोटार्थी माणसांनी आपला बुद्धीभ्रंश का करुन घ्यावा?' अशा चरचरीत उपहासाने केला.

## बीज भाजूनी केली लाही, आम्हा जन्म मरण नाही
## ७-४-१९५८

वरील अग्रलेखात पुनर्जन्माविषयी लिहिले आहे. आमच्या संतांनी जन्ममरणातून मुक्त होणे हाच मोक्ष मानला आहे. ही मोक्षा संबंधीची कल्पनाच श्रीतुकारामांच्या वरील ओवीतून दृग्गोचर होताना दिसते. श्री. माडखोलकर लिहितात. "आपण सर्वप्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, इतर धर्मात पुनर्जन्माची,

म्हणजेच चौऱ्यांशीलक्ष योनीतून बिचाऱ्या जीवात्म्याला परिभ्रमण करावे लागत असल्याची कल्पना अजिबात नाही, पुनर्जन्म नाही म्हणजे अर्थातच प्रारब्धही नाही, कारण पुनर्जन्माशिवाय प्रारब्धाला मुळी अस्तित्व आणि अर्थच नाही आणि त्यामुळे इतर धर्मीय भयावह अशा संकटातून मुक्त आहेत; त्यामुळे त्याधर्माचे मोक्षशास्त्र सुटसुटीत व सोपे झाले आहे. परंतु आपल्या हिंदु धर्मात मोक्षाच्या कल्पनेतून प्रत्यक्ष परमेश्वर सुद्धा सुटला नाही. अर्थात जन्ममरणाचा जो फेरा आमच्या संतकवींनी इतका निंद्य मानलेला आहे, तो फेरा योग्य रीतीने गण्यातच मानवी जीवनाचे सार्थक आणि साफल्य आहे.

## मोक्ष देवापाशी नाही
## १४-४-१९५८

या लेखात ते लिहितात. “वरील उद्‌गार तुकाराम महाराजांचे आहेत! कोणत्याही आधुनिक अज्ञेयवाद्यांचे किंवा चिकित्सकाचे नाहीत, “मोक्ष देवापाशी नाही,” मोक्ष परमेश्वरापाशी नाही आणि परलोकातही नाही, भगवद्‌गीतेतील स्थितप्रज्ञ, योगवासिष्ठातील जीवन्मुक्त व भागवतातील भागवतोत्तम किंवा उत्तमश्लोक परायण यांची वर्णने जर आपण पाहिली तर आपल्याला हे निश्चित कळून येते की, मोक्ष ही या इहलोकी आणि या नरदेहीच या मायेच्या पसाऱ्यात आणि या संसारातच, राहून प्राप्त करुन घेण्याची एक उच्चतम अवस्था आहे. परलोकांशी किंबहुना परमेश्वराशीही या अवस्थेचा काहीही संबंध नाही. जे लोक या अवस्थेला, म्हणजे ब्राह्मी स्थितीला, जाऊन पोचतात व नंतर केवळ लोकसंग्रहार्थ आणि लोककल्याणार्थ आपली नियत कर्मे करीत राहतात, त्यांना कोणताही मायापाश किंवा कर्मबंध हा जखडू शकत नाही. अर्थात मोक्ष म्हणजे प्रपंचातून उठणे किंवा जन्मतरणाच्या फेऱ्यातून सुटणे नव्हे; तर मोक्ष म्हणजे प्रपंच जाणीवेने करुन आपल्या सर्व बुद्धी शक्तीचा वेध समाजाच्या उन्नतीसाठी निष्काम भावनेने लावणे होय. स्थितप्रज्ञ, जीवन्मुक्त आणि भागवतोत्तम हे स्वतःसाठी जगत नाहीत; तर “तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।” या महाराजांच्या उद्‌गारानुसार परोपकारासाठी जगतात. जीवन कंठण्याची पात्रता आणि अधिकार अंगी येणे, म्हणजे असे जीवन जो कंठितो, तोच जीवन्मुक्त । मोक्षाची ही जी कल्पना गीता, योगवासिष्ठ आणि भागवत या ग्रंथात वर्णन केली आहे तिच्यापेक्षा अधिक उदान्त कोणते जीवनध्येय असू शकेल?” वाचकांनाचा विचारप्रवृत्त करावयाला लावण्याची हातोटी त्यांना चांगलीच साधली होती. व त्यामुळेच सोमवारचे अग्रलेख वाचनीय व चिंतनीय झालेले दिसतात.

## अध्यात्मचर्चेचा अधिकार
## २१ -४- १९५८

सोमवारच्या अग्रलेखाबाबत एका वाचकाचे पत्र आले असता- त्या पत्राला दिलेले उत्तर म्हणून हा अग्रलेख असल्याचे जाणवते. उत्तरात ते म्हणतात-

“आत्मप्रौढीचा आरोप येण्याची भीती पत्करुनही असे नम्रतेने पण निश्चयाने सांगणे प्राप्त आहे की, प्रस्तुत लेखकाने कै. नारायण महाराज कोडगावकरांपासून तो श्री. अप्रबुद्धांपर्यत, महात्मा गांधीपासून तो डॉ. प्र. श. पारनेरकर यांच्यापर्यंत अनेक अधिकारी समजल्या गेलेल्या सत्पुरुषांच्या सहवासाचा, सान्निध्याचा आणि

सदुपदेशाचा लाभ त्याने 'शिष्य स्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम' या विनित भावनेने घेतलेला आहे." ते पुढे लिहितात, "आत्मशास्त्रनीतीबद्धल काय म्हणावे? संस्कृतातील आध्यात्मिक ग्रंथ जरी सोडून दिले किंवा गीर्वाणवाणीचा आनुवांशिक अनुग्रह जरी ध्यानात न घेतला, तरी तुकाराम- रामदासांचे बहुतेक वाङ्मय मुखोद्गत असून, संत वाङ्मयाचा गेल्या तीन तपांचा व्यासंग हा आज अगदी थेट श्री. दासगणूमहाराजांपर्यंत येऊन भिडलेला आहे अर्थात गुरु मात्र मी केला नाही," ह्यापुढे ते लिहितात की, "आठ वर्षापूर्वी दुःखशोकाने होरपळलेल्या अत्यंत आर्त मनः स्थितीत जीज्ञासू आणि साधक या विनम्र भावनेने सुरु केलेली ही अध्यात्मचर्चा सवडीनुसार अखंड सुरु राहील. मग कोणाला ती रुचो वा न रुचो! केवळ वादंग म्हणून, करमणुकीखातर किंवा धर्माची कुचाळी करण्यासाठी जर हे अध्यात्माचे सदर सुरु करण्यात आले असते तर गोष्ट निराळी! श्री. समर्थानी शिष्याची लक्षणे सांगतांना; "बहु दुःख भोगिले जेणे । तयासीच परमार्थ बाणे ।" असा निर्वाळा देऊन, "जो संसार दुःखे दुखवला । जो त्रिविधतापे पोळला । तोची अधिकारी जाला । परमार्थासी ।।" असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे, आणि हा समर्थप्रणित माझा 'अधिकार' कोणी नाकारणार नाहीत. तेव्हा हे सोमवारचे व्रत, आयुष्यातील विलक्षण दुःखाच्या प्रसंगी ज्या विनम्र वृत्तीत समित्पाणी होऊन लेखकाने आरंभिलेले आहे. त्या व्रतात जिज्ञासू वाचकही सहभागी होतील अशी अपेक्षा लेखकाने का धरु नये?" असा प्रश्न वाचकांना विचारुन अतिशय गहन असा विषय लोकांच्या गळी उतरविण्याचा मार्ग ग. त्र्यं. नी उचलल्याचे दिसते.

**धर्म म्हणजे काय?**
**२१ - ७- १९५८**

या लेखात धर्माच्या निरनिराळया व्याख्या देवून 'ज्याने सर्व प्रजेचे धारण होते' ही सुटसुटीत व सोपी व्याख्या सांगितली. धर्म या शब्दाच्या अर्थात आणि व्याख्येत ईश्वर किंवा ईश्वरोपासना यांची कल्पना प्रधान नाही तर परमार्थापेक्षा प्रपंचावर व परलोकापेक्षा इहलोकावर भर जास्त आहे. डॉ. शंकर. दा. पेंडसेनी "इहलोकी विद्यमान असता या जन्मी आणि पुनर्जन्मी सुख देणारी जी कर्मे ती धर्म होत. धर्माची कल्पना नीति व व्यवहारावर अधिष्ठित आहे." घेतलेल्या या सुधारणवादी विचारांचे त्यांनी वरील अग्रलेखात समर्थन केले.

**अथातो धर्मजिज्ञासा**
**११. ८. १९५८**

या अग्रलेखात ते लिहितात, "धर्म ही मानवी जीवनातील सर्वात श्रेष्ठ अशी प्रेरक आणि धारक शक्ती आहे. आपल्या पुरुषार्थाच्या कल्पनेत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही जी जीवनाची चार मुख्य उद्दिष्टये सांगितलेली आहेत. त्यात धर्माला अग्रपूजेचा मान दिलेला आहे. विनयन, नियमन आणि उन्नती होणे कठीण आहे."

## महाराष्ट्रातील दल संप्रदाय
## १३. ७. १९५९

या लेखात महानुभावांचा दत्त व इतर सांप्रदायी दासिकांचा दत्त याचे वर्णन करुन एकमुखीदत्त व त्रिमुखी दत्त यावर प्रकाश टाकला आहे. दत्ताचे 'मलंगवेषाने' जनार्दनस्वामी, श्री. एकनाथ महाराज, आणि श्री. समर्थ रामदास यांना दर्शन देणे खटकल्याचे त्यांनी स्पष्टच लिहिले आहे. स्पष्ट व सत्यलेखन करुन वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

## उपासनेची शुचिता
## २७. ७. १९५९

धर्म म्हणजे ईश्वराप्रत जाण्याचा मार्ग समाजाचे चारित्र्य आणि नीतिमत्ता यावर या लेखात विशेष भर दिला. 'साधनानाम् अनेकता' असावी परंतु 'साधनानाम् अशुद्धता' असू नये. हे त्यांचे मत होते.

माडखोलकरांच्या मते, जगातील सर्वधर्म जर माणसाला ईश्वरांकडे स्वर्गाकडे मोक्षाकडे नेणारे आहेत. तर मग धर्माधर्माची सरसनीरसता ठरविली जाते किंवा तुलना केली जाते ती कोणत्या बाबतीत? ती तुलना दोन बाबतीत केली जाते. पहिली बाब ही की, त्या धर्माचे जे तत्वज्ञान असते, ते कितपत उच्च आणि उदात्त असते? दुसरी बाब ही की, त्या धर्मातील उपासना पद्धती ही कितपत शुद्ध आणि सात्विक असते? ख्रिस्ती, बौद्ध व वैदिकधर्म ह्यांची सांगोपांग चर्चा करुन उपासनेची शुचिता ज्यात असते तो श्रेष्ठ धर्म होय. असे वरील लेखात प्रतिपादित केले आहे

## हिंदूचे संस्कार
## २४. ८. १९५९

धर्मनिर्णय मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते तर्कतीर्थ 'रघुनाथशास्त्री कोकजे' ह्यांच्या व्याख्यानात संस्कारांचे पुनरुज्जीवन आणि पुनर्रचना हा विषय होता. या विषयावर विचार मांडत असताना ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात "हिंदु धर्मातील संस्कारांचे जर पुनरुज्जीवन व्हावयाचे असेल तर प्रथम त्या संस्काराची आधुनिक काळाला अनुरुप अशी पुनर्रचना व्हावयाला हवी; व लोकांच्या बुद्धिला व व्यवहाराला पटतील अशा आचरणीय स्वरुपात ते संस्कार लोकांपुढे ठेवले पाहिजेत. यासाठी हिंदुधर्मातील सर्व संस्काराचा सोपपत्तिक इतिहास लिहिला गेला पाहिजे. व त्या इतिहासातील उत्तरार्धात जे संस्कार आज ग्राहय ठरतील. त्यांची नवीन पद्धतीने मांडणी केली पाहिजे. हे कार्य जर 'धर्मानिर्णय' मंडळाने केले तर संस्काराच्या बाबतीत जे भयानक अज्ञान आणि अराजक आज हिंदू समाजात आहे, ते नाहिसे होऊ शकेल." हा त्यांचा १९५९ साठी व्यक्त केलेला विचार. समाज सुधारणा किती आवश्यक आहे; व समाजातील ज्या काही अनिष्ट रुढी आहेत त्यांचा निःपात करणे गरजेचे आहे ते सुचवितात. असे विचार व्यक्त करतांना ते लिहितात.

१) स्मृतिग्रंथांनी घातलेली अनाधिकाराची कृत्रिम दुष्ट मर्यादा समूळ काढून टाकली पाहिजे.

अनुक्रमणिका

२) सर्व संस्कार अखिल हिंदू समाजाला खुले करुन दिले पाहिजेत. जे संस्कार आज बुद्धिग्राह्य व्यवहार्य आणि आचरणीय ठरतील तेवढयाच फक्त संस्कारांची पुनर्रचना आणि पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरेल. हया लेखात एकूण सोळा संस्कारांची दिलेली माहिती तिचे विवरण यावरुन त्यांचे वाचन किती दांडगे होते याची जाणीव आपणांस होते.

## दासबोध
## २७. १०. १९५९

समाजाच्या मनोजीवनावर चिरंतन परिणाम करुन मानवी जीवनाकडे पाहण्याची एक विशिष्ट दृष्टी सर्वांना दिली आहे अशा ग्रंथात 'दासबोध' हा अग्रगण्य ठरेल. असे श्री. ग. त्र्यं. नी लिहिले आहे मराठी संताच्या मालिकेत श्री. ज्ञानेश्वर, श्री. तुकाराम आणि श्री. समर्थ रामदास यांना महाराष्ट्र संस्कृतीच्या आणि धर्मकारणाच्या विकासाच्या दृष्टीने जे ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्व आहे ते इतर कोणत्याही, संतांना नाही. ज्ञानेश्वरीला ज्याप्रमाणे 'माऊली' म्हणून संबोधिले जाते त्याप्रमाणे दासबोधाला ग्रंथराज असे संबोधतात. या ग्रंथात जी व्यवहारनीती आणि राजनीती यांचा खणखणीत उपदेश अध्यात्माची बैठक न मोडता, पण त्याबरोबरच समाजाची दुरावस्था लक्षात घेऊन अत्यंत सावधपणाने केलेला आहे ते विचारात घेता 'राजग्रंथ' हे नावही त्याला शोभू शकेल! समर्थांनी अध्यात्माइतकेच ऐहिक आणि सामाजिक जीवन महत्वाचे मानून त्यादृष्टीने रोखठोक असा व्यावहारिक उपदेश 'दासबोधा' तून केला आहे प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालावी व संसार नेटका करुन परमार्थाचा मार्ग चोखाळावा हे श्री. एकनाथ महाराजांनी आपल्या स्वतःच्या उदाहरणाने महाराष्ट्राला सिध्द करुन दाखविले. ते तिथेच थांबले परंतु श्री. समर्थांनी प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालावी असे सांगून न थांबता प्रपंच परमार्थ आणि राजकारण या तिहिंचीही सांगड घालण्यातच समाजाचे कल्याण, उन्नती आणि सुरक्षितताही आहे हे अगदी सडेतोड पध्दतीने लोकांच्या गळी उतरविले. "सामर्थ आहे चळवळीचे! जो जे करील तयांचे ।" किंवा "खटनटासी व्हावे खटनट" असा उपदेश करण्यामागे त्यांची व्यवहारदृष्टी पावलोपावली दिसते असे म्हटल्यास काहीही चूक ठरणार नाही. इ. समर्थसमर्थन या अग्रलेखात आहे.

'दासबोधाने' पारतंत्र्यातून मुक्त होण्याची बुद्धी रानडे, भांडारकर आदींना दिली. आगरकर, टिळक यांनाही दासबोधाने स्फूर्ती दिली. 'ज्ञानेश्वरी' व 'दासबोध' हे दोन ग्रंथ समाजाला नवचैतन्य देण्यास कारणीभूत ठरतात. श्री. समर्थांनी लिहिलेल्या दासबोधांवर दासनवमीच्या (त्रिशतसावंत्सरिक) निमित्ताने लिहिलेल हे लेखन वास्तवतेचे वाटते. ऐहिक जीवनातील प्रत्येक बारिक सारिक विषयावर इतक्या सविस्तरपणे चर्चा फक्त दासबोधातच आढळून येते हे त्यांचे मतही ग्राहय व्हावे.

## दासनवमी आणि दासबोध
## ८-२-१९६०

माडखोलकर लिहितात, "श्री. समर्थांनी दासबोधाचे लेखन एकंदर चार वेळा केले, असे दिसते. सध्याचा दासबोध १६०३ च्या मार्गशीर्षात पूर्ण केला असावा. हा ग्रंथराज पूर्ण केल्यावर जणू काही आपले वाङ्मयीन अवतारकार्यही संपले अशा भावनेने, त्यांनी त्यानंतर दोनच महिन्यांनी माघ वद्य नवमीला समाधी घेतली."

"रामदासांचा दासबोध हा ओजोगुणाने संपन्न असून महाराष्ट्रातील संत मालिकेत श्री. समर्थ आणि त्यांचा दासबोध या दोहोंचेही वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. धगधगीत धर्माभिमान आणि जळजळीत देशाभिमान हा त्यांचा अद्वितीय विशेष असा गुण त्यांच्या काव्यातून लक्षात येतो. तसेच त्यांचे दुसरे विशेष म्हणजे रोखठोक व्यवहार बुद्धी. त्यांनी संसार आणि जनसंघटना ही दोन्ही इर्ष्येने करण्यातच मानवी जीवनाचे सार्थक आहे असा उपदेश केला. "असा ते समर्थ गौरव करतात.

सांगोपांग विचार करुन डोळसपणे कोणत्याही विषयावर अग्रलेखातून लिहिणे त्यावर साधक- बाधक चर्चा करणे त्याची डावी उजवी बाजू वाचकांसमोर स्पष्टपणे मांडणे ही गोष्ट माडखोलकरांना अगदी चांगली मत होती असेच वरील अग्रलेखातून जाणवते.

## दशहरा
## २३ -५- १९६०

"गेल्या आठवड्यात वळिवाच्या पावसाच्या ज्यासरी दोन दिवस येऊन गेल्या. त्यामुळे थोडे उतरलेले उष्णतामान लगेच कडकावयाला सुरुवात होऊन आता ११३ अंशापर्यंत उन्हाचा कडाका चढला आहे. पण त्यात नवल नाही. कृत्तिका नक्षत्रात सूर्य गेल्यावर त्याची उष्णता द्विगुणित होऊन स्थिरचराचा दाह व्हावा, हे स्वाभाविक नाही काय?" अशी निसर्गसुंदर सुरवात करणाऱ्या या अग्रलेखात पुढे म्हटले आहे की,

"अशा या कडक उन्हाच्या महिन्यात आपल्या धर्मशास्त्रांनी दशहराचे व्रत करावयाला सांगून जेष्ठ प्रतिपदेपासून दशमीपर्यंत रोज गंगास्नान करण्याचा आदेश दिलेला आहे. नच जमले तर गावातल्या गाव गंगेचे तरी स्नान प्रत्येकाने प्रातःकाळी आणि सायंकाळी करावे अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे.

जेष्ठाच्या महिन्यात भगवान आदित्य हा आपले बाराही डोळे उघडून सृष्टिला अग्निस्नान घालतो. जेष्ठ मासातील शुद्ध दशमीला भगीरथाच्या तपश्चर्येने गंगाबाई स्वर्गातून भूतलावर अवतरली. तिच्या या पृथ्वीवरील आगमना प्रित्यर्थ हा दशहराचा उत्सव भारत खंडात केल्या जातो." हे पौराणिक महत्व लिहित असताना माडखोलकर त्याचे ऐतिहासिक व भौगोलिक महत्त्वही लिहून जातात. माणसाची पहिली गरज पाणी व दुसरी गरज अन्न त्यामुळे जुन्या धार्मिक उत्सवाला नवीन राष्ट्रीय स्वरुप देऊन त्याचा उत्सव मनविणे आज आवश्यक

ठरते, असे लिहून 'दशहरा' ची समाप्ती केली आहे. उत्सव करा पण त्याला नवीन युगानुसार नवे रुप द्या. कर्मकांडात पडू नका असेच यातून त्यांना सूचित करावयाचे असावे.

## निर्जला

**६-६-१९६०**

"दशहराच्या संबंधी अशी कल्पना आहे की, त्या व्रताच्या आचरणाने कायिक, वाचिक आणि मानसिक अशी दहा प्रकारची पापे नाहीशी होतात. जेष्ठातील शुध्द दशमी हा गंगेचा अवतारदिवस समजला जातो अर्थात दशहराच्या व्रताची समाप्ती त्या दिवशी केली जाते आणि दुसऱ्याच दिवशी जी एकादशी येते ती निर्जला! दहा दिवस गंगेचे स्नान, ध्यान आणि पान केल्यावर अकराव्या दिवशी येणाऱ्या या एकादशीला पाणी सुध्दा प्यावयाचे नाही, असा दंडक आहे. म्हणून ती निर्जला! जणु काही, दहा दिवस गंगेच्या उदकाचा यथेच्छ उपभोग घेतल्यानंतर त्यामुळे कडक उन्हाच्या या जेष्ठ महिन्यात थंडीची बाधा होण्याचा संभव, तिला प्रतिबंध करण्याच्या हेतूने हे निर्जला व्रत सांगितले असावे आपल्याकडे व्रतांची रचना मानवी स्वास्थाच्या दृष्टीने केलेली आहे. परंतु आता मात्र हे व्रताचरण पूर्वीइतके जोमाने होतांना दिसत नाही." असा रमणीय अभिप्राय या अग्रलेखात आहे.

## तयांसी साकडे पडो नेदी

**१८-७-१९६०**

'भक्त तोची जाणा जो देही उदास ।
गेले आशापाश विसरोनी ॥ १ ॥
विषय तो त्याचा झाला नारायण ।
नावडे धन-जन मातापिता ॥ २ ॥
नीर्वाणी गोविंद असे मागे पुढे ।
तयासी सांकडे पडो नेदी ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य ।
घेतलीया भय, नरका जाणे ॥ ४ ॥'

संतवाङ्मय भक्त श्री. स. ना. केळकर यांनी विचारलेल्या शंकेचा उलगडा करण्यासाठी वरील अग्रलेख लिहिल्या गेला. त्यात ते म्हणतात,

"तरुण भारताचा संपादक या विषयावर लिहावयाला सर्वथैव अनाधिकारी व अपात्र आहे. याची त्याला पूर्ण जाणीव आहे. तो संत वाङ्मयाचा केवळ एक सामान्य विद्यार्थी आणि अध्यात्ममार्गावरील एक जिज्ञासु वाटकरी आहे. श्री जनार्दन स्वामींसारख्या अधिकारी पुरुषाने श्री. केळकर यांच्या शंकेचा उलगडा केल्यानंतर या विषयावर प्रस्तुत लेखकासारख्या सामान्य माणसाने लिहिणे हे खरोखरीच एक धाडस होय. पण, श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे हंसासारखी सुबक चाल जरी सर्वांना साधली नाही, तरी त्यांनी आपले

चालणे सोडून द्यावे, असे थोडेच आहे? ही उक्ती ध्यानात घेऊन लेखकाने (संपादकाने) या शब्दाचा उलगडा आपल्या अल्पमतीनुसार केलेला आहे. त्यात आग्रह नाही. फक्त त्या उलगड्याची युक्तायुक्तता पारखली जावी, एवढीच अपेक्षा आहे.

तुकाराम महाराजांच्या या अभंगात जे सांकडे' उल्लेखिलेले आहे ते सामान्य प्रापंचिक सांकडे नसून अर्जुन आणि ख्रिस्त यांच्यासारख्या भक्तोत्तमांना पडलेल्या मोहासारखे आध्यात्मिक किंवा पारमार्थिक सांकडे आहे. भक्तांची लक्षणे वर्णन करताना श्री. तुकाराम महाराजांना हेच शेवटी निक्षून सांगावयाचे असेल?" असा प्रश्नार्थक समारोप आहे.

**मासांना मार्गशीर्षोहम्**
**६-१२-१९६०**

"मार्गशीर्ष हा चातुर्मास्यानंतर येणारा पहिला महिना, भगवंताने आपल्या विभूतीवर्णनात महिन्यामध्ये "मी मार्गशीर्ष आह" असे म्हटले आहे. महाभारताच्या काळात वर्षारंभ या महिन्यापासून होत असे. या महिन्याला 'दत्तजयंती' व 'ख्रिस्तजयंती' मुळे असामान्य महत्त्व आले आहे. हे सांगून शेवटी दत्त व ख्रिस्त या अवतारी पुरुषाची चरित्रे सारखीच उद्‌बोधक वाटतात, असे लिहिले आहे. त्यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान आपापल्या परीने चिंतनीय आणि  श्रेयस्करही आहे." असा अभिप्राय व्यक्तविणारे!

असे सर्व विषयांवरील माडखोलकरांचे सांगोपांग लेखन बघितले की मन त्यांच्या विद्वत्तेची प्रशंसा मनातल्या मनात करीत राहते. त्यांच्या कल्पनाशक्तीची, अद्म्य विश्वासाची, अफाट ज्ञानाची प्रकर्षाने जाणीव होते.

**एकनाथ, तुकाराम आणि रामदास**
**२३-१-१९६१**

"ज्ञानेश्वर आणि एकनाथ हे दोघेही साक्षात शांतीब्रहम, तर तुकाराम आणि रामदास हे दोघेही थोड्याफार फरकाने, दुर्जनाला दंडिले पाहिजे या खणखणीत मताचे!

महाराष्ट्रातील प्रमुख संताच्या जीवनात एक लोकोत्तर विशेष हा आढळतो की, ते ब्रह्मचारी असोत वा संसारी असोत, वैष्णव असोत, शैव असोत किंवा शाक्त असोत, हिंदु असोत किंवा मुसलमान असोत त्यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि उपदेशाचा पाया हा मात्र सदैव वेदान्तच राहिला व त्यांची परस्परांविषयीची आदरबुद्धी कोणत्याच भेदभावामुळे कधी ढळली नाही. हे वैशिष्ट्य त्यांच्या जीवनक्रमावरुन जाणून घेणे आवश्यक आहे. असा नेमका अभिप्राय या अग्रलेखात आहे.

अनुक्रमणिका

## निर्गुण किंवा ब्रह्म साक्षात्कार
## १-१०-१९६२

या लेखात ते लिहितात, “निर्गुण किंवा ब्रह्म साक्षात्कार ही केवळ योगशास्त्रातच नव्हे, तर सर्व वेदान्तशास्त्रातच मुळी मानवाच्या आध्यात्मिक उन्नतीची अंतिम श्रेष्ठ पायरी समजली जाते; व हा साक्षात्कार झाल्यानंतर मनुष्य जीवनमुक्त होतो. “याचि देही याचि डोळा” परब्रह्मपदाला पोचतो आणि परमहंस पदवीला पात्र होतो, अशी आपल्या समाजाची श्रद्धा आहे. साक्षात्काराच्या प्रकारात “ब्रह्मसाक्षात्कार” हा अत्यंत दुःसाध्य आहे. असे खुद्द भगवंतानीच गीतेच्या बाराव्या अध्यायात म्हटले आहे.

हिंदु धर्मात परमेश्वरांची अनेक रुपे, ध्याने आणि मूर्ती कल्पिलेल्या आहेत; तर इतर धर्मात फक्त एकाच देवाचे नाव घ्या तरच तुम्ही मोक्षाप्रद पोहचू शकता असा उपदेश केला आहे. हिंदु धर्मात सगुणोपासना आणि साक्षात्कार हा मोक्षदायक मानलेला आहे.” असे सांगत ते स्वतःच्या मतानुसार गीतेतील पुढील ओवींचे स्पष्टीकरण करतात.....

“अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुध्दयः ।
परं भावमजानंती ममाव्ययमनुत्तमम् ॥

आशय - मी खरोखरी अव्यक्त असता निर्बुद्ध लोक मला देहधारी मानतात. या लोकांना माझे सर्वोत्कृष्ट असे जे अव्यय रुप ते मुळी कळतच नाही या भगवत् वचनावरुन हे स्पष्ट दिसून येईल की, सगुणोपासना आणि सगुणसाक्षात्कार हे दोन्ही खुद्द भगवंतानेच मुळी अत्यंत गौण मानलेले आहेत; व निर्गुण ब्रह्माप्रत पोचण्याचा केवळ एकमार्ग एवढीच त्यांची किंमत केलेली आहे. किंबहुना परमेश्वराचे अव्यक्त आणि अव्यय रुप म्हणजेच जे परब्रह्म; ते आकलन करण्याची कुवत ज्यांच्या क्षुद्र बुद्धीच्या ठायी नाही अशा सर्वसामान्य माणसांसाठीच मूर्तीपूजा सगुणोपासना व सगुणसाक्षात्कार हे मार्ग आहेत. सारांश - सगुण साक्षात्कार हे परमार्थाच्या मार्गातील केवळ एक साधन मानलेले आहे. साध्य नव्हे साध्य ब्रह्म साक्षात्कार म्हणजे निर्गुण साक्षात्कार हेच खरोखरी आहे. ब्रह्म साक्षात्कार ही आधुनिक बुद्धीवादांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे एक परमोच्च बौद्धिक अवस्था आहे. ‘स्थितप्रज्ञावस्था’ ही ब्रह्मसाक्षात्कारानंतरच प्राप्त होते म्हणून शेवटी असे म्हणावेसे वाटते की, सगुण साक्षात्कार हा भक्तिप्रधान आहे, तसा ब्रह्मसाक्षात्कार हा बुद्धीप्रधान आहे.” या अभिप्रायातील खोली वाचकांच्या सहज लक्षात यावी.

## साक्षात्कारांवरील लेखांचा समारोप
## ८-१०-१९६२

वरील अग्रलेखात माडखोलकर सुरुवातीलाच स्वतःच्या लेखन प्रपंचाला ‘प्रचितीविण बोलणे’ असे म्हणतात. या विषयावर ‘प्रस्तुत लेखकाला’ लिहिण्याचा काहीही अधिकार नाही कारण तो ‘एक साधक’ आहे आणि तोही अज्ञेयवादी! त्यादृष्टीने त्याची भूमिका साधकापेक्षा खरोखरी जीज्ञासूची आहे असा विनय स्वीकारतात. पुढे ते लिहितात, “गेल्या चाळीस वर्षात महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, श्री. अवधूतस्वामी

इत्यादी सत्पुरुषांचे थोडेबहुत सान्निध्य आणि कृपाप्रसाद त्याने अनुभवलेला असून त्यापैकी काहींचे योगसामर्थ्य आणि सिद्धिचे चमत्कार हेही त्याने पाहिलेले आहे. त्याचप्रमाणे आळंदी पैठणपासून तो सात्कोरी, खुल्दाबाद यांच्या पर्यंत हिंदू आणि मुसलमान अशा दोन्ही सत्पुरुषांच्या समाधी आणि दर्गे यांचेही दर्शन घेतलेले आहे. 'संशयो न फिटला' अशी जरी त्यांच्या मनाची स्थिती असली तरी अध्यात्माची श्रेष्ठता आणि शक्ती या दोहोवरही त्याची श्रद्धा आहे. त्या व्यक्तींचे व्यक्तित्व आणि तत्त्वज्ञान समजावून घेण्याचाही प्रयत्न त्याने आपल्या अल्पबुद्धीनुसार केलेला आहे. पण पूर्वजन्मीच्या सुकृताच्या अभावामुळे म्हणा किंवा पुरेसा संतसमागम अद्याप झालेला नसल्यामुळे म्हणा साहित्याच्या क्षेत्रात जशी गुरुवर्य कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची कृपा त्याच्यावर होऊन त्या क्षेत्रापुरते त्याचे जीवन थोडे बहुत तरी कारणी लागले. तसा सुयोग काही आध्यात्माच्या क्षेत्रात अद्याप झालेला नाही. साक्षात्कारावरील विवेचनांचा जर काही निष्कर्ष निघत असेल, तर तो सगुणोपासना आणि सगुण साक्षात्कार हेच सामान्य माणसाला प्रिय आणि श्रेय आहेत."

## **यतोधर्मस्ततो जय**
## **१९-११-१९६२**

'धर्मशास्त्राचा इतिहास' या महामहोपाध्याय श्री. काणे यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या शेवटच्या खंडाचे प्रकाशन दि. १७ ला डॉ. राधाकृष्णन् यांचे अध्यक्षतेखाली झाले. त्या प्रसंगाला धरुन वरील विषयाचा अग्रलेख लिहिल्या गेल्याचे दिसते. माडखोलकर म्हणतात, "ग्रंथकर्ते व प्रकाशन करणारे दोघेही महान् आहेत. महान् यासाठी की, आज साऱ्या विश्वात धर्म म्हणजे एखाद्या थोर पुरुषाने सांगितलेली काही तत्त्वे व तीही आत्मा आणि परमात्मा यांच्या पुनर्मीलना पुरतीच मर्यादित असलेली, एवढाच त्या शब्दाला अर्थ प्राप्त झालेला आहे. परंतु भारतीय तत्वज्ञानांनी आणि भारतीय ऋषीमुनींनी हा संकुचित अर्थ कधीच मानला नाही. मानव जातीचे धारण करणारा तो धर्म एवढी विशाल दृष्टी त्यांनी ठेवली व हजारो वर्षापासून तिची या देशात जोपासना होत आली. अभ्युदय व निःश्रेयस या दोन्ही दृष्टींनी मानव समाजाला परमोन्नत सर्व तत्त्वज्ञानांना सामावून घेणारा विशाल व व्यापक जीवनाचा आदर्श जीवनसंदेश बनला. येथे प्रपंच करणाऱ्याला, तपस्व्यांना, वेश्येला, हत्या करणाऱ्याला, एकपत्नी व्रतधारण करणाऱ्याला, सहस्त्र नारी वरणाऱ्यालाही मुक्ती मिळू शकते. कर्म हे आमच्या धर्माचे गमक नसून कर्माच्या मुळाशी असलेली विशाल जीवनसृष्टी हीच आमच्या धर्माचे नियंत्रण करते. "चीनने भारतावर १९६२ साली आक्रमण केले त्यावेळी लिहिलेला हा अग्रलेख आहे. माडखोलकर शेवटी लिहितात', जेथे धर्म आहे तेथे विजय आहेच. पण तो धर्म आधी तुम्हाला समजला पाहिजे." वरील अग्रलेखात हिंदुधर्म व त्यावरील दृढ विश्वास दिसून येतो. माणसाने आपला धर्म सोडू नये धर्म हा व्यक्तिला तारणारा असतो. धर्माने वागल्यास मनुष्य जीवनात यशस्वी होतो,त्याची प्रगती होते. असे वरील लेखातील तात्पर्य!

## निष्कर्ष

श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांनी २ जानेवारी १९४४ ला तरुण भारताची स्थापना केली. अग्रलेख हा वर्तमानपत्रात रोजच लिहिण्याची प्रथा आहे. या प्रथेमुळे माडखोलकरांनी सुरुवातीला स्वतःच अग्रलेख लिहिलेत. परंतु नंतर इतरांकडूनही अग्रलेख लिहून घेतले जाऊ लागले. तरुण भारत कार्यालयात जाऊन छप्पन वर्षापूर्वीच्या फाईल शोधणे हे अतिशय दुरापास्त काम! परंतु "प्रयत्न वाळूचे कण रगडिता तेलही गळे"

या उक्ती नुसार अतिशय कठीण असलेले कामही चिकाटीने व सातत्याने केले. परंतु अंकांची इसवी सनानुसार शोधाशोध केली असता काही अंक गहाळ झाल्याचे काही उधईने खाऊन टाकल्याचे लक्षात आले. त्यात कितीतरी वर्षाचे अंकच दिसत नव्हते. जुन्या लोकांकडे चौकशी केली असता तरुण भारताचे कार्यालय दोन वेळा जाळण्यात आल्याचे कळले. त्यातील एक वेळ गांधीवधाची तर दुसरी १९५४ वगैरे सालची. त्यामुळे १९४८ ते १९५४ असे एकंदर ५ ते ६ वर्षाचा रेकॉर्ड तेथे नसल्याचे समजले. अशा परिस्थितीत उपलब्ध साधन सामुग्रीच्या शिदोरीवर मी लेखांची निवड केली आहे. उपलब्ध लेखांवरुन त्यांची धर्मविषयक मते, आपणास समजावून घेता येतात. माडखोलकरांच्या मते, "जन्मापासून तो मृत्यूपर्यंत जे जे धारण केले जाते त्यालाच धर्म असे म्हणतात."

सातत्याने नऊ ते दहा वर्षे त्यांनी दर सोमवारी धार्मिक अग्रलेख लिहिण्याचे धाडस केले. हे धाडसच त्यांच्याजवळील 'वाङ्मयीन साठ्याची' साक्ष होय. त्यांच्या अग्रलेखातून तत्कालिन बुद्धिवाद्यांचे मत स्पष्ट होत असे. अग्रलेखातील दर्जेदार भाषा, प्रतिभाशक्ती व सम्यक दृष्टी यामुळे त्यांचे लेख वाचनीय होत. याद्दष्टीने माडखोलकर सिद्धहस्त लेखक ठरतात. त्यांची भाषा सहज सुबोध अशी असे. त्यात संस्कृतप्रचूर शब्दांचा वापर असूनही भाषेला कोठेही बोजडत्व आल्याचे जाणवत नाही. परिश्रम, चिकाटी, व्यासंगाच्या जोरावर माडखोलकरांनी स्वतःचे स्थान टिकवून ठेवले.

'फक्त साधक' असा शब्दप्रयोग त्यांनी स्वतःसाठी वापरल्याचे दिसते. ते स्वतःला अज्ञेयवादी म्हणवून घेत. कोणत्याही एका धर्मावर वा धर्मग्रंथावर त्यांची ऐकांतिक श्रद्धा नव्हती तर ज्यातील विचार चांगले आहे ते ते सर्व त्यांना आचरणीय, आदरणीय वाटत असे. "मी शंकित आणि जिज्ञासू साधक आहे!" या मतासह त्यांच्या अग्रलेख लेखनावरुन त्यांची लेखणी बहुप्रसवा होती असेच म्हणावे लागेल! लेखन हाच त्यांना 'जीवनधर्म' बनला होता. प्रत्येकाने आपआपल्या धर्मानुसार वागावे असाही त्यांचा दंडक असे. जे कोणी लोककल्याणार्थ आपली नियतकर्मे करीत राहतात, त्यांना कोणताही मायापाश किंवा कर्मबंध जखडू शकत नाही. लोककल्याणार्थ झटणे म्हणजेच नियतकर्म करणे. असे जीवन माडखोलकर जगले व जीवन्मुक्त झाले असे त्यांच्या अभ्यासाने मला वाटू लागले आहे. त्यांच्या शैलीविशेषामुळेच त्यांचे अग्रलेख आजही ताजे व वास्तव वाटतात. व त्यामुळेच त्याला चिरंतनत्व प्राप्त होऊ शकले. "वृत्तपत्रव्यवसाय हा धंदा नसून धर्म आहे असे गं. त्र्यं.माडखोलकर म्हणत", समर्थपणे ४२ वर्षे अव्याहतपणे 'तरुण भारतात ते लिहिते झाले त्याचे कारण जे जसे ललित साहित्याची निर्मिती करणारे प्रतिभावंत लेखक होते तसेच स्वतंत्र धोरणाने आपले वृत्तपत्र यशस्वी करणारे प्रज्ञावंत पत्रकारही होते. हेच होय! पत्रकारिता ही त्यांची वृत्ती होती. ते निर्भिड, चतुरस्त्र, ध्येयनिष्ठ आणि शैलीदार पत्रकार होते. लिहिण्याची विशिष्ट शैलीच त्यांना यशस्वी पत्रकार होण्यास कारणीभूत ठरली. ह्या शैलीतच त्यांचे श्रेष्ठत्व लपलेले आहे!

⁕⁕⁕

अनुक्रमणिका



**गुरूवर्य - श्री. कोल्हटकर यांना अभिवादन करताना**

अनुक्रमणिका

## |माडखोलकर आणि मराठवाडा |

-----------------------------------------------------------------नरेन्द्र चपळगावकर

ख्यातनाम मराठी कादंबरीकार आणि पत्रकार गजानन त्र्यंबक उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांची जन्मशताब्दी सध्या साजरी होत आहे. या निमित्ताने कादंबरीकार आणि पत्रकार म्हणून त्यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन केले जात आहे. माडखोलकरांच्या कर्तृत्वाचा आणखी एक विशेष राज्यकारभारातील भाषेचे स्थान, साहित्य संस्था आणि भाषिक राज्ये या बाबींशी संबंधित आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन बेळगाव येथे माडखोलकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केली. हे सर्वज्ञात आहे. परंतु निजामी राज्यात अडकलेल्या लक्षावधी मराठी भाषिकांच्या कुचंबणीची व्यथा लक्षात घेऊन साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन मांडणारे आणि साहित्य संस्थेला बळ देण्याचा प्रयत्न करणारे एक साहित्य सेवक ही त्यांची भूमिका त्या मानाने फारशी ज्ञात नाही.

आज विदर्भ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ हे चार जिल्हे पूर्वी निजामाच्या राज्याचे भाग होते. निजामाला कर्ज बाजारी करुन ते कर्ज फेडून घेण्याच्या निमित्ताने सुमारे १०० वर्षांपूर्वी या जिल्हयांचा कारभार ब्रिटिश सरकारकडे आला तरी या भागांवर निजामाची अधिसत्ता कागदोपत्री ब्रिटीश सरकार मान्य करीत होते. यामुळे विदर्भ व मराठवाडा यांच्यातील भाषिक व सांस्कृतिक एकतेबरोबरच एक राजकीय नातेसुद्धा प्रस्थापित झाले होते. विदर्भ साहित्य संघाची स्थापना अधिवेशन अमरावती येथे १३ व १४ जानेवारी १९२३ रोजी भरण्याचे निश्चित झाल्यावर अधिवेशनाचे निमंत्रक बळवंत गणेश खापर्डे यांनी विदर्भाच्या बरोबरच मराठी मध्य प्रांत, पूर्व खानदेश व निजाम राज्य यांच्यातील साहित्यभक्तांना हजर राहण्याची परिपत्रकाद्वारे विनंती केली होती. असे दिसते की, प्रारंभीच्या काळात विदर्भ साहित्य संघाच्या कार्यक्षेत्रात मराठवाड्याचाही समावेश करण्यात आला होता. विदर्भ साहित्य संघाचे पहिले अध्यक्ष म्हणून हैदराबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती केशवरावजी कोरटकर या मराठवाड्यातील साहित्यप्रेमी व्यक्तिचीच निवड झाली होती. शिवाय संघाच्या पहिल्या तीन चिटणीसांत गोळेगावकर या आणखी एका मराठवाड्यातील कार्यकर्त्यांचा समावेश होता. या अधिवेशनाच्या निमित्ताने 'निजाम विजय' या हैदराबाद संस्थानातील एकमेव मराठी साप्ताहिकाने लिहिलेल्या अग्रलेखात व्यक्त केलेली भावना प्रातिनिधिक होती. निजाम विजयने म्हटले होते :

'आमच्यासारख्या पंगूंना चालविण्यास एखाद्या पांगुळगाड्याची आवश्यक्ता होती. त्याप्रमाणे विदर्भ साहित्य संघाने आम्हाला हाताशी धरले आहे खरे. पण जोपर्यंत बुडणाऱ्यांना स्वतः तरण्याची इच्छा नसेल तो पर्यंत हात देणारा तरी बिचारा काय करील?" याच अग्रलेखात विदर्भ साहित्य संघाने मराठवाड्याचा समावेश आपल्या कार्यक्षेत्रात केल्या बद्दल निजाम विजयने समाधान व्यक्त केले. मात्र मराठवाडयातही स्वतंत्र वाङमयीन हालचाल वाढण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

विदर्भ साहित्य संघाचे दुसरे अधिवेशन तर चक्क मराठवाड्यात औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथे भरणार होते. स्वागत मंडळाचे अध्यक्ष पैठणचे श्री. अंबादास दाजी भाकरे व विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस बळवंत गणेश खापर्डे यांच्या सहीने वृत्तपत्रात एक निवेदनही प्रसिद्ध झाले. अधिवेशनाच्या तारखा १९ व २०

एप्रिल १९२४ अशा निश्चित झाल्या. परंतु शासकीय अडथळ्यांना ओलांडून अधिवेशनाची व्यवस्था आपल्याला शक्य नसल्याचे पैठणकर मंडळींनी कळवल्यामुळे हे अधिवेशन बारगळले आणखी तीन वर्षांनी १०, ११ जून १९२७ रोजी हैदराबादच्या दिलशाद (त्या वेळचे प्रेम) थिएटरात भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघाचे दुसरे अधिवेशन भरले. न्यायमूर्ती केशवरावजी कोरटकर अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. विदर्भ हैदराबादपासून वेगळा झाल्यामुळे उर्दूच्या दडपणाखाली मराठीचा संस्थानात जो कोंडमारा होत आहे. त्यातून सुदैवाने विदर्भ बचावला असे आपल्या भाषणात त्यांनी उघडपणे नमूद केले. हैदराबाद येथे भरलेल्या या विदर्भातील साहित्य संघाच्या अधिवेशनातील विदर्भ साहित्य प्रेमी मात्र फारच तुरळक संख्येने हजर होते. विदर्भाच्या छत्राखाली मराठवाड्यातील साहित्य भक्तांचाच हा मेळावा होता. पुढे १९३७ मध्ये निजाम प्रांतीय मराठी साहित्य संमेलन भरले व १९४३ साली नांदेडच्या दुसऱ्या निजाम प्रांतीय साहित्य संमेलनात मराठवाडा साहित्य परिषदेची स्थापना झाली व विदर्भ साहित्य संघाच्या कक्षेतून मराठवाडा वेगळा झाला.

गरजेच्या काळात विदर्भ साहित्य संघाने मराठवाड्यातील वाङ्मयीन हालचालींना आश्रय दिला. नंतर मराठवाड्याची वेगळी संस्था निर्माण झाली. तरीही विदर्भातील माडखोलकरांसारख्या जागरुक वाङ्मय सेवकाचे मराठवाड्याकडे आणि तेथे होणाऱ्या मराठीच्या गळचेपीकडे सतत लक्ष होतेच. नांदेडचे संमेलन झाल्यानंतर औरंगाबाद येथे संमेलन घेण्याचे ठरल्यावर भाऊसाहेब माडखोलकरांचे या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेने निवड केली. भाऊसाहेबांनी अध्यक्षपद स्वीकारण्यास संमतीही दिली. संमेलनाच्या तारखा १८, १९ व २० डिसेंबर १९४४ अशा ठरल्या. परंतु सरकारने स्थानिक अध्यक्ष आणि स्थानिकच वक्ते असले तरच संमेलनास परवानगी देण्यात येईल असे कळवले. संस्थानातील रहिवाशी भाषण करताना आपल्याला याच संस्थानात रहावयाचे हे लक्षात घेऊन अतिशय संयमाने बोलेल व सरकारवर टीका करणार नाही असे सरकारला वाटत असावे. पहिल्या निजाम प्रांतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेब खापर्डे यांचे नाव संमत करुन घेताना बाबासाहेब हे अमरावतीचे म्हणजेच निजामाचे प्रजाजन आणि मुल्की असल्याचा युक्तिवाद करण्यात आला होता. दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष पोतदार हे हैदराबादचे तत्कालीन पंतप्रधान अकबर हैदर यांचे मित्र म्हणून त्यांच्या नावाला मान्यता मिळाली होती. परंतु माडखोलकरांच्या नावाला सरकारने प्रारंभी संमती दिली नाही. साहित्यपरिषदेचे कार्यकर्ते मात्र माडखोलकरांच्या नावाचा आग्रह सोडावयास तयार झाले नाही. संमेलनाचे स्वागताध्यक्ष हनुमंतराव वैष्णव, चिटणीस ज. प. मुळे व स. मा. गर्गे यांनी हैदराबादला चकरा मारून श्रीधर वामन नाईक व इतरांच्या मदतीने पंतप्रधानांच्या भेटी घेऊन माडखोलकरांच्या नावास संमती मिळवली व वक्ते मुल्कीच असावेत ही अटही वगळावयास लावली.

अशा परिस्थितीत औरंगाबाद येथे सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या प्रांगणात तिसरे मराठवाडा साहित्य संमेलन २८ व २९ में १९४५ रोजी भरले. दत्तो वामन पोतदारांनी आपल्या भाषणात मराठवाड्यातील मराठीच्या गळचेपीबद्दल उल्लेखही केला नव्हता. राज्यकर्त्यांवर यासंदर्भात वाङ मयीन चळवळीचा नेता म्हणून संमेलनाच्या अध्यक्षाने कोरडे ओढावेत ही अपेक्षा पूर्ण झाली नव्हती. माडखोलकरांनी मात्र अतिशय सडेतोडपणे मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या भावना त्यांचा एक जबाबदार नेता म्हणून आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडल्या. त्या मांडत असताना आपल्या भाषेची धार संकोचाने त्यांनी बोथटू दिली नाही. निजाम राज्यातील महत्त्वाच्या मराठी लेखकांचा उल्लेख करून माडखोलकरांनी प्रश्न उपस्थित केला की, 'अशा

राज्यातील मराठीच्या उपासकांना स्थानिक परिस्थितीशी विशेष परिचित नसलेल्या माझ्यासारख्या गैरमुल्की अध्यक्षासाठी निजाम सरकारशी हुज्जत घालण्याची काय गरज होती?' नागरिक स्वातंत्र्याच्या दृष्टिने हा प्रश्न मौलिक हक्कांचा आणि मूलभूत तत्त्वाचा होता, व म्हणून तो लोकपक्षाला अभिमानास्पद अशारीतीने सोडवून घेतल्याबद्दल त्यांनी स्वागत मंडळाचे अभिनंदन केले. दक्षिण भारताच्या कोणत्याही भागात मुल्की किंवा मादरी नसलेली उर्दु जबान ही ज्यांनी आपल्या विद्यापीठाची बोधभाषा केली व हैदराबाद संस्थान हे इस्लामी संस्कृतीचे केंद्र करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालवला त्या निजाम सरकारची कडक शब्दात हजेरी घेऊन माडखोलकरांनी मराठवाड्याचे महाराष्ट्राशी असलेले साम्य लक्षात घेऊन त्याच्या उन्नतीचा व भवितंव्याचा विचार करणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचा निर्वाळा दिला. राज्याबाहेरील गैरमुल्की असलेल्या उर्दु व फारशी ग्रंथकारांना उदार आश्रय देणाऱ्या सरकारने बाहेर जन्मलेल्या मराठी लेखकांना मात्र गैरमुल्की ठरवावे याचा धिक्कार करून माडखोलकरांनी मराठी आणि इतर लोकभाषांच्या संस्थानातील पायमल्लीकडे आपल्या भाषणात लक्ष वेधवले. पुढे जवाहरलाल नेहरूंच्या सारखे दृष्टे नेतेही ज्या तथाकथित दक्षिणी संस्कृतीच्या मोहाला बळी पडून संस्थानाच्या विभाजनाला विरोध करत होते. त्या दक्षिणी संस्कृतीची माडखोलकरांनी आपल्या भाषणात हजेरी घेतली आहे. दक्षिण टिरोल हा ऑस्ट्रियाचा प्रांत जिंकून घेतल्यानंतर इटलीने त्याचे इटालीकरण करण्याचा कसा प्रयत्न केला याचे उदाहरण देऊन अल्पसंख्यकांची संस्कृती आणि भाषा मराठवाड्यावर लादण्याचा प्रयत्नाचा माडखोलकरांनी धिक्कार केला आहे. आपल्या भाषणात त्यांनी मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगण यांना स्वायत्तता दिली जावी अशी अतिशय धाडसी मागणीही केली आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात आपले विचार मांडून फक्त माडखोलकर थांबले नाहीत. मराठवाड्याची साहित्य संस्था कशी चालवली जावी. या संबंधीचा एक आराखडा त्यांनी दिला आहे. साहित्य परिषदेच्या तालुकानिहाय शाखा स्थापन करा, परिषदेतर्फे एक मासिक चालवा, निदान चार ग्रंथ तरी दरवर्षी प्रकाशित करा. चांगल्या ग्रंथांना पारितोषिके द्या, प्रत्येक गावी वाचनालय उघडा. व ऐतिहासिक संशोधनासाठी औरंगाबाद किंवा हैदराबाद येथे एक केंद्र स्थापन करा आणि मराठीच्या अभ्यासाला उत्तेजन देण्यासाठी मराठीची परीक्षा केंद्रे चालवा असा एक कार्यक्रमच माडखोलकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितला आहे. हे संमेलन संपल्यावर माडखोलकर निदान दोन- तीन वेळा तरी हैदराबाद येऊ न गेले आणि त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. साहित्य संमेलनाचा अध्यक्ष हा केवळ शोभेचा नसतो तर त्याने साहित्य संस्थेला मार्गदर्शन करावे लागते हे आपल्या उदाहरणाने त्यांनी दाखवून दिले. माडखोलकरांचा आणि मराठवाड्यातील साहित्य चळवळीचा हा ऋणानुबंध आहे. मराठवाड्यातील वाङमयीन चळवळीचा पाया घालण्यामध्ये माडखोलकरांची भूमिका महत्त्वाची आहे.

१९४६ साली बेळगावच्या साहित्य संमेलनात माडखोलकरांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रीय नेत्यांनी विदर्भ मराठवाडयाकडे केलेल्या दुर्लक्षाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. मराठवाडा हा निजाम राज्याचा एक महत्वाचा घटक. शिक्षण स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य आणि मुद्रण स्वातंत्र्य या तिहींचा अभाव असलेल्या महाराष्ट्राच्या या आदिभूमीतील मराठीच्या संतांनाचा आज जो सर्व बाजूंनी कोंडमारा चालू आहे, त्याला उपमा शोधायला १७ व्या शतकातील जुलमी, बेजबाबदार मोगल राजवटीकडेच खरोखरी वळावे लागेल असे सांगून अल्पसंख्यांकाचे राजकीय प्राबल्य कायम ठेवण्यासाठी बहुसंख्यप्रजेची पद्धतशीर पायमल्ली आणि पिळवणूक

आज जर कुठे बेगुमानपणे चालली असेल तर ती निजाम राज्यातील मराठवाड्यात याची माडखोलकरांनी महाराष्ट्राला आठवण करुन दिली.

निजामाने आपल्या विद्यापीठाचे माध्यम उर्दू केले आहे याबद्दल राजगोपालाचारीपासून दत्तो वामन पोतदारांपर्यंत अनेकांनी स्तुती सुमने उधळली. मात्र ही उर्दू भाषा या भागातल्या बहुसंख्य जनतेची भाषा नाही तर त्यांच्यावर लादण्यात आलेली आहे याची जाणीव ठेवून मराठीच्या गळचेपीविरुद्ध फार कमी लोकांनी आवाज उठवला. अशा व्यक्तींच्यामध्ये माडखोलकर होते. माडखोलकर एका एकसंघ मराठी राज्याचे स्वप्न पहात होते ज्यात मराठीला राजभाषेचा दर्जा असेल व तिच्या विकासाची योग्य ती काळजी घेतली जाईल. म्हणूनच मराठवाडयातील मराठीच्या दुर्दशेकडे त्यांचे लक्ष गेले. धीटपणे त्यांनी ती व्यासपीठावर मांडली. साहित्यसंस्थेला बळ दिले आणि मराठी भाषिकांच्या संयुक्त महाराष्ट्राची मागणी करताना मराठवाडयाकडेही लक्ष देण्याचे आवाहन केले. विदर्भाच्या या सुपुत्राचे म्हणूनच मराठवाडा आज कृतज्ञापूर्वक स्मरण करतो आहे.

⁂⁂⁂

अनुक्रमणिका

## | दलितांचे हितचिंतक |

------------------------------------------------------------------ गंगाधर पानतावणे

भाऊसाहेब माडखोलकर यांचे व्यक्तित्व वादळी होते त्यात तिळमात्र शंका नाही. वाङमयीन व्यक्ति असोत, वाङमयीन प्रश्न असोत, नाहीतर राजकीय प्रश्न व राजकीय व्यत्ति असोत. भाऊसाहेबांची मते लोकविलक्षण होती. कदाचित पत्रकारितेच्या क्षेत्रात त्याचा वावर असल्यामुळेही असेल त्यांना चौकस दृष्टि लाभलेली होती आणि मग ते जेव्हा व्यक्तिगत स्वरूपात लिहू लागत तेव्हा एक प्रचंड वादही निर्माण होत असे. खुद्द आपल्या गुरूंनाही त्यांनी वगळले नव्हते. मग इतरांची काय कथा! म. गांधीच्या अस्पृश्यताविषयक दृष्टीत व धोरणात प्रारंभी व नंतर कसे अंतर पडले आहे. हे त्यांनी कठोरपणे सांगितले आहे. राजकीय व्यक्तिंमध्ये भाऊसाहेबांचा रुबाब होता पण कोणा एका राजकीय पक्षाशी त्यांची बांधिलकी नव्हती. अस्पृश्यांच्या प्रश्नांत त्यांना खूप रस होता. दलितांचे उत्थान व्हायला हवे, अशी त्यांची भूमिका होती. यांची काही कारणे संभवतात, असे मला वाटते.

भाऊसाहेब चिकित्सक होते आणि ही चिकित्सकता सर्वच बाबतीत प्रत्यक्षात येते. परंपरागत पुराणमूल्ये अतन करणारा हिंदू धर्म त्यांना ज्ञात नव्हता. समाज खरा पवित्र असते आणि या पवित्रतेच्या नावाखाली समाजात धुडघुस घालणाऱ्या प्रवृत्ती त्यांनी निषेधार्ह ठरविल्या होत्या. कोणतीही समाज सत्ता पवित्र नसल्यामुळे ती पूज्य आणि प्रमाण मानणे त्यांना शक्य नव्हते. जी समाजसत्ता जन्म आणि उच्चनीचतेच्या कल्पनेवर आधारित असते ती त्याज्य समजायला हवी. असा त्यांचा निर्वाळा होता. आणि त्यामुळेच जातीबद्धता आणि वर्णकल्पना त्यांना स्वीकृत नव्हत्या. साधारणतः वयाच्या पंचवीस वर्षापासूनच त्यांनी वर्णव्यवस्थेच्या कल्पनांना नकार देऊन. जोवर हया कल्पना नष्ट होत नाहीं तोवर हिंदू धर्माला भवितव्य नाही. या विचारसरणीमुळेच समाजाविषयीचा एक व्यापक असा दृष्टिकोण त्यांच्या विचारातून व व्यक्तित्वातून प्रतीत होताना जाणवत असे. भाऊसाहेबांना, दलितांच्या विषयी अपार सहानुभूती असण्याचे कारण त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लढे आणि विचार जाणून घेतले होते. बाबासाहेबांच्या बुद्धिप्रभेविषयी त्यांना नितांत आदर होता. बाबासाहेबांपूर्वी ज्या दलितांनी आत्मोद्धारासाठी युद्ध उभारले होते, त्याची जाणही त्यांना होती. हे युद्ध असले तरी त्याला काही मर्यादा होती. जागृती आणि मर्तपरिवर्तन हया त्यांच्या भूमिका तीव्र स्वरुपात व्यक्त होत नसत, त्याचे स्वरुप बरेचसे सौम्य होते. भाऊसाहेब आंबेडकरपूर्व दलित नेत्यासंबंधी मत व्यक्त करतात. म्हणतात की, "त्यात दलितांवर हजारो वर्षे होत असलेल्या अन्यायाबद्दल चीड असली तरी प्रतिकाराची भावना मात्र नवहती." (कै. ठवरे चरित्र आणि चारित्र्य : पार्श्वभूमी पृ. १२) अस्पृश्यांचा लढयांचा प्रारंभकाळ कृतीरुपतेच्या संदर्भात फार आक्रमक नव्हता असे जरी म्हटले तरी विचारांची आक्रमकता नाकारता येत नाही. ही धार आली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व विचारधारेशी स्पृश्यांनीही आपले नाते जोडायला हवे अशी बाबासाहेबांची इच्छा होती. म्हणूनच त्यांच्या लढयांशी अनेक सुवर्णवर्णियांनी संबंध बांधले होते. एवढेच नाहीतर, काही ब्राम्हण, चांद्रसेनीय कायस्थ प्रभु, भंडारी' मराठा या वर्गातील काही कार्यकर्ते त्यांच्या लढयात सहभागी झाले होते. पण ही माणसे थोडीच होती. आणि हया थोडया दलितेतरांविषयी बाबासाहेबांना विशेष प्रेम होते.

बाबासाहेबांच्या लढयांच्या अन्वयार्थ भाऊसाहेब माडखोलकर लावतात तेव्हा ते महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाला अग्रक्रम देतात. महाडचा संग्राम त्यांना धर्मसंग्रामाची रणभेरी वाटली. निर्लेपणे प्रतिपादन करतांना माडखोलकर म्हणतात की' "चवदार तळयावर त्यांचे जे आव्हानप्रद, ऊर्जस्वल व्यक्तित्व ता. २० मार्च १९२७ रोजी प्रगट झाले, त्याच्या प्रभावाने पुढे सर्व देश व्यापला व गांधीयुगाचा केवळ प्रत्यादेशच असे आंबेडकर युग त्या दिवशी भारतीय राजकारणात सुरु झाले. केवळ अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीपुरतेच नव्हे तर भारतीय राजकारणाच्या पुनर्घटनेच्या कार्यातही" (पूर्वनिर्दिष्ट ग्रंथ पृ. १६) बाबासाहेबांच्या चळवळीचे इतके मूलभूत मूल्यमापन माडखोलकरांनीच करावे!

परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वाकडे आणि नेतृत्वाकडे भारतातील काही राजकीय पक्षांनी दुर्लक्ष केले यांची खंत माडखोलकर व्यक्त करतात आणि त्याउलट ब्रिटिश सरकारने मात्र दखल घेतली याचा निवाळा देतात. साऊथबुरो कमीशनपासून जी अनेक मंडळे, भारतीय जनेतचा मताधिकार आणि राज्याधिकार यासंबंधी विचारविनिमय करण्यासाठी भारतात आली. त्या सर्व मंडळांनी साक्षीसाठी डॉ. बाबासाहेब निमंत्रित केले. एवढेच नाही तर भारताच्या भावी राज्यघटनेविषयी विचारविनिमय करण्यासाठी जी वर्तुळ परिषा, द विलायतेत आयोजित केली गेली, तीसही अस्पृश्यांना प्रतिनिधी म्हणून निमंत्रित केले गेले. यानंतरच म. गांधीनी यानंतरच म. गांधीनी डॉ. बाबासाहेबांची दखल घेतली, असे दिसते.

गांधी-आंबेडकर संघर्ष हा भारतीय राजकारणातील अटळ असा संघर्ष आहे. माडखोलकरांनी या संघर्षाची चर्चा करताना काही तथ्यें विशद केली आहेत. ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनी जातीय निवाडयाच्या अंतर्गत, शीख, मुसलमान' अस्पृश्य व अन्य अल्पसंख्यकांना विभक्त मतदार संघ दिला आणि ज्या अनुषंगाने काही राखीव जागा दिल्या होत्या. महात्माजी खरे अस्पृश्यांचे प्रश्न हिरीरीने मांडणारे पण त्यांनी इतर वर्गाना विरोध केला नाही तर तो केवळ अस्पृश्यांच्या विभक्त मतदारसंघाला केला. वस्तुतः जातीय निवाडयाची मूळ सूचना म. गांधी यांचीच होती. त्यामुळे माडखोलकर म्हणतात की, तत्वतः या निर्णयालागांधीजींनी बांधील राहायला हवे होते. पण तसे घडले नाही. उलट निर्णयाच्या विरोधात पुण्याला उपोषण आरंभ केले. त्यातूनच पुढे 'पुढे करार' उदयाला आला. गांधींजींच्या उपोषणामुळे, डॉ. आंबेडकरांचा अनुनय करण्याची पाळी गांधीजींच्या भक्तांवर व आप्तांवर आली असे माडखोलकर म्हणतात, ती वस्तुस्थिती आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला घटना दिली. पण त्यांनी आणलेले हिंदू कोड बिल संसदेने नाकारले. बाबासाहेबांपुढे आधुनिक भारत होता. त्यामुळे येथील व्यवस्थेत आमुलाग्र परिवर्तनाची त्यांना अपेक्षा होती. पण तसे घडले नाही. माडखोलकरांच्या मनातही या घटनेची बोच आहे. हिंदू कोडबिल स्वीकारले गेले असते तर काय घडले असते, याचा एक आलेख चितारताना माडखोलकर म्हणतात की, "हे बिल जर संसदेने स्वीकारले असते तर केवळ हिंदू समाजातील जाती जमातीच नव्हत तर बौद्ध, जैन, शीख इत्यादी सर्व भारतीय पंथोपपंथ कायद्याच्या समान भूमिकेवर येऊन, अखिल हिंदू समाजत वैधानिक आणि सांस्कृतिक एकात्मता उत्पन्न झाली असती. पण ही सूवर्णसंधी संसदेतील निरनिराळया प्रश्नांच्या आणि पंथांच्या सदस्यांनी दवडली, हे भारताचे केवढे दुदैव!" (पूर्वनिर्दिष्ट ग्रंथः पृ. २०) हिंदू कोड बिल, विध्यंसक नव्हते तर विधायक होते. परंतु सांप्रदायिकांनी एका अस्पृश्य महानेत्याने मांडलेले बिल म्हणून त्याकडे पाहिले आणि त्यातल्या रचनात्मकतेकडे दुर्लक्ष केले असे आढळून येते. माडखोलकर वस्तुनिष्ठेतेने या सर्व प्रकारांचा मागोवा घेऊन

भारतीय मानसिकतेची शोकांतिकाच व्यक्त करतात. आणि हिंदू समाज कसा अदूरदर्शी आहे असा आरोप करतात. डॉ. आबेडकरांचा हा वैधानिक व सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यासखस प्रयत्न हिंदू समाजाने हाणून पाडला याची एका परीने भाऊसाहेबांनी खंतच व्यक्त केली आहे.

माडखोलकर अस्पृश्यांच्या धर्मांतराचे/बौद्ध धर्म स्वीकाराचे विरोधक नव्हते. एका परीने या घटनेचे त्यांनी स्वागतच केले होते. बुद्ध धर्म हा समता व स्वातंत्र्यवादी आहे, असे त्यांचे मत होते. डॉ. बाबासाहेबांनी 'धर्मांतर' केले आहे, असे म्हणण्यापेक्षा 'धम्मचक्र प्रवर्तन' केले असे म्हणणे अधिक अन्वर्थक होईल, असे माडखोलकर म्हणतात, धर्मांतर म्हणजे एका धर्माचा त्याग करुन दुसऱ्या धर्माचा स्वीकार करणे एवढाच भाग. परंतु 'धम्मचक्रप्रवर्तन' म्हणजे अनात्मवादी, अनित्यतावादी आणि अनीश्वरवादी धम्माचे प्रवर्तन. या बुद्ध धम्माला चालना /गती देण्याचे कार्य, बुद्धानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले असा त्याचा अर्थ आहे.

१९२५ नंतर भाऊसाहेब माडखोलकरांचे वास्तव्य नागपूर/विदर्भात राहिल्याने ते विदर्भाचेच झाले होते. त्यामुळे विदर्भातील विविध चळवळींशी त्यांचे संबंध होते. विदर्भातील विविध क्षेत्रातील व्यक्तिंशीही त्यांचे अनुबंध होते. दलित चळवळीशींही त्यांचे संबंध होते. दलित समाजाविषयी व खळवळीविषयी त्यांना विलक्षण आस्था होती. ज्यावेळी ते दै. तरुण भारतचे संपादक होते. त्यावेळी, तरुणभारतातून दिलतांच्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली होती. दलितांना भाऊसाहेब हे आपले हक्काचे स्थान आहे, असे वाटे ते याचमुळे.

भाऊसाहेबांनी विदर्भातील दलित चळवळींचा मागोवा घेताना ती पश्चिम महाराष्ट्रातील दलित चळवळीपेक्षा वेगळी आहे, त्याची कारणमीमांसा देताना त्यांनी विदर्भातील दलितांमध्ये असलेली आर्थिक क्षमता, अन्य भागांपेक्षा अधिक आहे, असा हवाला ते देतात, शेती, विणकाम व जंगली व्यवसाय करण्यात अस्पृश्य महार पुढारलेले असल्याने त्यांची आर्थिक क्षमता अधिक आहे, असे त्यांना वाटे. कापड गिरण्या, रेल्वे, बिडी कारखाने यातही त्यांचा मोठा सहभाग होता. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने विदर्भात मोठया प्रमाणात समाजिक व सांस्कृतिक चळवळी झाल्या हेही क्षमतेस एक कारण आहे, असे माडखोलकरांना वाटे.

भाऊसाहेबा माडखोलकरांनी दलितांच्या विविध प्रकारच्या चळवळींना व कार्याला आपल्या दैनिकातून आत्मीयतेने प्रसिद्धी दिली हे निर्विवाद! नागपूरातील स्त्री शिक्षण चळवळीच्या प्रणेत्या जाईबाई चौधरी हयांच्या कार्यास त्यांनी जसे प्रोत्साहन दिले तसे ना. रा. शेंडे यांच्यासारख्या साहित्यिकाने, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्षपद भूषवावे म्हणून प्रयत्न केले आणि त्यात त्यांना यशही आले. जुन्या पिढीतील ग. आ. गवई, किसन फागू बंदसोडे पाटील, ग. म. ठवरे, हेमचंद्र खांडेकर इ. शी त्यांचे जिव्हाळयाचे संबंध होते आणि त्यांच्या कार्याला ते आपल्या पत्रातून प्रसिद्धिही देत. शंकरराव सुरडकरांच्या लेखनाचे भाऊसाहेब कौतुक करीत आणि जबलपूरसारख्या दूरस्थ ठिकाणी प्रशासक असलेल्या पण वृत्तीने लेखक असलेल्या ना. बा. जाधव प्रशंसा करीत. अलिकडील दलित चळवळीसंबंधाने ते विशेषत्वाने बोलत. 'अस्मितादर्श' विषयी त्यांना खूप आस्था होती. त्यातून त्यांनी लेखनही केले.

अनुक्रमणिका

दै. तरुण भारतात माडखोलकरांनी अस्पृश्यांच्या विविध प्रश्नांस वाचा फोडली. पुणे कौन्सिलवर १९४५ साली जेव्हा अस्पृश्यांनी आपल्या हक्कासाठी मोर्चा नेला होता व सत्याग्रह केला होता. त्यावेळी त्यांनी 'अस्पृश्यांना' डावलणे न्याय्य नाही' असा अग्रलेख लिहिला. अस्पृश्यांचा कायमच!' हा त्यांचा लेख काळजाला घरे पाडणारा होता. एका अस्पृश्याने आपल्या मुलाच्या प्रेताचे दहन स्पृश्यांच्या घाटावर केले म्हणून त्याच्या विरुद्ध स्पृश्यांनी खटला भरला आणि न्यायालयात अस्पृश्यांना शिक्षा झाली. ब्रिटिश काळातील म्हणजे १९४५ सालची ही घटना! या घटनेने व्यथित झालेले भाऊसाहेबांचे अंतःकरण द्रवले होते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली तेव्हा 'संयुक्त महाराष्ट्रात अस्पृश्यांचे स्थान काय?' असे विचारले ते भाऊसाहेब माडखोलकरांनीच!

अस्पृश्यांविषयीची उत्कट सहानुभूती त्यांच्या काही कादंबऱ्यातून प्रगट झाली आहे. त्या दृष्टीने 'चंदनवाडी' आणि 'अकेला' या दोन कादंबऱ्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. चंदनवाडीतील अभिमन या सुशिक्षित दलित तरुणाचे चित्रण स्पर्शी आहे. 'अकेला' मध्ये तर अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर त्यांच्यात होत असलेल्या मानसिक संघर्षाचे चित्र आहे.

नागपूरला भरलेल्या अ. भा. बौद्ध साहित्य संमेनाच्या मंचावरुन त्यांनी बौद्ध साहित्याची अपरिहार्यता विशद केली होती.

भाऊसाहेब माडखोलकर हे खऱ्या अथाने दलितांचे हितचिंतक होते. वैयक्तिक जीवनात त्यांनी अस्पृश्यता कधी पाळली नाही, उलट आपल्या घरात त्यांनी अस्पृश्य मुले वागविली. जातीभेद मोडणाऱ्या उपक्रमांना त्यांनी आयुष्यभर प्रोत्साहन दिले, उचलून धरले. अस्पृश्यांची बाजू ते हिरीरीने मांडत म्हणूनच दलितांनाही त्यांच्याविषयी ममत्व होते.

⁂⁂⁂

अनुक्रमणिका

## | माडखोलकरांची आत्मकथने |

-------------------------------------------------------------------प्रा. काशिनाथ वाडेकर

आयुष्याच्या संध्याकाळी पारावर बसून जीवनातील उगवती- मावळतीचे तपशील देणारे साग्रसंगीत आत्मचरित्र माडखोलकरांनी लिहिलेले नाही. तथापि आकाशवाणीवरच्या व्याख्यानमाला, मुलाखती, नियतकालिकांतील प्रासंगिक लेख, कसोटीच्या प्रसंगी व्यक्त केलेले विचारमग्न मनोगत अशा कितीतरी प्रकारानी माडखोलकर आपल्या जीवनाचा सतत आढावा घेत आलेले आहेत. 'तपशील बहुलता' हा त्यांच्या लेखनाचा मोठा विशेष समीक्षकांनी सांगितलेला आहे. व्यक्ती, प्रसंग स्थळ संवाद, परिणाम या सर्व घटकांची इतकी अचूक नोंद माडखोलकर सहज लेखनातूनही ठेवतात. वयाच्या १७ व्या वर्षापासून माडखोलकरांची लेखन कारकीर्द सुरु झाली. 'आधुनिक कविपंचक' हे पहिले पुस्तक १९२१ मध्ये प्रकाशित झाले. त्याही आधी कविता लेखनाला आरंभ झाला होता. वयाच्या सोळाव्या वर्षीच आपणास संयुक्त महाराष्ट्राच्या स्वप्नाने झपाटून टाकले होते. असे माडखोलकर स्वतः लिहितात. १९७६ मध्ये माडखोलकरांचे देहावसान झाले. सारांश, सुमारे साठ वर्षांच्या दीर्घ कृतिशील जाणत्या जीवनकाळा विषयी माडखोलकर सतत लिहीत बोलत आले.

१९६७ मध्ये त्यांनी नागपूरच्या दै. तरूणभारतच्या संपादकपदापासून निवृत्ती स्वीकारली. 'दोन तपे' हे आत्मचरित्रवजा आत्मकथान १९४६ मध्ये प्रसिद्ध झाले. माडखोलकरांच्या मते हे घटनांचे केवळ निवेदन होते. विश्लेषण नव्हते. तथापि निवेदन व विश्लेषण अशा दोन्ही स्वरूपाची कथने करणारे लेखन १९६३ पासून १९७२ पर्यंत म्हणजे 'मी आणि माझे वाचक' या पुस्तकाच्या पर्यंत चालू होते असे दिसते. अर्थात पुस्तकाच्या रूपात वाचकांपुढे आलेले लेख त्यापूर्वी विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेच होते. मी पाहिलेली अमेरिका, माझे आवडते लेखक, माझे आवडते कवी, माझे लेखन गुरू, व्यक्तिरेखा, मी आणि माझे सहित्य या प्रमुख ग्रंथांचा समावेश माडखोलकरांच्या आत्मकथनांमध्ये करायला हवा. त्याखेरीज म. गांधींच्या खुनानंतर नागपूरला जी जाळपोळ झाली तीत दै. तरूण भारतचे कार्यालय, शांतानिवास हे माडखोलकरांचे राहते घर, चिचभुवनचा निवारा यांचे जे विध्वंस झाले त्याचे धीरोदात्त व चिंतनाच्या पातळीवर जाणारे निवेदन 'एका निर्वासिताची कहाणी' या पुस्तक रुपाने उपलब्ध आहे. त्या काळयाकुट्ट चोवीस दिवसांचे तेरा दिवसांत पुरे केलेले वर्णन माडखोलकरांचे अतिशय महत्त्वाचे आत्मकथन ठरलेले आहे. वेगवेगळ्या नावांखाली पुस्तकरूपाने प्रकाशित झालेल्या आत्मकथनांमध्ये प्रसंगोपात्त माहितीची आणि भाष्यांची भर पडलेली दिसते. मराठी साहित्यक्षेत्रातील लिहिण्या लेखत्या, साहित्यकृती, विचारप्रवाह या बाबतचे माडखोलकरांचे कुतूहल फडके-खांडेकर-वरेरकर यांना ओलांडून अलिकडच्या काळात उतरलेले फारसे दिसत नाही. राजकीय चळवळी, विशेषतः महाराष्ट्राच्या राज्य निर्मिती, गोव्याचे महाराष्ट्रातील विलीनीकरण वगैरे प्रश्नांनी माडखोलकरांच्या पत्रकारमनाचा अधिक कब्जा उत्तरकाळात घेतलेला आढळतो. त्यामुळेच त्या काळातील साहित्यिक आत्मकथने कमी झालेली आहेत. मराठी साहित्याबद्दलची आपली आस्था कमी झाल्याची कबुली माडखोलकरांच्याच मुखातून मिळते. ती 'साहित्यिक गप्पांमधून'. जयवंत दळवींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरातून. '१९३६ नंतर मराठीचे वाचन झपाट्याने कमी झाले. फक्त इंग्रजीतून तत्त्वज्ञान, राजकारण, इतिहास आणि काव्य यांचे वाचन करतो. याचे कारण? 'वेळ नाही. आयुष्य संपत आले.' ही घटना १९७० च्या मानाची (ललित, एप्रिल १९७०) सविकल्प समाधीचा सिद्धांत ज्या भाषणामधून न. चिं. केळकरांनी मांडला ते इतिहास प्रसिद्ध भाषण तयार करण्याच्या कामी माडखोलकरांचे एवढे मौलिक सहाय्य त्यांना झाले की 'एका पोरसवदा लेखकाची मदत' घेतल्याचा

केळकरांवर नंतर आरोप झाला. तत्कालीन मराठी वाङमाचे विशेषतः आधुनिक मराठी काव्याच्या समालोचनाचे काम माडखोलकरांच्या टिपणांच्या आधारेच केळकरांनी पार पाडले होते. हेच मराठी साहित्याचे साक्षेपी साक्षीदार माडखोलकर नंतर मात्र मराठी साहित्याच्या वाचनापासून दूर गेले. आयुष्य संपत आले म्हणून मराठी साहित्य अधिक वेगाने वाचायचे सोडून इंग्रजी पुस्तकांचे वाचन माडखोलकर वाढवितात. ही आधुनिक मराठी साहित्याबद्दलची त्यांची निराशा की तत्त्वज्ञान राजकारण आणि इतिहास यां बद्दल त्यांना असणारे अधिक आकर्षण?

## पहिली दोन तपे

'दोन तपे' (प्रकाशक व व्यवस्थापक - रा. ज. देशमुख, पुणे २) या पुस्तकामध्ये माडखोलकरांनी आपले बालपण, पाठारे प्रभू समाजाच्या पौराहित्यामुळे वडिलांना प्राप्त झालेली सांपत्तिक सुस्थिती, विविध सामाजिक स्तरांशी मोकळेपणाचा संबंध, आई आणि वडील यांचे घडलेले दृढ संस्कार, मित्रमेळावा, मृत्यूचे घडलेले भयानक दर्शन, दारिद्र्याचा प्रवेश, शिक्षणाची फरफट वगैरे अनेक बाबतीतली उत्कट आत्मनिवेदने दिलेली आहेत. माडखोलकरांच्या आईचे संस्कृत, स्तोत्र पठण आणि पंचतंत्र, हितोपदेश या संस्कृत ग्रंथांचे वाचन होते. रघुवंशाचा दुसरा सर्ग आणि उत्तर रामचरितातील बहुतेक श्लोक आईमुळे मुखोद्गत झाले. 'पुस्तकस्य तु या विद्या परहस्तगतं धनम्' ही आई वडिलांची सक्त धारणा. त्यामुळे पाठांतराचा आग्रह. माडखोलकरांची आई तल्लख बुद्धीची पण दुर्दैवी होती. वयाच्या दहाव्या वर्षी बत्तीस वर्षांच्या बिजवराशी तिचा विवाह झालेला. सोळाव्या वर्षी गजाननाचा जन्म झाला. पुढे तिला क्षयाची भावना झाली. गजानन अकरा वर्षांचा असतानाच आई वारली. अतिशय सुंदर आणि मानी असणाऱ्या आई बद्दल माडखोलकरांनी हृदयस्पर्शी शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. 'गेल्या पस्तीस वर्षात मी पुष्कळ सुंदर स्त्रिया पाहिल्या पण माझ्या चिंतनात आणि स्वप्नात जर कोणती एक सौंदर्यमूर्ती पुनः पुन्हा प्रकट होत असेल तर ती माझ्या मातेची होय'. माडखोलकरांच्या मुंजीच्या भिक्षावळीच्या दिवशी रात्री बनारसी काळा शालू नेसलेली व सर्व अलंकारांनी नटलेली आईची सडपातळ गौरवर्ण मूर्ती माडखोलकरांना आयुष्यभर अवर्णनीय व अविस्मरणीय वाटत आली होती. आईच्या आयुष्यातील दुर्दैवाची, दुःखाची असत्य सलही माडखोलकरांनी सतत लिहून बोलून दाखवली. माडखोलकरांची भावंडे एकापाठोपाठ एक अशी मरण पावली. कुटुंबात सतत मृत्यु पाहावे लागले. स्त्रियांची दुर्दैवे न्याहाळावी लागली. याचा विलक्षण खोलवर परिणाम आपल्या कादंबरी लेखनावर झाल्याचे माडखोलकरांनी म्हटले आहे. "माझ्या आयुष्यात मी दुर्दैवी स्त्रियाच एकंदरीत जास्त पाहिल्या. माझी आजी, आई आणि बहीण या तिघीही आपापल्या परीने दुर्दैवीच म्हटल्या पाहिजेत." स्त्रियांच्या दुर्दैवाबरोबरच मृत्यूचे विदारक दर्शन माडखोलकरांच्या मनावर खोलवर धाव घालून गेले होते. 'चोवीस वर्षांत माझ्या जीवनावर सगळ्यात प्रबळ संस्कार झालां तो मृत्यूचा. पूर्वायुष्य काळवंडून गेले. मृत्यु जणू जन्मसहचरच', पुढे १९५० मध्ये सौ. शांताबाईंचा कर्करोगाने झालेला मृत्यू पाहावा लागला. स्वतः माडखोलकरांना क्षयाची भावना झाल्याचे त्यांनी अनुभवले. वाचकांनी अनेकदा माडखोलकरांना तळमळून प्रश्न विचारला- 'तुमच्या कादंबरीत मरणाचेच प्रसंग कां येतात? विशेषतः चंदनवाडी कादंबरीमध्ये चंदन आत्मघात करते. तिची आईच घात करायला लावते. असे कां? "माडखोलकरांनी लिहिलय - 'ही शेवटची प्रकरणे लिहिली जात असताना माझ्या डोळ्यांतून कितीदा तरी आसवे गळली.'

असे असताही नागकन्या, डाकबंगला, शाप या व अशा कादंबऱ्यांमध्ये उत्तान श्रृंगार बहरास येतो. फडक्यांनी तर नागकन्येस 'नागवी कन्या' असे म्हटले. 'तुमच्या सारख्या विरागी माणसाला श्रृंगार सुचतोच कसा?' असाही प्रश्न माडखोलकरांना विचारला गेला. मग 'ज्याच्या आयुष्याची ट्रॅजेडी झालेली असते त्याचा विशेष कल कॉमेडी लिहिण्याकडे असतो.' असे माडखोलकर म्हणून जातात. कृतार्थतेचा उत्सव साजरा करीत असताही एक वैफल्याची दु:खाची छाया माडखोलकरांच्या लिहिण्यावर पसरलेली जाणवत राहते. हे वैफल्यही झुंजार आयुष्यातून आलेले असते. निकराचा लढा देऊन दुःख पचविण्याचा शूर प्रयत्न त्यामागे निश्चितपणे असतो. आई खालोखाल माडखोलकरांवर वडिलांचा प्रभाव होता. आपल्या वडलांबद्दल ते म्हणतात, "वडिलांनी माझी मुंज होण्याआधी रामरक्षा अथर्वशीर्ष, महिम्न, गंगालहरी, विष्णुसहस्रनाम वगैरे संस्कृत स्तोत्रे शिकवली. मुंज झाल्यावर पुरुषसूक्त, अमरकोश, रघुवंशाचे पहिले पाचसर्ग, उत्तररामचरित, मेघदूत, केकावली आणि आर्याभारतातले युद्धपर्व - हे सर्व पाठ करवून घेतले.' माडखोलकर संस्कृतात ही कविता रचना करू लागले.' माझ्या आईच्या खालोखाल माझ्या मनावर माझ्या वडलांच्या सौजन्याचा, चारित्र्याचा आणि औदार्याचा परिणाम झालेला आहे., वडील शिवभक्त होते. परिणामी 'बाबांनी वयाच्या चौदाव्या वर्षी न कळत जी शिवदीक्षा दिली तिने माझ्या आंतरजीवनावर चिरंतन परिणाम केला. मनुष्याने शैव व्हायचे म्हणजे अंतर्बाह्य शिव-शुचि विरक्त वृतशील राहावयाचे असे ते म्हणत.' याचा परिणाम म्हणून 'आचाराने जरी मी शैव नसलो तरी विचारांनी आणि वृत्तीने मी शैव आहे. शिवचिंतन म्हणजे विश्वातील सगळ्या मांगल्याचे, भव्यतेचे आणि रूद्रतेचे चितन असे माडखोलकरांनी आत्मनिरीक्षण नोंदवले आहे. 'मी बुद्धीने अज्ञेयवादी असून धर्मशील आणि सनातनी राहिलो. परदेशातही सोमवारच्या व्रतात, स्तोत्र पाठात किंवा आसनात खंड पडला नाही. याचे कारण वडिलांची कडक शिस्त आणि काटेकोर शिक्षण यांच्यामुळे मी दीर्घायुषी व सत्प्रवृत्त राहिलो.' संस्कृत भाषा आणि प्राचीन वाङमय यांच्या पठण परिशीलनातून आपण सत्प्रवृत्त झालो आहोत याची सतत जाणीव माडखोलकरांना होती. 'माझ्या वाङमयापेक्षा मी कितीतरी चांगला आहे.' 'मी तत्वतः मार्क्सवादी असली तरी माझी मनोवृत्ती अध्यात्मिक आहे. कम्युनिस्ट अध्यात्म मानत नाहीत- मी मानतो.' हे मार्क्सवादी अध्यात्मिक प्रवृत्तीचे मिश्रण माडखोलकरांच्या ठायी उत्पन्न होण्याचे महत्त्वाचे कारण वडिलांचे संस्कार आणि भारतीय परंपरांशी त्यांची जुळलेली तार हेच असावे. माडखोलकर आपला आत्मकथनातून ते सतत सूचित करतात. जिन्सीवाले आणि राजारामशास्त्री भागवत यांच्या तोडीचा पंडित प्राध्यापक मी बनावे ही वडलांची इच्छा आणि पाश्चात्य व भारतीय साहित्यशास्त्र वाचून नवसाहित्यशास्त्र लिहावं ही गुरू कोल्हटकरांची अपेक्षा आपण पुरी करू शकलो नाही. 'माझे वडील व गुरू या दोघांची मी निराशा केली' या शब्दांत माडखोलकरांनी खंत व्यक्त केली आहे. 'पूर्वायुष्याची परवड ध्यानात घेऊनच माझ्या साहित्याचा विचार व्हायला हवा' (मी आणि माझे वाचक) असे माडखोलकरांनी आग्रहपूर्वक म्हटलेले असल्याने त्यांची पूर्वायुष्याबद्दलची आत्मकथने विशेष महत्त्वाची ठरतात.

सर्वश्री रा. ल. पराडकर, द. प. नवरे, वि. ह. कुळकर्णी, शं. ग. वैद्य, त्र्यं. वि. पर्वते या बालमित्रांसंबंधी माडखोलकरांनी तपशीलवार आणि आत्मीयतेने लिहिलेले आहे. त्यापैकी नवरे यांच्या घरी माडखोलकर सतत वास्तव्याला असायचे. एकेदिवशी नवरे यांच्याशी भांडण होऊन माडखोलकरांनी नवऱ्यांनाच त्यांच्या घरातून हाकलले आणि! 'मसणात जा' म्हणून फर्मावले. नवरे खरोखरीच सोनापूरच्या स्मशानभूमीत जाऊन मध्यरात्रीपर्यंत बाकड्यावर बसून राहिले. माडखोलकरांनी स्नेहभावाने हा प्रसंग वर्णिला

आहे. संसार विषवृक्षाची काव्यामृत रसास्वाद आणि सुजनसंगती ही दोन अमृतफले असतात. ही दोन्ही अमृतफले विशेषतः सुजनसंगती हे फल आपणास सर्वात जास्त आले असे माडखोलकर मानीत.

आयुष्यभर माडखोलकरांना साथ करणारे त्यांचे दोन जिवलग मित्र म्हणजे प्रा. वि. ह. कुळकर्णी (ते त्यांचे साडू ही बनले) आणि कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे. मुंबईच्या 'मेरा सर्कल' नावाच्या विद्यार्थी संस्थेत डांगे होते. या अभ्यास मंडळासारख्या संस्थेच्या शिवजयंती उत्सवाच्या निमित्त्याने डांग्यांचा माडखोलकरांशी परिचय झाला आणि आयुष्यभरचा स्नेह जुळला. ठाकुरद्वार भागातील एका तिमजली इमारतीच्या वरच्या जमल्यावर सर्कलच्या सभा भरत. या सभेतच 'केशवसुतांचा संप्रदाय' हा माडखोलकरांचा लेख वाचून दाखवण्यात आला. गडकरी हे डांगे माडखोलकरांचे आवडते कवी. गडकरी व केशवसुत यांच्या उत्कृष्ट कवितांचे इंग्रजी अनुवाद करून पुस्तक काढायचे. मराठी कविता जगापुढे यायला हवी. हा आग्रह डांगे यांनी माडखोलकरांकडे धरला होता. इंग्रजी वर टीकालेख लिहावेत ही डांग्याचीच शिफारस. डांग्यांमुळे कम्युनिस्ट विचारसरणीचे आकर्षण माडखोलकरांच्या ठिकाणी निर्माण झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये शंकरराव देव हे डांगे यांना प्रवेश द्यायला नाखूश होते माडखोलकरांनी जोरदार शिफारस करुन त्यांचा प्रवेश घडविला. माडखोलकरांचे वडील कर्जबाजारी झाल्याच्या धक्क्याने ते अर्धांगवायूचा झटका येऊन अंथरुणाला खिळलेले. दारी सावकरांनी पठाण बसवलेले अशा वेळी डांग्यांनी युक्ति ने माडखोलकरांच्या वडलांना गाडीत बसवून पुण्याला सुखरूप पाठवून दिले. डांगे यांच्या प्रखर बुद्धीमत्तेच्या, क्रांतीच्या धगीच्या कितीतरी आठवणी माडखोलकरांच्या आत्मकथानामधून वाचायला मिळतात. माडखोलकरांच्या मुक्तात्मा कादंबरीतला नायक चंद्रशेखर कॉम्रेड थांगे यांच्याशी जुळवणारा वाटतो. आपल्या क्रांतिकार्याचे यथातथ्य वर्णन मुक्तात्मा मध्ये आले आहे. असे डांगे यांनी ही म्हटल्याचे माडखोलकर सांगतात.

**रविकिरण मंडळ - माधव ज्यूलियन आणि कवी यशवंत :-**

१९२१ मध्ये माडखोलकर मुंबईहून पुण्याला आले. ते कै. न. चि.केळकर यांच्या बोलण्यावरून केसरीमध्ये माडखोलकरांनी आयर्लंडच्या सिनफेन चळवळीवर लेखमाला लिहलेली होती. शिवाय 'आधुनिक कवि पंचक' या समीक्षाग्रंथाने विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधांवरील टीका लेखनाने माडखोलकरांच्या लेखनसामर्थ्यां बद्दल कोल्हटकर- केळकर यांनाही कुतूहल निर्माण झालेले. पुण्यातील वास्तव्यामध्ये माडखोलकरांचे वाङमयीन व वृत्तपत्रीय व्यक्तिमत्व घडविण्याच्या दृष्ट्रीने दोन घटना महत्त्वाच्या ठरतात. त्या म्हणजे रविकिरण मंडळातील क्रीयाशील सहभाग आणि न. चि. केळकर यांच्या हाताखाली वृत्तपत्रीय लेखनाचे त्यांनी घेतलेले धडे. न. चि. केळकर व श्री. कृ. कोल्हटकर या 'दोन तात्या' बद्दल अत्यंत कृतज्ञतेचे उद्‌गार माडखोलकरांनी विविध आत्मकथनांमधून काढले आहेत. 'दोन तात्या' हा 'माझे आवडते लेखक' या पुस्तकातला लेख पाठ्य पुस्तकांमधून महाराष्ट्रातल्या विद्यार्थी पिढ्यांनी अभ्यासला आहे.

प्रा. श्री. बा. रानडे यांच्या घरी Sunday Tea Club म्हणजेच रविकिरण मंडळ अनौपचारिकपणे स्थापन झालेले. 'श्रीधर मनोरमा' हा मराठी कवितेतला आणि पुण्याच्या साहित्यिक जीवनातला त्यावेळचा द्वंद्व समास होता, यशवंत, गिरिश, माधवराव पटवर्धन ऊर्फ ज्यूलियन, विठ्ठलराव घाटे, श्री. बा. रानडे, मनोरमाबाई आणि ग. त्र्यं. माडखोलकर हे रविकिरणमंडळाचे सदस्य, माडखोलकरांच्या ज्ञानप्रकाशाने 'काव्यशास्त्र विनोद'

अनुक्रमणिका

पुरवणीतून रविकिरण मंडळाच्या चळवळीला लोकप्रियता मिळवून दिली. रविकिरण मंडळाच्या माधव ज्यूलियन आणि कवी यशवंत यांच्याशी माडखोलकरांचा विशेष घनिष्ट संबंध जुळून आला. माधव ज्यूलियन च्या प्रणयप्रधान कविता ज्ञान प्रकाशातून येऊ लागल्या खळबळ उडाली. नाव ही झाले. माधव ज्यूलियनांच्या 'वरदा नायडू' या प्रिय विद्यार्थिनीच्या संदर्भात ज्या गरमखमंग चर्चा, घटना घडून आल्या त्या सर्वांना माडखोलकर साक्षी होते. ते माधव ज्यूलियनांना समजून घेणारे ठरले. पुढे माधव ज्यूलियनांच्या तापट, हेकेखोर स्वभावामुळे त्यांचे माडखोलकरांशी संबंध पराकोटीचे बिघडले. माधव ज्यूलियनांच्या वाङ्मयीन विकास प्रक्रियेबद्दल माडखोलकरांनी आनंदाने तसेच स्वभाव वैशिष्टयाबद्दल व विषादानेही विस्तृत आत्मकथन केले आहे. ते मुळातूनच वाचायला हवे. घटनांचे, उद्‌गारांचे विचारांचे एवढे तपशील माडखोलकरांखेरीज आणखी कुणी देऊ शकले असते की नाही या बद्दल शंकाच आहे. कवी यशवंतांचे माडखोलकरांवर निरतिशय प्रेम होते. 'माझे आवडते लेखक' या पुस्तकात माडखोलकरांचे कवी यशवंतांबाबतचे अपराधी मनाचे निवेदन येते. ते असे 'माधवज्यूलियन यांच्या कवितेच्या बाबतीत एक प्रकारचा प्रसार करण्याची आवश्यकता मला वाल्यामुळे त्यांना जितका माझ्या या संबंधाचा फायदा मिळाला तितका तो श्री यशवंत यांच्यावर माझे नितांत प्रेम असून ही, त्यांना मिळू शकला नाही. माझ्या हातून बुद्धि पुरस्सर घडणारा हा पक्षपात जरी त्यांना फार लागत असे तरी त्यांचे मजवरील प्रेम मात्र अढळच राहिले.' वैद्यकीय उपचारासाठी कवी यशवंत माडखोलकरांना येरवड्याला आपल्या घरी दोन महिने घेऊन गेले. त्यावेळी माडखोलकर यशवंतांना म्हणाले, "यशवंतराव, या दुखण्यात जर मला मरण आले तर मी पुढच्या खेपेस तुमच्या पाठचा भाऊ म्हणून जन्माला येईन.' (माझे आवडते लेखक पृ. क्र. ९०)

## दोन तात्यांबद्दलची निवेदने

१९२१ मध्ये केसरीच्या संपादनकार्यात मदत करण्यासाठी केळकरांनी माडखोलकरांना पुण्यास बोलावून घेतले. केळकर व श्री. कृ. कोल्हटकर यांना माडखोलकरांचे गुरु मानले जाते. केळकर माडखोलकरांना पित्याप्रमाणे पूज्य वाटत तर कोल्हटकरांनी त्यांना मातेची ममता दाखविली. म्हणून कोल्हटकर त्यांना गुरुमाऊली वाटत. वृत्तपत्र व्यवसायातील कला आणि कारागिरी केळकरांनी माडखोलकरांना शिकविली. कोल्हटकरांपासून माडखोलकरांनी जीवनाकडे रसिकतेने पाहण्याची वृत्ती घेतली. चोखंदळ सौंदर्यदृष्टी संपादन केली. केळकर माडखोलकरांकडे भरपूर अवांतर वाचन करण्याचा आग्रह धरीत. केवळ वृत्तपत्रातील लेखनावर पैसा व कीर्ति यांची कमाई होणार नाही. याची जाणीव केळकरांनी करून दिली. बडोदा साहित्य संमेलनातील केळकरांच्या अध्यक्षीय भाषणातील सद्यःकालीन वाङमयीन घडामोडींचा आढावा केळकरांनी माडखोलकरांच्या साह्याने घेतला. याचा उल्लेख पूर्वी येऊन गेलाच आहे. डॉ. केतकरांच्या ज्ञानकोशांवर विस्तृत व मर्मग्राही परीक्षण केळकरांच्या सांगण्यावरून माडखोलकरांनी लिहिले. परीक्ष्य ग्रंथ आणि ग्रंथाकार यांचा थोडक्यात परिचय, ग्रंथाचे गुणदोष दिग्दर्शन, ग्रंथाच्या वाचनाने सुचलेले विचार, प्रतिपाद्य विषयाची ग्रंथात न आलेली पण परीक्षकाला असलेली माहिती, सदृश ग्रंथ आणि ग्रंथाकार यांच्याशी सूचक तुलना, ग्रंथातील तत्वांची किंवा सिद्धांतांची साधक बाधक चर्चा इतके मुद्दे ग्रंथ परीक्षणात असावेत. हे केळकरांकडून माडखोलकरांनी समजावून घेतले. तसा उल्लेखही माडखोलकर करतात. न. चि. केळकर हे माडखोलकरांचे आवडते लेखक होते. ते म्हणतात, 'चिपळूणकरांच्या खालोखाल बुद्धी लेखनशैलीवर केळकरांच्या लेखनाचा परिणाम झाला आहे. १९२१ च्या उत्तरार्धात लेखनकलेचे व टीकापद्धतीचे पत्यक्षाप्रत्यक्ष

शिक्षणच केळकरांकडून मिळाले. त्याला मोल नाही,' 'कलाकुसर, रंगढंग, नोकझोंक केळकरांइतकी अन्य कोणत्याही लेखकात आढळत नाही.... माझ्या मनाच्या क्षितिजावर चिपळूणकर आणि केळकर या दोनच व्यक्ती ठळकपणाने उभ्या असलेल्या दृष्टीस पडतात. (मी आणि माझे साहित्य.) तात्यासाहेब कोल्हटकरांबद्दल माडखोलकरांना विलक्षण ममत्व आहे. भावनिक ओढ आहे. पायावर मस्तक ठेवण्या एवढी भक्ती आहे. नवयुगाच्या गडकरी अंकामध्ये माडखोलकरांनी लिहिलेला गडकऱ्यांवरील लेख वाचून कोल्हटकरांनी माडखोलकरांना भेटीस बोलावले. विविध ज्ञानविस्तारचे संपादक रावसाहेब मोरमकर, यांच्याकडे कोल्हटकरांची पहिली भेट झाली. माडखोलकरांच्या 'आधुनिक कविपंचक,' विष्णुशास्त्री चिपळूणकरांवरील टीका निबंध या पुस्तकांची हस्तलिखिते शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या वह्या तपासाव्यात त्या प्रमाणे कोल्हटकरांनी तपासली असे माडखोलकर कृतज्ञतेने म्हणतात. टीका लेखनासंबंधीचे काही महत्त्वाचे मार्गदर्शनही कोल्हटकरांनी केले. 'आपण लिहितो त्या प्रमाणे लिहिणाऱ्या समकालीन लेखकांच्या ग्रंथांचे परीक्षण शक्यतोवर करावयाचे नाही. निदान प्रतिकूल तरी लिहावयाचे नाही. कठोर टीका पद्धतीने लिहिण्याची सवय जर का एकदा आपल्याला लागली तर आपले मन दुष्ट होऊन जाईल. आणि वाङमयाच्या क्षेत्रात न्हाव्याचे आणि मारेकऱ्यांचेच काम आपण जन्मभर करीत राहाल' असा निर्वाणीचा इशारा कोल्हटकरांनी दिल्याचे माडखोलकर लिहितात. उपरोधाचा वापर टीकेत करण्याचाही कोल्हटकरांचा सल्ला होता. कोल्हटकरांना तरूण माडखोलकरांनी लेखनजीवनातील गुरुपद अढळपणे अर्पण केल्यावर त्याच विनम्र भूमिकेतून, कोल्हटकरांना ज्येष्ठ वद्य २, शके १८४३ या तिथीने जे सविस्तर पत्र पाठविले आहे ते माडखोलकरांचे अत्यंत मोलाचे आत्मकथन आहे. वयाच्या एकवीस बावीसाव्या वर्षी आपल्या क्षमतांचा, ध्येयाचा, सामाजिक परिस्थितीचा जो विलक्षण अंदाज माडखोलकरांना आलेला होता तो पाहिला की मन थक्क होते. या निवेदनातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे –


(१) बहुतेक सर्व मराठी वाङमय मी काळजीपूर्वक वाचले आहे. इंग्रजीतील कवितेवरील बहुतेक टीकालेख वाचले आहेत. वर्ड्सवर्थ, टेनिसन, शेले, कीट्स, मूर, वायरन यांची कविता वाचली आहे. आयर्लंड, इटली या दोन देशांचा इतिहास वाचला आहे. अलिकडील राजकारणावरील जे हिंदी, इंग्रजी वाङ्मय बाहेर पडले ते (मी) निष्ठेने अभ्यासले आहे. तुकाराम, रामदास, मोरोपंत व लावणी वाङ्मयाच्या अभ्यासाबरोबर संस्कृत नाटके व कविता पाठ आहेत.

(२) महाराष्ट्राची वाङ्मयीन व राजकीय उन्नती व्हावी आणि उद्याच्या हिंदुस्थानातील संयुक्त संस्थानात (United States of India) त्याचा दर्जा सर्वतोपरी पहिला असावा.

(३) वाङ्मयावर माझी भिस्त आहे. कवी, लेखक यांच्या वाणीतून नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत विभंगलेल्या सर्व महाराष्ट्रात एकच ध्वनी उठाव हे माझे अभिलीषित आहे.

(४) लेखक स्वतः प्रतिभासंपन्न, मेहनती, व्यासंगी असला पाहिजे, तर तो दिशा दाखवील.

(५) परमेश्वराने मला बुद्धिबळ विशेष प्रकारचे दिले आहे. वि. कृ. चिपळूणकरांचे सर्व दोष निष्ठुरपणाने दाखविल. बाळ गंगाधर टिळक हा निबंध निःपक्षपातीपणाने लीहिला.



**कन्या सौ. मीना व नातवासह भाऊराव.**

अनुक्रमणिका

**विशेष महत्वाचे प्रतिपादन :-**

(६) राजकारणाला दिवसेंदिवस सामाजिक स्वरूप येत आहे. हिन्दुस्थानातील बहुजन समाज हा अब्राह्मण आहे. व मागासलेला आहे. त्या समाजाचा उद्धार म्हणजेच हिंदुस्थानाचा उद्धार.

(७) माझे नवीन विचार महाराष्ट्रापुढे ठेवण्यासाठी मला वर्तमानपत्र काढणे भाग आहे. चारच वर्षांनी मी तो उद्योग करीन. महाराष्ट्राचा इतिहास, राज्यनीतीशास्त्र, आयर्लंडचा इतिहास, समर्थांची स्फुटिक कविता, अर्वाचीन गद्यलेखक हे ग्रंथ लिहिण्याचा संकल्प माडखोलकरांनी या विचारगर्भ पत्रात सोडला आहे. राजनीती व समाजकारण हे दोन विषय माडखोलकरांना साहित्या इतकेच प्रिय होते. संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न तर त्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षापासून पाहिले होते. बहुजन समाजाच्या न्याय्य हक्कांबाबतची जाण, समता न्याय यांची बूज हे माडखोलकरी विचाराचे लक्षणीय पैलू इतक्या कोवळ्या वयातील पत्रातूनही ठळकपणे दिसून येतात. म्हणून या आत्मकथनाचे विशेष महत्व जाणवते.

**पत्रकारितेबाबतचे मनोगत :-**

आपण पत्रकार व समीक्षक आहोत. नंतर कादंबरीकार, कथाकार आहोत. ‘मी जातीचा प्रथम अभिजात लेखक नव्हे’ अशी निवेदने माडखोलकरांच्या मुलाखती व लेख यांमध्ये वारंवार येतात. ‘मी तर एक वर्तमानपत्री लेखक. अभिजात वाङ्मय निर्माता नव्हे’ (मी आणि माझे साहित्य). १९२३ ते १९६९ या शेहेचाळीस वर्षांच्या दीर्घकालावधीत विभाग संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक, मुख्य संपादक आणि ज्येष्ठ संपादक, अशा विविध पदांवरून माडखोलकरांनी पत्रकारितेचे व्रत दृढनिश्चयाने चालविले. राजकीय लेखक आणि साहित्य समालोचक अशा प्रामुख्याने दोन भूमिका त्यांनी अंगीकारल्या. संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार आणि महात्मा गांधींच्या राजकीय विचारांना परखड विरोध या कृत्यांचे परिणाम माडखोलकरांना म. गांधींच्या हत्येनंतर नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीत गंभीर रीत्या भोगावे लागले. १९४४ नंतर तर मुख्यतः राजकीय स्वरूपाचे लेखनच ते दै. तरूण भारत मधून करीत. ज्ञानप्रकाश, महाराष्ट्र, तरूण भारत ही वृत्तपत्रे, नवयुग, उद्यान, इंदुप्रकाश, केसरी वगैरे नियतकालिके यांमधून माडखोलकरांनी वृत्तपत्रीय लेखन केले. १९४४ ते १९६७ या दीर्घकाळात नागपूरच्या तरूण भारताच्या बुद्धी विकासासाठी तर माडखोलकरांनी ममत्वाने स्वतःला वाहून घेतले होते. ६८ रू पगारावरून तरूण भारतामधील निवृत्तीच्या वेळी केवळ ७०० रू. पगारापर्यंत त्यांच्या आर्थिक प्राप्तीची मजल गेली होती. यासाठी माडखोलकर, सेवा किंवा त्याग हे शब्द न वापरता ‘आत्मसमाधान’ हा शब्द वापरतात. “चरितार्थासाठी वृत्तपत्र व्यवसायात शिरणे भाग पडले” (मी आणि माझे वाचक.) ‘दुसरा कोणताही धंदा करणे मला शक्य नव्हते म्हणून मी वर्तमानपत्राच्या धंद्यात पडलो”. (मी आणि माझे साहित्य) असे माडखोलकर काही वेळा कडवटपणाने म्हणाले. तसे समीक्षा लेखन, वृत्तपत्र लेखन व कादंबरीलेखन यांच्या संदर्भात कठोर टीकेची विषादयुक्त प्रतिक्रिया म्हणून माडखोलकर उपरोधाने स्वतःबद्दल लिहितात. पण एरवी ‘मुक्त व्यवसाय’ या शब्दात त्यांनी पत्रकारितेचा गौरवच केला होता. ‘वृत्तपत्राच्या धंद्यात पडल्याने पराक्रम गाजवण्याची स्वतःच्या बुद्धीची चमक दाखवून वाचकांच्या मनावर परिणाम करण्याची, स्वतःला प्रिय असलेल्या कल्पना आपल्या घणाघाती लेखन शैलीत लोकांच्या बुद्धीवर सतत ठसविण्याची संधी मिळते म्हणून या धंद्यात पडलो असे आत्मगौरवाने ‘दोन तपे’ मध्ये माडखोलकरांनीच लिहिले आहे. ‘वृत्तपत्रव्यवसायात

पडल्याने जगाच्या सामुदायिक मनाशी मला समरस होण्याची संधी मिळाली' या शब्दात माडखोलकर जयवंत दळवींच्या प्रश्नाला दिलखुलास उत्तर देतात (साहीत्यिक गप्पा पृष्ठ क्र. ५६) वर्तमानपत्राचा धंदा अजून शास्त्र निबंद्ध झालेल्या नाही. म्हणून त्याला माडखोलकर 'मुक्त व्यवसाय' म्हणतात. या व्यवसायात शिरायला पदवी, प्रमाणपत्र लागत नाही. लॉर्ड मोर्लेनी सांगितलेल्या चुटक्याच्या आधारे म्हणता येते की वृत्तपत्र व्यवसायात 'सर्रास शिव्या' मात्र देता याव्या लागतात. वृत्तविद्यालयात शिकल्याने कोणी संपादक होऊ शकत नाही. वृत्तपत्र व्यवसायाचे शास्त्र झाल्यास त्याला साचेबंद स्वरूप येईल. हया धंद्यात हमी, शाश्वती नाही. विचार स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य यांचा उपभोग घ्यायला लोकोत्तर साहसच लागते'. असे वृत्तपत्र महात्म्य गात असतानाच माडखोलकर इशारा देतात. - 'दर्यावर नशीब काढायला निघालेला नाविक जसा केव्हा चाचेगार बनतो. तसेच महत्वाकांक्षी वृत्तप्रकाराचेही कधी कधी होते.' तथापि "या अधःपातांतही एक प्रकारचा जोम व जोष आहे व या मुक्त व्यवसायाच्या स्वातंत्र्याला तरी त्यामुळे बाधा येत नाही. टीकालेखकाने माडखोलकरांना भलीबुरी मुबालक प्रसिध्दी दिली. तात्यासाहेब कोल्हटकर हे साहित्य गुरु हे टिकालेखनानेच माडखोलकरांना मिळवून दिले. कादंबरी, कविता, नाटक वगैरे लेखनप्रकारा बरोबर राजकीय स्वरुपाचे मला एकवेळ शिवराळपणा पत्करेल पण खुषमस्करेपणा पत्करणार नाही. 'राईट अप' चा तेजीमंदीचा सट्टा खेळणारा वृत्तपत्रकार सबंध देशाला फसवू शकतो. म्हणूनच वृत्तपत्रकार लोकसंमुख असावा लागतो. समाजनिष्ठ असावा लागतो. जगाच्या सामुदायिक मनाशी अहर्निश तो बोलत असतो. "मी आणि माझे साहित्य' या ग्रंथातील हे निवेदन माडखोलकरांच्या वृत्तपत्रव्यवसायाच्या स्वधर्माचे अस्सल रूप वाचकांसमोर उभे करते.

**टीकालेखनाबाबतचे हृद्गत :-**

टीकालेखनाबाबत माडखोलकरांनी दोन प्रकारची निवेदने मांडली आहेत. एक म्हणजे स्वतः विविध ग्रंथ, चळवळी, मतप्रवाह, घटना वगैरेबाबत केलेल्या समीक्षा लेखना विषयी. दुसरे निवेदन येते ते माडखोलकरांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया म्हणून त्यांच्या कादंबऱ्यांवरील अभिप्राय म्हणून येणाऱ्या टीकालेखनावरील. टीका ही नेहमी प्रतिटीका प्रेरत जाते. टीकेचे मोहोळ उठवत जाणे हे एकूण माडखोलकरांना प्रिय असावे किंवा त्यांच्या कपाळावरील लहान खड्ड्याचा तो ज्योतिषशास्त्रीय परिणाम तरी असावा. माडखोलकर १९२९ मध्ये वाचकांपुढे प्रथम आले ते समीक्षक किंवा टीकाकार म्हणूनच. माडखोलकरांच्या 'दोन तपापैकी पहिल्या तपातच आधुनिक कविपंचक, विष्णु कृष्ण चिपळूणकर व विलापिका हे तीन प्रबंध प्रसिद्ध झाले. विशेषतः गडकरी आणि केशवसुत संप्रदायावरील टिकालेखनी माडखोलकरांनी उदंड केले. हे टीकालेखन करताना इंग्रजी समीक्षालेखनाचा आपल्यावर खूप प्रभाव असल्याचे ते मान्य करतात. तात्या साहेब कोल्हटकरांच्या इशाऱ्यानंतर प्रारंभीच्या कडक टीकेला सद्भिरु ची चे वळण लागले. जे आज वाचले असता मनाला पश्चाताप किंवा शरम वाटावी असे एक ही व्यक्तिद्वेष दूषित किंवा अन्यायी ग्रंथ परीक्षण मी केलेले नाही. इतकेच नव्हे तर ज्यांच्या वाणीतून किंवा लेखणीतून माझी निरर्गल नालस्तीच नेहमी बाहेर पडते अशा सद्गृहस्थांनी जेव्हा आपली पुस्तके माझ्याकडे अभिप्रायार्थ पाठवली तेव्हा त्यांचाही परामर्श मी गुणग्रहणबुद्धीनेच घेतलेला आहे' असा आत्मविश्वास युक्त निर्वाळा माडखोलकरांनी दिलेला आहे. (मी आणि माझे वाचक) कादंबरीलेखन हा सुद्धा टीका लेखनाचाच प्रकार माडखोलकर मानतात. 'फरक एवढाच की पूर्वी मी फक्त ग्रंथावर टीका करीत असे. आता जीवनावरही करतोग. मराठी टीकेचे स्वरूप इंग्रजीतील "रिव्हयू" (Review) सारखे आहे. तंत्राचे साचे आणि प्रतिष्ठित विचारप्रणाली यांना न जुमानणारे ते व्रात्य, दंडनीय असे

मानणारी ही टीका होय. निबंधमाला, केसरी, विविध ज्ञान विस्तार, सरस्वती मंदिर वगैरे नियत कालिकांतून ज्या टीका आलेल्या आहेत त्या सामान्यतः लेखकांना नादान ठरविणाऱ्या होत्या. कारण त्या ग्रंथ परीक्षणावर जॉन्सन, जेफ्रे आणि मेकॉले यांच्या विदारक टीका पद्धतीची छाप होती. हे असे तरी का झाले? या प्रश्नाचे माडखोलकर उत्तर देतात. 'महाराष्ट्रात ग्रंथपरीक्षणाच्या कामाला वृत्तपत्रातून आरंभ झाला.'

सर्जनशील टीका (Creative criticism) या पद्धतीचा विकास महाराष्ट्रात होऊ शकला नाही याबद्दल माडखोडलकरांना खेद वाटतो. सेंट व्यूव्ह, टेन, पेटर, मोर्ले ब्रँडिस, रॅले इत्यादी इंग्रजी समीक्षकांनी सर्जनशील टीकापद्धती पूर्णत्वाला नेली आहे. 'संस्कृतातील भाष्यग्रंथ बव्हंशी सर्जनशील स्वरूपाचे आहेत. ज्ञानेश्वरी आणि गीतारहस्य हे सर्जनशील टीकेचे दोन ठळक नमुने. ग्रंथ हा ग्रंथकाराच्या मनोवृत्तीचा आणि जीविताचा एका परीने अविष्कार असतो. एकूण मराठी टीकावाङ्मायाला शाळामास्तरच्या पेपरतपासणीची निःकृष्ट कळा यावी यात नवल काय?' ही माडखोलकरांची टीकेवरील टीका आहे. रहस्योद्ग्राही टीका लिहावयाला अव्वल दर्जाची कल्पनाशक्ति आणि मनोगाहन कुशलता लागत असते. टीकाकार समानधर्मा असावा लागतो. टीकाविषय व टीकाकार समरस होतात तेव्हा त्यांच्या समाधीतून उत्कृष्ट कलात्मक टीकाकृती निर्माण होते. 'महाराष्ट्रात वाङ्मयाला नवीन वळण लावणारा, व्यक्ति, संस्था, समाज आणि साहित्य यांचा प्रभावशाली टीकाकार- विष्णुशास्त्री चिपळूणकर हा एकच झाला. 'ही माडखोलकरांची चिपळूणकरांच्या टीकाकार्याबद्दलची संतोषाची पावती आहे. (कालपरत्वे व प्रसंगानुसार माडखोलकरांच्या निष्कर्षांमध्ये फरकही पडतात.)

माडखोलकर आपल्या टीकाकारांबद्दल काय म्हणतात? माडखोलकर प्रखर टीकेचा विषय बनले. याची दोन प्रमुख कारणे युक्मात्मा ही कादंबरी नागकन्या, डाकबंगला, शाप वगैरे कादंबऱ्यांमधून आलेली तथाकथित अश्लील व विकृत वर्णने आणि मुखवटे, प्रमद्वारा वगैरे कादंबऱ्यातून गांधीवादावर झालेली विदारक टीका, विदर्भातील अनेक काँग्रेसनेती मंडळी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रचाराला विरोधी होती. मुक्तात्मा वाचून फडके, खांडेकर, अत्रे, यांनी कादंबरीलेखनाच्या फंदात न पडण्याचा सल्ला जाहीरपणे माडखोलकरांना दिला. बुजुर्गांनी टीकेची झोड उठवली पण माडखोलकरांच्या कादंबऱ्यांच्या अनेक आवृत्त्या निघत होत्या. वाचक मोठ्या संख्येने आपल्या आपल्या कादंबऱ्या वाचत आहेत. हीच त्यांच्या पसंतीची पावती, असे माडखोलकर मानत होते. माडखोलकर टीकेने व्यथित असत. कित्येकदा टीकाकारांबद्दलचा राग उपरोधाने ते व्यक्त ही करीत. 'नसता टीकाकारांचा व्यापार/ तर कैचा असता कवीचा उद्धार? 'हे वाङ्मय वैदू जगात आहेत म्हणून प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांनी वारंवार बहकणारी लेखकांची डोकी थोडीतरी ठिकाणावर राहिली आहेत.' 'टीकाकारांविषयी मला आदर आहे' अशी टिप्पणी माडखोलकरांनी अनेक ठिकाणी साधली आहे. माडखोलकरांनी टीकेच्या हलकल्लोळात अगदी सौ. शांताबाईंच्या निषेध नापसंतीलाही भीक घातली नाही. 'माझ्या टीकाकारांची मते प्रमाण मानून जर मी लेखणी कायमची खाली ठेवली असती तर भंगलेले देऊळ, कांता, चंदनवाडी यांसारख्या कादंबऱ्या लिहिण्याचे भाग्य लाभले नसते.' हे माडखोलकरांचे समर्थन त्यांच्या एकूण लेखनामागील मनोधारणेशी सुसंगत आहे. 'सगळ्या विफलतेतही आपल्या अंतःकरण प्रवृत्तीला प्रमाण मानून चालल्याचे समाधान माझ्या मनाला खचित आहे.' 'लेखन हे आपले स्वभावज, नियतकर्म आहे याची जाणीव मला बुद्धी जागृत होता क्षणीच झाली.' 'दोन तपे' या ग्रंथातील वरील महत्वाची आत्मकथने माडखोलकरांच्या लेखनव्रताचा उलगडा करतात. नागकन्येचा उल्लेख प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे

'उपजीविकावादी अनुकृती' असा करतात. आपल्या कादंबऱ्या जीविकावादाची अपत्ये असतील तर त्यात गैर काय? पैसा आणि कीर्ति या दोहोंसाठी आपण कादंबरी लेखन केले असे माडखोलकर आभिमानाने सांगतात. कादंबरीलेखनावर पैसा मिळविण्याचे साधन असा शिक्का मारणे हा माडखोलकरांच्या शब्दात 'शालशिष्टपणा' (Snobbery) होय. 'मी टीकाकार आणि पत्रकार आहे म्हणूनच मी यशस्वी कादंबरीकार होऊ शकलो. असे ते म्हणतात.' अभिजात लेखकाच्या कपाळी समकालीन टीकाकारांनी घातलेले धोंडे परदेशातूनही माडखोलकर गोळा करुन आणतात. डॉ. जॉन्सनने 'ग्रे' च्या 'एलेजी' ची कुचाळी केली. ग्रीनने शेक्सपीयरवर टिकेचा धमाका उडवला. आणखी नाट्याचार्य खाडिलकरांवर 'सरस्वतीमंदिरात' काय कमी जहरी टीका आली। - असा नादान नाटककार जन्माला तरी कशाला आला? किती दिवस आमचा अन्त पाहणार? त्या मानाने आपल्यावर खूपच सौम्य टीका आली हे पाहून माडखोलकर खूष होतात.

**कादंबरीलेखन व एकूण साहित्यलेखन विषयक भूमिका : -**

'ललित वाङ्मय बोलून चालून मानवी जीवनाची अनुकृती, प्रतिकृती किंवा विकृती होय. मग अशा वाङ्मयाचे टीकाकार होण्यापेक्षा विशाल मानवी जीवनाचे टीकाकार होणे अधिक उद्‌बोधक अधिक आल्हाददायक नाहीं काय? या भावनेने माडखोलकर कादंबरीलेखनाकडे वळले. टीकालेखनाने विनाकारण रोष ओढवून घेण्यापेक्षा खांडेकर फडके यांच्याप्रमाणे कादंबरी लेखन करावे असा सौ. शाताबाईंनी सतत आग्रह धरला आणि माडखोलकरांनी 'मुक्तात्मा' ही आपली पहिली कादंबरी लिहिली. संस्कृत प्रचुर बोजड भाषेचा तीवर आरोप झाला. तथापि आपण प्रत्येक कादंबरीमध्ये भाषा बदलत गेलो. वंग भाषेचा नाद, आदिवासी बोली यांचाही वापर कादंबरी लेखनामध्ये करीत गेलो. असा माडखोलकरांचा दावा आहे. "आपण वास्तववादी लेखक आहोत (फडके भोगवादी तर खांडेकर भूतदयावादी!)' हे त्यांचे म्हणणे "जे मानवी जीवनाचे विलक्षण वैचित्र्य पत्रकार या ना त्याने सार्वजनिक चळवळीत वावरत असताना मी पाहिले त्यातूनच माझ्या बहुतेक कादंबऱ्या निर्माण झाल्या आहेत.' सर्वच बाबतीत अगदी भिन्न स्वरुपाच्या अशा कादंबऱ्या माझ्या वृत्तपत्रव्यवसायातील आणि सार्वजनिक जीवनातील अवलोकनाचा आणि अनुभवाचा उपयोग करुन मी लिहिल्या! 'महाराष्ट्रातील इतर कादंबरीकारांनी न दाखवलेली विशाल आणि विचित्र, भव्य आणि भोगलोलुप अशा मानवी जीवनाची कितीतरी नाविन्यपूर्ण अंगोपांगे मी मराठी वाचकांना दाखवली हे मात्र निस्संशय! "मी कादंबरी लेखनाकडे का वळलो' या लेखात माडखोलकरांनी वरील आत्मकथन स्पष्ट शब्दात मांडले आहे.

'मी जो कादंबरीकार झालो तो केवळ समाजजीवनाचा टीकाकार म्हणून" हे माडखोलकरांचे निवेदन महत्वाचे ठरते. हे महत्व दोन प्रकारचे. मध्यप्रांत - विदर्भ भागातील श्रीमंत खानदानी जीवनाचा होत चाललेला लोप आणि उच्च मध्यमवर्गातील परिवर्तने माडखोलकरांनी अनेक कांदबऱ्यांमधून मांडली. 'सत्यभामा' कादंबरीच्या निवेदनात त्यांनी तसा स्पष्ट उल्लेखही केलेला आहे. रुक्मिणी, उर्मिला, सत्यभामा ही कादंबरी त्रयी या विशिष्ट समाजचित्रणाची साक्षी आहे. माडखोलकर राजकीय, भाषिक चळवळीतले एक सैनिक होते. अनेक क्रांतिकारक, राजकारणधुरंधर व्यक्तींशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. या व्यक्तिंची चित्रणे विविध रुपे धारण करुन माडखोलकरांच्या कादंबऱ्यात आली आहेत. माडखोलकर राजकीय कादंबरीकार मानले जातात. 'मी राजकीय कादंबरीकार नाही' असा दावा करुनही आपल्या कादंबरीला राजकीय का म्हटले जाते याचे ते विश्लेषण करतात. ते असे "माझ्या कादंबऱ्यांमध्ये राजकीय चर्चा जास्त येत असल्यामुळे वाचकांनी ही

अनुक्रमणिका

पदवी बहाल केली असावी." (मी आणि माझे साहित्य - पृष्ठ क्र. १५७) पण "केवळ राजकीय चर्चेमुळे कादंबरी राजकीय होत नाही. राजकारण हे व्यक्तिवादी नसते. राजकारण म्हणजे समुदायाच्या विशाल मनाची हालचाल. राजकीय कादंबरीला युरोपात समाजात्मक कादंबरी — Socio- logical fition असे म्हणतात. 'मुखवटे' या माझ्या कादंबरीला प्रभाकर पाध्ये यांनी वृत्तिका (Reportage) म्हटले. माझ्या राजकीय कादंबऱ्यांचे वर्णन करायला इतका समर्पक शब्द दुसरा खास सापडणार नाही' असे म्हणून (राजकीय कादंबरी - मी आणि माझे साहित्य) विशाल सामूहिक मनाची आंदोलने चित्रित करणाऱ्या आपल्या अनेक कादंबऱ्या राजकीय आहेत हे विवेचनाच्या ओघात माडखोलकरांनी मान्यही करुन टाकले.

माडखोलकरांवरील शृंगारिकतेच्या वा अश्लीलतेच्या आरोपाबाबत त्यांना काय म्हणायचे आहे? माडखोलकर म्हणतात. - 'नागकन्येमध्ये जो शृंगार येतो तो संभोगशृंगार नाही. विप्रलंभ शृंगार आहे." "हीच कादंबरी संस्कृतमध्ये लिहिली असती तर समीक्षकांच्या प्रशंसेला पात्र ठरली असती." हा मामा वरेरकरांचा अभिप्राय माडखोलकर पुढे करतात. 'दोन तपे' मध्ये माडखोलकर लिहितात- 'संस्कृत साहित्याचे बाराव्या वर्षापासून गुर्जरशास्त्र्यांसारख्यांकडून संस्कार झाले. कुमारसंभवाच्या आठव्या वर्गातील काम दोहदाचा परमार्थ पं. रमावती मिश्रजींनी समजावून दिला. संस्कृत कवींनी शृंगार वारंवार आळवला आहे. उमामहेश्वर आदिमिथुनाचे युगायुगावर पसरलेले अद्‌भुतरम्य प्रणयजीवन माडखोलकरांच्या चिंतनावर छाप पाडून असणारच. आळवला शिवाय शृंगारवर्णन केवळ माडखोलकरांनाच वर्ज्य का असावे? नायकनायिका विप्रलंभ का होईना पण शृंगार आळवत असता त्यांच्या संवादात हैद्राबाद संस्थानातील हिंदुप्रजेचा छळ, स्पेन आणि चीनमधील लोकयुद्धाचे भीषण प्रसंग यांची चर्चापण होती. (म्हणजे माडखोलकरांनी विनोद पण आणला.) माडखोलकरांनी आपल्या 'बहुतेक कथांत वर्णन केलेले प्रसंग अनुभूत आणि वास्तविक आहेत. केवळ कल्पनिक अशी प्रायः एकही घटना नाही' असे म्हटले आहे कै. रावसाहेब रामचंद्र वासुदेव फुले या राजकारण धुरंधर व्यक्तीबरोबर माडखोलकरांनी जीवनाच्या विविध अंगाचा मुक्तपणे अनुभव घेतल्याचे त्यांचेच निवेदन आहे. 'सर्व प्रकारच्या निशाचरणाची नशा मनसोक्त लुटली आहे.' (मी आणि माझे साहित्य- पृष्ठ क्र. १७४-माझे कथालेखन)

आपण का लिहितो? लेखनाचा हेतू काय? या प्रश्नांना माडखोलकर नेहमीच सरळ उत्तरे देत नाहीत. एकदा म्हणतात 'लेखक होण्यापेक्षा न्हाव्याचा, धोब्याचा, खाणावळवाल्याचा धंदा माणसाने करावा. हा प्रतिष्ठित पण वांझोटा धंदा मात्र मुळीच करु नये. उदरनिर्वाहाचे दुसरे साधन नाही म्हणून आपण लेखनाकडे वळलो. असे म्हणत असतानाही माडखोलकर 'प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।' 'या गीतावचनाचा आधार घेतात. स्वतः च्या मनाला तळमळत ठेवून आणि बुद्धी संवेदनांना दाबून टाकून केलेल्या व्यवसायात यश मिळाले तरी त्यात सुख नाही आत्मविकासाचा आनंद नाही. (मुक्तात्मा) आत्मविकास हा माडखोलकरांच्या लेखनामागील हेतू आहे. त्याशिवाय प्रचाराचे प्रभावी साधन म्हणून ते लेखनाचा गौरव करतात. 'अहिल्याच्या माध्यमातून क्रांतिकारकांपासून मध्यमवर्गापर्यंत जाऊन पोचलो. निरनिराळया गुंतागुंतीच्या राजकीय आणि सामाजिक समस्या सामान्य वाचकवर्गाच्या निदर्शनाला आणून दिल्या." असे ते म्हणतात. (मी आणि माझे वाचक) साहित्यनिर्मितीचा माडखोलकरांचा हेतू या आत्मकनिवेदनातून स्पष्ट व्हायला हरकत नाही.

अनुक्रमणिका

**एका निर्वासिताची कहाणी :**

म. गांधींच्या हत्येनंतर महाराष्ट्रभर विशिष्ट जाती व वर्ग यांविषयी संतापाचा आगडोंब उसळला. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर नागपूरच्या दै. तरुण भारत चे संपादक होते. म. गांधीजींच्या राजकारणावर अनेकदा टीकेचे प्रहार तरुण भारतने केलेले. शिवाय १९४३ च्या बेळगाव येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनातील विभागीय अध्यक्षपदावरुन केलेल्या भाषणापासून माडखोलकरांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा प्रचार अत्यंत जोमाने चालविलेला होता. विदर्भ- मध्यप्रांतातील विशिष्ट कॉंग्रेसनेते मंडळी त्यामुळे प्रक्षुब्ध झालेली होती. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची त्यांची मागणी होती. या सर्वांचा परिणाम म्हणून नागपुरात नरकेसरी प्रेस, तरूण भारत कार्यालय व माडखोलकरांचा शांतानिवास यांचा विध्वंस करण्यात आला. तरूण भारत हे सतत बहुजन समाजाचा कैवार घेणारे पत्र होते. ते विशेष ध्यानात घेण्यासारखे आहे. या 'एका विशिष्ट प्रक्षोभाचे आलेखन' माडखोलकरांनी तेरा दिवसात पुरे केले. या सत्त्वपरीक्षेच्या कालखंडात माडखोलकर अत्यंत खंबीर व निर्विकार राहिले. 'प्राप्तं प्राप्तं उपासति हृदयेना पराजितः' या उक्तीचाच त्यांनी प्रत्यय दिला. पोलीस संरक्षण नाकारले. विरोधकांपुढे गुढगे टेकले नाहीत की बहुजन समाजाबद्दल एवढीही कटुता मनात बाळगली नाही. उलट ते लिहितात, "या दुर्धर संकटामुळे माझ्या विषयी आणि तरूण भारता विषयीही अखिल महाराष्ट्रातील निरनिराळ्या पक्षांच्या आणि वृत्तींच्या लोकांना किती आत्मीयता किंवा अगत्य वाटते याची प्रचीती मला उत्कटतेने आली'. 'नथू राम गोडसे दिल्लीला जाताना नागपूरला उतरला. माडखोलकरांनी त्याला आपल्या घरी मेजवानी दिली व स्टेशनवर पोचविले.' अशी अफवा सर्वत्र पसरली आणि जमावाच्या संतापाला पारावार उरला नाही. 'मृत्यु? ही पूर्णाहुति' या गांधीजींवरील अग्रलेखाने "गांधीजींचे मरण श्रीकृष्णाच्या मृत्युपेक्षाही अधिक उन्नत, अधिक वीरोचित आणि स्फूर्तिप्रद आहे. जणू येशू ख्रिस्ताचा मृत्यू' असे माडखोलकरांनी आदरपूर्वक म्हटले होते. नागपुरचे श्रीमंत प्रतापसिंह भोसले यांनी स्वतः आपल्या गाडीतून माडखोलकरांना आपल्या वाड्यात नेले. माडखोलकरांचा जीव वाचवला. बेफाम झालेला जमाव, संयुक्त महाराष्ट्राचे विरोधक, तरुणभारतचे निंदक या सर्वांचे वर्णन करीत असतानाच माडखोलकरांनी ब्राह्मण बाह्मणेतर वाद, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न, गांधीवाद वगैरे विविध विषयांसंबंधी जे विचार मंथन केले ते अत्यंत मूलगामी आहे. शांतानिवास उध्वस्त झाले याचे खरे दुःख त्यातील प्रचंड ग्रंथसंग्रह, पत्रव्यवहाराच्या फाईल्स नष्ट झाल्याचे होते. या ग्रंथ संग्रहालयात कोणकोणते ग्रंथ नष्ट झाले त्याची केवळ स्मरणाच्या आधारे जी सविस्तर यादी माडखोलकरांनी दिली आहे ती त्यांच्या तल्लख स्मरणशक्तीची द्योतक आहे. ग्रंथप्रेमाची साक्ष आहे. माणुसकीचा गहिवर अनुभवत असतानाच दोन थोर अहिंसक व्यक्तींच्या हिंसक वृत्तीचे क्लेशदायक अनुभवही माडखोलकरांनी दिलेत. आचार्य दादा धर्माधिकारींना माडखोलकरांचे घर लुटले गेल्याचे दुःख झाले पण तरूण भारताचा विध्वंस झाल्याबद्दल मुळीसुद्धा वाईट वाटले नाही. तसे त्यांनी बोलून दाखविले. संत तुकडोजी महाराज जमावापुढे म्हणाले- 'आजसे बम्मन हरिजन हो गया और हरिजन बम्मन हो गया." संतपणाच्या भूमिकेला हे विधान मुळीच शोभणारे नाही' एवढीच टिप्पणी माडखोलकर करतात.

महाराष्ट्रातील सामाजिक चलन वलनाचे सूक्ष्म आणि विवेकी विवेचन या क्षोभाच्या क्षणीही माडखोलकरांनी केले ते अतिमोलाचे आहे. 'समाजातील संपन्न, सुस्थित सुसंस्कृत लोकांविरुद्ध जो निरनिराळया प्रकारचा असंतोष समाजाच्या खालच्या उपेक्षित, अकिंचन, असंस्कृत घरात आज धुमसतो आहे,

त्याचाच हा एक स्फोट आहे. खरोखरी Have आणि Have nots यांच्यातल्या अनिवार्य लढ्याचाच हा एक भाग आहे.' ( पृ. क्र. १८५)

१९४३ मध्ये बेळगांवच्या महाराष्ट्रसाहित्य संमेलनाच्या ललित साहित्य विभागाच्या अध्यक्षपदावरून माडखोलकरांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा ठराव मांडला 'मुंबई आणि मध्यप्रांत व वऱ्हाड या दोन प्रांतातील तसेच या दोनही प्रांतांच्या स्थलसीमेत मोडणाऱ्या देशी संस्थानातील सर्व' सलग प्रदेश, हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा आणि पोर्तुगीज सत्तेखालील गोमंतक यांचा संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण करावा.' या ठरावावर लालजी पेंडसे भाष्य करतात. 'काळाचे औचित्य लक्षात घेऊन त्यांनी (माडखोलकरांनी) महाराष्ट्र एकीकरणावर भार दिला. इतका की महाराष्ट्र राज्याची प्रस्थापना होऊन चुकली असली तरी त्या भाषणाचे महत्त्व कमी होणार नाही. (महाराष्ट्राचे महामंथन - लालजी पेंडसे)

शेवटी गजाननराव ओंकारस्वरूप शब्द ब्रह्माचेच उपासक होते. ते म्हणतात- 'वाङमय मी साधन मानतो. साध्य नाही.' शिवत्वाचा प्रचार हे माडखोलकरी साहित्याचे प्रयोजन आहे. जीवन आणि कला यात भेद करणेच भ्रामक आहे. जीवनाला सोडून कला नसते. कलेवाचून जीवनात स्वास्थ्य नाही. साऱ्या लेखन भाषणांमधून माडखोलकरांनी दोन भव्य स्वप्ने पाहिली. वाचकांना श्रोत्यांना सतत वाटली.

'संयुक्त महाराष्ट्र आणि भारतीय राष्ट्रकुटुंब यांच्या स्थापनेची ही उज्ज्वल, भव्य स्वप्ने! या दोन स्वप्नांच्या साफल्याच्या ईर्ष्येने मी विशाल हिंदुत्वाचा, आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाचा ब्राह्मण-ब्राह्मणेतर आणि अस्पृश्य यांच्या एकंकाराचा व ही विराट समाजक्रांती घडवून आणण्यासाठी मार्क्सवादाचाही पुरस्कार गेली सत्तावीस वर्षे करीत आलो आहे.' (एका निर्वासिताची कहाणी - पृष्ठ क्र. ८७)

माडखोलकरांनी विपुल आत्मकथने केली आहेत. साऱ्यांचाच समावेश एका लेखात होऊ शकणार नाही. कितीही पात्रे भरून घेतली तरी विशाल प्रवाह बाहेर शिल्लक राहतोच. त्या गंगोदकाचा एक कलश सुद्धा तीर्थयात्रेचे साफल्य देणारा असतो. माडखोलकरांच्या जन्मानंतर एका शतकाची पूर्ती होत आहे. त्यांच्या स्वप्नपूर्तीलाही साफल्याचेकाठ लाभोत ही मनोमन प्रार्थना!

⁂⁂⁂

अनुक्रमणिका

## | संयुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेचे शिल्पकार |

---------------------------------------------------------------------------------------राम शेवाळकर

विदर्भ हा पूर्वी आदि महाराष्ट्र मानला जात असे. आर्यांचे आर्यावर्तातून दक्षिणापथात पदार्पण झाले, ते विदर्भाच्या प्रदेशात. त्यामुळे वाङ्मयामध्ये विदर्भाचा उल्लेख आढळतो. महाराष्ट्राचा पहिला उल्लेख बाकी २००० वर्षापूर्वीच्या होळे शिलालेखात "त्रिक् महाराष्ट्र" म्हणून आला आहे. ज्ञानेश्वरीतही 'महाराष्ट्र मंडळ' असा उल्लेख आहे. महानुभावांच्या चक्रधरस्वामी कृत सूत्रपाठाच्या भाष्यामध्ये महाराष्ट्राच्या चतुःसीमा सांगितल्या असून त्याचे वर्णनही आले आहे. त्यात महाराष्ट्राला 'महंत राष्ट्र' म्हटले आहे. 'महाराष्ट्रीय असावे' असा चक्रधर स्वामींचा कटाक्ष होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेची पायाभरणी विदर्भातच झाली. मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या विधानसभेमध्ये बॅ. रामराव देशमुख यांनी त्या प्रदेशात समाविष्ट असलेल्या मराठी भाषिक लोकांचा एक स्वतंत्र विदर्भ प्रांत निर्माण करण्याचा ठराव मांडला होता. मुख्यमंत्री पंडित रविशंकर शुक्ल यांचे या प्रस्तावाला अनुमोदन होते. व १ ऑक्टोबर १९३८ रोजी हा ठराव एकमताने संमत झाला. मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्याचा संकल्पाचा हा पहिला उद्‍गार होता. महाराष्ट्र एकीकरणाच्या प्रयत्नातील पहिला टप्पा या दृष्टीनेच या घटनेकडे पाहावे लागेल.

त्यानंतर १५ ऑक्टोबर १९३८ रोजी मुंबईला स्वा. सावरकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या साहित्य संमेलनात विदर्भासह सर्व मराठी भाषिक प्रदेशाच्या सलग महाराष्ट्राची मागणी करणारा ठराव संमत झाला. त्यानंतर १९३९ मध्ये नगरच्या साहित्य संमलनानेही हाच प्रस्ताव पारित केला. त्याची फलश्रुती म्हणजे २८ जानेवारी १९४० रोजी बॅ. रामराव देशमुख यांच्याच अध्यक्षतेखाली मुंबईला संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापन झाली. महाविदर्भ, मराठवाडा, मध्यमहाराष्ट्र, कोकण व मुंबई या पाच घटक प्रदेशांच्या स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले. या संस्थेतर्फे २४ मे १९४० रोजी पुण्याला डॉ. तु. ज. केदार यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र एकीकरण परिषद आयोजित करण्यात आली. म. म. द. वा. पोतदार हे तिचे स्वागताध्यक्ष होते. पण पुढे संयुक्त महाराष्ट्र सभा निष्प्रभ झाल्यामुळे यातून मार्ग काढण्याकरिता विदर्भाने लो. अणे यांच्या नेतृत्वाखाली पुढाकार घेतला. १८ ऑगष्ट रोजी वर्धा येथे वैदर्भीय कार्यकर्त्यांची परिषद झाली. तिने स्वतंत्र विदर्भाच्या स्थापनेसाठी आंदोलन करण्याचा संकल्प केला. त्याचवळी महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीस हातभार लावण्याचीहि तयारी बोलून दाखविली. स्वतंत्र विदर्भ हे संपूर्ण महाराष्ट्र एकीकरणाच्या मार्गातले पहिले पाऊल होते. हे या संकल्पाने आता स्पष्ट झाले.

मराठी साहित्य संमेलनांनी मुंबई साहित्य संमेलनातील ठरावाचा सातत्याने पाठपुरावा केला. १९३९ मध्ये नगर, १९४० मध्ये रत्नागिरी व १९४१ मध्ये सोलापूर येथे झालेल्या संमेलनात स्वतंत्र मराठी राज्याच्या स्थापनेचे ठराव एकमताने संमत झाले.

त्यानंतर मराठी पत्रकार परिषदेने मे १९४३ मध्ये ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिवेशनात पंचखंड महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव संमत केला. ३ आक्टोबर १९४३ रोजी महाविदर्भ परिषदेचे

दुसरे अधिवेशन बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती येथे झाले. त्या परिषदेत मध्यप्रदेशातील मराठी भाषिक विभागाचा 'महाविदर्भ' नावाचा प्रांत स्थापन करण्याच्या वर्धा ठरावावर शिक्का मोर्तब करण्यात आले. या नव्या विदर्भात अमरावती, अकोला, नागपूर, भंडारा व चांदा जिल्हयाच्या सरहद्दीवरील मराठी भाषिक विभाग, तसेच खांडवा, बैतुल, छिंदवाडा व बालाघाट या हिंदी भाषिक जिल्हयांमधील मराठी भागाचा समावेश अपेक्षित होता. बॅ. जयकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषिक प्रदेशाच्या एकीकरणाच्या मागणीचा पहिला हप्ता म्हणून महाविदर्भाची मागणी पुढे रेटण्याची व्यवहार्य सूचना केली. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या व चळवळीच्या वाटचालीचा हा आढावा लक्षात घेतला, तर ग. त्र्यं. माडखोलकरांचे या बाबतीतले योगदान ठरविणे शक्य होते.

तिभंगलेल्या महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या कल्पनेचे पहिले श्रेय श्री. नरसिंह चिंतामण केळकरांकडे जाते. त्यांनी १९११ च्या सुमारास केसरीमध्ये लेख लिहून या आकांक्षेचे सूतोवाच केले होते. त्यावेळी माडखोलकर, त्र्यं. वि. पर्वते या समवयस्क मित्रांमध्ये या विषयावर चर्चाही झाल्या होत्या. त्यानंतर पंचवीस-तीस वर्षांनी माडखोलकरांच्या मनात महाराष्ट्र एकीकरणाच्या कल्पनेला कृतीरुप देण्याच्या विचाराने घर केले. त्यानंतर साहित्य संमेलने, वा ठिकठिकाणचे वाङ्मयीन उपक्रम यांचे जे जे व्यासपीठ उपलब्ध झाले, त्या सर्वांचा उपयोग माडखोलकरांनी याच विचाराचा पाठपुरावा करण्यासाठी केला. मग ते ७ जून, १९३७ रोजी महेश्वर येथे झालेले मध्यभारतीय मराठी साहित्य संमेलन असो, ६ जानेवारी १९४० रोजी उज्ज्ञयिनी येथे झालेले महाराष्ट्र वाङ्मय मंडळाचे आठवे अधिवेशन असो, २९ मे, १९४० चे पुण्यातील शारदोपासक संमेलनाचे नववे अधिवेशन असो, कल्याणच्या मुंबई प्रांतिक साहित्य संमेलनाचे (१६ नोव्हेंबर १९४०) सातवे अधिवेशन असो, बडोद्याच्या वाङ्मय परिषदेचे (१ फेब्रुवारी १९४१) सातवे अधिवेशन असो, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या २६ जुलै, १९४१ रोजी झालेला बेचाळीसावा वार्षिकोत्सव असो की औरंगाबादला २८ मे, १९४५ रोजी झालेले मराठवाडा साहित्य संमेलनाचे अधिवेशन असो, माडखोलकरांनी सातत्याने महाराष्ट्र एकीकरणाच्या प्रदीर्घ काळापासूनच्या अंतःकरणातील ध्यासालाच पुन्हा पुन्हा आणि जाणीवपूर्वक प्रकटपणे वाच्यता दिली. वाङ् मयीन व्यासपीठावरुन भाषिक राजकारणाचा प्रचार करीत असल्याचा आळ पत्करुनही माडखोलकरांनी दहा वर्षे आपल्या सर्व भाषणात या एकाच विषयाला अग्रक्रम दिला. या आग्रहाचे पर्यवसान १२ मे, १९४६ रोजी बेळगाव येथे झालेल्या तिसाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात झाले. माडखोलकर संमेलनातील ललित साहित्य शाखेचे अध्यक्ष होते. दीर्घकाळ कथा, कादंबऱ्यांची निर्मिती करणाऱ्या ज्येष्ठ लेखकाकडून ललित साहित्याची निर्मिती, तिचे स्वरुप, आस्वाद वा समीक्षा याबद्दलच्या अनुभवी मार्गदर्शनाची अपेक्षा करणाऱ्या रसिकांची निराशा करण्याचे आपले दशवर्षीय व्रत त्यांनी याही संमेलनात पाळले. व पुन्हा एकदा अनौचित्याची टीका अंगावर ओढवून घेतली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी केवळ संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कारच केला नाही, तर मान्यवरांच्या स्वाक्षऱ्यांसह त्याबद्दलचे तीन ठरावहि खुल्या अधिवेशनात पारित करवून घेतले.

संमेलनाच्या व्यासपीठावरुन केवळ वाङ्मयीन विषयाचीच चर्चा व्हावी, हा परंपरागत सोवळेपणा माडखोलकरांच्या नेतृत्वामुळेच संमेलनाने बेळगांव येथे टाकून दिला. बेळगावला अशी घोषणा करण्यात एक विशिष्ट उद्दिष्ट होते, तसेच साहसही होते. केसरीतील अग्रलेखात केळकरांनी ज्या तिभंगलेल्या महाराष्ट्राचा उल्लेख केला होता. त्यामध्ये मध्यप्रदेश व निजाम स्टेटप्रमाणेच कर्नाटकामध्ये समाविष्ट असलेला मराठी प्रदेशही अभिप्रेत होता. यापूर्वी प्रादेशिक साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन महेश्वर, उज्जैयिनी, बडोदा व

अनुक्रमणिका

औरंगाबाद येथे माडखोलकरांनी हा विचार अगोदरच मांडलेला होता. बेळगावला तो विचार मांडण्यामागे तुलनेने अधिक व्यापक व्यासपीठावरुन तो मांडण्यात मागणीला विशाल अधिष्ठान लाभावे व संपूर्ण मराठी भाषिकांच्या एकमुखी आकांक्षाचे प्रतिनिधिक स्वरुप त्याला देता यावे, हा एकाग्र उद्देश होता. कर्नाटकाच्या आवारात हा उद्‌घोष झाल्यामुळे त्याचे अपेक्षित अनुकूल प्रतिकूल परिणाम होणे स्वाभाविकच होते. तसे ते झालेहि. वाङ्मयैकनिष्ठ प्रकृतीपेलव साहित्यिकांना आपल्या व्यासपीठावरचे राजकारणाचे हे अतिक्रमण मानवणार नव्हतेच. कारण राजकारण हा विषय त्यांच्या दृष्टीने अस्पर्श होता. (ते स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवादी राजकारण असूनसुद्धा!) खरे म्हणजे, ज्या भाषेत आपण वाङमय निर्मिती करतो, त्या भाषेच्या जिव्हाळयाचा प्रश्न राजकीय का ठरावा? १९३५ मध्येच काँग्रेसने भाषावर पुनर्रचनेचे तत्व मान्य केले होते. तत्पूर्वी नेहरु कमिशनने आपल्या अहवालात भाषिक राज्यांची आवश्यकता १९२८ मध्येच मान्य केली होती. नेहरु आयोगाच्या अहवालाचे मर्म खालील उताऱ्यातून स्पष्ट होईल.

"प्रांताचे शिक्षण व त्याचा दैनंदिन कारभार मातृभाषेतून व्हावयाचा, तर प्रांतात मोडणारा प्रदेश अवश्यतःच एकभाषी असला पाहिजे. तो प्रदेश जर बहुभाषी संमिश्रणाचा असेल, तर तेथे सदोदित अडचणी उभ्या राहतील, आणि शिक्षणाचे व कारभाराचे माध्यम म्हणून दोन किंवा अधिक भाषा चालवाव्या लागतील. म्हणून भाषेच्या पायावर प्रातांची पुनर्घटना करणे अत्यंत उपयुक्त ठरते. सामान्यपणे विवक्षित संस्कृति' परंपरा व साहित्य यांशी भाषेचे साधर्म्य असते. यामुळे भाषिक प्रांताच्या सर्वांगीण प्रगतीला ती वैशिष्टये सहाय्यभूत होतील."

स्वातंत्र्योत्तर भारताच्या मानचित्राचा आराखडा तयार करताना सत्तासंपादनाची सर्वाधिक क्षमता असणाऱ्या राष्ट्रव्यापी पक्षाला देशातील प्रादेशिक भाषांच्या बलसंवर्धनासाठी व विकासासाठी स्वतंत्र राज्यनिर्मिती महत्वाची वाटली असेल. तर मराठी भाषिकांच्या सर्वोच्च व्यासपीठावरुन त्याचा बुलंद उच्चार व्हायला आक्षेप का असावा? ही मागणी केवळ राजकीय मंडळीच्या हाती सोपविली. तर त्याचे पुढे काय होते, हे बेळगाव कारवाच्या बाबतीत आपण आजहि अनुभवित आहोतच.

भाषेच्या अस्मितेच्या प्रश्नावर, बव्हंश समाज निःसंज्ञ झाला, तरी तीव्र संवेदनशीलतेच्या स्वाभिमानी साहित्यिकांनी दैव योगावर विसंबून अनुकूल काळाची वाट पाहण्यात अर्थ नसतो.

आपोआप घडेल इष्ट समयी हे कार्य, हे बोलणे
आहे युक्तच काय सगळे काळावरी टाकणे?
भागीदार कृतीत मानव असे काला निसर्गासवे
आणा त्यास समीप अेकवटुनी यत्नप्रयत्नोसवे॥

या कविवर्य बी च्या कवितेतील 'आपोआपवाद्यांचे' अनुकरण सोयीचे असले, तरी त्यामागची अकर्मण्यता करंटेपणाची ठरते.

अनुक्रमणिका

वाङ्मयीन व्यासपीठावर कोणत्याही कारणाने, वा उद्देशाने एकदा राजकारणाच्या चंचू प्रवेशाला वाव मिळाला, तर ते व्यासपीठ बळकावून बसते. निदान शिरजोर तरी होते. राजकारणाचा हा स्वभावच आहे. हे खरे असले, तरी हे सत्तेचे राजकारण नसून लोकेच्छेचे प्रतिनिधित्व करणारे लोककारण आहे. हा भेद महत्वाचा आहे.

राहता राहिला प्रश्न अनौचित्याचा. यापूर्वी अशा प्रयत्नांबद्दल 'विविध वृत्त' साप्ताहिकाने माडखोलकरांवर 'साहित्यिकाचे राजकारण' अशी टीका केली होती. प्रसिद्ध पत्रपंडित पां. वा. गाडगीळ यांनी बेळगावच्या अध्यक्षीय भाषणावर "नाजुक, सुवासिक फुलांचा सडा अंगावर पडेल, अशा आशेने आपण पहाटेच्या वेळी प्राजक्ताच्या झाडाखाली जाऊन उभे रहावे आणि त्याऐवजी अचानक गारपीट व्हावी, तसा प्रकार माडखोलकरांच्या अध्यक्षीय भाषणांच्या बाबतीत झाला आहे!" असा मार्मिक आक्षेप घेतला होता. पण औचित्यभंगाचा हा गुन्हा माडखोलकरांच्या हातून अभावितपणे घडलेला नव्हता. तो त्यांनी जाणूनबुजून व योजनापूर्वक केला होता. माडखोलकरांसारख्या प्रतिष्ठाप्राप्त साहित्यिकाकडून हा अशोभनीय अपराध का घडावा? याची त्यांनी स्वतः "स्वतःच्या अंतःकरणाची अनिवार्य ओढ व महाराष्ट्राच्या राजकीय नेत्यांची अक्षम्य अनास्था" अशी दोन कारणे दिली आहेत. हिंदी संघराज्यात सर्व मराठी प्रदेशाचे एकीकरण होऊन महाराष्ट्राला स्वायत्त घटकप्रातांचा दर्जा मिळावा, असा प्रयत्न करणारी एकहि मध्यवर्ती संस्था मला महाराष्ट्रात कुठे दिसेना. आंध्र महासभा आणि संयुक्त कर्नाटक परिषद या दोन संस्थांच्या आपआपल्या विशिष्ट प्रांतांचे एकीकरण आणि स्वायत्तता यासाठी सतत पंचवीस वर्षे चालू असलेल्या चळवळी व डॉ. पट्टाभिसीताराम अय्या, श्री. दिवाकर यांच्यासारख्या कॉग्रेसधुरीणांकडे असलेले त्या चळवळीचे नेतृत्व पहात होते. पण महाराष्ट्रात मात्र कोणत्याच प्रकारची जागृती त्यांना या बाबतीत दिसेना. उलट न. चिं. केळकर, डॉ. बा. शि. मुंजे, श्री. मा. श्री. अणे, श्री. शंकरराव देवप्रभृति महाराष्ट्राच्या निरनिराळया भागातले आणि निरनिराळ्या पक्षांचे धुरीण या प्रश्नासंबंधी उदासीन किंवा अननुकूल होते.

असा अनुभव आल्यामुळे मराठी नेत्यांना स्वत्वाचे भान आणून देण्यासाठी स्वतःच पुढाकार घेण्याचा निर्धार भाऊसाहेबांना करावा लागला. भाऊसाहेब ललित लेखक होते. निष्णात कादंबरीकार होते. पण हस्तदंती मनोऱ्यात रमणारे आत्ममग्न साहित्यिक नव्हते. त्यामुळे लालित्यलालनापेक्षा सामाजिक स्पंदनांची दखल घेऊन त्यांना प्रतिसाद देण्याकरिता त्यांच्या मनाचा कल अधिक होता. त्यामुळेच आपल्या आवडत्या कला क्रीडेपेक्षा भाषिक अस्मितेसाठी लोकमत जागृत करणे त्यांना अधिक अगत्याचे वाटते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी एका प्रतिभावंताने मोजलेले हे मोल होते. माडखोलकरांना सक्रीय राजकारण मानवले नसते. पण राजकीय घडामोडीबद्दल त्यांना आस्था होती. त्यांचे विश्लेषण, मीमांसा व अन्वयार्थ लावण्याची त्यांना आवडही होती. त्यामुळेच त्यांची 'मुक्तात्मा' ही मराठीतील पहिली राजकीय कादंबरी ठरु शकली. ही दृष्टी लाभल्यामुळेच माडखोलकरांना संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेबाबत राजकीय नेतृत्वाच्या उदासीनतेतून संभवणाऱ्या धोक्याचा अंदाज घेता आला. आंध्र, कर्नाटक आणि केरळ यांच्याजवळ प्रांतपुनर्घटनेची कैफियत सादर करण्यासाठी सर्वपक्षीय, जबाबदार व समर्थ संस्था होत्या. महाराष्ट्राला त्यांच्या अभावामुळे अन्याय होण्याची शक्यता लक्षात घेऊन माडखोलकरांनी त्याबद्दल रान माजविण्याचा निर्धार केला. १९३७ ते १९४६ पर्यंत मिळालेल्या सर्व वाङ्मयीन व्यासपीठावरुन त्याच एका कामाचा पाठपुरावा केला.

१९४४ च्या नोव्हेंबर मध्ये औरंगाबादच्या आकाशवाणीवर भाषण देण्याच्या निमित्ताने माडखोलकर मराठवाड्यात गेले. औरंगाबाद, पैठण, परभणी व नांदेड या चार प्रमुख शहरांना त्यांनी भेट दिली. त्यावेळी मराठीच्या माहेरी मराठी भाषिकांचे व लोकांचे जे दैन्य त्यांच्या दृष्टीस पडले, त्यामुळे त्यांचे अंतःकरण पिळवटून गेले. आणि निजामशाहीच्या नादिरशाहीच्या नियंत्रणातून मराठी जनतेला मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र एकीकरणाचा प्रश्न तातडीने हाती घेण्याची निकड त्यांच्या लक्षात आली. म्हणून, त्यांनी मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरुन आग्रहाने या विचाराचा पुरस्कार केला. त्यावेळेला हैद्राबाद संस्थानमधील दिगंबरराव बिंदु, काशीनाथराव वैद्य, आनंदराव वाघमारे, गोविंदभाई श्रॉफ हे प्रमुख राजकीय कार्यकर्ते त्या संमेलनाला उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातील प्रादेशिक स्वायत्ततेची कल्पना आणखी दहा वर्षे तरी अंमलात येण्याची शक्यता नसल्याचे आपले मत त्यावेळी काशीनाथ वैद्य यांनी स्पष्टपणे भाऊसाहेबांजवळ नोंदविले होते. त्यावर भाऊसाहेबांनी तडफदार उत्तर दिले, “दहा वर्षात निजाम ही चीजच मुळी नष्ट होऊन जाईल, अशी माझी खात्री आहे.” भाऊसाहेबांचे भाकीत खरे व्हायला दहा वर्षे सुद्धा लागले नाहीत, हे सर्वज्ञात आहेच. या उद्‌गारांमध्ये भाऊसाहेबांचे द्रष्टेपण प्रत्ययाला आले, असे म्हणता न आले, तरी राजकीय वास्तवाचा अचूक वेध घेण्याची भाऊसाहेबांची बुद्धी त्यातून प्रगट झाली हे निभ्रांतपणे खरे!

बेळगावच्या साहित्य संमेलनासाठी ३ मे, १९४६ रोजी भाऊसाहेब नागपूरहून निघाले, ते मुळी या निर्धाराने की अद्दछेने आपल्या वाट्याला आलेले अखिल महाराष्ट्राच्या साहित्याचे अत्युच्च व्यासपीठ याच एका प्रश्नाच्या प्रित्यर्थ राबवून घ्यायचे. त्यामुळे संमेलनाच्या सर्व शक्ती या एका प्रश्नाला जुंपण्याच्या दृष्टीने ते उद्योगाला लागले. आणि महाराष्ट्र एकीकरणाचे तीन ठराव श्री. शं. दा. पेंडसे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, पु. य. देशपांडे, विमलाबाई देशपांडे, ए. श्री. पटवर्धन, पु. दि. ढवळे व मो. ज्ञा. शहाणे या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नागपुरातील सदस्यांच्या स्वाक्षऱ्यासह स्वागत मंडळाकडे पाठवून दिले. आणि डॉ. जयकर, आचार्य विनोबा भावे, काकासाहेब गाडगीळ, बाळासाहेब खेर, दिगंबरराव बिंदु यांच्यासारख्या मराठी प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागातील पुढाऱ्यांची या ठरावाला अनुकूलता मिळवली. एवढेच नव्हे, तर श्री. केशवराव जेधे व शंकररव देव यांचाहि पाठिंबा मिळवण्यात संमेलनापूर्वीच ते यशस्वी झाले. या प्रयत्नांना फळ येऊन संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेबाबत ठराव संमेलनात स्वतः मांडून तो त्यांना सर्वानुमते मंजुर करुन घेता आला. या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी ‘संयुक्त महाराष्ट्र समिती’ नेमण्याचा आग्रह आचार्य अत्रे, श्री. शं. नवरे यांनी धरला. त्या समितीची पहिली सभा २६ मे, १९४६ रोजी पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळात होऊन जुलै अखेर मुंबई येथे श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र एकीकरण परिषद भरविण्याचे सर्व संमतीने ठरले. बेळगाव संमेलनानंतर माडखोलकरांनी १५ ते २५ मे पर्यंत मडगाव, पणजी, सावंतवाडी, मालवण आणि कोल्हापूर या ठिकाणी दौरे करुन महाराष्ट्र एकीकरणाच्या कल्पनेचाच प्रचार केला. २८ जुलै १९४६ रोजी मुंबईत भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेतील संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेबद्दलचा ठराव म. म. पोतदार, आचार्य दादा धर्माधिकारी व माडखोलकर यांनी तयार केला होता. त्याला महाराष्ट्रामध्ये मुंबईचा समावेश करण्याची पुस्ती श्री. मामा वरेरकर, अप्पासाहेब खाडीलकर, प्रभाकर पाध्ये, लालजी पेडंसे यांनी दिली. स्वागताध्यक्ष स. का. पाटील विरुद्ध असले, तरी या पुस्तीबाबतहि कणखर धोरण अवलंबिण्याचा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, कॉ. डांगे व र. के. खाडीलकर यांनी धरला.

दि. २८ जुलै १९४६ रोजी मुंबईच्या ब्लॅ. व्हटस्की लॉजमध्ये महाराष्ट्र एकीकरण परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाला आरंभ झाला. नागपूर, वऱ्हाड, मराठवाडा, गोमंतक वगैरे महाराष्ट्राच्या विविध भागातील विविध भाषांचे जातीचे, धर्माचे, वर्गाचे नेते, शास्त्रज्ञ, पंडित, कवी मुत्सद्दी, पत्रकार या परिषदेला हजर होते. जणू महाराष्ट्राची संस्कृती, विद्‌वता, संपत्ती, तपस्या व मुत्सद्देगिरी ही सर्व गुणसंपदा संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी एकमत होऊन संमेलनाच्या विशाल व्यासपीठावर एकत्र आली होती. या संमेलनात संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. डॉ. जयकर, द. वा. पोतदार, धनंजयराव गाडगीळ, केशवराव जेधे, श्री. शं. नवरे, कॉ. डांगे, ब्रिजलाल बियाणी, आनंदराव वाघमारे, डॉ. पंजाबराव देशमुख व त्र्यं. वि. पर्वते या विविध क्षेत्रातील नेत्यांचा त्या परिषदेमध्ये समावेश करण्यात आला.

पण डॉ. पंजाबराव देशमुख व सौ. प्रमिलाताई ओक यांनी विदर्भाच्या स्वायत्तेचा मुद्दा काढल्यामुळे परिषदेनंतर महाराष्ट्र विदर्भातील कार्यकर्त्यांशी चर्चा करुन त्याचे मानस समजवून घेण्याच्या हेतूने दि. २७ ते ३० ऑक्टोबर १९४६ पर्यंत अध्यक्ष श्री. शंकरराव देव आणि डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी श्री. पुनमचंदजी राका, आचार्य दादा धर्माधिकारी, ए. श्री. पटवर्धन यांच्यासह विदर्भाचा दौरा काढून गोंदिया, नागपूर, अमरावती व अकोला या शहरांना भेट दिली. त्यांनी श्री. धनंजयराव गाडगीळ यांनी तयार केलेल्या ‘संयुक्त महाराष्ट्र’ व ‘हिंदी संघराज्याचे घटक प्रांत’ या दोन विषयावरील निबंधावर स्थानिकांशी चर्चा केली. परिणामी दि. १३ एप्रिल १९४७ रोजी जळगाव येथे झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या प्रतिनिधीसभेत डॉ. पंजाबराव देशमुख, ब्रिजलाल बियाणी, दादासाहेब सोमण, प्रमिलाताई ओक व ना. रा. बामणगावकर या वैदर्भीय प्रतिनिधींनी संयुक्त महाराष्ट्राविषयीची निःशंक निष्ठा जाहीर केली.

तथापि महाराष्ट्र एकीकरण झाल्यानंतरही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात महाविदर्भाची स्वायत्तत्ता कायम राखण्याचा वैदर्भीय प्रतिनिधींचा आग्रह शिल्लक राहिलाच. त्यातूनच २० एप्रिल, १९४७ रोजी वऱ्हाडच्या प्रश्नासंबंधी चळवळ करण्यासाठी अकोला येथे श्री. बियाणी यांच्या नेतृत्वाखाली वऱ्हाड सर्वपक्षीय परिषद स्थापन झाली. दक्षिणेतील काही प्रांतांच्या पुनर्रचनेचा विचार २२ जून १९४७ रोजी दिल्लीहून काँग्रेस नेते डॉ. पट्टाभि सीमाराम अय्या यांनी घोषित केला. तेव्हा स्वतंत्र महाविदर्भाच्या प्रश्नाने पुन्हा उचल खाल्ली. हे श्री. मा. सा. कन्नमवार व मदनगोपाल अग्रवाल यांनी लगेच काढलेल्या पत्रकावरुन स्पष्ट झाले. दि.५ जुलै १९४७ रोजी विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीने तर मराठी भाषी प्रदेशाचे दोन स्वतंत्र प्रांत करण्याचा ठरावच संमत केला.

यावर माडखोलकरांनी विदर्भातील वरील घडामोडींची माहिती करुन देणारे व यातून तोडगा काढण्याची विनंती करणारे सविस्तर पत्र श्री. शंकरराव देव यांना पाठविले. ‘उदय’ चे संपादक श्री. बामणगावकर यांनीही दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या प्रश्नासंबंधी चर्चेसाठी दिल्लीला गेलेल्या बॅ. रामराव देशमुख यांना पत्र लिहून या प्रश्नावर तडजोड घडवून आणण्यासाठी विनंती केली. त्यानुसार दि. १४ जुलै रोजी श्री. शंकरराव देव यांच्या निवासस्थानी श्री. बियाणी, डॉ. पंजाबराव देशमुख, बॅ. रामराव देशमुख यांची तातडीची बैठक होऊन दि. ७ ऑगस्ट १९४७ रोजी अकोला येथे महाराष्ट्र व महाविदर्भ यातील प्रमुख कार्यकर्त्यांची सभा श्री. शंकरराव देव व श्री. ब्रिजलाल बियाणी यांनी आयोजित करावी असा निर्णय घेण्यात आला.

अनुक्रमणिका



**महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई आणि भाऊराव**

अनुक्रमणिका

त्यानुसार श्री. देव यांच्या सूचनेनुसार माडखोलकर लगोलग पुण्याला जाऊन प्रा. द. वा. पोतदार, ध. रा. गाडगीळ, श्री. दा. वि. गोखले व डॉ. य. कृ. सोहोनी यांना भेटले व अकोल्याच्या बैठकीपुढे ठेवण्यासाठी उपप्रांताची एक योजना तयार करण्याची जबाबदारी त्यांनी श्री. धनंजयराव गाडगीळ यांच्यावर टाकली. त्यानुसार श्री. धनंजयराव गाडगीळ यांनी 'नवीन प्रांत रचना' व 'उपप्रांतांचे सत्ताधिकार' या दोन विषयांवर टिपण तयार केले. दि. ७ ते ८ ऑगस्ट रोजी अकोला बैठकीत श्री. गाडगीळ यांच्या दोन टिपणांवरच सविस्तर चर्चा होऊन सर्व संमतीने निर्णायक ठराव झाला. या ठरावात महाविदर्भाबरोबरच बृहन्मुंबई, गोमंतक या महाराष्ट्रातील इतरही घटकांना आवश्यक वाटल्यास व व्यवहार्य ठरल्यास उपप्रांताचा दर्जा देण्याची तरतूद करुन ठेवली होती. त्याचा फायदा हा झाला की राज्याच्या पुनर्रचनेवर विचार करणाऱ्या घटना समितीत महाराष्ट्राकडून दुफळी होण्याचे भय टळले. या अनुकूल घटनेमुळे प्रोत्साहित होऊन श्री. हरिभाऊ पाटसकर यांनी भाषावर प्रांत रचनेचा ठराव संसदेपुढे मांडण्याचा प्रयत्न केला. संसदेमध्ये तो सादर होऊ शकला नाही, तरी त्यानिमित्ताने झालेल्या प्रश्नोत्तरांच्या परिणामी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी भाषावार प्रांत रचनेच्या प्रश्नाची व्यापक चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमण्याची घोषणा केली. पुढच्या सर्व घटना सर्वपरिचित आहेत.

या व्यतिरिक्त माडखोलकर यांनी खुद्द महात्मा गांधी यांचेशीही महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नावर पत्रव्यवहार केला होता. २९ मार्च १९४२ रोजी 'हरिजन' च्या अंकात गांधीजींनी विजयानगरचे महाराजकुमार विजयानंद यांच्या पत्राच्या निमित्ताने एक लेख लिहिला होता. त्यात भाषावार प्रांत रचनेच्या तत्वावर स्वतंत्र होण्याचा आंध्र प्रदेशाचा हक्क मान्य केलेला होता. इतकेच नव्हे तर काँग्रेसकडूनही त्या विषयावर मान्यता मिळविण्यास पुढाकार घेतल्याचे उघड केले होते. भाषावार प्रांतरचना मान्य करावी म्हणून शासनाकडेही वारंवार प्रयत्न केले होते.

'हरिजन' मधील गांधीजींच्या लेखातील वरील कबुली वाचून माडखोलकरांनी महाराष्ट्र निर्मितीबाबत गांधीजींचा आशीर्वाद मागण्यासाठी दिनांक ७ एप्रिल १९४२ रोजी त्यांना सविस्तर पत्र पाठविले. त्यामध्ये मराठी जनतेची मनोव्यथाही कळविली. वायव्य सरहद्द प्रांत, ओरिसा, सिंध, गुजराथ, केरळ, तामीळ, कर्नाटक, महाकोशल या प्रांतांप्रमाणेच महाराष्ट्राचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्याच्या मागणीस पाठिंबा मिळावा अशी त्यांना कळकळीची विनंती केली.

या पत्राच्या उत्तरी दिनांक १९ एप्रिल १९४२ च्या 'हरिजन' च्या अंकात गांधीजींनी माडखोलकरांच्या सूचनेबद्दल पूर्ण सहानुभूती व्यक्त करुन प्रांताच्या सीमा ठरविण्यासाठी भाषेचे तत्व योग्य असल्याचा विश्वास व्यक्त केला. पण एकीकरणाची मागणी त्या त्या विभागातील काँग्रेसजनांनी एकमताने करण्यावर भर दिला. यातून या प्रश्नी काँग्रेसजनांच्या पुढाकाराची आवश्यकता गांधीजींनी अधोरेखित केली होती. या पत्राला माडखोलकरांनी पुन्हा २४ एप्रिल रोजी उत्तर लिहून गांधीजींनी सर्व मराठी भाषिक प्रदेश एक होण्याबाबत जी अनुकूलता दर्शविली आणि एकीकरणाची मागणी त्या त्या प्रदेशातील काँग्रेसजनांकडून व्हावी अशी सूचना केली, त्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी मांडलेल्या काही मुद्दयांवर मतभेद दर्शवून आपल्या अगोदरच्या विनंतीचा पुनरुच्चार केला. माडखोलकरांनी महात्माजींना पाठविलेल्या पत्रात पुढील पाच मुद्दे प्रामुख्याने मांडले होते.

अनुक्रमणिका

१) भाषावार प्रांत रचनेचे तत्व काँग्रेसला मान्य असल्यामुळे महाराष्ट्राच्या एकीकरणाची महाराष्ट्रीयांची मागणी मान्य करावी आणि चळवळ न्याय्य आणि निरपवाद आहे, असे काँग्रेसवाल्यांना अनुलक्षून जाहीर करावे.

२) पश्चिम महाराष्ट्र, मुंबई शहर, वऱ्हाड आणि नागपूर या महाराष्ट्राच्या चार भागातील प्रांतिक काँग्रेस कमिट्यांनी महाराष्ट्राच्या एकीकरणासाठी सनदशीर प्रयत्न करण्याची इष्टता आपण सूचित करावी.

३) महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या चळवळीचा एक भाग म्हणून महाविदर्भाचा स्वतंत्र प्रांत करण्याची जी मागणी वऱ्हाड मध्यप्रांतांतील असेंब्ली आणि काँग्रेस मंत्रीमंडळ यांनी मंजूर केली आहे, तिला आंध्र प्रांतांच्या कायदेशीर मागणी प्रमाणेच आपण पाठिंबा द्यावा.

४) भाषावार प्रांत रचनेच्या प्रश्नाला आपण आपल्या रचनात्मक कार्यक्रमात स्थान द्यावे.

५) महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीचे आपण प्रत्यक्ष नेतृत्व घ्यावे, अशी मुळीच अपेक्षा नाही. फक्त त्या चळवळीला चुकीच्या कल्पनांनी होणाऱ्या विरोधाचा परिहार करण्यासाठी तिला पाठिंबा देऊन आपण मार्गदर्शन करावे, एवढाच आग्रह आहे.

या पत्रानंतर दिनांक २७ जून १९४२ रोजी माडखोलकरांनी महात्माजींना पुन्हा इंग्रजीमध्ये स्मरण पत्र पाठविले आणि आपल्या एप्रिलच्या पत्राच्या उत्तराची विनंती केली. त्यावर दिनांक २९ जून रोजी स्वतः गांधीजींनी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

"भाई माडखोलकर,

आपका खत मेरे सामने पडा है, अब अंग्रेजी मिला. बात यह है कि मै धर्मसंकट मे हूं। महाराष्ट्र के सब विभाग एक प्रांत बने उसे मेरी संम्मती है. लेकिन इस समय आंदोलन उठानेमें मुझे शंका है. जब सब चीज खतरेमें है तब यह एक प्रश्न का अलग महत्व देनेमे कहां तक औचित्य है, मै नही जानता हूँ. अगर अंत में हिंदुस्थान आझाद बनेंगा, तो ऐसे सब प्रश्न अपने आप हल हो जायेंगे. ऐसी मेरी मानसिक स्थिती मे मै कहांतक मदद दे सकता हूँ?"

साहित्य संमेलनासारख्या वाङ्मयीन व्यासपीठांपासून वेगवेगळ्या राजकीय पक्षांपर्यंत इतकेच नव्हे तर, देशातील सर्वोच्च प्रभावकेंद्रापर्यंत माडखोलकरांनी आपल्या ध्यासाचा हा विषय लावून धरला होता. साहित्यसम्राट केळकरांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणात उच्चारलेला विचार अखिल महाराष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीच्या निरीक्षणाअंती माडखोलकरांनी अधिक पायाशुद्ध केला. व्यापक प्रमाणावर सातत्याने रेटत नेला. एवढेच नव्हे तर त्याला संघटित स्वरुप देऊन एका सामाजिक व राजकीय चळवळीमध्ये त्याचे रुपांतर केले. बेळगावच्या संमेलनामध्ये या विचाराचा पहिला शंख फुंकल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र सभा, संयुक्त महाराष्ट्र परिषद, महाराष्ट्र एकीकरण परिषद या माध्यमातून ठिकठिकाणी प्रमुख विचारवंताच्या व कार्यकर्त्यांच्या बैठकी, संमेलने व परिषदा आयोजित केल्या. ठिकठिकाणी जातीने दौरे करुन या प्रश्नावर

बृहन्महाराष्ट्र ढवळून काढला. स्वाभिमान हरवलेल्या विविध पक्षांच्या राज्य नेतृत्वाला दायित्वाचे भान आणून दिले. कर्तव्योन्मुख केले. पक्ष शिस्त व चळवळीचे नेतृत्व यामध्ये द्वंद उत्पन्न झाल्यामुळे चळवळीमध्ये आत्मविश्वासाच्या अभावी शैथिल्य आले. तेव्हा जनतेनेच पुढाकार घेऊन ते संभ्रांत व हतबल नेतृत्व बाजुला सारले व एका सर्वपक्षीय बलिष्ठ समितीची स्थापना केली. एस. एम. जोशी यांच्या पुढाकाराने व कॉ. डांगे यांच्या लढाऊप्रवृत्तीच्या सहयोगाने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली एक विराट आंदोलन उभारले. ते आंदोलन तळागाळापर्यंत सर्वदूर पोचविण्यासाठी आचार्य अत्रे यांची बुलंद वाणी व लेखणी प्राधान्याने कारणीभूत ठरली. आंदोलनाला सतत पेटते ठेवण्यासाठी त्यांचे सर्वगामी व प्रभावी प्रचारतंत्र सार्थकी लागले. यामुळे महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर अभूतपूर्व ऐक्य सिद्ध होऊन प्रस्थापितांचे पारंपारिक वर्चस्व खिळखिळे झाले, परिणामी हस्तिनापुराहूनसंयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश वाजत गाजत अरबी समुद्रापर्यंत येऊन पोहचला.

अशा रीतीने महाराष्ट्र चळवळीच्या आरंभी व अंती दोन प्रतिभाप्रभु साहित्यिकांचा पुढाकारच कृतकृत्य झाला. यामागणीचे मंगलाचरण ग. त्र्यं. माडखोलकरांनी, तर भारतवाक्य आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी म्हटले, याची नोदं राजकीय मतमत्यांत्तरांच्या धुक्यातही इतिहासाला घ्यावी लागेल.

⁂⁂⁂

अनुक्रमणिका

## | महाराष्ट्र एकीकरणाचा ध्यास |

-----------------------------------------------------------------------------स. मा. गर्गे

**विखुरलेले मराठी प्रदेश –**

थोर कादंबरीकार आणि साहित्य समीक्षक म्हणून श्री. ग.त्र्यं. माडखोलकर यांनी यश मिळविले. तसेच मराठी पत्रव्यवसायातही प्रभावी संपादक म्हणून त्यांनी ख्याती मिळविली. ध्येयवादी मराठी पत्रकारांच्या परंपरेत त्यांची वैचारिक बैठक पक्की झाली होती. त्यात ध्येयवादाचे परिणत उद्दिष्ट म्हणून त्यांनी महाराष्ट्र अेकीकरणासाठी प्रचार, विचार आणि प्रसार केला. त्यांच्या समकालीन लेखकांपेक्षा अेकीकरणाचे त्यांचे कार्य वेगळे साहित्य वैशिष्ट्य म्हणून मानावे लागेल. मराठी भाषिकांच्या अेकात्मतेसाठी त्यांनी हिरीरीने प्रचार केला. आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला वैचारिक कार्याची बैठक प्राप्त करुन ठेवली. त्यामुळे मराठी भाषिकांच्या एकतेसाठी पुढे झालेल्या संघटनात्मक कार्याला गती मिळण्यास श्री. माडखोलकरांच्या कार्याची बहुमोल मदत झाली. राजकारणात ज्यावेळी महाराष्ट्र एकीकरणाच्या प्रश्नावर राजकीय पुढाऱ्यांचे डावपेच चालले होते, पक्षीय हितसंबंध साधण्याचे प्रयत्न वाढत होते, त्याकाळात या निकडीच्या भाषिक प्रश्नांची आवश्यकता आणि उपयुक्तता यासंबंधी सर्वसामान्य माणसाच्या मनात जागृती उत्पन्न करण्याचे त्यांचे कार्य होते. मराठी भाषिक एकाच राज्यात असावेत, हा विचार बुद्धिवंतांना पटण्यासारखा असला तरी, सर्वसामान्य मराठी माणसाला तो पुनः पुनः समजावून सांगणे आवश्यक होते. केवळ मराठी भाषिकांनी एकत्र यावे एवढीच भावनात्मक जाणीव पुरेशी नव्हती. या प्रश्नाचे सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय महत्वही पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे, मराठवाडा आणि विदर्भालाही पटवून देण्याची गरज होती. यासर्व विखुरलेल्या मराठी प्रदेशातील लोकांचे पाठबळ मिळाले तरच हा प्रश्न सुलभतेने सुटु शकेल, यासाठी प्रचार जरुर होता. नाहीतर, विस्कळीत विचाराने दिरंगाई बरोबरच या तिन्ही भागातील निरनिराळ्या हितसंबंधाचा प्रभाव वाढण्याची चिन्हे दिसू लागली होती. त्यावर मात करुन मराठी एकीकरणाची भावना अधिक तीव्र आणि उत्कट बनविण्याचे कार्य निकडीचे होते. ते कार्य आपल्या प्रचाराने भाऊसाहेब माडखोलकर यांनी केले. त्यासाठी त्यांनी आपले दैनिक 'तरुण भारत' तर उपयोगात आणलेच पण निरनिराळ्या साहित्य संस्था, परिषदा आणि साहित्य संमेलने यांचाही त्यांनी भरपूर उपयोग केला. मराठी अेकीकरणाच्या मागणीला उत्कटता प्राप्त करुन दिली. त्यामुळे ज्या राजकीय पक्षांना असे एकीकरण नको होते. त्यांनाही श्री. माडखोलकरांच्या प्रचाराकडे कानाडोळा करणे, दुर्लक्ष करणे वा तो विचार बाजूला सारणे अवघड झाले. त्यांच्या प्रचाराचा दुहेरी हेतू होता. लोकमानस घडविणे आणि त्या प्रश्नासंबंधी जे गट अनुकूल होते, त्यांच्या कार्याला बळकटी आणणे.

या प्रचाराच्या संदर्भात एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी असे म्हटले होते की, "मी महाराष्ट्र हा एक प्रांत किंवा नुसता मराठी भाषी प्रदेश समजत नाही, तर भारतीय राष्ट्रकुटुंबातील ते अेक प्रथगात्म राष्ट्र आहे अशी माझी निष्ठा असून त्याची प्रकृती, संस्कृती आणि नियती या इतिहास सिद्ध आहेत, अशी माझी श्रद्धा आहे."

श्री. माडखोलकर यांच्या एवढया व्यापक श्रद्धेचा प्रश्न त्यावेळी विचारात घेणे कोणत्याही राजकीय पक्षाला आवश्यक वाटत नसले तरी, देशातील इतर भाषिक राज्ये आहेत त्याप्रमाणेच भारतीय राज्यघटनेचे

अनुक्रमणिका

एक मराठी भाषिक राज्य झाले पाहिजे, यावर त्यांचा मुख्य भर होता. ही मागणी पूर्ण झाली पाहिजे यावर काही राजकीय पक्ष ठामपणे उभे होते.

**संयुक्त महाराष्ट्राची मागणी –**

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा इतिहास तपासला म्हणजे त्यामागे कोणत्या भावना होत्या व कोणते राजकीय वास्तव होते हे लक्षात येते. स्थूलमानाने इ. स. १९४० पासून या प्रश्नावर मराठी भाषिकांच्या स्पष्टपणे भावना व्यक्त होऊ लागल्या. जानेवारी १९४० मध्ये मुंबई येथे प्रा. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली पहिली 'संयुक्त महाराष्ट्र' सभा झाली. त्यानंतर चार महिन्यानीच मे १९४० मध्ये 'महाराष्ट्र एकीकरण परिषदेचे' पहिले अधिवेशन पुणे येथे भरले होते. या सभा, परिषदांमध्ये त्यावेळच्या मुंबई प्रांतातील महाराष्ट्र, मध्यप्रदेशातील महाविदर्भ, निजाम राज्यातील मराठवाडा आणि पोर्तुगीज अंमलाखालील गोव्याचा प्रदेश हे सर्व भाग संयुक्त महाराष्ट्राच्या एकाच राज्यात असले पाहिजेत, अशी प्रथमच मागणी करण्यात आली. या सर्व मराठी प्रदेशांवर इतर भाषिकांचे वर्चस्व झपाट्याने वाढत होते. त्यामुळे मराठी भाषिकांची एका अर्थाने कुचंबणा होत होती. स्वतंत्रपणे करावयाच्या प्रगतीला अडथळे येत होते. उदा. मुंबईच्या गुजराथी भाषिकांच्या हातात आर्थिक नाड्या असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रावर अप्रत्यक्षपणे का होईना राजकीय सत्तेचा आघात पोहोचत होता. विदर्भामध्ये हिंदी भाषिकांचे वर्चस्व सातत्याने वाढतच चालले होते. तेथील राजकीय सत्ता आणि व्यापारही हिंदी भाषिकांच्या वर्चस्वाखाली होता. मराठवाडा पूर्णपणे निजामाच्या मुस्लीम सरंजामशाहीखाली दडपला गेला होता आणि गोव्यावर तर पोर्तुगीजांनी भाषिक वर्चस्वाबरोबर धार्मिक वर्चस्वही वाढविले होते. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे एकीकरण होणे अत्यंत निकडीचे आहे, हा विचार श्री. माडखोलकर यांनी अनेक प्रकारांनी आणि साहित्य परिषदांच्या व्यासपीठावरुन मोठ्या तळमळीने मांडला. त्यावेळी क्रीप्स वाटाघाटी चालू होत्या. अशावेळी श्री. माडखोलकर यांनीच म्हटल्याप्रमाणे, "मुख्य अडचण ही की संयुक्त महाराष्ट्र सभा निष्क्रिय झालेली असल्यामुळे महाराष्ट्राच्या संयुक्त प्रांत घटनेची मागणी करणारी एकही मध्यवर्ती प्रातिनिधिक जबाबदार संस्था महाराष्ट्रात नाही. आंध्र, कर्नाटक आणि महाविदर्भ यांनी क्रिप्स वाटाघाटीच्या वेळी आपल्या कैफीयती ब्रिटीश सरकारला सादर केल्या. पण अखिल महाराष्ट्रातर्फे त्याच्या एकसंघ प्रांतरचनेची मागणी करण्यात आली नाही. कारण, अशी मागणी करणारी संयुक्त महाराष्ट्र सभा निष्प्राण झालेली आणि महाराष्ट्र साहित्य परिषद बहुधा राजकारणापासून अलिप्त राहण्याच्या कल्पनेने महाराष्ट्राच्या संयुक्त प्रांत घटनेची मागणी करणे हे आपले कर्तव्य आहे असे साहित्य परिषद समजत नव्हती."

**महात्माजींशी पत्रव्यवहार –**

हे चित्र स्पष्ट दिसत असतानाही श्री. माडखोलकर यांनी मराठी भाषिकांच्या अेकतेचा ध्यास सोडला नाही. त्यांनी भाषिक प्रश्नासंबंधी मार्च १९४२ मध्ये महात्मा गांधीशीही पत्रव्यवहार केला. मराठी भाषिकांच्या प्रदेशांचे जे चार तुकडे मुंबई, मध्यप्रदेश, निजाम प्रांत आणि गोवा या प्रदेशात विभागले गेले आहेत ते एकत्र होणे कसे अगत्याचे आहे, याचा उल्लेख करुन एप्रिल १९४२ रोजी गांधीजींना पाठविलेल्या एका पत्रात माडखोलकर म्हणतात, "अशा रीतीने महाराष्ट्राचे अनेक तुकडे पडल्यामुळे महाराष्ट्र आणि मराठी जनता यांचे राजकीय संघटनेच्या दृष्टीने किती नुकसान होत आहे हे मी आपल्याला सांगितले पाहिजे असे नाही. या

अनुक्रमणिका

नुकसानीची अलिकडे तीव्र जाणीव झाल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र आणि महाविदर्भ अशा दोन प्रकारच्या चळवळी, मुंबई प्रांत आणि मध्यप्रांत - वऱ्हाड या दोन्ही प्रांतातून चालू आहेत. पण ही चळवळ उचलून धरुन काँग्रेसच्या कारभारापुरती तरी, महाराष्ट्राच्या एकीकरणाचा प्रश्न सोडवून घ्यावयाला कोणताही प्रमुख काँग्रेस पुढारी तयार असल्याचे दिसत नाही." याच पत्रात शेवटी त्यांनी गांधीजींना विनंती केली आहे, "आपण स्वतः जातीने लक्ष देऊन तिन्ही मराठी भागातील काँग्रेस कार्यकर्त्यांना स्पष्ट मार्गदर्शन करावे. आपल्या विधायक कार्यक्रमात आपण राष्ट्रभाषेबरोबर मातृभाषेच्या सेवेवरही भर दिलेला आहे. लोकांच्या मातृभाषेचा पूर्ण विकास व्हावयाचा म्हणजे त्या मातृभाषेने व्यापले जाणारे क्षेत्र हे सुसंघटीत आणि एकसंघ असले पाहिजे........"

या दृष्टिने पाहिले असता आपण आपल्या विधायक कार्यक्रमात केवळ मातृभाषेच्या सेवेवरच भर देऊन न थांबता, भाषावार प्रांत रचनेच्या कार्याचाही समावेश त्यात करावयास पाहिजे, असे मला वाटते. त्यावर महात्माजींनी दिलेले उत्तर एकीकरणाच्या प्रश्नाला फारसे अनुकूल नव्हते. २९ जून १९४२ रोजी श्री. माडखोलकर यांना पाठविलेल्या पत्रात महात्माजी म्हणतात, "मैं धर्मसंकट में हूँ । महाराष्ट्र विभाग अेक प्रांत बने उसमे मेरी पूर्ण संमती है। लेकिन इस समय इस प्रश्न का अलग महत्व देनेमें कहाँतक औचित्य है मैं नही जानता हूँ । अगर अंत में हिंदुस्तान आजाद बनेगा तो ऐसे सब प्रश्न अपनेआप हल हो जाएगें!" विचारवंतांना आवाहन –

अर्थात तत्वशः गांधीजींची संमती आणि सदिच्छा असली तरी, स्वातंत्र्यानंतरही संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर केवढे रण माजले याचा इतिहास सर्वांना माहीत आहे. त्यासाठी मराठी जनतेला फार मोठा संघर्ष करावा लागला. काँग्रेस शासनाशी लढा द्यावा लागला.

राजकीय नेत्यांप्रमाणेच श्री. माडखोलकर यांनी महाराष्ट्रातील साहित्यिक, पत्रकार, तत्वज्ञ, समाजशास्त्री यांच्या औदासिन्याबद्दलही आपली नापसंती व्यक्ती केली आहे. अेके ठिकाणी ते म्हणतात, "महाराष्ट्राचे जीवन खुरटे आणि दुबळे आहे. आपल्याला दरिद्री आणि मागासलेले म्हणवून घेण्यात त्याला अेक प्रकारचा अनुकंपनीय अभिमान वाटतो. आपल्या भौतिक संपत्तीचे त्याला ज्ञान नाही. आणि बौद्धिक सामर्थ्याचा त्याला विश्वास नाही...... अेक प्रकारच्या संभ्रांत, संत्रस्त मनस्थितीत तो आज आहे...... या अराजकाच्या आणि अनिश्चयाच्या परिस्थितीतून नव महाराष्ट्र निर्माण करण्याची जबाबदारी स्वतःच्या किंवा स्वपक्षाच्या तात्कालिक यशाच्या दृष्टीने राजकारणाकडे पहाणाऱ्या हंगामी राजकीय नेत्यापेक्षाही तत्वज्ञांनी, समाजशास्त्री, साहित्यिक आणि पत्रकार यांच्यावरच जास्त जबाबदारी नाही का?"

या सर्व निवदेनामागे श्री. माडखोलकर यांच्या भावनेचा उद्वेग, चीड आणि संताप दिसून येतो. तो उद्वेग संयुक्त महाराष्ट्र विषयक उत्कटतेतूनच व्यक्त झाला आहे. हे निश्चित.

बेळगाव येथे मे १९४६ मध्ये झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन केलेल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्र संबंधीच्या भावना साकल्याने, विस्ताराने आणि उत्कटतेने व्यक्त झाल्या आहेत.

अनुक्रमणिका

**बहुमोल ग्रंथ संपत्तीचा नाश –**

महाराष्ट्र अेकीकरणाचा ध्यास घेऊन केलेल्या अशा प्रचारामुळे श्री. माडखोलकर यांना फार मोठे नुकसानही सोसावे लागले. १९४८ मध्ये महात्माजींच्या हत्येनंतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दंगली उसळल्या. त्याच्या दोन दिवसानंतर नागपुरात तशीच भीषण प्रतिक्रिया झाली आणि त्यात प्रामुख्याने दंगल करणाऱ्यांचे लक्ष दै. तरुण भारत आणि माडखोलकर हेच लक्ष्य होते असेही सर्वांच्या लक्षात आले. त्या दंगलीनंतर दै. तरुण भारतचा प्रेस नष्ट झाला. मुद्रणाची मौल्यवान साधने उध्वस्त झाली आणि त्यापेक्षाही फार मोठे व्यक्तिशः माडखोलकरांचे नुकसान झाले. त्यांनी आयुष्यभर जमा केलेला प्रचंड ग्रंथसंग्रह अनेक थोर साहित्यिकांशी झालेला त्यांचा पत्रव्यवहार, दुर्मिळ साहित्य हे सर्व दंगलखोरांनी नष्ट केले. त्यांच्या घराची मोडतोड केली. व्यक्तिशः त्यांच्या जीवावरही दंगलखोर उठले होते. पण सुदैवाने ते बचावले. त्या सर्व भयंकर प्रकारासंबंधी स्वतः माडखोलकरांनीच 'अेका निर्वासिताची कहाणी' यात म्हटल्याप्रमाणे "तरुण भारतावर ज्यांनी आघात केला त्यांना संयुक्त महाराष्ट्राच्याही चळवळीवर आघात करायचा होता. हे जाणून तरुण भारताचा नाश म्हणजे माझा नाश होता. माझ्या जिवितकार्याचा नाश होता." तरुण भारतासारखे लोकप्रिय दैनिक श्री. माडखोलकरांच्या हाती नसते तर संयुक्त महाराष्ट्राचा इतका प्रभावी प्रचार होऊ शकला नसता. हे त्याकाळच्या परिस्थितीची आणि वृत्तपत्रांची ज्यांना कल्पना आहे तेच समजू शकतात.

**चळवळीचे मुखपत्र –**

तरुण भारतचा हिरीरीने चाललेला प्रचार लक्षात घेऊन त्यावेळी प्रा. द. वा. पोतदार म्हणत असत "संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे मुखपत्र महाराष्ट्रात फक्त अेकच आहे आणि ते म्हणजे "तरुण भारत" त्या चळवळीला मराठी लोकमत अनुकूल करण्यासाठी तरुण भारतचा उपयोग होत असे. हे प्रा. पोतदार यांच्या उद्‌गारावरुन लक्षात येते आणि म्हणूनच ते बंद पडले तर निदान त्याकाळच्या मध्यप्रदेशातही हिंदी भाषिकांना ते हवेच होते. हिंदी वृत्तपत्रेही तरुण भारताविरुद्ध सातत्याने प्रचार करीत असत. त्यातूनच वरील प्रकार उद्‌भवण्याची शक्यता अनेकांनी बोलून दाखविली होती. कारण स्पष्ट होते. त्यावेळच्या मध्यप्रदेशात हिंदी विरुद्ध मराठी अशा वादाला तीव्रता आलेली होती आणि केव्हा तरी त्याची परिणती दंगलीत होईल असे अनेकांना जाणवत होते. त्यासंबंधी अधिक तपशीलाने लिहिण्याचे कारण नाही.

**राजकीय नेत्यांची अनास्था –**

स्वातंत्र्यानंतर सर्व प्रश्न आपोआप सुटतील असे अेक विधान गांधीजींच्या वर उल्लेखिलेल्या पत्रात आहे. पण दुर्देवाने तसे घडू शकले नाही. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न भारताच्या स्वतंत्र राज्यघटनेच्या निर्मितीनंतरही सुटू शकला नाही. या घटनेनंतर मुंबई आणि अहमदाबाद पूर्ववत् कायम राहिले त्यांची भाषावार विभागणी झाली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात तर तो अवघड होऊन बसला. मुंबई शहर सोडायला तेथील भांडवलदार आणि कारखानदार मुळीच तयार नव्हते. मुंबईच्या सर्व आर्थिक नाड्या अमराठी लोकांच्या हातात आणि सरदार पटेलांचा त्यांना भक्कम पाठींबा असा सर्व प्रकार होता. हैद्राबाद संस्थानवरची निजामाची सत्ता पोलीस कारवाईनंतर घटनात्मकदृष्ट्या संपली पण त्याचे त्रिभाषिक स्वरुप मात्र कायम राहिले. त्यामागे

अनुक्रमणिका

पं. नेहरुंची 'दक्षिणी संस्कृती' कायम ठेवण्याचा आग्रह होता. त्यांना संस्थानी प्रदेशाच्या विभागणीची कल्पना मान्य नव्हती. मध्यप्रदेशातील हिंदी आणि मराठी भाषिकही पूर्ववत कायम राहिले. त्यामुळे विदर्भाचा मराठी प्रदेश हिंदी भाषिकांच्या वर्चस्वाखाली तसाच कायम राहिला. थोडक्यात, महाराष्ट्र अेकीकरणाचा प्रश्न सुटू शकला नाही. त्यासाठी पुनः नवा संघर्ष करावा लागला. त्यातून प्रथम द्विभाषिक राज्य आणि नंतर १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती असे घडत गेले. त्यासाठी मराठी जनता, वृत्तपत्रे, संयुक्त महाराष्ट्र समिती, या सर्वांनी निकराने दिलेला लढा, त्यात अेकशे पाच मराठी माणसांना शासनाच्या गोळीबाराला बळी पडून करावे लागणारे प्राणार्पण, या सर्वांचा इतिहास सर्व परीचित आहे. त्याची पुनरावृत्ती करणे येथे अभिप्रेत नाही. त्या लढण्याच्या यशाचे श्रेय सामान्य मराठी माणसांनी दाखविलेला निर्धार आणि त्यांना मिळाले कणखर नेतृत्व, यानाच दिले पाहिजे. अर्थात त्यामागे दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभकालापासून श्री. माडखोलकर यांनी पोटतिडकेने केलेला प्रचार आणि विचार यांचाही त्यात वाटा आहे हे मान्य करावे लागेल. सर्व मराठी भाषिक अेकाच मराठी राज्यात असावीत हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. तो त्यांचा ध्यास होता.

श्री. माडखोलकर यांनी ललित साहित्यात मोठे स्थान मिळविले होते. मानमान्यताही त्या क्षेत्रात मिळाली होती. अशा स्थितीत त्यांनी महाराष्ट्र अेकीकरणासारख्या राजकीय क्षेत्रात अेवढा पुढाकार घेण्याचे कारण काय? यासंबंधी त्यांनीच असे म्हटले आहे की, "माझ्यासारख्या साहित्यिक समजल्या गेलेल्या माणसावर 'अनुचित' भाषणे पुनः पुनः करण्याचा प्रसंग का ओढवला, याचा विचार माझ्या टीकाकारांनी केलेला दिसत नाही. मला स्वतःच्या मर्यादा समजतात आणि माझे औचित्याचे भानही तीव्र आहे. मग महाराष्ट्र अेकीकरणासारख्या अत्यंत बिकट, गुंतागुंतीच्या राजकीय प्रश्नाला हात घालण्याच्या भानगडीत मी कां पडलो? त्याचे अेक कारण जसे स्वतःच्या अंतःकरणाची अनिवार्य ओढ हे सांगता येईल, तसेच दुसरे त्यापेक्षाही प्रबळ कारण, त्या प्रश्नाच्या बाबतीत महाराष्ट्राच्या राजकीय नेत्यांची अक्षम्य अनास्था हे सांगता येईल." (हांक, पृष्ठ २, ३)

⁂ ⁂ ⁂

## | माडखोलकरांचे संस्थात्मक जीवन |

----------------------------------------------------------------------मदन धनकर

राजकीय कादंबरी लेखनाचे प्रवर्तक, रसज्ञ समीक्षक व पत्रपंडित म्हणून ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांचा परिचय मराठी वाचकांना आहे. मराठीचे शैलीकार म्हणून त्यांचे स्थान अढळ आहे. त्यांचे लेखन कर्तृत्व सतत प्रकाशात राहिले. त्या मानाने संस्था जीवनातील त्यांचा सतत सहभाग व्यापक प्रमाणावर परिचित नाही. बृहन्महाराष्ट्रातील संस्थांच्या कार्यांना प्रगतीवर वळण देऊन त्यांची लोकाभिमुख उपयोगिता सिद्ध करण्यात त्यांनी आपली प्रतिष्ठा व बळ वेचले. यातून अनेक संस्थांचा संसार उभा झाला. या फुललेल्या संस्थांनी महाराष्ट्राचे सांस्कृतिकच नव्हे तर सार्वजनिक जीवन समृद्ध केले आहे.

नवीन लेखकाला हेरून त्याच्या प्रतिभेची जोपासना करण्याचे कार्य माडखोलकरांनी केले. त्यासाठी वृत्तपत्राचे व्यासपीठ मुक्तपणे वापरले. नव्या लेखकाला प्रोत्साहन देऊन त्यातील लेखक घडवित असतानाच संस्थांच्या उभारणीत आवश्यक कार्यकर्ते हेरून त्यांच्यातील संघटना कौशल्यास आकार देण्याचे कार्यही त्यांनी ममत्वाने केले. साहित्यिक व संपादक म्हणून लाभलेले स्थान संस्थाच्या उभारणीत खर्ची घालून त्यांना अधिक संपन्न, प्रगल्भ व सार्वजनिक करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. या प्रयत्नांना मराठी भाषा आणि वाङमय यांचे वैभव वाढविण्याची जशी बाजू आहे तसा व्यापक राष्ट्रहिताचा व भारतीय एकात्मतेचा आयाम आहे.

साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे लेखनिक म्हणून त्यांनी आपल्या जीवनाचा प्रारंभ केला. केळकरांना ते आपले लेखन गुरु मानीत. तारूण्यात केसरी-मराठा संस्थेचे कार्य त्यांनी जवळून पाहिले. नंतर सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटीत कर्मचारी म्हणून काम करण्याची संधी त्यांना लाभली. पुण्याच्या दैनिक ज्ञानप्रकाशचे विभाग संपादक म्हणून त्यांनी काम केले. भारतीय पातळीवरील विचार आचारांचा मागोवा घेऊन त्यानुसार महाराष्ट्राला राष्ट्रीय प्रवाहात जागरुक व सतेज ठेवणाऱ्या पुण्यातील 'केसरी-मराठा' संस्था आणि 'भारत सेवक समाज' यात कार्य करण्याची संधी त्यांना लाभल्यामुळे संस्था जीवनाला आकार देण्याची दृष्टि त्यांना लाभली.

व्यापक राष्ट्रीय हितासाठी लेखणीचा वापर करण्याची सिद्धता आणि संस्थेच्या जडणघडणीतील बारकावे यांचा शोध त्यांनी ऐन तारूण्यात घेतला. या अनुभवाचे पाथेय घेऊन १९२४ साली ते नागपूरला 'महाराष्ट्र' वृत्तपत्रात आले. वाङ्मय परीक्षण व साहित्य विषयक सदर यातून त्यांची वाचकांशी भेट झाली. प्रथम सहसंपादक व नंतर मार्च १९३० ते १३ जून १९४० पर्यंत कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम केले. दादासाहेब ओगले 'महाराष्ट्रा' चे सूत्रधार होते. त्यांच्या शब्दात सांगायचे तर माडखोलकर 'एडिटर इन चार्ज' होते. 'महाराष्ट्रा' तील आगमनानंतर ते पक्के वैदर्भीय झाले. विदर्भाला बृहन्महाराष्ट्राशी जोडण्याच्या कामात त्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली.

सर्वसमावेशक सहानुभूति, राजकीय व सामाजिक संस्थात निर्भयपणे संचार करण्याची कुवत, नेत्यांमधील निःस्वार्थी वावर, व्यक्तिमत्वातील चौरसपणा, साहित्यिक व संपादक म्हणून प्राप्त मूर्धन्य स्थान व दीर्घोद्योग यांच्या बळावर त्यांनी विदर्भास उर्वरित महाराष्ट्राशी अलगद जोडले. हिंदी भाषिकांचे नेतृत्व,

सेवाग्राम मध्ये म. गांधींच्या वास्तव्यामुळे प्राप्त राष्ट्रीय नकाशावरील स्थान आणि नागपूरच्या बहुरंगी जीवनाच्या पार्श्वभूमीवर हिंदीचा दुस्वास न करता मराठीचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. मराठी प्रदेशांच्या भावनात्मक एकतेचा विचार संस्थात्मक जीवनाच्या पातळीवर करून त्यास मूर्त रूप देण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न केवळ अपूर्व आहे.

माडखोलकरांनी लेखणी हेच उपजीवीकेचे साधन मानले. त्यातून होणाऱ्या पुरेशा अर्थप्राप्तीमुळे त्यांच्यात कधीच न्यूनगंड निर्माण झाला नाही. निर्वाहासाठी काम करताना देखील वर्तमानपत्राला संस्थात्मक आकार देण्याचा त्यांचा ध्यास राहिला. प्रतिभा पाक्षिक सुरूकरण्याचा त्यांचा प्रयत्न याचे द्योतक आहे. गं. दे. खानोलकर, के. नारायण काळे, वि. ह. कुळकर्णी, खं. सा. दौंडकर, ग. त्र्यं. माडखोलकर आणि वि. स. खांडेकर या सहा जणांनी प्रत्येकी ३०० रु. देऊन १८०० रु. भांडवलावर प्रतिभा सुरू केले. पदरमोड करून कोणताही उपक्रम करण्याचा त्यांचा स्वभाव संस्थात्मक जीवनाच्या परिपुष्टीसाठी असायचा. प्रतिभाच्या प्रकाशनाचे त्यांनी मांडलेले उद्दिष्ट यातून हेच दिसून येते.

नागपूर विदर्भात राहून साऱ्या महाराष्ट्राच्या एकीकरणाचा विचार त्यांनी केला. ६ जानेवारी १९४० रोजी उज्जैन येथे मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष म्हणून भाऊसाहेब माडखोलकर यांनी ‘युद्धोत्तर महाराष्ट्राचे भवितव्य’ या विषयावर भाषण केले. यातून त्यांनी मराठी भाषिकांच्या एकसंघ राज्याच्या निर्मितीची कल्पना मांडली. मराठी भाषिकांचे एक राज्य असावे ही कल्पना एका चिंतनशील लिखाण पुरूषाच्या प्रतिभेचे अपत्य असावे हे मराठी वाङ्मयप्रेमी व अभ्यासकांना निरंतर प्रेरक राहील. पुढे १२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे भरलेल्या ३० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पदावरून त्यांनी केलेल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार केला.

२९ मे १९४२ रोजी माडखोलकरांनी म. गांधी यांना लिहलेले पत्र ते २ मे १९४६ रोजी तिसऱ्या मराठवाडा साहित्य संमेलनात केलेले अध्यक्षीय भाषण संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या स्थापनेस सहाय्यक ठरले. २८ जानेवारी १९३९ रोजी डॉ. तु. ज. केदार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन ‘संयुक्त महाराष्ट्र सभा’ या पासून शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत ‘संयुक्त महाराष्ट्र परिषद’ पर्यंतच्या संस्थात्मक घडामोडीत ते सक्रीय होते. त्यांच्या सक्रीय सहभागाची तुलना पुढे ‘संयुक्त महाराष्ट्र समिती’ च्या कार्यातील आचार्य प्र. के. अत्रे यांच्या कामगिरीशीच करता येईल. १९४० साली वर्धा येथे बॅरि. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन ‘महाविदर्भ सभा’ चे सरचिटणीसपद त्यांनी नाकारले.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील सर्व संस्थात्मक उपक्रमात ते आघाडीवर होते. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे ते सरचिटणीस होते. भाषातर प्रांतरचना भारतातील भाषिक राज्यवादास प्रवृत्त करण्यासाठी कारणीभूत न ठरता राष्ट्रीय एकात्मतेचे माध्यम होईल हा विचार मराठी जनता व राष्ट्रीय नेत्यांना संस्थात्मक चळवळीतून समजावून सांगणारे श्रेष्ठ व सफल नेते भाऊसाहेब माडखोलकर यांचे स्थान स्वयंपूर्ण आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या उभारणीसाठी झालेल्या सर्व संस्थात्मक प्रयत्नातून असलेला त्यांचा वावर त्यांच्यातील नेतृत्वक्षमता, व्यक्ती व संस्था यांच्यातील अनुबंध राखण्याची हातोटी व अंगीकृत कार्याच्या सिद्धीसाठी आवश्यक तळमळ यांची साक्ष देणारी आहे.

अनुक्रमणिका

'महाराष्ट्र' वृत्तपत्रातून राजीनामा देऊन ते तरूण भारतात आले. २ जानेवारी १९४४ रोजी दैनिक तरूण भारत सुरू झाले. ३ इंग्रजी व २ हिंदी दैनिके उत्तम रितीने चालू असताना माडखोलकरांनी तरुण भारत चे साहस केले. 'स्वातंत्र्य', 'नि:स्पृह' व 'राष्ट्रदूत' ही पत्रे अल्पजीवी ठरल्याची उदाहरणे त्यांच्या पुढे होती. गांधी खूनानंतरच्या काळात उफाळलेल्या, प्रतिक्रियेत २ फेब्रुवारी १९४८ रोजी 'तरूण भारत' ची राखरांगोळी झाली असताना वीस दिवसांत त्यांनी वृत्तपत्र सुरू केले. स्वकीयांच्या रोषाला बळी पडून झालेल्या हानीनंतर अक्षरशः राखेतून पुन्हा उभे राहण्याचा विक्रम ते संस्थात्मक उभारणीचे कसब आणि कौशल्य यांच्या आधारावर करू शकले.

फेब्रुवारी १९५० साली बारावे विदर्भ साहित्य संमेलन डॉ. मा. गो .देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूरला भरले. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष म्हणून भाऊसाहेब माडखोलकर यांची निवड झाली. वि. सा. संघाचे अमरावती येथील कार्यालय नागपूरला हालविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. विदर्भ साहित्य संघ नागपूरला आणून विदर्भ साहित्य मंदीर (धनवटे रंग मंदिर) उभे करण्याचे कार्य त्यांनी वेगाने सुरू केले. विदर्भातील मराठी भाषा व वाङ्मय यांचे संगोपन व संवर्धन करणारी प्रमुख प्रातिनिधिक संस्था म्हणून साहित्य संघाला त्यांनी उभे केले. त्यासाठी राजकीय नेते, परिश्रमी कार्यकर्ते व दानशूर नागरिक यांच्या सहकार्याचा मेळ घालून संस्था उभारणीचे एक चांगले उदाहरण महाराष्ट्रापुढे ठेवले.

पं. द्वारकाप्रसाद मिश्र, पु. का. देशमुख, विमलताई देशपांडे, बाळासाहेब तिरपुडे, यशवंतराव चव्हाण, चिंतामणराव देशमुख, वसंतराव नाईक व बाळासाहेब देसाई या राजकीय नेत्यांचे सहकार्य त्यांनी घेतले. वि. भि. कोलते, मा. गो. देशमुख, ना. रा. शेडे, बा. ग. आणि ब. ग. हे अमरावतीचे खापर्डे बंधु, पु. य. देशपांडे, आ. रा. देशपांडे, कुसुमावती देशपांडे, बाळासाहेब ढवळे या साहित्यिकांचा सक्रीय सहभाग, दादासाहेब धनवटे, पूर्णचंद्रराव बुटी, श्रीमंत बाबूराव देशमुख, दामुअण्णा देशमुख व पु. बा. काळे या धनिकांचे अर्थसहाय्य आणि नाना जोग, पुरुषोत्तम दारव्हेकर, प्रा. श्री. गो. काशीकर, गो. स. देहाडराय, तु. ना. काटकर, तु. वि. गेडाम आणि बाबूराव चिमोटे आदी कार्यकर्त्यांची धडपड यातून त्यांनी संस्था आकारास आणली.

नरकेसरी प्रकाशन संस्था, विदर्भ साहित्य संघ, राजाराम वाचनालय, विदर्भ संशोधन मंडळ, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा व योगाभ्यासी मंडळ या नागपुरातील संस्थांच्या उभारणीत त्यांनी केलेले कार्य संस्थात्मक जीवनातून सार्वजनिक जीवन वैभवशाली करण्याच्या प्रयत्नांचा तेजस्वी इतिहास ठरावा एवढे मोठे आहे. माडखोलकरांचे व्यक्तिमत्व चौफेर व चोरस होते. गुणग्राहता व कार्यकर्त्यांच्या मर्यादांची जाणीव यामुळे संस्थापन व संचालन यासाठी आवश्यक नेमकी माणसे ते गोळा करू शकले. संस्था उभारणीतील त्यांची उभारी, लहानसहान प्रयत्नांना उचलून धरण्याची तत्परता आणि आचार विचारातील चोख व स्पष्ट बाणा यामुळे हे शक्य झाले. तसेच रसिकता, वैचारिकता व राष्ट्रचिंतन यातील काकासाहेब कालेलकर, दादा धर्माधिकारी व तुकडोजी महाराज यासारखे अधिकारी नेते त्यांनी सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांना जोडून दिले.

नागपूर ही हिंदी व मराठी द्वैभाषिक प्रांताची राजधानी असल्याचे भान त्यांनी सदैव बाळगले. हिंदीच्या अपरिहार्यतेबद्दल व त्याच्या राष्ट्रीय स्थानाबद्दल मराठी राष्ट्रनेत्यांनी घेतलेली भूमिका त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणली. महाराष्ट्रात राष्ट्रभाषा सभा, पुणे च्या विदर्भ आणि मराठवाड्यातील कार्य विस्तारासाठी त्यांनी

मनःपूर्वक प्रयत्न केले. द्विभाषिक मुंबई राज्याच्या स्थापनेनंतर संस्थेच्या कार्यासाठी म. म. दत्तो, वामन पोतदार व मंत्री गो. प. नेने. नागपूरला आल्यानंतर विदर्भासाठी प्रचार करणारी समिती स्थापन करण्यात आली. भाऊसाहेब माडखोलकर या समितीचे अध्यक्ष होते. मराठी लोकांनी हिंदीच्या प्रचारासाठी वाहिलेली संस्था म्हणून त्यांनी विदर्भ व मराठवाड्यात या संस्थेला उभे केले.

डॉ. अ. ना. देशपांडे, म. न. अंजीकर, दी. पु. वऱ्हाडपांडे, ना. को. त्रिवेदी व गोकुलप्रसाद साहू यांच्या मदतीने त्यांनी नागपूर- विदर्भातील प्रचाराची धूरा सांभाळली. विदर्भ सेकंडरी एज्यूकेशन बोर्डात इयत्ता ५ ते ८ पर्यंत क्रमिक पुस्तके तयार करण्याच्या कामासाठी असलेल्या संपादक मंडळात त्यांचा समावेश होता. जनवाणी भाग १ ते ४ अशी पुस्तके मंजूर करून ९० टक्के शाळातून क्रमिक पुस्तके म्हणून सुमारे २० वर्षावर काळासाठी चालू राहिली यात त्यांचे प्रयत्न व मार्गदर्शन प्रमुख होते. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे च्या कार्याशी ते अखेरपर्यंत निगडीत होते. विदर्भासाठी नागपूर येथे मेहाडीया चौक धंतोली मध्ये सुरू झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन लोकनायक बापूजी अणे यांनी केले एवढे सांगितले म्हणजे कार्य सफलतेची माडखोलकरांची दृष्टी लक्षात येते.

मराठवाड्यातील वाङ्मयीन व सांस्कृतिक जीवनास माडखोलकरांनी लावलेला हातभार सर्वश्रृत आहे. "मराठवाड्याच्या अंधार युगात असलेल्या एक-दोन तुरळक आधारापैकी माडखोलकर एक होते. मराठवाड्यातील लेखक व बातम्या यांना ते आपल्या नियतकालीकातून स्थान देत. मराठवाड्यातील सर्व साहित्यप्रेमींना पोलीस ॲक्शनपर्यंत ते आधार होते. त्यामुळे पुढे मराठवाडा साहित्य परिषदेचे एका साहित्यिक संघटनेत रुपांतर झाले. मराठवाड्यातील साहित्य, मराठवाडा साहित्य परिषद आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न या तीन कारणासाठी आम्ही माडखोलकरांचे कर्जदार आहोत. "स्व. प्राचार्य नरहर कुरुंदकर यांनी 'अभिवादन' लेखसंग्रहात भाऊसाहेब माडखोलकर यांच्याबद्दल व्यक्त केलेली ही कृतज्ञता बोलकी आहे.

भाऊसाहेब माडखोलकर यांनी आपले व्यक्तिमत्व आणि उभारलेल्या संस्था यातून सांस्कृतिक जीवनाच्या संपन्नतेचा वेध घेतला. खरे-अभ्यंकर यांच्या काळातील काँग्रेस संघटनेतील प्रबळ दुवा ए. श्री. पटवर्धन आणि १९५५ च्या काँग्रेस पक्षातील तडफदार युवक नेतृत्व बाळासाहेब तिरपुडे यांचे सहकार्य संस्था उभारणीस घेतले. श्री. के. गोळेगावकर, स. मा. गर्गे व के. ए. पोतदार या मराठवाड्यातील तरुणांना त्यांनी पत्रकारितेत आणले. य. बा. शास्त्री यांच्यापासून तर ना. बा. ठेंगडी व दि. भा. घुमरे अनेक पत्रकारांना आत्मीयतेने जवळ घेऊन तयार केले. त्यांचे अध्ययन व लेखन यात काळजीपूर्वक मार्गदर्शन केले. या सर्वांनी पत्रकार व कार्यकर्ते म्हणून मोलाचे योगदान दिले आहे.

माडखोलकर, त्यांनी उभारलेल्या संस्था व त्यातून तयार झालेली माणसे महाराष्ट्राच्या एकात्मतेस उपकारक ठरली. वाचन, लेखन, कार्यकर्त्यांवर निर्मम भरवसा, सार्वजनिक जीवनातील अंतर्गत गोटात फेरफटका व निरपेक्ष प्रोत्साहन यातून त्यांनी अनेक माणसे गोळा केली व संस्था उभारल्या. हे संस्था जीवन समृद्ध व्यक्तिमत्वाच्या सहकार्याने फुललेले व सार्वजनिक जीवनात उद्दिष्ट पूरक सिद्ध झालेले दिसून येईल. चौफेर व्यासंग व लेखन यातून त्यांनी हा संस्था समृद्धी योग साधला हे विशेष.

⁕⁕⁕

अनुक्रमणिका

## | ग. त्र्यं. माडखोलकर : प्रतीतिधर्मी कादंबरीकार |

--------------------------------------------------------------------डॉ. सुरेश म. डोळके

माडखोलकरांनी 'चंदनवाडी' कादंबरीत 'त्रिमूर्ति' नावाचे एक प्रकरण लिहिले आहे. त्यात त्यांनी 'त्रिराष्ट्रवादाची चर्चा केली आहे. त्रिमूर्तीच्या या प्रतीकावरुन मनात अशी कल्पना आली की मराठी कांदबरीच्या क्षेत्रातही १९३० ते १९४५ या कालखंडात कादंबरीकारांची अशी त्रिमूर्ति होती. फडके, खांडेकर व माडखोलकर हे या त्रिमूर्तीतील तीन कादंबरीकार होते. प्रतिभा हे या तीनही कादंबरीकारांतील समान सूत्र असले तरी या प्रत्येक कादंबरीकाराचे प्रकृतीवैशिष्ट्य व आविष्कारकौशल्य भिन्न भिन्न स्वरुपाचे होते. ललितवाङ्मय हे कलात्मक असावे या बाबतीत या तीनही कादंबरीकारांचे ऐकमत्य असले तरी कलेचे स्वरुप आणि कार्य या बाबतीत या तीनही प्रतिभावन्तात कमालीचे मतभेद होते. कला ही आनंददायक असते हे या तीनही साहित्यिकांना मान्य होते. पण त्याकरिता 'कलेसाठी कला' असा फडके यांनी उद्‌घोष केला, 'जीवनासाठी कला' याचे अर्ध्वर्युपण खांडेकरांनी स्वीकारले व 'उद्‌बोधन हे कलेचे स्वाभाविक कार्य आहे' असे माडखोलकरांनी प्रतिपादिले.


महाराष्ट्राच्या कादंबरीक्षेत्रातील एक अग्रगण्य कादंबरीकार (कै.) ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांतील काही विशेषांची व त्यामागे कादंबरीकार म्हणून असलेल्या त्यांच्या मनोधर्माची चर्चा व मीमांसा करण्याचे या लेखात योजले आहे.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांच्या बाबतीत त्या 'राजकीय' आहेत, व माडखोलकर हे 'राजकीय कादंबरीकार' आहेत असेच त्यांच्या कादंबरी वाङ्मयाचे समालोचन करताना सर्व टीकाकारांनी म्हटले आहे. किंबहुना, आधुनिक कादंबरीकारात ज्या आपल्या वैशिष्ट्याने माडखोलकरांच्या कादंबऱ्या पृथक् ठरतात ते म्हणजे त्यांच्या कादंबऱ्यात असलेले राजकारणाचे प्रतिबिंब, असेही मानले जाते.

इतकेच नव्हे तर टीकाकारांनी माडखोलकर हे 'पहिले राजकीय कादंबरीकार' असा 'पहिलेपणाचा' अग्रमान त्यांना दिलेला असून, 'पहिले राजकीय कादंबरीकार हा त्यांचा गौरव यथार्थ आहे' असेही त्यांच्या कादंबऱ्यांची समीक्षा करताना काही अभ्यासकांनी म्हटले आहे. (सौ.मंदाकिनी सगदेवः 'माडखोलकरी कादंबरी' (१९९८).

वस्तुतः, माडखोलकरांच्या 'मुक्तात्मा' या पहिल्या कादंबरीच्याही पूर्वी प्रसिद्ध झालेल्या प्रा. फडके यांच्या 'निरंजन' कादंबरीत राजकारण आलेले आहे. सत्याग्रहाबद्दल तुरुंगवासाची शिक्षा भोगणारा निरंजन त्यात आहे. पण, त्यांना पहिले राजकीय कादंबरीकार असे कुणीही म्हटले नाही. त्यांच्या नंतरच्याही अनेक कादंबऱ्यांत राजकीय हालचालींची, नानाविध राजकीय चळवळींची वर्णने आली आहेत. त्यांच्या 'उद्धार' आणि 'आशा' या कादंबऱ्यांत राजकारणाचा जोरदार ठसा उमटलेला आहे आणि आपल्या 'प्रवासी' कादंबरीत तर नायक राजाभाऊ हा राजकीय ध्येयसिद्धीच्या मार्गावरील एक 'प्रवासी' याद्ष्टीनेच त्यांनी बुद्धिपुरःसर निर्माण केला आहे.

अनुक्रमणिका



**श्री. भाऊराव गुरुबंधुसह**

अनुक्रमणिका

तरीही, प्रा. फडके यांना कुणी 'राजकीय कादंबरीकार' म्हणत नाहीत. माडखोलकरांच्या 'मुक्तात्मा' या पहिल्याच कादंबरीपासून मात्र त्यांना 'राजकीय कादंबरीकार' हे विरुद्ध मिळालेले आहे. 'मुक्तात्मा' कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर प्रा. डॉ. श. दा. पेंडसे यांनी 'केसरी' त लिहिलेल्या तिच्या विस्तृत परीक्षणात 'राजकीय कादंबरी' म्हणून मुक्तकंठाने तिची प्रशंसा केली होती. माडखोलकरांनी भावरम्य भाषाशैलीत लिहिलेली 'भंगलेले देऊळ' ही स्त्रीजीवनावरील शुद्ध कादंबरी, आणि ऐन तारुण्यात वैधव्य व विजनवास कपाळी आलेल्या एका संपन्न तरुणीच्या विफल मनोजीवनाचे विश्लेषण आणि चित्रण करणारी 'डाकबंगला' ही कादंबरी या त्यांच्या दोन कादंबऱ्या सोडल्या तर त्यांच्या प्रत्येक कादंबरीत राजकारण हे या ना त्या रुपाने प्रविष्ट झाले आहे. - आणि फडक्यांच्या कादंबऱ्यांतल्याप्रमाणे केवळ पार्श्वभूमी म्हणून नव्हे, अगर नायकांच्या जीवनात आगंतुक म्हणून झालेले नव्हे, तर कादंबरीतील नायकांचा जीवनरस म्हणूनच ते आविर्भूत झाले आहे.

माडखोलकरांच्या संवेदनशील अंतःकरणावर राष्ट्रवादी वातावरणाचे जे संस्कार विद्यार्थीदशेपासून झाले ते त्यांच्या वाङ्मयात- त्यानी वाङ्मयक्षेत्रात पदार्पण केल्यापासूनच या ना त्या रुपाने पण उत्कटतेने आविष्कृत झाले आहेत. माडखोलकर कलावादी? जीवनवादी? अभिजातवादी? याचे उत्तर असे की, ते मूलतः 'राष्ट्रवादी' होते. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायकांच्या जीवनात राजकीय दृष्टीने विचारांच्या म्हणा, चळवळींच्या म्हणा, प्रतिपादनाच्या म्हणा, की तत्वज्ञानाच्या म्हणा' - ज्या ऊर्मी उंचबळलेल्या आहेत त्या सर्वांच्या मुळाशी त्यांची राजकीय स्वातंत्र्योन्मुख अशी राजकीय वृत्तीच प्रमुख आणि प्रभावी आहे.

टिळकांचा जहाल राष्ट्रवाद, क्रांतिकारकांचा दहशतवाद व गांधीजींचा अहिंसावाद या तिन्हींचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यांत उत्कटतेने आविष्कृत झाले आहे. यात समाजवादाचाही अंतर्भाव करायला पाहिजे. कारण, 'समाजवाद' ही माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतील एक प्रमुख प्रवृत्ती आणि प्रेरणा आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांवर सुरुवातीच्या काळात क्रांतिकारकांच्या चळवळीचा प्रभाव होता, नंतर साम्यवादाच्या तत्वज्ञानाने माडखोलकरांच्या मनाची पकड घेतली. आणि नंतर साम्यवादावरील त्यांच्या विश्वासालाही धक्का बसला. तथापि, समाजवादाविषयीची त्यांची अनुकूलता मात्र कायम राहिली; वृत्तपत्रव्यवसाय आणि सार्वजनिक जीवन यातील अनुभवांवरुन समाजवादाविषयीची त्यांची भावना ही अधिकाधिक दृढ होत गेली. त्यामुळेच की काय, माडखोलकरांच्या 'रुक्मिणी' पूर्वीच्या बहुतेक कादंबऱ्यांतील नायक हे समाजवादी आहेत. समाजवादाच्या अधिष्ठानावर त्यांच्या विविधरुपी राजकारणाचे रंग उमटले आहेत. राष्ट्रवादाचेच एक अंग समाजवाद आहे. आणि समाजाचेच एक अंग राजकारण आहे. हे सांगायला नकोच! यामुळेच, आपणा जिला 'राजकीय' कादंबरी म्हणतो तिला युरोपात समाजात्मक कादंबरी (Sociological fiction) म्हणत असावे!

माडखोलकरांच्या बहुतेक कादंबऱ्यांत काही राजकीय घटनांचे प्रतिबिंब पडले आहे किंवा त्या राजकीय घडामोडींच्या निदर्शक आहेत म्हणून त्यांना 'राजकीय कादंबरीकार' म्हणतात असे मला वाटत नाही; तर त्यांच्या कादंबऱ्यांतील नायक हे स्वतः राजकारण जगतात विशिष्ट प्रकारचे राजकीय ध्येय दृष्टीसमोर ठेवून ते प्राप्त करण्यासाठी ते ईर्ष्येने झटतात व त्या खडतर प्रवासात त्यागाची परिसीमाच ते गाठतात असे नव्हे, तर जिवाचीही पर्वा न करता ते स्वतःला झोकून देतात. राजकारण हा त्यांचा बाहयोपचार नाही, तर अंतरंगातून स्फुरलेला व प्राणाचीही तमा न बाळगता स्वातंत्र्यांच्या वेदीवर आत्माहुती देण्यासही तयार असलेला धगधगीत असा आचारधर्म आहे. त्यांच्या रक्तात तो भिनला आहे. त्यांच्या वाणीत तो व्यक्त झाला आहे आणि त्यांच्या

कृतीत आत्मार्पणाच्या त्यागभावनेने तो उजळला आहे. "राष्ट्राच्या उद्धारासाठी स्वतःचा जरी बळी द्यायचा प्रसंग आला, तरी मी मागे पाहणार नाही" हे त्यांच्या 'कांता' या कांदबरीतील जयाचे उद्‌गार ('कांता', आ. २री (१९४७), पृ. २३९) याची साक्ष आहेत.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीयाही राजकारण करतात, इतकेच नव्हे तर राजकारण जगतात व राजकारणात प्रत्यक्ष भागही घेतात हे त्यांच्या 'प्रमद्वरा' या कादंबरीतील प्रमद्वरा व 'नवे संसार' मधील मुक्ता यांच्या स्वभावरेखातून प्रभावीपणे व्यक्त होते.

त्या दृष्टीने माडखोलकरांच्या कादंबऱ्या 'राजकीय', व माडखोलकर हे मराठीतले 'राजकीय कादंबरीकार' ठरतात.

राजकीय कादंबरीच्या संदर्भात एक विचार येथे व्यक्त करावासा वाटतो.

राजकीय कादंबरीत विशिष्ट काळातील राजकारणाचे अन्तःप्रवाह व त्याचे समाजमनावर होणारे परिणाम आणि परिवर्तने पात्र- प्रसंगांच्या द्वारे कादंबरीकाराने कलात्मकतेने रंगविलेले असतात. पण, विशिष्टकाळातील राजकारण हे सदैव तसचे कायम राहते असे नव्हे! ते कालानुसार बदलत असते. परिस्थितीनुसार बदलत असते, त्यामुळे, विशिष्ट काळातील राजकीय अन्तःप्रवाह व घटना- प्रसंग हे नंतरच्या काळात इतिहासाचे रुप धारण करतात. टिळकांच्या जहाल राष्ट्रवादाने प्रभावित झालेल्या राजकारणाने नंतरच्या काळात अहिंसावादाचे स्वरुप धारण केले. म्हणजेच गांधींच्या काळात टिळकांचे राजकारण हे इतिहासजमा झाले, अर्थात ऐतिहासिक ठरले. त्यामुळे, त्या काळातल्या राजकारणावर लिहिलेली कादंबरी ही, - तिच्यातील घटना राजकीय दृष्टीने कितीही महत्वपूर्ण असल्या, व त्या घटनांनी वा प्रसंगविशेषांनी समाजाच्या राजकीय मनात एकेकाळी कितीही परिवर्तन घडवून आणले असले तरीही, ते राजकारण नंतरच्या काळात गतार्थ झाल्यामुळे, - 'ऐतिहासिक' च ठरत नाही का?

माडखोलकरांच्या 'कान्ता' व 'मुखवटे' या कादंबऱ्यांचेच उदाहरण घ्या. या दोनही कादंबऱ्यांत तत्कालीन राजकारणाचा प्रवाह माडखोलकरांनी खेळविला आहे. मध्यप्रांतात १९३८-३९ साली ज्या राजकीय घटना घडल्या त्या कथारुपाने माडखोलकरांनी या कादंबऱ्यांत रंगविल्या आहेत. या दोनही कादंबऱ्यांतील 'प्रियदर्शन' म्हणजे त्या काळात मध्यप्रांत- वऱ्हाडात मुख्य मंत्री असलेले डॉ. खरे होत. आपल्या सहकाऱ्यांच्या, काँग्रेस पार्लमेंटरी पक्षाच्या अध्यक्षांच्या, व खुद्द म. गांधींच्याही विरोधामुळे त्यांना आपल्या मुख्य प्रधानकीचा राजीनामा द्यावा लागतो. गांधीवाद व गांधींची राजकीय मतप्रणाली यावर 'कांता' कादंबरीतील निरनिराळी पात्रे अगदी सडकून टीका करतात ('कांता ', (आ. २ री, पृ. ५५) गांधींच्या राजकीय चारित्र्यांविषयीही सर महादेव ठाकूर यांच्या मुखानं माडखोलकरांनी प्रतिकूलता व्यक्त केली आहे ('कांता ', पृ. १५७) 'मुखवटे,' या कांदबरीतही म. गांधी यांचे तत्वज्ञान, त्यांचे सगळे लहरी, छांदिष्ट व अहंनिष्ट राजकीय चारित्र्य ('मुखवटे', आ. १ ली, पृ. ३५०) यांचा, 'कांता' कादंबरीतला प्रवाहच माडखोलकरांनी अती वेगवान व अती तीव्र केला आहे. गांधीजींच्या राजकारणाचा परिणाम म्हणूनच मुख्यमंत्री असलेल्या प्रियदर्शनला पदभ्रष्ट व्हावं लागतं!- वस्तुतः मुख्यमंत्री हा काँग्रेस-पक्षाचा, त्याचे राजकारण हेही त्याच्या मानी स्वभावानुसार व लोककल्याणकारी

योजनानुसार त्याने अंमलात आणलेले! - म्हणजे काँग्रेसने नियुक्त केलेले, काँग्रेसपक्षाचेच मुख्यमंत्री, - आणि त्यालाच काँग्रेसपक्षाच्याच अती महत्वाच्या पुढाऱ्यांच्या मनमानी इच्छेनुसार, - लहरींनुसार म्हणा वाटल्यास, - राजीनामा देण्यास भाग पाडलेले! आणि तेही म. गांधींच्या अनुमतीने! - हे सर्व राजकारणच नव्हे का? - या राजकारणातील अन्तःप्रवाहच माडखोलकरांनी 'कांता' व विशेषतः 'मुखवटे' या कादंबऱ्यांत कादंबरीकारांच्या भूमिकेतून चित्रित केले आहेत.

'मुखवटे' या कादंबरीत महात्माजींच्या राजनैतिक तत्वज्ञानाचे खंडन माडखोलकरांनी केले. व ते करताना कांदबरीतील पात्रे ज्या प्रसंगातून वावरतात त्या प्रसंगांचा त्यांच्यावर होणारा मानसिक परिणाम- ह्याचेही चित्र त्यांनी रेखाटले. त्यांच्या व्यक्तिमत्वावर झगझगीत असा भावनात्मक प्रकाश त्यांनी टाकला. त्यामुळे 'मुखवटे' ही कादंबरी 'राजकीय' ठरते व माडखोलकर हे 'राजकीय कादंबरीकार' ठरतात.

राजकीय कादंबऱ्यांचे आयुष्य त्यातील विशिष्टकालीन राजकारणासारखेच अल्पजीवी ठरते का? - "राजकारण हा साहित्याच्या गळ्यात बांधलेला धोंडा आहे व तो त्या साहित्याला सहा महिन्यांच्या आत बुडवून टाकतो " असे लिडेलने म्हटले आहे.

('Politics is a stone tied to the neck of literature which sinks it in less Than six months'- (Robert Lideel, 'A Treatise on the Novel, 'P. 108) सर व्हयू वॉलपोल यांनीही राजकीय कादंबरीविषयी Nothing is more dead than a novel stuffed with the political notions of ten years ago'' असे उद्‌गार काढले आहेत.

पण, माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्यांतील राजकारण त्यांच्या कलात्मकतेला बाधक ठरले का? - त्यांच्या 'कांता' आणि 'मुखवटे' या कादंबऱ्यांचीच उदाहरणं घ्या. या कादंबऱ्या ज्या खरे - प्रकरणावर आधारलेल्या आहेत ती प्रकरणे राजकीय दृष्टया कधीच इतिहासजमा झाली आहेत. आजच्या कित्येकांना तर ही प्रकरणे ठाऊकही नाहीत. तरी माडखोलकरांच्या या कादंबऱ्या आजही लोकप्रिय आहेत. रसिकांच्या मनात घर करुन आहेत. याचे कारण या कादंबऱ्यांतील माडखोलकरांच्या कलात्मकतेत, त्यांच्या भावस्पंदनी व्यक्तिचित्रणकौशल्यात आहे. आपल्या लक्षात राहते ती कांता' तील कांता, सर महादेव ठाकूर, श्यामाकुमारी' — आणि 'मुखवटे' तील प्रियदर्शन, विठोबा, मोहन, रोज, - 'मुखवटे' तील 'शकुंतलेचा शाप', 'पाकळ्या झडून गेलेले फूल', 'घर आवो प्रीतम प्यारा' ही प्रकरणे तर भावस्पर्शित्वाच्या दृष्टीने अत्यंत हृदयंगम आहेत. राजकीय कादंबऱ्या ज्या यशस्वी होतात त्या त्यांतील व्यक्तिचित्रणामुळे! कादंबरीकाराच्या ठिकाणी असलेल्या संवेदनशील प्रतीतिसामर्थ्यामुळे!

अर्थात, माडखोलकरांच्या कादंबऱ्या रसिकहृदयांना अजून मोहवितात याचे कारण त्यातील राजकारण नसून त्यात आविष्कृत झालेली माडखोलकरांची कलाप्रवृत्ती आहे. त्यातील राजकारण हे वास्तववादी असेल, पण राजकारणात वावरणाऱ्या व्यक्ती, या वस्तुसृष्टीतल्या असल्या तरी, माडखोलकर आपल्या प्रतिभेचा असा काही विलक्षण झोत त्यांच्यावर पाडतात की, त्यातील राजकारण हे वास्तविक असले तरी त्यात भाग घेणाऱ्या व्यक्ती ह्या स्वतःच्या आंतरिक वैशिष्ट्याने चित्ररुप धारण करतात. हे व्यक्तिरेखाटनाचे,

- अधिक समर्पक शब्दात सांगावयाचे तर व्यक्तिचित्रणाचे,- कौशल्य माडखोलकरांना पुरेपुर साधले आहे, त्यांची निर्माणक शक्ती (Creative Power) त्यांनी रंगविलेल्या व्यक्तिचित्रांत व्यक्त होते. त्यांच्या ठिकाणी असलेल्या या निर्माणशक्तीमुळेच ते थोर कादंबरीकार होऊ शकले. या निर्माणक व्यक्तीचे वैशिष्ट्य काय? - वास्तवता? - कल्पनारम्यता? भावनात्मकता? सौंदर्यवाद? अभिजातवाद? - यापैकी कोणतेही एकच नाही ! - त्यात अभिजातवाद आहे. पण, अभिजातवादात उत्तरोत्तर येत गेलेल्या परंपरागत संकेतांचा व कर्मकांडाचा बडिवार नाही; त्यात वास्तवता आहे; पण, वास्तवतेतील रुक्ष व कर्कश अशी केवळ यथातथ्यताच नाही; त्यात कल्पनारम्यता आहे. पण आकाशात उडणाऱ्या पतंगाप्रमाणे केवळ कल्पनेच्या निःसंग भराऱ्या नाहीत, तर कल्पनेच्या पतंगाला वास्तवतेचेही भान आहे; त्यात भावनात्मकता आहे. पण, दुबळेपणात परिवर्तित होणारा भावनेचा अतिरेक नाही. त्यात सौंदर्यवाद आहे. पण, सौंदर्यवादातील आत्यंतिक भावनोत्कटता, अतिरिक्त स्वप्नाळूपणा, कृत्रिम हळवेपणा त्यात नाही. तरीही माडखोलकरांच्या (काही) कादंबऱ्या ह्या श्रेष्ठ कलाकृती ठरतात. याचे कारण, वरील सर्व प्रकारांतील अतिरेक टाळून आपले अवलोकन, अनुभव आणि अनुभूती यांनी जागृत झालेल्या आपल्या भावनाकोशातील स्पंदनांना कल्पकतेचे (Poetic Imaginations) साह्य देऊन माडखोलकरांनी आपल्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. आणि म्हणूनच ते यशस्वी कादंबरीकार ठरले. असे मला वाटते.

यात माडखोलकरांच्या बौद्धिकतेचा मी उल्लेख केला नाही असे काहीजण म्हणतील. कारण, माडखोलकरांचे व्यक्तिमत्व हे बुद्धिप्रद होते. पण, प्रतिभा हे प्रज्ञेचेच ललित रुप नाही का? - 'प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' असे 'काव्यानुशासन' कारांनी म्हटले आहेच! ललित लेखन करताना माडखोलकरांची नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञाच प्रतिभारुप धारण करते, आणि त्या प्रतिभेतूनच त्यांच्या कादंबऱ्या आविस्कृत झाल्या आहेत. त्यात प्रत्यभिज्ञा आहे व प्रतिभेची 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमता' ही आहे.

'प्रत्यभिज्ञा' असे मी मुद्दामच म्हटले आहे. कारण त्यात केवळ 'अभिज्ञा' च म्हणजे बौद्धिक अंशच राहत नसून प्रत्ययांचाही म्हणजे अनुभूतीचाही अंतर्भाव होतो. त्यांच्या ज्ञान व अनुभव यांनी संस्कारित असलेल्या मनावर भावना व कल्पना यांचा उद्‌भव होतो. त्या उद्‌भवातून त्यांचे ललितवाङ्मय अर्थात कादंबऱ्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच, माडखोलकरांचे व्यक्तित्व बुद्धिप्रधान असले तरी त्यांच्या कादंबऱ्या भावना व कल्पना यातून सृष्ट म्हणून कलात्मक झालेल्या आहेत.

माडखोलकरांच्या 'डाकबंगला' व 'चंदनवाडी' या कादंबऱ्या करुणान्त आहेत. त्यांचा दुःखान्त शेवट वाचून सहृदयांना जो भावानुभव येतो तो आनंदाचा असतो की दु:खाचा? –

'डाकबंगला' या कादंबरीला सुरुवातच मुळी नायिकेचे प्रेत तलावातून बाहेर काढण्याच्या प्रसंगाने होते, व शेवट तिने स्वेच्छेने केलेल्या आत्मघाताने होते. हा आत्मघात सहृदयांच्या डोळ्यांत अश्रू उभे करतो! 'चंदनवाडी' या कादंबरीचा शेवटही' 'चंदन' च्या मृत्युत पर्यवसित होतो. हा करुण शेवटही अनेकांना दुःखानुभूती देणारा ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी 'चंदनवाडी' वाचल्यावर माडखोलकरांना लिहिलेल्या पत्रात 'चंदनच्या मृत्यूचा प्रसंग वाचताना माझ्या डोळ्यात अश्रू आले, असे म्हटले होते ('चंदनवाडीची पार्श्वभूमी, ' पृ. २८, चंदनवाडी', आ. ३ री) आचार्य अत्रे यांनीही, 'चंदनवाडी' संबंधी बोलताना

"चंदनसारख्या अश्राप, गोड पोरीला मारुन तुम्ही काय साधलंत?" असे उद्‌गार माडखोलकरांजवळ काढले होते. ('चंदनवाडीची पार्श्वभूमी ', पृ. २९) म्हणजे करुण रस हा सहृदयांच्या दुःखाला कारणीभूत होतो, असे यावरुन दिसते. करुण रसापासून, इतर रसांप्रमाणेच, आनंद होतो, असे म्हणणाऱ्या काव्यानंदमीमांसकांनी हे ध्यानात घ्यायला हवे. ॲरिस्टॉटलच्या Catharsis च्या उपपत्तीचा आधार घेऊन, सहृदयांच्या अंतः करणात दबून असलेल्या, किंवा दडपल्या गेलेल्या अथवा सुप्तावस्थेत असलेल्या भय आणि अनुकंपा या भावना जागृत होऊन त्या भावनांचे विरेचन करुणरसयुक्त कलाकृती पाहून होते, व त्या भावनांचे विरेचन झाल्यामुळे रसिकांना आनंद होतो, असे करुणरसापासून होणाऱ्या काव्यानंदाची मीमांसा करताना समीक्षक म्हणतात. पण, ही मीमांसा वास्तविक आहे का? - माडखोलकरांच्या 'डाकबंगला' व 'चंदनवाडी' या शोकान्त कादंबऱ्या वाचून डॉ. आंबेडकर व आचार्य अत्रे यांचे जे मनोव्यापार झाले ते सुखरुप होते असे म्हणता येईल का? ते दुःखरुपच होते. म्हणजे त्यांच्या अंतःकरणातील भय व अनुकंपा या भावनांचे विरेचन न करता त्यांना दुःख देणारेच ते ठरले. म्हणजे करुण रस हा सहृदयांच्या अंतःकरणातील भय व अनुकंपा या भावनांचे विरेचन करणारा व तद्वारा त्यांना आनंद देणारा ठरत नसून उलट ते या भावनांना उत्तेजित (Excite) प्रक्षुब्ध (Incite) करणारेच ठरते. व त्यामुळे करुण रसापासून आनंद होतो असे म्हणता येत नाही. त्यामुळेच दुःखच होते असेच अनुभवास येते.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांवर टीकाकारांकडून अश्लीलतेचा आणि शृंगारिकतेचा आरोप वारंवार करण्यात येतो. आणि हा आरोप करताना त्यांच्या 'डाकबंगला' व 'नागकन्या' या कादंबऱ्यांची विशेषत्वाने साक्ष काढली जाते. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांत शृंगारिकता दिसते की अश्लीलता? - डॉ. वाळिंबे यांनी माडखोलकरांच्या कादंबऱ्यांवर उत्तान व भडक शृंगाराचा आरोप केला आहे ("मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत; पृ. २४७). १९४६ च्या मे मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलनप्रसंगी प्र. के. अत्रे यांनीही 'माडखोलकरांचा शृंगार मोठा कडक असतो' असे विचार केले होते. उत्तान, शृंगारिक वर्णनांबद्दल प्रसिद्ध असलेल्या प्रा. ना. सी. फडके यांनीही माडखोलकरांची 'नागकन्या' ही कादंबरी प्रसिद्ध होताच आपल्या 'झंकार' या साप्ताहिकाच्या ता. २२ मार्च १९४२ अंकात "माडखोलकरांची नाग (वी) कन्या' हा लेख लिहून तिच्यावर अश्लीलतेचा आरोप केला.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यात अश्लीलता आहे काय, याचा विचार करताना 'अश्लीलता' म्हणजे काय? - शृंगार व अश्लीलता यात फरक कोणता आहे, याचा विचार व्हायला पाहिजे. कलाकृतीतील शृंगार हा एक आस्वाद्य असा 'रस' आहे. अश्लीलता हा मनोविकार आहे. साहित्य दर्पणकारांनी 'अश्लीलत्वं व्रीडाजुगुप्साडमंगल-व्यंजकात् त्रिविधम्' या उद्‌गारात म्हटल्याप्रमाणे अश्लीलता हा रसापकर्षक असा दोष आहे. आणि रसापकर्षक असा दोषच केवळ नव्हे, तर कलाविलासाला विघातक अशी ती मनोविकृती आहे. येथे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'विद्वत्व आणि कवित्व' या आपल्या निबंधात केलेल्या 'अश्लीलत्व म्हणजे चावटपणा ', या अश्लीलतेच्या व्याख्येची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. 'डाकबंगला' ही कादंबरी एक करुणरम्य भावकथा आहे. तिच्यात टीकाकारांना अश्लीलता कशी काय आढळते हे त्यांनाच ठाऊक! वास्तविक या भावकथेत अश्लीलतचाच काय, पण शृंगारिकतेचा सुद्धा आरोप करता येईल असे काहीही नाही. उलट, या कादंबरीत, टीकाकारांना उत्तान वाटणाऱ्या गोष्टीही माडखोलकरांनी मोठ्या हळुवारपणाने व संयमाने सूचित केल्या आहेत. त्यांत अश्लीलतेची बीभत्सता किंवा घृणास्पदता तर नाहीच, पण शृंगारिकतेची लोलंगिताही नाही! उलट, आहे ती माडखोलकरांच्या ठिकाणी असलेली कलात्मक योजकता व सूचकता! त्यात सूचकतेची

सुषमा आहे, अश्लीलतेची बीभत्सता अथवा शृंगारिकतेचा विलास नाही! सूचकता हा कलेचा आत्मा आहे याचा प्रत्यय माडखोलकरांनी रेखाटलेल्या 'डाकबंगल्या' तील करुणरम्य नायिकेच्या व्यक्तिचित्रणात आल्याशिवाय राहत नाही! आणि त्याबरोबरच, - "A novilist's characters are not wholly in his control and he must not take in order to produce a pleasant character for the sake of producing characters" हे वॉल्टर ॲलन, यांचे उद्‌गारही येथे आठवतात. (Walter Allen : Reading a Novel' P.27)

टीकाकारांनी केलेल्या अश्लीलतेच्या आरोपाला कारण ठरलेली माडखोलकरांची दुसरी कादंबरी 'नागकन्या' ही!

माडखोलकरांच्या 'मुखवटे' या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीच्या (१९४०) वेष्टनावर जे चित्र आहे ते पाहूनच, माडखोलकर हे 'गांधी' विरोधी आहेत अशी, गांधीभक्तांचीच नव्हे तर गांधीवादी टीकाकारांचीही भावना झाली व माडखोलकरांवर गांधीद्वेषाचा छाप मारण्यात त्यांनी धन्यता मानली... अशीच स्थिती 'नागकन्या' या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीच्या (१९४२) वेष्टनावरील भडक शृंगारिक चित्र पाहूनच बहुधा, ही कादंबरी अश्लील असल्याचा गदारोळ टीकाकारांनी केला...

पण, 'नागकन्या' कादंबरीत खरोखरीच अश्लीलता आहे का?

नायक व नायिका यांच्या प्रणयमीलनाचा प्रसंग या कादंबरीत माडखोलकरांनी कुठेही रंगविलेला नाही. कादंबरीची नायिकाच मुळी "आजपर्यंत कुणाच्याही वासनेचं मी खेळणं होऊ दिलेलं नाही स्वतःला!" असं म्हणतं. ('नागकन्या', द्वितीयावृत्ति, पृ. १४३). इतकेच नव्हे तर, नायकाच्या लंपट कल्पनांचा धिःकार ती करते व "प्रीती हा यौवनाच्या धर्म आहे असे तू म्हणतोस, ते अर्धसत्य आहे; पूर्णसत्य नव्हे. यौवनाचा धर्म एवढा एकच नाही. इतका संकुचित नाही. प्रीती हा यौवनाचा धर्माचा फक्त एक भाग, यौवनाच्या प्रभावाचा फक्त एक आविष्कार आहे. ते यौवनाचं सर्वस्व नव्हे, साफल्य नव्हे आणि सामर्थ्य तर नव्हे" असे ती त्याला फटकारते! ('नागकन्या,' पृ. ४१) या कादंबरीत अश्लीलता नाही. आणि शृंगार असला तरी तो संभोगशृंगार नाही, विप्रलंभशृंगार आहे. साहित्यशास्त्रात शृंगररसाचे जे दोन प्रकार सांगितले आहेत त्यांपैकी विप्रलंभशृंगार हाच अधिक सूचक, अधिक भावपोषक व अधिक आस्वाद्य असतो. तो कलेला विघातक आहे, असे कसे म्हणता येईल? - कालिदासाच्यां मेघदूतात विप्रलंभ शृंगाराचाच विलास आहे.

माडखोलकर हे प्रतिकृतीवादी की प्रतीतिधर्मी? –

प्रतिबिंबवादी (Impressionist) कादंबरीकाराच्या मनावर बाह्य वस्तूचं जे प्रतिबिंब पडलेलं असतं तेच, स्वतःच्या प्रकृती आणि संस्कृतीनुसार, तो आपल्या कादंबरीत रंगवितो. बिंबाचं प्रतिबिंब असं स्वरुप असतं त्याच्या कादंबरीचे. त्यात कला नसते. कादंबरीकाराच्या निर्माणक शक्तीचे (Creative Power) दर्शन नसते. त्याच्या काव्यात्म कल्पकतेचा (Poetic Imagination) रमणीय अथवा उदात्त असा विलास नसतो किंवा त्याच्या भावनात्मकतेची सांद्रताही त्यात नसते. -त्यात असते फक्त वास्तविकता! वास्तववादाचाच तो एक प्रकार असतो. कादंबरीकाराच्या मनावर वस्तुसृष्टीचे जे प्रतिबिंब उमटले असेल अथवा त्याला वास्तवाचे जे दर्शन

झालं असेल त्या वास्तवाचं सुंदर भाषेत व स्वतःच्या व्यक्तिमत्वानुसार तो वर्णन करतो आपल्या कादंबरीत. ते आकर्षक असेल, पण प्रतीतीकारक नसते. ते केवळ बाहयरुप आहे. कादंबरीकाराला दिसलेल्या जगाचं! केवळ बाह्यांग आहे ते! तो केवळ अनुकरणधर्म आहे, प्रतीतिधर्म नव्हे!

कला काय नुसती अनुकरणात्मक असते? —

कलावंत हा नुसतं अनुकरणच करीत नाही, तर आपल्या हृदयाचा आविष्कार करीत असतो आपल्या कलेत. वस्तुसृष्टीच जे काय आकलन त्याला झालं असेल त्याच्या मागचं त्याला प्रतीत झालेलं सौंदर्य म्हणा, आशय म्हणा, मूलस्रोत म्हणा, अथवा निसर्गतत्व म्हणा- तो अभिव्यक्त करीत असतो आपल्या कलाकृतीत! ते कलावन्तानं पाहिलेल्या वस्तूचं (object) छायांकन (Impression) किंवा अनुकरण (Imitation) नसते तर त्यात अंतर्हित असलेल्या व कलावन्ताला प्रतीत झालेल्या त्यातील आतल्या अर्थांच (Inner meaning), अथवा निगूढतेचं कलावन्तानं केलेलं ते आत्माविष्करण (Self expression) असतं. त्यांच्या आत्मभावनेचा आविष्कार असतो तो!

कलावंत हा वस्तुसृष्टीपासून आपले साहित्य घेत असला, तरी त्या साहित्याच्या त्याच्या संवेदनशील अंतःकरणावर जो ठसा उमटला असेल, त्याच्या अनुभूतीविश्वात त्या साहित्यामुळे जे भावतरंग उठले असतील अथवा त्याला जी प्रतीती आली असेल ती प्रतीती, भावना आणि कल्पना यांच्या साहाय्याने, आपल्या कलाकृतीत तो अभिव्यक्त करीत असतो. वस्तुसृष्टीतील साहित्याच्या आधारे स्वतःच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेने तो अपरसृष्टी उत्पन्न करतो, नवनिर्मिती करीत असतो. कला ही जीवनाची केवळ प्रतिकृती नाही, कलावन्ताने आपल्या सृजनशक्तीने (Creative Power) निर्माण केलेली ती नवनिर्मिती आहे. त्याला आलेल्या प्रतीतीचे ते कलात्मक आविष्करण असते. त्यात त्याच्या स्फुरणशील प्रतिभेचे, -

'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमतेचे' दर्शन घडते.

कादंबरी हा कवितेसारखाच आत्माविष्कारी प्रकार आहे. कादंबरी ही कादंबरीकाराच्या सर्जनशीलतेची अभिव्यक्तीच आहे. कादंबरीकाराने जीवन जगत असताना जीवनासंबंधी जे अनुभवले असेल, ते निरिक्षिले असेल- अर्थात त्याच्या मनो-बुद्धीवर भोवतालच्या जगाचे जे स्वानुभूत संस्कार झाले असतील व त्या दृष्यातील अंतरंग- अर्थ (Inner meaning) जो त्याला प्रतीत झाला असेल त्याचा आविष्कार पात्रे (Characters) आणि कथानक (Story) यांच्या द्वारा तो कांदबरीत अभिव्यक्त करीत असतो. यात त्याला आलेली जीवन- सत्याची जाणीव अंतर्भूत असते. ही जाणीवच त्याला प्रतीत झालेली जीवनातील व सृष्टीतील अर्थात्मकता अथवा सारगर्भता-भावना आणि कल्पना यांच्या साहाय्याने भाषेच्या द्वारा तो आविष्कृत करतो. जीवनानुभव व बाह्यजगाचे अवलोकन आणि निरीक्षण तो पात्र-प्रसंगांच्या द्वारा व्यक्त करतो. अर्थात, ही कादंबरीकाराची सृजनशीलता आहे. सृष्टीतील घटनांची ती प्रतिबिंबता नाही, तर कादंबरीकाराने आपल्या 'प्रतिभाबले' केलेली ती पुनर्निर्मिती आहे. आणि त्यातच त्याची कलात्मकता आहे. त्याने निर्माण केलेली उपरसृष्टी हा त्याच्या आत्म्याचा जिवंत असा आविष्कार असतो. ललितकलांचे ध्येय प्रतिकृती (Imitation) हे नव्हे, तर नूतन निर्मिती (creation) हे आहे.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यात त्या सृजनशीलतेचा कलात्मक प्रत्यय येतो. त्यांनी आपल्या कादंबऱ्यात अनेक ठिकाणी निसर्गवर्णने केली आहेत. पण, ती निसर्गाची केवळ बाह्यवर्णनेच नाहीत. वस्तुनिष्ठा हेच केवळ त्यांचे वैशिष्ट्य नाही; तर या वर्णनात सृष्टीत अंतर्हित असलेल्या चैतन्याचे आणि वैभवाचे दर्शन व मानवी भावभावनांवर होणाऱ्या त्यांच्या परिणामांचेही दर्शन त्यांनी घडविले आहे. त्यामुळे त्यांची निसर्गवर्णने ही कथानकाला चिकटलेली बाह्य वस्तू वाटत नाही तर कथेतील पात्रांच्या भावनांशी समरस झालेली, किंबहुना त्यांच्या भावनांना प्रद्युक्त करणारी बाह्यतः स्थितीशील, पण अंतरंगतः गतिशील, चैतन्यमय अशी ती झालेली आहेत. निसर्गाची ती केवळ छटा नाही, तर निसर्गाच्या मुखावर जो अर्थपूर्ण भाव आहे त्याचा आपल्या कादंबऱ्यातील पात्रांच्या भावभावनांवर होणाऱ्या परिणामांचा अनुकूल- प्रतिकूल असा चित्रमय आलेख त्यांनी काढला. निसर्गातील चैतन्यतत्वाचा आविष्कारच पात्र- प्रसंगांच्या अभिव्यक्तिद्वारे त्यांनी घडविला. इथे त्यांच्या 'चंदनवाडी' कादंबरीतील एक उदाहरण सादर करतो. वर्धा नदीच्या संदर्भात या कादंबरीतील येसूची भावना माडखोलकरांनी कशी आत्मभावाने व्यक्त केली आहे पहा. "इतरांना वर्धा ही एक सामान्य नदी होती. पण येसूच्या दृष्टीने वर्धा नदी हे सर्व तीर्थांचे तीर्थ होते, सर्व मातांची माता होती..... व्युत्पत्ती आणि इतिहास यांना अनाकलनीय असा जो जीवनाचा अनंत अखंड धागा माणसाला निसर्गाशी निगडित करीत असतो त्या अदृश्य धाग्याने तिचा सगळा जीवभाव वर्धा गुंतून गेला होता. तिचे मन हे वर्धेच्या बाबतीत जणू नाळ न तोडलेल्या तान्हुल्यासारखे होते..... येसूला वर्धा ही आईसारखी, नव्हे आईच वाटे व तिचे अनागर, अनघ मन त्या आईचा पदर सोडून जावयाला तयार नव्हते." ('चंदनवाडी' आ. १ ली, १९४३ पृ. २९) निसर्गातील स्पंदने, त्यातील चैतन्य आणि वैभव जिवंत होऊन मानवी भावभावनात कशी संक्रान्त होतात, व सजीव होऊन एका अदृश्य पण चैतन्यशील अशा अपार्थिव स्वरुपात ती मानवी मनात कशी साकार होतात याचे माडखोलकरांनी काढलेले हे प्रतीतिस्फूर्त शब्दचित्र आहे. त्यांच्या सृजनशील प्रतिभेचा हा कलात्मक अविष्कार आहे. हे अनुकरण (Imitation) किंवा प्रतिबिंब (Impression) नाही, तर प्रतीतीचे ते आविष्करण आहे. त्यावरुन माडखोलकरांच्या प्रतिभेचा धर्म हा प्रतिकृतीवादी नसून आविष्कारवादी आहे असे प्रत्ययाला येते.

याला उपोद्‌बलक असे माडखोलकरांचे स्वतःचे उद्‌गारही येथे सादर करता येतात. 'वास्तववादाचे स्वरुप आणि कार्य' याविषयी ते म्हणतात —

"पाण्यात पडलेल्या सावलीसारखे जीवनाचे नुसते प्रतिबिंब दाखविण्यात ललित लेखकाला कसला आनंद आहे? आणि त्याच्या सृजनसामर्थ्याचा तरी कोणता गौरव आहे? नुसते प्रतिबिंब दाखवावयाला सृजनशक्तीची गरज नाही. बिंबग्राही मन असलेला कोणताही लेखनकुशल मनुष्य ते काम करु शकतो. वास्तववादाचा अर्थ जर नुसता दिसेल तसे लिहिणं एवढाच असता, तर वर्तमानपत्रांचे बातमीदार उत्तम कादंबरीकार का न होते? पण वास्तवता म्हणजे नुसते प्रतिबिंब नव्हे, जसे दिसेल तसे रेखाटणें नव्हे. अशा प्रकारच्या कलाहीन वास्तवतेला ललित वाङ्मयात थारा नाही. कलावंत हा जीवनाचा पुनर्निर्माता असतो, छायाचित्रकार नव्हे." ('आव्हान', १९४१, पृ. ११)

आणखी एका ठिकाणी माडखोलकर म्हणतात —

“मी जर अशा रीतीने केवळ पाहयलं ते लिहायला लागलो, तर मग त्यात माझं स्वतःचं ‘चातुर्य ते काय राहिलं?” (‘चंदनवाडी’ ची पार्श्वभूमी, ‘चंदनवाडी’, आ. ३ री, १०५८, पृ. २७) यातील ‘चातुर्य’ या शब्दाने कलावंताच्या ठिकाणी असलेल्या सृजनशक्तीचा, त्याच्या ठिकाणी असलेल्या निर्माणक सामर्थ्याचा (Creative Power) व काव्यात्मक कल्पकतेचाच (Poetic Imagination) माडखोलकरांनी गौरव केला. त्यांच्या कादंबऱ्यात या सृजनशील कलासामर्थ्याचा प्रत्यय येतो आणि म्हणूनच ते प्रतिकृतीवादी नव्हे, तर प्रतीतिधर्मी कादंबरीकार ठरतात.

⁂ ⁂ ⁂

अनुक्रमणिका

## | माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील मार्क्सवाद |

------------------------------------------------------------------------डॉ. वि. स. जोग

गजानन त्र्यंबक उपाख्य भाऊराव माडखोलकर हे मराठीतील ज्येष्ठ राजकीय कादंबरीकार आहेत. माडखोलकरांची 'मुक्तात्मा' ही पहिली कादंबरी १९३३ मध्ये प्रसिद्ध झाली. मामा वरेरकरांची 'धावता धोटा' ही कादंबरीही १९३३ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यामुळे राजकीय कादंबरीच्या अग्रपूजेचे हे दोघे मानकरी आहेत. या दोघांच्या पूर्वी वरखेडकर, केतकर, वा. म. जोशी यांच्या कांदबऱ्यातून समकालीन राजकारणाचे संदर्भ आहेत. पण केवळ राजकीय संदर्भ असणे एवढाच काही राजकीय कादंबरीचा निकष होऊ शकत नाही. राजकीय कादंबरीत राजकारण केंद्रस्थानी असते. नायक किंवा नायिका किंवा कादंबऱ्यातील प्रमुख पात्रे यांचा राजकारण हा पहिला पसंतीक्रम असतो. राजकारणाने त्यांच्या जीवनाला आकार येतो. कादंबरीच्या कथानकाला गती येते. कादंबरीकार हा राजकारणाशी निगडीत असतो. तो राजकीय कार्यकर्ता तरी असतो किंवा राजकीय विचारवंत तरी असतो. समकालीन राजकारणातील महत्वाच्या व्यक्ती त्यांच्या कादंबऱ्यातील पात्रे बनतात. ती पात्रे कादंबरीकाराच्या राजकीय भूमिकेची वाहक बनतात. माडखोलकरांच्या पूर्वी वामन मल्हार जोशी, श्रीधर व्यंकटेश केतकर इ. च्या कादंबऱ्या राजकीय कादंबऱ्याच्या उपरोक्त निकषावर पूर्णतः उतरत नाहीत. त्यांच्यापाशी समग्र राजकीय भूमिका नव्हती विशिष्ट भूमिका असली तरी ती बदलत होती. माडखोलकरांच्या समकालीन कादंबरीकारांपैकी वरेरकर आणि पु. य. देशपांडे यांच्यापाशीही ठाम राजकीय भूमिका नव्हती. एका दोन कादंबऱ्यातून पुढच्या पुढच्या कादंबऱ्या मध्ये त्यांची अगोदरची राजकीय भूमिका पूर्ण बदलली. विरोधी झाली. साम्यवादी पु. य. अध्यात्मवादी झाले. वर्गसंघर्षाचा 'धावता धोटा' मध्ये पुरस्कार करणारे मामा वरेरकर त्या कादंबरीवर लिहिलेल्या 'सोन्याचा कळस' या नाटकात मात्र वर्गसमन्वय वादी होतात. पुढे वरेरकर काँग्रेसवादी झाले. अर्थात वरेरकर आणि पु. य. या समकालीन कादंबरीकारांची राजकीय कादंबरीकार म्हणून प्रतिष्ठा माडखोलकरांच्या तुलनेत घसरली. माडखोलकरांच्या उत्तरकालीन राजकीय कादंबरीकारात अरुण साधूंचे नाव घेतले जाते. पण पत्रकारिता हा समान दुवा असला तरी अरुण साधूंच्या राजकीय कादंबऱ्यात एकल राजकीय भूमिका नाही. त्यांच्या कादंबऱ्या राजकीय डावपेचांच्या, सत्तासंघर्षाच्या अधिक आहेत. समकालीन राजकारणाचे बारकावे त्यांच्या कादंबऱ्यात टिपकागदी शैलीने, प्रतिबिंब भावाने येतात. भाष्यरुपाने कमी येतात. त्यामुळे पूर्वकालीन, समकालीन आणि उत्तरकालीनात माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान अबाधित राहते.

**मार्क्सवादांची शुद्धी आणि वृद्धी –**

माडखोलकरांच्या कादंबऱ्याना ही वैशिष्ट्यपूर्णता मार्क्सवादाने दिली. साहित्य आणि समाज यांच्या संबंधाची वाहतुक एकेरी नसते. एकेरी नसावी. ऐतिहासिक भौतिकवादाची ती अपेक्षा आहे. ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे ऐतिहासिक नियतीवाद नाही. समाजाचे, सामाजिक संबंधाचे, सामाजिक संघर्षाचे प्रतिबिंब कादंबऱ्यात पडते. पडावे. त्याचबरोबर सामाजिक संबंध परिष्कृत करण्याचे, सामाजिक संघर्ष नियंत्रित करण्याचे, इष्टानुगामी करण्याचे कार्य कादंबरीकाराला करावयाचे असते. माडखोलकरांनी मार्क्सवादाच्या संदर्भात हे कार्य केले. स्वतःच्या कादंबऱ्यातून माडखोलकरांनी मार्क्सवादाची शुद्धी, वृद्धी केली. मार्क्सवादाच्या राजकीय

अनुक्रमणिका

अंगापासून म्हणजेच कम्युनिस्ट पक्षापासून माडखोलकर फटकून राहिले नाहीत. पण योग्य वेळेस पक्षाला फटकारण्यास त्यांनी कमी केले नाही.

**कोलांटउड्या नाहीत** –

इतर काही कवी कादंबरीकारांप्रमाणे माडखोलकरांनी मार्क्सवादाच्या स्वीकार नकारात कोलांटउड्या घेतल्या नाहीत. माडखोलकरांची वाङ्मयविषयक भूमिका स्थिर आहे. त्यांची जीवनविषयक भूमिका स्थिर आहे. त्यांची मार्क्सवादाविषयक भूमिका स्थिर आहे.

ती स्थिर भूमिका १९७० मधील त्यांच्या 'मी आणि माझे कादंबरी लेखन' या लेखात पुढीलप्रमाणे व्यक्त झाली. 'आपल्या देशाचे केवळ पारतंत्र्यच नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट व्हायलाही साम्यवादाचे तत्वज्ञान उपयोगी पडेल....... दुसऱ्या महायुद्धातील स्टॅलिनच्या विसंगत, अनाकलनीय धोरणामुळे आणि त्या धोरणाची री ओढणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या अराष्ट्रीय वृत्तीमुळे रशियन राजनीतीविषयी मला आदर उरला नाही. तथापि, समाजवादाविषयीची अनुकूलता मात्र कायम राहिली. १९२२ पासून वृत्तपत्र व्यवसायात आणि सार्वजनिक जीवनातही मला जे अनुभव येत गेलेले होते, त्यामुळे सोशॅलिझमच्या पायावर आपल्या समाजाची पुनर्घटना झाल्याशिवाय सर्वसामान्य माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगता येणार नाही, अशी माझी भावना होऊन गेलेली होती........ केवळ वैयक्तिक अनुभवांमुळेच समाजवाद मला ग्राह्य वाटला, असे मात्र नाही. इतिहासात प्रतिबिंबित झालेला एकंदर मानवी जीवनाचा ओघ पाहून, माझी अशी धारणा झाली की, कर्मगतीमुळे किंवा दैवगतीमुळे म्हणा, वैषम्य आणि नैर्घृण्य यांनी ग्रासलेल्या मानवी संसारात व्यक्तिमात्राला स्वतःच्या प्रवृत्तीनुसार विकास करुन घेण्याची समान संधी जर मिळावयाला हवी असेल तर ती आत्मस्वातंत्र्य आणि समाजवाद यांच्या अवलंबनानेच मिळू शकेल. विषमता आणि परस्परांचे शोषण हा मुळी द्वंद्वमय सृष्टीचा कायदाच आहे. त्याचा जबरदस्त काच थोडा जरी आपल्याला सैल करणे शक्य असेल आणि करण्याची आकांक्षाही असेल तर या दोन प्रमेयांच्या पायावरच मानवी संसार आणि शासन यांची पुनर्घटना करण्यात आली पाहिजे."

(येथे संदर्भ युगवाणी माडखोलकर विशेषांक १९९९ मूळ संदर्भ एका पिढीचे आत्मकथन - संपादित ग्रंथ)

**मध्यमवर्गाच्या ऱ्हासाचे चित्रण** –

३१ आक्टोबर १९७१ रोजी नागपूरच्या दै. तरुण भारत मध्ये लिहिलेल्या 'माझे लेखन कशासाठी?' या लेखात स्वतःच्या कादंबऱ्या आणि मार्क्सवाद यामधील संबंध सूचित करताना भाऊराव लिहितात, "(माझ्या कादंबऱ्यामुळे) मी एका बाजूने क्रांतिकारकांपर्यंत आणि दुसऱ्या बाजूने दलित वर्गापर्यंत जाऊन पोचलो. तितकीच दुसरी महत्वाची गोष्ट ही की, वरिष्ठ आणि कनिष्ठ मध्यम वर्गांचा जो ऱ्हास गेली चाळीस वर्षे सारखा झपाट्याने होत आहे, त्याचे विश्लेषण आणि चित्रण करुन निरनिराळ्या गुंतागुंतीच्या राजकीय आणि सामाजिक

समस्याही मी सर्वसामान्य वाचकवर्गाच्या निदर्शनाला आणून दिल्या." ( मी आणि माझे वाचक, विजय प्रकाशन १९७२ पृ. ६-७)

**वाङ्‌मयविषयक भूमिका**

माडखोलकरांची जीवननिष्ठा मार्क्सवादाने संस्कारली आहे. मार्क्सवाद आणि राष्ट्रवाद यांचा समन्वय ही त्यांच्या कादंबऱ्यानी मध्यमवर्गीय मराठी मानसिकतेला पुरवलेली कुमक. त्यांची वाङ्मय विषयक भूमिका बहुशः मार्क्सवादी आहे. कधी ती, 'कला ही कोणत्याही काळी आणि स्थळी कोणाची ना कोणाची तरी गुलामही होतीच. आज प्रश्न एवढाच आहे की, यापुढे तिने जगातील चिमूटभर प्रतिष्ठितांचे दास्य करावयाचे अगर विराटस्वरुपी बहुजन समाजाच्या उद्धाराला हातभार लावायचा?' (जीवन आणि साहित्य पृ. १८) अशा कट्टर शब्दात व्यक्त होते. कधी ती मॅक्झिम गोर्कीचा 'समाजवादी वास्तवतावाद' (सोशॅलिस्ट रिॲलिझम) पुढील शब्दात अनुसरते, "खरा वास्तववादी हा समाजाची सुधारणा करण्याच्या आंतरिक तळमळीने प्रेरित झालेला असतो. जीवनाच्या प्रगमनशीलतेवर त्याची श्रद्धा असल्यामुळे त्याने रेखाटलेल्या वस्तुचित्राला ध्येयवादाची उज्ज्वल पार्श्वभूमी लाभते." (आव्हान पृ. ११-१२)

मॅक्झिम गोर्कीच्या 'समाजवादी वास्तवतावादात' जीवन आहे तसे रंगविणे, जीवन कसे व्हावे तेही रंगवणे या दोन्ही गोष्टी येतात. वस्तुस्थितीतील वेदना, विद्रोह आणि विजय या तिन्ही गोष्टींना समाजवादी वास्तवतावादात स्थान आहे. साहित्यिकाने केवळ वेदना कुरुवाळू नये. विद्रोहाची ठिणगीही वस्तुस्थितीत असेल तर दाखवावी. नसेल तर चेतवावी. भविष्यातील विजय सूचित करावा. भविष्याच्या पोटात पराभव असू शकतो. विजय असू शकतो. साहित्यिकाने मात्र विजयाची स्वप्ने पहावी असा समाजवाद वास्तवतावादाचा स्थूल आशय आहे. माडखोलकरांनी हा आशय ध्यानात घेतला. ललित वाङ्मयाची व्याख्या केली, "ललित वाङ्मय म्हणजे निव्वळ सत्य नव्हे किंवा निव्वळ कल्पनाही नव्हे; तर अवलोकन, अनुभूती आणि आकांक्षा यांची मनोहर सरमिसळ" ( मी आणि माझे साहित्य पृ. ११७)

स्वतःच्या व्याख्येशी त्यांच्या कादंबऱ्या प्रामाणिक आहेत.

**मार्क्सवाद आविष्करणाचे प्रकार** –

त्यांच्या कादंबऱ्यातील मार्क्सवाद आविष्कृतीच्या विविधपरी आहेत. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचे नायक किंवा सहनायक मार्क्सवादी आहेत. प्रसंगी पूर्णतः मार्क्सवादी नसले तरी वर्गविहीन शोषणयुक्त समाजव्यवस्थेची अनिवार्यता मानणारे, भांडवलशाहीला विरोध करणारे आहेत. कादंबऱ्यातील इतर पात्रांपैकी लेखकाची सहानुभूती ज्या पात्रांना आहेत ती पात्रे मार्क्सवादी आहेत. काही कादंबऱ्यातील खलनायक भंपक गांधीवादी आणि भांडवलदार किंवा जमीनदारांचे पुढारी आहेत. भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील गांधीजींचे योगदान मान्य करुनही माडखोलकर एकाच वेळेस साम्राज्यशाही आणि भांडवलशाही यांच्याशी अनिवार्य संघर्ष, त्या संघर्षात आवश्यकतेनुसार सशस्त्र प्रतिकार अशी भूमिका घेतात. १९४६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'सुभाषवाद' या ग्रंथात त्यांनी अशी स्वच्छ भूमिका घेतली. ती भूमिका त्यांच्या कादंबऱ्यातून आविष्कृत

अनुक्रमणिका

झाल्याशिवाय कशी राहील? कम्युनिस्टांच्या प्रभावाखालील कामगार चळवळींचे सविस्तर वर्णन त्यांच्या काही कादंबऱ्यात आहे. अर्थात, मार्क्सवाद ही केवळ राजकीय चळवळ नाही. व्यक्तीमनातील आणि समूहमनातील वर्गीयतेचे दिग्दर्शन करणारे ते मानसशास्त्र आहे. माडखोलकरांच्या पात्र रेखाटनात तोही एक आयाम आहे. स्वतः माडखोलकर आध्यात्मिक पेशाच्या ब्राह्मण वर्गातील. शिवोपासक घराण्यातील. भारतात अशा वर्गातील बुद्धिवंत जेव्हा मार्क्सवादाकडे आकृष्ट होतात तेव्हा आपल्या मूळ संस्कारांशी विसंगत होणार नाही अशा पद्धतीने मार्क्सवादाची मांडणी करतात. मंडन करतात. माडखोलकरांच्या कादंबऱ्यात अशी मांडणी, असे मंडण आहे. परिपक्व मार्क्सवादी लेखक मार्क्सवादाचे समर्थन करताना केवळ किसान कामगारांच्या लढ्यापुरता थांबत नाही, वरिष्ठ वर्गाच्या, उच्चभ्रू मध्यमवर्गाच्या संपत्तीनिष्ठ नैतिक अधःपतनाचेही तो चित्रण करतो. तसे चित्रण माडखोलकरांनी त्यांच्या रुक्मिणी, सत्यभामा, उर्मिला या कादंबऱ्यात केले.

**मुक्तात्मा** –

१९३३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मुक्तात्मा' पासून १९७५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'अकेला' कादंबरीपर्यंत सुमारे बावीस कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'मुक्तात्मा' कादंबरीत भारतातील कम्युनिस्टांच्या सुरवातीच्या चळवळीचे भाऊरावांनी प्रामाणिक चित्रण केले असे प्रमाणपत्र कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक भाई डांगे यांनी दिले. भाऊरावांचे वैचारिक व्यक्तिमत्व आकार घेत असलेल्या किशोर-तरुण वयात डांगे हे त्यांचे जिवश्चकंठश्च मित्र होते. ही मैत्री उभयबाजूंनी माडखोलकरांच्या मृत्युपर्यंत टिकली, "टिळकांच्या मृत्युनंतर अखिल भारताच्या राजकारणावर आपल्या नेतृत्वाचा आणि मुत्सद्देगिरीचा इतका प्रभाव पाडणारा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा दुसरा झुंजार आणि त्यागी पुढारी महाराष्ट्रात झाला नाही" (तरुण भारत ११ आक्टो १९५९) असे डांग्याविषयी गौरवोद्गार ते काढतात. 'मुक्तात्मा' मधील चंद्रशेखर चे पात्र निर्मिण्यास डांग्याचे व्यक्तिमत्व कारणीभूत झाल्याचे ते अनेकदा सांगतात. चंद्रशेखरला मार्क्सवाद भारतासाठी अटळ वाटतो. पण तो येथल्या विशिष्ट प्रकृतीला पचेल, रुचेल असा हवा हा त्यांचा आग्रह आणि प्रत्यक्षात भाई डांग्यांनी भारतातील कम्युनिस्ट चळवळीवर केलेले राष्ट्रवादाचे संस्कार यात कुठेही विसंवाद नाही. 'मुक्तात्मा'त व्यक्ती परिस्थिती द्वंद्वाची तात्विक चर्चा आहे. मार्क्सवादी असल्यामुळे त्यात परिस्थितीच्या तागडीत योग्य ते वजन टाकले आहे. परंतु ऐतिहासिक भौतिकवाद हा ऐतिहासिक नियतीवाद नव्हे हे त्यांचे रास्त आकलन असल्यामुळे उपरोक्त तात्विक चर्चेचा समारोप करताना ते लिहितात, "कालांतराने सर्व जग समाजसत्तावादी होईल, हे मलाही कबूल आहे. पण जी सुधारणा घडून आल्याने मानवजातीच्या दुःखाचा भार हलका होईल, अशी ग्वाही आपली मनोदेवता आपल्याला पदोपदी देत असते, ती घडवून आणण्याचं काम काळावर सोपवून स्वस्थ बसण्यात पौरुष नाही आणि प्रामाणिकपणाही नाही. हा एक प्रकारचा सुसंस्कृत दैववाद आहे."

याच कादंबरीतील वीरेन्द्र या अप्रत्यक्ष पात्राद्वारे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीचे निसटते पण महत्वाचे संदर्भ आहेत.

अनुक्रमणिका

**भंगलेले देऊळ –**

१९३४ मध्ये त्यांची 'भंगलेले देऊळ' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. एक पुरुष आणि दोन स्त्रीया यांच्या वर्तनस्खलनावर आधारलेल्या या कादंबरीत राजकारण नाही. पण समाज जीवनावरच्या भाष्यात कुठेही मार्क्सवादाशी प्रतारणा नाही. रशियात मार्क्सवादी क्रांतीनंतर लैंगिक नवमतवाद हा 'ग्लास वाटर थिअरी' या नावाने बोकाळला. पण त्याने कुटुंब संस्थेला हादरा बसतो हे लेनिनच्या लक्षात आल्यावर त्याने या स्वैराचाराचा धिक्कार केला. मार्क्सवादाच्या समंजस भाष्यात स्वैराचाराला स्थान नाही. म्हणून 'भंगलेले देऊळ' ही अनाचाराची शोकपर्यवसायी कथा शेवटी, "विवाह संस्था हे भंगलेले देऊळ असेल, भ्रष्ट झालेले असेल, तर तुमच्या कल्पनेप्रमाणे त्याचा जीर्णोद्धार करा पण ते अजिबात पाडून टाकून मानव जातीच्या हाती स्वैराचाराची सनद देऊ नका." असा संदेश देते.

१९३६ च्या जुलै मध्ये त्यांची 'शाप' कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीचा नायक विचारांनी मार्क्सवादी आहे. 'साम्यवादाच्या अवलंबनाने हिंदुस्थानातील सारे प्रश्न सुटतील' असे तो मानतो. मात्र लगेच म्हणतो, "मला साम्यवाद हवा तो हिंदुस्थानच्या परिस्थितीला लागू पडणारा हवा. रशियन जमिनीत रुजलेलं विदेशी रोपटं नको."


**कम्युनिस्टांची दखल**

१९३९ मध्ये त्यांची 'कांता' ही राजकीय कादंबरी प्रसिद्ध झाली. ब्रिटीश साम्राज्यशाहीविरुद्ध संघर्ष करताना नागविदर्भातील काही मंडळींनी तो स्वतःच्या पद्धतीने, कुवतीने केला. मगनलाल बागडी, शैलेन्द्र घोष आदींनी हिंगणघाट स्थानकावर दरोडा घातला. कम्युनिस्ट कार्यकर्ते भूपेन्द्रनाथ मुखर्जी त्यात अग्रणी होते. या संघर्षाचे चित्रण या कादंबरीत आहे. काँग्रेसपक्ष हा मुख्यतः गांधीजींच्या अहिंसक राजकारणावर विश्वास ठेवणारा असला तरी त्यातही साहसवादी प्रवृत्ती होत्या. या साहसवादी प्रवृत्तींना सक्रीय करण्याचे काम त्याकाळी बंदी घातलेल्या कम्युनिस्ट पक्षाचे लोक करीत. त्यांची दखल माडखोलकरांनी या कादंबरीत घेतली.

त्याचवर्षी प्रसिद्ध झालेल्या 'दुहेरी जीवन' या कादंबरीचा नायक मुकुंदराव हा मार्क्सवादाने प्रभावित. तो म्हणतो, "समाजवाद म्हणजे काही केवळ भाकरीचा सवाल नव्हे, पोटभर पगार, म्हातारपणी पेन्शन आणि बेकार विमा म्हणजे काही समाजवाद नव्हे. समाजाची सर्वांगाने आमुलाग्र पुनर्घटना करावयाला प्रवृत्त झालेले ते अत्यंत व्यापक आणि विग्राहक तत्वज्ञान आहे."

कम्युनिस्टांच्या कामगार चळवळीतील मध्यमवर्गीय नेतृत्वाचे कादंबरीत समर्थन आहे. परंतु हे मध्यमवर्गीय नेतृत्व 'डी' क्लास झाले म्हणजे मध्यमवर्गीय कोषातून मुक्त झाले तरच ते समर्थ नेतृत्व देऊ शकते हेही सत्य माडखोलकरांनी जोरकसपणे मांडायला हवे होते. समाजवाद, श्रमिक संघवाद, (ट्रेड युनियनिझम) राष्ट्रीय क्रांतिवाद इत्यादी विचारप्रवाहांच्या चर्चेने कादंबरीतील आशय सघन केलाय.

अनुक्रमणिका



**बसलेले डावीकडून, आचार्य दादा धर्माधिकारी, भाऊराव ए. श्री. पटवर्धन**
**उभे - सौ. उमा व श्री. चंद्रशेखर**

अनुक्रमणिका

**प्रतिष्ठेला बाधा : नागकन्या आणि डाकबंगला** –

१९४० मधील 'मुखवटे' या कादंबरीत मुख्यतः सत्तासंघर्षाचे चित्रण आहे. सत्तासंघर्षातील कौरवपक्ष हा गांधीजींचा अनुयायी वर्ग होता. मुख्यतः तो बिगरमराठी धनिक वर्ग होता. देशभक्तीचे मुखवटे चढवून सगळ्या प्रकारचे अनैतिक व्यवसाय करणाऱ्यांचा विदारक पर्दाफाश या कादंबरीत आहे. कांदबरीनायक प्रियदर्शन हा गांधीवाद्यांच्या कुटील कारस्थानाला बळी पडतो. तो मार्क्सवादी नाही. पण मार्क्सवादाचा सहानुभूतीदार आहे. अण्णासाहेब या पात्राच्या निमित्ताने पोषाखी कम्युनिस्टांचे नि विठोबाच्या रुपाने कष्टाळू कम्युनिस्टांचे प्रतीकचित्र लेखकाने उभे केले. १९४१ मधील 'नवे संसार' या कादंबरीत विद्याधर आणि मीरा या कनिष्ठवर्गीय सहजीवींचे हालअपेष्टांचे जीवन वर्णिले आहे. विद्याधर हा मास्तर आहे. तो लेखकही आहे. बुद्धी आणि कला भांडवलशाही समाजरचनेत विक्रीस निघाल्याचा त्याला पदोपदी अनुभव येतो. कादंबरीत हे पात्र कम्युनिस्ट आहे. तो कागदी कम्युनिस्ट नाही. गांधीवादाचं हिंदी राजकारणातलं कार्य संपलय असं मत व्यक्त करुन तो रशियन धर्तीच्या कम्युनिस्ट क्रांतीसाठी प्रतिज्ञाबद्ध आहे. विदर्भातील त्या काळातील अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते, प्रस्तुत कादंबरी लिहिताना आपल्या डोळ्यांसमोर होते असे माडखोलकर सांगतत. 'नवे संसार' नंतर १९४२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'नागकन्या' आणि 'डाकबंगला' या कादंबऱ्यानी लेखक म्हणून त्यातही मार्क्सवादाने संस्कारलेला लेखक म्हणून असलेल्या माडखोलकरांच्या प्रतिष्ठेला बाधा आली पण लगेच पुढच्याच वर्षी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'चंदनवाडी' या कादंबरीने त्यांच्या लौकिकात भर पडली.

चंदनवाडी : सर्वोत्तम निर्मिती -

'चंदनवाडी' ही बहुधा माडखोलकरांची सर्वोत्तम निर्मिती. कादंबरीतील प्रधान संघर्ष गिरणीमालक आणि गिरणीमजूर, जमीनदार आणि शेतमजूर हा आहे. चंदन आणि अवधूत यांच्या प्रेमकथेला वर्गसंघर्षाच्या अग्नीज्वाळेचा स्पर्श आहे. येसूच्या जमिनी लबाडीने गिळंकृत करणारे, येसूची विधवा सून रखमा हिच्यावर पापी नजर ठेवणारे, येसूची नात चंदन हिच्या प्रेमात स्वतःचा मुलगा अवधूत पडला असल्याचे लक्षात येताच आकांडतांडव करणारे दादासाहेब देशपांडे हे खलनायक असून भांडवलदार जमिनादारांचे प्रतिनिधी आहेत.

या कादंबरीचा काळ भारतातील स्वातंत्र्य आंदोलनाचा निर्णायक काळ होता. फाळणीची बीज मुसलमानांच्या समूह मानसिकतेत रुजू लागली होती. डॉ. बाबासाहेबांनी प्रेरिलेला तेजाळ केलेला वर्ण संघर्ष महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचला होता. त्यातून बाबासाहेबांनी अपेक्षित नव्हत्या अशा काही क्षीण संभावनांची भाषा संतप्त दलित तरुण बोलत होता. सवर्ण हिंदु, पूर्वास्पृश्य आणि मुसलमान यांच्या फुटीर त्रिराष्ट्रवादास उत्तर हवे होते. ते माडखोलकरांनी समाजवादी राष्ट्रीय क्रांतीवादाच्या रुपाने अवधूतच्या मुखाने दिले.

'चंदनवाडी' च्या प्रस्तावनेत भाऊरावांनी म्हटले आहे की, "समाजजीवनाचा टीकाकार म्हणून जो मनुष्य ललित वाङ्मय लिहितो, त्याचं लिहिणं हे वास्तवनिष्ठ असणं अत्यंत अवश्य आहे. कारण समाजातील काही विशेष प्रवृत्तीची आणि परिस्थितीची प्रातिनिधिक अशी प्रतीकं निर्माण करुन, तो आपल्या समकालीन जीवनातील वैगुण्य आणि वैशिष्ट्य ही दोन्हीही, आपल्या पद्धतीनुसार, वर्णन करीत असतो. म्हणून कोणत्याही

अनुक्रमणिका

प्रकारचं अतिरंजन किंवा कोणालाही अन्याय होणार नाही, अशी दक्षता घेणं, हे त्याचं कर्तव्य आहे. याच दृष्टीने मी माझ्या कादंबऱ्यांसाठी वापरायचं साहित्य इतकं पारखून आणि पडताळून पाहाण्याचा खटाटोप करीत असतो."

**राष्ट्रवाद आणि मार्क्सवाद यांचा समन्वय** –

या पार्श्वभूमीवर 'चंदनवाडी' तील राष्ट्रीय क्रांतीवादाच्या प्रमेयाचे विशेष महत्व आहे. देशातील सर्व धर्मांनी आणि पंथांनी भारत हे राष्ट्र मानणे. त्या राष्ट्रवादास मार्क्सवाद पूरक आणि साहयक ठरविणे. म्हणजेच भारतासाठी राष्ट्रवाद आणि मार्क्सवाद यांचा समन्वय साधणे. अशा विचारांची पेरणी 'चंदनवाडी' त आहे.

वर्गीय आंदोलनाच्या निमित्ताने अवधूत तुरुंगात जातो. आपण कम्युनिस्ट नाही असे लिहून देऊन तुरुंगातून सुटण्याचे नाकारतो. तो म्हणतो, "मी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद नसलो आणि त्या पक्षाच धोरण मला काही बाबतीत अनिष्ट वाटत असलं तरी त्यांचा कार्यक्रम मला बव्हंशी मान्य आहे." अर्थात, भारतीय कम्युनिस्टांचे परप्रत्ययनेय धोरण त्याला मान्य नाही. भारतातील जातीय आणि धार्मिक कलहांवर प्रभावी उपाय म्हणजे मार्क्सवाद असे त्याचे मत. सिस्टर ख्रिश्चियानाशी चर्चा करताना तो ख्रिस्त हा साम्यवादी असल्याचे पटवून देतो.

कादंबरीतील 'अभिमन्यू' हे पात्र अभिमन्यू कोसारे या वास्तव जीवनातील दलित कार्यकर्त्याचे प्रतिबिंब आहे. 'चंदनवाडी' कादंबरीतील दलित दलितेतर चर्चेची स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दखल घेतल्याचे भाऊराव सांगतात. चंदनवाडीतील अन्य पात्रांची विशेषतः स्त्रीपात्रांची वर्गीयता महत्वाची आहे. येसू ही गेलेल्या मालकी हक्काच्या पुनःप्राप्तीकरिता झगडणारी जमीनदारी जाणिवा कायम असलेली स्त्री. रखमा ही संप, संघटना, संघर्ष यापासून अलिप्त राहाणारी कामगार. कारण इतर कामगारांच्या मानाने तिची मिळकत अधिक. पुन्हा या दोन्ही स्त्रीया आर्थिकदृष्ट्या 'नाही रे' वर्गातील असल्या तरी सामाजिकदृष्टया खानदानी मराठा असल्यामुळे हिरा बन्सोले या दलित युवतीकडे पाहाण्याची त्यांची भूमिका निरोगी नाही हे लेखकाने स्वाभाविकपणे दिग्दर्शित करुन उच्चवर्णीयांचा अहंकार अधोरेखांकित केला.

**स्वामी अभयानंद** –

१९४३ मध्ये त्यांची 'प्रमद्वरा' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यावर ती आधारली आहे. या लढ्यांना कम्युनिस्ट पक्षाने विरोध केला. साहजिकच कादंबरीत या भूमिकेला विरोध आहे. पण पक्षाच्या चुकांसाठी तत्वज्ञानाला त्यांनी उत्तरदायी ठरवले नाही. उलट कादंबरीतील स्वामी अभयानंद हे मंगलमूर्ती पात्र म्हणते, "मार्क्सवादातही पुष्कळच घेण्यासारखे आहे.... आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक विषमता समूळ नष्ट व्हायला मार्क्सवादाचा अवलंब अंशतः तरी करावा लागेल." स्वामी अभयानंदाने स्वीकारलेला मार्क्सवाद आणि माडखोलकरांना मान्य असलेला मार्क्सवाद यात फारसा फरक नाही. स्वामीजी सांगतात, "मार्क्सवादाची मौलिक उपयुक्तता आम्हाला अंशतः पटते. म्हणूनच आम्ही, राष्ट्रीयत्वाच्या जुन्या कल्पनांना त्यातील सर्वांगीण समतेची जोड देऊन, आपल्या लोकजीवनातील सर्व प्रकारचे पारतंत्र्य आणि

अनुक्रमणिका

सर्वप्रकारची विषमता यावर सारख्याच त्वेषाने शस्त्र धरणाऱ्या राष्ट्रीय क्रांतीवादाचं हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीला सर्वथैव योग्य असं तत्वज्ञान निर्माण केले आहे. पण मार्क्सवादातल्या निरात्मक, भौतिक समतेपेक्षा आपला उपनिषदातला आध्यात्मिक समतावाद हा सगळ्याच दृष्टींनी अत्यंत उच्च आणि पूर्ण आहे."

या स्वामी अभयानंदचे भविष्यातील 'जन हे वोळतू येथे' या (१९६९) मुक्तिबोधी कादंबरीतील भागवत गुरुजींशी पुरसे साम्य आहे!

**राजकीय द्रष्टेपण –**

१९५० मध्ये त्यांची 'अनघा' कादंबरी प्रसिद्ध झाली. कादंबरी नायक अभयची मार्क्सवादाविषयक भूमिका, "हिंदुस्थानातील विशिष्ट परिस्थिती आणि तत्वज्ञान यांच्या अनुषंगाने मार्क्सवादाचे भारतीयीकरण करुन जीवनाचे नवे तत्वज्ञान आपण निर्माण केले पाहिजे" अशी. लेखाकाचा मार्क्सवाद, राष्ट्रवाद समन्वय अभयच्या मुखातून, "माझा हा अखंड हिंदुस्थान म्हणजे भिन्नधर्मी आणि भिन्नभाषी प्रदेशांना आणि समाजांना पूर्ण स्वायत्तता देणाऱ्या समाजवादी संघराज्याचा अखंड हिंदुस्थान!" असा प्रगटतो. शेख मुजीब रेहमानच्या नेतृत्वाखाली १९७१ साली निर्माण झालेला समाजवादी बंगाल माडखोलकरांच्या दूरदृष्टीने अंशतः तरी १९५० मध्ये पहिला असावा असे त्यांच्या या कादंबरीतील, "कदाचित बंगालच्या पूर्व आणि पश्चिम शक्लांचे एकीकरण होऊन तेथे हिंदुस्थानातील पहिले मार्क्सवादी लोकसत्ताक स्थापन होण्याचीही शक्यता आहे." या भाकीतावरुन उमगते.

सुदाम देशमुख (?) मुख्यतः भागानगर चळवळीची पार्श्वभूमी असलेली त्यांची 'स्वप्नांतरिता' ही कादंबरी १९५२ मध्ये प्रसिद्ध झाली. कादंबरी रचनादृष्ट्या सपक असल्यामुळे कादंबरीच्या बऱ्याच भागाला राष्ट्रवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जाहीरनाम्याचे स्वरुप प्राप्त होते. १९५६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'अरुंधती' या कादंबरीतही हिंदु अध्यात्म आणि मार्क्सवाद यांचे त्यांच्या मनाला ऐकाच वेळी असलेले आकर्षण दिसते. कादंबरी नायक एका शिवोपासकाचा मुलगा. पुढे परिस्थितीने त्याची स्वतःची केलेली दैंना आणि सभोवतालची श्रमिकांची दुर्दशा यांच्या जाणीवेने तो कम्युनिस्ट बनतो. हा अनंग देशमुख म्हणजे काही प्रमाणात विदर्भातील एकेकाळचे कम्युनिस्ट नेते श्री. सुदाम देशमुख असे माहितगारांचे म्हणणे.

**शरदबाबूंची गुणवत्ता-**

त्यानंतर अनुक्रमे (१९५९) रुक्मिणी, (१९६३) उर्मिला, (१९६८) सत्यभामा या त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे एक अखंड त्रिदलात्मक कादंबरी. आचार्य दादा धर्माधिकारी, आचार्य काका कालेलकर, प्रा. ना. सी. फडके यांनी गौरविलेली. दादा धर्माधिकारींनी तर 'रुक्मिणी' वाचून भाऊरावांना शरदबाबूंची गुणवत्ता बहाल केली. नागपुरातील एका सुविख्यात घराण्याचे क्लेशदायक स्मरण करुन देणारी ही कादंबरी. जुन्या प्रतिष्ठित मध्यमवर्गाचा ऱ्हास दाखवते असे स्वतः भाऊराव सांगतात. महाराज हे मालगुजार या त्रिदलात्मक अखंड कादंबरीचे नायक. त्यांच्या रुक्मिणी, सत्यभामा आणि उर्मिला या तीन बायका. संततीसाठी महाराजांनी लग्ने केली. तरीही स्वतः विविधतऱ्हांच्या भोगविलासात रममाण झाले. नागपूर प्रांतातील मालगुजारांचे अधःपतन या

कादंबरीत आहे. महाराजांना नायक म्हणण्यापेक्षा प्रतिनायक म्हणता येईल. मात्र या कादंबरीत रुढार्थाने शोषक-शोषित संघर्ष नाही. खरेतर तिन्ही नायिका शोषित आहे. महाराजांच्या कामचेष्टितांनी, भोगविलासांनी त्या हतबल आहेत. त्या अर्थाने त्या शोषित आहे. उर्मिला ही कनिष्ठ मध्यमवर्गातील आहे. पण तिन्ही नायिका भारतीय परंपरेने बांधल्या असल्यामुळे पुरुष सत्तेविरुद्ध बंड करीत नाहीत. त्या चळल्या ढळल्या नाहीत हे योग्य. त्या मूल्यनिष्ठ आहेत हेही योग्य. त्या कादंबरी निमित्ताने चंगळवादाला चटावलेला मध्यमवर्ग माडखोलकरांनी दाखवला हाही त्यांच्या द्रष्टेपणाचा पुरावा. मात्र साठीच्या दशकात लिहिल्या गेलेल्या या तिन्ही कादंबऱ्यातून (कादंबरीतील कथानकांचा काळ मागेपुढे असला तरी!) नवजागृत स्त्री आकांक्षाचे भाष्यरुप संदर्भ असणे आवश्यक होते. जन्म दुर्दैवी (१९७२) व रेणुका (१९७५) या त्यांच्या कादंबऱ्या पौराणिक कथा भागावर आहेत. जन्म दुर्दैवी हा शब्द प्रभू रामचंद्रासाठी वापरला आहे. पौराणिक कथाभागावर आधारलेल्या कादंबऱ्यात आधुनिक जीवनावर सविस्तर भाष्य करता येते. समाजवादी लेखकाकडून तर ती अपेक्षा आहेच. खांडेकरांनी 'ययाती' मध्ये असे जीवनभाष्य केले आहे. माडखोलकर मात्र त्याबाबतीत कमी पडले.

**अकेला** –

त्या तुलनेत त्यांची 'अकेला' ही (१९७५) शेवटली आत्मचरित्रपर कादंबरी अधिक भाष्याभिमुख आहे. दलित मानसिकतेतील भावनांच्या आणि विचारांच्या आंदोलनाची दखल कादंबरीत आहे. मार्क्सवाद आणि बुद्धवाद यांचा व्यवहार्य समन्वय या देशात अपरिहार्य असल्याची कादंबरीतील आग्रही शिकवण आहे. नव बौद्धांनी स्वतःचे वैशिष्ट्य ठेवून मार्क्सवादाशी जुळवून घ्यावे असेही प्रतिपादन कादंबरीत आहे. कादंबरीत दलित नंदा आणि ब्राह्मण आबासाहेब ही मुख्य पात्रे आहेत. इतरही विपुल पात्रे आहेत. पत्रकार आबासाहेबांच्या नंदा हा जणू मानसपुत्रच. नंदा आंबेडकरी चळवळीच्या प्रभावापासून अलिप्त नसला तरी तेवढयाने संतुष्ट नाही. शेवटी तो रिपब्लिकन पक्षाचे नव्हे तर लालनिशाण गटाचे कार्य करण्यासाठी निघून जातो. कम्युनिस्टांच्या नादी न लागण्याच्या स्वतःच्या काकाच्या उपदेशाकडे दुर्लक्ष करतो. तो बौद्ध कम्युनिस्ट आहे. बौद्ध धर्मातही अस्पृश्यता आहे आणि हिंदु धर्मातील सगळी राड त्या धर्मात आहे, असे नन्दाचे आकलन आहे. "मार्क्स आणि आंबेडकर" यांच्या तत्वज्ञानाचा मेळ घालून, तू स्वतःची विचार प्रणाली निर्माण कर आणि आपल्या समाजातल्या सगळ्या दलितांच्या, पीडीतांच्या आणि शोषितांच्या उन्नतीच्या कार्यात यशस्वी हो" आबासाहेबांचा संदेश तो शिरोधार्ह मानतो.

या कादंबरीत प्राचीन भारतीय संस्कृतीतील शास्त्रशुद्ध ठेवा स्वीकारला आहे. मार्क्सवादाबद्दल कृतज्ञता आहे. "मार्क्सच्या काळापेक्षा आजच्या काळातील वैज्ञानिक, सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक परिस्थिती सर्वथैव भिन्न आहे" असे काळाचे भान आहे. मार्क्सवादात संशोधनाची अपेक्षा आहे. विशेषतः नंदाच्या निमित्ताने तरुण मार्क्सवाद्यांना माडखोलकरांनी संदेश दिला, "तू आपल्या बुद्धीची कवाडं सताड उघडी ठेव आणि कोणत्या नव्या विचाराचा स्वीकार करायचा, हे तारतम्याने ठरव."

माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील मार्क्सवाद आविष्करणाचे स्वरुप हे असे आहे. माडखोलकर टीकाकार आणि पत्रकार होते म्हणून ते यशस्वी कादंबरीकार झाले. असे त्यानींच म्हटले आहे. अर्थ स्पष्ट आहे.

कादंबरीकार हा निरीक्षक असावा लागतो. भाष्यकार असावा लागतो. स्वानुभूतीने त्या निरीक्षणांना, भाष्यांना मोल येते. सहानुभूतीने या निरीक्षणांना, भाष्यांना व्यापकता आणि टिकावूपण येते.

ललित लेखक म्हणून माडखोलकरांपाशी असलेल्या स्वानुभूतीने आणि सहानुभूतीने त्यांच्या कादंबऱ्यांचा या शतकातील गुणवत्ताक्रम आपोआपच ठरणार आहे.

❋ ❋ ❋

अनुक्रमणिका

## | माडखोलकरांच्या कादंबऱ्या |

-------------------------------------------------------------------प्रा. म. ना. लोही

कै. गजानन त्र्यंबक उपाख्य भाऊराव/भाऊसाहेब माडखोलकर यांची जन्मभूमी मुंबई असली तरी कर्मभूमी नागपूर हीच होती. पन्नास वर्षे त्यांचं वास्तव्य नागपुरात होतं. विदर्भातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक लोकजीवनाशी ते एकरुप झाले होते. विदर्भातील लोकनेत्यांनी त्यांना आपलं मानलं होतं. पत्रकार म्हणून वयाच्या 'गध्देपंचविशीत' ग. त्र्यं. माडखोलकर नावाचा मुंबईकर तरुण नागपूरवरून निघणाऱ्या 'महाराष्ट्र' साप्ताहिक वृत्तपत्रात संपादक मंडळात रुजू झाला. अल्पावधीत येथील प्रतिष्ठितात वावरु लागला. चळवळीत भाग घेऊलागला. जंगल सत्याग्रहात चार महिने कारावासाचा अनुभव घेऊन आला. कुटुंबात भाऊ राव आणि बाहेर भाऊसाहेब बनला. इकडच्याच एका अल्पशिक्षित, रंगाने सावळया मुलीशी त्याने स्वखुशीने विवाह केला. नागपूर विदर्भातील लोक आणि लोकजीवन माडखोलकरांना आवडले आणि लोकांनाही ते प्रिय झाले. गांधी-वधानंतर लोकक्षोभाला बळी पडलेला 'तरुण भारत' आणि स्वतः माडखोलकर लवकरच सावरले तरी १९४६ सालापासून 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीचे निमित्ताने त्यांचा जो शंकरराव देवांशी घनिष्ठ संबंध आला आणि देवांनी त्यांना पुण्यास येण्याचे जे आवाहन केले त्याला त्यांच्या मनाने साद दिली. पण येथील बहुजन समाजातील मान्यवर अमरावतीकर पुढाऱ्यांनी नागपूर न सोडण्याचा हट्ट धरला. एका प्रसंगी प्रस्तुत लेखक उपस्थित होता. मग त्यांनी महालातील 'शांता-निवास' सोडून धंतोलीत वास्तव्य केले ते शेवटच्या श्वासापर्यंत. त्यांनी नागपुरातच १९७६ साली देह ठेवला!

वृत्तपत्र -व्यवसायात शिरण्यापूर्वीचे माडखोलकर टीकाकार म्हणून गाजले. संपादकीय कारकीर्द सुरु असतानाच ते कथा लिहू लागले. त्याआधी त्यांनी कवितालेखनही केले होते. मात्र माडखोलकर कादंबरी लेखनाकडे वळले ते सौ. शांताबाईंच्या आग्रहावरुन. हे त्यांनीच लिहून ठेवले आहे. तरीही, 'अर्थप्राप्तीचे हुकमी साधन' म्हणून आणि 'पत्रकार या नात्याने सार्वजनिक चळवळीत वावरताना जे मानवी जीवनाचे वैचित्र्य पाहिले' ते कादंबरी लेखनाकडे वळण्यास कारणीभूत झाल्याचेही ते सांगतात. १९३३ ते १९७५ पर्यंत त्यांनी वीस कादंबऱ्या लिहिल्या. माडखोलकरांचे गुरुबंधू वि. स. खांडेकर आणि कादंबरीचे शतक गाठणारे ना. सी. फडके यांच्या मागून कादंबरी लेखनाची सुरुवात करणाऱ्या माडखोलकरांनी पहिल्या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध होताच त्या दोघांच्या पंक्तीचा मान मिळवला. परंतु त्या दोघांपेक्षाही वेगळा सन्मान भाऊरावांच्या पदरात पडला तो 'पहिला राजकीय कादंबरीकार' हा होय.

'मुक्तात्मा' (१९३३) या पहिल्याच कादंबरीने माडखोलकरांना हा मान मिळवून दिला. ती मराठीतील पहिली राजकीय कादंबरी असल्याचे माडखोलकरी कादंबरीचे घणाघाती टीकाकार डॉ. रा. शं. वाळिंबे हेही मान्य करतात. कारण त्यांच्या मते या 'कादंबरीचा मध्यवर्ती विषय संपूर्णपणे राजकीय आहे व मुख्य विषयाशी संबद्ध असलेल्या घटनाही बव्हंशी राजकीय आहेत'. तरीही या कादंबरीत 'राजकीय चर्चा आहे, प्रत्यक्ष राजकारण नाही.' असा आक्षेप घेतला गेला. मात्र ज्या कॉम्रेड डांगे यांच्या व्यक्तिमत्व आणि कार्यावरुन 'मुक्तात्मा' चा नायक चंद्रशेखर या पात्राची निर्मिती झाल्याचे स्वतः लेखक अंशतः मान्य करतो त्या श्री. अ. डांग्यांनी "आमच्या आरंभीच्या चळवळीचं तुम्ही या कादंबरीत हुबेहूब वर्णन केलं आहे" असे प्रशस्तीपत्र दिले आहे. ह्या कादंबरीत आलेल्या राजकीय चर्चांचा उलगडा करता येणार नाही का? समकालीन ख्यातकीर्त

कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातून अशा चर्चा आढळतात हे जसे एक कारण असू शकेल, तसेच समकालीन राजकारणाबद्दलची आपली मते व्यक्त करण्याच्या लेखकाच्या तीव्र इच्छेचा तो परिपाक असू शकतो किंवा समाजवादी अतिरेकी/क्रांतिकारी पक्षाच्या विचारधारेला उठाव देण्यासाठी लेखकाने विभिन्न मतांचा उहापोह केलेला असू शकतो. माडखोलकरांनी ज्या काळात ही कादंबरी लिहीली त्या काळात महाराष्ट्रातील बुद्धिवंतांवर साम्यवादाचा विशेष प्रभाव होता, तसाच तो माडखोलकरांवरही होता.

समकालीन समाजमन आणि समाज जीवन गांधीजींच्या प्रभावाखाली असले तरी माडखोलकरांवर गांधीवादाची मोहिनी पडली नाही. उलट, त्यांच्या 'कांता', 'मुखवटे' ह्या कादंबऱ्यातून त्यांच्यावर गांधीद्वेषाचा आरोप करण्याइतकी गांधी व गांधीवाद यांच्यावर त्यांनी हल्ला चढविला. त्याला एक कारण 'खरे प्रकरण' होते. माडखोलकरांच्या गांधीजीवरील टीकेत व्यक्तिगत आकस कमी आणि वैचारिकता अधिक आहे याची दखल माडखोलकरांच्या टीकाकारांनी घेतलेली दिसत नाही. स्वतः माडखोलकर गांधीजींनी प्रेरित केलेल्या जंगल सत्याग्रहात भाग घेऊन चार महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा भोगून आले होते. सौ. शांताबाई माडखोलकर सेवाग्रामला जाऊन-येऊन असत. भाऊराव त्यांच्या आड कधीच आले नाहीत. मात्र, अडतीस-एकोणचाळीस साली मध्यप्रांतात काँग्रेस राजवटीत गांधीजींच्या साक्षीने ज्या राजकीय घडामोडी झाल्या त्यामुळे बुद्धिवादी जनमानस ढवळून निघाले. लोक प्रक्षुब्ध झाले. त्या गांधीविरोधी विचारांना वाट करून देणे, एवढाच गुन्हा माडखोलकरांनी केला. माडखोलकरांच्या राजकीय कांदबऱ्यांतून वास्तव घटना आणि तत्कालीन व्यक्ती आढळत असल्या तरी त्यांनी जशाच्या तशा शब्दबद्ध केल्या नाहीत. सत्याला/वास्तवाला कल्पनेची जोड देऊन, व्यक्तिदर्शनातील चातुर्याने पुनःप्रत्यय नव्हे, तर त्यांच्याच शब्दांत, 'नवप्रत्यय' घडवला. ललित वाङ्मय हे कधीच पूर्णपणे वस्तुनिष्ठ नसते. लेखकाच्या व्यक्तिमत्वाची छाप त्यावर असतेच. ललित साहित्यातील पात्रांच्या मुखाने बहुधा लेखकच बोलत असतो. उदाहरणच द्यायचे झाले तर राम गणेश गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकातील सुधाकर, सिंधू, रामलाल, तळीराम आणि गीता ह्या सर्वच पात्रांच्या संवादातून गडकरी स्वतःच बोलत असल्याचा भास होत नाही का? लेखक सर्वसाक्षी असल्याने आणि सर्व बाजू मांडत असेल तर त्याच्यावर पक्षनिष्ठेचा अगर विरोधाचा आरोप करणे योग्य ठरणार नाही. असाच काहीसा प्रकार माडखोलकरांच्या बाबतीत झालेला दिसून येतो. ही मखलाशी नसून उलगडा आहे.

माडखोलकरांनी राजकीय कादंबऱ्या लिहिल्या खऱ्या पण त्यांच्या कादंबऱ्या राजकीय ठरतात का? हा मुद्दा वादग्रस्त राहिला आहे. ना. सी. फडके, वा. म. जोशी आणि भा. वि. वरेरकर यांच्याही कादंबऱ्यातून राजकारणाच्या चर्चा आहेत, राष्ट्रीय घडामोडींची पार्श्वभूमी आहे. मग माडखोलकरांच्याच कादंबऱ्या राजकीय कशा? अशी एक शंका उद्‌भवते. वाळिंबे तर 'मुखवटे' हा कादंबरीरुप इतिहास असल्याचे मत व्यक्त करतात. ते खरेही आहे. त्यांचा आक्षेप असा आहे की, माडखोलकरांनी कादंबरी न लिहिता इतिहास लिहायला हवा होता. तो न लिहिण्यामागील हेतू गांधीजींची अप्रतिष्ठा करण्याचा होता. पण डॉ. वाळिंबे हे विसले की त्यासाठी माडखोलकरांना कादंबरी लिहिण्याची गरज नव्हती. एका प्रतिष्ठित व लोकप्रिय वृत्तपत्राचे ते संपादक होते. माडखोलकरांच्या कादंबऱ्या राजकीय आहेत. कारण 'माडखोलकरांची पात्रे राजकीय घटनांशी समरस होऊन राजकारण जगतात. मनीमानसी राजकारण त्यांच्या ठिकाणी असलेले दिसून येते' (माडखोलकरी कादंबरी - डॉ. मन्दाकिनी सगदेव) त्यांच्या सर्व राजकीय (?) कादंबऱ्या 'राजकीय कादंबरी' या संज्ञेस पात्र नाहीत. परंतु 'मुखवटे', 'प्रमद्वरा' आणि 'अरुंधती' या कादंबऱ्यात प्रत्यक्ष राजकारण, राजकीय उलाढाली, सत्तास्पर्धा

यांना प्रत्यक्ष स्थान आहे'. (राजकीय कादंबरी - जयंतकुमार बंड -युगवाणी मार्च-एप्रिल ८४) डॉ. वि. स. जोग यांच्या मते माडखोलकरांच्या (काही अपवाद वगळता) कादंबऱ्यांवर साम्यवादाचा सखोल प्रभाव आहे. अशा कादंबऱ्यांना राजकीय का म्हणू नये, असाही प्रश्न विचारण्यासारखा आहे 'भंगलेले देऊळ', 'चंदनवाडी', 'डाक बंगला' आणि 'नागकन्या' ह्या चार कादंबऱ्या राजकारणविरहित सामाजिक आहेत. पण पूर्णपणे काल्पनिक म्हणता येणार नाहीत.

'भंगलेले देऊळ' ही कादंबरी डॉ. माधराव पटवर्धन, शांताबाई कशाळकर आणि श्री. कशाळकर यांच्या जीवनकथेवर आधारित तर 'चंदनवाडी' तील चंदन आणि तिचा परिवार माडखोलकर आणि सौ. शांताबाई यांच्या परिचयाचा. चंदनच्या मृत्यूच्या प्रसंगी स्वतः माडखोलकर व शांताबाई उपस्थित होते. 'डाक बंगला' चा संबंध 'खापा मर्डर केस' शी तर 'नागकन्या' तून ज्या परिसराचे चित्रण आहे तेथे लेखक गेला होता व नायिकेची त्याची भेट झाल्याचे लेखकाने लिहून ठेवले आहे. 'डाकबंगला' आणि 'नागकन्या' या कादंबऱ्यातील शृंगारिक वर्णनांवर अश्लीलतेचा आरोप केला गेला. नुकतेच एका विदुषीने माडखोलकरांवरील आपल्या प्रबंधातून त्या आरोपाचे वैयर्थ उघड केले आहे. माडखोलकरी कादंबरीचे खरे वैशिष्ट्य फारसे कोणी लक्षात घेतल्याचे दिसत नाही. नागपूर विदर्भातील राजकीय घडामोडी आणि समाजजीवन यावरच भर दिल्यामुळे ती निखालस प्रादेशिक कादंबरी आहे. या प्रांतात (तेव्हाच्या मध्यप्रांत वऱ्हाडात) घडलेल्या राजकीय घटना आणि त्यात सहभागी व्यक्ती यांचे कलात्मक, सुपरिचित आणि पुनःप्रत्ययी चित्रण हा माडखोलकरांच्या राजकीय कादंबरीचा विशेष होय. 'मुखवटे' तील 'खरे प्रकरण' सरकारला आक्षेपार्ह वाटले नाही. मात्र 'नवे संसार' आणि 'प्रमद्वरा' ह्या कादंबऱ्या सरकारी रोषाला बळी पडल्या. जप्त करण्यात आल्या. दहशतवादाला प्रोत्साहित करणाऱ्या या कादंबऱ्या असल्याचा सरकारला साक्षात्कार झाला असावा!. तरी त्या कादंबऱ्यांना राजकीय म्हणायचे नाही का?

'मुक्तात्मा' प्रसिद्ध होण्याच्या सुमारास भाऊसाहेबांनी 'महाराष्ट्र' पत्रात, (ज्याचे ते संपादक होते) 'वाङ्मयातील प्रतिबिंब' या शीर्षकाचा एक लेख लिहिला होता. कदाचित, त्यांच्यावर नंतर होऊ घातलेल्या आरोपाचे त्यांनी उत्तर देऊन टाकले असावे. 'मुक्तात्मा' त केशवच्या रुपात त्यांनी स्वतःच्या बालपणाला शब्दबद्ध केले आहे. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणाचे शीर्षक आहे 'मातृदेवता'. या प्रकरणात नायक चंद्रशेखर आणि उपनायक केशव यांच्या मातृभक्तीचे व मातेच्या चिरवियोगाचे दर्शन घडवले आहे. पुढील कादंबऱ्यांतून माडखोलकरांनी प्रत्यक्षातील सर्वपरिचित अशा कितीतरी व्यक्तींना केवळ स्थानच दिले नाही तर काही पात्रे कोणत्या व्यक्तींवरुन उचलली हे स्वतःच सांगून टाकले आहे. यात काही वावगे नसल्याचे प्रतिपादन त्यांनी 'वाङ्मयातील प्रतिबिंबे' या लेखात केले. त्याच सुमारास त्यांनी आणखी एक लेख 'कला हीच कसोटी' लिहून असे प्रतिपादन केले की, 'कादंबऱ्यातून प्रतिबिंबे कोणाची आहेत, यावर त्यांच्या युक्तायुक्ततेचा निर्णय अवलंबून न ठेवता, ती प्रतिबिंबे कलापूर्ण आणि सद्हेतुप्रेरित आहेत की नाही, हीच गोष्ट त्या बाबतीत मुख्यतः लक्षात घ्यायला हवी.' या दृष्टीनेही माडखोलकरांच्या कादंबऱ्यांचे पुनरावलोकन आणि समीक्षा व्हायला हरकत नाही.

'चंदनवाडी' ही एकमेव कादंबरी अशी आहे की, जी समीक्षकांच्या/टीकाकारांच्या प्रशंसेला पात्र ठरली. 'भंगलेले देऊळ' ने माडखोलकरांना सामाजिक कादंबरीकार म्हणून, स्त्री-जीवनाचे प्रभावी दर्शन घडवणारे कादंबरीकार म्हणून भरपूर प्रसिद्धी दिली. त्यांना फडके- खांडेकरांची प्रतिष्ठा दिली. डॉ. रा. शं. वाळिंबे

यांनीही या दोन कादंबऱ्यांवर चांगला अभिप्राय दिला. 'चंदनवाडी' तील प्रत्येक व्यक्तिचित्र आकर्षक व प्रभावी आहे. ब्राह्मण, मराठा आणि दलित, एवढेच नव्हे तर ख्रिश्चन मिशन या सर्वांना या कादंबरीत स्थान मिळाले आहे. दलितांना सवर्णांकडून मिळणारी वागणूक आणि ख्रिस्ती धर्मगुरुंकडून मिळणारी वागणूक यातील विरोध त्यांनी कौशल्याने व सूचकपणे दर्शवला आहे.

कादंबरीकार माडखोलकर हे टीकाकार आणि पत्रकार होते. त्यांच्या कादंबरी- लेखनामागील एक प्रेरणा पत्नीचा आग्रह, दुसरी अर्थप्राप्ती, तिसरी पत्रकार या नात्याने घडलेले विविध प्रकारचे जीवनदर्शन आणि मानवी जीवनाचा टीकाकार होण्याची ओढ. माडखोलकरांनी 'मुक्तात्मा' लिहिली त्यावेळी त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात एक दशकाचा काळ व्यतीत केला होता. तोपर्यंत ते मध्यप्रांत-वऱ्हाडातील जीवन आणि संस्कृती, राजकारण आणि राजकीय चळवळी, राजकीय पुढारी आणि सरकारी अधिकारी, समाजसेवक आणि वरिष्ठ कार्यकर्ते या सर्वांशी केवळ परिचित नव्हे तर घनिष्ठ बनले होते. शिवाय पत्रकार या नात्याने समकालीन दहशतवादी घटनांची त्यांनी माहिती मिळवली होती. साहजिकच या सर्व घटकांचा अंशतः वापर करून माडखोलकरांनी वेगळ्या प्रकारच्या पूर्णपणे 'प्रादेशिक राजकीय' कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली. 'कांता' आणि 'मुखवटे' या कादंबऱ्यातून तत्कालीन मध्यप्रांतातील राजकीय घडामोडींचे पत्रकारांच्या चष्म्यातून वर्णन आलेले आहे. 'कांता' वर डॉ. वाळिंब्यांनी टीका करताना, "वृत्तपत्रात आलेले सभांचे आणि चर्चांचे साग्रसंगीत वृत्तान्त किंवा असेंब्लीतील वादविवादाचे रिपोर्ट म्हणजे काही कादंबरी वाङ्मय नव्हे!" असा जो टोमणा मारला त्याला उत्तरादाखल माडखोलकर बोलले, "माझ्या कादंबऱ्यांना कोणी 'रिपोर्टाज' म्हटले, कोणी 'विकृत चित्रण' म्हणून निंदिले किंवा कोणी वर्तमानपत्री गळाठा म्हणून टाकाऊ ठरविले तरी त्याबद्दल मला दुःख नाही" प्रश्न असा आहे की, भाऊसाहेब माडखोलकरांच्या कादंबऱ्या खरेच टाकाउ आहेत का? टिकाऊ आहेत की नाही हे काळच ठरवेल. एवढे मात्र खरे की, पन्नास वर्षांचा काळ उलटून गेला, नवसाहित्याचा बोलबाला सुरु असला तरी अजून माडखोलकरी कादंबरी टिकून आहे.

निसर्ग, प्रणय आणि राजकारण हे माडखोलकरांच्या खास आवडीचे विषय. माडखोलकरी कादंबरीने पश्चिम महाराष्ट्रातील कादंबरीकारांना आणि वाचकांना हे दाखवून दिले की सृष्टीसौंदर्यात सह्याद्रीच नव्हे तर सातपुडाही उजवा आहे. मध्यप्रांतातील पचमढी, ग्वारीघाट आणि रामटेक येथील निसर्ग माथेरान-महाबळेश्वरपेक्षा कमी सुंदर नाही. माडखोलकर आपल्या वाचकांना हरिद्वारपासून हैद्राबादपर्यंत फिरवून आणतात. प्रत्यक्ष नागपूरकरांना नागपूर भोवतालच्या निसर्ग रम्यतेची ओळख करून देतात. यातून त्यांची सौंदर्यदृष्टी आणि कलात्मक चित्रदर्शी वर्णनशैली प्रत्ययास येते.

प्रीती आणि प्रणय हे मानवी जीवनाला सार्थ आणि कृतार्थ बनवणारे, स्त्री-पुरुषाला सुखाच्या नंदनवनात पोचवणारे किंवा दुःखाच्या गर्तेत लोटून देणारे रसायन. ज्याची परिणती विवाहात होते त्या युवक-युवती-प्रेमाला सामान्यतः सफल समजले जाते. परंतु बरेचदा प्रेमविवाहसुद्धा दुःखान्त होताना आपण पाहतो. विवाहोत्तर प्रेम हे अधिक उत्कट स्वरुपात सुख-समाधान देऊन जाते. पण त्यासाठी पती-पत्नीचे सूर जुळावे लागतात. ते जुळले नाहीत तर जीवन बेसूर बनते. माडखोलकरांच्या कादंबऱ्या मग त्या राजकीय असोत की सामाजिक, प्रीती कथेतून साकार होतात. याचं कारण 'भंगलेले देऊळ' ची नायिका 'अनू' हिच्याकडून वदवलं आहे. तिला भवभूतीपेक्षा कालिदास अधिक आवडतो. ती म्हणते, "कालिदासानं प्रीतीपुढं दुसऱ्या कोणत्याच

गोष्टीच स्तोम माजू दिलं नाही." निश्चितच ही आवड अनूच्या जनकाची (माडखोलकर) आहे. प्रेम हा माडखोलकरी कादंबरीचा प्रेरणास्रोत आहे, मग ते देशप्रेम असो, राजकीय विचारसरणींचे असो, युवक-युवतीचे असो. प्रेमासाठी त्याग हे सूत्र माडखोलकरांनी कवटाळले आहे. मात्र त्यात पुरुषवर्गाला सूट आहे. स्त्रियांनी त्याग स्वीकारला आहे. त्यामुळे माडखोलकरांनी महिला वर्गावर अन्याय केला, अशी हाकाटी करण्यात आली. पतीचा व्यभिचार पत्नीने मुकाट्याने सहन करीत त्याच्याविषयी क्षमाशील वृत्ती धारण केलेल्या स्त्रिया माडखोलकरांनी बहुसंख्येने चित्रित केल्या आहेत. कारण विवाहसंस्था उध्वस्त होऊ नये असे त्यांचे प्रामाणिक मत आहे.

साम्यवादाच्या प्रभावाखाली असताना माडखोलकरांनी लिहिलेल्या 'भंगलेले देऊळ' मध्ये त्यांनी अनूच्याद्वारे महिलावर्गाला आणि समाजालाही असा सल्ला (की संदेश?) दिला आहे की. "ते देऊळ भंगलेलं असेल, भ्रष्ट झाले असेल तर त्याचा तुमच्या कल्पनेप्रमाणे जीर्णोद्धार करा. पण ते अजिबात पाडून टाकून मानवजीच्या (पुरुषवर्गाच्या) हाती स्वैराचाराची सनद मात्र देऊ नका." हा विचार नेमका साम्यवादी तत्वाविरुद्ध नाही का? यातून एक गोष्ट स्पष्टपणे सूचित होते. माडखोलकरांना रशियातील साम्यवाद जसाच्या तसा भारतात नको आहे. डॉ. वि. स. जोगांनी आपल्या 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' या प्रबंधात याची सविस्तर चर्चा केली आहे. डॉ. जोग माडखोलकरांना 'हिंदुत्ववादी कम्युनिस्ट' म्हणतात. पण मला वाटते, त्यांना 'राष्ट्रवादी कम्युनिस्ट' म्हणणे योग्य होईल. तसेच स्त्री पुरुष संबंध, कुटुंब व्यवस्था, विवाह आणि दाम्पत्यजीवन, स्त्री मुक्ती यावरील माडखोलकरी विचारधारेचा मूलस्रोत जाणून घेण्यासाठी 'स्वैरविचार' या पुस्तकातील 'साम्यवाद आणि नवी लैंगिक नीती' हा लेख उपयुक्त ठरेल.

माडखोलकरांना प्रणय प्रिय आहे. प्रणयाचे पर्यवसान शृंगारात होते. युवक-युवती प्रेमभराने परस्परांना आलिंगन देतात. परस्परांची चुंबने घेतात. अनेकदा संयमाचा बांध फुटतो. व्यभिचारी भाव उत्तेजित होतो. ह्या घटिताचे वर्णन शृंगारात जमा होणारे असले तरी अश्लील असेलच असे नव्हे. मात्र 'शाप' कादंबरीत जे वर्णन आहे ते कलात्मक असेलही, पण वासनोत्तेजक नाही, असे म्हणवत नाही. येथे असा एक प्रश्न विचारला जाऊ शकतो की, अश्लीलता ही वस्तुगत (objective) की व्यक्तिगत (subjective)? या प्रश्नाचे एक उत्तर उभयपक्षी असेच द्यावे लागेल. कदाचित काही महाभागांना ते पटणारही नाही. "स्त्री देहाची उत्तान आणि उद्दीपक वर्णने हा माडखोलकरांच्या कादंबरीचा (सर्वच नव्हे!) विशेष. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या (आणि त्याच) अधिक वाचकप्रिय ठरल्या असेही म्हटले जाते. परंतु माडखोलकरांच्या वाचकांना आवडलेल्या आणि टीकाकारांनी प्रशंसलेल्या 'भंगलेले देऊळ', 'कांता', 'नवे संसार', 'चंदनवाडी', 'रुक्मिणी' यांत कुठे आहे भडक शृंगार आणि वासनोत्तेजक वर्णने यांचा अभावच नाही का?" (नरहर कुरुंदकर-युगवाणी-माडखोलकर विशेषांक-१९९८) म्हणजेच माडखोलकरांच्या कादंबरीत उत्तान व उत्तेजक भाषांच्या उद्दीपनाखेरीज आणखी काही लक्षणीय आणि प्रभावी गुण असले पाहिजेत. अर्थात् त्यांची विपुल चर्चा अभ्यासकांनी आणि अध्यापकांनी केलेली आहे. म्हणून रुढ पद्धतीने समीक्षेची अपेक्षा नाही.

शृंगाराइतकीच, किंबहुना त्याहून अधिक अशी मृत्युविषयक आर्तता माडखोलकरांच्या मानसात रुजलेली दिसते. कदाचित त्यांच्या व्यक्तिगत जीवनात बालपणीच त्यांना मृत्यूची ओळख आणि भीषणता पटल्यामुळे त्यांच्या साहित्यसृष्टीवर त्याची गडद छाया पडली असावी. ज्या वयात जीवनातील सुखोपभोगात

डुंबून जायचे त्या वयात त्यांनी 'विलापिका' लिहिली. त्या पुस्तकातील पहिलेच वाक्य असे आहे "जीवित आणि जग यांच्याविषयी मनुष्याला पुनः पुन्हा विचार करावयास भाग पाडणारा जर मानवी आयुष्यातील कोणता एक प्रसंग असेल, तर तो मरणाचा होय." पत्रकारितेच्या क्षेत्रात माडखोलकरांचे मृत्युलेख गाजले. गांधीद्वेष्टे म्हणून निंदानालस्ती झालेल्या माडखोलकरांचा 'गांधीजींचा जीवनयज्ञ' हा लेख लक्षणीय आहे. माडखोलकरांच्या कादंबरीतून मानवी जीवनाला मृत्यू किती प्रकारे ग्रासतो, किती विविध रुपे धारण करून झडप घालतो, याचा आलेख बघायला मिळतो. विशेष हे की, बहुतेक मृत्यू अकालमृत्यू आहेत.

माडखोलकरांना साम्यवाद प्रारंभी भावला खरा, पण लवकरच त्याच्यातील अंधभक्तीने त्यांचा भ्रमनिरास झाला. संपूर्ण साम्यवाद नव्हे तर भारतीय परिस्थितीला योग्य असा भाग त्यांनी मान्य केला. पुढे तर त्यांनी 'माझी साम्यवादावरच काय, पण कोणत्याच वादावर एकांतिक आणि आत्यंतिक निष्ठा नाही' अशी कबुली दिली. 'चंदनवाडी' त अवधूतच्या मुखाने त्यांनी 'सर्वांगीण राष्ट्रीय क्रांतिवादा' ची अभिनव कल्पना मांडली.

कादंबरीकार म्हणून माडखोलकरांनी विदर्भाला कायमचे ऋणी करून ठेवले आहे. नागपूर-विदर्भाचीच नव्हे तर हल्लीच्या मध्यप्रदेशातील सृष्टि वैभव, संस्कृती, सरंजामशाही, राजकारण, चळवळी, समाजनेते, सणवार इत्यादी गोष्टी पश्चिम महाराष्ट्राला परिचित करून दिल्या. 'काय ठेवलं आहे विदर्भात?' असा तुच्छतेने प्रश्न विचारणाऱ्या मुंबई- पुण्याच्या लोकांची तोंड बंद करून टाकली. पुढच्या पिढीतील नवोदित कथा- कादंबरीकारांना वैदर्भीय जीवनावरील लेखन करण्याची प्रेरणा दिली. गो. नी. दांडेकर, पु. भा. भावे, ना. रा. शेंडे, उध्दव शेळके, मनोहर तल्हार ही सहज सुचणारी नावे. आणखी एक नाव वामन इंगळे. या बहाद्दराने भाऊसाहेबांवरच 'काळा समुद्र' ही कादंबरी लिहिली.

माडखोलकरी कादंबरीचे स्वरुप आणि स्वभाव स्थूलमानाने आणि संक्षेपाने मांडण्याचा हा प्रयत्न आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांवर जेवढी टीका झाली तेवढी त्यांच्या समकालीन फडके- खांडेकरांच्या कादंबऱ्यांवर झाली नाही. आणि स्वसमर्थनार्थ त्यांनी जेवढे लिहून ठेवले, सप्रमाण लिहिले, तेवढे अन्य कोणत्याही कादंबरीकाराला लिहावे लागले नाही. एवढी टीका होऊनही त्यांच्या कादंबऱ्यांची लोकप्रियता कमी झाली नाही. गेल्या दोन तपात मात्र, तीस ते सत्तर मध्ये आघाडीवर असलेले कादंबरीकार नव्या पिढीने नाकारल्याचे दिसून येते. अपवाद सांगता येईल तो खांडेकरांच्या 'ययाती' चा आणि तोही खांडेकरांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यामुळे. तशी माडखोलकरांची उपेक्षाच झाली. वैदर्भीय म्हणून की गांधीविरोधक म्हणून हे सांगणे कठीण आहे.

❋❋❋

अनुक्रमणिका

## |माडखोलकरांच्या त्रिदल कादंबरीची स्त्रीवादी समीक्षा|

-----------------------------------------------------------------डॉ. अरुणा देशमुख

गेल्या २५-३० वर्षात स्त्रीवादी समीक्षा पद्धतीने वाङ्मयात काही महत्वपूर्ण प्रश्न उभे केलेले आपल्याला दिसतात. मूलतः पाश्चात्य जगात निर्माण झालेली स्त्रीवादी चळवळ आपल्याकडील स्त्रीविषयक धारणांना लागू पडते. आपल्या समाजातले स्त्रीविषयक प्रश्न अनेक संदर्भांना जाऊन भिडतात. त्यामुळे या पाश्चात्य विचारसरणीला इतर अनेक पुरवण्या आपल्याला जोडाव्या लागतात. मूलतः आपली स्त्रीविषयक समस्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संदर्भांशी निगडित आहे. इथली पातिव्रत्याची कल्पना, स्त्रीचे झालेले दैवतीकरण, मातृत्वाचा झालेला अतिरेकी गौरव आणि स्त्रीच्या संदर्भात निर्माण झालेल्या विविध आदर्श कल्पना यामुळे आपली स्त्रीविषयक समस्या व्यामिश्र आणि बहुपेडी झालेली आहे.

स्त्री आणि पुरुष यांच्यातील शारीरभेदावर स्त्रीसंबंधीची एक कल्पना मांडली जाते. शारीर पातळीवरील तिची दुर्बलता, नाजुकपण, भावनाशीलता, लज्जा या साऱ्यांचा आधार घेऊन तिच्याविषयीची एक साचेबद्ध प्रतिमा वाङ्मयात सतत येत राहते. ही स्त्रीची कल्पना म्हणजे समाज आणि संस्कृतीने केलेली मखलाशी असते. स्त्रीची ही अशी दुबळी, लाजरी, मर्यादशील आणि भावनाशील प्रतिमा पुरुषप्रधान संस्कृतीला अतिशय सोयीची होती. समाज आणि संस्कृतीने सतत स्त्री ही अशीच असते असे मानले. स्त्रीत्वाच्या संकल्पनेचे असे एसेन्शिलायझेशन आणि नॅचरलायझेशन करण्यात पुरुषप्रधान समाजाचे हितसंबंध गुंतलेले असतात. स्त्रीवादाला ही गोष्ट प्रामुख्याने नोंदवायची असते. शारीरपातळीवरील स्त्रीत्व आणि सामाजिक-सांस्कृतिक पातळीवरील स्त्रीत्व या दोन गोष्टी भिन्न मानल्या पाहिजेत असे स्त्रीवादाला वाटते. त्यामुळे प्रत्येक लेखकाच्या लेखनातून कोणता सांस्कृतिक सिद्धांत अथवा विचारसरणी आढळते याची चिकित्सा करणे हे स्त्रीवादी समीक्षेचे महत्वाचे कार्य ठरते. लेखनाचे स्वरुप लिंगभेदाने निर्धारित झालेले असते असे स्त्रीवादी समीक्षापद्धती मानते. वाङ्मयनिर्मिती होते तेव्हा निर्मात्याचे स्त्रीत्व अथवा पुरुषत्व त्या वाङ्मयाचे स्वरुप निश्चित करीत असते. त्या गाभ्यावरच त्यातल्या स्त्री-पुरुष प्रतिमा निश्चित होत जातात. त्यामुळे एखाद्या कलाकृतीकडे स्त्री म्हणून पाहणे, तिचा स्त्री म्हणून आस्वाद घेणे, विश्लेषण करणे, मुल्यमापन करणे या कृती मग भिन्न ठरत जातात. पुरुषसत्ताक मूल्य दृष्टीतून आलेल्या रचनाबंधांना, विचारव्यूहांना छेद देणे, वाङ्मयाचे पुरुषकेंद्री मानदंड, प्रमाणके यांचे पुनर्मूल्यांकन करुन नवे मानदंड, नवी मूल्यवत्ता निर्माण करणे हे स्त्रीवादी समीक्षेचे उद्दीष्ट आहे.

स्त्रीवादाचे असे एक प्रमाणक घेऊन माडखोलकरांच्या 'रुक्मिणी', 'उर्मिला', 'सत्यभामा' या कादंबरीत्रयाची तपासणी करताना जे प्रथमदर्शनी जाणवते ते माडखोलकरांच्या पूर्णपणे विरोधात जाणारे आहे. स्त्रीविषयक कोणती भूमिका यातून व्यक्त होते? स्त्रीविषयक कोणते सामाजिक-सांस्कृतिक सिद्धांतन माडखोलकर करतात? रुक्मिणी, उर्मिला व सत्यभामा या तीन स्त्रीयांच्या प्रतिमा निर्माण करताना माडखोलकरांची मूल्यवृत्ती कोणती आहे?

या तिन्ही प्रश्नाचे उत्तर देताना माडखोलकरांची बाजू आपल्याला उचलून धरता येत नाही. या तिन्ही नायिका अप्रतिम सौंदर्यवती आहेत. त्यांची शरीरप्रतिमा उभी करताना माडखोलकरांनी खरोखरीच आपली प्रतिभा पणाला लावलेली आहे. त्या प्रतिभेचे वळण संस्कृत अभिरुचीला अनुरुप असे आहे. पण त्या प्रतिमा

उभ्या करण्यामागची माडखोलकरांची मनःप्रकृती सौंदर्योपभोगाचीच दिसते. या तिन्ही स्त्रियांचे लावण्य हे पुरुषाला मोहात पाडणारे, त्याला शरीरसौंदर्यात अडकवून ठेवणारे असे आहे. पण या स्त्रिया खानदानी, प्रतिष्ठित आणि घरंदाज असल्यामुळे त्यांच्या शारिरीक सौदंर्याचे वर्णन एखाद्या नर्तिकेचे किंवा विलासिनी स्त्रियांची जी इतर रुपे त्यांनी वर्णन केली त्या धाटणीची नसतात पण तरीही त्यांच्या सौंदर्याने पुरुषजात स्तिमित होते. त्यांच्या नजरा लोलूप होतात. सौदंर्यामुळे या नायिकांना कधी कधी पुरुषांच्या गैरकृत्यांना तोड द्यायची पाळीही येते. माडखोलकर या तिन्ही स्त्रियांचे वर्णन अतिशय संयमाने आणि राजस पद्धतीने करतात. पण त्यामागे उभे असलेले पुरुषमन, त्या मनाची भोगलालसेला अनुकूल वृत्ती लपत नाही. या तिन्ही नायिकांचा नायक त्या त्या वेळी त्या त्या नायिकांच्या वेगवेगळ्या रुपवैशिष्ट्यांचा पूर्णतया गुलाम झालेला होता. हे सारे अपुरे वाटून त्याने जीवनातल्या साऱ्या सुखविलासांचा आणि चैनीचा अनुभव त्याने घेतला आहे. म्हणूनच 'पुरुष हा भोग्या आहे आणि स्त्री ही भोग्य आहे हा एकच धडा शिकत आले मी आतापर्यंत' असे सत्यभामा उद्गारते. पुरुष हा खेळगडी आहे, स्त्री त्याला खेळविणारी, पुरुष गुलाम, स्त्री मालक, पुरुष सावज, स्त्री शिकारी अशासारखे उल्लेख यात येतात. ह्यातून स्त्रीकडे शारीरप्रतिमेच्या आणि उपभोग्य वस्तू म्हणून बघण्याचा लेखकाचा मनःपिंड लपू शकत नाही. पुरुष बहुभोगी असणं हे या कांदबरीत्रयीत अनेक परींनी समर्थनीय ठरवण्यामागचं दुसरं काहीच कारण सांगता येत नाही. या तिन्ही स्त्रिया पुरुषांच्या बाहेरख्यालीपणाला एक उदात्ततेची किनार लावतात. 'स्त्रीचं तारुण्य पारिजातकाप्रमाणं असून लवकर कोमेजणारं असतं. पुरुषाचं बकुळीच्या फुलासारखं खाली पडलं तरी परिमल कायम असतो' असे म्हणून पुरुषाच्या या वृत्तीचे समर्थन त्या करित असतात. 'नवऱ्याच्या जीवनात फार मन घालून आणि खोल शिरुन बघू नये. नवरा सामान्यतः आपल्याशी चांगला वागला म्हणजे तेवढयावर समाधान मानावं तिने' असेही या संदर्भात रुक्मिणी म्हणते. ही सारी विधाने या कादंबरीच्या निर्मितीमागची पुरुषप्रधान भूमिका अतिशय स्पष्टपणे व्यक्त करणारी आहेत. लेखकाची स्त्रीकडे पाहण्याची भूमिकाच त्यातून पर्यायाने व्यक्त होते. महाराजांच्या वर्तनातील सर्व अवगुण ठाऊक झाल्यानंतरसुद्धा 'ज्यालां आपलं वाईटपण कळतं, त्या वाईटपणाबद्दल लाज वाटते, ते वाईटपण घालवून टाकण्याचा प्रयत्न जो सारखा करित असतो, त्याच्यासारखा चांगला मनुष्य नाही जगात' असे उर्मिला म्हणते आणि त्या वाईट वर्तनाकडे उदारतेने बघते, समंजसतेने बघते. पुरुषाची ही वृत्ती समजून घेण्याइतकी क्षमता तिच्याठायी असते. अशी तिची प्रतिमा उभी करण्यामागे लेखकाची हीच भूमिका आहे. त्यातून पुरुषाच्या वर्तनाचे एक प्रकारचे समर्थनच व्यक्त होते.

या कादंबरीत्रयीतील तिन्ही नायिका एकेका जीवनमूल्याची प्रतिमा म्हणून येतात. रुक्मिणी ही त्यागाची, पतिनिष्ठेची, मूर्तीमंत पुतळी आहे. उर्मिला ही समजूतदारपणाची-समंजसतेची, सहानुभूतीची आणि क्षमतेची प्रतिमा आहे. सत्यभामा ही उग्रसुंदर स्त्री म्हणजे तेजस्वी अशा वात्सल्याची मातृप्रतिमा आहे. माडखोलकरांनी या तिघिंना असे वेगवेगळ्या आदर्शांमध्ये वाटून टाकले आहे. स्त्रीची अशी आदर्श रुपे उभी करण्यामागची मानसिकता आपण लक्षात घेतली पाहिजे. हे आदर्श खरोखरीच जीवनात असतीलही कदाचित पण एकदा का त्यांना आदर्श प्रतिमा बहाल केल्या की त्यांची व्यक्ती म्हणून मातब्बरी संपुष्टात येते आणि व्यक्ति म्हणून त्या संपल्या की मग उरते ते फक्त आदर्शाचे कृतक् चित्रण. व्यक्ति म्हणून जगताना कराव्या लागलेल्या लढाया, जगाशी आणि मनाशी भांडावी लागलेली भांडणं या कशालाच या चित्रणात जागा उरत नाही. त्या स्त्रिया हाडामांसाच्या जिवंत मनाच्या वाटतच नाहीत. त्या फक्त आपापल्या आदर्शांची अंमलबजावणी करणाऱ्या कळसूत्री बाहुल्या वाटू लागतात. रुक्मिणीने पुत्रप्राप्तीसाठी महाराजांचे दुसरे लग्न करुन दिले आणि त्यांच्या

संसारापासून दूर होण्याचे वचन दिले. आपल्या वचनासाठी तिने पतीचा जो त्याग केला त्या त्यागाची पूर्ती मग वंशवृद्धीच्या आड येणाऱ्या संकटनिवारणातील आत्मयज्ञातच होते. आदर्शाचे टोक गाठल्याशिवाय त्या आदर्शातील मूल्य टोकदार होऊ शकत नाही असेच माडखोलकरांना वाटत असावे. त्यामुळे रुक्मिणी महाराजांच्या अधःपतनाला जबाबदार ठरते. पण आपले वचन मोडून आणि आदर्श मोडून ती हाडामांसाच्या एखाद्या सामान्य स्त्रीप्रमाणे महाराजांच्या पाठीशी उभी राहू शकत नाही. त्यांना अधःपतनापासून वाचवू शकत नाही. कारण लेखकाला रुक्मिणीच्या माध्यमातून असीम त्यागाचा आदर्श उभा करायचा होता.

उर्मिला ही महाराजांची तिसरी बायको. तिला सहानुभूतीने साऱ्यांनाच समजून घ्यायचे आहे. वाईटाचे वाईटपण घालवायचे आहे. जीवनातल्या साऱ्या उदारतेचे, क्षमेचे आणिउदात्ततेचे व्रत माडखोलकरांनी तिच्याकडे सोपवले आहे. आपल्या या व्रताचे अखेरपर्यंत ती निष्ठेने पालन करते. महाराजांचे जीवन सावरते. त्यांच्या आजारपणात खंबीरपणे उभी राहते. त्यांच्या मृत्युनंतरही आपले खंबीरपण टिकवून सत्यभामेच्या जीवनात सुख निर्माण करते. ती मूर्तीमंत क्षमा असते. पतीचा शब्द हा तिच्यासाठी अखेरचा शब्द असतो. पतीच्या इच्छेनुसार त्याच्यामागे ती रुक्मिणीची जागा घेते. निमूटपणे आपला मुलगा सत्यभामेच्या स्वाधीन करते. उर्मिलेचे  संपूर्ण वर्तन माडखोलकरांनी पुन्हा आपल्या मनातल्या स्त्रीच्या आदर्शानुरुप बेतले. सुंदर, सुशील, पतिनिष्ठ पण करारी, कुणाला न दुखवता पतीच्या हितासाठी दक्ष असलेली उर्मिला काळाची पावले ओळखते. आपल्या घराण्याची प्रतिष्ठा कायम राखते. माडखोलकरांनी त्या गुणांच्या जोडीलाच तिच्यात पुरोगामीत्वाचे गुणही जोडलेले आहेत. ती आपल्या मुलाचे ख्रिश्चन मुलीशी (मुळातल्या ब्राह्मण) लग्न लावून देते. (हे पुरोगामीत्व बरेचसे शंकास्पद वाटते. ही मुलगी इतर कुठल्या हलक्या जातीतली असली असती तर? किंवा तिच्यावर पूर्णपणे ख्रिश्चन संस्कार असले असते तर?) एकूणच उर्मिलेचे संपूर्ण चित्र माडखोलकरांना हव्या असलेल्या सगळ्याच आदर्श स्त्रीरुपांना अनुकूल असे उतरलेले आहे.

सत्यभामा ही वेड्याच्या इस्पितळात राहिलेली उद्दाम, उग्र सौंदर्याची प्रतिमा आहे. तिच्यात अवगूण आहेत पण ते अवगुण आता तिने घेतलेल्या प्रायश्चित्ताने पूर्णपणे नष्ट झाले आहेत. तिच्यातल्या अतृप्त पिपासेचे वेडात रुपांतर झाल्यामुळे तिचे स्त्रीत्व अहेवपणी वैधव्य भोगाव्या लागलेल्या स्त्रीचे आहे. पण आता त्यात कसलेच किल्मिष उरले नाही. उर्मिलेमुळे तिच्यात बदल होतो. तिच्यातली अतृप्ती मातृत्वाच्या जाणिवेने भरुन निघते. ती आता फक्त उर्मिलेच्या मुलाची आई म्हणून शिल्लक उरते. ती आता वात्सल्यमय, प्रेमस्वरुप आई होते. प्रसंगी ती करारी होते. नेटाने मुलाच्या पाठीशी उभी राहते. आता तिच्यातल्या कृष्णछटेचे विसर्जन होते. अवगुणांमधून ती मातृप्रतिमेचा आदर्श म्हणून आपल्या पुढे येते.

माडखोलकरांनी या तिन्ही नायिकांच्या ह्या ज्या आदर्श प्रतिमा निर्माण केल्या त्यामागची त्यांची मानसिकता आपल्याला शोधली पाहिजे. या नायिकांची जडणघडण कादंबरीत होते आहे असे आपल्याला दिसत नाही. त्यांचा त्यांच्या आदर्श रुपापर्यंतचा प्रवासही या कादंबऱ्यामधून झालेला दिसत नाही. त्या एकदम परिणतप्रज्ञ आणि आपल्या आदर्श रुपातच समोर येतात. त्यांच्या घडतेपणाची कोणतीच प्रक्रिया आपल्याला दिसत नाही. त्या आदर्श रुपातच एकदम अवतीर्ण होतात. विविध स्त्रीप्रतिमांचे माडखोलकरांच्या मनातले आदर्श घेऊन त्या अवतरतात. त्यांच्या व्यक्ति म्हणून विकासाकडे, मनातल्या द्वंद्वाकडे माडखोलकर कधी फिरकताना दिसत नाहीत. माणूस म्हणून त्यांच्या अस्तित्वाची दखल ते घेत नाहीत. माडखोलकर हे ज्या

सामाजिक-सांस्कृतिक परंपरेचे घटक आहेत त्या परंपरेत त्यांना स्त्रीचे रुप यापेक्षा वेगळे दिसू शकत नाही. रामायण-महाभारत यातील स्त्रीची रुपे लेखकाच्या मनावर अधिराज्य गाजवित आहेत याचे अनेक पुरावे या कादंबऱ्यात आहेत. त्यामुळेच यापेक्षा वेगळ्या अशा स्त्रीयांच्या प्रतिमा माडखोलकरांना कल्पिता येत नाहीत.

माडखोलकरांनी आपल्या पुरुषवृत्तीने आपल्या मनातील आदर्श त्यांच्यावर आरोपीत केले. त्यांच्या आदर्शाची कल्पना इथल्या सांस्कृतिक, सामाजिक घटकांनी नियंत्रित केलेली पारंपरिक अशीच आदर्श कल्पना आहे. क्वचित कधीतरी त्यांनी परंपरेला छेद देत, पुरुषसत्तेच्या कल्पनेला छेद देत काही एक भूमिका मांडली. "पूर्ण जाणीव असलेला पुरुष स्वतः जितकं स्वातंत्र्य घेतो, तितकंच स्वातंत्र्य स्वतःच्या जबाबदारीची जाणीव असलेल्या स्त्रीलाही देण्याची तयारी असली पाहिजे त्याची" असे ते एका ठिकाणी म्हणतात. पण अशी विधाने अगदी अपवादाने येतात. त्यामुळे ती त्यांची प्रमुख भूमिका आहे असे मांडता येत नाही. त्यामुळेच मग आपल्या संस्कृतीने निश्चित केलेली स्त्रीविषयक प्रतिमाच माडखोलकरांच्या कादंबरीतून प्रकटताना दिसते.

परंतु जरासे सुक्ष्मपणे पाहिले तर असे दिसते की रुक्मिणी, उर्मिला आणि सत्यभामा या एकाच मूळ प्रतिमेच्या तीन वेगवेगळ्या मुद्रा आहेत. या तिन्ही मुद्रा अखेरीस एकाच रुपात आपल्यापुढे साकार होतात. या तिघींचे मूळ एकाच ठिकाणी आहे. त्या तिघी तीन वेगवेगळ्या रुपात समोर येतात. तीन वेगवेगळी मूल्ये घेऊन येतात पण या साऱ्यांना सामावणारी एकच एक प्रतिमा अखेरीस आपल्याला जाणवत राहते. एकाच रुपात या तिघींचा अखेरीस विलय होतांना दिसतो. हे रुप आहे मातृप्रतिमेचे. रुक्मिणी ही एकाकाळी महाराजांच्या पहिल्या प्रीतीचा अनुभव ल्यालेली आहे. पण आता तिचे पत्नी म्हणून जगणे संपले आहे. ती उर्मिलेच्या आईच्या वयाची आहे. तिचे लग्न होऊन ती येते तेव्हा तिचे हे आईपण माडखोलकर अधोरेखित करतात. ती या क्षणी महाराजांचीही आईच झालेली आहे. त्याच भूमिकेतून ती त्यांच्याशी वागते. त्यांना सल्ला देते. त्यांच्यावर वचक ठेवते. तिचे सगळेच वर्तन पत्नीपेक्षा आईपणाकडे जाणारेच आहे. उर्मिलेच्या गर्भाला धोका निर्माण होतो त्यावेळी तिचे हे आईपण अधिक टोकदार होते. आपले सारे जीवन बाळाला मिळावे म्हणून ती आत्मसमर्पण करण्याचा नवस बोलते. येथे तिचे आईपण एका उंच जागेवर जाऊन बसलेले असते. उर्मिला महाराजांचा वंश धारण करते. पत्नी म्हणून सहा-सात वर्षे त्यांच्यासोबत घालवते. पण येथेही ती पत्नीपेक्षा आईपणच स्वतःकडे अनेकदा घेते. महाराजांच्या जीवनातले शल्य अचूक ओळखून ते दूर करण्याची तिने घेतलेली जबाबदारी त्यांच्या अधःपतनापासून त्यांना रोखण्याची कृती ही त्यांच्या पत्नीने आईच्या मायेने केलेलीच कृती असते. उर्मिलेची मातृप्रतिमा रुक्मिणी आणि सत्यभामेएवढी उघड नाही. ती सुप्त आहे. पण तेही आईपणाचेच रुप आहे. महाराज एकदा तिला म्हणतात, "स्त्री पुरुषांच साहचर्य हे वासनेवर, त्या हंगामी गरजेवर अवलंबून नसतं. त्यात वासनेचं स्थान गौण आहे. त्या साहचर्याचा स्थायीभाव हा परस्परांविषयीचा नितांत जिव्हाळा, विश्वास आणि आदर हाच असतो." येथे माडखोलकरांनी स्त्री-पुरुष साहचर्यातील वासनेचे गौणत्व अधोरेखित केलेले आहे. त्यातून आईपणाची प्रतिमा ते अधिक प्रभावी करीत आहेत असेच म्हणावेसे वाटते.

अनुक्रमणिका



**सहधर्माचारीणी - सौ. शांताबाई सोबत भाऊराव**

अनुक्रमणिका

सत्यभामेचे तर संपूर्ण अस्तित्व मातृप्रतिमेचेच द्योतक आहे. ती येते तिच मुळी श्रीची आई म्हणून. जन्म न देताही त्याची आई होण्याचे भाग्य तिला लाभते. श्रीही तिच्याच पोटी यावा इतका तिच्यावर अवलंबून आहे. सत्यभामेच्या जगण्याचे सार्थकच तिच्या मातृप्रतिभेत आहे. त्यामुळे त्याविषयी अधिक खोलात शिरण्याची आवश्यकता नाही.

या तिन्ही स्त्रीया वेगवेगळ्या पण त्या एकाच मातृप्रतिमेच्या तीन मुद्रा आहेत. ही मातृत्रयी निर्माण करणे हेच माडखोलकरांचे वेगळेपण आहे. या मातृत्रयीतून माडखोलकर स्त्री विषयीची आपली भूमिका व्यक्त करतात. अशरीरी प्रेमाचे, त्यागमय प्रेमाचे, पुरुषाच्या बहुभोगित्वाकडे समजूतदारपणे पाहणाऱ्या प्रेमाचे निखालस आदर्श स्वरुप त्यांनी या स्त्रियांमधून प्रकट केले. हे सारेच घटक आईच्या प्रेमात अधिक येतात. पत्नीचे प्रेम आणि आईचे प्रेम यात भेद निश्चित असतो. पण माडखोलकरांना या भेदाला पार करुन एक वेगळी स्त्री प्रतिमा उभी करावयाची आहे. त्या प्रतिमेत स्त्रीच्या संदर्भातील साऱ्या प्रश्नांची सोडवणूक करता येते. स्त्री-पुरुषांमधील वासनेच्या गौणत्वाची कल्पना अगदी 'भंगलेले देऊळ' या कादंबरीपासून त्यांना भुरळ घालते आहे. त्यामुळे वासना वगळून, शरीर वगळून एक आदर्श स्त्री प्रतिमा उभी करण्याचा त्यांचा प्रयत्न या कादंबऱ्यांमधून त्यांनी केलेला आहे. आई त्यागाची मूर्ती असते, कठोरतेची, व्यवहारदक्षतेची, मांगल्याची आणि प्रेमाची प्रतिमा असते. प्रसंगी ती खंबीरपणे आधार देते, निडरपणे समस्येतून मार्ग काढते, प्रसंगी आपले सारे सत्व, स्वत्व आणि मातृत्व पणाला लावते, आत्मयज्ञही करु शकते आणि अशा प्रकारची स्त्री प्रतिमा पत्नीच्या ठिकाणी, प्रेयसीच्या ठिकाणी किंवा इतर कुठल्याही स्त्रीरुपात दाखवण्यापेक्षा मातृप्रतिमेत अधिक तेजस्वीपणे आणि मूल्यरुपात उभी करता येते. माडखोलकरांनी मोठ्या चातुर्याने अशी आपल्या मनातली एक आदर्श स्त्रीची प्रतिमा ह्या तिघींच्या रुपाने उभी केलेली आहे.

वस्तुतः अशी स्त्रीप्रतिमा उभी करुन माडखोलकरांनी एक त्यांच्या समकालाची चौकट उल्लंघून जाणारी स्त्री प्रतिमा उभी केलेली आहे. या प्रतिमेच्या माध्यमातून त्यांना स्त्रीविषयक संकल्पनेची एक मूल्य प्रतिमा उभी करायची होती असे आपल्या लक्षात येते. ती प्रतिमा उभी करण्यात त्यांना बरेचसे यशही आले आहे. पण आपली ही प्रतिमा त्यांनी रामायण- महाभारतातल्या स्त्री प्रतिमेशी बांधून टाकल्यामुळे त्या प्रतिमेला. अभावितपणे एक पुराणांची चौकट प्राप्त होऊन गेली. उलट त्या चौकटीतून सोडवून एक नव्या कालोचित आणि कालोत्तिर्ण चौकटीत त्यांनी तिला बसवले असते तर या स्त्रीप्रतिमा स्त्रीवादी मूल्यभूमिकेची परिपूर्ती करताना आपल्याला दिसल्या असत्या. दुर्दैवाने माडखोलकरांना आपल्या सांस्कृतिक संचितातून प्राप्त झालेल्या चौकटीचे उल्लंघन करता आले नाही. मात्र अशा प्रकारचा प्रयत्न त्यांच्या समकालात इतर कुणी केल्याचे आपल्याला दिसत नाही. एका व्यापक पटावर, त्या मिश्र समकालाला छेदत स्त्रीच्या एका वेगळ्या प्रतिमेचे सूचन त्यांनी त्यातून करुन ठेवल्याचे मात्र आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही. काळाच्या पुढच्या चौकटीतले स्त्रीचे प्रतिमांकन करुन त्यांनी एक प्रकारच्या मुक्त आणि अस्मितायुक्त स्त्री-जीवनाची प्रतिमा सूचित केली आहे. येथेच या त्रिदलकादंबरीचे खरे यश दडलेले आहे.

⁂⁂⁂

अनुक्रमणिका

## | माडखोलकरी कादंबरी : ललिता ते रेणुका |

-----------------------------------------------------------डॉ. सौ. मंदाकिनी प्र. सगदेव

कै. श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर यांची जन्मशताब्दी सर्वत्र साजरी होत असताना फडके, खांडेकर या ज्येष्ठ व श्रेष्ठ कादंबरीकारांच्या पंक्तीत बसण्याचा सन्मान प्राप्त झालेल्या या ज्येष्ठ, अग्रगण्य व विदग्ध कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातील स्त्री सृष्टीकडे एक दृष्टी वळवणे उचित ठरेल. सर्वसाधारणपणे प्रथम कवी, कथाकार, कादंबरीकार नंतर समीक्षक टीकाकार अशा साहित्यिक प्रवासाची वाटचाल चालू असताना माडखोलकरांनी मात्र उलटा प्रवास केलेला आढळून येतो. प्रथम तुरळक कविता लिहिल्या असल्या तरी आधुनिक कविपंचक व विलापिका या समीक्षात्मक लिखाणाने ते प्रकाशाच्या झोतात आले. त्यांचेवर त्यांच्या मातृकुळाकडून प्राप्त झालेले साहित्यिक संस्कार व पित्याचे समृद्ध वाचनालय यामुळे त्यांची वाणी व लेखणी संस्कृतनिष्ठ पण तरल अर्थवाही झाली. वृत्तपत्र लेखनाला पुण्याला प्रारंभ झाला असला तरी त्यांचे साहित्य गुरु न. चिं. केळकर तसेच श्री. कृ. कोल्हटकर यांचे सुसंस्कारामुळे लेखन अतिशय तरल व सुबोध होऊन या भाषा शक्तीचा उपयोग वृत्तपत्रातील व्यवसायात एक शस्त्र म्हणून त्यांना करता आला.

नागपूरला स्थायिक होऊन तरुण भारत या वृत्तपत्राला संजीवन देण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले. त्यांचे एकेक अग्रलेख म्हणजे साहित्याचे मोठे देणे! अर्थसहाय्यासाठी माडखोलकर कादंबरी क्षेत्रात संचार करु लागले व १९३३ पासून १९७४ पर्यंत विविध प्रकारच्या, तऱ्हेतऱ्हेच्या पात्रांनी युक्त, तत्कालीन सामाजिक समस्यांना स्पर्श करणाऱ्या अशा वीस कादंबऱ्यांची निर्मिती त्यांनी केली. ‘मुक्तात्मा’ या पहिल्याच कादंबरीने त्यातील राजकीय कथानक राजकीय चर्चा, राजकीय कृति कारस्थाने इ. मुळे त्यांना ‘राजकीय कादंबरीकार’ म्हणून गौरविले जाऊ लागले.

त्यांनी ‘मुक्तात्मा’, ‘भंगलेले देऊळ’, ‘शाप’, ‘कांता’, ‘दुहेरी जीवन’, ‘मुखवटे’, ‘नवे संसार’, ‘डाक बंगला’, ‘नाग कन्या’, ‘चंदनवाडी’, ‘प्रभद्वरा’, ‘अनघा’, ‘स्वप्रांतरिता’, ‘अरुंधति’, ‘रुक्मिणी’, ‘उर्मिला’, ‘सत्यभामा’, ‘रेणुका’, ‘जन्मदुर्दैवी’, ‘अकेला’ अशा वीस सरस कादंबऱ्यांची मोलाची भर साहित्यक्षेत्रात घातली आहे. प्रथमदर्शनी ह्या कादंबऱ्या नायिकाप्रधान आहेत, स्त्री विषयक अनेक समस्या त्यात हाताळल्या आहेत हे लक्षात येते.

माडखोलकरी कादंबरीत अनेक वृत्ती प्रवृतीच्या स्त्रिया वावरताना आढळतात.

यौवनाच्या यक्षभूमीत पदार्पण करणारी, चुलतभाऊ केशव याचेवर जीवापाड प्रेम करणारी पण त्या प्रेमाची जात कोणती ह्याचे आकलन न होणारी तसेच त्या दोघात तिसरा कुणीही वाटेकरी नको म्हणून अविवाहित राहू इच्छिणारी, चंद्रशेखरच्या व्यक्तिमत्वावर मोहित होणारी पण त्याची भयानक मते न पटल्यामुळे व केशवसारख्या मृदु अंतःकरणाच्या तरुणाला आपल्या दहशतवादी चळवळीत ओढू पहात असल्यामुळे त्याच्यावर रुष्ट असणारी, केशवच्या काळजीने खंगत जाऊन मृत्यु स्वीकारणारी ‘मुक्तात्मा’ या राजकीय कादंबरीला लालित्य प्राप्त करुन देणारी ‘ललिता’ आहे. प्रथम प्रणयभंग झाला तरी स्वाभिमानाने चंडोल वृत्तीच्या अरुणला झिडकारुन टाकणारी व नव्याने अनिरुद्धशी विवाह करुन प्रणयपूर्ती साध्य करणारी व

अनुक्रमणिका

त्याच्या प्रेमवर्षावाने स्वतःला भाग्यवती समजणारी, अत्यंत ऐश्वर्यसंपन्न व बुद्धीवंत अशी 'अनू' आहे. भोगलालसेच्या अतिरेकापायी अनेक बाळंतपणे लादली गेल्यामुळे अकाली तारुण्य ओसरलेली व अपंगतेमुळे दौर्बल्य प्राप्त झालेली ही अनू दुसऱ्या स्त्रीबरोबर कामलीलेत मग्न झालेला पती पाहताच त्याच्याशी वाद घालते. मोठ्या स्वाभिमानाने घराचा व मुलांचा त्याग करते. तरीही देवळाच्या विवाहसंस्थाच्या - समाजधारणेसाठी व समाज स्वास्थ्यासाठी आत्यंतिक आवश्यकतेवर भर देते. स्वतःचे देऊळ भंगले तरीही! अशी ही मानिनी आहे. 'मोह व प्रेम' हे सर्वस्वी वेगळे घटक आहेत मनाचे' असे प्रतिपादन करणारी, संयमपूर्ण वैचारिक भावना असलेली, संकटात एकाकी पडलेल्या प्रियकराला याचवेळी आपल्या भक्कम आधाराची आवश्यकता आहे असे ठणकावून सांगून भावाच्या ऐश्वर्याकडे पाठ फिरविणारी, प्रियकराची राजकीय खटल्यातून सुटका व्हावी म्हणून स्वतःचा लिलाव करुन घेण्यास निकराने विरोध करणारी, अशी तडफदार 'सुहास' शाप कादंबरी वाचताना मन भारुन टाकते. परमेश्वर प्राप्तीच्या मागे पिसाटाप्रमाणे गिरीकंदरात भटकंती करणारी, परत येताच विविध समस्या व कपटी राजकारण यांचा वीट येऊन लाखाच्या इस्टेटीवर पाणी सोडून पुन्हा स्वामीजींकडे हृषीकेशला निघून जाणारी 'अरुंधती' ही तत्वज्ञानाची सुविद्य तरुणी आहे. महाराजाची पत्नी, मैत्रिण, सल्लागार, कारभारीण इ. भूमिका पार पाडणारी, अपत्यसंभव नाही हे पाहताच घराण्याच्या वारस प्राप्तीसाठी स्वतः सवत आणणारी, दिलेले वचन पालन करुन वाड्यात मुरलीधराच्या सेवेत व्रतस्थ जीवन जगणारी, सर्वांच्या आदरास प्राप्त ठरणारी, वंश जोपासनेसाठी नर्मदा परिक्रमा करण्याचा घोर नवस करुन अखेर देह त्याग करणारी 'रुक्मिणी' चिरस्मरणीय आहे. सरंजामशाहीच्या व वैभवाच्या उतरत्या काळातील समस्यांना कणखरपणे तोंड देत असलेल्या उर्मिला तसेच राणीसाहेब अत्यंत तडफीने माडखोलकरांनी उभ्या केल्या आहेत. तिसरपणची बायको असूनही महाराजांशी समरस होणारी, त्यांच्या विलासी व चैनी सवयींना आवर घालून काटकसर करणारी, घराण्याला वारस देणारी, वेड लागलेल्या आपल्या सवतीला घरी आणून महाराजांच्या मृत्युनंतर तिच्या ओटीत आपलं मूल देणारी, रत्ना लेले ह्या ख्रिश्चन मुलीला धर्मांतरानंतर सून म्हणून स्वीकारणारी पतीनिष्ठ अशी 'उर्मिला' आहे. तर महाराजांच्या चैनी व विलासी स्वभावाला मुरड घालू न शकल्याने व त्यांचे परिपूर्ण प्रेम न लाभल्याने वेड लागलेली, मत्सरामुळे उर्मिलेला विष देऊन गर्भपात घडवून आणण्याचा प्रयत्न करणारी, परंतु लहानग्या 'श्री' च्या स्पर्शाने पुलकित होऊन त्याच्या वात्सल्याचा वर्षाव करणारी, घराण्याची प्रतिष्ठा असलेली मूर्ती चोरी झाल्याचे पाहताच ती परत प्राप्त करण्यासाठी जिवाच्या कराराने कृष्णरावाशी वाद घालून घनघोर शाप देणारी व त्यातच देहत्याग करणारी करारी 'सत्यभामा' आहे. साऱ्या हैद्राबादेत सुंदर, तेजस्वी व महत्वाकांक्षी म्हणून प्रसिद्ध असलेली मेधाविनी राणीसाहेब. महाराष्ट्राचे गुणगान करणाऱ्या, गोदावरीमधे माहेरची माया शोधणाऱ्या, घराण्याच्या प्रतिष्ठेला जपणाऱ्या, रंजनाच्या विवाहाला परवानगी देणाऱ्या सवतीच्या मुलांवर अतोनात माया करणाऱ्या, राजेबहाद्दरांना संकटातून सोडविण्यास प्रयत्नाची पराकाष्टा करणाऱ्या अशा स्वप्नांतरित मधील तडफदार राणीसाहेबांचे व्यक्तिमत्व मन भारुन टाकते.

'संसारकरु' हे विशेषण मोठ्या आनंदाने व आदराने स्वीकारणारी प्रणयाचे पर्यवसान विवाहात होऊन पतीचे एकनिष्ठ प्रेम लाभलेली बुद्धीप्रभ सौंदर्य असलेली, प्रेमयुक्त दरारा व विश्वास असलेली, "जी स्त्री स्वतःचे मन आवरुन, पतीशी एकरुप होण्यास नकार देत असेल तिला कांता व माता होण्याचा अधिकार नाही,' असे मतप्रतिपादन करणारी, स्वाभिमान कायम राखून अनेक आघात सोसणारी व अखेर मृत्यूला बळी पडणारी कांता आहे. त्याचवेळी संपूर्ण रात्र अपरिचित रंगाबरोबर तापीच्या डोहामध्ये जलक्रीडा करणारी, परंतु स्वतःचे

शील सांभाळून तारुण्याचा संबंध देशभक्तीकडे वळविणारी रंगेल नागकन्या 'मदिया' आहे. १९४२ चा ऑगस्टवाद सांगणारी, पतीवर व मुलीवर अपार प्रेम करणारी, जळणाऱ्या पोस्ट ऑफिसकडे अनिमिष नेत्राने पाहणारी ही स्वामीजींना एक दिवसही आपल्याकडे ठेवू न शकल्याने व्यथित होणारी परंतु चौकशीला आलेल्या इन्स्पेक्टरांना यथायोग्य सामोरी जाणारी, पतीला आपल्या कार्यात ओढून घेणारी अशी तडफदार 'प्रमद्वरा' आहे.

स्त्रीच्या जन्माचं साफल्य आपल्या प्रियकराला पुत्ररुपानं जन्म देण्यात असून त्याच प्रिया व प्रियकराला बांधून ठेवणाऱ्या आनंदग्रंथी होत असं मानणारी, वात्सल्यपूर्ती होऊ न शकल्याने व वांझ म्हणून समाज व आप्तेष्टांचा रोष पत्करावा लागल्याने अपमानित होणारी, 'मृत्यू पत्करेल' पण गर्भाशय काढू नका असा हट्ट धरणारी, स्वतःचेच मूल हवे, सवतीचे सुद्धा नको, असा हेका धरणारी टेनिस चँपियन सुविद्य 'अनघा' आहे. पतीकडे मृत्यूच्या क्षणापर्यंत पाहता यावे यासाठी मार्फिया न घेण्याचा हट्ट करणारी अनघा सहानुभूतीला पात्र ठरते.

वागण्या बोलण्यात बौद्धिकतेचा ऐटदारपणा असला तरी जात्याच शांत गंभीर, सरल स्वभावी व अबोल असलेली 'दुहेरी जीवन' मधील सुलोचना घरकुलातील सुरक्षित वैभवी जीवनाची अपेक्षा बाळगणारी आहे. इच्छा असूनही पतीचे जीवन संपूर्णपणे व्यापू न शकणारी, त्याच्या सुशिक्षितांच्या भेसूर शृंगाराला बळी पडणारी, तरीही संकटात त्याच्या पाठीशी निर्धाराने उभी राहणारी 'मुखवटे मधील' 'रोज' मन मोहून घेते. धनिक रतिलालच्या बलात्काराला बळी पडलेली परंतु त्याच्याशीच विवाहबद्ध होण्यात यशस्वी ठरलेली व दूरत्वाने व्यवहार करुन तिरस्कार व्यक्त करणारी वेळी "मी वाटेल तिथे जाईन, मी तुम्हाला कुठे जाता, कुणाबरोबर जाता याची चौकशी करते काय? मग तेच स्वातंत्र्य मला कां देऊनये?" असा खडा सवाल करुन स्वतःचे स्वातंत्र्य व्यक्त करणारी, ठायी ठायी कधी स्वामीजी तर कधी प्रत्यक्ष सासरा यांच्या विषयलोलूपतेपासून स्वतःचे कणखरपणे रक्षण करणारी, पुरुष स्वतःसाठी जगतो, पण स्त्री मात्र पुढील पिढीसाठी जगत असते, मुलांना आपल्याबद्दल आदर असावा असचं निष्कलंक वर्तन आपलं असावं अशी मतं व्यक्त करणारी सश्चरित्र निर्भय कांचनगौरी! कोणा एका मोहाच्या क्षणी तोल सुटताच व तिच्या निष्कलंक चारित्र्याला तडा जाताच रामसागरात कायमचा विसावा घेते. अशी ही हतभगिनी कांचनगौरी!

सुरक्षित व प्रतिष्ठित जीवनाची अपेक्षा असणारी 'नवे संसार' ची नायिका मीरा पतीप्रेमाच्या अवगुंठनात निश्चित आहे. त्याच्या नवीन दहशतवादी विचारसरणीशी, बदललेल्या मनःस्थितीशी समरस न झाल्याने, अखेरीला सत्य कळून येताच ती सैरभैर होते. ज्या मुक्तबाईचा संशय घेतला तिचीच सक्रिय मदत व मार्गदर्शन तिला उपयुक्त ठरते. आततायी संशयी, चिडखोर व सर्वसाधारण व्यक्तीमत्व असलेली मीरा 'स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळालं तरी ती सुखी होईलच असे म्हणता येत नाही' असे महत्वपूर्ण मत व्यक्त करुन जाते!

ऋषी पत्नी असल्याने राजकन्या म्हणवून घेणे उचित वाटत नसलेली, जमदग्नींच्या आश्रमाची प्रतिष्ठा असलेली, ऋषीकुलाची धारिणी असलेली, सूर्याकडून 'एकवीस' होण्याचे वरदान मिळालेली हे रेणुका पतीव्रता आहे. पतिव्रत्य भंग पावताच मात्र प्रामाणिकपणे कबुली देऊन जमदग्नी क्रोधाला स्मितमुखाने बळी पडते.

अनुक्रमणिका

'शापादपि शरादपि' सामर्थ्य असलेल्या पती हैहेया कडून यज्ञीय पशूप्रमाणे बुकलला जातो तेव्हा तिला अपार शोक होतो व ती सती जाते.

अशा प्रकारे माडखोलकरांनी आपल्या विविध मनोवृत्तींच्या नायिकांचे दर्शन त्यांच्या कादंबऱ्यांमधून घडविले आहे. त्यांच्या उपनायिकाही तेवढ्याच तुल्यबल ठराव्या व चिरस्मरणीय ठराव्या अशाच त्यांनी रेखाटल्या. मुक्तात्मांमधील 'प्रेमाबाई' व कांता मधील 'शामाकुमारी' या राजकीय उलाढालीत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या धाडसी स्त्रिया आहेत तर हताश झालेल्या अनघाला पुन्हा पुन्हा धीर देऊन समाजकार्याकडे वळविणारी 'निरुपमा' आहे. विवाहापूर्वी मृत झालेल्या प्रियकराची विधवा म्हणून त्यागाच जीवन व्यतीत करणारी, शीलाला जपणारी, मोहाचे क्षण निकराने मागे सारणारी व "विवाहितांचे संसार सुशिक्षित स्त्रियांनीच उध्वस्त केले तर त्यांच्या शिक्षणाचा उपयोग काय?" असे उच्च विचार व्यक्त करणारी मुक्ताबाई वाचकांचे मन आकर्षून घेते. दलितांना मदतीचा हात देणारी कुटुंबनियोजनाच्या मार्गदर्शनाने त्यांना प्रसूतीमुळे होणाऱ्या शरीराचे हाल कमी करणारी व विवाहितांचे संसार उध्वस्त करण्यास स्वतः कारण ठरु नये म्हणून विवाहाच्या प्रस्तावाला नकार देणारी, मोहाच्या बलवत्तर क्षणी बळी पडलो तरी गर्भपात न करता अपत्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारुन असा सल्ला देण्याऱ्या मुकुंदाचा धिःकार करणारी डॉ. क्षमा आहे.

'मुक्तात्मा' या कादंबरीमुळे राजकीय कादंबरीकार हा गौरव त्यांना प्राप्त झाला. तत्कालीन समाजवाद, दहशतवाद, गांधीवाद तसेच साम्यवाद इत्यादी विचारसरणी त्यांनी हाताळली. 'चिताभस्माची दीक्षा' 'मृत्तिका लेपन' इत्यादींच्या उपयोगामुळे माडखोलकरांचे दहशतवादाबाबतचे आकर्षण दिसते. पत्रकारितेच्या डोळस अनुभवामुळे व अनेक राजकीय, सामाजिक व्यक्तींच्या जवळच्या स्नेहसंबंधामुळे त्यांचे अनुभवविश्व अतिशय संपन्न होते. त्यामुळे त्यांच्या कादंबरीतील पात्र रचना सजीव व उठावदार झाली आहे. त्यांच्या स्त्रियाही राजकीय क्षेत्रात मागे राहणाऱ्या नाहीत. प्रेमाबाई, शामाकुमारी ह्या तर प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या उपनायिका आहेत. प्रमद्वरा ही रणरागिणी आहे पण भोळी व सरलहृदयी चंदनही अवधूतच्या कार्यात स्वतः ला झोकून देते. राणीसाहेब तर ओतप्रोत राजकीय उलाढालीत, कारस्थानात गुंतलेल्या व त्याचे परिणामही भोगत असलेल्या धैर्यवान स्त्री आहेत. तत्वज्ञानाची विद्यार्थिनी असलेली अरुंधती, अनंगच्या सहवासात येऊन राजकारणात प्रवेश करते, पण ते तिला न रुचल्यामुळे या सर्वांचा त्याग करुन पुन्हा हृषीकेशला जाते. डॉ. क्षमा व मुक्ताबाई ह्या उपनायिकाही राजकारणात ओढल्या जातात.

माडखोलकरांनी या कादंबऱ्यांच्या माध्यमातून अनेक स्त्री विषयक समस्या वाचकांसमोर उपस्थित केल्या. पुरुषांची भ्रमरवृत्ती, प्लॅटनिक लव्हची वैय्यर्थता, भोगलोलुपांच्या तावडीत सापडलेल्या सुशिक्षित स्त्रियांचे भवितव्य काय? विवाहित अविवाहीत स्त्री पुरुषांच्या संघटनामुळे विवाह संस्थेवर तसेच कुटुंबावर होणारे दुष्परिणाम हे 'भंगलेले देऊळ', 'दुहेरी जीवन', 'मुखवटे', नवे संसार', 'डाक बंगला,' इ. कादंबऱ्यातून चर्चिले गेले आहेत. घटस्फोटाचा मार्ग कितपत योग्य, स्त्रीमनाचा कोंडमारा, अर्थार्जन करीत असूनही स्त्रीला सन्मान नाही. धर्मांतर करुन घेतले - त्यांना सन्मान देणे, हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन ह्या तिन्ही धर्मियांनी एकत्र कुटुंबात नांदावे, एकाच निशाणावर कमल, क्रॉस व अर्धचंद्र झळकवून एकात्मता साधणे, (चंदनवाडी) अस्पृश्यता नष्ट करणे, आंतरधर्मीय तसेच पोट जातीतील विवाहामुळे ऐक्य साधणे, राष्ट्रभाषेच्या प्रश्नाची तड लावणे, हिंदी हीच राष्ट्रभाषा असावी, संस्कृत भाषेची अवहेलना संपवावी, आदिवासी हे हिंदू की अहिंदू?

अनुक्रमणिका

मठांचा कारभार पंचांच्या हाती असावा, देवस्थानांची पुनर्रचना करावी, महंतजीच्या मुलाच्या निमित्ताने अनौरस संततीचा प्रश्न, संयुक्त महाराष्ट्राचा ज्वलंत प्रश्न, विधवा झालेल्या स्त्रीने स्वकर्तृत्वाने मुलांचे संगोपन करावे, समाजात विधवेलाही सन्मान मिळावा, स्त्रियांचे हक्क, अनाघ्रात पुष्पाची अपेक्षा कालबाह्य इ. अनेक प्रश्न उपस्थित करुन वाचकांना अंतर्मुख केले आहे.

माडखोलकर निर्मित स्त्रिया ह्या सौंदर्यवती असून काहींचे बुद्धीप्रभ लावण्य व सुविद्य सुसंस्कृतता यामुळे त्या आदरणीय ठरतात. सर्वच नायिका उच्च विद्याविभूषित कलाप्रिय असून प्रतिष्ठित घराण्यातील आहेत. त्या स्वाभिमानीही आहेत. त्यांना प्रियकराबद्दल दुरंत आसक्ती आहे. सुहास, अनू, रोज, सुलोचना, मीरा, उर्मिला ह्यांना आपल्या प्रियकराबद्दल अतिशय प्रेम वाटते. सर्व नायिका प्रगल्भ विचारसरणीच्या आहेत. 'अनाघ्रात पुष्पाचे' युग संपल्याबद्दल त्या बोलतात. प्रत्येकीचे प्रेमविषयक तत्वज्ञान जवळजवळ समान आहे. नदीप्रमाणे सर्वस्व अर्पण करणारे, नंदादीपा प्रमाणे त्या प्रेम प्रकाशात जळत राहणारे, प्रणयविषयाशी विलीन होऊ न जाणारे, स्त्री भावनेने प्रेम करते असे प्रतिपादन करणारे, प्रेमविषयाकडून सर्वस्वाची अपेक्षा न करणारे, संकटात पतीच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची दुर्दम्य शक्ती असणारे. प्रेमविषयक उदात्त व उच्च तत्वज्ञानाचे गुणगान करणारे स्त्रीजीवन माडखोलकरांनी आकारले.

मदिया, चंदन, सुहास चा अपवाद वगळता सर्व नायिकांना सुरक्षित प्रतिष्ठित जीवनाची इच्छा आहे. तरीही मनाविरुद्ध असले तरी पतीसाठी त्या राजकीय कार्यात भाग घेतात. निवडणुकाचे वेळी सहकार्य करतात.

कलेच्या आविष्काराचा उद्देश आनंदवृद्धीसाठी असावा असे मत ललिता, रंजना, रोज इ. व्यक्त करतात. परंतु सिराज 'खरी कला तीच की जी माणसाच्या खडतर जीवनयात्रेत त्याचे साहचर्य करेल. उद्‌बोधन करुन योग्य मार्ग दाखवेल. उद्‌बोधन हेच कलेचे ध्येय व कार्य असलं पाहिजे. केवळ रंजन नव्हे' असे प्रतिपादन करतो.

जीवनातील आनंदाला प्राधान्य देणाऱ्या या सर्व नायिका निर्धाराच्या पक्क्या आहेत. अनू, चंदन, सुहास, रोज, कांचनगौरी, कांता, मुक्ता, अनघा, उर्मिला, सत्यभामा, राणीसाहेब, रुक्मिणी, रेणूका ह्यांचा निर्धार ठायी ठायी दिसून येतो व कुसुमकोमल असूनही त्या निर्धाराच्या बाबतीत वज्रकठोर असल्याचे प्रत्ययाला येते.

माडखोलकरी स्त्रियांचे ठिकाणी सौंदर्य, विद्वता, घराण्याची प्रतिष्ठा, सधनता, सुसंस्कृतता ह्या सर्व गुणांचे एकत्रीकरण झाले असून त्यावर कळस म्हणून की काय कांचनगौरीचा अपवाद वगळता या सर्वांना मनपसंत प्रियकर पती म्हणून लाभले आहेत. परंतु बहुतेकींना आपल्या पतीचे एकमेव व निर्भेळ प्रेम व सौख्य लाभलेले दिसत नाही. कुणाचा भोगलंपट सहवास तर कुणाचा ध्येयवादाचा अतिरेक यामुळे या सुखी असलेल्या स्त्रिया तेवढ्याच दुःखी आहेत. अनूला तर आपल्या घरकुलाचा त्याग करावा लागला. अशा या नायिका वैफल्यग्रस्त, प्रणयी जीवनाची दारुण वंचना झाल्यामुळे पराकाष्ठेच्या व्यथित आहेत. तरीही पलायनवाद स्वीकारुन घटस्फोटाची कल्पना मात्र त्या स्वीकारत नाहीत. रोज, अनू, सुलोचना, कांचनगौरी,

मीरा यांना घटस्फोट घेऊन स्वतंत्र जीवन व्यतीत करता आले असते. परंतु घटस्फोटीत स्त्रीला हमखास सौख्य मिळेलच याची शाश्वती कुठे आहे? विवाह संस्थेचे पावित्र्य व अभंगत्व कायम असावे ह्या विचारांचा पाठपुरावा त्यांनी केला. यासाठी प्रसंगी त्यांना मनस्ताप, अवहेलना, कोडंमारा सहन करुन वंशसातत्यासाठी संसाररथ ओढताना त्या दिसतात. या स्त्रिया पुरोगामी वृत्तीच्या आहेत. मिश्र विवाह करणारी अनु, आंतरधर्मीय विवाह करणारी रोज, अस्पृश्य मुलांना घरी आश्रय देणारी अनघा, अस्पृश्यांच्या वस्तीत कार्य करणारी सुहास, हीराला घरी जेवू घालण्याचा निर्धार करणारी चंदन, 'श्री' ची मुंज आधुनिक पद्धतीने करण्याचे ठरविणारी उर्मिला व सत्यभामा, रत्ना लेळेला ही हिंदु करुन सून म्हणून स्वीकारणारी उर्मिला - परशुरामाच्या आदिवासी मित्रांना ममतेने वागविणारी रेणुका ह्या सर्व पुरोगामित्वाचा पुरस्कारच करतात. स्त्रीच्या वाट्याला आलेली कर्तव्ये व जबाबदारी पार पाडून संसारातील तिचे स्थान किती महत्वपूर्ण आहे हे गांधारीचा आदर्श ठेवणारी कांता, द्रौपदीचे उदाहरण देणारी रुक्मिणी, कुंतीचे उदाहरण देणारी उर्मिला यांच्या रुपाने ठायी ठायी व्यक्त केले आहे. 'स्त्री संसाराचा भार वाहताना कुरकुर करेल तिला कांता व माता होण्याचा अधिकार नाही' असे प्रतिपादन कांता करते तर "स्त्रीचे जीवन नदीतील पाण्याप्रमाणे सर्वस्वाने समरस होणारी की वेलीसारखी फक्त आश्रय घेऊन स्वतंत्ररीत्या स्वतः फोफावणारी?" असा प्रश्न अनु उपस्थित करते. "संसार करु" हे विशेषण लावण्यात बहुतेक स्त्रियांना धन्यता वाटते. चंदन तर "सगळ्याच लग्न करणाऱ्या तरुणींचे जीवन अहेतुक व व्यर्थ असते? अकल्याण होते त्यांचे?" असा उघडउघड प्रश्न विचारते. "बुद्धीमत्ता किंवा विद्वता यांच्यापेक्षा स्त्रीत्व हेच मुख्य मानणारी अनघा व कितीतरी वर्षापूर्वीची कांता यांच्या वंश सातत्याबाबतच्या मतांचा माडखोलकरांनी पाठपुरावा केला.

अनेक संकटे, अपमान, घृणा, कोंडमारा सहन करुन वंशसातत्यासाठी व त्यांच्या संगोपनासाठी घटस्फोटाचा आधार न घेता मोठ्या नेटाने संसारात उभ्या राहतात, त्या माडखोलकरांच्या नायिका दुर्बल व खचून जाणाऱ्या कशा असतील? स्त्री ही सृष्टीची खरीखुरी प्रतिनिधी व प्रतीक मानणाऱ्या व संसार ही स्त्रीची 'लीला' मानणाऱ्या माडखोलकरांची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी प्रतिगामी आहे हे विधान किती फोल आहे हे लक्षात येते. ठिकठिकाणी स्त्री जातीची थोरवी व्यक्त करणाऱ्या मातृभक्त माडखोलकरांवरील "ते स्त्रीला तुच्छ मानतात" हा आक्षेप केव्हाच गळून पडतो. कांचनगौरी किंवा रोज सहजतेने संसाराच्या तुरुंगातून मुक्त होऊ शकल्या असत्या. परंतु मुलांच्या हितासाठी व त्यांचेवर सुसंस्कार होण्यासाठी त्या सगळा अपमान, विटंबना मुकाटपणी सहन करत असतात तरीही स्वाभिमानाने राहतात, त्या दुर्बल कशा? एकापेक्षा एक सरस, तेजस्वी, तडफदार व आत्माभिमान सांभाळून संसार करण्याची तारेवरची कसरत करणाऱ्या या नायिका साहित्य प्रांगणात झळकत आहेत. चंदन, सुहास, राणीसाहेब, सत्यभामा, प्रमद्वरा ह्या तर कडाडणाऱ्या बिजली आहेत. स्त्रीत्वाची जबाबदारी कौशल्याने सांभाळणाऱ्या स्त्रिया ह्या खचलेल्या, दुर्बळ असणेच शक्य नाही.

मनोवेधक भाषाशैली हे माडखोलकरांचे साहित्य क्षेत्रातले बलस्थान आहे. इतर कादंबरीकारांच्या स्पर्धेच्या युगात त्यांच्या यशस्वितेचे श्रेय त्यांच्या अत्यंत मनोवेधक नादमधुर व सुललित अशा भाषाशैलीकडे जाते हे निर्विवाद होय. साहित्य सागरातील वेचक शब्दरले पारखून त्यांचे विविध अलंकार माडखोलकरांनी शारदेला अर्पण केले. त्यांची भाषाशैली बहुगुणी, प्रचुर व इंद्रधनुसारखी विविध अर्थ छटा प्रकट करणारी आहे. भाषेवर ज्याचे प्रभुत्व व लेखणीवर ज्यांचा अदम्य विश्वास आहे त्या माडखोलकरांचे शब्दभांडार समृद्ध झाले ते त्यांच्या मातापित्यांच्या जाणीवपूर्वक केलेल्या ज्ञानदानामुळे व संस्कारामुळे.

अनुक्रमणिका

आत्मनिवेदन तसेच सर्वगामी - सर्वसाक्षी अशा दोन्ही पद्धतींचा उपयोग सर्व कादंबऱ्यात आढळतो. दुहेरी जीवन किंवा भंगलेले देऊळ यात आत्मनिवेदनाची अत्यंत सुंदर अभिव्यक्ती आहे. कादंबरीतील पात्रांशी लेखक इतके तन्मय झालेले आढळतात की मुक्तात्मामधील केशव म्हणजे माडखोलकरच होत हे कुणी सांगायला नको. अनघाचा उत्तरार्ध म्हणजे कै. शांताबाईंचा दुसरा अवतार होय हे उघडपणे जाणवते. तसेच व्यक्ती चित्रणे तंतोतंत उतरविण्यात माडखोलकरी लेखणी अधिक यशस्वी ठरली. कांता, सरमहादेव ठाकूर, प्रेमाबाई, मुक्ताबाई, चंदन, रावसाहेब देशमुख, येसू, महाराज, रुक्मिणी, केशव, चंद्रशेखर इ. व्यक्ती आपल्या आसपास वावरताहेत असे वाटावे इतकी सजीवता त्यांना प्राप्त झाली आहे. समुद्राबद्दलचे प्रेम व निसर्गाचे आकर्षण ललितरम्य, भाषेमुळे अधिक उजळून निघालेले दिसते. चंद्र, चांदण्या, नक्षत्रे, ऋतू वनश्री, फुले तसेच नद्या यांचा उपयोग नायक नायिकांच्या बदलत्या मनोवस्थेचे दिग्दर्शन करण्यात झालेला आढळतो. समुद्राचे प्रेम व आकर्षण बालपणीपासूनचे! तो त्यांच्या सोबती, सखा! समुद्राचे विविध प्रकारे वर्णन करण्यात तसेच गोदावरी, नर्मदा, वैनगंगा, तापी इ. नद्यांचे सुहृद वर्णन करण्यात त्यांच्या प्रतिभेचे तळे जणु फुलून आले.

पानेच्या पाने वर्णन करण्यात खर्ची घालण्याऐवजी अत्यंत संयमितपणे मोजक्या व मार्मिक शब्दात नेमका परिणाम साधणारे वर्णन करण्यात माडखोलकरांची कुशलता दिसून येते. नुकतेच वैध्यव्य प्राप्त विकल मनूचे किंवा बाळंतपणाला टेकलेल्या परंतु वैतागलेल्या राधाबाईचे वर्णन याची उदाहरण म्हणून सांगता येतील. सामान्य कथनही लालित्यपूर्ण भाषेत करण्याची त्यांची हातोटी ठिकठिकाणी दिसते. नुसतेच 'पुष्पाक्षता म्हणण्याऐवजी कुंकुमरंजित बेल तुळशी फुले' वर्णन करणे किंवा "तिने हात जोडले, मस्तक नमविले व स्मितसुषमेने विस्फारलेल्या टपोऱ्या डोळ्यांनी सर्वांकडे पाहिले", "लवचिक नृत्यनिपुण तन्वंगाचे मनोहर विभ्रम" "मनुच्या गालावर संध्येची लालिमा, डोळ्यात तारकांची तेजस्विता, केसात क्षितिजाच्या नीलिमा तर भुवयात लाटांची वक्रता अन् हसऱ्या ओठांवर फेसांची शुभ्रता आहे", 'मरणापेक्षा मारक, दहनापेक्षा दाहक', इ. शब्दांच्या लालित्य योजनेमुळे वर्णन अधिक आकर्षक झाले आहे. ज्योत्स्ना, सुषमा, चारुलता, निरुपमा, ललिता इत्यादि नादमधुर लालित्यपूर्ण शब्दांना माडखोलकरांनीच रुढ केले.

नागपूर, विदर्भ, पचमढी, हैद्राबाद इत्यादि ठिकाणची कथानके घेऊन माडखोलरांनी आपल्या पात्रांबरोबर वाचकांनाही विविध ठिकाणी फिरवून आणले. नागपूरच्या विविध ठिकाणचा उल्लेख तसेच वर्धा, अमरावती, बडनेरा, अकोला या ठिकाणची वर्णने वाचून एक आत्मीयता निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. नेहमी पुणे, मुंबई, सोलापूर, कोल्हापूर किंवा कोकण गोवा इथली वर्णने वाचावी लागत. त्या वाचकांना खरोखरीच आगळावेगळा आनंद देण्याची किमया माडखोलकरांनी केली. नागपुरी भाषेलाही स्थान प्राप्त करुन दिले त्यांनी! विविध समस्यांबरोबर संयुक्त महाराष्ट्राचा जयघोष त्यांनी आपल्या कादंबऱ्यामध्येही आपल्या पात्रांकरवी केला. त्यांच्या कादंबऱ्यात किती प्रकारचे स्वामीजी आले आहेत. प्रत्येक स्वामी वेगळा! तसेच मृत्युचे संहार सत्रही त्यांच्या प्रमुख स्त्री पात्रांवर - ललिता, पार्वतीबाई, शामाकुमारी, कांता, चंदन, रंजना, अनघा, सत्यभामा, सती जाणारी रेणुका, काळाने किती विविध तऱ्हेने झडप घालून त्यांना गिळंकृत केले आहे हे माडखोलकरांनी अत्यंत कुशलतेने दाखविले.

अनुक्रमणिका

माडखोलकरांच्या भाषेचे एक मनोरम वैशिष्टय म्हणजे तिचा शांत, भारदस्त व ललित रुबाबदार विलास. या भाषेला वैचारिकतेचे कोंदण व कलापूर्ण अलंकारांची कारागिरी असल्यामुळे या भाषेचे तेज इतके नेत्रदीपक वाटू लागले की त्यापुढे त्यांचे बडे बडे टीकाकारही हतप्रभ झाले.

अनेक समस्या व मौलिक विचार त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून लालित्यपूर्ण, कलेला बाधा येऊ न देता सहजतेने व्यक्त केले. म्हणूनच या कादंबऱ्या उत्कृष्ट व विदग्ध ठरल्या आहेत. हा कादंबरी विभाग त्यांनी इतक्या हळुवारपणे व तरलतेने हाताळला आहे. त्यामुळे त्यांचे स्थान आज शंभर वर्षे होऊनही अबाधित राहिले. ललित साहित्य हे समाज-नौकेचे सुकाणू मानले जाते. या जागेची जबाबदारी उत्कृष्टपणे पेलून उत्कर्षाला हातभार लावणारी साहित्याची जी अमोल देणगी त्यांनी दिली ती सर्वभक्षी काळालाही हिरावून घेता येणार नाही. चिरंजीव साहित्य निर्माण करणारे माडखोलकर ग्रंथरुपाने अस्तित्वात आहेत. आणि हेच, एका कादंबरीकाराचे सुयश होय. त्यांच्या शताब्दी वर्षात त्यांच्या स्मृतीला वाहिलेले हे एक लहानसे पुष्प!

⁕ ⁕ ⁕

अनुक्रमणिका

## | मी पाहिलेली अमेरिका माडखोलकरांचे एक प्रवासवर्णन |

------------------------------------------------------------------डॉ. चंद्रकांत वर्तक

श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांनी अमेरिकन सरकाराच्या निमंत्रणानुसार १९५७ च्या मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात अमेरिकेचा दौरा केला. त्या दौऱ्यात ९० दिवसांमध्ये सुमारे ५४०० मैलांचा प्रवास त्यांनी केला आणि न्यूयॉर्कपासून लॉस एन्जलिससह दोन टोकांमधल्या १२ शहरांमध्ये थोडेफार वास्तव्य केले. त्यामध्ये वॉशिंग्टन ह्या अमेरिकेच्या राजधानीत ते थोडा अधिक काळ ते राहिले. या प्रवासासंबंधी त्यांनी १३ मार्च १९५७ पासून ५ जून, १९५७ पर्यंत लिहिलेल्या पत्रांचे संकलन 'मी पाहिलेली अमेरिका' ह्या पुस्तकात आहे. त्याशिवाय परत आल्यावर त्यांनी अमेरिकेतील वृत्तपत्र व्यवसायासंबंधी जो लेख लिहिला आणि अमेरिकेत आलेल्या प्रवासविषयक अनुभवांसंबंधी 'समारोप' म्हणून जो मजकूर (मुद्रित सुमारे ६५ पृष्ठांचा) लिहिला, तोही ह्या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे. प्रवासपत्रे आणि लेख असे मिश्रण ह्या पुस्तकात आहे. माडखोलकरांनी निवेदनात लिहिले आहे : "प्रवासपत्रांची मूळ हस्तलिखिते किंवा कात्रणे जपून ठेवण्याची काळजी मी घेतलेली नव्हती. 'तरूण भारताच्या' नागपूर आवृत्तीच्या फायलीतील काही अंक गहाळ झालेले होते, व तीन चार प्रवासपत्रेही टपालात बेपत्ता होऊन गेलेली होती. त्याच प्रमाणे १९५६ ते १९६१ या काळात, नागपूर शहरात विदर्भ आन्दोलनाची चळवळ जोरात असताना, माझेघर जाळून टाकण्याचा धमक्या सतत दिल्या जात असल्यामुळे, महत्त्वाचे कागदपत्र, हस्तलिखिते, फोटो वगैरे साहित्य अन्यत्र नेऊन ठेवलेले होते. त्या गडबडीतही काही कागदपत्र आणि छायाचित्रे नाहीशी झाली. - - - - नागपूर आणि पुणे या 'तरूण भारता' च्या दोन्ही आवृत्तींच्या फायलींचा उपयोग करून हे पुस्तक अखेर तयार करावे लागले. - - - - - तरी सुद्धा सगळी प्रवास पत्रे, प्रवास विषयक लेख किंवा छायाचित्रे त्यात आलेली आहेत, असे म्हणता येणार नाही. विशेषतः सानफ्रांसिसको, लॉस एन्जेलिस आणि न्यूयॉर्क या तीन शहरांसंबंधीची माझी प्रवासपत्रे टपालातच मुळी गहाळ होऊन गेलेली होती. त्यामुळे त्या प्रमुख शहरासंबंधी फारशी माहिती या पुस्तकात येऊ शकली नाही. हे मोठेच वैगुण्य होय" - (निवेदन, पृ. १ व २) हा मजकूर उपलब्ध झाला असता तर ह्या पुस्तकाच्या परिपूर्णतेत भर पडली असती.

माडखोलकरांनी आणखी एक गोष्ट त्यांच्या बाजूने नोंदवली आहे. ते म्हणतात :

"हे पुस्तक म्हणजे प्रवासवर्णन नव्हे, तर अमेरिकन सरकारने- - - - माझ्या प्रवासा संबंधी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या, तदनुसार आणि माझ्या स्वतःच्याही काही कल्पनानुसार मी अमेरिकेत केलेल्या निरीक्षणाचे, चर्चेचे आणि चिंतनाचे हे संकलन आहे. - - - - - -

माहिती देण्याच्या, निष्कर्ष काढण्याच्या आणि विधाने करण्याच्या बाबतीत मी पराकाष्ठेची काळजी घेतलेली आहे. रोजनिशी किंवा टिपणे करण्याची सवय मला अजिबात नाही पण- - - - मी दिनक्रमाचे आणि प्रमुख व्यक्तिंशी केलेल्या संभाषणांचे टिपण त्या त्या दिवशीच करीत गेलो, व - - - - - पाहिलेल्या संस्थांचे आणि व्यक्तींचे स्मरण मनात अगदी ताजे असताना ही प्रवासपत्रे लिहिली. इतकेच नव्हे तर काही संभाषणांची टिपणे त्याच दिवशी त्या त्या व्यक्तिंना दाखवून त्यांच्याकडून मंजूरही करुन घेतली. त्यामुळे या पुस्तकात

अनुक्रमणिका

अनधिकृत अशी माहिती किंवा विधान आलेले नाही, असे मी निःशंक मनाने म्हणू शकतो." (निवेदन, पृ. १ ते ३)

माडखोलकर ह्या पुस्तकाला प्रवासवर्णन असे का समजत नाहीत ते कळत नाही. कारण

प्रवासवर्णनकाराने, आपल्या स्वतःच्या शरीराने आणि मनाने केलेल्या प्रवासाचा, प्रवासात घेतलेल्या, आलेल्या अनुभवांचा आणि मनावर स्थळादी गोष्टींच्या झालेल्या संस्कारांचा स्मृतिरूपाने केलेला जागर- स्मृतिरू पाने घेतलेला पुनर्शोध शब्दरूपात सजीव करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे प्रवासवर्णन –

असे जर असेल तर माडखोलकर ह्या पुस्तकाला प्रवासवर्णन म्हणत नसले तरी प्रवासवर्णनच ठरते. माडखोलकरांचेच म्हणणे येथे पुन्हा उद्धृत करता येईल. ते लिहितात :

"भारताचा प्रवास तीन किंवा चार आठवड्यात वायुगतीने करून अमेरिकन प्रवासी आमच्या देशावर सचित्र आणि विचित्रही जाडजूड ग्रंथ लिहून मोकळे होतात. इतकेच नव्हे, तर त्या ग्रंथात त्यांचा आव आणि ऐट अशी असते की भारताचे संपूर्ण आकलन आपल्याला झाले आहे. अशा ऐटीने आणि उतावळेपणाने ग्रंथ लिहिण्याची पद्धत आपल्या देशात अद्याप रूढ झालेली नाही, हे मी सुदैव समजतो. तथापी, संयुक्त संस्थानातील या बारा शहरांत जे वास्तव्य मी केले आणि त्याहिपेक्षा त्या शहरातील निरनिराळ्या जमाती, संस्था, पक्ष, वृत्तपत्रे, विद्यापीठे, चर्चेस, कार्यकर्ते इत्यादिकांचे अवलोकन करण्याची जी संधी मला मिळाली, तिच्यामुळे अमेरिकेच्या राष्ट्रीय जीवनाच्या काही अंगांची मला चांगली माहिती झाली, असे मी खात्रीने म्हणू शकतो." ( पृ. २४२ - २४३)

त्यामुळे त्यांना आलेल्या अनुभवांचे दर्शन घडवताना त्यांची प्रवासी म्हणून आणि प्रवासवर्णनकाराची म्हणून असलेली भूमिका उथळ, वरवरची नसून तीमागे चिंतनशीलता आहे. अनधिकृतता नाही हे तर ते स्वतः म्हणतातच. त्यांचे हे प्रवासवर्णन वाचताना, वाचकालाही, माडखोलकरांचे अनुभव, आपल्याला येऊन भिडताहेत हे स्पष्टपणे जाणवते. त्यांच्या प्रवासवर्णनाचे तीन स्तर आपल्या लक्षात येतात. एक स्तर म्हणजे विमानाचा केलेला प्रवास - त्यातील लाक्षणीय अनुभव; दुसरा स्तर माडखोलकर ज्या ज्या व्यक्तींना भेटले त्यांच्याबद्‌दलचे अनुभव आणि अमेरिकन वृत्तपत्राचे स्वरुप (ते बहुशः वृत्तपत्राशी संबंधित अशा व्यक्तींना भेटले.) तिसरा स्तर निग्रो, रेड इंडियन्स जमातींबद्दल त्यांचे चिंतन आणि एकूण अमेरिकेच्या जीवन प्रणालीचा त्यांना आलेला अनुभव हयांचा! एकवैगुण्य ह्या प्रवासवर्णनात आढळते, ते म्हणजे ते कुठल्याच स्थळाचे वर्णन करीत नाहीत. प्रवासात माणूस स्थळे बघतो. माडखोलकरांनीही ती पाहिली आहेत; पण त्या स्थळांची काहीशी उपेक्षाच त्यांनी केली. जेथे ते स्थळाचे वर्णन करतात, तेथे ते अगदी त्रोटक वर्णन करतात. उदाहरणार्थ :-

"- - - नायगाराचा धबधबा हा मला सामान्य दर्जाचा वाटला. या धबधब्याच्या दोन प्रपातांची खोली अनुक्रमे १५८ आणि १६७ फूट इतकीच जास्तीत जास्त आहे. उलट आपल्या देशातल्या गोकाक येथील घटप्रभा नदीच्या धबधब्याची खोली १७० फूट असून, गिरसप्पा येथील शरावतीच्या धबधब्याची खोली तर ८४३ फूट आहे. त्याचप्रमाणे जबलपूर नजीक भेडाघाट येथे नर्मदेच्या प्रपाताचे जे वैचित्र्यपूर्ण सौंदर्य दृष्टिस पडते, त्याच्या

पुढे नायगाराचा फवारा किंवा धुवार हे काहीच नाहीत. पण अमेरिकन सरकारची प्रसिद्धीपटुता, प्रवासाच्या अद्ययावत सोयी आणि त्या धबधब्यावरील प्रणयप्रचुर बोलपटाने त्याच्याविषयी जागृत केलेले बेसुमार कुतूहल यामुळे रोज शेकडो प्रवासी हा धबधबा पहायला जातात; व त्यांपैकी बरेच मनातल्या मनात खजील होऊन परत फिरतात. निदान मी ज्या ज्या प्रवाश्यांशी या धबधब्याबद्दल बोललो, त्या त्या प्रवाश्यांनी तरी आपला अपेक्षाभंग झाल्याचे मला प्रांजळपणाने सांगितले. ---"

या धबधब्याच्या मानाने ग्रँड केनियन निस्संशय प्रेक्षणीय आहे. ग्रँड केनियन ही अमेरिकेतील कोलोरॅडो नदीने आपल्या प्रपाताने आणि प्रवाहाने निर्माण केलेली २०० मैल लांब, ११ मैल रुंद आणि १ मैल खोल अशी प्रचंड दरी आहे. या दरीतील प्रस्तरांचे रंगवैचित्र्य आणि तिच्या निरनिराळ्या थरांची शोभा खरोखरीच आश्चर्यकारक आहे. पण या दरीला मी अद्‌भूत किंवा अपूर्व म्हणावयाला मात्र तयार नाही. कारण, हिमालयात अशा अनेक दऱ्या असून खुद्द सह्याद्रीत महाबळेश्वर आणि प्रतापगड यांच्या दरम्यान असलेल्या दऱ्याही ग्रँड केनियनची काही बाबतीत बरोबरी करतील, अशा आहेत. फरक एवढाच की या दऱ्यांची जाहिरात भडक अमेरिकन पद्धतीने करण्यात आलेली नसल्यामुळे व त्या पाहण्यासाठी अवश्य त्या प्रवासाच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे ग्रँड केनियन सारखी त्या दऱ्यांची प्रसिद्धी जगभर झालेली नाही." ( पृ. २०४-२०५) - (येथे पु. ल. देशपांडे ह्यांनी त्यांच्या 'जावे त्यांच्या देशा' (१९७४) मध्ये 'नायगाराचे' केलेले वर्णन तसेच गंगाधर गाडगीळ यांनी 'नायगाराचे नादब्रह्म' (१९९४) मध्ये केलेले 'नायगारा' आणि 'ग्रँड केनियन' चे वर्णन वाचले तर व्यक्तीपरत्वे रुचिवैचित्र्य व भिन्न दृष्टि असू शकते हे लक्षात घेऊ न ही माडखोलकरांच्या वर्णनातला त्रोटकपणा लक्षात येईल. माडखोलकरांच्या प्रतिभेचा पिंड जितका पत्रकाराचा तितकाच ललितलेखकाचाही आहे. त्यांना ललितलेखनाशी नाते सांगणारे स्थळ वर्णन सहज करता आले असते - अगदी त्यांनी पाहिलेली स्थळे त्यांना न आवडूनही! पण जणू आपण अमेरिकेत ज्या उद्देशाने आलो आहोत, त्यामध्ये असे लेखन बसत नाही. हे त्यांच्या मनाने घेतले असेल. ह्या गोष्टीला पूरक असा प्रसंग त्यांच्या प्रवास वर्णनात आला आहे. एफ. बी. आय. च्या डिपार्टमेटं ऑफ डिफेन्स ह्या खात्याचे डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशन मि. स्कली कॉफी पित असताना बोलता बोलता माडखोलकरांना त्यांच्या कादंबऱ्यांबद्दल (राजकीय) विचारतात, तसेच आपल्या कादंबऱ्यांतील राजकारणाबद्दल काही सांगाल का? अशा त्यांच्या प्रश्नांवर ते "हे पहा, मि. स्कूली, मी जो आज येथे आलेलो आहे, तो पत्रकार म्हणून, कादंबरीकार म्हणून नव्हे! शिवाय संरक्षण खात्याच्या या कचेरीत साहित्याची चर्चा करणे अप्रशस्त ठरेल असे मला वाटते," असे म्हणून त्यांना झटकून टाकतात. (पृ. ५७) तत्त्वतः माडखोलकरांचे म्हणणे अयोग्य नाही. पण अमेरिकेबद्दलचे पुस्तक लिहिताना स्थळवर्णनात त्रोटकता येण्यामागे त्यांचे पत्रकारपण आड यायला नको होते. नाही म्हणायला वॉशिंग्टन बद्दल त्यांनी जे लिहिले आहे, ते अपवाद म्हणून मानायला हवे. लाफान्त ह्या फेंच इंजिनियराने वॉशिंग्टनची शहररचना कशी केली हे ते समरसून सांगतात. तिथले प्रशस्त रुंद रस्ते, पोटोमॅक नदीकाठची कुरणे, रॉक ग्रीक पार्क, उपाहारगृहे, हेन्स पॉइंटपाशीच्या तरूण जोडप्यांच्या प्रणयलीला, तिथली हवा बंद घरे, दुकाने, स्वच्छता, लोकांचा प्रामाणिकपणा- अगदी 'हॉटेल प्रेसिडेन्शियल' मध्ये राहायला लागल्यानंतर तिथल्या खोलीतील सुखसोयी इ. बद्दल ते दिलखुलासपणे वर्णन करतात. अमेरिकेला येताना वाटेत ते रोमला काही तास थांबले होते व अतिशय धावतेपणाने त्यांनी रोम '(व्हॅटिकन सिटी, कलोसियम, सेण्ट पीटरचे चर्च इ. वास्तू) पाहिले आणि त्याचा संस्कार त्यांच्या मनावर उमटला. वॉशिंग्टनचाही त्यांच्या मनावर संस्कार झाला होताच. दोन्ही शहरांबद्दल ते मोठी मार्मिक कळीची वाक्ये लिहून जातात - "रोमचे एकमेव वैशिष्टय 'सौंदर्य' हे सांगता येईल; तर वॉशिंग्टनचे

'ऐश्वर्य' हे ( पृ. ३६); "रोमचे सौंदर्य अभिजात आणि कलापूर्ण, तर वॉशिंग्टनचे उपयुक्तताप्रधान आणि यांत्रिक आहे. शिल्पशास्त्राच्या दृष्टीने सुंदर म्हणता येतील अशा काही दहा इमारतीसुद्धा या राजधानीत दाखवता येणार नाहीत." (पृ. ५३) त्यांना वॉशिंग्टनमधले नाविकांचे असलेले स्मारक अधिक कलात्मक, अधिक रोमांचकारी वाटल्याचे ते लिहितात- असे वर्णन वाचताना त्यांचा ललित लेखकाचा पिंड आपल्याला प्रकर्षाने जाणवतो आणि असेच लालित्यपूर्ण वर्णन इतर शहरास्थळांचे त्यांनी केले असते तर ह्या पुस्तकाचे मोल अधिक वाढते - सनफ्रान्सिस्को, लॉस एन्जेलिस, न्यूयॉर्क ह्या शहरांबद्दलची त्यांची प्रवासपत्रे टपालात गहाळ झाली हे वाचून अधिक रुखरुख लागून राहते. अटलाण्टा, अल्बुकर्की, वुइंडो रॉक, फिनिक्स, शिकागो, अल्बनी अशा शहरांची जुजबी वर्णने वाचल्यावर, ती रुखरुख अधिकच वाढते. कारण माडखोलकरांच्या विचक्षणी दृष्टीला हया शहरांची नस नक्कीच गवसली असणार! वर उद्धृत केलेली कळीची वाक्ये हीच गोष्ट स्पष्ट करतात. माडखोलकरांना स्वतःलाही ही जाणीव झाल्यामुळेच बहुधा त्यांनी ह्या पुस्तकाला 'प्रवास वर्णन' नसल्याचे म्हटले असावे.

वॉशिंग्टनहून लिहिलेल्या पहिल्या तीन पत्रांत माडखोलकर त्यांच्या विमानातील प्रवासाचे वर्णन करतात. कदाचित १९५७ साली त्यांनी केलेला हा इतका लांब पल्ल्याचा विमान प्रवास पहिलाच असेल. त्यामुळे त्यावर्णनात एक प्रकारची नवखेपणाची भावना दिसते, त्याचबरोबर वाचकांपैकी कुणाला परदेशात विमानाने जाण्याचा योग आला तर त्याला वाचता वाचता आपोआपच काही माहिती हवी असाही एक उद्देश असावा असे जाणवते. त्यामुळे 'पर्सर' आणि 'होस्टेस' ही विमानातील दुकल म्हणजे सर्व उतारुंची 'यजमान' आणि 'यजमानीण'! मात्र ती पति- पत्नी नव्हते!!" ( पृ. २) असे वाक्य येते. विमानात 'एअर सिकनेस' येतो, विमान लागते तेव्हा तसेच सामान ठेवताना एअर होस्टेस कशी मदत करते हे ते सांगतात. विमानात दर तीन तासांनी काही ना काही खायला देतात, ते फ्रिजमध्ये ठेवलेले किंवा हीटमध्ये ठेवलेले असते. त्या अन्नाचा गंध, रुची ठरलेली! सर्व पेये कागदी चषकातून दिल्याने उष्ट्याचा प्रश्न येत नाही. येथेही कळीचे वाक्य येते - "विमानाचा कॅप्टन हा जसा त्याच्या (प्रवाशाच्या आणि विमानाच्या) सुरक्षिततेचा आधारस्तंभ, तशी होस्टेस ही त्यातील (विमानातील) सुखसोयींची शिराणी" (पृ. ४) विमानतळावरच्या सुखसोयी, विमानातील सहप्रवासी (जयवंत दळवी, चंद्रकांत किर्लोस्कर इ.) इ. चा उल्लेख येतो. धर्रानला विमान थांबल्याबरोबर पत्रकारांशी घनिष्ट नाते सांगणारे "धर्रान.... संपूर्ण पश्चिम आशियातील शहरात हे सर्वात मोठे तेल केंद्र" (पृ. ६) असे त्यांचे वाक्य येतेच. पाश्चात्यांचे स्वभावविशेष, आचारवैचित्र्य त्यांची नजर टिपतेच. युरिनलपुढे निस्संकोपचपणे गप्पा मारणे, भल्या पहाटे ३-४० वाजता गॅण्डर विमानतळ आल्यावर आता पुढच्या टप्प्यात अमेरिका- न्यूयॉर्कच म्हणून पाश्चात्य उतारुंची दाढी करण्याची, पोषाख बदलण्याची उडालेली धांदल इ. गोष्टी ते टिपतात. त्याच बरोबर पाण्याचा उपयोग न करता कागदानेच उर्ध्वरंध्रर, अधोरंध्र साफ करण्याची त्यांची पद्धत जाणवून माडखोलकरांना अतिशय शिसारी आल्याचेही ते लिहितात. १५, ००० फूट उंचीवरुन विमानाचे भ्रमण व खालचे, आजूबाजूचे काहीही न दिसणे पण अथेन्सजवळ सागरदर्शन हे ते मोठे विशेष म्हणून सांगतात. अटलांटिक महासागराचे अंतरही त्यामध्ये येते.



**श्री. भाऊराव - श्री. मधुकर चौधरी व श्री. राजाराम हुमणे**

अनुक्रमणिका

रोममध्ये त्यांचा छोटासा मुक्काम होतो-तेवढ्या अल्प वेळात ते (व दळवी) रोममधली ठळक ठळक ठिकाणे बघून घेतात. सेंट पीटरचे चर्च पाहतानाचे वर्णन करताना त्या चर्चचा इतिहास (माडखोलकरांची इतिहासाची आवड येथे उसळून वर येते.) सांगतात, राफेल, मायकेल अँजेलो, बर्निनी प्रभृतींची शिल्पकला तेथे नांदते १२० वर्षे त्या मंदिराचे बांधकाम चालू होते इ. तपशील त्या वर्णनात येतो. आपोआप मायकेल अँजेलोने शिल्पिलेल्या मोझेसच्या पुतळ्याचे सौंदर्य व सजीवपण त्याला स्वतःलाच इतके उत्कटपणे जाणवते की तो "अरे, तू, बोलत का नाहीस? "असा प्रश्न त्या पुतळ्याच्या गुडघ्यावर छिन्नी मारून विचारतो- त्या गुडघ्याला झालेली छिन्नीची जखम पाहता पाहता माडखोलकर आपल्याला ही कथा सांगतात. तिथल्या अनेक मूर्ती पाहून हिंदूंना मात्र मूर्तीपूजक अशी नावे का ठेवतात हा प्रश्नही त्यांच्या मनात येतो. 'दि फाऊन्टन ऑफ दि फोर रिव्हर्स' हे कारंजे त्यांना अतिशय आवडते. त्याबद्दलची कारंजातून पाणी उसळण्याची पोप आणि शिल्पकार बर्निनी ह्यांची कथाही लागोलग ते सांगतात. त्यांचे इतिहासप्रिय मन रोम पाहता पाहता उद्‌गारते- "यातही काही नवल नाही की सायंसूर्याच्या प्रभेने उजळलेले रोमचे प्राचीन भव्य अवशेष पाहून गिबनला रोमन साम्राज्याच्या अधःपाताचा इतिहास लिहिण्याची स्फूर्ती व्हावी आणि शेलेला रोमच्या कलापूर्ण ऐतिहासिक भूमीत आपला देहपात होण्याचा ध्यास लागावा- - - - - रोम या पुरातन पवित्र नगरीने मात्र आपले आल्हाददायक, उदात्त, सौंदर्य, सर्वभक्षक काल आणि आततायी आक्रमक यांच्या आघातांना किंवा परस्परविरोधी धर्म आणि संस्कृती यांच्यातील संघर्षांना दाद न देता, गेली अडीच हजार वर्षे शाश्वत ठेवलेले आहे!" (पृ. २५)

वर्णनाचे हे स्वरुप लक्षात घेतले तर 'मी पाहिलेली अमेरिका' हे पुस्तक त्याच्या नावापासूनच प्रवास वर्णन ठरते ही गोष्ट निश्चित! त्या वर्णनातील वर उल्लेखिलेल्या त्रुटी लक्षात घेऊनही!

माडखोलकरांना अमेरिकेच्या भेटीचे निमंत्रण येण्या मागचे उद्देश म्हणजे अमेरिकेतील वृत्तपत्र व्यवसायाची कल्पना घेणे आणि एकूण अमेरिकन जीवनपद्धती अनुभवणे हे होते. असे निमंत्रण आपल्याला आले ह्याचेच आश्चर्य माडखोलकरांना वाटले. कारण 'तरूण भारत' अमेरिकाधार्जिणा कधीच नव्हता- उलट अमेरिकेचे सातत्याने पॅसेफिक महासागरात चाललेले अणवस्त्राचे प्रयोग आणि अमेरिकेचे भारत विषयक धोरण हे 'तरूण भारताच्या' टीकेचे लक्षच होते. त्यामुळे निमंत्रणाची किंवा अमेरिकेला जाण्याची ओढ मनात असणे असे माडखोलकरांबाबत संभवतच नव्हते. पण मग निमंत्रण आले. तेव्हा सहाजिकच ह्या प्रवासवर्णनाचा भर ह्या उपरोक्त दोन उद्देश्यांची पूर्ती कितपत झाली हे सांगण्याचा आहे. अमेरिकन वृत्तपत्र व्यवसायाशी निगडीत अशा अनेक माणसांशी त्यांच्या भेटी-मुलाखती झाल्या. त्या वृत्तपत्रांचे स्वरूप इ. चा अंदाज घेताना महाराष्ट्रातील वृत्तपत्रव्यवसायाशी थोडीफार तुलना त्यांनी करून पाहिली. राष्ट्रध्यक्ष आयझेनहोअर आणि परराष्ट्र मंत्री डलेस त्यांच्या पत्रकारपरिषदांना ते हजर राहिले. त्या पत्रकारपरिषदा त्यांना कशा वाटल्या ह्यांचे त्यांनी वर्णन केले. हे सगळे लिहिताना त्यांच्या मधला वृत्तपत्रांचासंपादक (म्हणजे पत्रकारच) सतत जागा होता आणि त्याचवेळी त्या पत्रकाराचे माडखोलकरांच्या ललितलेखक नामक व्यक्तिमत्त्वाशी अद्वैत झालेले होते. ते ज्यांना भेटले त्यात जसे गोरे अमेरीकन पत्रकार होते, तसे निग्रो पत्रकारही होते. त्यामुळे त्यांना अमेरिकन वृत्तपत्रसृष्टीचे यथार्थ असे जवळून दर्शन घडले.

अनुक्रमणिका

माडखोलकर अमेरिकेस गेले तेव्हा भारतात मालक पत्रकार आणि श्रमिक पत्रकार असे द्वैत निर्माण झाले होते. श्रमिक पत्रकारांच्या मागण्यांमध्ये वेतन ते अधिकार अशा विविध स्तरावरच्या मागण्यात होत्या. माडखोलकर हे स्वतः संपादक होते - 'तरुण भारता' चे ध्येय धोरण, व्यवस्थापन इ. मध्ये त्यांचा सहभाग होता. ते तसे श्रमिक पत्रकार नव्हते. त्यामुळे येथील सरकारने श्रमिक पत्रकारांसाठी आयोग नेमून त्यांच्या मागण्यांचा विचार केला व श्रमिक पत्रकार कायदा तयार करुन देशातील सर्व वृत्तपत्रांना तो लागू केला. साखळी वृत्तपत्रे, जिल्हा वृत्तपत्रे, तालुका वृत्तपत्रे असे त्यांचे स्तर कल्पून त्या त्या स्तरावरचे वेतन प्रमाणिक केले होते. हे ते सांगतात. माडखोलकरांना त्या त्या वृत्तपत्राचे व्यवस्थापक (मालक) व श्रमिक पत्रकार ह्यांनी त्या त्या स्तरावर आपापसात बोलणे करुन प्रश्न सोडवावे असे वाटत असावे. भारतात झालेल्या ह्या श्रमिक पत्रकारांबाबतची कायद्याची माहिती अमेरिकन वृत्तपत्रकारांना झालेली होती. त्यामुळे ते व माडखोलकर ह्यांचे ह्या विषयावर बोलणे स्वाभाविकच वळायचे. सामान्यतः अमेरिकन माणसाला स्वातंत्र्य अधिक प्रिय असल्याने वृत्तपत्रक्षेत्रातील ट्रेड युनियनिझम (तेथे श्रमिक पत्रकारांचे गिल्ड आहे) रुचत नव्हतं - ह्यात अमेरिकन पत्रकारही आला - बोलणे ह्या विषयाकडे वळले की माडखोलकर त्या देशातल्या वृत्तपत्रकारांचे म्हणणे, स्वतःचे मत प्रदर्शित न करता ऐकून घ्यायचे. त्या वृत्तपत्रकाराला भारतात हा कायदा झाला हेच विचित्र वाटायचे. पत्रकारांच्या (मालक व पत्रकार) दुहीचे प्रदर्शन होऊन त्या दुहीचा फायदा सरकार घेईल अशी भीती त्याला वाटे. आपापसात वाटाघाटी करुन त्या त्या वृत्तपत्राने प्रश्न सोडवावे- अमेरिकेत गिल्ड असे प्रश्न सोडवत असते, असे 'वॉशिंग्टन पोस्ट' ह्या दैनिकाचे एक्झिक्युटिव्ह एडिटर जेम्स रसेल विगिन्स माडखोलकरांना सांगतात.

जेम्स रसेल विगिन्स ह्यांच्याशी बोलताना 'वॉशिंग्टन पोस्ट' ची सर्व प्रकारची माहिती, पृष्ठ संख्या, खप (दैनिक व रविवार), विविध सदरे, माडखोलकर घेतात (पर्यायाने वाचकालाही देतात) 'वॉशिंग्टन पोस्ट' हे अमेरिकन सरकारवर सणसणीत टीका करणारे असल्याने सरकारात प्रिय नव्हते. विगिन्सच्या मते प्रत्येक दैनिक मुख्यत्वे स्थानिकच असते. न्यूयॉर्क टाइम्स जगभर जात असला तरी त्याचा न्यूयॉर्क मध्येच अधिक खप आहे. असेच प्रत्येक दैनिकाचे असते. एक्झिक्युटिव्ह एडिटर स्वतः लिहीत नाही (मॅनेजिंग एडिटर न्यूज व इतर सेक्शन्स पाहतो) पण स्वतःला योग्य त्याप्रमाणे संपादकीय व इतर लेखन करुन घेतो.

ते अटलाण्टाला जातात तेव्हा 'दि अटलाण्टा कॉन्सिटट्यूशन' च्या राल्फ मॅकगिल ह्या संपादकांना भेटतात. मॅकगिल दोनदा भारतात येऊन गेलेले होते. तेही श्रमिक पत्रकारांसाठी कायदा नको असे म्हणतात. ते साध्या रिपोर्टर (वार्ताहर) पासून 'संपादका' पर्यंत स्वतःच्या मेहनतीने चढत गेले. त्यांना भारताचे तटस्थ परराष्ट्रीय धोरण योग्य वाटत होते. वयाने ५९ वर्षांचे ते ३७ वर्षे वृत्तपत्र व्यवसायात होते. 'दि अटलाण्टा जर्नल' हे सायं दैनिकही चालवत आणि रविवारी दोघांचा एकत्र १८० पृष्ठांचा अंक निघायचा. पाच लाखाचा खपहोता. ह्या दैनिकाच्या दिवसात ५ आवृत्त्या निघत. संपादकीय लिहिणारे ६, रिपोर्टर्स २९ आणि इतर विभाग सांभाळणारे ७५ इतके मोठे खटले त्या वृत्तपत्राचे होते. माडखोलकर भेटले त्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांच्यावर एक कॉलम प्रसिद्ध झाला. मॅकगिल आणि माडखोलकर ह्यांची मैत्रीच झाली आणि त्यांच्याबरोबर ते चार दिवस राहिले.

मॅकगिल यांनीच त्यांची ‘अटलाण्टा डेली वर्ल्ड’ ह्या निग्रो दैनिकाचे संपादक (मॅनेजिंग एडिटर) श्री. विल्यम गॉर्डन हयांची भेट करुन दिली. त्या दोघांना मोकळेपणाने बोलता यावे म्हणून ते त्यांचा निरोप घेऊन गेले. हे निग्रो दैनिक मोठ्या जिद्दीने निग्रोंसाठी चालवलेले होते. त्याचा खप २५००० होता. त्याची कचेरी अगदी तुटपुंज्या जागेत होती. गॉर्डन हे निग्रोंच्या प्रश्नांबाबत अतिशय हळवे होते. माडखोलकर भेटले तेव्हा ते अतिशय कामात होते, म्हणून दुसऱ्या दिवशी (रविवारी) ते वेळ काढून माडखोलकरांना भेटले व त्याचे चार पाच तास बोलणे निग्रोंच्या भवितव्याबद्दलच झाले, त्यामुळे माडखोलकरांना निग्रो समस्येचे अतिशय जवळून सम्यक दर्शन झाले.

त्यांनी दोन पत्रकार परिषदा पाहिल्या व ऐकल्या. त्या परिषदात ते रमले आहेत. आयझेनहोअर हयांच्या पत्रपरिषदेचे ते असे वर्णन करतात,

“श्री आयझेन होअर..... पत्रपरिषदेत त्यांच्या डाव्या हाताला बसलेले त्यांचे उंचेपुरे प्रेस सेक्रेटरी श्री. जेम्स हॅगर्ती यांच्या मानाने तर अगदीच उणे वाटले. वर्ण लाल गोरा. डोळे बारीक पण मर्मभेदी, भुवयांपासून टाळूपर्यंत उभ्या आडव्या सुरकुत्या पडलेले तकतकीत टक्कल, बोलताना आवेशाने उडणाऱ्या लाल लाल कानशिलांवरल्या तडतडीत शिरा आणि वार्ताहरांच्या हास्यकल्लोळात सामील होताना क्षणार्धात चेहऱ्यावर खेळणारी प्रसन्नता! - नवल नाही, अमेरिकन जनतेला हा उमदा शिपाई इतका प्रिय व्हावा.” (पृ. ८८)

त्यांना पत्रकार सटासट प्रश्न विचारीत होते. अंदाजपत्रकाबाबत त्यांना फारच छेडले गेले. वीस-पंचवीस मिनिटे ही प्रश्नोत्तरांची झटापट चालली. तोच तोच प्रश्न विचारणाऱ्या एका चिवट वार्ताहराला आयेझेन होअर म्हणाले, “आपण तज्ज्ञ दिसता मला! आपण काँग्रेसचे सदस्य असतात, तर मी कमिटीवर घेतले असते आपल्याला! पण सद्यःस्थितीत तुमचाही उपाय नाही, माझाही नाही!”, तेव्हा एकदम हंशा पिकला व त्यात राष्ट्राध्यक्ष सामील झाले. एका वार्ताहराने “तुम्ही निव्वळ लष्करी दृष्टीचे गृहस्थ असल्यामुळे संरक्षणावर फाजील खर्च आकारला आहे तुम्ही!” तेव्हा ते हसून उद्‌गारले, “खरी गोष्ट! मी जातिवंत शिपाई असल्यामुळे माझ्या नजरेला धोक्याच्या जागा आणि संभव लगेच येतात. पण तुम्ही पत्रकार! तुमच्या काकदृष्टीला फक्त टीका स्थळे तेवढीच दिसतात! आपण ज्या वेगवेगळ्या जागांवर बसलेले आहोत, त्यांचा परिणाम आहे हा?”, ह्या उत्तराबरोबर मोठा हंशा पिकला व त्या हास्यकल्लोळात पत्रकार परिषद संपली.

पत्रकार एकमेकांना, “He is a fine fellow! तुम्हाला कसे फजित करावे हे ते चांगले जाणतात! पण तुम्ही त्यांना फजित केलंत, तरीही ते चिडत नाहीत ते!” असे म्हणत होते. (पृ. ९३)

पत्रकारांना खूप स्वातंत्र्य तेथे असते हे माडखोलकरांच्या लक्षात आले, ते आणखी एका प्रसंगाने! –

आयझेनहोअर त्यांच्या गेटिस्बर्गच्या शेतबंगल्यावर जाताना त्यांच्या ड्रायव्हरने वेगमर्यादा ओलांडली व भरधाव गाडी चालवली. त्यावेळी पोलिसांनी हटकले नाही पण मागाहून वार्ताहरांच्या गाडीला त्याच वेगाने जावे लागल्यावर पोलिसांनी त्यांना हटकले - वेग कमी करायला लावला. हयावर वादळ उठले. पोलिस प्रमुख “माझ्याहून अध्यक्ष बडे आहेत!” असे त्यांना जाब विचारल्यावर म्हणाले. न्यूयॉर्क टाइम्सने 'Too fast, Mr.

President!' ह्या मथळ्याचा अग्रलेख लिहून अध्यक्षांवर टीका केली. वेगमर्यादेचा कायदा मोडल्याबद्दल पूर्वीचे अध्यक्ष श्री. ग्रँट व श्री. ट्रमन यांना दंडाची शिक्षा झाल्याची आठवण करुन दिली. सिनेटर्सनीही वेगाच्या दुटप्पीपणाबद्दल (कायद्याच्याही) झोड उठवली.

डलेसच्या पत्रपरिषदेत पत्रकारांनी त्यांना बर्म्युडा बैठकीबद्दल अतिशय छेडले. राष्ट्राध्यक्षांप्रमाणे विनोद न करता गंभीरपणाने ते उत्तरे देत होते. डलेस हया त्यांच्या नावावरुन पत्रकार ते 'hopelessly dull आहेत' अशा कोटी करीत राहिले. (पृ. ९४)

अशा भेटींमध्ये इंडिया डेस्क ऑफिसर 'हॅरॉल्ड जोसिफ', इंडियन अफेअर्सचे मुखय 'रॉबर्ट ॲण्डर्सन', निअर ईस्ट, साऊथ एशिया आणि आफ्रिका खात्याचे डेप्युटी असिस्टंट सेक्रेटरी 'लॅम्प्टन बेरी', सिनेट मायनॉरिटी लीडर 'विल्यम नोलँड' (ह्यांनाच माडखोलकरांच्या डोक्यावरची गांधी टोपी पाहून राग आला), नॅशनल प्रेस क्लबचे अध्यक्ष श्री. ग्रँट, प्राच्यविद्याविशारद वॉल्टर हार्डिंड, माऊरर, सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश न्या. विल्यम डग्लस (हे गिर्यारोहक होते. त्यांनी हिमालयावर पुस्तक लिहिले होते. कलकत्ता युनिव्हर्सिटीत टागोर व्याख्यानमालेत त्यांची व्याख्याने झाली होती. त्यांच्या टेबलावर गांधी टोपी तसोच गिर्यारोहकाची टोपी ठेवलेली होती) अशा अनेकांच्या भेटी होत्या.

अमेरिकन वृत्तपत्रव्यवसायाच्या संदर्भात माडखोलकरांच्या लक्षात बऱ्याच गोष्टी आल्या - तिथेही श्रमिक पत्रकार आहेत. त्यांची संघटना आहे. (गिल्ड)! श्रमिक पत्रकारांच्या संरक्षणासाठी अमेरिकत सरकारने कायदा करावा हे तिथे कुणालाही वाटत नाही. संघटना प्रश्न सोडवू शकते. संघटनेचे 'दि गिल्ड रिपोर्टर' नावाचे साप्ताहिक आहे. संघटनेच्या १०० शहरात शाखा आहेत. सदस्यांकडून वर्गणी म्हणून लक्षावधी डॉलर्स संघटनेला मिळतात. पत्रकारांबरोबर वृत्तपत्रातील कमर्शियल भागाकडचे लोकही सदस्य होऊ शकतात. स्त्री मात्र सदस्य होउ शकत नाही. तसेच सुपरवायझरी अधिकार (एखाद्याला कामावर नेमण्याचा व कामावरुन काढण्याचा अधिकार असलेला) असणाऱ्यास सदस्य होता येत नाही. सरकारी नोकर सदस्य होतात, पण सरकारला ते सरकारी गुपिते फोडतील असे वाटत नाही. तसे काही गुप्त कळले तरी त्याला जाहीर वाच्यता न देण्याची खबरदारी घेतली जाते. पत्रकारांना पुष्कळ स्वातंत्र्य आहे. भारताच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल सरसकट सगळ्यांना मनामध्ये रागच आहे - त्यांना तटस्थपणाचे नेमके आकलन होत नाही. पाकिस्तानला मदत देताना ते राष्ट्र करारातले एक घटक म्हणून दिली जाते - भारताविरुद्ध म्हणून ती मदत करीत नाहीत. ती वृत्तपत्रे स्थानिक, प्रादेशिक बातम्यांना अधिक महत्व देऊन त्या सचित्र, चटकदार व तपशीलवारपणे तत्परतेने छापतात - हे वैशिष्ट्य भारतातील वृत्तपत्रांनी स्वीकारण्याजोगे आहे. पण गुन्ह्याच्या बातम्या भडकपणे पहिल्याच पानावर देण्याची त्यांची पद्धत माडखोलकरांना आवडत नाही. त्या वृत्तपत्रांची वृत्ती सरसकट धंदेवाईक असते - तीही त्यांना रुचत नाही.

माडखोलकर तेथे जारुकपणे हिंडले - फिरले आहेत. अमेरिकेचे जे चांगले आहे, त्याबद्दल ते अमेरिकन संस्कृतीला जरुर मानतात. त्यांना तिथल्या जीवन पद्धतीची जशी काही वैशिष्ट्ये जाणवली तशी काही वैगुण्येही जाणवली आणि दोहोंची ठळक नोंद त्यांनी प्रवास वर्णनात केली आहे. अमेरिकन जीवन संस्कृतीमध्ये उभ्या असलेल्या दोन समस्यांची त्यांना तेथे हिंडताना प्रकर्षाने जाणीव झाली. पहिली समस्या

निग्रोंची - (आपल्या येथे जातिभेदातून जी विषमता निर्माण झालेली आहे, तीपेक्षाही अमेरिकेत वर्णावर (कलर्ड- निग्रो, रंग) आधारुन निर्माण झालेली विषमता त्यांना अती तीव्र व भयानक वाटली आहे) त्या समस्येचे परिणाम दैनंदिन वास्तव जीवनात त्यांना प्रत्यही आढळले आहेत. खुद्द राजधानीत वॉशिंग्टन मध्ये निग्रो लोकांसाठी स्वतंत्र चालवलेले विद्यापीठ ही त्यांना चमत्कारिक - भेद उत्पन्न करणारी गोष्ट वाटते. त्या विद्यापीठाचे प्रेसिडेंट डॉ. जॉन्सन (व्हॉईस चॅन्सेलर) आणि उपाध्यक्ष डॉ. नेल्सन ह्यांना ते भेटले होते. हे दोघेही म. गांधीचे भक्त होते. 'अटलाण्टा डेली वर्ल्ड' ह्या निग्रो दैनिकाच्या विल्यम गार्डनने त्यांच्याबरोबर जी रविवारची संध्याकाळ घालवली व मोकळेपणाने जे बोलणे केले, त्यातून हया निग्रोंच्या संबंधातील विषमतेची दाहक जाणीव त्यांना झाली. विल्यम गॉर्डन हे स्वतः निग्रोच होते. ते माडखोलकरांना घेऊन जाणार असतात पण "हॉटेलच्या लॉबीत तुम्ही येऊन बसले पाहिजे', असे म्हणतात. माडखोलकर त्यांना "एक्सिलरेटर मधून सरळ नवव्या मजल्यावरच्या माझ्या खोलीत या," असे म्हणतात, तेव्हा, "ती गोष्ट सांगू नका आपण मला! कदाचित अपमानाचा प्रसंग येईल माझ्यावर! त्या हॉटेलात निग्रो हा फक्त नोकर म्हणूनच येउ शकतो!" (पृ. १२५) असे गॉर्डन उत्तरतात.

संध्याकाळी परतल्यावर हॉटेलचा मॅनेजर माडखोलकरांना हसत हसत विचारतो - "काय? आज रविवारची सुंदर सायंकाळ 'निगर' च्या सहवासात घालवलीत तुम्ही?" — त्यावर

"मी त्याला हटकले, "मी तरी कुठे गोरा आहे? मीही तर 'कलर्ड च आहे की!"

त्यावर मॅनेजर उत्तरला, "छे, छे! तुम्ही फार मोठ्या राष्ट्राचे प्रतिनिधी आहात - ज्या राष्ट्राने गांधी आणि नेहरु निर्माण केले!" (पृ. १३९)

हा सगळा प्रसंग स्वतःहूनच इतका बोलका आहे की निग्रोंना काय सहन करावे लागत असेल हयाची अचूक कल्पना आपल्याला येते.

गॉर्डन सांगतात की "खरोखरी अमेरिकेत शुद्ध निग्रो उरलेला नाही. निग्रो स्त्रियांना भोगदासी म्हणून गोरे वापरत. आजच्या घडीलाही काळ्यागोऱ्यांचे चोरटे प्रेमसंबंध सर्रास सुरु असतात. संयुक्त संस्थानातील दक्षिणेकडची संस्थाने निग्रोंनामुक्त करण्याविरुद्ध असून जस जसे दक्षिणेकडे जावे तो तो हा गोरा व निग्रो हा संघर्ष टोकाला जाऊन भिडतो. १८६० त यादवी युद्ध झाले - निग्रोंसाठी झटणाऱ्या लिंकनचा खून झाला. आयझेन होअर ह्यांचे धोरण समतेचे आहे पण त्यांनाही आतून विरोधच आहे. गोऱ्यांच्या वस्तीत, हॉटेलात राह्यला - शाळा, कॉलेजात प्रवेशाला - सर्व पातळ्यांवर निग्रोंना विरोधच असतो. अटलाण्टा शहरातील स्लम्स आज नाहीत, कारण तेथल्या निग्रोंनी स्वच्छ, टुमदार घरे बांधली. पण त्याला गोऱ्यांनी विरोधच केला. अडचणी उभ्या केल्या. गोरे त्यांच्या वस्तीत जागाच मिळू देत नाहीत. खुद्द वॉशिंग्टन मध्येही गोरे अमेरिकन्स निग्रोंचा संपर्क टाळण्यासाठी शहरातून उपनगरात राहयला जाऊलागले आहेत. तिथल्या हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष इतके दिवस गोरे असत. डॉ. जॉन्सन हे पहिले निग्रो अध्यक्ष! चर्चेस, कॉलेजेस्, युनिव्हर्सिटीज येथे गोरा आढळणार नाही. कुणी गोरा आढळला तर तो देखील (निग्रो लोकांच्या) निग्रोच (मूळ) असतो म्हणून! काही गोरे निग्रो गोऱ्या अमेरिकनात मिसळत पण त्यांचे निग्रोपण कळले की त्यांची हकालपट्टीच होते. आता ही

'क्रॉसिंग दि लाईन' ची प्रवृत्ती नष्ट झाली आहे. निग्रोंनाही स्वाभिमान आहे. त्याला गुलाम म्हणून येथे आणले असले तरी अमेरिकेचा विकास, संपन्नता त्याच्या घामातून, शारीरिक कष्टातूनच निर्माण झाली आहे. सेग्रिग्रेशन असो को काही असो - तो काही येथून कुठे जाणार नाही. हीच त्याची मातृभूमी - पितृभूमी!"

गॉर्डन बोलता बोलता थांबतात. त्यांची हृदयातील खोल जखम आपल्याला कळते. माडखोलकर हे कसलेले ललित लेखक असल्याने हे सर्व संवादात्मक निवेदन इतक्या उत्कटपणाने त्यांनी केले आहे की ते आपल्याला खोलवर जाऊन भिडते. माडखोलकर ५७ साली तिकडे गेले होते पण त्यावेळचे प्रश्न जवळ जवळ पन्नास वर्षांनी - विसाव्या शतकाच्या शेवटी आज तितकेच तीव्र आहेत. माडखोलकरांचे हे द्रष्टेपणच की पन्नास वर्षांपूर्वीच त्याचे सत्य, दाहक रुप आपल्या प्रवास वर्णनातून त्यांनी उभे केले.

निग्रोंच्या इतकाच महत्वाचा प्रश्न अमेरिकेतील रेड इंडियन्सचा आहे. माडखोलकरांच्या बाबतीत खरोखरीच ही गोष्ट त्यांच्या भाग्याचीच म्हणायला हवी की त्यांना रेड इंडियनांच्या गावात - वस्तीत जाऊन तिथले जीवन पाहता आले. निग्रोंचे जीवन आणि रेड इंडियनांचे आजच्या काळातले जीवन एकूण अमेरिकन जीवन पद्धतीतील महत्वाचे घटक आहेत आणि त्यांचे दर्शन माडखोलकरांना घडले हे भाग्याचेच म्हटले पाहिजे. त्यांनी 'वुइण्डो रॉक' आणि 'झुनी' येथल्या रेड इंडियनांच्या वस्तीत भ्रमण केले. तिथल्या चिक सँडोवॉल आणि हेन्री जेन्सन यांच्याशी बोलणे केले.

'वुइण्डो रॉक' चे चिक सँडोवॉल त्यांना म्हणाले - "तुम्ही हिंदुस्थानातील 'हिंदी' आहात.

मी अमेरिकेतला हिंदी म्हणून तुमचे स्वागत करतो." तेव्हा त्यांच्याशी हस्तांदोलन करताना मी त्यांना म्हटले —

"तुम्हीही माझ्याप्रमाणे 'इंडियन' आहात - फक्त या देशातले!" त्यावर ते एकदम आवेशाने उद्गारले —

"छे छे, मी अमेरिकनच आहे. खरेखुरे, जातिवंत अमेरिकन, या भूमीचे अग्रज आणि औरस संतान फक्त आम्ही अमेरिकन इंडियनच आहोत." (पृ. १३८ - १३९)

चिक सँडोवॉल हे जमात, धर्म, संस्कृती सोडून पाश्चात्य बनलेले नव्हते. 'नवाहो' जमातीची उत्कृष्ट माहिती देणारे एकमेव अधिकारी पुरुष होते. ते इंग्रजी शिकले होते पण पदवीधर नव्हते आणि ख्रिस्ती असूनही चर्चमध्ये जात नसत.

माडखोलकरांना 'झुनी' येथे न्यायला आलेले हेन्री जेन्सन म्हणाले —

"आमच्या मनात असो वा नसो, अमेरिकेतील गोऱ्या लोकसमाजात आम्ही विलीन होऊन जाणार, हे आता अगदी स्पष्ट आहे; अमेरिकेतील इंडियन जमातींची ही नियती अगदी अटळ आहे." (पृ. १३६)

वडील जुन्या पिढीला या नियतीची कल्पनासुद्धा सहन होत नाही.

हेन्री जेन्सन उद्‌गारले –

"त्या जुन्या पिढीतल्या शूर, मानी, करारी 'इंडियनां' च्याच केवळ नव्हे, तर माझ्यासारख्या स्वतःचा धर्म,संस्कृती आणि भाषा यांना पारख्या होऊन बसलेल्या तरण्याबांड सुशिक्षित 'इंडियनां' च्याही मनात, आपली जमात नष्ट होऊन जाणार - 'इंडियन' हे नाव सुद्धा काही काळाने या देशात शिल्लक उरणार नाही - ही गोष्ट आली, म्हणजे हृदयात कळ उठल्यासारखी होते. पण काय करणार? आमची ही नियती अटळ आहे." (पृ. १३६ - १३७)

निग्रो काय आणि रेड इंडियन्स काय - दोघांचाही प्रश्न वांशिक आहे. निग्रो बाहेरुन गुलाम म्हणून आणला गेला. रेड इंडियन मुळचाच अमेरिकेतला रहिवासी - काही हजार वर्षापूर्वी आशियातून सैबेरिया, अलास्का मार्गे आला - गोरा, लालसर, चेहऱ्याची ठेवण आर्यन - मंगोलियन वळणाची, मऊ केस, नितळ त्वचा असलेला! त्याला मिशनऱ्यांनीच ख्रिस्ती बनवले. त्याची बुद्धिमत्ता कुशाग्र आहे. त्याला प्रखर स्वाभिमान आहे. त्याचे कलाकौशल्य उच्च दर्जाचे आहे. गोरा अमेरिकन त्याच्याकडे आदराने पाहतो. त्याला लक्षावधी एकर जमीन राखीव' म्हणून सरकारने तोडून दिली आहे. हया गोऱ्या वसाहत वाल्यांशी तो अनेक शतके लढत राहीला. त्याच्याशी 'तह' केले गेले. त्याचे अस्तित्व मानले गेले. पण इंग्रजीचे शिक्षण शाळांमधून सुरु झाल्यावर नव्या पिढीने अमेरिकनांचे अनुकरण करीत स्वतःची भाषा विस्मृतीत लोटली. पाश्चात्य राहणी आक्रमण करु लागली. ख्रिश्चन झालेल्या इंडियन्सनी 'नवाहो कॅथॉलिक कॉन्फरन्स' ची स्थापना केली. अमेरिकन पाश्चात्य लोकसमाजात विलीन होण्यात कल्याण आहे अशी तरुण इंडियन्सची श्रद्धा आहे; आणि तसेच घडू लागले आहे. तरीही आतला सल, तळमळ संपलेली नाही. फिनिक्सचे ॲण्टन कोल्थॉफ म्हणतात,

"..... मी जरी अमेरिकन असलो, आता नखशिखान्त पाश्चात्य झालेला असलो, तरी मी या देशातील गोऱ्या समाजाहून अगदी वेगळा आहे, माझा पिंड आणि प्रकृती ही त्याच्यापासून अगदी भिन्न आहेत, माझी परंपरा आणि संस्कृती त्याच्यापेक्षा अगदी निराळी आहेत, असे क्षणोक्षणी वाटत असते मला!.... आमच्या धर्मात आम्ही पृथ्वीला - या धरित्रीला - आपली आई मानलेली आहे. पण, ही आमची पृथ्वीविषयीची कल्पना आम्हाला कितीही प्रिय असली, आमचा पिंड या कल्पनेमुळे पृथ्वीला कितीही बिलगलेला असला, तरी पाश्चात्यांना ती कशी समजणार? इंडियन जमाती आपल्या नापिक वैराण जमिनींना पिढयान् पिढ्या का चिटकून राहिलेल्या आहेत, आपल्या देवांचे निवासस्थान म्हणून ते पर्वतशिखरे का पवित्र मानतात, शहरांपेक्षा त्यांना डोंगरदऱ्यात राहण्यात का आनंद वाटतो, मोटारीपेक्षा त्यांना घोड्याचे वेड का जास्त आहे, हे पाश्चात्यांना कसे कळणार? आमच्या ते रक्तात आहे आणि त्यांच्या तर ते गावीही नाही! पण जाऊ द्या...." (पृ. १६३ - १६४)

ॲण्टन कोल्थॉफचे उद्‌गार रेड इंडियन्सची आंतरिक व्यथाच स्पष्ट करतात.

माडखोलकरांनी निग्रोंच्या अंतरातला सल जसा उत्कटपणे व्यक्त केला आहे तसाच रेड इंडियन्सच्या मनातल सल अचूकपणे उकलून दाखवला आहे - त्याच्या नसानसातली व्यथा उघडून दाखवली आहे

अनुक्रमणिका

अमेरिकन जीवनातल्या हया प्रमुख घटकांच्या अंतर्यामातील व्यथावेदनांचा त्यांना जो अनुभव आला, त्याचा ह्या पुस्तकात त्यांनी स्मृतिरुपाने जागर केला आणि तोच त्यांच्या ह्या पुस्तकाला प्रवासवर्णनाचे रुप देतो.

अमेरिकेमध्ये असे वेगळया प्रकारचे अनुभव घेत असताना त्यांनी सर्वसामान्य अमेरिकन माणसाच्या जीवनाचे विशेषही टिपले. त्याच्या घराचे हाऊस, रॅम्बलर, स्पिल्ट लेव्हल रॅम्बलर, अपार्टमेंटस् असे असलेले प्रकार वर्णित कमी उत्पन्न असलेल्या लोकांसाठी बांधलेली सहकारी तत्वावरची घरे निर्देशिली आहेत. घरातल्या खोल्या कशा प्रकारच्या असतात हे सांगून वॉशिंग्टन शहर थंडीमुळे 'सेंट्रली हिटेड' असते हे स्पष्ट केले आहे. घरात यांत्रिक साधनांमुळे वेळ, श्रम ह्यांची बचत होते. दुधाचा सुकाळ, फळांचे रस (तेही 'चिल्ड') पिण्याचीआवड, चहाकॉफी दूध व साखर न घालता पिण्याची पद्धत, पोषाखाचा धरबंध नसणे ह्याकडे लक्ष वेधले आहे.

अमेरिकेत युरोपातील भिन्न भिन्न देशांचे लोक वसाहत करायला गेले. ते आता एकमेकात इतके मिसळले आहेत की घरामधला बाप स्पॅनिश असतो आणि आई फ्रेंच असते. आई जर्मन असली तर बाप इंग्लीश असतो, किंवा ज्यू असतो. अशी विविधता अमेरिकेच्या मुख्य जीवनस्रोतात केव्हाच एकजीव होऊन गेली आहे. इतकी की अमेरिकेसारख्या भारताच्या तिप्पट क्षेत्रफळ असलेल्या देशात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत भाषा, लिपी, वेश, राहणी, अन्न, शिष्टाचार, धर्म इत्यादी सर्व बाबतीत तिथल्या जीवनपद्धतीत विलक्षण एकविधता असल्याचे त्यांना उत्कटपणे जाणवले - 'अमेरिकन वे ऑफ लाईफ' चे वेगळेपण ते हेच! माडखोलकरांनी हे प्रवास वर्णन 'प्रवासपत्रां' च्या रुपाने लिहिले. पत्र हा एका परीने अंतःकरणातल्या भावनेला सहजपणे उद्‌गार देत असते. 'मी पाहिलेली अमेरिका' हा त्यांनी अनुभवलेल्या अमेरिकेबद्दलेचा उत्स्फूर्त पण चिंतनशील असा उद्‌गारच आहे.

⁂⁂⁂

## | श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी केलेला साहित्य विचार |

------------------------------------------------------------------ डॉ. उषा माधव देशमुख

श्री गजानन त्र्यंबक माडखोलकर यांना सत्याहत्तर वर्षांचे आयुष्य मिळाले. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लेखनाला सुरवात केली. मुंबई -पुणे-नागपूर अशा तीन ठिकाणी त्यांनी वास्तव्य केले असले तरी त्यांच्या पत्रकारितेची आणि साहित्य, समीक्षा निर्मितीची कर्मभूमी विदर्भ आणि विशेषतः नागपूर हीच होती. महाविद्यालयीन कोणतीही पदवी त्यांच्या गाठीशी नव्हती. तरीही त्यांनी पांडित्य बहुश्रुतता, विदग्धता कमावली होती. साहित्यसृष्टी आणि वृत्तपत्रसृष्टी यात माडखोलकरांनी अखेरपर्यंत यशस्वी संचार केला. त्यांचे व्यक्तित्व हे बहुआयामी होते. त्यांनी विद्वता कष्टाने कमावली होती आणि वृत्तपत्राच्या माध्यमातून आणि स्वतंत्रपणे त्यांनी अविरत लेखन केलेले आहे. कथा, कविता, कादंबरी, निबंध, समीक्षा, साहित्य, तत्वविचार या माध्यमातून त्यांनी साहित्य निर्मिती केली. देशपरदेश येथे जाऊन अनेक संस्थांची अध्यक्षपदे भूषवून त्यांनी महाराष्ट्रातील साहित्य व्यवहारावर, समाज व्यवहारावर, राजकीय व्यवहारावर अखेरपर्यंत एक जागता पहारा ठेवला होता. हिंदी, संस्कृत, इंग्रजी, उर्दू इत्यादि भाषातील वाङ्मयाचा माडखोलकरांचा व्यासंग होता. वृत्तपत्रकार, ललित लेखक आणि साहित्य विमर्शक म्हणून त्यांचा लौकिक फार मोठा होता. माडखोलकरांचा मूळ पिंड वृत्तपत्रकाराचा होता आणि त्यांनी अनेक निमित्ताने लेखन केले. साहित्य निर्मिती, साहित्य समीक्षा आणि साहित्य तत्वसिद्धांत या परिप्रेक्ष्यातून माडखोलकरांच्या साहित्य विचारांमागील भूमिका तपासून घेतली पाहिजे. पत्रकाराची सावधता आणि चौकसपणा हा त्यांच्या साहित्य विचारांमागील प्रेरणास्रोत आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, महाराष्ट्र एकीकरणाचा प्रश्न, मध्यप्रदेश आणि बृहन महाराष्ट्रातील राजकारण, देशातील आणिबाणीचा काळ अशा अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांचा खल माडखोलकरांनी आपल्या कांदबऱ्यातून जसा केला तसाच तो स्वतंत्र आणि स्फुट लेखनातूनही केला. माडखोलकर वृत्तपत्रपंडित असल्यामुळे त्यांच्या साहित्यात तपशीलबहुलता आलेली आहे. एक ठोस अविर्भाव घेऊन माडखोलकर लिहितात. माडखोलकरांची वाङ्मय समीक्षा आणि साहित्य विचार हे त्यांच्या पत्रकारितेचे प्रधान अंग आहे तर त्यांची कादंबरी ही वृत्तपत्रीय कारकिर्दीचे एक ललित गर्भ आविष्करण ठरते. साहित्य सम्राट न. चिं. केळकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना माडखोलकर गुरुस्थानी मानीत असत आणि त्यांच्या चतुरस्त्र लेखनाचा संस्कार माडखोलकरांनी स्वीकारुन आपले लेखन फुलविले- वाढविले. केळकर- कोल्हटकरांचा आदर्श माडखोलकरांनी स्वीकारला होता. माडखोलकरांनी एकूण अठ्ठावीस टीकात्मक वाङ्मय विमर्शात्मक ग्रंथ लिहिले आहेत. त्यातून त्यांचा साहित्य विचार कसा प्रगत झाला आहे ते प्रस्तुत बघावयाचे आहे.

माडखोलकरांचे समीक्षात्मक लेखन

| ग्रंथकाराचा अभ्यास | वाङ्मय विमर्षात्मक | वाङ्मयीन प्रवाह |
| --- | --- | --- |
| विष्णू कृष्ण चिपळूणकर | वाङ्मय विलास | आधुनिक कविपंचक, विलापिका |
| विष्णू कृष्ण चिपळूणकर द्विविध दर्शन | स्वैर विचार | महाराष्ट्राचे विचारधन |
| समग्र कोल्हटकर खंड | अवशेष | स्ववाङ्मय विषयक |
| | आव्हान | दोन तपे |
| | परामर्ष | एक निर्वासिताची कहाणी |
| | जीवन साहित्य | माझे आवडते लेखक |
| | सुभाषवाद | मी पाहिलेली अमेरिका |
| | हांक | माझे लेखन गुरु |
| | निर्माल्य | माझे आवडते कवी |
| | पाखरण | माझी नभोवाणी |
| | साहित्यशलाका | व्यक्तिरेखा |
| | साहित्य समस्या | मी आणि माझे साहित्य |
| | श्रद्धांजली | व्यक्ति तितक्या प्रवृत्ती |
| | | मी आणि माझे वाचक |

वरील वर्गीकरणावरुन वाङ्मयाची तात्विक मीमांसा, ग्रंथकाराचा अभ्यास, कलाकृतींचा अभ्यास, वाङ्मयीन वृत्तीप्रवृत्तींचा विचार, कालखंडाचा अभ्यास, वाङ्मय प्रकाराचा अभ्यास, वाङ्मयीन प्रवाहाचा अभ्यास, स्व वाङ्मय विषयक चिकित्सा अशा विविध परिप्रेक्ष्यातून माडखोलकर आपली वाङ्मय विषयक भूमिका सिद्ध करतात. स्व वाङ्मयविषयक आणि स्वेतर वाङ्मयविषयक चिंतनातून आणि वृत्तपत्राच्या माध्यमातून विशेषतः आणि प्रामुख्याने हे लेखन झालेले आहे. ग्रंथ प्रस्तावना, मृत्युलेख, स्मृतिलेख, गौरवलेख, ग्रंथ परीक्षणे, वाङ् मयीन चर्चात्मक पत्रव्यवहार, ग्रंथ समीक्षा, अग्रलेख, व्याख्याने, आकाशवाणीवरील चिंतन, समकालीन वाङ्मयीन प्रवाहांच्या अनुषंगाने झालेले वृत्तपत्रीय लेखन अशा स्वरुपात वरील ग्रंथातील लेखन झाले आहे.

माडखोलकरांनी स्व वाङ्मयविषयक जी चिकित्सा केली आहे तीही त्या त्या वाङ्मय प्रकारांच्या सैद्धांतिकतेवर भर देणारी नाही तर तात्कालीक विचार विमर्शात्मक अशी झाली आहे. माडखोलकरांची साहित्य मीमांसा आणि समीक्षा विचार हा नव्या-जुन्याच्या संगमावर उभा असलेला व समकालीन साहित्य विमर्शकांनाही पेचात पकडणारा असाच समीक्षा विचार ठरला. साहित्याची तात्विक मीमांसा करण्यासाठी संस्कृत साहित्यशास्त्राचा आधार घ्यावयाचा आणि समीक्षेसाठी पात्र पाश्चात्य समीक्षा निकषांनी काम भागवायचे

अनुक्रमणिका

या पेचात सापडलेल्या कालखंडातच न. चिं. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, रा. श्री. जोग, यांची साहित्य मीमांसा व समीक्षा अडकलेली होती. माडखोलकरही त्याला अपवाद नव्हते.


'संस्कृत कवि पंचका' प्रमाणे 'आधुनिक कवि पंचकांची मांडणी माडखोलकरांनी केली आणि त्यांच्या टीकात्मक लेखनाला प्रारंभ झाला तो वयाच्या एकविसाव्या वर्षी! भारदस्त, संस्कृत प्रचुर, बहुश्रुत, तपशील बहुल अशी रोखठोक आणि मतप्रदर्शनातील स्पष्टता व्यक्त करणारी समीक्षा माडखोलकरांनी लिहिली केशवसुत, बालकवी, रे. टिळक, गोविंदाग्रज, विनायक यांचे काव्यसंग्रह नुकतेच प्रसिद्ध होत असतांना माडखोलकरांनी एका ऐतिहासिक आणि मूल्यमापनात्मक दृष्टिकोनातून त्या त्या कवीचे वैशिष्ट्य आणि गुणदोष दिग्दर्शन केलेले आहे. आपली स्वतंत्र व प्रवाहाविरुद्ध जाणारी अशी मते त्यांनी मांडली. केशवसुतांना स्त्रैण ठरविणारे टीकाकार म्हणून त्यांच्या समीक्षेचा आणि या ग्रंथाचा गाजावाजा झाला होता. माडखोलकरांच्या या पहिल्याच ग्रंथावर चिपळूणकरांच्या लेखनशैलीची सघन अशी छाप पडली आहे. 'राष्ट्राच्या संसारात काव्यातील प्रबोधशक्ती महत्वाची ठरते' असे त्यांचे प्रतिपाद्य होते व त्या अनुषंगाने आधुनिक कवींचा विचार ते करतात. प्रतिभेचे सामर्थ्य, काळाचे प्रयोजन, कवितेचे घटक, या विषयी विचार त्यांनी मांडले. 'कवितेचा अवतार विश्वाला उदात्तता आणण्याकरिता आहे. क्षणिक आवेगातून शाश्वत सत्य बाहेर काढण्याचे कार्य कवीला करायचे असते'. महाराष्ट्राची धार्मिक परंपरा लोपू न देता त्याच्या राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्याचे महत्कार्य आधुनिक कवींनी करावयाचे आहे असा इशाराही माडखोलकरांनी दिला याच विचारांना अनुलक्षून 'महाराष्ट्राचे विचारधन' या ग्रंथात उहापोह केला. प्रत्येक कवीच्या जन्ममृत्यूची नोंद करुन त्याच्या काळाचा ऐतिहासिक आढावा आणि विश्लेषण या काळात सर्वप्रथम माडखोलकरांनी केले आहे. हे विशेष! रे. टिळकांविषयी लिहिताना टिळक ख्रिस्ती झाल्यामुळे महाराष्ट्र धर्माला, परंपरेला आणि भावनांना पारखे झाले असेही माडखोलकर नमूद करतात. केशवसुतांच्या कवितेत आगरकराचा सुधारणावाद आणि गरिबांविषयीची तळमळ दिसून येते आणि त्यांच्या कवितेचे अंतरंग जसे सखोल, सुंदर आहे तसे बहिरंग सुंदर नाही. असाही शेरा मारतात. केशवसुतांच्या कवितेतील दोषस्थळे माडखोलकर सटीक मांडतात. परके कल्पनाविलास, भाषादोष, वृत्तदोष, माडखोलकरांनी दाखवून दिले आहेत. माडखोलकर केशवसुतांच्या राष्ट्रीय भावनेने मात्र प्रभावित झालेले दिसतात. कवी विनायकांविषयी माडखोलकर जिव्हाळ्याने लिहितात. देशप्रेम, क्रांतिकारकांचे विचार आणि पारतंत्र्याविषयीची चीड याविषयी माडखोलकर विश्रब्धतेने लिहितात. केशवसुतांच्या कवितेपेक्षा विनायकांची कविता कशी निर्दोष आहे तेही पटवून देतात. संस्कृतप्रचुर ओजस्वी भाषा यामुळे माडखोलकरांच्या पहिल्या वहिल्याच समीक्षा लेखनाला एक आक्रमक स्वरुप आलेले दिसते. विनायकांच्या राष्ट्रीय कवितेचे मूल्यमापन करताना 'राष्ट्राचे अंतःकरण, राष्ट्राच्या भावना आणि राष्ट्राचे विकार ज्या कवितेत आविर्भूत झालेले असतात ती राष्ट्रीय कविता' या अर्थाने विनायक हे राष्ट्रकवी होते.

'आधुनिक मराठी कवि पंचक' या ग्रंथातून माडखोलकरांच्या टीकादृष्टीची आणि साहित्य विचारांची दिशा निश्चित झालेली दिसते. लेखन विषयाचा ऐतिहासिक तपशील, समकालीन पर्यावरण, पाश्चात्य विचारसरणींचा आणि लेखकाचा प्रभाव, राष्ट्रीय भावना जागृती करणारा आशय, शैली विचार या पद्धतीने माडखोलकर मांडणी करतात. तपशील बहुलता हा त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. त्यामुळे त्या काळात आस्वादक समीक्षेचा एक मानदंड माडखोलकरांच्या समीक्षेने घालून दिला होता. न. चिं. केळकर आणि कोल्हटकर यांच्या समीक्षेच्या प्रभावातून पण पृथगात्म होत माडखोलकरांची समीक्षादृष्टी आणि साहित्य विचार

आकार घेत होता तो त्यांच्या सर्व ग्रंथातून तसाच कायम राहिला. नवसमीक्षेच्या प्रवाहात आणि पाश्चात्य साहित्य शास्त्राच्या प्रभावातही माडखोलकरांचा साहित्य विचार फारसा वेगळे वळण घेऊन सिद्ध झाला नाही तर एकाच पद्धतीने तो आविष्कृत होत राहिला. संस्कृत साहित्यातील कालीदास भवभूती यांचा संस्कार आणि मोरोपंतांच्या आर्याभारताचा प्रभाव माडखोलकरांच्या पांडित्यावर विशेषत्वाने होता.

'चिपळुणकर काळ आणि कर्तृत्व' आणि 'विष्णूकृष्ण चिपळुणकर द्विविध दर्शन' या ग्रंथातून ग्रंथकाराचा अभ्यास कसा असावा याचा आदर्श माडखोलकरांची टीका घालून देते. हे सर्व लेखन एका श्रद्धायुक्त अन्तःकरणाने झालेले आहे. काही वेळा त्यामुळेच माडखोलकरांच्या समीक्षेत भक्तिभावही उतरलेला दिसतो. चिपळूणकर, कोल्हटकर ही माडखोलकरांची श्रद्धास्थाने होती. 'दादोबा पांडुरंग, जोतिबा फुले भांडारकर, रानडे आणि चिपळुणकर या सहा महापुरुषांनी आपल्या विचारांना आणि वृत्तीने परतंत्र महाराष्ट्राच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या प्रमुख व्यक्ती होत्या' असे माडखोलकर म्हणतात. त्यात आगरकरांचे नाव घेत नाही हे विशेष. माडखोलकरांना पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवाद अभिप्रेत नव्हता तर व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित युयुत्सु राष्ट्रवादाची अपेक्षा माडखोलकरांनी ठेवली होती व ती साहित्याने पूर्ण करावी अशी त्यांची धारणा होती.

'विलापिका' हा माडखोलकरांचा असाच एक स्वतंत्र व महत्वाचा ग्रंथ ठरतो. वैलापिक काव्य आणि विलापिका, विलापिकेतील शोकात्मभान, टेनिसन, मिल्टन, ग्रे, शेले, व्हिटमन, अर्नोल्ड, स्पिनबर्न या पाश्चात्य कवींची 'इन मेमोरियम्' आणि मराठी संतकवींपासून आधुनिक कवींपर्यंत शोकात्म कवितेचे स्वरुप, अनुभवाची वैशिष्ट्यपूर्णता आणि आविष्काराची संरचना याविषयी सूक्ष्म चिंतन माडखोलकरांनी केले आहे. विलापिका या काव्यप्रकारात करुण आणि शांत या दोन रसांचा रमणीय संगम झालेला असून निर्वेद हा शांतरसाचा (Elegy) स्थायीभाव असून करुणा रसाचे पर्यवसान अखेरीस शांत रसात होते. जगन्नाथ पंडित, क्षेमेंद्र यांची करुणा रसविषयक मते आधाराला घेऊन 'अजविलाषा' अतके श्रेष्ठ काव्य जगात सापडणार नाही असा निष्कर्ष माडखोलकर काढतात. स्नेन्सरपासून स्विनबर्म पर्यंत जे वैलापिक कवी इंग्लंडमध्ये उदयाला आले ते पढीक आणि प्रतिष्ठित होते. साहित्यातील कोणत्या ना कोणत्या परंपरेचे ते प्रतिनिधी होते; किंवा प्रवर्तक होते. वैयक्तिक दुःखातून विलीपिका हे काव्य निर्माणा हेते. 'विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पंचवीस वर्षाच्या अंतराने जी दोन महायुद्धे झालीत. त्यात परंपरागत सांस्कृतीक आदर्शांचा उच्छेद होऊन गेला. रशियन साम्यवादी क्रांतीतून निर्माण झालेल्या वर्गीय आणि पक्षीय हुकूमशाहीने व्यक्तिस्वातंत्र्याची अमानुष गळचेपी केली, त्याचा परिणाम कवितेवर झाला. यांत्रिक अधिकारशाहीचा निषेध कवींनी नोंदविला. मानवी आदर्श आणि मानवी आकांक्षा यांचा विध्वंस झाल्यामुळे विकृती, वैफल्य आणि त्यातून उफाळलेला उपरोध यांचे सावट विसाव्या शतकातील पाश्चात्य साहित्यावर पडलेले आहे. 'दिवसलॅन्ड' हे काव्य म्हणजे या वैफल्याचे रुपकात्मक शब्दचित्र ठरते. विसाव्या शतकातील पूर्वार्धातील कवींवर मार्क्स आणि फ्राईड यांची छाप आहे. स्वप्नमीमांसा आणि क्रांतित्व यांच्या मिलाफातून दुसऱ्या दशकातील कवीचा गट अतिवास्तविकवादाकडे झुकला. विफलता हा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील विलापिकांचा उगम आणि आशय आहे, असा निष्कर्ष माडखोलकरांनी काढला आहे. यावरुन त्यांच्या काव्याभ्यास आणि जागतिक समाजकारण व राजकारण याविषयीची समज लक्षात येते.



**चित्रकार मधुकर पारळकर यांचेसोबत - भाऊराव**

अनुक्रमणिका

आधुनिक मराठी विलापिकांवर संस्कृत आणि इंग्रजी वैलापिक काव्याची छाया दिसते. कृष्णशास्त्री चिपळूणकर, गणेश शास्त्री लेले, या कवींनी जगन्नाथ पंडिताच्या करुण विलापाचे तर नी. ब. भवाळकर, लेंभे, मोगरे, रहाळकर, रे. टिळक, आगाशे यांनी इंग्रज वळणाची विलापिका गीते लिहिलीत. 'शोकावर्त', 'बाष्पांजली', 'बापाचे अश्रू' या महत्वाच्या विलापिका माडखोलकरांनी ठरविल्या आहेत. प्रस्तुत ग्रंथात माडखोलकरांचा इंग्रजी आणि संस्कृत साहित्याचा व्यासंग लक्षात येतो. माडखोलकरांनी काव्याचा विचार करताना, व्यक्ति स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम आणि भावनात्मकता यांना विशेष महत्व दिले आहे. भारतीय अध्यात्म, राष्ट्रभक्ती, आणि व्यक्ति स्वातंत्र्य यांचा उद्‌घोष माडखोलकरंनी केलेला आहे. इंग्रजी काव्य, संस्कृत काव्य, संस्कृत साहित्यशास्त्र आणि मराठी काव्य यांचा अभ्यासपूर्ण आलेख माडखोलकरांच्या साहित्य विचारातून व्यक्त झाला आहे.

माडखोलकरांच्या पूर्व परंपरेत आणि माडखोलकरांच्या वर्तमानकाळात मराठी टीकाकारांची एक पिढी साहित्य विचार मांडत होती. साहित्याचे स्वरुप, निर्मिती प्रेरणा, प्रयोजन विचार, प्रतिभेचे सामर्थ्य याविषयी या काळात संस्कृत साहित्य शास्त्राच्या आधाराने जावे लागले होते तर समीक्षा करण्यासाठी मात्र संस्कृत साहित्यशास्त्र अपुरे वाटत होते ही त्यांची अडचण लक्षात येते. के. ना. श्री. के.  क्षीरसागर, रा. श्री. जोग, माडखोलकर यांचा साहित्यविचार कधी मानसशास्त्राच्या अंगाने, कधी ललितकलांच्या अनुषंगाने तर कधी चिपळूणकरांनी दिलेली दिशा व श्रीपाद कृष्णांनी तिला दिलेले कलावादाचे वळण यामध्येच घोटाळत होती. त्यामुळे साहित्यकृतीच्या पाठीमागे असलेली नियम, व्यवस्था तिच्यात अत्युस्युत असलेल्या संकल्पना यांच्या संदर्भात संस्कृत साहित्यशास्त्राचा आधार घेतला गेला. साहित्य कृतीचा आस्वाद आणि साहित्यकृती मागील तत्वमीमांसा यामध्ये निश्चित नवीन विचार आलेला नव्हता. 'विश्लेषण हा शास्त्रांचा आत्मा आहे तर सर्वच ललितकलांचा आत्मा संश्लेषण हा असतो' असे माडखोलकर मानतात. किंबहुना माडखोलकरांनी युगमानाप्रमाणे नवीन साहित्य शास्त्राची मांडणी करावी अशी अपेक्षा माडखोलकरांचे गुरु श्रीपाद कृष्ण यांनी व्यक्त केली होती. माडखोलकरांचा तसा व्यासंगही होता पण वृत्तपत्रीय माध्यमातच हे लेखन आल्यामुळे तळस्पर्शी विचारविमर्श मांडण्याइतकी फुरसत माडखोलकरांना मिळाली नाही. मात्र तसे पांडित्य आणि प्रज्ञा त्यांची होती. डॉ. मा. गो. देशमुखांच्या 'भावगंध' या प्रमेय सिद्धांतनाला विरोध करतानाही ती दिसून येते.

मराठी वाङ्मय आणि साम्यवाद, साम्यवाद आणि लैगिंक नीती, अभिजात म्हणजे काय? ललितकला आणि ललित वाङ्मय, प्रतिभा, भाववाणी, वाङ्मय आणि नीती, वाङ् मयातील प्रतिबिंबे, कला हीच कसोटी, साहित्याची परिभाषा, साहित्यातील युगकल्पना, मराठी वाङ्मयाची जीवन मूल्ये, ललित वाङ्मयाची जीवन मूल्ये', ललित वाङ्मयातील वास्तव सास्मित समाधी - या सर्व साहित्य विषयक प्रश्नांचा खल माडखोलकरांनी केला आहे. अनेक कलाकृतींच्या परीक्षणातून, वृत्तपत्राच्या माध्यमातून माडखोलकरांनी मांडला आहे. त्यात जीवनभाष्य जसे उतरले आहे तसेच वाङ्मय भाष्यही उतरले आहे. अशी व्यापक वाङ्मय आणि जीवन यांची मीमांसा माडखोलकर करतात. ही भूमिका स्वीकारल्यामुळे समाजकारण, राजकारण, संस्कृतिकरण यांच्या अनुषंगाने साहित्य मीमांसा माडखोलकर करतात. साहित्य हा संस्कृची चा दर्पण आहे ही त्यांची भूमिका होती. 'जीवनाइतके वैचित्र्यपूर्ण दुसरे काही नाही या वैचित्र्यपूर्ण जीवनातील हृद्य व रम्य वाटणाऱ्या भागाचे कल्पनेच्या साहाय्याने व शब्दांच्या साधनाने केलेले चित्रण म्हणजेच ललित वाङ्मय' असा जीवन आणि साहित्याचा समन्वय माडखोलकर अपेक्षितात. इतर ललित कलांच्या मानाने ललित लेखनकला ही अधिक संस्कार सुलभ

असते. शब्द हे भावाष्किाराचे माध्यम आहे आणि ते परंपरायुक्त व समाजसापेक्ष असते. म्हणून लेखनकला ही जीवनाला व समाजाला बांधलेली असते. वास्तवाशी कलेचे इमान प्रतिबिंब स्वरुप नसून परिवर्तनाच्या स्वरुपाचे असावे. कलेने राष्ट्राभिमान जागृत करावा आणि व्यक्ति स्वातंत्र्याचीही जोपासना करावी ही माडखोलकरांची विचारधारा त्यांच्या समग्र साहित्याचे सूत्र आहे, अनुभव केंद्र आहे.

साहित्य मीमांसेच्या संदर्भात न. चिं. केळकर यांना माडखोलकर गुरुस्थानी मानतात पण त्यांच्या सविकल्प समाधीच्या सिद्धांतावर लिहिताना मात्र माडखोलकरांमधील वर्धिष्णू टीकाकार प्रभावी ठरला आहे. सास्मित समाधीची उपपत्ती त्यांनी मांडली- यावरुन लौकिक जीवनातील स्नेह, मैत्री, आदर आणि साहित्य मीमांसा यात माडखोलकरांनी गल्लत केली नाही. ‘भावगंधावर, आक्षेप घेऊ नही डॉ. देशमुखांचे माडखोलकर अखेरपर्यंत ज्येष्ठ स्नेही आणि हितचिंतक होते. त्यांचा दुसरा सिद्धांत म्हणजे साहित्याचे साफल्य अनुकृतीत नाही. पुनःप्रत्ययात नाही तर जीवनातील अमानुष उदात्तता व उदात्त अमानुषता येण्यात आहे असा प्रतिपक्ष ना. सी. फडके यांच्या पुनःप्रत्ययाचा आनंद या प्रयोजन विचारात माडखोलकर करतात. ललित वाङ्मयातील वास्तव हेच मुळात अद्‌भुत आणि अवास्तव असते. लौकिकाच्या प्रभावाखाली असलेल्या मानवी मनाला अलौकिकाचा आस्वाद देणे व त्याच्या उद्‌बोधनाने मानवी मनाचा विकास घडवून आणणे हेच श्रेष्ठ साहित्याचे प्रयोजन आहे. अभिनवगुप्त आणि क्षेमेंद्र यांच्या विचारातून त्यांनी ही संकल्पना सिद्ध केली आहे. जगातील कोणतीही विचारप्रणाली आणि मतप्रणाली ही कलेचा विषय होऊ शकेल पण कलेचा निकष तिने स्वतःला म्हणवून घेउ नये अशी रास्त ताकिद माडखोलकर देतात. कारण इंग्रजी आणि संस्कृत या दोन्ही साहित्य शास्त्रीय परंपरांचा दांडगा व्यासंग त्यांच्याकडे आहे. वाङ्मय आणि नीती याविषयीही माडखोलकर स्पष्ट विचार मांडतात. मानवी प्रकृतीच जर सत्व-रज-तप अशी त्रिगुणात्मक आहे तर वाङ्‌मयही तसे का असू नये? केवळ सत्वशीलता कशी अपेक्षित येईल? असा मूलगामी प्रश्न अनेक ठिकाणी माडखोलकर प्रगट करतात. माडखोलकरांनी विविध ‘साहित्य समस्यांचा’ शोध घेतला आहे. त्यांच्या याच शीर्षकाच्या ग्रंथात साहित्य मीमांसा आणि आस्वादन याविषयी माडखोलकर चर्चा करतात. ‘साहित्य शलाका’ मध्येही आपण आस्वादक समीक्षा केली पण ती परीक्षणवजा का झाली याचा शोध माडखोलकरांनी घेतला आहे. माडखोलकरांनी आपल्या कादंबऱ्यांना विस्तृत प्रस्तावना लिहून या कादंबऱ्या कशा वाचाव्या याची समज वाचकांना दिली आहे. त्याचप्रमाणे विमर्शात्मक ग्रंथांच्या प्रास्ताविकातूनही आपली वाङ् मयविषयक भूमिका विशद केली आहे. तिच्यात काळानुरुप फारसा बदल घडून आला आहे असे मात्र नाही.

उद्‌बोधन आणि नवप्रत्यय, साहित्य निर्मितीत कोणत्या मनःशक्ती कार्यरत असतात आणि ती निर्मिती सास्मित समाधीतून होते का? साहित्यातील विविध प्रवृत्ती कोणत्या असतात आणि त्या का निर्माण होतात आणि त्यांच्या साहित्याच्या स्वरुपाशी कोणता संबंध असतो आणि साहित्यनिर्मिती करणारा लेखक हा प्रतिभा स्वतंत्रतेने साहित्य निर्मिती करणारा असावा अशी अपेक्षा माडखोलकरांनी ठेवलेली दिसते. यावरुन साहित्य म्हणजे काय? साहित्य निर्मितीत कल्पनाशक्तीचे स्वरुप कसे असते? साहित्याच्या वर्गीकरणाचे तत्व कोणते या साहित्यशास्त्रीय प्रश्नांचा विचार माडखोलकरांनी केलेला नाही. साहित्याचा मूल्यविचार, साहित्य आणि इतर ललित कला या विषयी निसटते निष्कर्ष माडखोलकर नमूद करतात.

अनुक्रमणिका

मराठीमध्ये साहित्यशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र यांची एकपोती अभिव्यक्ति झाली नाही याची हळहळही माडखोलकर नमूद करतात. ते म्हणतात, 'साहित्यशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र यांच्याही बाबतीत विचार आणि परिभाषा यांचा गोंधळ मराठीत झालेला आहे. भरताच्या नाट्यशास्त्रात साहित्याबरोबर इतर ललितकलांचा विचार हा नाट्याची उपांगे म्हणून झाला आहे.' भरताप्रमाणे ॲरिस्टॉटलनेही सर्व ललितकलांना पायाभूत असलेले सौदंर्य तत्व त्याच्या अनुषंगाने काव्य कलेबरोबर इतरही कलांचे विवरण केले आहे. पाश्चात्य साहित्य शास्त्राचा आणि सौंदर्यशास्त्राचा जसा विकास झाला तसा मराठीत झाला नाही असे माडखोलकरांना वाटत होते. श्रेष्ठ साहित्याविषयीही माडखोलकर म्हणतात, 'विदग्ध साहित्यातील वास्तव हे जितके अमानुष आणि अद्‌भुत, पण त्याबरोबरच भव्य आणि उदात्त असेल तितके ते साहित्य थोर! कोणतीही साहित्यकृती ही नुसती सुबक,सुंदर, मोहक किंवा रमणीय असून भागत नाही. व तिच्यापासून करमणूक, रंजन, विश्रांती, विरंगुळा किंवा आनंद प्राप्त होऊनही मनाचे सामाधान होत नाहीत तर चित्तवृत्ती थरारुन सोडणारा, हृदयाचा थरकाप करणारा किंवा मनाला आणि बुद्धीला विश्वातील अलौकिकाचा साक्षात्कार घडविणारा अद्‌भुताचा अंश ज्या प्रमाणात त्या साहित्यात असेल त्या प्रमाणात ते 'लोकोत्तर चमत्कार प्राण साहित्य' थोर ठरते," ही माडखोलकरांची विधाने आज जशीच्या तशी कुणीही स्वीकारणार नाहीत. पण आक्रमकपणे विचार प्रदर्शन हा माडखोलकरांच्या ठिकाणचा जो पत्रपंडित आहे त्याच्या ईर्ष्येतून ही आक्रमकता सिद्ध झाली आहे. 'साहित्य हा संस्कृतीचा जसा दर्पण आहे तसाच मानवी अस्मितेचा अत्युच्च आविष्कार आहे' असाही माडखोलकर आध्यात्मिक पातळीवर सास्मित समाधीचा ऊहापोह करतात. साहित्याच्या रसास्वादाची प्रक्रिया हा सुद्धा अस्मितेचाच विलास आहे म्हणजे असे की कवीची अस्मिता ही आपल्या आविष्काराने ज्यावेळी रसिकाच्या अस्मितेचे उद्‌बोधन करते त्यावेळी कवी आणि रसिक हे तादात्म्याच्या समान भूमिकेवर येऊन रसास्वादाचा आनंद रसिकाला लुटता येतो. साहित्याचा निर्माता आणि भोक्ता यांची रसास्वादाची समाधी ही उत्पत्ती आणि उपभोग यावेळी स्वयमेव लागते ती समाधी सास्मित समाधी म्हणजे अस्मिता युक्त समाधी होय. मीपणाच्या जाणिवेने युक्त पण अहंकारापासून मुक्त, साक्षीनिष्ठ आणि प्रकृतिनिष्ठ, अन्तर्मुख आणि बहिर्मुख अशी जी दुहेरी अस्मितायुक्त समाधी ती साहित्याचा निर्माता व भोक्ता या दोघांनाही ब्रह्मास्वाद आणि रत्यास्वाद या दोहोंचा केवळ सहोदर अशा अलौकिक आनंदाचा साक्षात्कार घडवून देते.' या ठिकाणी माडखोलकर आध्यात्मिक परिभाषेत वाङ्मयानंदाची उपपत्ती सांगण्याच्या प्रयत्नात आहेत. कविगत आणि रसिकगत साधारणीकरणाची अपेक्षा त्यांना अभिप्रेत असावी असे स्पष्ट दिसते पण ती परिभाषा माडखोलकर उपयोजित नाहीत. मीपणाची जाणीव, अहंकार, साक्षिनिष्ठ आणि प्रकृतिनिष्ठ ही सारी परिभाषा अध्यात्मशरण अशी परिभाषा आहे. यावरुन माडखोलकरांच्या प्रतिभेचा पैस कसा व्यापक आणि सखोल होता हे लक्षात येईल. त्यांना वाङ्मय विषयक एक मर्मदृष्टी होती आणि ती इंग्रजी, संस्कृत भाषेतील वाङ्मयाच्या चिंतनातून प्रगल्भ झाली होती. वादळी झंझावाताप्रमाणे आपली मते मांडीत जाणे ही त्यांची शैली होती. त्यासाठी विपुल पुरावे, आधारग्रंथ, विचारप्रणाली यांचे उपयोजन माडखोलकर नीटस करीत गेलेत. त्याचा परिणाम असा झाला की माडखोलकरांची समीक्षा आणि साहित्य विचार हा तपशीलबहुल आणि वाचनीय झाला आहे. सूक्ष्म तपशील, चरित्रात्मक माहिती, समकालीन वातावरण, विषयाचे वैशिष्ट्य यांचा यथासांग परामर्ष माडखोलकरांनी विस्ताराने केलेला आहे. वाचनीयता हा त्यांच्या साहित्यविमर्शाचा गुणधर्म आहे.

अनुक्रमणिका

माडखोलकरांनी मराठी समीक्षेलाही समृद्ध केले आहे. त्यात चरित्रात्मक समीक्षा ही अधिक समृद्ध केली. माडखोलकरांनी चरित्रात्मक, ऐतिहासिक, सृजनशील, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय अशा अनेक समीक्षा प्रकारातून समीक्षा केली आणि त्यातही स्ववाङ्मय विषयक चिकित्साही भरपूर केलेली आहे.

**चरित्रात्मक समीक्षा** –

व्यक्तिरेखा, श्रद्धांजली, व्यक्ति तितक्या प्रकृती, कोल्हटकर, चिपळूणकर, आंबेडकर, ना. भा. खरे, डॉ. राघवेंद्रराव, दयानंद सरस्वती, सयाजीराव गायकवाड, धोंडो केशव कर्वे, जमनालाल बजाज, मा. ज. कानेटकर, दादा धर्माधिकारी, गणपतराव बोडस, पु. रा. लेले, हिराबाई, काकासाहेब गाडगीळ, खाडिलकर, काका कालेलकर, ना. सी. फडके इत्यादि विविध क्षेत्रातील विचारवंतांवर माडखोलकरांनी लेखन केले आहे. त्या त्या व्यक्तिमत्वाची जडणघडण, त्याच्यावरील संस्कार, त्यांचे कर्तृत्व, जन्म मृत्यू, शैक्षणिक पात्रता, विचारसरणी, आवडीचे विषय असा सारा तपशील पुरवून माडखोलकर व्यक्तिरेखाटन करतात. त्यातही आजूबाजूचे वातावरण, संस्कृती, स्त्रीपुरुष यांचेही चित्रण माडखोलकरांच्या लेखातून येत असल्यामुळे व्यक्तिरेखांचे यथातथ दर्शन घडविले गेले आहे. वरील काही व्यक्तींचा निकट सहवास माडखोलकरांना मिळाला होता. काही व्यक्तिरेखांचा संस्कार त्यांनी स्वीकारला होता कलावंत, राजकारणी, वक्ते, समाजशिक्षक यांचे दर्शन 'व्यक्तिरेखा', 'श्रद्धांजली', 'अवशेष' ग्रंथात लेख विषय झालेल्या व्यक्तिचित्राविषयीची गुणग्राहकता, मर्यादा, स्वभावविशेष यांचा स्पष्ट निर्देश आलेला असतो. सखोल चिंतनापेक्षा सर्वांगीण तपशीलवार माहिती पुरविणे यावर माडखोलकरांचा भर असतो त्यामुळे त्यांचे हे ग्रंथ आज तत्कालीन मराठी अस्मितेचा आणि वातावरणाचा असा दस्तऐवज ठरतो. माडखोलकरांनी मराठीतील चरित्रात्मक समीक्षा निश्चितच समृद्ध केलेली आहे पण वाचकांचे आणि अभ्यासकांचे जावे तसे लक्ष त्यांच्या या चिंतनाकडे गेलेले नाही. 'विलापिका' हा माडखोलकरांचा सुरवातीला ग्रं थ होता पण 'श्रद्धांजली' 'व्यक्तिरेखा' या ग्रंथात आलेले मृत्युलेख याच्यांशी त्याचे साम्य आहे. स्मृतिलेख, मृत्युलेख कसे लिहावेत यांचा वस्तुपाठ माडखोलकरांच्या या ग्रंथातून मिळतो.

चरित्रात्मक समीक्षेप्रमाणेच माडखोलकरांनी स्वसाहित्य निर्मितीचा, सृजनप्रक्रियेचा शोध घेतला आहे तोही वेगवेगळ्या निमित्ताने! 'माझे आवडते लेखक', 'माझे आवडते कवी', 'माझे लेखन गुरु', 'मी आणि माझे साहित्य', 'माझे कादंबरी लेखन', 'मी आणि माझे लेखन', 'माझी साहित्यिक वाटचाल', 'मी आणि माझे वाचक', 'माझी नभोवाणी ', 'माझे आवडते लेखक' या सर्व ग्रंथातून लेखक म्हणून माडखोलकरांशी झालेली जडणघडण, व्यक्तींविषयीची सहृदयता, लौकिककार्य मनावर होणारा परिणाम याविषयी माडखोलकरांनी अतिशय विस्ताराने लिहिले आहे. तसेच त्यांनी जे जे वाङ्मय प्रकार हाताळले त्याविषयी विपुल लिहिले आहे. पैकी आपल्या लेखन गुरुंविषयी (वृत्तपत्र+साहित्य) खूप लिहिले आहे. आणि त्या त्या व्यक्तित्वांचा आपल्यावर कोणता आणि कसा परिणाम झाला याचाही तपशीलवार विचार मांडला. स्वतःच्या साहित्याची मीमांसाही माडखोलकरांनी अतिशय प्रामाणिकपणाने केली. वृत्तपत्रीय लेखन हा त्यांचा आनंददायक आविष्कार आहे तर कादंबरी लेखन हे सौ. शांताबाईंच्या सांगण्यावरुन आणि अर्थ प्राप्तीसाठी केले असे ते प्रांजळपणाने कबूल करतात. वाङ्मयाकडे आणि स्वतःच्या साहित्याकडे माडखोलकर कोणत्या दृष्टीने बघतात यावरही प्रकाश पडतो. नभोवाणीवरुन दिलेली व्याख्याने, व्यासपीठांवरुन दिलेली व्याख्याने नैमित्तिक स्वरुपाची आहेत. आणि त्यात स्व साहित्य, साहित्य विषयक समस्यांविषयीचे चिंतन माडखोलकरांनी केलेले आहे.

अनुक्रमणिका

स्मृतिलेख, मृत्युलेख, व्यक्तिचित्रणात्मक लेख, समकालीन महत्वाच्या कलाकृतींची परीक्षणे, वाङ्मयीन समस्यांचे उद्घाटन करण्यात माडखोलकर यशस्वी ठरले आहेत. तसेच माडखोलकरांनी वैचारिक निबंध लेखनाला एक नवी उंची आणि अर्थपूर्णता दिली. चरित्रात्मक समीक्षेचे निकष सिद्ध केले. साहित्यशास्त्र आणि वाङ्मयीन समीक्षा यांचे सिद्धांत आपल्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला. वर्ण्य व्यक्ती विषयीची गुणग्राहकता आणि साहित्य समस्यांविषयीचा जिव्हाळा यामुळे माडखोलकरांचे सारेच लेखन वैचारिक निबंध सदृश्य झाले असून त्याची वाचनीयता विशेष लक्षात राहण्यासारखी आहे. टीकात्मक लेखनाने माडखोलकरांनी आपली वाङ्मयीन कारकीर्द सुरु केली पण माडखोलकर वाचकांच्या लक्षात राहिले ते वृत्तपत्रपंडित आणि कादंबरीकार म्हणूनच! या दोन्ही क्षेत्रातील त्यांचे योगदान विलक्षण आहे.

माडखोलकर हे राजकारणाचे आणि समाजकारणाचे अंतरंगदर्शन आपल्या साहित्य निर्मितीतून आणि साहित्य विचार दर्शनातून घडविणारे लेखक आहेत. ते आपल्या काळाचे साक्षीदार ठरले आहेत. अनेक नेत्यांचे राजकीय चढउतारांचे खेळ माडखोलकरांनी फार जवळून बघितले आहेत. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यातून घडले आहे. पण त्या व्यक्तित्वाविषयी लिहितांना मात्र औचित्यभंग होऊ दिलेला नाही. क्रौर्य, गटबाजी, कारस्थाने, मनाचा हिणकसपणा, सत्तेचा उन्माद, भोग विलास इत्यादि राजकारणातील भ्रष्टतेचे प्रतिबिंब कादंबरीत उमटले आहे तर श्रद्धांजली लेखातून वृत्तपत्रीय चौकटीत माडखोलकरांनी तपशीलवार माहिती पुरविली आहे. व्यासंगी वृत्ती, सूक्ष्म निरीक्षण आणि वर्ण्य विषयासंदर्भातील अथांग आदर यामुळे माडखोलकरांचा साहित्य विचार ऐसपैस आणि संस्कृत इंग्रजी निकषांच्या अंगाने जाणारा झाला आहे. प्रस्तावना, परीक्षणे आणि वृत्तपत्रांची मागणी या प्रेरणेतून माडखोलकरांचे टीकात्मक लेखन झाले आहे. त्यामुळे वृत्तपत्र चौकटीच्या मर्यादा माडखोलकरांच्या लेखनावर पडल्या. माडखोलकरांनी 'स्वैर विचार' मांडले. ग्रंथकार, कलाकृती, कालखंड, प्रवृत्ती, वाङ्मय प्रकार यांचा विचार वृत्तपत्राच्या मर्यादेत माडखोलकरांनी केलेला आहे. एक शस्त्र म्हणून माडखोलकरांनी आपल्या साहित्य चिंतनाकडे बघितले आहे. चिंतनशीलता आणि गांभीर्य यापेक्षा तपशील बहुलता आणि आक्रमकता यावर माडखोलकरांचा समस्या सोडविण्यात भर होता. साहित्याकडे पाहण्याची दृष्टी आणि जीवनावर साहित्याचा होणारा परिणाम असा शोध माडखोलकर घेतात. माडखोलकरांचा गोष्टीवेल्हाळ स्वभाव त्यांच्या टीकात्म लेखनातही उतरला आहे. त्याचा परिणाम म्हणजे माडखोलकरांच्या लेखनाला एक प्रकारची प्रत्यक्षता आलेली आहे. कल्पनारम्यतेच्या आविष्कारातुरतेतून जशा त्यांच्या कादंबऱ्या नटल्या आहेत तशी साहित्य दर्शनातूनही कल्पनारम्यता डोकावते. राष्ट्रवाद, इतिहासा विषयी विलक्षण प्रेम, संस्कृती विषयीचा सार्थ अभिमान, कला आणि जीवन यांच्या समन्वयाची धडपड, बहुश्रुतता यांचे प्रतिबिंब माडखोलकरांच्या ललित साहित्यातून जसे उमटले आहे तसेच ते टीकात्म लेखनातूनही उमटले आहे. आकर्षक मांडणी आणि तपशीलाची विपुलता यामुळे माडखोलकरांचे टीकात्मक लेखनही लोकप्रिय ठरते पण चिंतनशील सैद्धांतिक पातळीपर्यंत पोहोचले नाही. परस्पर विरोधी सिद्धांत तितक्याच जिव्हाळ्याने माडखोलकर मांडत की वाचकाची फसगत होण्याची शक्यता असते.

माडखोलकरांनी केलेला साहित्य विचार हा कला आणि जीवन यांचा संबोध तपासणारा साहित्यविचार ठरतो. त्याचे स्वरुप सलग एकसंध एकपोती असे नाही तर त्रुटित पद्धतीने तो त्यांच्या सर्व ग्रंथात विखुरलेला आहे. त्याच्या विचारांमागे असलेली भूमिकाही एकसंध अशी नाही. त्या त्या काळातील विचारप्रणालींचा प्रभाव माडखोलकरांच्या भूमिकेवर पडलेला दिसून येतो. माडखोलकरांच्या साहित्य विचारांचे स्वरुप संकल्पनात्मक

सैद्धांतिक मांडणीचे नसून सृजनशील कलावंताने केलेला तो साहित्य विचार आहे. कलाविषयक आणि साहित्य विषयक चिंतन प्रातिक स्वरुपाचे असे स्वतंत्र आहे. मळलेल्या वाटेने जाणारे नाही. काहीशी गूढता निर्माण करणारे असे आहे. काही वेळा विरोधाभासावर तो कलाविचार आधारलेला असतो. कलेच्या स्वरुपासंबंधी साक्षात्कारी जाणीव आध्यात्मशरण होतांना दिसते. त्यामुळेच माडखोलकरांचा कलाविचार जीवन विचार आणि साहित्य विचार व्यापक आणि ऐसपैस असा होतो. तो गोळीबंद रेखीव आखीव असा असत नाही. त्यामुळे माडखोलकरांच्या साहित्य विचारांची तर्कसंगत मांडणी करणे कठीण होऊन जाते.

माडखोलकरांनी केलेला साहित्य विचार एकीकडे तो मानवी संस्कृतीच्या विचारांवर आधारलेला आहे तर दुसरीकडे त्याला अद्वैताची चैतन्य तत्वाची पार्श्वभूमी आहे. माडखोलकर स्वतः कवी, कथाकार, निबंधकार, कादंबरीकार, वृत्तपत्रपंडित असे आहेत. त्यांच्या साहित्य निर्मितीचा अनुभव विपुल आणि विविधतापूर्ण आहे. त्याची रसिकताही व्यापक आहे. त्यांनी पौर्वात्य पाश्चात्य, प्राचीन अर्वाचीन, अक्षर साहित्याचे परिशीलन केलेले आहे. विविध कला प्रकारातील कलाकृतींचा आस्वाद घेतलेला आहे आणि त्यांनी आपली रसिकता प्राचीन- अर्वाचीन आणि पौर्वात्य पाश्चात्य समीक्षेतून व्यक्त केली आहे. त्यांनी विशिष्ट ज्ञानशिस्तींचा आणि विद्याशाखांचा पद्धतशीर अभ्यास केलेला नसला तरी त्यांच्या विवेचनाला साहित्यादी कलांप्रमाणे विज्ञान, तत्वज्ञान, अध्यात्म आणि मानसशास्त्र यांची थोडीफार पार्श्वभूमी आहे. त्यातही त्यांच्या साहित्य विचारावर आणि कला विचारावर औपनिषदिक जीवन चिंतनाची छाया अंधुक स्वरुपात दिसते. आपल्या विचारांना पुष्टी देण्यासाठी ते साहित्यशास्त्रीय किंवा कला मीमांसेतील संदर्भ न देता त्या ऐवजी उपनिषदे, रामायण, महाभारत, मोरोपंतांचे आर्याभारत आणि पाश्चात्य कलावंत लेखकांचा अवतरणांचा कौल लावतात त्यामुळे भावशुष्कता अशी त्यांच्या लेखनाला येत नाही. विचार आणि भावना यांच्या संगमातून भावनेला झुकते माप मिळत माडखोलकरांचा साहित्य विचार आविष्कृत होतो आणि त्याला आधार असतो तो जीवनावरील आणि साहित्यावरील बळकट श्रद्धेचा. या व्यक्तिमनावर पाश्चात्य ज्ञानाचे आणि साहित्याचे संस्कार झाले असले तरी त्यांचा भारतीय पिंड त्यांच्या आग्रही आणि आक्रमक विचार दर्शनातून दिसून येतो.

माडखोलकरांनी केलेला साहित्य विचार असा बहुपेढी आहे. साहित्य तत्व मीमांसेपासून उपयोजित समीक्षेपर्यंत तो पसरलेला आहे. साहित्य तत्वमीमांसा करताना साहित्याचे प्रयोजन, काव्यकारण, काव्यलक्षण, अलंकार विचार, औचित्यविचार, कलावंताचे स्वातंत्र्य, जीवन आणि साहित्य यांचा अनुबंध व त्यातून निर्माण होणारी वाङ्मयमूल्ये आणि जीवनमूल्ये यांचा विचार कलेच्या अंगाने आणि जीवनाच्या अंगाने माडखोलकरांनी केला आहे. तर कादंबरीतून विदर्भाचा सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास राजकारणासह मांडला आहे. साहित्य हे समाज प्रबोधनाचे साधन आहे. ते एक शस्त्र आहे अशी त्यांची धारणा होती. कल्पनापूरित राष्ट्रवादाचा पुरस्कार त्यांनी आपल्या साहित्यातून केला. ते जसे वृत्तपत्र विद्याशास्त्राचे भीष्माचार्य ठरतात तसेच वाङ्मयाच्या बाबतीत विदर्भाचे विष्णुशास्त्री चिपळूणकर ठरतात! अभ्यासकांच्या अभ्यासासाठी माडखोलकरांनी आपल्या लेखनातून अनेक दिशा आणि मार्ग दाखवून दिले आहेत. त्या दिशांनी आणि मार्गाने आजच्या अभ्यासकांनी साहित्य विचार पुढे नेला पाहिजे इतकेच! ‘वर्तमानपत्राची कचेरी म्हणजे मानवी स्वभावाचे ज्ञान संपादन करण्याची उत्तमशाळा आहे’ हे विधान माडखोलकरांनी पूर्णतः आत्मसात केले होते. बर्नाड शॉने म्हटले होते ‘वृत्तविशारद हा उत्कृष्ट साहित्यिक असावा आणि तरीही त्याने साहित्यापेक्षा वर्तमानपत्राच्या धंद्यात अधिक गोडीने लक्ष घालावे’ माडखोलकरांना ही विधाने चपखल लागू पडतात. शि. म.

परांजपे यांच्या भाषेतील विदग्ध पांडित्य, चिपळूणकरांचा राष्ट्रवादाविषयीचा अभिमान, केळकरांची चतुरस्रा आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची कलामीमांसा यांचा मनोज्ञ संगम माडखोलकरांच्या टीकात्मक लेखनात उतरलेला आहे. १९३६ नंतरचे मराठी साहित्य त्यांनी फारसे वाचलेले नव्हते असा तपशील त्यांच्या लेखनात आला आहे. त्यावरुन आधुनिक साहित्यशास्त्र आणि नवसमीक्षा याविषयी माडखोलकरांनी विचार केलेला नाही. स्वतःच्या काळाशी आणि साहित्याच्या पूर्वपरंपरेशी माडखोलकर एकनिष्ठ राहिले.

⁂⁂⁂

## | माडखोलकरांच्या काही प्रस्तावना |

------------------------------------------------------------------डॉ. श्री. प्र. कुळकर्णी

गजानन त्र्यंबक माडखोलकर हे महाराष्ट्रातील आधुनिक पाच शैलीकारांपैकी एक होत. ते सव्यसाची संपादक, निर्भिड पत्रकार, व्यासंगी टीकाकार, राजकीय कादंबरीकार म्हणून गाजले. मांडखोलकरांनी एकूण एकोणीस कविता, अठरा कादंबऱ्या, दोन कथा संग्रह, एक नाटक, सत्ताविस प्रबंध, शेकडो अग्रलेख व तेवढेच अन्य लेख लिहिले. त्यांनी आपल्या जवळ जवळ सर्वच ग्रंथाना प्रस्तावना लिहिल्या. इतर लेखकांच्या ग्रंथांनाही प्रस्तावना दिल्या. सर्वच प्रस्तावना मनोवेधक आहेत. गांधीवधोत्तर जाळपोळीत त्यांचे मौलिक संग्रह नष्ट झाले. त्यांच्या सर्व प्रस्तावनांचा मागोवा त्यामुळे शक्य झाला नाही. प्रस्तुत लेखात प्रस्तावना, भूमिका, निवेदने किंवा तत्सम सर्व मनोगते, 'प्रस्तावना' या शीर्षकांतर्गतच घेतल्या आहेत. त्यांच्या अनेक प्रस्तावना गाजल्या. त्यांचे गुरु श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी त्या बाबतीत माडखोलकरांची प्रशंसा केली. श्री. यशवंतराव चव्हाणांनी म्हटल्याप्रमाणे, 'भाऊसाहेबांची प्रस्तावना म्हणजे स्वतंत्र संशोधनात्मक प्रबंधच' होय. प्रत्येक लेखकाच्या लेखनात त्याचे व्यक्तिमत्व व त्याचे जीवन संदर्भ उमटत असतात. काही विशेष व्यक्तीचा प्रभावही प्रत्यक्षाप्रत्यक्ष उपस्थित असतो. माडखोलकरांसारखे महान लेखकही त्याला अपवाद नाहीत. त्यांचे संघर्षमय आयुष्य व त्यांच्यावरचा कोल्हटकरांचा प्रभाव प्रस्तावनेतही दिसतो. कोल्हटकरांप्रमाणोच नव लेखकांना सर्वतोपरी मदत माडखोलकर करीत. त्यातही उपेक्षितांकडे त्यांचा ओढा जास्त होता. कोल्हटकराविषयी ते स्वतःच सांगतात, "जीवन आणि साहित्य याकडे अगदी नवीन दृष्टीने पाहण्याची तार्किक काटेकोरपणे विचार करण्याची शिकवण त्यांनी मला दिली.... व्यासंग, बहुश्रुतपणा, बुद्धिवाद, समतोलपणा, गुणदोष विवेचनातील बारकावा आणि प्रत्येक प्रमेयाच्या मुळाशी जाऊन चर्चा करण्याची प्रवृत्ती या कोल्हटकरी गुणांची छाप माझ्यावर पडली." ज्या रविकिरण मंडळाचे रवी म्हणून त्यांचा उल्लेख सुप्रसिद्ध समीक्षक द. भि. कुळकर्णी करतात त्या मंडळाचे संस्कारही त्यांच्यावर आहेत. या सर्व मुशीतून उतरलेल्या काही प्रस्तावना वाचकांपर्यंत पोहचविण्याचा एक प्रयत्न येथे केला आहे.

प्रस्तावना हा वेगळा साहित्य प्रकार आहे किंवा नाही हा वादाचा विषय असू शकतो. पण प्रस्तावनांचे साहित्यातील स्थान महत्वपूर्ण आहे हे निर्विवाद सत्य. डॉ. आळतेकर या संदर्भात एके ठिकाणी म्हणतात, "वधूला जशी पाठराखीण तशी ग्रंथाला प्रस्तावना". ग्रंथाच्या मूळ भागात आपली भूमिका व्यक्त करण्याची संधी असतेच असे नाही. लेखकाने रंगवलेले प्रत्येक पात्र लेखकाचे मनोगतच बोलते असा एक समज अनेक गैरसमजांना कारणीभूत ठरतो. लेखन वैचारिक असते त्यावेळी नेमकेपणाने लेखकाची मूल्यनिष्ठा, आणि लेखन प्रयोजन स्पष्ट करण्यास प्रस्तावना उपयोगी ठरतात. ललित लेखनात वेगवेगळ्या स्तरावरचा कल्पना विलास अभावित वा अनाभावितपणे लेखक करित असतो. प्रस्तावनेत मात्र तो केवळ बुद्धीगम्य किंवा वास्तवाच्या पातळीवर वावरतो. तटस्थता व विवेक यांचा वापर करण्याची संधी लेखकाला येथे असते. प्रामाणिक लेखक अशा प्रस्तावनातून वाचकांपर्यंत पोहचत असतो. खुलासे करण्याची जागा म्हणूनही प्रस्तावनेचा वापर अनेकदा होतो. इतिहास दृष्ट्या हे सर्वच मौलिक असे पुरावे असतात. छेदक संदर्भ (इंग्रजीत ज्याला क्रॉस रेफरंस् म्हणतात) तपासून पाहण्यासाठी त्याची फार मदत होते. स्वतःच्या कृतींना दिलेल्या प्रस्तावना लेखकाची निर्मिती प्रक्रिया उघड करीत असतात. आत्मचरित्रात्मक आठवणी तेथे आढळतात. माडखोलकरांच्या काटेकोरपणामुळे या सर्व संदर्भांची मौलिकता वाढली आहे.

अनुक्रमणिका

इतरांच्या ग्रंथांना दिलेल्या प्रस्तावना वैचारिक क्षेत्रात अनेक लेखकांना प्रकाश झोतात आणतात. नावरुपाला आणतात. महनीय इतिहासकार शेजवलकर पुढे आले ते त्यांनी रियासतकार सरदेसायांच्या नानासाहेब पेशवे या ग्रंथाला दिलेल्या प्रस्तावनेमुळे. प्रस्तावनाकार मूळ कृतींना सुलभ करण्याचे, त्याच्या सौंदर्य आकलनात वाढ करण्याचे काम तर करतातच, त्याचवेळी वाचकांना समीक्षा पाठही देतात. उमेदवार लेखकाचे मनोबल वाढवण्याचे कार्यही या प्रस्तावना करतात. विदर्भात ही परीपाठी माडखोलकरांनी आणली असे म्हणणे वावगे होवू नये. पुढे ती परंपरा डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. सुरेश डोळके, सौ. उषाताई देशमुख आदींनी समोर नेली.

विलापिका हा त्यांचा एक उत्कृष्ट प्रबंध. माडखोलकर वैचारिक लेखनाला प्रबंध म्हणतात. या ग्रंथाची प्रस्तावना अत्यंत अभ्यासपूर्ण, नवोदितासाठी अनुकरणीय आहे. इ. स. १९६६ ला पुनर्लेखित मोठ्या आवृत्तीला माडखोलकरांनी विस्तारपूर्वक निवेदन जोडले. एलेजी (विलापिका) या काव्य प्रकाराचे मर्म त्यात मांडले आहे. मराठीतील ऐलेजी व आंग्ल यांची तुलना हा प्रस्तावनेचा मुख्य विषय आहे. विस्तृत विवेचनाचा तो अत्यंत बोलका सारांश आहे. माडखोलकर प्रा. ताकाखाव यांचे मत उधृत करतात की, “एलेजीचे महत्व मानवी जीवन आणि नियती यांच्या संबंधीच्या चिंतनाचे वाहन होऊन बसले आहे. जीविताची नश्वरावरील श्रद्धा, आत्मानात्मविचार, मरणोत्तर स्थिती इत्यादि, आध्यात्मिक प्रश्नांचाही विचार ओघाने या काव्यातून केलेला असतो” या पार्श्वभूमीवर माडखोलकर अभिप्राय देतात, “एरवी,....... टेनिसन आणि व्हिटमन यांच्या विलापिकांशी तुल्य असे मराठीत काही नाही” न्या. रानडे, लो. टिळक, म. गांधी यांच्या सारख्या थोरा मोठ्यांवर अशी विलापिका का रचली जावू नये, ही त्यांची खंत आहे. राष्ट्र हा विलापिकेचा विषय का नसावा? असा प्रश्न करुन ते म्हणतात, “स्वतःला किंवा एकमेकांना शेले, किंवा कीटस् वगैरे म्हणण्यात धन्यता मानणारे असे काही का लिहून जात नाहीत!” यात तीन अर्थ अध्याहृत आहेत. १ टेनिसन, व्हिटमन तोडीचे लेखक आमच्यात नाहीत. २. एलेजी प्रकार मराठीत रुजला नाही ३. मराठीतील एलेजी सखोल नाही. पैकी पहिले तथा तिसरे विधान मराठी कवींवर अन्याय करणारे आहे. उदाहरणार्थ माडखोलकरांनी आयर्लंड मधील देशभक्तीपर गीतांचा समावेश विलापिकेत (स्वतःच स्वीकारलेल्या परिभाषेच्या कक्षेबाहेर जाऊन) केला आहे. तेव्हा, स्वातंत्र्यवीरांनी मातृभूमीच्या प्रेमाने सागराला घातलेली आर्त साद या सर्व टेनिसन बायरन प्रभृतींना विसरायला लावणारी आहे, हे माडखोलकरांनी लक्षात घेतले नाही. शिवाय, मराठी काव्य प्रकारांना लाभलेले अध्यात्म पाश्चात्य कवींना लाभलेल्या अध्यात्मापेक्षा अधिक परिपूर्ण अधिक सर्वांगीण असे आहे. त्यांना मृत्यू कोडे वाटत नाही. मृत्यू आनंदयात्रा वाटते. विलापाची बाब नव्हे. प्रत्यक्ष ईश्वराशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुकाराम-नामदेवाची परंपरा लाभलेल्या मराठी काव्याला लौकिकातील सुख दुःखे गौण वाटली तर नवल नाही. विलाप ही दुबळी भावना आहे. तीचे प्रदर्शन न करणारी मराठीतील एलेजी अधिक सखोल आहे असे म्हणणे अधिक उचित. हा मराठी कवी विरुद्ध आंग्ल कवीवाद बाजूला ठेवला तर ही प्रस्तावना म्हणजे इंग्रजी एलेजीचाच नव्हे तर इंग्रज कवींचाही संपूर्ण सखोल मागोवा घेणारा प्रबंध आहे, कवीचे व्यक्तिमत्व, काव्यातील तत्वज्ञान, अत्यंत सुलभ भाषेत स्पष्ट केले आहे. हे सर्व करताना संस्कृत काव्यापासून तर इंग्रजी काव्यापर्यंत व एकूणच वाङ्मयेतिहासापर्यंत भाऊसाहेब कुठलाही बोजडपणा न आणता वाचकाला सहज फिरवून आणतात. ही माडखोलकरांची हातोटी पत्रकारितेतून आली आहे.

'राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज' या श्री बाबा मोहोड लिखित ग्रंथाला दिलेली प्रस्तावना, माडखोलकरांची दुसरी चांगली प्रस्तावना आहे. ती एक ललित समीक्षाच आहे. प्रस्तावनाकाराकडून अपेक्षित असलेली, ग्रंथाची परिपूर्ण ओळख तर माडखोलकर करुन देतातच, त्याचबरोबर लेखकाच्या त्रुटी अत्यंत सौजन्याने दाखवून विधायक समीक्षेचा नमुनाही सादर करतात. ते लिहीतात, "या पुस्तकाच्या पानापानातून जो उत्कट भावनांचा गंध दरवळत आहे तो लोकांच्या मनाला हलवून सोडील, भावना हळव्या तशी भाषाही हळुवार, लिहिण्याची सरणही कालव्यातून संथपणे झुळझुळ वाहणाऱ्या पाण्याच्या ओघासारखी शांत आणि सात्विक." असे भरभरुन वस्तुनिष्ठ मूल्यमापन करुन पुस्तकाचे ऐतिहासिक मोल भाऊसाहेब स्पष्ट करतात. त्याचवेळी ते लिहीतात, "कालक्रमानुसार हे लेख एकत्र ग्रंथित केले असते तर शेवटल्या दोन अडीच वर्षांत (महाराजांवर) मृत्युची छाया कशी पडत चाललेली होती याची कल्पना आली असती. हे जसे सहज असे लिहिलेले लेख आहेत, तसेच ते हाताला लागले तसे पुस्तकात घातलेले आहेत. जणु पुण्यतिथीचा मुहूर्त साधण्यासाठी, हाती लागलेल्या फुलांची निवड न करताच, घाई-घाईने कशी तरी गुंफलेली ही माळच आहे." भाऊसाहेब नुसतीच समीक्षा करुन थांबत नाहीत तर स्वतःच्या ज्ञानातून आणि तुकडोजी महाराजांच्या परिचयातून त्यांच्या जीवनाचे विविध पैलू मर्मज्ञतेने उलगडून दाखवितात. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज याची सगळ्यात मोठी देणगी म्हणजे 'त्यांनी दिलेले, हिंदुधर्मात व समाजात आजवर नसलेले, मानव सेवेच महान तत्व, अशा शब्दात', ते महाराजांची महती सांगतात. त्यातील एक अनुभव बोलका ठरावा. भाऊसाहेबांनी तुकडोजींना चर्चेच्या दरम्यान विचारले की, "महाराज, आपण बांधलेल्या या मंदिरात इतर धर्माचे अनुयायी कधी येऊन प्रार्थना करतात का? त्यावर, महाराज म्हणाले, "शीख, ईसाई व पारशी येऊन गेलेत पण.. मुसलमानांच्या काळजाला काही माझी हाक जाऊन भिडलेली नाही.... जिथे महात्माजींनी हात टेकले, तिथे माझा काय पाड?" महाराजांनी माडखोलकरांकडे बोलून दाखविलेली दुसरी व्यथाही अशीच उद्बोधक आहे. धर्मांतरासाठी अनन्वीत अत्याचार करणाऱ्या सोळाव्या शतकातील, स्पॅनिश मिशनरी सेंट झेवियरच्या पोर्तुगीज चर्चला सरकारने दिलेल्या मदतीचा विषय होता. महाराज म्हणाले, "धर्मातीत राज्यात असा पक्षपात का चालावा, हे कळत नाही. हिंदु देवालयासाठी सरकार कवडीही खर्च करीत नाही. मशिदी आणि चर्च यांच्यासाठी पैशाचा पाऊस पडतो!" महाराज सर्वधर्मसेवाभावी तर माडखोलकर मार्क्सवादाकडे झुकलेले. पंथीयत्वाचा आरोप नसणाऱ्या दोन सामाजिक विचारवंतातील हा संवाद वस्तुस्थितीवर विदारक प्रकाश टाकतो. प्रत्येक प्रस्तावनेतून असा एक एक इतिहास समोर येतो.

'हाक' या साहित्य सम्मेलनातील माडखोलकरांच्या भाषण संग्रहाची, प्रस्तावना साहित्यिकाची सामाजिक बांधिलकी स्पष्ट करणारी असून नव लेखकासाठी मौलिक व मार्गदर्शनपर ठरावी. संयुक्त महाराष्ट्र होणे हे माडखोलकरांचे जीवनध्येय. त्यामुळे, साहित्य सम्मेलनातील भाषण असो वा अन्य कुठलेही, माडखोलकर महाराष्ट्राच्या एकीकरणाचा विषय रेटत. यावर पां. वा. गाडगीळ टीका करताना म्हणाले, "नाजुक सुवासिक फुलांचा सडा अंगावर पडेल अशा आशेने आपण पहाटेच्या वेळी प्राजक्ताच्या झाडाखाली जाऊन उभे रहावे आणि त्याऐवजी अचानक गारपीट व्हावी, तसा हा प्रकार" उत्तरादाखल माडखोलकर म्हणतात की, "अशा प्रकारची 'अनुचित' भाषणे करण्याचा प्रसंग का ओढवला... .माझ्या मर्यादा मला समजतात. माझे औचित्याचे भानही तीव्र आहे. मग राजकीय प्रश्नाला हात घालण्याच्या भानगडीत मी का पडलो? त्याचे एक कारण, स्वतःच्या अंतःकरणाची अनिवार्य ओढ... दुसरे प्रबळ कारण प्रांतपुनर्घटनेच्या कैफियती सादर करायला जबाबदार संस्था इतर प्रांताप्रमाणे महाराष्ट्रातून (नाहीत)...... म्हणून साहित्याचे

अनुक्रमणिका

जे जे व्यासपीठ माझ्या तावडीत सापडले, त्याचा उपयोग मी बेदरकारपणे केला. साहित्यिक हा समाजापासून अलिप्त राहूच शकत नाही” हा मुद्दा येवढया समर्पक कृतीतून सांगण्याची ही पद्धती माडखोलकरांची तळमळ आणि ध्येयाप्रती निष्ठा तर दाखवते त्याचबरोबर साहित्यिकांच्या सामाजिक बांधिलकीविषयीची त्यांची कल्पनाही स्पष्ट करते. भाषावार प्रांतरचना केवळ राजकीय विषय नसून भाषेच्या प्रांतातला असल्याने साहित्य सम्मेलनाचा विषयही आहे हे त्यांनी समकालीन साहित्यिकाच्या गळी कसे उतरवले, आदी सर्व इतिहास या प्रस्तावनेत आहेत. सर्वच काळात काही भित्रे, काही शब्दशः वागणारे, काही औचित्याच्या नावाने विवादातून पळवाट काढणारे दिग्गज साहित्यिकातही असतात, हे सर्व सत्य ते समाजासमोर उघड करतात. ही प्रस्तावना साहित्यिकाला सामाजिक, राजकीय वगैरे कप्पे पाडून आपले आपले दायित्व जगता येत नाही हे तत्व स्पष्ट करुन लेखकाने आपल्या सर्वव्यापी ज्ञानाचा उपयोग लोकाना कसा द्यावा याकडे संकेत करते. जागतिक संदर्भात भारताचा आर्थिक सामाजिक प्रदीर्घ आढावा घेतल्यावर ते, लिहीतात, “आज मुंबई शहर हे महाराष्ट्राचा द्रव्यशोष करुन त्याच्या आर्थिक आणि राजकीय जीवनावर हुकमत गाजवणाऱ्या भांडवलशाहीचा बालेकिल्ला होऊन बसलेले आहे. हा बालेकिल्ला पाडल्याशिवाय, मुंबईत तळ देऊन महाराष्ट्राचे आर्थिकजीवन शोषित आणि नियंत्रित करणाऱ्या भांडवलशाहीचा नाश होवून हा बालेकिल्ला महाराष्ट्रात अंतर्भुत झाल्याशिवाय महाराष्ट्राचे पुनरुत्थान होणार नाही” ही मांडणी लेनिनच्या लेखन शैलीची आठवण करुन देणारी आहे. माडखोलकरांची सामाजिक प्रज्ञा आणि त्यांचा जीवनविषयक मार्क्सवादी दृष्टिकोन येथे सुस्पष्टपणे उमटतो.

‘मुक्तात्मा’ कादंबरीच्या नंतरच्या आवृत्तीत लिहिलेल्या निवेदनात साहित्यिकाने आपल्यावरील टीकेचा परामर्ष कसा घ्यावा याचा बोध मिळतो. ‘मुक्तात्मा’ प्रसिद्ध झाल्यावर नायिकेला धरुन उडालेल्या गदारोळाचा इतिहास येतो. त्यांच्या भगिनी स्वरुप सुहृद स्त्रीच्या जीवनावर ही कादंबरी आहे हा काही अंशी खरा समज. कादंबरीत कालसापेक्ष ‘अश्लिलता’ आहे. हा वाद विषय. त्यामुळे, विशेषतः आपल्या पतीला काय वाटेल या आशंकेने ती स्त्री काही काळ व्यथित झाली. पत्रव्यवहारही घडून आला. त्यातून नंतरच्या आवृत्तीत खुलासे प्रती खुलासे येतात. पण काळ ताजा असल्याने हे सर्व खुलासे हातचे राखून येतात. माडखोलकर स्वतःच अन्यत्र म्हणतात. “साहित्यातील पात्रे आणि प्रसंग निर्माण करण्यासाठी आपण कोणत्या सामग्रीचा वापर केला हे वाचकांना विश्वासात घेऊन सांगावे की नाही, हा  तर नाजूक प्रश्न आहे.... सद्यस्थितीत शक्य वाटले तेवढे (स्पष्टीकरण) केले”.  तरीपण, समकालीनांना ओळखू यावीत अशीच बहुतांशी पात्रे त्यांच्या कादंबऱ्यातून आहेत. आणि प्रत्येकवेळी वादही झाला आहे. तत्कालीन दादांची एक गंमत जाणवते. पात्र जेवढे वाईट तेवढे ते आपणच आहोत असे एकाच वेळी अधिकांना वाटते. आपली बदनामी झाल्याचीही प्रत्येकाची खात्री असते. त्यातूनच तो मी नव्हेच हे नाट्यही सुरु होते. आज कदाचित पारदर्शकतेमुळे किंवा पसिद्धी वा खळखळ उडविण्याची हौस म्हणून कोणाला काही वाटणार नाही. एक निश्चित, माडखोलकरांची पात्रे ओळखू येतात ती झाकण्याचा विशेष प्रयत्नही ते करीत नाहीत. लोक ज्याला ‘खोडकरता’ म्हणायचे अशी मिस्कीलता माडखोलकरांमध्ये भरपूर होती.

‘चंदनवाडी’ या कादंबरीत ही पात्रे जवळ जवळ वास्तव चितारण्याचा खुलासा विस्ताराने येतो. महत्वाचे कारण त्यांच्याच शब्दात असे, “एखादी विशेष घटना अवलोकिल्यावर किंवा अनुभवल्यावर तिचा जो ठसा माझ्या मनोबुद्धीवर उमटतो. तो असा काही जोरकस आणि खोल असतो की, त्याचे वर्णन किंवा विश्लेषणा करावयाला नंतर जी तटस्थतेची अवस्था यावी लागते ती मला साधलेली नाही. त्यामुळे, अवलोकनात आणि

अनुक्रमणिका

अनुभवात आलेल्या ........ त्यांचे वर्णन शक्यतो सहृदयतेने करण्याचा प्रयत्न मी केला आहे”. अर्थात, पुढे ते असेही म्हणतात, “केवळ पाहिलं ते लिहायला लागतो तर तर मग त्यात माझं चातुर्य ते काय राहिलं?.... पात्रे जशी निव्वळ काल्पनिक नसतात, तशीच ती निव्वळ वास्तविकही नसतात... काही सावधता, आणि बरेचसे सत्य या स्पष्टीकरणात आहे. पण माडखोलकरांचा पिंड वास्तव पूर्णत्वाने साहित्यात उतरविण्याचाच होता. श्रीमती माडखोलकरांकडे खुलासा करताना ते म्हणतात, “समाजजीवनाचा टीकाकार म्हणून जो मनुष्य ललित वाङ्मय लिहितो. त्याच लिहिणं वस्तुनिष्ठ असणं अत्यंत आवश्यक आहे.... समकालीन जीवनातील वैगुण्य आणि वैशिष्टय ही दोन्हीही प्रातिनीधिक रुपात घेताना.... कोणत्याही प्रकारचं अति रंजन किंवा कोणालाही अन्याय होणार नाही ही दक्षता घेणं त्याचं कर्तव्य आहे”. तेव्हा त्यांची पात्रं आजूबाजूचीच होती. त्यात कल्पनाविलास जसा माडखोलकरांना मान्य नाही तसाच मूळ प्रतिकांवर अन्यायही मान्य नाही. ज्यांच्यावर ही पात्रे रचली आहेत त्यांनीही अन्याय न झाल्याचे लेखी मान्य केले आहे. शिवाय, सत्य हे कल्पिताहून अधिक अद्‌भूत असते. या दृष्टीने माडखोलकरांचा वास्तवाला धरुन राहण्याचा विचार योग्यच वाटतो. ‘चंदनवाडी’ कादंबरीचा आचार्य अत्र्यांना न पटलेला चंदनच्या मृत्युचा दुःखांत शेवट सत्यावर आधारित असल्याने, माडखोलकरांना तो काल्पनिक किंवा चातुर्यपूर्ण शेवटापेक्षा अधिक योग्य वाटतो.

‘महाराष्ट्राचे विचारधन’ हया ग्रंथाची प्रस्तावना लेखनात झालेल्या कालसापेक्ष बदलाचा प्रत्यय देते. अलिकडच्या काळात, मुद्रण खर्च वाचविण्यासाठी म्हणा, अगर वेळेअभावी म्हणा, प्रस्तावना आभारापुरती लिहिली जाते. ललित लेखनात तर अनेकदा प्रस्तावना नसतातच. विचारधनची प्रस्तावना अशीच आभारासाठी वापरली आहे. तरीपण, कृतज्ञतेचा एक हळुवार वैदर्भीय नमुना भाऊसाहेब सादर करतात. अर्पण पत्रिकेविषयी ते लिहितात, “(आचार्य विनोबांचे) आणि माझे बहुतेक सर्व बाबतीत मतभेद असताना देखील त्यांची मजवरील माया कायम आहे, हे मी सुदैव समजतो. या पुस्तकातील विचार आणि विवेचन दोन्ही त्यांना रुजण्यासारखी नाहीत, तथापि, आपल्याविषयीची माझी आंतरिक भावना लक्षात घेवून, अनुमतिविना केलेल्या समर्पणाचा ते स्वीकार करतील, अशी मला खात्री आहे.” यातील दुसरा भावनिक प्रसंग मनाला चटका लावणारा आहे. एका पाल्याला उद्देशून आलेले हे वाक्य पहा : “अरे, कुठे चाललास मला सोडून दत्ता? तू जरी मनात आणलेस, तरी मला तू सोडू शकणार नाहीस, आणि मलाही तुझ्या काही गोष्टी आवडल्या नाहीत तरी मीही तुला सोडू शकणार नाही. हा कर्मबंध आहे बेटा, मृत्यूनेच तो तुटत असतो.” प्रत्येक प्रस्तावनेत असा एक एक बोध होतो. सहृदय माडखोलकरांचा आणि जीवनविषयक तत्वज्ञानाचा साक्षात्कार होतो. मग प्रस्तावना लहान असो वा मोठी.

‘मी आणि माझे साहित्य’ या ग्रंथाची माडखोलकरांची प्रस्तावना त्या ग्रंथाचा एक तृतीयांश भाग व्यापते. एकूण अडतिस पृष्ठांपैकी बावीस पृष्ठे डॉ. माधवराव पटवर्धन व माडखोलकर यांच्यातील वितुष्टावर खर्ची पडले आहेत. आपली बाजू मांडून झाल्यावर माडखोलकर शेवट करतात, “इतके थैमान केल्यावर हा ‘वेताळ’ शांत झाला.” हा लेखन स्पर्श वाचताच आधीचा निरस वाटणारा भाग वाचून कंटाळलेला वाचक भान विसरुन, ‘अहा’ ! म्हणून, दाद देतो. ही प्रस्तावना सामान्य वाचकाऐवजी चरित्रकारांसाठीच अधिक उपयुक्त आहे. विस्तार भयाच्या अभावी पुनरोक्तिचेही भान काही वेळा सुटते, याचा अनुभव येथे येतो. विशेषतः ग्रंथ वेगळा असला की तेच ते विचार लिहिण्याचा मोह होतो. पण अशा त्रुटी विरळच.


अनुक्रमणिका

'मी आणि माझे वाचक' या ग्रंथात जे निवेदन आहे ते गोवा करारावरील वादाच्या संदर्भात आहे. या निमित्ताने काही जुने आरोपही ताजे झाले. तो सर्व इतिहास उपलब्ध आहे. जिज्ञासुंनी मुळातूनच तो वाचावा. येथे नमूद करण्याची बाब म्हणजे त्यातील श्री. कन्नमवारांचे बुद्धिमान दर्शन. आचार्य अत्र्यांनी पूर्वग्रहित केलेल्या वाचकांना ते उद्‌बोधक वाटेल. माडखोलकरावरील महाराष्ट्र टाइम्स मधील टीकेच्या संदर्भात ते म्हणतात, "भाऊसाहेब, तिच्याबद्दल (टीकेबद्दल) तुम्हाला आनंदच वाटला पाहिजे. कारण, तर्कतीर्थांच्या विश्वासातील रॉयिस्ट लेखक त्या वृत्तपत्राचे संपादक आहेत. आप बदनाम हुअे लेकिन नाम तो हुआ ना! आपण तिघा चौघांनी सह्याद्रि बंगल्यात बसून काय खलबते केली हे जाणून घेण्याची तीव्र जिज्ञासा लोकात उत्पन्न झाली हा फायदाच समजतो." सारांश माडखोलकरांची प्रस्तावना अन्य ग्रंथकारांच्या प्रस्तावना प्रमाणे भूमिकारुप माहिती पुरवीतेच. पण त्याचवेळी प्रत्येक प्रस्तावना म्हणजे एक लेखच होय. त्यात केवळ भूमिका नसते, केवळ स्वसमर्थन नसते, केवळ तार्किकता नसते, केवळ टीकाही नसते, केवळ आभारही नसतात. भूमिकेच्या जोडीला तत्वज्ञान, स्वसमर्थनाच्या जोडीला न्यायाची बूज, तार्किकतेच्या जोडीला अनुभवाधिष्ठित भाष्य, टीकेच्या जोडीला विधायक सूचना, आभाराच्या जोडीला उत्कट संदर्भ येतात. लालित्यपूर्ण शैली वापरुनही ते मांडणीतून संदर्भांची मौलिकता वाढवतात. अगदी, विद्यापीठीय प्रबंध लेखकांनी धडा घ्यावा असे ते विवेचन आहे. भाऊसाहेब वाचकांना आपल्या साहित्याची ओळख प्रांजळपणे करुन देतात. आत्मश्लाघा न करता आत्मदोष उघड करतात. वाचकाला बौद्धिक आनंद मिळतो. रोचकता व उद्‌बोधकता यांच्या जोडीला थोडी मिस्कीलता यांचे मिश्रण ही पत्रकाराची शैली या सर्व लेखनात दिसून येते.

प्रस्तावनेत परिपूर्ण लेखनाचे सर्व गुणविशेष माडखोलकर समृद्धपणे साकार करतात. महत्वाचे म्हणजे हे सर्व अत्यंत सुलभतेने भाऊसाहेब करतात. प्रस्तावना म्हणजे लेखकाचा श्रोतृवृंदाशी जिव्हाळ्याचा संवाद होय. वऱ्हाडी अघळपघळपणे जवळ जवळ बोलभाषेतच ते वाचकांशी संवाद साधतात. हेच त्यांचे आगळेपण. माडखोलकरांच्या प्रस्तावनांचा एक लेख संग्रह निघावा व आजवर दुर्लक्षित राहिलेले त्यांचे हे लेखन वैशिष्ट्य वाचकांसमोर यावे. तसे घडल्यास या अल्प टिपणाचे सार्थक होईल.

❋❋❋

अनुक्रमणिका



**अनोख्या व्यक्तिमत्वातील भाऊराव**

अनुक्रमणिका

## श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकरांचा जीवनपट

| | |
|---|---|
| २८ - १२ - १८९९ | जन्म (पोभुर्ले) |
| १९१० | मातृनिधन (पार्वती) |
| १९१८ | मॅट्रिक नापास १९१९ |
| १९१९ | केशवसुतांचा संप्रदाय (टीकालेख) |
| १९१९ जून | 'शिवप्रभूस' कविता प्रसिद्ध झाली |
| १९२० मे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशी भेट |
| १८ - ०१ - १९२१ | 'केसरी' त सिनफेन चळवळीवरील पहिला लेख प्रसिद्ध |
| ०६ - ०२ - १९२१ | केळकरांचे प्रशस्ती पत्र |
| १२ - ०२ - १९२१ | केळकरांशी भेट |
| १९२१ जुलै | पुण्यात आगमन |
| १९२१ ऑक्टोबर | 'आधुनिक कविपंचक (पहिला ग्रंथ) |
| २४ - ०६ - १९२३ | पितृनिधन (त्र्यंबकराव) |
| १९२२ नोव्हेंबर ते १९२४ | सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचा आधार |
| १९२३ | चिपळुणकर, काल आणि कर्तृत्व प्रबंधाचे प्रकाशन |
| १९२३ मार्च ते १९२४ जुलै | 'ज्ञानप्रकाशा' च्या दोन सदरांचे संपादक |
| १९२४ ऑगस्ट | नागपुरास आगमन |
| २७ - ०८ - १९२४ | 'महाराष्ट्र' साप्ताहिकाचे सहसंपादक |
| २९ - ०५ - १९२५ | विवाह ( शांताबाई) |
| ०६ - ०८ - १९३० | जंगल सत्याग्रहात भाग, चार महिने सश्रम कारावास |
| १९३२ | पहिली प्रस्तावना : चंद्रशेखरांच्या काव्यसंग्रहास |
| १९३३ मार्च | 'मुक्तात्मा' कादंबरी (पहिली) |
| १९३५, ३६ | कादंबरी 'भंगलेले देऊळ', 'शाप' |
| १९३७ | 'शांतानिवास' (धंतोलीत) वास्तव्यास आले. |
| ०७ - ०६ - १९३७. | महेश्वरच्या मध्य भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद |
| १९३८ | 'शुक्राचे चांदणे' कथासंग्रह |
| | स्वैरविचार लेखसंग्रह |
| ०६-०१-१९४० | उज्जयिनी महाराष्ट्र वाङ्मय सभा अध्यक्ष |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| २९ - ०५ - १९४० | अध्यक्ष, शारदोपासक संमेलन (पुणे) |
| ०६ - ११ - १९४० | अध्यक्ष, मुंबई प्रांतिक साहित्य संमेलन (कल्याण) |
| ०१ - ०२ - १९४१ | अध्यक्ष, मराठी वाङ्मय परिषद (बडोदे) |
| २३ - ०७ - १९४१ | अध्यक्ष, मराठी ग्रंथ संग्रहालय बेचाळीसावा वार्षिकोत्सव (मुंबई) |
| ३० -११ - १९४३ | 'महाराष्ट्र' साप्ताहिकाचा राजिनामा |
| ०२ -०१ - १९४४ | 'तरूण भारत' दैनिकाचे मुख्य संपादक |
| १९४४ नोव्हेंबर | सांगली विलिंग्डन कॉलेज, मराठी वाङ्मय मंडळ, अध्यक्ष (वार्षिकोत्सव) |
| १२ - ०५ - १९४६ | महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे (तिसावे) अध्यक्ष, बेळगाव |
| २८ - ०७ - १९४६ | संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना, चिटणीस |
| ०२ - ०२ - १९४८ | 'तरूण भारत' व 'शांतानिवास' चा विध्वंस |
| १९४८ फेब्रुवारी | एका निर्वासिताची कहाणी (आत्मकथनात्मक) |
| १८ - ०८ - १९५० | पत्नीचे निधन |
| १९५७ | अमेरिकेचा दौरा |
| १९६४ | युरोपचा दौरा |
| १९६७ | 'तरूणभारता' तून निवृत्त |
| ०८ - ०९ - १९७५ | 'अकेला' कादंबरी अखेरचा ग्रंथ |
| २७ - ११ - १९७६ | मृत्यु - नागपूर मुक्कामी |

(संकलन : - सौ. कीर्ती मंगरूळकर)

## ग. त्र्यं. माडखोलकर : ग्रंथसंपदा

| | |
|---|---|
| १९२१ | आधुनिक कविपंचक (टीकाग्रंथ) |
| १९२३ | विष्णु कृष्ण चिपळूणकर |
| १९२७ | विलापिका (टीकात्मक) |
| १९३४ | विष्णु कृष्ण चिपळूणकर द्विविध दर्शन |
| १९३४ | मुक्तात्मा, भंगलेले देऊळ (कादंबरी) |
| १९३६ | शाप (कादंबरी) |
| १९३७ | वाङ्मयविलास |
| १९३८ | स्वैरविचार, शुक्राचे चांदणे (कथासंग्रह) |
| १९३९ | कांता, दुहेरीजीवन (कादंबरी) |
| १९४० | मुखवटे (कादंबरी) अवशेष, रातराणीची फुले (कथासंग्रह) |
| १९४१ | नवे संसार (कादंबरी) 'आव्हान' |
| १९४२ | डाकबंगला, नागकन्या (कादंबऱ्या) माझी नभोवाणी |
| १९४३ | चंदनवाडी (कादंबरी) परामर्ष, जीवनसाहित्य |
| १९४६ | सुभाषवाद, दोनतपे |
| १९४८ | हाक |
| १९४९ | एका निर्वासिताची कहाणी |
| १९५० | अनघा (कादंबरी) |
| १९५३ | स्वप्नांतरीता (कादंबरी) |
| १९५६ | अरुंधती (कादंबरी) |
| १९५९ | प्रमद्वरा (कादंबरी), रूक्मिणी |
| १९६३ | उर्मिला (कादंबरी) मी पाहिलेली अमेरिका |
| १९६४ | निर्माल्य, उर्वशी (नाटक) देवयानी (नाटक) |
| १९६५ | माझे आवडते लेखक, माझे लेखन गुरु, माझे आवडते कवी |
| १९६६ | व्यक्तिरेखा |
| १९६७ | पखरण |
| १९६८ | मी आणि माझे साहित्य, सत्यभामा (कादंबरी) |
| १९७० | साहित्य शलाका, व्यक्ती तितक्या प्रकृती |
| | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : व्यक्तिदर्शन |
| १९७२ | जन्मदुर्दैवी (कादंबरी), साहित्यसमस्या मी आणि माझे वाचक |
| १९७३ | महाराष्ट्राचे विचारधन, समग्र कोल्हटकर खंड |
| १९७४ | श्रद्धांजली |
| १९७५ | रेणुका (कादंबरी) |
| १९७५ | अकेला (कादंबरी) |

अनुक्रमणिका

एकूण पंचाव्वन ग्रंथसंपदा आणि तरूण भारतातील अग्रलेख पाचहजारांवर अशी अजोड - अमोल साहित्यानिर्मिती माडखोलकरांचे खाती जमा आहे.

अनुक्रमणिका

## माडखोलकरांवरील निवडक संदर्भ साहित्य


१. तीर्थस्वरूप भाऊराव : सौ. उमा माडखोलकर, रुद्रवाणी दिवाळी अंक, नोव्हेंबर १९६५

२. माझ्या माहितीचे माडखोलकर : अरविंद ताटके, दीपावली, फेब्रुवारी १९७०.

३. भाऊराव माडखोलकर - एक गमतीदार व्यक्तिमत्व : जयवंत दळवी, ललित, फेब्रुवारी १९७५.

४. विशाल, विविध, भोगलोलुप मानवी जीवन दाखविणारे कादंबरीकार : जयवंत दळवी, लोकसत्ता, २९ - १२ – १९७६

५. सामाजिक व साहित्य क्षेत्रातील आधुनिक परशुराम : ले. प्रा. वि. ह. कुलकर्णी, म. टाईम्स, २९ - १२ – १९७६.

६. संपन्न व्यक्तिमत्व - गत्र्यं : ले. डॉ. रा. शं. वाळिंबे, रुद्रवाणी, डिसेबंर १९७६.

७. वादळी व्यक्तिमत्व : रुद्रवाणी, डिसेंबर १९७६.

८. ग. त्र्यं. श्रद्धांजली : कवी यशवंत, रुद्रवाणी, डिसेंबर १९७६.

९. पत्रकार माडखोलकर : वि. स. वाळिंबे, म. साहित्य पत्रिका, नोव्हेबर- डिसेंबर १९७६.


१०. माडखोलकर कसे होते? : वि. ह. कुळकर्णी, नवशक्ती.

११. गत्र्यं मराठी साहित्यदर्शन : संपादक प्रा. सुरेश डोळके, १९५९.

१२. माडखोलकर वाङ्मय आणि व्यक्तिमत्व : मा. का. देशपांडे, १९४८.

१३. मुलांसाठी माडखोलकर : संपादक परांजपे, १९४२. १४. मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत - प्रा. रा. शं. वाळिंबे.


अनुक्रमणिका



**वृद्धकाळातील भाऊरावांचे अखेरचे छायाचित्र**

अनुक्रमणिका